# मेहता मराठी ग्रंथजगत

## दीपावली विशेषांक

वर्ष सहावे • अंक दहावा

प्रसिद्धी १५ ऑक्टोबर २००६

संपादक
**सुनील मेहता**

★

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

★

संपादन सहाय्य
**अनिरुद्ध पाटील**

★

विशेष सल्लागार
**सुनीता दांडेकर**

★

मांडणी व अक्षरजुळणी
**मेहता पब्लिशिंग हाऊस**

**किंमत ४० रु.**

वार्षिक वर्गणी १००रु.
तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.
३ व ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोनभवन समोर, पुणे ३०

या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका

## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

### माझा वेळ आणि मी


| | |
|---|---|
| संदीप खरे | ९ |
| रत्नाकर मतकरी | १२ |
| संजीव अभ्यंकर | १७ |
| डॉ. आनंद यादव | २० |
| वीणा पाटील | २३ |
| अविनाश पंडित | २६ |
| संजय आवटे | २८ |
| प्रवीण दवणे | ३३ |
| प्रा. रा. रं. बोराडे | ३६ |
| मकरंद टिल्लू | ३९ |
| शरद दळवी | ४२ |
| केशव मेश्राम | ४५ |
| भालचंद्र पानसे | ४९ |
| नसिमा हुरजूक | ५३ |
| दीपक टिळक | ५७ |
| मृणालिनी गडकरी | ६० |
| विवेक सबनीस | ६३ |
| गिरिजा कीर | ६७ |
| विनिता पिंपळखरे | ७० |
| सुरेश नाईक | ७२ |
| सुवर्णा दिवेकर | ७५ |
| अरुण पटवर्धन | ७८ |
| श्याम भुर्के | ८१ |
| दीपक आलेगावकर | ८३ |
| महेश लिमये | ८६ |
| शुभदा चौकर | ८९ |
| जालंदर सोनुने | ९४ |


### परदेशात जपलेला मराठी बाणा


| | |
|---|---|
| दिवाकर कारखानीस | १०२ |
| मनोज शहाणे | १०४ |
| डॉ. जगन्नाथ वाणी | १०६ |
| डॉ. जगन्नाथ वाणी | १०८ |
| विजया दंडे | ११० |
| जयश्री हुपरीकर | ११३ |
| उषादेवी कोल्हटकर | ११६ |
| उषादेवी कोल्हटकर | ११८ |
| ललिता गंडभीर | १२१ |
| डॉ. शारदा सबनीस | १२३ |
| माधवी सबनीस | १२५ |
| वसंत घाग | १२७ |


### वंदे मातरम्


| | |
|---|---|
| डॉ.द. भि. कुलकर्णी | १२९ |


### माझा वाचनप्रवास


| | |
|---|---|
| डॉ. बाळ फोंडके | १३५ |
| डॉ. आनंद पाटील | १३९ |
| दीपक शिकारपूर | १४२ |
| **स्पर्धेतील लेख** | |
| समीर मोने | १४४ |
| प्रभाकर कर्वे | १४६ |
| अर्चना ठोके | १४७ |
| सुधा चान्दोरकर | १५० |
| शालिनी वैद्य | १५१ |
| श्रीकृष्ण कर्वे | १५३ |
| ब. अ. अळवणी | १५६ |
| माधव साने | १५८ |
| सुमेधा पोळ | १६० |
| मेधा तेलंग | १६२ |


### बालनगरी


पान नं. १६४


**मुखपृष्ठ**
चंद्रकांत जोशी

**आतील चित्रे**
मुकुंद तळवलकर
चंद्रकांत जोशी

# विश्वचि माझे घर

मेहता मराठी ग्रंथजगतचा यंदाचाही दिवाळी अंक मोठ्या आकारात, वैविध्यपूर्ण साहित्याचा नजराणा घेऊन वाचकांच्या आनंदात भर टाकण्यासाठी येत आहे. गेल्या वर्षी प्रथमच ग्रंथजगतचा अंक मोठ्या आकारात निघाला; त्याचे स्वागत चांगले झाले. त्याला सगळीकडून मागणी आली. रसिकांची प्रशस्तिपर पत्रेही बरीच आली. ग्रंथप्रसार हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून ग्रंथजगतची जी वाटचाल गेली दहा वर्षे चालू आहे तिचा प्रा. रा. ग. जाधव प्रभृतींनी मुक्तकंठाने गौरव केला. ''साहित्य सृष्टीत वाचक हा खरा केंद्रबिंदू असून लेखक, समीक्षक व प्रकाशक हे त्याच्या ग्रह-उपग्रहांप्रमाणे कार्यरत असतात... आमचाही एक वाङ्मयीन अड्डा, आमची आवडती पुस्तके, आमचे वाचन वगैरे स्पर्धांद्वारे आपली मनोगते व मते मांडण्याचा अवसर देऊन वाचकांनाही यात स्थान देण्यात आले आहे... समर्थ वाचकांतूनच प्रगल्भ लेखकाची निर्मिती होत असते'' असे उद्गार या अंकाचे प्रकाशन करताना विख्यात समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी काढले.

यंदाच्या मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकातही वाचकांची आवडनिवड आणि वाचनसंस्कृतीची अभिरुची जाणून घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. 'माझ्या वाचनाची दिशा' यावर डॉ. बाळ फोंडके, दीपक शिकारपूर यांच्यासारख्या मान्यवरांनी लिहिलेले आहे; त्याचबरोबर वाचकांसाठीही 'माझा वाचनप्रवास' ही एक स्पर्धा लावण्यात आलेली होती. त्यातही महाराष्ट्राच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर वाचकांची मनोगते आली. त्यातील काही मनोगते या अंकात आपल्याला आढळतील. एकेका दशकात कोणती पुस्तके वाचकांच्या हाती पडत होती आणि त्याद्वारे त्यांच्या जडणघडणीला, व्यक्तिमत्त्वाला, जीवनविषयक दृष्टिकोनाला कशी चालना मिळत होती हे या लेखांवरून आपल्या लक्षात येते. गावोगावच्या ग्रंथालयांची आणि वाचनालयांची वाचनसंस्कृती जोपासनेला होणारी मदतही त्यावरून जाणवते. बहुसंख्य वाचक आरंभीच्या काळात वाचनालयांतूनच आवडीची पुस्तके मिळवतात...

शाळेच्या ग्रंथालयातल्या पुस्तकांद्वारे मुलांचे भावविश्व फुलत जाते आणि ते आयुष्यभराची शिदोरी देत राहते – असे अनेक वाचकांच्या निवेदनातून स्पष्ट होते. या दृष्टीने शाळा-महाविद्यालयातील ग्रंथालयांचे महत्त्वही नकळत मनावर बिंबते.

शाळा-कॉलेजचा टप्पा ओलांडल्यावर आवडीनिवडीला नित्य नवे खाद्य पुरवत राहतात आणि त्याची वाचनाची आवड टिकवून ठेवतात असेही ध्यानात येते. तेव्हा ग्रंथालये अद्ययावत असणे, समृद्ध असणे, नवीन प्रकाशित होणाऱ्या पुस्तकांची सतत भर पडत राहणे आवश्यक आहे... ग्रंथालये हा वाचनसंस्कृतीच्या प्रसारातला आद्य घटक आहे हे जाणून घेऊन गावोगावी असणारी ग्रंथालये समृद्ध करणे आणि नवी ग्रंथालये काढत राहणे अशी मोहीमच हाती घ्यायला हवी. ग्रंथालयांना मिळणारी अनुदाने वाढायला हवीत; तसेच ती वक्तशीर उपलब्ध व्हायला हवीत. ग्रंथालय हे त्या त्या गावातील, त्या त्या भागातील एक सांस्कृतिक केंद्र म्हणून, ज्ञानाचे व माहितीचे भांडार म्हणून, विविध कार्यक्रमांनी गजबजलेले, जिज्ञासू व रसिक आबालवृद्धांना एकत्र आणून त्यांच्यात संवाद साधणारे स्थळ म्हणून विकसित व्हायला हवे. या दृष्टीने जिल्हानिहाय ग्रंथालय संघांनाही मोठे कार्य करण्याची संधी आहे. आमदार-खासदार निधीतून पुणे जिल्ह्यात दीडशेवर ग्रंथालये उभी राहिली आहेत. तालुका, जिल्हा ग्रंथालय संघटनांनी आपल्या आमदार-खासदारांना त्यासाठी आवाहन करायला हवे.

वाचकांच्या हाती कोणती पुस्तके जात आहेत आणि त्याद्वारे अभिरुचीला कशी दिशा मिळत आहे हे नकळत या स्पर्धेतील लेखांवरून उलगडत जाते. केवळ टाइमपास म्हणून, मनोरंजन म्हणून काही वाचक पुस्तकांकडे पाहतात; परंतु बहुसंख्य वाचक हा टप्पा ओलांडून अधिक कसदार, कलात्मक, वैचारिक, चिंतनपर पुस्तकांकडे वळतात हेही या लेखांद्वारे लक्षात येते. एकूणच वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेऊन, ग्रंथपाल, प्रकाशक, संपादक, लेखक अशा साहित्यसंस्कृतीशी निगडित असणाऱ्या घटकांनी आपापल्या कार्यक्षेत्रात इष्ट ते प्रयोग करण्यास सज्ज रहायला हवे असाही एक संदेश त्याद्वारे मिळतो.

विविध क्षेत्रातील नामवंत व्यक्ती – आपल्या वेळेचे नियोजन कसे करतात, आपल्या आवडीच्या कामासाठी जास्तीत जास्त वेळ कसा काढतात, कोणत्या बाबींना अधिक महत्त्व देतात, याबद्दल सर्वसामान्य नागरिकांना नेहमीच कुतूहल वाटते. प्रत्येकाच्या दिवसाचे चोवीस तासच असतात; परंतु काही जण या चोवीस तासांत ऑफिस, जेवणखाण, विश्रांती आणि झोप या पलीकडे काहीच करत नाहीत; तर काही जण याच चोवीस तासांत अलौकिक कलाकृती निर्माण करतात, संगीताची साधना करतात, हजारो लाखोंची उलाढाल करतात, जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला पोहोचतात; प्रसिद्धीच्या झोतात झळकतात... कलाकृतींचा

आनंद लुटतात... मैफली रंगवतात... चिंतन-मनन करून नवे काही शोधून काढतात... नवे मित्र सुहृद मिळवतात... मोठेपण मिळते ते केवळ नशिबावर असे नाही. त्यामागे वेळेचे नियोजन असते, परिश्रम असतात, आपापल्या क्षेत्रात संपादन केलेले प्रावीण्य आणि आपल्या प्रातिभेच्या वेगळेपणाची साधना त्यासाठी आवश्यक असते... या अंकातील वेळेचे व्यवस्थापन या विषयावरील वेगवेगळ्या क्षेत्रातील यशस्वी व्यक्तींची प्रांजळ मनोगते वाचकांच्या विचारांना चालना देतील. प्रोत्साहन-प्रेरणा देतील; यशाची दिशा दाखवतील.

गेल्या दहापंधरा वर्षांत जागतिकीकरणाचे आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वंकष विस्ताराचे क्षणोक्षणी दर्शन घडत आहे. मराठी माणसाचे क्षितिज व कार्यक्षेत्रही त्यामुळे विस्तारत आहे. त्याच्या कर्तृत्वाला केवळ महाराष्ट्र वा केवळ भारत देश – हे क्षेत्र आता पुरेसे राहिलेले नाही. तो जगातल्या नानाविध देशात जाऊन आपल्या बुद्धिचातुर्याने, कर्तृत्वाने आपली छाप टाकत आहे... स्टाफमध्ये भारतीय तरुणांची टक्केवारी जास्त असणे हे आता अमेरिकेतील कंपन्यांना आपल्या प्रतिष्ठेचे गमक वाटत आहे... मराठी माणूस हा खऱ्या अर्थाने आता ज्ञानेश्वरांच्या 'हे विश्वचि माझे घर' या भावनेचा पाठपुरावा करत आहे... परंतु भिन्न संस्कृतीच्या परदेशात राहूनही तो आपल्या मूळ संस्कृतीशी असणारी आपली नाळ तुटू नये म्हणून जागरूक असतो. आपले खानपान, आपली भाषा, आपले साहित्य, आपली जीवनशैली, आपले छंद, आपले सणउत्सव, आपल्या कला, आपली मूल्ये – या सर्वांची यथाशक्ती जपणूक करण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. आमचे कार्यकारी संपादक शंकर सारडा यांनी अमेरिकेतील आपल्या तीन महिन्यांच्या वास्तव्यात अमेरिकेतील अनेक मराठी व्यक्तींशी व संस्थांशी संपर्क साधला. परदेशात राहूनही आपले मराठीपण, आपला मराठी बाणा तेथील लोक कसा जपत आहेत याविषयी त्यांचे अनुभव लिहिण्यास त्यांना प्रवृत्त केले. या अंकात परदेशातील मराठी व्यक्तींनी आपल्या मराठी संस्कृतीच्या आणि जीवनशैलीच्या जपणुकीच्या काही अंगांवर प्रकाश टाकलेला आहे. हा विभाग हे या अंकाचे एक वैशिष्ट्य ठरावे. परदेशस्थ मराठी लेखकांच्या लेखनाला यापुढेही अधिक स्थान देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

ही दिवाळी आणि नवे वर्ष आमच्या सर्व वाचकग्राहकांना, लेखक-चित्रकारांना, ग्रंथविक्रेत्या सहकाऱ्यांना सुखसमृद्धीचे जावो ही प्रार्थना!

# दीपावली स्पर्धा निकाल

## माझा वाचन प्रवास स्पर्धेतील विजेते

**प्रथम क्रमांक** - समीर मोने, पुणे.
**द्वितीय क्रमांक** - प्रभाकर कर्वे, नवी मुंबई
**तृतीय क्रमांक** - अर्चना ठोके, ठाणे

**यशस्वी स्पर्धकांना दर्जेदार पुस्तक भेट पाठवत आहोत.**

**यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन**

### उत्तेजनार्थ

सुधा चान्दोरकर, पुणे.
शालिनी वैद्य, नागपूर.
श्रीकृष्ण कर्वे, मुंबई.
ब. अ. अळवणी, मुलुंड, ठाणे.
माधव साने, पुणे.
सुमेधा पोळ, जबलपूर, मध्यप्रदेश.
मेधा तेलंग, पुणे.

### या स्पर्धेसाठी उल्लेखनीय लेख पाठवणारे इतरही रसिकवाचक

जोसेफ तुस्कानो, मुंबई., उल्हास सुतावणे, डोंबिवली पू., चित्रा देशपांडे, औरंगाबाद., दिलीप निकम, नाशिक., सुनील पांडे, पुणे., वसंत चिंचाळकर, पुणे., मिलींद चिंधडे, नाशिक., विश्वास भोपटकर, पुणे., गजानन प्रधान, पुणे., सुधा कुंटे, औरंगाबाद., कविता जोशी, लातूर., उषा साठे, डोंबिवली पू., रा. व्यं. जोशी, अंबरनाथ पू., बाळ राणे, विरार, मुंबई., अनिता दाते, रायगड., ग. भ. फडके, चिपळूण., मालती नांदापूरकर, मुंबई., भा. ना. गोठोस्कर, सिंधुदुर्ग., संध्या रानडे, पुणे., विद्या चिंचाळकर, पुणे.

# माझा वेळ आणि मी

★ संदीप खरे
★ रत्नाकर मतकरी
★ पंडित संजीव अभ्यंकर
★ डॉ. आनंद यादव
★ वीणा पाटील
★ अविनाश पंडित
★ संजय आवटे
★ प्रवीण दवणे
★ प्राचार्य रा. रं. बोराडे
★ मकरंद टिल्लू
★ शरद दळवी
★ केशव मेश्राम
★ भालचंद्र पानसे
★ नसिमा हुरजूक
★ डॉ. दीपक टिळक
★ मृणालिनी गडकरी
★ विवेक सबनीस
★ गिरिजा कीर
★ विनिता पिंपळखरे
★ सुरेश वसंत नाईक
★ डॉ. सुवर्णा दिवेकर
★ अरुण पटवर्धन
★ श्याम भुर्के
★ दीपक आलेगावकर
★ महेश लिमये
★ शुभदा चौकर
★ जालंदर सोनुने



# टाईम इज मनी. नव्हे टाईम इज मोअर दॅन मनी.

वेळ ही आपल्या हाती लागलेली पण मर्यादित प्रमाणात उपलब्ध अशी मौल्यवान ठेव आहे. वेळ काटकसरीनेच वापरायला हवा याची जाणीव दिवसेंदिवस वाढत आहे. किंबहुना वेळेचे व्यवस्थापन हे शास्त्रच झाले आहे.

पूर्वी म्हणजे अगदी शंभर सव्वाशे वर्षांपूर्वी वेळेचे नियोजन अशी काही संज्ञा नव्हती. अनेक मान्यवर वक्तशीरपणा किंवा वेळेसंबंधी काटेकोर असणे यामधून वेळेचे नियोजन करत असत. रावसाहेब मंडलिक यांच्याबद्दल यासंबंधी अनेक आख्यायिका आहेत.

आता मात्र एखाद्या मोठ्या संस्थेच्या अध्यक्षांपासून गृहिणी किंवा गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांना वेळेचे महत्व ध्यानात येऊ लागले आहे. भिंतीवरच्या कॅलेंडरपासून टेबल कॅलेंडर, एक्झिक्युटिव्ह डायरी,प्लॅनर्स येथवर झालेला प्रवास हे त्याचेच द्योतक आहे. (काही महाभाग संगणकावर अवलंबून असतात) बँकेचा व्यवस्थापक त्याच्या डायरीत तासावार विभागलेल्या ओळींसमोर नोंद करतो. तर गणोशोत्सव मंडळाचे कार्यकर्ते कालनिर्णय पाहून जोधपूरच्या महाल बांधायला घेतात किंवा वर्गणी गोळा करायला बाहेर पडतात.

वेळेचे नियोजन या संज्ञेला अनेक कंगोरे आहेत. ठराविक वेळात महत्वाच्या जास्तीत जास्त गोष्टी बसवणे हा या संज्ञेचा एक अर्थ म्हणजेच डोळसपणे कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा याचे आटोपशीरपणे केलेले नियोजन ते वेळेचे नियोजन होय. वेळेचे नियोजन यामध्ये सर्व कामे तत्परतेने करून वाचलेल्या वेळेचा उपयोग आपली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी करणे ही एक महत्त्वाची बाजू या संज्ञेच्या व्याख्येत आहे.



वेळेचे नियोजन कसे करायचे याकरता साधे व सोपे मूलमंत्र आहेत. सर्वप्रथम आपल्याला नक्की काय करायचे आहे ते नीट माहित असले पाहिजे. स्वयंशिस्त महत्त्वाची आहेच पण वेळेबाबतची शिस्त इतरांवर बिंबवणे तितकेच महत्त्वाचे आहे.

वेळेचे नियोजन करताना सर्वात धोकादायक शब्द म्हणजे टाईमपास. वाया घालवण्याकरता वेळ लोकांना मिळतोच कसा हा महत्त्वाचा प्रश्न आहे. मुंबईत लोकलमध्ये विकण्यात येणाऱ्या उकडलेल्या शेंगांना टाईमपास म्हणतात. टाईमपासचा तेवढाच मर्यादित अर्थ असायला हवा.

लेखक, कवी, गीतकार, गायक, पत्रकार,नट, संस्थाचालक, प्रशासकीय अधिकारी, न्यायाधीश आदि वेळेचे नियोजन करतात का असल्यास कसे हे वाचणे निश्चितच उद्‌बोधक ठरेल.

कुर्सवाला आहिम



# संदीप खरे

**आपल्याला कराव्याच लागतात अशा सर्व गोष्टी (त्यांना पूर्ण न्याय देऊन) पार पाडूनही, आपल्याला हवं ते करायला भरपूर वेळ उरवणे म्हणजे वेळेचे योग्य व्यवस्थापन!**

**हा** लेख सोमवारी लिहून पूर्ण करायचा असं ठरवलं होतं. प्रत्यक्षात सुरुवात करताना गुरुवार उजाडला!... आणि लेखाचा विषय आहे 'माझ्या वेळेचे व्यवस्थापन'!! (काळाचा हा 'प्रसंगनिष्ठ' विनोद बरं!) 'मॅन प्रपोजेस अ‍ॅन्ड टाईम डिस्पोजेस' हा अनुभव आपल्याला काही नवा नाही.

त्यातून मी कवी!... म्हणजे बहुतेकदा लक्ष वर्तमानापेक्षा भूत आणि भविष्याकडेच लागलेलं! अगदी खरं सांगायचं तर मी वेळेचं व्यवस्थापन करण्याऐवजी बहुतेकदा वेळच माझं व्यवस्थापन करत असते. 'आपण केलेलं वेळेचं व्यवस्थापन' आणि 'वेळेने केलेलं आपलं व्यवस्थापन' या दोहोंची सांगड जमली की बात बन जाती है!

वेळेच्या व्यवस्थापनाविषयीची माझी कल्पना सांगतो. माणूस म्हणून मी तसा 'अनिर्बंधा'च्या आवडीचा आहे! 'आराम हराम है'पेक्षा 'आराम हा राम आहे!' यावर श्रद्धा अधिक! अर्थात हा आराम दरवेळेस गोधडीतलाच असतो असं नव्हे. पुस्तक वाचणे, नाटक/सिनेमे बघणे, कॅमेरा घेऊन फिरणे, तिन्ही ऋतूंमध्ये कुठल्यातरी डोंगर-किल्ल्यांवर धडपडणे या गोष्टीही माझ्या 'आराम' खात्यातच येतात. सक्तीने करावी लागत नाही ती कुठलीही गोष्ट मला आरामदायी वाटते. म्हणून तर माझ्यापुरतं बोलायचं तर- आपल्याला कराव्याच लागतात अशा सर्व गोष्टी (त्यांना पूर्ण न्याय देऊन) पार पाडूनही, आपल्याला हवं ते करायला भरपूर वेळ उरवणे म्हणजे वेळेचं योग्य व्यवस्थापन!

कुठल्यातरी पुस्तकात वाचलं होतं की कमीत कमी वेळात जास्तीत जास्त गोष्टी करण्याचं एक तंत्र असतं; आणि आळशी माणसाकडे ते जास्त उपजत असतं. (आता ते तंत्र वापरायचाही आळस केला तर गोष्ट वेगळी!) मीही अनेकदा हे तंत्र वापरण्याचा प्रयत्न करीत असतो; आळसासाठी नव्हे तर अनेक क्षेत्रांमध्ये लुडबूड करायची जन्मजात खोड असल्यामुळे!

कविता, संगीत, (थोडंबहुत) गाणं, अ‍ॅडव्हर्टायझिंगमध्ये कॉपीरायटिंग, व्हिज्युअलायझेशन, रेडिओ/टीव्ही अ‍ॅडस्‌साठी जिंगल्सची निर्मिती, फोटोग्राफी या क्षेत्रांत काही ना काही धडपड चालू असते. त्याचबरोबर गेली दोन वर्षे 'आयुष्यावर बोलू काही' या स्वरचित कवितांच्या कार्यक्रमाचे व्यवधान आहे. (या कार्यक्रमाने तर- चांगलीच परीक्षा पाहिली आहे. गंमत म्हणून सुरू केलेला हा कार्यक्रम, पण लोकांच्या प्रतिसादामुळे एखाद्या व्यावसायिक नाटकासारखे दोन वर्षांत सव्वादोनशे प्रयोग झाले. महाराष्ट्रात सर्व प्रमुख गावांत, दिल्ली, बेंगलोर, इंदौर आणि परदेशातही. सांगायचा मुद्दा असा की त्यामुळे अपरिहार्यपणे नाटकासारखे 'दौरे' करणंही ओघानं आलंच!) वाचन आणि भटकंती हे तर प्राणवायूच... त्यामुळे ते अपरिहार्य! आणि या सगळ्यापलीकडे ('लास्ट बट सर्टनली नॉट द लीस्ट' गोष्ट) म्हणजे घरी असलेली एक मोठी मुलगी (बायको) आणि एक छोटी मुलगी (कन्या) यांनाही पुरेसा वेळ देणं!

कितीही नाही म्हटलं तरी या सगळ्यांमुळे 'रात्र थोडी आणि सोंगं फार' अशी वेळ येतेच! गेली काही वर्षे 'धावपळ' आणि 'दमणं' हे अध्याहृत आहेच; प्रश्न आहे तो 'कमी दमलो' का 'जास्त दमलो' एवढाच! त्यामुळे कमीत कमी दमणे आणि तरीही या सगळ्या गोष्टी करीत राहणे, यासाठी 'वेळेचं व्यवस्थापन' हा भाग अपरिहार्यपणे आयुष्यात डोकावला आहे. त्याविषयीचे वेगवेगळे

प्रयोग अजूनही चालू आहेत.

या विषयात अप्रत्यक्षपणे मला मदत झाली आहे ती माझ्या 'जाहिरात' क्षेत्रामुळे! दिलेल्या वेळात, दिलेल्या चौकटीत (ही चौकट कधी जाहिरातीच्या आकाराची, तर कधी अगदी १० सेकंद इतक्याच मिळणाऱ्या रेडिओ/टीव्ही जाहिरातींची) जास्तीत जास्त सृजनशील आणि परिणामकारक काम करणं हा इथला मूलमंत्र! त्यानुसार मेंदूला एक सवयच लागून गेली. 'आयडिया' सुचण्यासाठी दिवस दिवस एकान्तात राहून, चहाचे कपावर कप ढोसून विचार करीत राहणं इतकी चैन इथे परवडतच नाही. (कधी कधी क्वचित असा भरपूर वेळ मिळतोही, पण सवय अशी की हातातले दिवस वाया घालवून 'इलेवन्थ अवर' आल्याशिवाय 'आयडिया'च सुचत नाही.) त्यामुळे झालं असं की हातात इतर कामं चालू असूनही, डोक्यात एका स्पूलवर कायम त्या विषयाचा विचार करणं चालूच राहतं आणि प्रत्यक्ष लिहायची वेळ आली की अक्षरश: काही

आणखीही एक गोष्ट लक्षात आली की काहीही कारण नसताना अनावश्यक हालचालींत, गोष्टींत आपला फार वेळ वाया जातो आहे. थोडं लक्ष दिलं, थोडं व्यवधान ठेवलं तर करावयाच्या घटनांची, गोष्टींची एक सलग, सुसंगित साखळी आपण गुंफू शकतो. उदाहरणार्थ सकाळी 'ब्रश' करता करता एकीकडे गरम पाण्याची बादली आपण भरू शकतो. आंघोळीला जाण्यापूर्वी घरातल्यांना दिवसभराचं शेड्युल सांगताना एकीकडे बाहेर जाताना घालायचे कपडे, कागदपत्र, अन्य आवश्यक गोष्टी आपण काढू शकतो. ही एक-दोन उदाहरणं, पण मला खात्री आहे की जरा विचार केला तर मला आणि तुम्हालाही 'हे' करता करता करायच्या 'त्या' गोष्टी नक्की सापडतील! (अर्थात बायकोनं 'बाकी काहीही करायचं नाही, फक्त माझ्याबरोबर बसून चहा प्यायचा असा लाडिक हट्ट धरला तर गोष्ट वेगळी! अशा भाग्याच्या वेळी 'वेळेचं व्यवस्थापन' कोलमडायलाच हवं, हे माझं ठाम मत!)

**या विषयात अप्रत्यक्षपणे मला मदत झाली आहे ती माझ्या 'जाहिरात' क्षेत्रामुळे! दिलेल्या वेळात, दिलेल्या चौकटीत (ही चौकट कधी जाहिरातीच्या आकाराची, तर कधी अगदी १० सेकंद इतक्याच मिळणाऱ्या रेडिओ/टीव्ही जाहिरातींची) जास्तीत जास्त सृजनशील आणि परिणामकारक काम करणं हा इथला मूलमंत्र!**

सेकंदांत, मिनिटांत ते कागदावर उतरतं! पण यासाठी तुम्हाला, तुम्ही कुठल्या प्रॉडक्टविषयी, काय आणि कुणाशी बोलत आहात हे शांतपणे स्वत:च्या मेंदूत 'फीड' करायला लागतं! हे मी जाहिरातीविषयी बोललो. पण मला वाटतं की कुठल्याही क्षेत्रात तुम्हाला 'नक्की काय करायचंय' हे आपल्याला पक्कं ठाऊक असलं की बराच वेळ आपण वाचवू शकतो! त्यासाठी 'करतोय काय आणि करायचंय काय' हे भान सजग असणं महत्त्वाचं! (एक छोटासा माझा अनुभव सांगतो. 'डीएसके बिल्डर्स'साठी तयार केलेल्या आणि लोकप्रिय झालेल्या माझ्या रेडिओ जिंगलसाठी मला लागलेला वेळ होता सात ते आठ मिनिटं! कशा प्रकारची जाहिरात अपेक्षित आहे हे मला सांगण्यात आलं, पूर्ण एकाग्रतेने मी ते मेंदूला भरवलं. तिथून निघून 'कल्पना' हॉटेलवर बाईकवरून पोहोचेपर्यंत, गुणगुणत गुणगुणत ती जाहिरात तयार झाली होती! हॉटेलमध्ये पोहोचल्यावर तिथल्याच टिश्यू पेपरवर ती उतरवून काढायला अवघं दीड मिनिट लागलं. वाचलेला वेळ अर्थातच त्या रात्री एक सिनेमा पाहून सत्कारणी लावला!) हे वळण लागल्याने, आता तर कधी कधी क्लायंट ब्रिफिंग करत असतानाच डोक्यात आयडिया, ओळी निर्माण व्हायला लागतात. (अर्थात लगेच सुचलं तरी लगेच ते क्लायंटला दाखवू नये, हा अनाहूत सल्ला! कमी वेळातही चांगलं सुचू शकतं यावर नसतो विश्वास काहीकाही जणांचा!)

गंमत सोडून द्या, पण असा छोट्या छोट्या बचतीचा वेळ, शेवटी आवडत्या गोष्टींवर स्वैरपणे खर्च करता येतो, हा माझा अनुभव.

तिसरा मुद्दा पुन्हा एकदा मेंदूशीच संबंधित! तुम्हालाही अनुभव असेल की आपण सामान्य माणसं १००% एकाग्रतेने काही सगळी कामं करू शकत नाही! विवेकानंदांना अपेक्षित असलेली एकाग्रता महादुर्मिळ! मग काम करीत असताना भलतेच काही विचार करत राहण्यापेक्षा, करायच्या दुसऱ्या एखाद्या कामाचा विचार केला तर? 'एक ना धड, भाराभर चिंध्या' असा धोका यात असेलही, पण सामान्य श्रेणीत मोडणारी कामं अशा प्रकारे डोक्यात एकाचवेळी ठेवली तर? एखादं गुंतागुंतीचं, महत्त्वाचं ऑपरेशन/सर्जरी जिथे पूर्ण एकाग्रतेची आवश्यकता आहे, असे अपवाद सोडले, तर इतर 'निरुपद्रवी' ठिकाणी हा प्रयोग करून बघायला हरकत नाही. मी स्वत: घर आवरताना, चहा वगैरे बनवताना एकीकडे ऐकायच्या राहून गेलेल्या, 'मस्ट' असलेल्या कितीतरी सीडी/कॅसेटस्‌चा आनंद घेतला आहे. आता तर ती एक सवय होऊन गेलीय. तैमुरलंगासंबंधी एक गोष्ट अशी ऐकलीय की, सकाळी तो तलवार फिरवण्याचा सराव करताना, त्याच्याभोवती त्याचे मंत्री उभे राहून त्याला एकामागोमाग एक असे प्रश्न विचारत रहायचे. सरावानंतर त्या सगळ्या प्रश्नांची सलग उत्तरं, निवाडे तो एकामागून एक त्यांना द्यायचा. यात सत्य किती, अतिशयोक्ती किती हा भाग सोडून द्या,

पण या वाटेवर थोडंसं चालून पहायला हरकत नाही. माझा तो प्रयत्न चालू असतो. मग कधीकधी ब्रशला पेस्टऐवजी शेव्हिंग क्रीम लागतंही, पण जमेल हळूहळू! (शिवाय कवी असल्यामुळे एवढा 'धांदरटपणा' करणं हा माझा हक्कच की!)

मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे 'आयुष्यावर बोलू काही' या माझ्या प्रयोगाचे दौरे सुरुवातीला थोडे गैरसोयीचे वाटले खरे, पण पुढे याच दौऱ्यांमुळे वाचायला भरपूर वेळ (प्रवासामध्ये) आणि फोटोग्राफीच्या छंदासाठी (दुसऱ्याच्या खर्चाने घडणारी) नवनवी स्थलदर्शनं घडली, तेव्हा एकप्रकारे वरदानच वाटले हे दौरे! याच प्रवासात पुढे करायच्या गोष्टींविषयी स्वत:शी शांतपणे नियोजन करता आलं, (हॉटेलमध्ये पोहोचल्यावर) मित्रांना पत्रं लिहिता आली. एवढंच काय, कितीतरी कविताही सुचल्या... सुचलेल्या उतरवता आल्या. मी आणि सलील - आम्ही कितीतरी नवीन गाणीही याच दौऱ्यांमध्ये केली आहेत. भरपूर दौऱ्यांमुळे तब्येत बिघडण्याचा धोका तर असतोच, पण मला वाटतं, थोडं पथ्य कटाक्षाने पाळलं, तर शरीर नाही धोका देत!

'वेळेचं व्यवस्थापन' यावर मी काही अधिकाराने बोलावं, ही माझी पात्रता नाही, मी जाणतो. पण प्रत्यक्ष/अप्रत्यक्षपणे याविषयी काही विचार करीत असतो, धडपडत असतो... ते तुमच्याशी 'शेअर' केलं इतकंच! आयुष्याच्या संध्याकाळी 'करायच्या बऱ्याच गोष्टी राहून गेल्या... छे! वेळ कसा संपला कळलंच नाही!' असं म्हणायची 'वेळ' येऊ नये, अशी आंतरिक इच्छा आहे.

आणि याहीपलीकडे अगदी आतली एक गोष्ट 'शेअर' करू का? 'वेळेचं व्यवस्थापन' यावर मेंदू खूप मोठीमोठी 'लेक्चर्स' देत असतो हो, पण शेवटी मन कवीचं पडलं ना! काम चालू असताना, कधी बाहेर पावसाच्या धारा कोसळायला लागल्या, संध्याकाळीने पश्चिमेच्या कागदावर रंगाची नक्षी उधळली, कधी कुंडीत नुकताच फुललेला सोनचाफा गंधनिमंत्रण घेऊन पोहोचला की हातातली 'काळ-काम-वेगा'ची गणितं ओलांडून, न जाणे कुठल्या या साऱ्यांपल्याडच्या अज्ञाताची 'तंद्री' लागते! 'वेळ' महत्त्वाची असतेच, त्याच्या गैरव्यवस्थापनाने व्यावहारिक तोटेही होत असतील, पण माझ्यासाठी तरी ही तंद्रीच मला जास्त महत्त्वाची आहे!!

(ता.क. : लेख लिहिण्यापूर्वी 'मुद्दे' स्वत:शी नीट आठवून घेतले आणि लिहायला बसलो. लेख 'एकटाकी' झाल्याने 'फेअर कॉपी' करायचा 'वेळ' वाचला! आता जातो दोस्तांसोबत 'चकाट्या' पिटायला! 'अपनी अपनी सोच है... पण माझ्यासाठी तरी ते 'आवश्यक काम'च आहे!)

**संदीप खरे**
फ्लॅट नं. १०, आदित्य अपार्टमेंट्स,
संतोष बेकरीसमोर, आनंदनगर
पुणे-सिंहगड रस्ता, पुणे ४११०५१
फोन : ०२०-२४३५६०७२
e-mail : ksakhar@yahoo.co.in

**नाव** : संदीप खरे
**शिक्षण** : डिप्लोमा इन इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग
**व्यवसाय** : जाहिरातक्षेत्र कॉपी रायटिंग, स्पॉट-जिंगल निर्मिती

* इयत्ता चौथीपासून कविता लिहिण्याचा छंद. शालेय व महाविद्यालयीन स्तरावर कविता व कथालेखनासाठी अनेक पुरस्कार प्राप्त. रेडिओ व टीव्हीवर काव्यवाचनाचे कार्यक्रम.
* पुणे फेस्टिवल, ई टीव्हीवरील 'कवितांचे घर', 'कवितांच्या गावा जावे' या कार्यक्रमांतून काव्यवाचन.
* 'कॅलिडोस्कोप' या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे आत्तापर्यंत २०० हून अधिक कार्यक्रम.

कॅसेट्स- 'दिवस असे की' व 'मी गातो एक गाणे' या स्वत:च्या दोन कॅसेट्स प्रकाशित.

* 'कधी हे... कधी ते' हा कॅसेट संच प्रकाशित. यात गीतलेखन, संगीत व गायन केले आहे.
* 'आयुष्यावर बोलू काही' ही स्वत: संगीत व गायन केलेली स्वरचित कवितांची कॅसेट प्रकाशित.

पुरस्कार-

* 'सादर', 'पहाट', 'पुणे की आशा' इ. पुरस्कार प्राप्त
* 'मृत्युंजयकार 'शिवाजी सावंत' पुरस्कार
* कोल्हापूरचा 'रणजित देसाई' पुरस्कार
* अत्रे प्रतिष्ठानचा 'केशवकुमार' पुरस्कार



# रत्नाकर मतकरी

**स्वभावात शिस्त असेल, तर आपण वेळ, पैसा, एवढेच नव्हे, तर नातेसंबंधांना सुद्धा एका आखीव रेखीव चौकटीत बसवू शकू – नव्हे, तसे बसवणे ही आपली मानसिक गरज होऊन जाईल.**

स्वत:च्या आणि त्या अनुषंगाने दुसऱ्याच्याही वेळाचे नियोजन – व्यवस्थापन ही गोष्ट वाटते, त्यापेक्षा कितीतरी अधिक महत्त्वाची आणि आपल्या तसेच आपल्या अवतीभवतीच्या जीवनाला व्यापून राहिलेली आहे. पूर्वी त्याविषयी फारसे बोलले-लिहिले जात नव्हते; आजच्या व्यावसायिक जगातले 'नियोजन-व्यवस्थापन' यासारखे शब्दही त्यासाठी वापरले जात नसत; तरीही कितीतरी व्यक्ती वेळाचे नियोजन करीत आणि 'वक्तशीर' किंवा वेळासंबंधी 'काटेकोर' मानल्या जात. पूर्वी एकंदर आयुष्य संथ आणि काहीसे आरामाचे असल्यामुळे वेळाविषयीची बेपर्वाई थोडीफार परवडण्यासारखी होती. आज मात्र कॉर्पोरेट डिरेक्टर पासून ते गृहिणीपर्यंत प्रत्येकालाच 'टाइम मॅनेजमेंट'ची गरज भासते. एके काळी खरा कलावंत हा अव्यवहारी आणि कलंदर प्रवृत्तीचा असतो, असा सार्वत्रिक (गैर)समज शिष्टसंमत होता; त्यामुळे बऱ्याच कलावंतांनी 'घड्याळाचे गुलाम' न होणे पसंत केले. आज मात्र कलावंताला किंवा त्याला सांभाळून घेणाऱ्या माणसाला, रोजच्या जगण्यापासून ते एकंदर आयुष्यापर्यंत प्रत्येकच गोष्टीत वेळ वाया जाऊ नये, याची काळजी घ्यावी लागते. याबाबतीत, सुधारणेच्या पलीकडे असलेली चित्रपटसृष्टीदेखील, 'टाइम इज मनी' हे तत्त्व आता मोठ्या प्रमाणात विचारात घेऊ लागली आहे. एकूणच, वेळ ही आपल्या हाती लागलेली, पण मर्यादित प्रमाणात उपलब्ध अशी एक मौल्यवान ठेव आहे, आणि ती काटकसरीनेच वापरायला हवी, याची जाणीव दिवसेंदिवस वाढतेय.

वेळाचे नियोजन ज्या अनेक गोष्टींवर अवलंबून असते, त्यातली सर्वात महत्त्वाची म्हणजे आपला स्वभाव. स्वभावात शिस्त असेल, तर आपण वेळ, पैसा, एवढेच नव्हे, तर नातेसंबंधांना सुद्धा एका आखीव रेखीव चौकटीत बसवू शकू – नव्हे, तसे बसवणे ही आपली मानसिक गरज होऊन जाईल. इतर माणसे व त्यांचा वेळ यांना गृहीत धरणे चुकीचे आहे, हे आपल्याला समजेल. आयुष्य सुंदर आणि अर्थपूर्ण करण्यासाठी वेळाचा जास्तीत जास्त उपयोग कसा करता येईल, हे आपण पाहात जाऊ.

अर्थात स्वभावातल्या शिस्तीमुळे आणि ह्या शिस्तीचे दुसऱ्यावर दडपण येण्याऐवजी ती सुखकारक आणि उपयुक्त ठरेल, हे पाहण्याच्या चांगुलपणामुळे, वेळाचे नियोजन करता येते, पण त्याबरोबरच आपल्या आजूबाजूची माणसे, आणि लाभलेल्या संधी हीदेखील तितक्याच महत्त्वाची असतात. योग्य वेळी योग्य माणसे आयुष्यात येणे, योग्य ते मार्गदर्शन मिळणे, आणि विशेष म्हणजे योग्य ती संधी चालून येणे, हे घडले नाही तर अत्यंत कर्तबगार आणि हुशार माणसांचीही उमेदीची वर्षे वाया जातात, हे आपण पाहतोच.

आपल्या आजवरच्या आयुष्याचा विचार करतो, तेव्हा लक्षात येते, की तुरळक अपवाद सोडले, तर मला माझ्यातील गुण ओळखून साहाय्य करणारे, पुढे नेणारे किंवा माझ्यासाठी संधी निर्माण करणारे असे फारसे कुणी भेटले नाही. माझ्या मध्यमवर्गीय कुटुंबाने, कदाचित त्याकाळच्या सर्वच जबाबदार कुटुंबांप्रमाणे, सुरक्षिततेला प्राधान्य देऊन मला एक सर्वसामान्य माणूस बनवायचे ठरवले आणि मीही माझ्या स्वभावातील आज्ञाधारकपणाला बळी पडून सामान्यच व्हायचे, आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या आपल्या परीने पार पाडायच्या, असेच ठरवले. मात्र माझ्यातला लेखक-

दिग्दर्शक, खूपच लहानपणी, नको म्हटले तरी बाहेर पडत राहिला, बंड करायचे नसतानाही आंतरिक उर्मीप्रमाणेच वागत राहिला. अशा वेळी एखादी तरी संधी, एखादा तरी मदतीचा हात पुढे आला असता, तर माझा हा नकळत केलेला संघर्ष थोडा सुसह्य, कमी क्लेशकारक, अधिक उत्पादक झाला असता. मुख्य म्हणजे त्यामुळे माझ्या आयुष्यातली काही वर्षे वाचली असती. तरीही ज्यांच्यामुळे हा संघर्ष सुरू झाला/चालू राहिला, त्या, माझे पहिले बालनाट्य निर्माण करणारी सुधा करमरकर, पहिले नभोनाट्य सादर करणारे आकाशवाणीचे ल. गो. भागवत, पहिली एकांकिका छापणारे 'वसुधा'चे त्यावेळचे संपादक विजय तेंडुलकर यांच्याविषयी मला कृतज्ञता वाटतेच. तसेच, घरात माझ्या चित्रकलेचे काहीच कौतुक नसताना, 'केतकर आर्ट इन्स्टिट्यूट'मध्ये नाव घालतोस का, असे विचारणाऱ्या, भूगोलाच्या दिगास्कर बाई आणि इंटरमीजिएट आर्ट एक्झॅमसाठी मला रंगपेटीची जमवाजमव करून देणारा काणे नावाचा चाळीतला तरुण, यांनाही मी कधी विसरलो नाही. परंतु चित्रकला क्षेत्र आणि चित्रपटक्षेत्र यांमध्ये अशा काही संधी आल्या नाहीत, की ज्यामुळे मी त्या पंथांचा वारकरी व्हावे, किंबहुना जेव्हा जेव्हा मी तसे प्रयत्न केले, तेव्हा तेव्हा ते निष्फळ ठरले अर्थात वेळाचा विचार करता मी जर या क्षेत्रांमध्ये वाटचाल करू लागतो, तर लेखन-नाट्यनिर्मिती-दिग्दर्शन यांना अजिबात वेळ देऊ शकलो नसतो, हेही खरे; कारण यातील प्रत्येक क्षेत्र हे संपूर्ण वेळ आणि संपूर्ण एकाग्रता मागणारे आहे. तेव्हा आयुष्यात मी पेंटिंग आणि चित्रपट यांना वेळ दिला नाही, हे बरे झाले की वाईट, हा प्रश्न विवाद्य आहे.

मात्र केवळ लेखन आणि नाट्यनिर्मिती यांनाही मी सुरुवातीच्या काळात जो वेळ दिला, त्यात वेळाच्या नियोजनाला फार महत्त्व होते. पदवीधर झाल्या झाल्या, वयाच्या विसाव्या वर्षी मी बँकेत नोकरीला लागलो. तोवर माझी, मुलांची दोन आणि प्रौढांची दोन नाटके रंगभूमीवर आलेली होती, व कथा व एकांकिका आकाशवाणीवर व मासिकातून प्रकाशित झाल्या होत्या. या सर्वच ठिकाणांहून माझ्या लिखाणाला मागणी होती, आणि प्रसिद्धीसाठी नाही, तरी ज्या वेगाने मला विषय व त्यांच्या रचना सुचत होत्या, त्याला वाट करून देण्यासाठी तरी मला लिहिणे भागच होते. तेव्हा नोकरीच्या वेळाशिवायचा सगळा वेळ (कधीकधी लंचटाइमसुद्धा) मी कटाक्षाने लेखनासाठी वापरत असे. लेखनाची जुळवाजुळव मी गाडीत, आणि स्टेशन ते बँक हा प्रवास व लंचटाइम या प्रत्येकी अर्धातासाच्या तुकड्यांमध्ये करीत असे. रात्री अंथरूणात पडल्यावर झोप लागेपर्यंतसुद्धा माझ्या मनातली ही जुळवाजुळव चालूच असे. एवढे खरे की सतत नवे सुचत राहिले, तरच वेळाच्या नियोजनाचा कलावंताला उपयोग! – अर्थात इथे आपण गृहीतच धरतो की मुळात काही कलागुण आहेत आणि त्यांच्या सर्वोत्तम आविष्कारासाठीच वेळाचे नियोजन करायला हवे!

तेवढ्यात माझा प्रेमविवाह झाला आणि जबाबदारी वाढली. पण प्रेमासाठी मी फारसा 'एक्स्ट्रा' वेळ दिला नाही; उलट त्या काळातल्या माझ्या मन:स्थितीचा उपयोग करून मी प्रौढांसाठी परीकथा 'सत्यकथा'मध्ये लिहू लागलो. याच काळात आम्ही (मी, प्रतिभा आणि इतर मित्रमंडळी) 'बालनाट्य' संस्था सुरू केली. मग काय? नाटक लिहिण्यापासून ते बसवण्यापर्यंत आणि नेपथ्य-वेशभूषा-संगीत-पोस्टर्स (काय लागेल ते सगळे!) पासून प्रयोगाला हजर राहण्यापर्यंत, पुष्कळच गोष्टींमध्ये वेळ जाऊ लागला. तोही नोकरीत कुचराई न करता!

पुढे मुले, प्रायोगिक नाटके, दोन संस्था चालवणे, विचार, वाचन, चित्रपट-नाटके, चित्रप्रदर्शन पाहणे, आणि मुख्यत: दहा ते सहा नोकरी हे सगळेच मजेत सांभाळून (मजेत म्हणजे मित्र-मैत्रिणी-पार्ट्या इत्यादींसकट) मी लेखन करीत राहिलो. (पुढे आठवड्याची नियमित सदरे आणि दूरदर्शनचे 'गजरा' सारखे नियमित कार्यक्रमही आले. सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, हे सगळे, प्रतिभा मध्येच तीन वर्षे दिल्लीला 'नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा'चा कोर्स करून आली, त्यातही कुटुंबीयांच्या मदतीने का होईना) जसेच्या तसे चालू राहिले. वर त्यावेळी माझ्या मनाने घेतले, की आपण फार कृश आणि वाईट दिसतो. मग या सगळ्याच्या बरोबरीने व्यायाम सुरू केला आणि तीन वर्षं जवळजवळ दीड-पावणेदोनपट दिसू लागलो. हे सगळे हुशारी म्हणून नाही, तर ते वेळाच्या नियोजनाला कसे आव्हान देणारे होते, ते कळावे म्हणून सांगितले.

काही गोष्टी मी ठरविल्या आणि निर्धाराने पार पाडल्या. पहिली, जे काम फक्त आपणच केले पाहिजे असे नाही, ते दुसऱ्यालाच करू द्यायचे. त्यात लुडबूड न करता. त्यामुळे नाटकाच्या निर्मितीचा

**काही गोष्टी मी ठरविल्या आणि निर्धाराने पार पाडल्या. पहिली, जे काम फक्त आपणच केले पाहिजे असे नाही, ते दुसऱ्यालाच करू द्यायचे. त्यात लुडबूड न करता. त्यामुळे नाटकाच्या निर्मितीचा बराच भाग प्रतिभा उचलू लागली. कौटुंबिक गरजांपैकीही फक्त मोठ्या (राहती जागा, कुटुंबातील लग्ने, आजार इ.) गोष्टींमध्येच मी लक्ष घातले. पैसेही तिच्या स्वाधीन – खर्चामध्ये डोकेफोड आजतागायत कधी केली नाही.**

बराच भाग प्रतिभा उचलू लागली. कौटुंबिक गरजांपैकीही फक्त मोठ्या (राहती जागा, कुटुंबातील लग्ने, आजार इ.) गोष्टींमध्येच मी लक्ष घातले. पैसेही तिच्या स्वाधीन – खर्चामध्ये डोकेफोड आजतागायत कधी केली नाही. याशिवाय, लग्ना-मुंजींना जाणे कटाप! सभा-संमेलनांना हजेरी क्वचित – काही खास कारण असले तरच! या बाबतीत माझे धोरण असे की, माझ्या हजर राहण्याने चार मुलांना काही शिकायला मिळणार असेल, तर मी एखाद्या छोट्यांच्या शिबिरालाही जाईन, पण केवळ मिरवायला उद्घाटक, अध्यक्ष वगैरे म्हणून जाणार नाही! ज्यातून काहीही निष्पन्न होत नाही आणि वक्ते केवळ लोकांत चांगले दिसेल असे बोलतात, असे परिसंवाद, चर्चा इत्यादींवर वेळ फुकट घालवणे अजिबात नाही! **एका तासाच्या व्याख्यानासाठी दोन दिवसांचा प्रवास – आउट ऑफ क्वेश्चन!**

बँकेत बारा दिवसांची कॅज्युअल आणि एक महिन्याची भरपगारी रजा असे. शिवाय ५२ रविवार हक्काचे. महिन्याच्या रजेने माझे सहकारी लीव्हफेअर कन्सेशन घेऊन प्रवास करीत. मी मात्र ही सगळीच्या सगळी रजा लेखन किंवा दिग्दर्शन यासाठीच वापरत असे. महिनाभराच्या रजेत (१९७८ च्या रजेत तर मी 'लोककथा ७८' हे नाटक, 'अॅडम' ही तीनशे पानांची कादंबरी आणि सातआठ गूढकथा एवढे लिहून 'अजून यौवनात मी' नाटकाचा कच्चा खर्डाही लिहिला.) मी सकाळपासून रात्रीपर्यंत झपाटल्यासारखे आणि एकटाकी लिही. पण असे लिहिता यावे, यासाठी आधीच्या दोनतीन महिन्यांपासून मानसिक तयारीची गरज असे. आजही, गूढकथा लिहिण्याची मानसिक बैठक तयार करण्यासाठी मला पुष्कळच वेळ लागतो. मग ती एक कथा असो, की पाच कथा. इतका वेळ देणे हे परवडण्यासारखे नसते. म्हणून मी एकूणात, वाचन आणि विचाराच्या मानाने, खूप कमी लिहितो. सातत्याने पन्नास वर्षे लिहिल्यामुळे इतके लिखाण जमले, एवढेच.

वीस वर्षे इमानेइतबारे मी नोकरी केली आणि सोडली (१९७८ नंतर) कारण सकाळी लिहावेसे वाटत असतानाच नेमके कामावर जावे लागणे, हे नकोसे वाटे. नोकरी सोडली तेव्हापासून मी घरीच, पण नोकरीच्या नियमितपणाने काम करतो – सकाळी सातला उठून व्यायाम झाल्यावर ब्रेकफास्ट, मग वृत्तपत्रे वाचल्यावर लिहिणे, वाचणे इ. सुरू होते, ते जेवणाच्या वेळेपर्यंत. त्यानंतर दुपारचे वृत्तपत्र पाहून तासभर विश्रांती. (ही अत्यंत आवश्यक – कारण त्यामुळेच तुम्ही रात्री उशिरापर्यंत ताजेतवाने राहू शकता.) मग पुन्हा काम. अलीकडे कधीकधी रात्री दोन तास सीडी पाहण्यात जातात. (दूरदर्शनवरचे चित्रपट किंवा सिरिअल्स, जाहिराती पाहण्यात वेळ फुकट जातो, म्हणून रद्द.) कामाच्या महत्त्वाच्या प्रमाणातच वेळ जाणार असेल, तर मी बाहेर जातो. माझ्याकडे कुणी आल्यास मी त्याला पुरेसा वेळ (कधीकधी जास्तच) देतो, कारण त्रोटक बोलून मला ना तो माणूस समजतो, ना त्याचे कार्यक्षेत्र. परवानग्यांसाठी जे लोक येतात, त्यांची दखल अर्थातच प्रतिभा घेते. अलीकडे माणसे फोन करून, वेळ ठरवून येतात हे चांगले. वेळ ठरविताना उभयपक्षी एकच वेळ, म्हणजे, बरोबर ६ वाजता अशी ठरवावी लागते. संध्याकाळी, किंवा सहा-साडेसहाला अशी अनिश्चित ठरविल्यास हमखास गोंधळ होतो. कोणी येणार असेल, तर मी हातातले काम बाजूला ठेवून पंधरा मिनिटे आधी तयार राहतो. त्याचे जे काम असेल त्याच्या साहित्यासकट. पण पंधरा म्हणजे पंधराच मिनिटे. तो जर वीस मिनिटे आधी आला, तर माझी गडबड उडते. हल्ली ट्रॅफिकच्या अडचणींमुळे लवकर निघालेली माणसे फार लवकर पोहोचतात, किंवा वेळेवर निघालेली उशिरा. हे समजून घ्यावे लागते. मात्र त्यांनीही फोन करून आपण नेमके किती उशिरा येऊ, ते कळवलेले बरे असते. म्हणजे दुसऱ्या उद्योगाला लागता येते. मला स्वत:ला पाच मिनिटेसुद्धा रिकामे बसता येत नाही. (पाच मिनिटांत दोनतीन पाने वाचून होतात.) एकमेकांना जोडूनच मी काम करतो. 'टाइमपास' हा शब्द भाषेत आला तरी कसा, तेच मला समजत नाही. 'पास' करण्याची गरज पडावी, इतका 'टाइम' लोकांकडे येतो तरी कुठून? आणि असला, तर त्याचा निश्चित काही उपयोग करण्याची योजना ह्यांच्याकडे का नसते? (मी चुकत असेन, पण साधारणपणे असे दिसते, की अभ्यासात फारच व्यग्र असलेल्या मुलांशिवाय इतर तरुणांना, आणि व्हीआरएस घेतलेल्या किंवा सेवानिवृत्त झालेल्या ठणठणीत प्रकृतीच्या कित्येक ज्येष्ठांना भरपूर वेळ असतो. 'टाइमपास' करीत रात्र होण्याची वाट पाहात बसण्याऐवजी या मंडळींनी काही निश्चित समाजोपयोगी उद्योग लावून घेतला तर समाजातली किती मोठी ऊर्जा कामी येईल!

**'टाइमपास' हा शब्द भाषेत आला तरी कसा, तेच मला समजत नाही. 'पास' करण्याची गरज पडावी, इतका 'टाइम' लोकांकडे येतो तरी कुठून? आणि असला, तर त्याचा निश्चित काही उपयोग करण्याची योजना ह्यांच्याकडे का नसते?**

वेळाच्या नियोजनासाठी थोडीफार बुद्धी, थोडी कल्पनाशक्ती, थोडा दूरदर्शीपणा, थोडे धोरण, या गोष्टी लागतात. जे काम करायचे आहे, त्याविषयी थोडा आगाऊ विचार करून ठेवायला तर हवाच, पण त्या कामाला नेमका किती वेळ लागेल, तो कमी होऊ शकेल का, याचाही विचार करता यायला हवा. उशिरा

येणारे बरेच लोक ट्रॅफिक जॅमचे निमित्त सांगतात. रोजच त्या भागात ट्रॅफिक जॅम होतो हे माहीत असताना मार्जिन का ठेवत नाही, या प्रश्नाला त्यांच्याकडे उत्तर नसते. ऑफिसमध्ये किंवा नाटकाच्या तालमीला ठराविक लोक उशिरा येतात. उशीर करणे त्यांच्या अंगात इतके भिनलेले असते, की ते चुकूनसुद्धा लवकर येण्याचा प्रयत्न करीत नाहीत. मी नाटकाच्या तालमींना एकच वेळ ठरवतो. (म्हणजे दहा सांगितले तर साडेदहापर्यंत येतील, असे नाही.) आणि स्वत: दहा मिनिटे आधी पोहोचतो. हळूहळू, 'उशीर अंगात भिनलेले' लोक सोडले, तर बाकी सगळे वेळेत येऊ लागतात. दिग्दर्शकच उशिरा येतो, मग आम्ही का लवकर जावे? असे निमित्त त्यांना मिळत नाही.

कुठलीही गोष्ट, गरज पडेल त्याच्या थोडी आधीच तयार हवी. मी नाटक बसवताना सुरुवातीपासूनच वेगाने जातो, जसे काही नाटक चार दिवसांवर आले आहे! मात्र प्रत्यक्ष चार दिवस राहिले असताना नाटक पूर्णपणे तयार असते, आणि रोज काही प्रेक्षक बोलावून आम्ही प्रयोगासारख्या सलग तालमी करतो. (अलीकडे एकूण तालमींचा आनंद कमी झालेला आहे; कारण मालिका आणि चित्रपट यात व्यग्र असलेल्या नटांकडे तालमींसाठी द्यायला वेळच नसतो.) तंत्रज्ञांसाठी आणि नटांसाठीही शेवटच्या आठवड्यात तालमी होणे महत्त्वाचे असते. 'दुभंग'च्या वेळी डॉक्टर लागूंना शेवटच्या आठवड्यात वेळ नव्हता. ते त्या आठवड्यात फक्त शनिवारी व रविवारी येऊ शकत होते. मी निर्मात्याला म्हटले, नाटक एक आठवडा आधी 'ओपन' होतं आहे, असे समजून तालमी ठेव. हा आदला आठवडा 'शेवटचा; व त्याला जोडून खोटा प्रयोग – झिरो शो. पुढच्या शनिवारी तालमीला व रविवारी प्रयोगाला डॉक्टर मिळतील.

त्याप्रमाणे आदल्या रविवारी तुरळक प्रेक्षकांसमोर दोन प्रयोगांसारख्या सकाळ-दुपार दोन तालमी झाल्या, आणि पुढच्या रविवारचा (पहिला) प्रयोग तिसऱ्या प्रयोगासारखा सराईतपणे झाला.

वेळाविषयी जागरूक असलेल्या व्यक्तीने एक पथ्य पाळायला हवे ते म्हणजे आपल्या वेळनियंत्रणाचे दडपण दुसऱ्यावर येऊ न देणे. आपण ठरलेल्या वेळा यावे-जावे, मात्र 'मला एका मिनिटाचा उशीर खपत नाही!' असे येता-जाता दुसऱ्याच्या तोंडावर फेकू नये! दुसऱ्याची वेळाच्या संदर्भात काही अडचण असली (आणि हे त्याला मान्य असेल) तर ती सोडवायला त्याला मदत करावी. आपल्या वेळाचे नियंत्रण ही खासगी बाब आहे. ती निग्रहाने करावी, पण जाहीर करू नये. आणि जसे दुसऱ्याशी होऊ नये, तसेच स्वत:शीही फार निर्दय होऊ नये. 'पाच मिनिटे इकडेतिकडे झाली, तर काय झाले?' हा विचारसुद्धा गैर आहे. पण खरोखरच पाच मिनिटे इकडेतिकडे झाली, तर अस्वस्थ न होता, ती इतरत्र 'ॲडजस्ट' करावीत. शक्यतो अत्यंत नियमित असावे, पण ते सहजपणे. नियमितपणाचेही बंधन व्हायला नको. पैशाप्रमाणेच इथेही. काटकसरी असावे, पण कंजूष नसावे. नाटक वेळेत सुरू व्हावे, हे मी मानतो. पण नाटकानंतर तत्काळ आपापल्या घरी पोहोचावे, यापेक्षा सर्वांनी एकत्र बसून नाटकाविषयी गप्पा माराव्यात, हा मी वेळाचा अपव्यय मानत नाही, कारण याच वेळी खूप गोष्टी शिकायला मिळतात.

प्रत्येक गोष्टीची सतत घाई असणे हे चांगले नियोजन नव्हे. याउलट प्रत्येक गोष्टीची आधीच सिद्धता असल्यामुळे ती आरामात करता येणे, हेच खरे. कोणी मला मी काही काम न करता नुसता आरामात आहे, असे म्हटले, तर मी तो गौरव समजेन. आपल्याकडे जी कामे असतात, त्यांचे मनातल्या मनात अग्रक्रम (प्रायॉरिटीज) ठरवावेत. जे काम नंतर करून चालणार आहे, ते आत्ताच करणे, आणि त्यासाठी आत्ताच्या कामावर अन्याय करणे चूक आहे. 'कल करे सो आज कर' पेक्षा 'कल'चे कलच (परसो नव्हे) आणि 'आजचे आज करणे' ठीक. मला पत्र लिहिण्याचा विलक्षण कंटाळा आहे. (लिहायला बसलो की मात्र यथास्थित लिहितो.) त्यामुळे पत्र लिहिणे लांबणीवर पडते. मात्र एखाद्या वृद्धाचे किंवा आजारी व्यक्तीचे अभिप्रायात्मक, शुभचिंतनपर पत्र येते, तेव्हा माझ्या उत्तराची वाट पाहणारा त्याचा चेहरा मला दिसतो. अशा पत्राला माझे तत्काळ उत्तर जाते. अग्रक्रम ठरवताना नेहमी दुसऱ्याचा विचार करायला हवा, त्यात सांगकामेपणा नको. मी तालमीला उशीर करू शकत नाही, कारण तिथे चार लोक माझी वाट पाहात असतात, त्यांचा वेळ वाया जातो. पण म्हणून एखाद्या पार्टीला जाताना घड्याळाच्या ठोक्यावर जायला नको. तिथे उशीर केला तर स्वत:चे खाणे-पिणे थोडे कमी होईल इतकेच. प्रत्येक गोष्ट जर घड्याळाच्या काट्याप्रमाणे केली, तर आपल्या वागण्यात एक ताण येईल, एक प्रकारचा यांत्रिकपणा येईल. काल-नियोजनाचा आनंद कमी होईल; हे टाळायला हवे. प्रत्येक काम शांत, विश्रांत, relaxed पद्धतीने करता यायला हवे. वेळाचे नियोजन हे या

**प्रत्येक गोष्ट जर घड्याळाच्या काट्याप्रमाणे केली, तर आपल्या वागण्यात एक ताण येईल, एक प्रकारचा यांत्रिकपणा येईल. काल-नियोजनाचा आनंद कमी होईल; हे टाळायला हवे. प्रत्येक काम शांत, विश्रांत, relaxed पद्धतीने करता यायला हवे. वेळाचे नियोजन हे या 'रिलॅक्सेशन'साठी आहे. वेळाचा ताणतणाव घेण्यासाठी नाही.**

'रिलॅक्सेशन'साठी आहे. वेळाचा ताणतणाव घेण्यासाठी नाही.

कलावंताला तर आणखी एक सावधगिरी घ्यावी लागते. स्वत:मधली उत्स्फूर्तता टिकवण्याची. लिहिण्याची तातडी आणि उत्स्फूर्तता यातील तोल सांभाळण्याची. लेखकाने कितीही थोड्या दिवसांत लिहिले, कितीही घाईने आणि ठरलेल्या तारखेपर्यंत पोहोचावे, म्हणून लिहिले, (आणि हे प्रसंग तर, सातत्याने लिहिणाऱ्या लेखकावर नेहमीच येतात) तरीदेखील ते शंभर टक्के उत्स्फूर्त वाटायलाच हवे. आणि ते तसे वाटावे, यासाठी एक सोपी युक्ती आहे. ती म्हणजे, ते खरोखरीच उत्स्फूर्त असावे. आजवर मी कुणालाही कबूल केले, आणि वेळेत लेखन दिले नाही, असे झालेले नाही. अगदी साप्ताहिक सदरापासून ते तीन अंकी नाटकापर्यंत बहुतेक वेळा माझ्यासमोर कुणीतरी घालू दिलेली किंवा मी स्वत:च काम रखडू नये म्हणून घालून घेतलेली 'डेडलाइन' असते आणि तरीसुद्धा मला आतून लिहिण्याची उर्मी आल्याशिवाय मी कागदाला पेन लावत नाही. ही उर्मी कधी येणार हे मला माहीत नसते. त्यासाठी मनात जुळवाजुळव झालेली असते. काय लिहिणार हे साधारणसे माहीत असते. स्मरणपत्रे येत असतात. कधी निर्मात्यांचे दिवसाला दोनतीन फोन येतात. 'आम्ही थांबलो आहोत' असे. मी त्या कशानेही चित्त विचलित होऊ देत नाही. मन पूर्ण मोकळे ठेवलेले असते. काहीतरी हे वाच, ते चाळ असे चाललेले असते. व्यक्ती म्हणून मीही अस्वस्थच असतो. तरीही माझ्यातला कलावंत शांतपणे 'लिहावेसे वाटण्याची' वाट पाहात असतो... या विशिष्ट लेखनाच्या विचाराची सुरुवात खूप आधी झालेली असते. तरीही डेडलाइन जवळ येण्याची आपत्ती कोसळलेलीच असते, पण लिहू शकत नाही.

आणि अचानक – डेडलाइन हुकणार, असे वाटता वाटताच, बांध फुटल्यासारखे लिहिले जाऊ लागते. त्याआधी संपादक, निर्माते हवालदिल असतात. पण भरवसाही ठेवून असतात. 'जौळ, 'ॲडम' या कादंबऱ्या, दिवाळी अंकाचे सगळे काम झाल्यावर जवळजवळ न वाचताच संपादकांनी प्रेसकडे दिल्या.

म्हणजे, काळावर नियंत्रण ठेवा. पण तुमच्यावर अंतिम नियंत्रण कलेचे असू द्या. प्रत्येक कलावंत हे मानतो. मी हे मानतो.


## रत्नाकर मतकरी यांची काही खास पुस्तकं

१०० रु.

*ती माझ्याकडे रोखून पाहत उभीच होती.*
*मी वळलो. आणि घरी परतू लागलो...वडाच्या झाडाखाली सगळीकडे, चांदण्याचे राखाडी डागच डाग पडले होते.. मी घराच्या पायऱ्या चढू लागलो.अचानक माझ्या छातीत दुखू लागले. अर्थात हा एक योगायोगच..... माझा अजिबात विश्वास नाही...*
*असे काही कुणी केलेल्या नुसत्या प्रार्थनेने कुणाचे मरण.....*
**('प्रार्थना' - 'निर्मनुष्य' कथासंग्रह)**

८० रु.

*जळक्या लाकडांच्या ढिगाऱ्यात त्या दोन देहांचे कोळसे पडले होते. प्राण निघून गेले तरी त्यांतले दोन डोळे त्या सर्वनाशाकडे बघत होते. घरादारासकट सबंध कुटुंबाला समूळ नष्ट करणाऱ्या एका प्रचंड शक्तीकडे - असाहाय्य अनामिक भीतीने - सताड उघडे राहून बघत होते - एकटक बघत होते...*
**('आल्बम' - 'खेकडा' कथासंग्रह)**

१०० रु.

*आणि एकाएकी- मोठ्ठा आवाज! पेटी मांडीवरून उडून एकदम टपाला भिडली आणि परत खाली आली... काचांचा चक्काचूर झाला... त्यातून सांगाडा बाहेर पडतांना क्षणमात्र दिसला. दुसऱ्याच क्षणी मुरंजन सीटखाली कोसळला होता. त्याची मान तिरपी झाली होती. पेटीतून बाहेर पडून मोकळा झालेला सांगाडा त्याच्या छातीवर आणि... सांगाड्याचे हात त्याच्या गळ्यात...*
**('कामगिरी' - 'मध्यरात्रीचे पडघम' कथासंग्रह)**

१०० रु.

*घड्याळाची टिकटिक- टेबलावरच्या सप्तर्षीचा श्वासोच्छ्वास - नुसती निळ्या बुबुळांची हालचाल - इकडून तिकडे - तिकडून इकडे- कुठे गेले ते चिडवल्यासारखे ही ही करून हसणे? तो उन्माद? "आय प्रपोज्ड हर. शी ॲक्सेप्टेड." तुला माहीत नसेल- पण तू दगा दिलास. मला दगा दिलास! सगळीकडे दाटून येणारा काळोख - फक्त डोक्यावर जळणारा एक प्रखर दिवा-*
**('म्हणे कोण मागे आले' - 'कबंध' कथासंग्रह)**

**पोस्टेज प्रत्येकी २५रु.**

# पंडित संजीव अभ्यंकर

**‘योग्य वेळेला योग्य गोष्टी करण्यासाठी नियोजन करणे’ त्याच्यासाठी जास्त महत्त्वाचे असते. आज मी ‘गायक’ म्हणून जो काही थोडासा परिचित झालो आहे, त्यासाठी मला माझ्या ‘आयुष्याचंच’ व्यवस्थापन करावं लागलंय असं मला वाटतं.’**

गेल्या आठवड्यात एक परिसंवाद ऐकला. मोठमोठे उद्योजक, ख्यातनाम प्राचार्य, वरिष्ठ सरकारी अधिकारी असे, आपल्या कामात व्यस्त असणारे सर्व नामवंत सहभागी, आपले स्वत:चे ‘वेळेचे व्यवस्थापन’ यावर अगदी मनापासून मोकळेपणाने बोलले. विचार करता करता मनात आलं की हे सर्व वक्ते, अतिशय कार्यरत व नेमस्त असा आपला दिनक्रम, विचारपूर्वक वेळेची आखणी करून यशस्वीरित्या पार पाडणारे होते. पण मग वेळेच्या बाबतीत अपरिहार्यपणे अनियमित असणाऱ्या कलाक्षेत्रात स्वत:चे आयुष्य झोकून दिलेल्या कलाकारांना, असे वेळेचे व्यवस्थापन करण्याची गरज भासत असेल का?

हा विचार पाठ सोडेना. मग ठरवलं की एखाद्या कलावंताशी याविषयी प्रत्यक्ष बोलायचंच. आणि लगेचच, शास्त्रीय गायनक्षेत्रात तरुण वयातच ख्यातकीर्त झालेले पं. संजीव अभ्यंकर यांचे नाव आठवले. लगेच त्यांच्याशी संपर्क साधला आणि भेटीची वेळ ठरविली.

‘त्यांच्या करिअरमध्ये त्यांचे वेळेचे व्यवस्थापन समजून घेणे’ हा या भेटीचा उद्देश असल्याचे सांगताच, नेहमीसारखे प्रसन्न हसत संजीवजींनी आधीच सांगून टाकलं, ‘‘मीच काय, कलाक्षेत्रातला दुसरा कोणताही कलाकार, आपल्या दिनचर्येचे अगदी नेमून दिल्यासारखे ठराविक वेळापत्रक आखू शकत असेल, असे मला तरी वाटत नाही. प्रत्येक दिवशीच्या दिनक्रमातील अनियमितता आम्ही अगदी नियमितपणे अनुभवतो. आणि म्हणूनच, वेळेचे दीर्घकालीन व्यवस्थापन करणे व एखाद्या व्रतासारखे त्याचे पालन करणे हे आमच्यासारख्यांसाठी तरी असंभव आहे.’’

आमची चर्चा सुरू होण्याआधीच संपते की काय, ही भीतियुक्त शंका बहुधा माझ्या चेहऱ्यावर उमटली असावी. कारण लगेचच संजीवजी म्हणाले, ‘‘याचा अर्थ आम्हाला कधीच वेळेचे व्यवस्थापन वगैरे करण्याची गरज पडत नाही, असा मात्र नाही हं! उलट, दररोजच त्या त्या दिवसाचा वेळेचा व कामाचा हिशेब आम्ही सकाळीच मांडतो, आणि तो दिवस त्याप्रमाणेच खर्च होईल हे कटाक्षाने पाळतो.’’

काहीतरी वेगळं ऐकायला मिळणार म्हणून मला आनंद झाला. स्वत:च्या मधुर, दिलखुलास गायनाइतकंच दिलखुलास बोलत संजीवजी सांगू लागले, ‘‘तुला खरं सांगतो, रुढार्थाने ‘वेळेचे व्यवस्थापन’, म्हणजे ‘ठराविक वेळात, महत्त्वाच्या जास्तीत जास्त गोष्टी बसविणे व न चुकता पार पाडणे.’ पण ही व्याख्या कोणत्याच कलाकाराला लागू होत नाही. त्यापेक्षा ‘योग्य वेळेला योग्य गोष्टी करण्यासाठी नियोजन करणे’ त्याच्यासाठी जास्त महत्त्वाचे असते. माझंच उदाहरण बघ ना! आज मी ‘गायक’ म्हणून जो काही थोडासा परिचित झालो आहे, त्यासाठी मला माझ्या ‘आयुष्याचंच’ व्यवस्थापन करावं लागलंय असं मला वाटतं.

त्याची सुरुवात अगदी लहानपणीच झाली. सकाळी शाळेचा गृहपाठ करून, गाण्याची शिकवणी करून वेळेत शाळेत पोहोचता यावे म्हणून त्या क्लासच्या जवळ असणाऱ्या गावातील नू.म.वि.त माझे नाव घातले गेले. त्यामुळे जाण्यायेण्याचा पुष्कळ वेळ वाचत होता आणि जास्त वेळ आणि जास्त एकाग्रतेने गाणं शिकता येत होतं. गाण्याइतकाच व्यायामही महत्त्वाचा, म्हणून काहीही झालं

तरी शाळेतून आल्यावर न चुकता दोन तास ग्राउंडवर जावे लागे.''

''दहावीनंतर, माझे गुरू पं. जसराजजी यांच्या घरी, मुंबईला मी संगीत-शिक्षणासाठी राहू लागलो. आणि तिथे मात्र मला माझ्या वेळेचा जास्तीत जास्त चांगला व योग्य उपयोग करण्याची, म्हणजेच, तुझ्या भाषेत 'वेळेचे व्यवस्थापन' करण्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली. संगीताबरोबरच मला कॉलेजचा अभ्यासही स्वत:चा स्वत:च करायचा होता. पहाट, दुपार, रात्र असा तीन वेळा रियाज, प्रत्यक्ष संगीत शिक्षण, अभ्यासाचे वेळापत्रक पाळणे, स्वत:ची इतर नित्याची कामे, आणि त्याबरोबरच वैयक्तिक आवडीनिवडी जपणे, घरी, मित्रांशी संपर्क साधणे – बाप रे! या सर्वांचा योग्य ताळमेळ घालणं म्हणजे खरंच तारेवरची कसरत होती. दिवसाचं अगदी मिनिट अन् मिनिट मी विचारपूर्वक ठरवून खर्च करत होतो. आता जाणवतंय, की 'वेळेचे व्यवस्थापन' या संकल्पनेचाच तेव्हा उपयोग झाला. म्हणूनच गुरुजींची मर्जी संपादन कामही तितकेच न चुकता करायचो. आता मला प्रकर्षाने वाटतं, नव्हे माझी खात्रीच आहे की, कुठल्या एका गोष्टीत प्रावीण्य मिळविण्याच्या नादात, या इतर आवडत्या गोष्टी करण्याची त्या वयातली उर्मी मी जर पूर्ण दाबून टाकली असती, तर कालांतराने त्याचे उलट परिणाम उफाळून, माझ्या करिअरवर नक्कीच विपरित परिणाम झाला असता. बरे झाले, मी तेव्हा माझ्या आवडींसाठीही वेळ काढू शकलो.''

यानंतर संजीवजी स्वत:चे कार्यक्रम करू लागले. हळूहळू 'लोकांचा आवडता तरुण-तडफदार गायक' म्हणून नाव मिळवू लागले. आता त्यांचा दिनक्रम त्यांनी कसा आखलाय असं ओघानेच मी विचारल्यावर ताबडतोब उत्तर आलं, ''आता देशात आणि परदेशात कार्यक्रमांसाठी फिरताना, करिअर आणि कुटुंब दोन्ही योग्य तऱ्हेने सांभाळताना, वेळेच्या नियोजनाचे हे कसब मला नेहमीच खूप उपयोगी पडत आलंय. दुसऱ्या गावाला पोहोचल्यापासून कार्यक्रमानंतर परत निघेपर्यंत, जेमतेम एक-दीड दिवस हातात असतो. इतक्या कमी वेळात किती गोष्टी साधायच्या असतात म्हणून सांगू? संयोजकांबरोबर संवाद, स्थानिक वार्ताहरांसाठी चुकवता न येणाऱ्या मुलाखती, चाहत्यांशी गाठीभेटी, आवाजाला विश्रांती देण्यासाठी आवश्यक अशी, सर्वात महत्त्वाची असणारी आवश्यक तेवढी झोप आणि दोनतीन तासांचा प्रत्यक्ष कार्यक्रम, इतक्या गोष्टींचं व्यवधान पाळणं म्हणजे घड्याळाच्या काट्यांवरची कसरतच म्हणा ना! प्रत्येकच गोष्ट अगदी कटाक्षाने कॉम्पॅक्ट ठेवावी लागते. प्रत्येक मैफल ही एक नव-निर्मिती, नवं आव्हानच आहे असं मी मानतो. आणि म्हणूनच प्रत्यक्ष कार्यक्रमाआधी आत्यंतिक गरजेची असणारी आवाजाची विश्रांती आणि बोलायला भाग पाडणारी बाकीची कामं यांचा मेळ, वेळेची व्यवस्थित आखणी केल्याशिवाय घालताच येत नाही. प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी, तेथील परिस्थितीनुसार वेगवेगळे वेळेचे व्यवस्थापन! म्हणूनच हे व्यवस्थापन म्हणजे ''controlling yourself in terms of time, while doing the things'' असंच मला म्हणावंसं वाटतं. परदेश दौऱ्यात तर याचा फारच अनुभव येतो. सहा-सात आठवड्यांत

**अवघड आणि वेगळं असं एक समय-नियोजनाचं कसब तर प्रत्यक्ष गाताना साधावंच लागतं. दिलेल्या वेळेचे भान ठेवून मांडणीचा क्रम विस्कळीत न करता, मनातील उर्मीला मूर्तरूप देत कार्यक्रमाची उंची गाठणं हे खूप महत्त्वाचं असतं. आणि प्रत्येक मैफलीसाठी मिळालेला वेळ वेगवेगळा असतो. अगदी वीस मिनिटांपासून दोनतीन तासांपर्यंत कितीही. कॅसेटसाठी तर अल्बमच्या गरजेनुसार एखादा राग फक्त सात मिनिटांतही मांडावा लागतो. इथे कुठलेही आखीव वेळापत्रक न मांडता, उपलब्ध वेळाची राग मांडणीशी चपखल सांगड घालणं आणि श्रोत्यांच्या मनात तो राग मूर्तिमंत उभा रहावा म्हणून जास्तीत जास्त प्रयत्न करणं हे कसब अक्षरशः पणाला लागतं.**

करण्याइतकी गाण्याची तयारीही होत होती आणि दरम्यान मी चक्क ६८ टक्के मार्कस् मिळवून बी. कॉम. ही होऊ शकलो.'' आणि पुढे मिस्किलपणे हसत त्यांनी पुस्ती जोडली, ''आणि बरं का, याखेरीज मला चक्क झोपेचंही व्यवस्थापन करावं लागत होतं. रियाजासाठी पहाटे उठावंच लागे म्हणून झोप अर्धवट होई. दुपारी झोपावं तर तेव्हा परत रियाझ. त्यात गुरुजी मनात येईल तेव्हा शिकवत असत. त्यावेळी फ्रेश असणं आवश्यक असे – मग गुरुजी कुठे बाहेर गेले की झोपून घेण्याचा प्लॅन मात्र नेहमीसाठी होता.''

एवढ्या उमलत्या वयात, ध्येयाच्या ध्यासाने, इतर सर्व मोह बाजूला ठेवून, अगदी विचारपूर्वक जास्तीत जास्त वेळ कारणी लावण्याची ही धडपड ऐकून मी खरंच अचंबित झाले. आणि तेवढ्यात संजीवजींनी मला त्यांचा एक अगदी वेगळाच असा विचार ऐकवला तो असा – ''लहानपणापासूनच क्रिकेटची मला खूप आवड आहे. पुण्यात असायचो तेव्हा, सकाळचा रियाज झाल्यावर क्रिकेटची शॅडो प्रॅक्टिस करून मी ती भूक भागवायचो. त्याप्रमाणेच, संध्याकाळची तबलजी येण्याची वेळ लक्षात ठेवून, दुपारच्या रियाजानंतर मधल्या वेळात मित्रांना भेटणे हे दुसरे आवडीचे

वेगवेगळ्या शहरांत मिळून वीसएक कार्यक्रम – कोणालाही नाराज न करणे हे पथ्य आणि वाट्टेल ते झाले तरी कार्यक्रमाच्या क्वॉलिटीशी जराशीही तडजोड न करणे ही व्यवसायाची अनिवार्य गरज – समय व्यवस्थापनेचे कौशल्य अंगी बाणविल्याशिवाय हे सर्व शक्य होणं केवळ अशक्य आहे.''

प्रत्यक्ष कार्यक्रम सादर करतानाही यादृष्टीने काही वेगळा विचार करावा लागतो का? या प्रश्नाचेही त्वरित उत्तर आले, ''हो तर! याहून अवघड आणि वेगळं असं एक समय-नियोजनाचं कसब तर प्रत्यक्ष गाताना साधावंच लागतं. दिलेल्या वेळेचे भान ठेवून मांडणीचा क्रम विस्कळीत न करता, मनातील उर्मीला मूर्तरूप देत कार्यक्रमाची उंची गाठणं हे खूप महत्त्वाचं असतं. आणि प्रत्येक मैफलीसाठी मिळालेला वेळ वेगवेगळा असतो. अगदी वीस मिनिटांपासून दोनतीन तासांपर्यंत कितीही. कॅसेटसाठी तर अल्बमच्या गरजेनुसार एखादा राग फक्त सात मिनिटांतही मांडावा लागतो. इथे कुठलेही आखीव वेळापत्रक न मांडता, उपलब्ध वेळाची राग मांडणीशी चपखल सांगड घालणं आणि श्रोत्यांच्या मनात तो राग मूर्तिमंत उभा रहावा म्हणून जास्तीत जास्त प्रयत्न करणं हे कसब अक्षरश: पणाला लागतं. कोणत्याही परिस्थितीत गाण्याची क्वालिटी मेन्टेन करावीच लागते.''

जवळपास पंधरा वर्षांपूर्वी टिळक स्मारक मंदिरात, संजीवजींनी केवळ पंधरा मिनिटांत समोर साक्षात उभा केलेला बहारदार 'बसंत' मला झर्रकन आठवून गेला.

मला त्या आठवणीतून बाहेर काढत आता ते मलाच विचारत होते, ''आता सांग, 'वेळेचे व्यवस्थापन' या शास्त्राच्या कोणत्या चौकटीत तू आम्हा कलाकारांना बसवशील? मुळात आमच्या व्यवसायाला साचेबंदपणाच नाही. कार्यक्रमाच्या वेळी व्यवस्थापनाचे वेगळे नियम आणि घरी असताना वेगळे. घरी घरच्यांच्या गरजांनुसार पुरेसा वेळ देणे, पुढील कार्यक्रमांचे नियोजन, रेकॉर्डिंग असेल तर त्याच्या तालमी, यासोबत रोजचा ठराविक व्यायाम, बायको-मुलांच्या रूटीनमध्ये सामावून जाणे, यासाठी वेळेचा काटेकोर हिशेब करावाच लागतो. त्यातही ठराविक दिवस नक्की घरी व ठराविक दिवस नक्की बाहेर असंही नसतं. आणखी एक गंमत म्हणजे, उद्या कार्यक्रम असेल तर आज आवाजाला विश्रांतीची गरज असते हा व्यवसायाचा एक भाग असतो. त्यामुळे रिकामा वेळ असतानाही, 'गप्प' राहण्यासाठी आणि इतर काही न करण्यासाठी आवर्जून वेळ राखून ठेवणे, हेही एक प्रकारचे व्यवस्थापनच आहे की नाही? कारण त्याशिवाय प्रत्यक्ष गाताना मनाची एकाग्रता-एकरूपता साधणे, मन स्थिर असणे या उत्तमतेसाठी आवश्यक गोष्टी साधतच नाहीत. मग आवडते विषय टाळून, इतर आवश्यक कामे, ही अत्यावश्यक विश्रांतीची वेळ सोडून उरलेल्या वेळात पार पाडण्यासाठी वेळेचे नियोजन करावेच लागते.''

बोलता बोलता, आपली रियाजाची वेळ झाल्याचे लक्षात येताच, संजीवजींनी एकदम समारोपच केला, ''व्यवस्थापनाची ही पथ्ये न पाळल्यास त्याचा गाण्यावर होणारा परिणाम माझा मला लगेच जाणवतो व पुन्हा असे होऊ न देण्याची खबरदारी घ्यावीच लागते. पण शेवटी मी अगदी नम्रपणे एक गोष्ट सांगू इच्छितो की, आजपर्यंत लोकांनाही हा परिणाम जाणवेल, इतकं माझं समय-व्यवस्थापन कधीच गडबडलेलं नाही बरं का!''

'वेळेचे व्यवस्थापन' याविषयी एक व्यग्र कलाकार म्हणून संजीव अभ्यंकरांचे हे अनुभव ऐकून मी एका निष्कर्षाप्रत नक्की पोहोचले की, ''मुळात वेळेचे व्यवस्थापन म्हणजे तरी काय? तर आयुष्यात आवश्यक असणाऱ्या प्रत्येक गोष्टीसाठी, इतर कोणतीही आवश्यक गोष्ट न डावलता किंवा न डिस्टर्ब करता, आवश्यक तेवढा क्वालिटी टाइम उपलब्ध करून देणे होय.''

पहा पटतंय का?

शब्दांकन : **सौ. मंजुषा सुनीत मुळे**
फोन : २४२६६६७८

गांधर्वी

बाणी बसू
अनु. मृणालिनी गडकरी

**१७० रु.**

**पोस्टेज २५ रु.**

*कंठात वैखरी, हृदयात मध्यमा, स्वधिष्ठानात पश्यंती, त्यापुढे गभीरात गेल्यावर ती वाणी माणसाला ऐकू येत नाही. ती होते मग परा. सूरलोकांच्या मार्गावरून चालता चालता एखादा अन्यमनस्क देवगंधर्व मर्त्यलोकात येऊन पडला, तर त्याच्या दु:खाला पारावार रहात नाहीत. त्याला जेवढं देता येईल तेवढं तो देतो. गांधर्वींची नायिका 'अपाला' म्हणजे अशीच एक गांधर्वी आहे. सप्तसूर हेच तिचं संचित आहे, भाग्य आहे. आणि दुर्भाग्यही!*

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# डॉ. आनंद यादव

**कवितालेखन वेळेचे व्यवस्थापन करून करता येत नाही; तर ते कवितास्फुरण झाल्यावर त्यावेळी 'वेळ' काढून करावे लागते; मात्र गद्यलेखनाचे तसे नसते. असे का व्हावे ?**

साहित्याची निर्मिती ही घटना साहित्यिकाच्या वैयक्तिक पातळीवर चालते. ती साहित्यिकाच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाशी संबंधित असल्याने तिच्याविषयी वस्तुनिष्ठ स्वरूपाचे नियम किंवा लक्षणे सांगता येणे कठीण असते. मात्र एखादा जाणकार साहित्यिक स्वत: साहित्याची निर्मिती कशी करतो, हे स्वानुभवाच्या आधाराने सांगू शकेल. अर्थात त्याचे ते स्वत:चे अनुभव असतील. ते नियम म्हणून स्वीकारता येणे कठीण असते. तरीही त्या साहित्यिकाच्या अनुभवांचा फायदा इतर साहित्यिकांना कमी-अधिक प्रमाणात मिळू शकतो; किंवा घेता येऊ शकतो.

मीही त्याच हेतूने कविता, ललित लेख, कथा, कादंबरी यांच्या निर्मितीविषयी थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

मी साहित्याकडे गंभीर वृत्तीने पाहतो. साहित्यनिर्मिती हे एक व्रत किवा तपसदृश साधना आहे. गंभीर, मन:पूर्वक, चिंतनशील वृत्तीने साहित्याची निर्मिती करण्यात मला धन्यता वाटते. अशा साहित्याचा वाचकमनावर सखोल परिणाम होतो. हा परिणाम इंजेक्शनसारखा असतो; मद्य प्यायल्यावर लगेच येणाऱ्या धुंदीसारखा किंवा तंबाखू-मावा खाल्ल्यावर येण्यासारख्या तात्कालिक गुंगीसारखा तो नसतो. धुंदी किंवा गुंगी येते आणि हळूहळू निघून जाते. पण रक्त शुद्ध करते. त्यामुळे इंजेक्शनचा परिणाम हा रक्त आणि मन दीर्घकाल निरोगी करण्यात होत असतो. त्या दृष्टीने मी साहित्याकडे पाहतो. त्याच दृष्टीने मी साहित्याची निर्मिती करण्याचा प्रयत्न करतो... साहित्याने साहित्यिकाला मिळणारी प्रसिद्धी, प्रतिष्ठा आणि पैसा या गोष्टी मला गौण आणि आनुषंगिक वाटतात.

वयाच्या विशीनंतर माझे साहित्य प्रसिद्ध होऊ लागले, माझ्या पंचविशीत माझ्या साहित्याला सरकारी पारितोषिके मिळू लागली. म्हणून मी साहित्याचा गंभीरपणे सखोल अभ्यास करू लागलो. असा अभ्यास केल्यावर वयाच्या पस्तिशीनंतर मी साहित्यनिर्मितीकडे गंभीरपणाने एक व्रत, एक तप- एक साधना म्हणून पाहू लागलो. माझ्यातील साहित्यिकाचे हे मूलभूत स्थित्यंतर होते. या स्थित्यंतरानंतरच मी साहित्यप्रकारांच्या निर्मिताचाही जाणीवपूर्वक अभ्यास केला.

चांगल्या कवितेतून व्यक्त होणारा अनुभव हा काव्यात्म पातळीवरचा असतो. तो कलात्म असतो. त्यामुळे कवितेला एक छानदार आकृतिबंध प्राप्त होतो. तो प्रमाणबद्ध असल्याने त्याला सौंदर्य प्राप्त होते. तो व्यवहारातील अनुभवाप्रमाणे वाट्टेल तसा ओबडधोबड, वाहवत गेलेला, एकारलेला नसतो. कवितेच्या या अनुभवात संवेदनांना, कल्पनाशक्तीला, भावोत्कटतेला, तरल चिंतनशीलतेला, मन:पूर्वकतेला प्राधान्य लाभलेले असते... आणि हे सगळे कवीच्या व्यक्तिमत्त्वात असावे लागते किंवा जमून यावे लागते. ते असल्यावर त्याला कवितालेखनाचे किंवा काव्यनिर्मितीचे स्फुरण झाले तर त्यावेळची त्याची ती कविता चैतन्यपूर्ण, देखणी, सुंदर, उत्तम रूप प्राप्त झालेली होते.

यावरून हे लक्षात येते की 'कविता' ही स्फुरत असते. हे स्फुरण कधी होईल सांगता येत नाही. जेव्हा ते होईल तेव्हाच कवितालेखन करावे लागते. त्याच वेळी लेखन करण्यास मोकळा वेळ किंवा फुरसत असली पाहिजे. ज्याला कविता करण्याचा छंद असतो; तो हे बरोबर साधत असतो. एरवी 'मागणी तसा पुरवठा' या न्यायाने कविता होत नाही.

म्हणून कविता जेव्हा स्फुरेल तेव्हाच तिचे लेखन करावे.

त्यांचा संग्रह करून ठेवावा आणि त्या संग्रहातूनच प्रसिद्धीसाठी कविता पाठवावी, हे उत्तम. जाणकार कवी असे करतो. नियतकालिकाचे जाणकार संपादकही 'अमुक एका विषयावर कविता लिहून पाठवा,' असे कधीच सुचवीत नाहीत. 'उत्तम कविता पाठवा' अशीच त्यांची मागणी असते.

कवितालेखन वेळेचे व्यवस्थापन करून करता येत नाही; तर ते कवितास्फुरण झाल्यावर त्यावेळी 'वेळ' काढून करावे लागते; मात्र गद्यलेखनाचे तसे नसते. असे का व्हावे? – याचे कारण गद्यलेखनात व्यक्त होणारे अनुभव सामान्यत: 'व्यावहारिक पातळीवरचे अनुभव' असतात. ते सर्वसामान्य माणसाला येत असतात. पण व्यावहारिक जीवनाच्या धबडग्यात त्या माणसाला त्या अनुभवांकडे खास लक्ष द्यायला वेळ नसतो, उसंत नसते. किंवा त्याला इतर अवधानांच्या तुलनेत ते नगण्य, कमी महत्त्वाचे किंवा दुर्लक्षणीय वाटत असतात.

नव्हता.

१९६१ साली एम.ए. झाल्यावर प्राध्यापकाची नोकरी करू लागलो. १९६२ साली विवाह झाला. या दोन घटनांमुळे वेळेचं व्यवस्थापन करावे लागले. वयात प्रौढता आली. काव्यमय जगण्याचे दिवस कमी झाले. व्यावहारिक अनुभवांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागले. हळूहळू माझ्या प्रौढ आणि धबडग्यात सापडलेल्या मनाला कळून आले की ह्या जगात काव्यमय जगण्याला, ते अनुभव कवितारूपात मांडण्याला व्यवहारग्रस्त समाजजीवनात फारसा अर्थ नाही...

त्यामुळे नकळत मी गद्यलेखनाकडे वळलो. माझे गद्यलेखन (ललित लेख, कथा) 'सत्यकथे'सारख्या प्रतिष्ठित मासिकातून भराभर प्रसिद्ध होऊ लागले आणि माझी साहित्यिक होण्याची महत्त्वाकांक्षा अधिकच बळावत गेली... रात्रंदिवस लेखनाचाच विचार माझ्या मनात त्या तिशीच्या काळात रुंजी घालू लागला.

**माझ्या कादंबरीलेखनाचे मूलद्रव्य (रॉ मटेरिअल) मी प्रथम अभ्यास करून नोंदींच्या रूपात सिद्ध करतो. त्याच्या आधारे माझ्या मनात कादंबरीचा लेखनपूर्व ढाचा तयार होतो. त्याच्या आधारे मी कादंबरीची प्रकरणे कल्पितो आणि मगच लेखन करतो. हे लेखन माझ्या सवडीने, सातत्याने पण वेळ मिळेल तसे, काळाचे बंधन न मानता, माझे समाधान होईपर्यंत पुनर्लेखन करत मी कादंबरी पूर्ण करतो...**
**या लेखनाला वेळेचे बंधन नसते.**

साहित्यनिर्मिती करणारा लेखक मात्र तो अशा अनुभवांकडे खास लक्ष देतो. समाजाच्या दृष्टीने त्या अनुभवांचे महत्त्व जाणतो. ते अनुभव मनोमन इतर अनुभवांपासून वेगळे काढून त्यांच्यावर स्वतंत्रपणे विचार करतो. आणि त्याला ते महत्त्वाचे वाटले तर त्यांच्यावर स्वतंत्रपणे साहित्यकृती निर्माण करतो. ही साहित्यकृती मग ललित गद्य, लघुकथा, दीर्घकथा, कादंबरी किंवा नाटक इत्यादी कोणत्याही प्रकारची असू शकेल; ते साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते; तसेच त्याच्या आवडीनिवडीवरही अवलंबून असते. एवढेच नव्हे तर आलेल्या अनुभवाच्या वैशिष्ट्यांवरही अवलंबून असते.

१९५५ साली वयाच्या विशीमध्ये साहित्यिक होण्याची माझी महत्त्वाकांक्षा जाणीवपूर्वक आकाराला आली. जाणीवपूर्वक मी ठरविले की आपण साहित्यिक व्हायचे. इयत्ता पाचवीपासून मी केवळ आवड म्हणून कविता करत होतो. अनेक कारणांनी एकाकीपण वाट्याला आलं होतं. त्या काळात हिंडताना-फिरताना जे दिसत होतं, अनुभवत होते, जे आठवत होतो, ज्या आठवणीत रमत होतो, त्यांना कवितारूप देण्याचा मला छंद लागला होता. मी माझ्यातच रमून जात होतो. ते वयही तसंच होतं. कविता सुचली की कागद-पेन घेऊन बसत होतो. वेळेच्या व्यवस्थापनाचा प्रश्नच

वेळेचे व्यवस्थापन केले. माझी कॉलेजची नोकरी सकाळी ७॥ ते११॥ अशी होती. त्यामुळे मला दुपारचा वेळ सामान्यत: मोकळा मिळत असे. या काळात मला जाता-येता, विचार करता, गतायुष्यातील घटनाप्रसंग आठवताना, मित्रांशी गप्पा मारताना विविध घटनाप्रसंगांतून अनेक कथांची बीजं सुचू लागली. त्यांच्या आधारे कथा कशी लिहिता येईल, याचा विचार मी कळत नकळत सतत करू लागलो. त्यांची एक नोंदवही मी केली. तिच्यात संक्षिप्त स्वरूपात नोंदी करून ठेवू लागलो... संपादकांची मागणी असो वा नसो; सवड होताच त्या नोंदींच्या आधारानं कथालेखन करू लागलो. ते उमेदीचे दिवस होते, मी उमेदवार लेखक होतो. त्यामुळे मासिकांच्या दिवाळी अंकांसाठी अनाहूतपणे कथा पाठवू लागलो. साहित्याच्या क्षेत्रात कथाकार म्हणून स्थिर झाल्यावर मात्र; संपादकांकडून मागणी आली तर कथा पाठवू लागलो. आधीच नोंदी करून ठेवलेल्या कथाबीजांच्या आधारे कथा लिहू लागलो. या काळात नोंदवही हा माझा फार मोठा आधार होता.

जो अनुभव कथालेखनाचा होता, तसाच अनुभव ललित गद्यलेखनाचा होता. आलेल्या अनुभवाच्या प्रकृतिवैशिष्ट्यांवर कथा साधायची की 'ललित निबंध' साधायचा, हे अवलंबून असते. मला ती वैशिष्ट्ये माहीत असतात. कारण मी मराठी साहित्याचा प्राध्यापकही

असल्याने प्रत्येक साहित्यप्रकाराची अंगभूत वैशिष्ट्ये काय आणि कोणती असतात, याचा पुरेसा अभ्यास केला आहे. त्यामुळेच आणि आंगिक कुवतही असल्यामुळे आजवर मी साहित्याच्या बहुतेक सर्व प्रकारांत लेखन केले आहे... नोंदवहीमुळेच मला कथाविषयांची व ललित-निबंध विषयांची चणवण कधीच भासत नाही; भासली नाही.

तरीसुद्धा आताशा म्हणजे गेल्या दहाबारा वर्षांत वयाची साठी ओलांडल्यानंतर कथा, ललित निबंध यासारख्या साहित्यलेखनाचा माझा उत्साह बराच ओसरला आहे. कारण हे आकृतिबंध माझ्या आजच्या व्यक्तिमत्त्वाला फारसे सुसंगत आहेत, असे वाटत नाही. म्हणून मी प्रामुख्याने आत्मचरित्र, कादंबरी यासारख्या प्रदीर्घ कालपटावर पसरलेल्या आकृतिबंधांकडे वळलो आहे. थोडक्यात मी असे म्हणेन की आत्मचरित्र, कादंबरी यासारखे साहित्यप्रकार ज्या व्यापक आणि अर्थपूर्ण जीवनाला आपल्या आवाक्यात घेतात, तेवढा व्यापक आवाका कथा, ललितनिबंध या साहित्यप्रकारांना सामान्यत: नसतो. विशेषत: कादंबरीच्या तुलनेत कथा, ललितनिबंध फारच कमी पडतात, असे मला वाटते.

आजवर ज्या कादंबऱ्या मी लिहिल्या, त्या मागणी तसा पुरवठा, या न्यायाने मुळीच लिहिल्या नाहीत. उलट मला मानवी जीवन जे काही कळले आहे आणि जे मला मानसिकदृष्ट्या जवळचे वाटते; त्याचेच लेखन मी माझ्या समाधानासाठी केले आणि ते माझ्या प्रकाशकांनी स्वतंत्रपणे ग्रंथरूपाने प्रसिद्ध केले. मी ते मासिकांतून प्रसिद्ध केले नाही.

माझ्या कादंबरीलेखनाचे मूलद्रव्य (रॉ मटेरिअल) मी प्रथम अभ्यास करून नोंदींच्या रूपात सिद्ध करतो. त्याच्या आधारे माझ्या मनात कादंबरीचा लेखनपूर्व ढाचा तयार होतो. त्याच्या आधारे मी कादंबरीची प्रकरणे कल्पितो आणि मगच लेखन करतो. हे लेखन माझ्या सवडीने, सातत्याने पण वेळ मिळेल तसे, काळाचे बंधन न मानता, माझे समाधान होईपर्यंत पुनर्लेखन करत मी कादंबरी पूर्ण करतो... या लेखनाला वेळेचे बंधन नसते. वर्षभर, तर कधी चार-चार वर्षे हे लेखन चालतं.

अशा प्रकारच्या लेखनाची परिपूर्ती झाली की मिळणारा आनंद अनमोल आणि अद्वितीय वाटतो. मला यातच जीवनाचे सार्थक वाटते.


## झलक

# लोकसखा ज्ञानेश्वर

**आनंद यादव**

*''गीताभक्तांनी आता स्थिर बैठक घालून सरळ ताठ बसावं. डोळे मिटावेत. परमेश्वरासाठी हात जोडावेत. मी जे ओवीबद्ध पसायदान म्हणेन ते मनात म्हणावे, मनात मुरवून घ्यावे.''*

*मग स्वत:च ज्ञानदेव सावरून नीट पद्मासन घालून बसले. डोळे मिटले. बसून अंतर्मुख झाले. सूर धरून ओवीबद्ध पसायदान ताठ मानेने म्हणू लागले...*

*''...आता विश्वात्मकें देवें! येणें वाग्यज्ञे तोषावें।*
*तोषोनि मज द्यावे। पसायदान हे–।।*
*जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मी रती वाढो।*
*भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें।।*
*दुरितांचे तिमिर जावो। विश्व स्वधर्मसूर्ये पाहो।*
*जो जें वांछील तो तें लाहो। प्राणीजात।।''*

*असं संथ लयीत एक एक ओवी म्हणत ज्ञानदेव पुढे जात होते. वाणीत गोडवा होता. कोमलता होती. हळूहळू तिच्यात कंपही येऊ लागला. शेवटच्या ओळीपाशी आले...*

*''येथ म्हणे श्रीविश्वेशरावो। हा होईल दानपसावो।*
*येणे वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला।।*
*...सुखिया झालाऽऽ*

*ओवीचं शेवटचं चरण ते हळुवारपणे पुन:पुन्हा म्हणू लागले. सुरातील कंप वाढू लागला.*

*मिटलेल्या डोळ्यांतून अनपेक्षितपणे अश्रूंच्या धारा वाहू लागल्या.*

**३५० रु.**

**पोस्टेज ३० रु.**



# वीणा पाटील

**माझ्याबाबतीत 'वेळेचं व्यवस्थापन' हा त्रिस्तरीय मुद्दा ठरतो. एक म्हणजे सहलींवरचं वेळेचं व्यवस्थापन, दुसरा स्तर ऑफिसमधील कामाबाबतचा आणि तिसरा व सगळ्यात नाजूक भाग म्हणजे घरातलं, कुटुंबासाठी द्यायच्या वेळेचं व्यवस्थापन.**

**१**९८६ सालची गोष्ट आहे, आमच्या काश्मीरच्या सहलीवर मी बाबांची असिस्टंट म्हणून गेले होते. नेहमीप्रमाणे रात्री बाबा दुसऱ्या दिवशीचा कार्यक्रम सांगत होते, ''मंडळी उद्या सकाळी आपण बरोबर ९ वाजता निघणार आहोत.'' एक पर्यटक मध्येच खोचकपणे म्हणाले, ''केसरीभाऊ, ९ म्हणजे इंडियन टाइम का?'' हे ऐकल्यावर बाबांचा संताप अनावर झाला. त्यांनी जरा कडक शब्दांतच सुनावलं, ''मंडळी आय सॉरी, पुन्हा असं म्हणू नका. तुम्ही-आम्ही वेळ पाळू शकत नाही म्हणून संपूर्ण देशाची बदनामी करू नका. आपण चुकीचं वागतो, अयोग्य बोलतो आणि आपणच आपल्या देशाची इमेज खराब करतो.''

बाबांचं हे पोटतिडकीचं बोलणं ऐकून 'इंडियन टाइम' असं खोचकपणे म्हणणारे पर्यटक वरमले. अशा 'काटेकोर' वडिलांच्या तालमीत तयार झाल्यानं, वेळ पाळण्याची सवय मला लहानपणापासूनच लागली. पुढं घरच्या पर्यटन व्यवसायात पूर्णवेळ झोकून दिल्यानंतर, वेळेचं व्यवस्थापन करणं आवश्यक आहे याची जाणीव झाली.

माझ्याबाबतीत 'वेळेचं व्यवस्थापन' हा त्रिस्तरीय मुद्दा ठरतो. एक म्हणजे सहलींवरचं वेळेचं व्यवस्थापन, दुसरा स्तर ऑफिसमधील कामाबाबतचा आणि तिसरा व सगळ्यात नाजूक भाग म्हणजे घरातलं, कुटुंबासाठी द्यायच्या वेळेचं व्यवस्थापन. या तिन्ही गोष्टींची क्रमवारी लावताना, माझ्या लक्षात आलं की, सहलीवरचं वेळेचं व्यवस्थापन, नियोजन अगदी फर्स्ट क्लास जमतंय. व्यवसायाचा भाग असल्यानं या व्यवस्थापनाकडे पूर्ण लक्ष एकवटलेलं असतं. सहलींच्या संदर्भातील टाइम प्लॅनिंग करताना अनेक गोष्टींचं अवधान ठेवावं लागतं. मुख्य म्हणजे रेल्वेगाड्या, विमानसेवा यांच्या वेळा काही आपण नियंत्रित करू शकत नाही. त्यामुळे यातील एखाद्या सेवेनं जरा 'वेळखाऊपणा' केला तरी पुढचा सगळा सहल कार्यक्रम गडगडू शकतो. असं होऊ नये म्हणून सहलीच्या पहिल्या दिवशी आणि शेवटच्या दिवशी हाताशी थोडा वेळ राखून ठेवावा लागतो. शिवाय एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींची घड्याळं अनेकदा जुळत नाहीत. (आपापल्या जोडीदाराला विचारा!) इथं तर अक्षरश: बारा घरचे बावीसजण असतात. या सगळ्यांना घेऊन ठरलेल्या वेळात, ठरलेली ठिकाणं पूर्ण करायची म्हणजे किती घड्याळं जुळवावी लागत असतील? बरं, टुरिझम ही सर्व्हिस इंडस्ट्री आहे. हॉस्पिटॅलिटी हा तर या इंडस्ट्रीचा आत्मा. त्यामुळे वेळ पाळण्याचे 'काटे' तर पर्यटकांना टोचता कामा नयेत, पण वेळ तर सांभाळली गेलीच पाहिजे अशी कसरत आम्हा सहल संयोजकांना 'हरघडी' करावी लागते.

सुदैवानं या व्यवसायात पूर्णपणे मुरलेल्या आमच्या वडिलांमुळे- केसरीभाऊंमुळे- हे बारकावे मला (आणि माझ्या भावंडांनाही) कोणताही ट्रॅव्हल टुरिझमचा कोर्स न करता थेट अनुभवातून शिकायला मिळाले. गेल्या अठरा-वीस वर्षांत मला सहलीवरचं वेळेचं व्यवस्थापन (स्वत:बरोबरच ग्रुपचंही) अगदी 'काटेकोर'पणे जमलंय असं मी खात्रीने सांगू शकते. या वर्षीच्या मे महिन्यामध्ये 'अम्युझमेन्ट पार्कस् स्पेशल' ही स्टुडंट टूर मी नेली होती. दहावी, बारावी व त्याहूनही लहान अशा मुलांना घेऊन मी थायलंड, मलेशिया, हाँगकाँग आणि सिंगापूर या चार देशांमध्ये फिरले. डिस्नेलँड, थीम पार्कस्, सफारी वर्ल्ड, सनवे लगून अशा अम्युझमेन्ट

पार्कस्‌मध्ये मुलांनी फुल टू धमाल केली पण वेळेचं बंधन पाळून. क्वालालंपूर ते हाँगकाँग या प्रवासासाठीचं आमचं विमान होतं पहाटेचं. विमानतळाकडे जाणारी बस पहाटे पाच वाजता निघणार होती, तर ही मुलं पहाटे ४ वाजता उठून तयार झाली. या मुलांची वक्तशीर वागणूक पाहून माझी तर खात्रीच पटली की आता 'इंडियन टाइम' असा खोचक उल्लेख करायची कोणाची हिंमतच होणार नाही.

सहलीतील वेळेचं गणित इतर अनेक घटकांवर अवलंबून असूनही छान जमलंय. पण ऑफिसमध्ये असताना मात्र काही वेळा गडबड उडते. म्हणजे होतं असं की, सकाळपासून आखलेली कामं, ठरलेल्या भेटीगाठी इतक्या वक्तशीरपणे होतात की अचूक वेळ साधल्याबद्दल मी माझीच पाठ थोपटून घेते. पण दुपारनंतर काय होतं तेच कळत नाही. कधी एखादी मीटिंग विनाकारण लांबते, कुठं बाहेर जाताना ट्रॅफिकमध्ये वेळ जातो किंवा मध्येच घुसून एखादा अनाहूत पाहुणा माझ्या वेळापत्रकाचा पार बेंडबाजा वाजवतो. दुपारपर्यंत माझ्या ताब्यात असणारे घड्याळाचे काटे, दुपारनंतर एकदम लगाम सुटलेल्या घोड्यांप्रमाणे चौखूर उधळतात आणि त्यांच्या मागे धावताना माझी मात्र दमछाक होते. कदाचित ऑफिसमध्ये आहोत तर जास्तीत जास्त कामं निपटून टाकूया, या विचारानं दोन दिवसांची कामं एकाच दिवसांत बसवायचा प्रयत्न केल्यानंही असं होत असेल. पण ऑफिसमधील माझं वेळेचं व्यवस्थापन अनेकदा घड्याळाच्या तबकडीत मावत नाही एवढं खरं आणि मग ऑफिसच्या वेळेचं घरावर अतिक्रमण होऊ लागतं.

घर आणि ऑफिस या दोन ध्रुवांमध्ये धावणाऱ्या माझ्यासारख्या अनेक करिअर वुमन आहेत. बाकीच्यांचं काय होतं माहीत नाही पण माझ्याबाबतीत सांगायचं तर घरासाठी वेळ देण्यात मी कमी पडते हे मला अनेकदा जाणवतं. हे म्हणजे एखाद्या क्रिकेटरने देशाबाहेरच्या खेळपट्टीवर मारे द्विशतक ठोकावं आणि घरच्या

**माझ्या भरगच्च वेळापत्रकामुळे मुलांचा (आणि माझाही) जो कोंडमारा होतो त्यावर एक वेगळाच उपाय मला सापडलाय. मुलांना शाळा नसेल, सुट्टी असेल तेव्हा मी त्यांना चक्क माझ्याबरोबर टूरवर नेते. मग ते दहाबारा दिवस आम्हा मायलेकांचे हक्काचे होतात. आता प्रत्येक सुट्टीत मुलांना असं टूरवर नेणं थोडं खर्चिक ठरतं कारण मौके का फायदा घेऊन आईला झक्कासपैकी कापायची संधी ही मुलं अजिबात सोडत नाहीत. त्यामुळे 'टाईम इज मनी' या सुभाषिताचा एक वेगळाच अर्थ मला कळतो.**



पीचवर मात्र त्याचा साफ त्रिफळा उडावा तसंच माझं होतं. एक तर व्यवसायाच्या स्वरूपामुळे अनेकदा दिवसचे दिवस घरापासून दूर राहावं लागतं. टूरवरून परतल्यावर ऑफिसचं काम वाट पहात असतं. मग मुंबईत असूनही घरी वेळेवर जाणं अशक्य होतं. या सगळ्यामुळे मी माझ्या मुलांच्या वाट्याला फारच कमी वेळ देऊ शकते. गेल्या वर्षी माझा मोठा मुलगा 'नील' दहावीत होता. त्यावेळी मी मारे गाजावाजा करून ऑफिसमधून अडीच महिन्यांची सुट्टी घेतली. पण त्यापेक्षा ऑफिसमध्ये एक दिवसाआड गेले असते तर बरं झालं असतं असं म्हणायची वेळ आली. कारण रोज ऑफिसचं काहीतरी छोटंसं, फक्त दहापंधरा मिनिटांचं काम निघायचं आणि तेवढ्यासाठी गेल्यावर मी परत यायची ती थेट चारपाच तासांनीच. मग त्या मानाने धाकटा मात्र सुदैवी ठरलाय. कारण मुंबईत असताना त्याला शाळेत सोडून मगच ऑफिसला जायचं हा नियम अजून तरी पाळला जातोय.

माझ्या भरगच्च वेळापत्रकामुळे मुलांचा (आणि माझाही) जो कोंडमारा होतो त्यावर एक वेगळाच उपाय मला सापडलाय. मुलांना शाळा नसेल, सुट्टी असेल तेव्हा मी त्यांना चक्क माझ्याबरोबर टूरवर नेते. मग ते दहाबारा दिवस आम्हा मायलेकांचे हक्काचे होतात. आता प्रत्येक सुट्टीत मुलांना असं टूरवर नेणं थोडं खर्चिक

ठरतं कारण मौके का फायदा घेऊन आईला झक्कासपैकी कापायची संधी ही मुलं अजिबात सोडत नाहीत. त्यामुळे 'टाईम इज मनी' या सुभाषिताचा एक वेगळाच अर्थ मला कळतो. पण मुलांना वेळ देता येतो हे समाधान या सगळ्यापेक्षा अनमोल असतं. मुलांइतकेच, मुलांचे बाबा मात्र भाग्यवान नाहीत. माझे पती सुधीर पाटीलही याच व्यवसायात असल्याने माझी धावपळ, कुचंबणा ते समजू शकतात. त्यांच्या समजूतदार स्वभावामुळे वादावादीच्या अनेक 'वेळा' चुकवल्या जातात.

पण एकूणच घरच्या आघाडीवर वेळ मारून नेणं फार वेळा होतं. आता अशा परिस्थितीत स्वत:साठी वेळ काढणं तर फारच मुश्किल असतं. जिथे घरच्यांना पुरेसा वेळ देता येत नाही, तिथं मित्र-मंडळींसाठी कुठून वेळ देणार? साहजिकच मैत्रीचं वर्तुळ मर्यादित आणि काहीसं व्यवसायाशी निगडीतच राहिलं आहे. जी गोष्ट मित्रमैत्रिणींची तीच छंदांचीही. स्वत:ला कामात बुडवून घ्यायच्या स्वभावामुळं, एखादा वैयक्तिक छंद जोपासायचं माझं स्वप्न अजूनही वेटिंग लिस्टवरच आहे. या बाबतीत खरं तर एक आदर्श उदाहरण आमच्या घरातच आहे. माझा भाऊ शैलेश माझ्यासारखंच झपाटून काम करतो आणि त्याचबरोबर आपल्या फोटोग्राफीच्या छंदालाही वेळ देतो. त्यामुळे शैलेशकडे बघते तेव्हा माझी छंदासाठी वेळ नाही ही सबब लंगडी असल्याचं जाणवतं. एकूणच 'वेळ नाही' हे कारण तुम्ही धरून ठेवलंत तर कधीच, कशालाच वेळ मिळणार नाही.

दिवसाच्या चोवीस तासांत पंचवीस तासांचं काम करणारे पंडित नेहरू आणि कितीही धावपळ असली तरी ठराविक वेळी ठराविक काम करणारे गांधीजी, अशी थोरामोठ्यांची उदाहरणं तर प्रसिद्धच आहेत. पण मला या उदाहरणांबरोबरच अवतीभवती दिसणारी सर्वसामान्य लोकांची उदाहरणंही महत्त्वाची वाटतात. अगदी लोकलमध्ये प्रवास करताना एकीकडे विणकाम, भरतकाम असा छंद जोपासणाऱ्या महिलांना वेळेचं व्यवस्थापन जमलंय असं मला वाटतं. एकूणच आपली जीवनशैली, घरापासून कामाच्या ठिकाणापर्यंतचं अंतर यामुळे प्रत्येकजणच आपल्या परीने वेळेचं व्यवस्थापन करायचा प्रयत्न करीत असतो. मला असं वाटतं की तुमच्या वेळेच्या व्यवस्थापनात, तुमच्या कार्यालयीन सहकाऱ्यांचाही सहभाग महत्त्वाचा असतो. त्याबाबतीत मी स्वत:ला सुदैवी समजते. शेवटी अनुभवातूनच तर आपण शिकतो. वेळेचं व्यवस्थापन ही प्रत्येकवेळी उपयोगी पडणारी गोष्ट आहे आणि ते वेळीच शिकलो तर, वेळ निघून गेली असं म्हणायची वेळ येणार नाही.

**वीणा पाटील**
संचालिका, केसरी

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **वीणा सुधीर पाटील** |
| **पत्ता** | : | केसरी टूर्स, ३१४, एल. जे. रोड, माहीम पश्चिम, मुंबई- ४०००१६ |
| **दूरध्वनी** | : | २४३३२२२२, २४७१७६७७ |
| **शिक्षण** | : | इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा |
| **व्यवस्थापकीय जबाबदारी** | : | संचालिका, केसरी टूर्स |
| **विशेष कार्य/पुरस्कार** | : | * बावीस वर्षांपासून पर्यटनव्यवसाय.<br>* देशांतर्गत आणि विदेशात उत्कृष्ट प्रेक्षणीय सहलींचे आयोजन केल्यामुळे 'बेस्ट टूर कंडक्टर' ॲवॉर्ड.<br>* इंडिया टूरिझम कौन्सिलतर्फे 'टूरिझम आणि हॉस्पिटॅलिटी ॲवॉर्ड २००२'<br>* आजवर दोन लाख पर्यटकांनी 'केसरी टूर्स' तर्फे सहलींचा आनंद लुटला आहे.<br>* विद्यार्थी स्पेशल, ज्येष्ठ नागरिक स्पेशल, पती-पत्नी स्पेशल, लेडीज स्पेशल अशा अनेक ग्रुपवर आधारित सहलींचे यशस्वी आयोजन, अशी संकल्पना 'केसरी टूर्स' तर्फे भारतात सर्वप्रथम राबण्यात आली. ती सर्वत्र लोकप्रिय होत आहे. |

# अविनाश पंडित



**शेवटच्या क्षणापर्यंत एखादे काम न करणे व कोणतीही गोष्ट करताना नियोजन न करता ती करणे ही वेळ वाया घालवण्याची उत्तम कारणे आहेत.**

''काय करणार? सर्व उत्तरे लिहायला वेळ पुरला नाही.''

''मी काय डोंबलं वाचणार? घरच्या कामात इतर काही करायला वेळ मिळत नाही.''

''जानेवारी संपला तरी पोर्शन बाकी आहे.''

''त्यांच्याकडे नोकरचाकर आहेत म्हणून त्यांना नाटक-सिनेमा जमतात. मला गरीबाला कोणता वेळ?''

वेळ नसणे, वेळ न मिळणे, वेळ काढता न येणे या सर्व, एखादी गोष्ट न करण्याकरता, काढायच्या सबबी असतात. निदान बऱ्याच प्रसंगी.

खरे म्हणजे आपण सर्वच जण वेळेच्या बाबतीत समान पातळीवर आहोत. प्रत्येकालाच रोज २४ तास अथवा १४४० मिनिटे वाट्याला येतात. प्रत्येक जण सारख्याच वेळेत – एका वर्षात – सूर्याभोवती प्रदक्षिणा घालतो. मग गांधीजी त्यांच्या जीवनात सुमारे ६४,००० पानांचा मजकूर, इतर राजकीय-सामाजिक चळवळींचे व्याप सांभाळून लिहू शकतात आणि आपल्याकडे साधे वाण्याकडून जाऊन 'हिंग आणायचा राहिला' किंवा 'जिरे विसरलो' असे म्हणून दोन फेऱ्या का माराव्या लागतात व त्यात आपण वेळ वाया का घालवतो?

कोणतीही गोष्ट करताना नियोजन न करता ती करणे हे वेळ वाया जाण्याच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण आहे. कुणाला तरी डेक्कनच्या स्टॉपवर भेटू असे मोघम सांगितल्यावर तो डेक्कन कॉर्नरच्या स्टॉपवर व आपण मुख्य स्थानकावर वाट पाहत वेळ वाया घालवतो. 'बघू, तिकिटे मिळाली तर, नाहीतर आलो घरी परत' असल्या दृष्टिकोनात वेळेबाबतची बेफिकिरी डोकावते.

वेळेचे व्यवस्थापन न होण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे कोणत्याही प्रकारचे व्यत्यय होय. खणखणणारे फोन्स अथवा मोबाइल्स, ''काही नाही, इथून जात होतो. महाराज काय करताहेत बघायला डोकावलो,'' म्हणणारे पाहुणे, ''नाशिकला जाणारी शेवटी बस किती वाजता आहे?'' असे एसटीच्या चौकशीत विचारल्यासारखे प्रश्न करणारे शेजारी... यादी मारुतीच्या शेपटीसारखी वाढवता येईल.

शेवटच्या क्षणापर्यंत एखादे काम न करणे हे वेळ वाया घालवण्याचे उत्तम कारण आहे. घिसाडघाईने काम झाले तर त्याची गुणवत्ता तर कमी होतेच पण ते बिघडले तर परत काम करण्यात वेळ जातो त्याचे काय?

स्वयंशिस्त व स्वत: नीट organised राहणे हे वेळेच्या व्यवस्थापनाचे प्रमुख सूत्र आहे. घेतलेली वस्तू जर पुन्हा त्याच जागी ठेवली, नंतर भरायची बिले (सुदैवी लोकांच्या बाबत धनादेश) योग्य ठिकाणी ठेवल्यास पुढे या गोष्टी शोधण्यात वेळ जात नाही. फोनजवळ सहज मिळेल अशा ठिकाणी काही टिपून घेण्यासाठी कागद व पेन न ठेवणे आणि मग हे साहित्य शोधत फिरणे वेळेचे गैरव्यवस्थापन नाही तर काय आहे?

शारीरिक थकवा किंवा ताण यांच्या वेळेच्या व्यवस्थापनावर प्रतिकूल परिणाम होतो. याबरोबर उत्साह नसणे, काम पूर्ण होण्यास वेळ लागणे याबरोबर कामाची गुणवत्ता यामुळे कमी होते. नक्की काय करायचे हे माहीत नसणे यामुळे देखील वेळेचे व्यवस्थापन नीट करता येत नाही.

वेळेच्या व्यवस्थापन करण्यात कोणता घटक अडसर घालत

आहे हे कळल्यावर तो दूर करणे सोपे जाते. आगंतुक पाहुण्याला जास्त वेळ न देणे, शारीरिक थकवा दूर करण्यासाठी विश्रांती घेणे अशा उपाययोजना परिणामकारक होतील.

त्याचबरोबर वेळेच्या व्यवस्थापनासाठी स्वत:च्या कामाचे नियोजन करणे, वेळ व कामाचे महत्त्व यांची सांगड घालणे या दोहोंचा पाठपुरावा करायला हवा. हे नियोजन दैनिक, साप्ताहिक आणि मासिक या स्तरावर हवे. क्वचित प्रसंगी ते वार्षिक स्तरावर देखील असेल.

मी कार्यालयातून परतल्यावर आजच उद्या घेऊन जायचे कागदपत्र बॅगेत भरतो. एखादी त्रुटी माझ्या त्याचवेळी लक्षात येते. माझ्या साप्ताहिक नियोजनाचा एक भाग गुरुवारी-शुक्रवारी कपडे घरी धुवून ते रविवार संध्याकाळपर्यंत पुढच्या आठवड्याच्या उपयोगासाठी लाँड्रीतून इस्त्री करून आणणे हा आहे. बँकेत जाणे, टेलिफोन-वीज यांची बिले भरणे, रद्दी विकणे हे महिन्यातून एकदा करायचे कार्यक्रम आहेत.

हे करत असताना एकाच वेळी एकापेक्षा अधिक कामे करता येत असल्यास ती कामे मी अवश्य करतो. लायब्ररीतून मासिके आणत असतानाच फुटकळ सामान आणता येते. मी घरी नसता आलेल्या फोन कॉल्सना एका विशिष्ट वेळी उत्तर देतो.

वेळ वाचवण्याचे उत्तम साधन म्हणजे वृत्तपत्र होय. ज्यांचा ज्याच्याशी संबंध आहे त्यांनी त्या बातम्या जरूर वाचाव्यात. पण उगीच 'डोक्यात दगड घालून खून', 'स... खेळायला फिट आहे का?', 'अमक्या निवडणुकीत सूर्य पॅनेलचा दणदणीत विजय', 'रविवारचा मेनू-सीताफळ रबडी' असल्या बातम्या वाचू नयेत.

वेळेचे व्यवस्थापन करावे असं सांगणारे तज्ज्ञ ज्या सूचना करतात ते खरे तर आपल्यालाच सुचायला हवे. घरातली एखादी वस्तू संपली तर दिसेल अशा ठिकाणी एखाद्या कागदावर तिचे नाव लिहून ठेवावे म्हणजे बाजारात जाताना सुलभ होईल; घरात येणाऱ्या प्रत्येक कागदावर लगेच निर्णय घ्यावा, निरुपयोगी कागद फेकून द्यावा व उपयोगी कागदपत्र योग्य त्या जागी ठेवावेत हे सांगायला इतर लोक कशासाठी? आपणच वेळेचे आयोजन स्वत:च्या गरजेनुसार, व्यवसायानुसार, प्राधान्यानुसार करायचे आहे.

वेळेचे व्यवस्थापन करणे म्हणजे घड्याळाच्या काट्याला जुंपून घेणे नाही. या व्यवस्थापनात वेळेचे वाटप करताना अचानक उद्भवणाऱ्या तातडीच्या प्रसंगांना वेळ द्यायलाच हवा. पण म्हणून रात्र थोडी आणि सोंगं फार अशा आजच्या धकाधकीच्या जीवनात काम, अभ्यास, काव्य-शास्त्र-विनोद, यासाठी योग्य वेळ वाटून न देणे असेही होता कामा नये.

कोणतेही पूर्वनियोजन न करता एकच गोष्ट शंभर टक्के यशस्वी होऊ शकते आणि ती म्हणजे फजिती असे पु. ल. देशपांडे म्हणाले होते. आपले सर्व प्रयोग वेळेवर सुरू करण्याचा आग्रह धरणाऱ्या पुलंना या पूर्वनियोजनात वेळेचे व्यवस्थापन अभिप्रेत असणार.

**वयाची साठी व लेखन-प्रकाशनाची तिशी ओलांडल्यानंतरचा नवा संकल्प**

**रवींद्र गुर्जर वाचक परिवार**

**विनामूल्य सभासदत्व**

आपले नाव, पत्ता, दूरध्वनी इ. तपशीलवार कळवा

**विविध योजना :**
व्यक्तिगत ग्रंथसंग्रह, छोटी वाचनालये, सांस्कृतिक कार्यक्रम, गाठीभेटी, प्रवास इ.

**संपर्क :** २६/१२ प्रतिक नगर, येरवडा, पुणे ४११ ००६.

**दुसऱ्या महायुद्धातील महिला गुप्तहेरांची शौर्यगाथा**

केन फॉलेट लिखित

**जॅकडॉज**

**अनु. रवींद्र गुर्जर** | **किंमत ३२०रु.**

३१ ऑक्टोबर पर्यंत **सवलतीत २५०रु.**

**गायत्री साहित्य** २६/१२, प्रतिकनगर, येरवडा, पुणे ४११ ००६.
फोन नं. (०२०)२६६९५१६८
**सर्वत्र उपलब्ध**



# संजय आवटे

**लेखकाला असे धोधो धबडग्यात, किंवा चालत्या ट्रेनमध्ये नि गर्दी-गोंगाटामध्ये लिहायला सांगितलेले नसते. हे करू शकतो फक्त पत्रकार.**

पत्रकारितेत असूनही मी वर्तमानपत्र सीरियसली वाचतो! त्यात जे काही चांगलं असेल, त्यासाठी त्याच्या जन्मदात्याला नॉर्मली फोनही करतो... निदान एसएमएस किंवा मेल तरी. अर्थात, अशा स्वरूपाच्या एसएमएसचं त्या सिंहाच्या गुहेत जाणाऱ्या माणसांच्या पावलांसारखं असतं. म्हणजे जाणारी पावलं दिसतात, पण येणारी अभावानंच. आणखी गंमत म्हणजे, ज्यांना एसएमएस जातात, त्यांच्यापैकीच काहींचे नॉर्मली येतात. Mutual admiration society म्हणतात ते याला.

पण ते जाऊ द्या. परवा मी असाच एसएमएस केला तो प्रवीण टोकेकरला. 'लोकप्रभा'तील त्याच्या संपादकीयासाठी बहुधा. माझा मेसेज होता तो असा... I have ranked you at 12th position amongst Marathi writer journalist community. आणि पुढं म्हटलं होतं... It's really nice to read you. शेवटच्या वाक्यानं सुखावलेला प्रवीण आपल्या अगोदर अकराजण कोण आहेत, या शंकाकुल कोलाहलात बुडाला असावा. माझ्या अपेक्षेप्रमाणं त्यानं तसं विचारलंही. त्यावर माझं उत्तर होतं... At one to ten, Mr. Kumar Ketkar. पुढं माझ्या हमखास शैलीत मी लिहिलं होतं... at eleven naturally Sunjay awate!... आपल्या मनमोकळ्या स्वभावानुसार प्रवीणनं या एसएमएसला अर्थातच दाद दिली...

प्रसंग तसा एवढाच.

नंतर मात्र मी विचारात पडलो.

रायटर जर्नालिस्टचा असा सर्व्हे झाला तर खरोखरच काय होईल? मुळात या सर्वेक्षणांवर माझा विश्वास नाही; पण ते सोडून द्या. डेव्हिड लेटरमननं या सर्वेक्षणांची भल्ली थट्टा उडवली होती. "USA Today has come out with a new survey. Apparently, three out of every four people make up 75% population" ...

तर मुद्दा असा की पहिली बारा सोडा; मला धड बारा नावं आठवेनात. माझ्या लक्षात आलं, वृत्तपत्रलेखन हे वाटतं तसं सोपं नाही. आपण जे काही करीत असतो, त्याच्या स्वरूपाची अवज्ञा अनेकदा अतिपरिचयामुळे होते. शिवाय वृत्तपत्रलेखनाला तसं सीरियसली घेण्याची सवय आपल्या वाचकांना अद्याप लागलेली नाही. जे घेतात, ते बहुधा स्वतःच विचारवंत- पत्रकार असल्यानं एवढे सीरियसली घेतात की रिॲक्टच होत नाहीत. त्यामुळं आपल्या लेखनाचा आवाका, व्याप्ती, प्रभाव याविषयी लेखकालाच खरं म्हणजे पत्ता नसतो. मात्र, स्वतःवर खूश असणे ही बहुधा पत्रकारितेत येण्याची पूर्वअट असल्याने वृत्तपत्रलेखकांना त्याचे काही देणेघेणे नसते. एकीकडे स्वतःवर खूश असणारे पत्रकार आणि दुसरीकडे या लेखनाची फारशी दखलही न घेणारे वाचक या डायलेमात जर्नालिझमची पार गोची झालीय.

If a person is not talented enough to be a novelist, not smart enough to be a lawyer and his hands are too shaky to perform operations, he becomes a journalist अशी थट्टा पत्रकारांची होत असल्यानं या धावपळीतील साहित्याचं महत्त्व आपल्याला कधी समजलं नाही.

चांगलं लिहिणारे वृत्तपत्रलेखक- पत्रकार आपल्याकडे अपवादानेच आहेत, त्याचे कारण हे.

पण खरं सांगू का, पत्रकारांसारखे लढवय्ये जगात फार कमी. शिवाय त्यांचे रणांगण रोजचेच. एवढा अविरत, अविश्रांत, अव्याहत लढणारा 'रिझल्ट ओरिएंटेड' सैनिक तुम्हाला शोधूनही सापडणार नाही. डॉक्टरची चूक स्मशानात जळेल, वकिलाची चूक फासावर लटकेल; पण पत्रकाराची चूक अगदी दिमाखात झळकेल... असा प्रचंड ताण डोक्यावर घेऊन लढणारा दुसरा बुद्धिजीवी प्राणी मला दाखवा.

खरं म्हणजे, पत्रकाराकडून तीच अपेक्षा असते, जी कोणत्याही कलावंताकडून असते. लेखकाकडून वा संशोधकाकडून किंवा इतिहासकाराकडूनही असते. मात्र, बाकी कोणत्याही परफॉर्मरवर अशी रोज परफॉर्म करण्याची सक्ती नसते. कोणत्याही कलावंताच्या मनगटावर असे घड्याळ बांधलेले नसते. कोणत्याही इतिहासकाराला अशा जागेच्या बांधाने अडविलेले नसते. कोणत्याही ललित लेखकाला असे धोधो धबडग्यात, रोजच्या रामरगाड्यात किंवा चालत्या ट्रेनमध्ये नि गर्दी-गोंगाटामध्ये लिहायला सांगितलेले नसते. हे करू शकतो फक्त पत्रकार.

**पण, कोणी काही म्हणो... एक बाकी खरे. रात्र चढू लागली आहे, डेडलाईन अगदी अंगाशी खेटू लागली आहे, हाताशी बातम्यांचा ढीग आहे आणि पान लावायचे आहे... विशेषतः पहिले पान... ही प्रक्रिया अशी काही रोमांचकारी असते की बस्स! पहिल्या पानासमोर बसणारा उपसंपादक हाच दैनिकाचा खरा संपादक.**

म्हणजे हे केवळ लेखनाचे नाही. बातमीदारी असो वा बातम्यांचे संपादन, बातम्यांची निवड असो वा पानांची मांडणी, पीटीआयचा अनुवाद असो वा मुलाखत- चित्रपट समीक्षण... सगळीकडे तो अक्षरशः लढत असतो. आणि तरीही त्याने विश्वासार्ह, वाचनीय वस्तुनिष्ठ, विश्लेषक, विचारप्रवर्तक, विविधांगी वगैरे मजकूर दररोज द्यावा, अशी अपेक्षा असते. आता पुस्तकं कोणी वाचत नाहीत, जे काही वाचतात ते वर्तमानपत्र. त्यामुळं मराठी भाषेचं भवितव्य आता फक्त पत्रकारितेवर अवलंबून आहे, असं लॉजिक मांडत त्या बापड्या पत्रकारांच्या खांद्यावर असं सगळं ओझं लादलं जातं... कधी भाषेचं भविष्य म्हणून, कधी लोकशाहीचा चौथा खांब म्हणून... पत्रकार अक्षरशः अहोरात्र लढत असतो. पहाटे पहाटे मला जाग आली, तुझी रेशमाची मिठी सैल झाली, अशी गाणीही त्याच्या संदर्भात गैरलागू; कारण अपरात्री तो घरी पोहोचतो तेव्हा त्याच्या डोक्यात रेशमाची नव्हे; तर नुसतीच 'मिठी' आणि महापुराने असे थैमान घातलेले असते की रोमँटिक कल्पना अपघातानेच करता याव्यात...

अर्थात, इथे आपण प्रामुख्याने बोलूया लेखनाविषयी. खरे म्हणजे बातमीदारी, संपादन, पानाची मांडणी हे सारे माझ्या आवडीचे विषय असूनदेखील. शिवाय ते परस्परांपासून सुटे करणे अशक्य आहे, हे ठाऊक असूनदेखील.

विषयच आत्मनिवेदनात्मक असल्याने काही व्यक्तिगत तपशील अपरिहार्यपणे येणार. (म्हणजे, मी युरोपात होतो तेव्हाची गोष्ट, अशा थाटाचे मात्र नव्हेत!) शिवाय तुम्ही जेवढे व्यक्तिगत सांगाल, तेवढे ते वैश्विक होत जाते, या वाक्यानं मला भलतं कम्फर्टेबल केलंय!

...आज कोणत्याही क्षणी कोणत्याही विषयावर, हव्या त्या वेळेत आणि हव्या त्या शब्दमर्यादेत लिहिण्यासाठी मी सज्ज असतो खरा; पण मलाच अनेकदा प्रश्न पडतो हे आपण कसं करू शकतो? माझ्याप्रमाणे अनेकजण हे करीत असतात. किंबहुना सारेच पत्रकार ते करीत असतात...

निव्वळ सवयीने हे शक्य आहे, असे मला वाटत नाही. त्यामध्ये प्रतिभेचा, प्रयत्नांचा आणि प्रकृतीचा काही अंश नक्कीच असतो. कवींचे माहीत नाही; पण जन्मदत्त कोणी वृत्तपत्रलेखक असतो यावर माझा विश्वास नाही. तो घडविता येतो. म्हणजे यायला हवा. मात्र दुर्दैवाने अशी कोणतीही यंत्रणा आपल्याकडे नीटशी अस्तित्वात नाही. त्यामुळं ही लढाई लढणारा पत्रकार नावाचा सैनिक आणखी दुर्दैवी ठरतो. म्हणजे त्याला युद्धात अक्षरशः ढकललं जातं आणि रोज जिंकलं पाहिजे असंही बजावलं जातं... मात्र त्याला लढणं शिकवलं जातंच असं नाही. अर्थात, हा लढवय्या कितीही घायाळ झाला तरी 'बचेंगे तो और भी लडेंगे' असंच म्हणणार. जर्नालिझम ही नशा साधी का आहे?

मी सुदैवी कदाचित... कारण कळत-नकळत या लढाईसाठी मी शस्त्रसज्ज होत गेलो होतो.

एखादी घटना घडत जाते नि त्यावर तातडीने लिहायचे असते, असे प्रसंग तर आता नेहमी येतात. हाताशी वेळ असतो चार-पाच तासांचा. संबंधित साऱ्या बातम्या फार मुळातून वाचणं शक्यही नसतं. तरी तासाभरात त्या वाचाव्या लागतात. 'रॅपिड रीडिंग' नावाचा प्रकार वृत्तपत्रलेखनासाठी म्हणून महत्त्वाचा. 'नजर टाकणे' या वाक्प्रचाराचा अर्थ अशावेळी समजतो. 'धावपळीतील साहित्य' लिहिणाऱ्याला 'धावपळीतील वाचन'ही जमवावे लागते. त्यासाठी तातडीने संदर्भ मिळवावे लागतात, पण महत्त्वाचे म्हणजे ते संदर्भ तुमच्या डोक्यातही असावे लागतात! डाटा फार तर

तुम्हाला वृत्तपत्रांतून- पुस्तकांतून वा नेटवरूनही मिळेल. मात्र, मूलभूत संदर्भ ठाऊक असावे लागतात. शिवाय डोक्यात काही एक आराखडा असावा लागतो. खरे म्हणजे प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात होते आणि तो आराखडाही कोलमडून जातो. लेखन म्हणजे जणू 'इव्हेंट' होऊन जातो तो त्यामुळेच तर. वृत्तपत्रलेखनात अशी उत्कटता असू शकते, हेच अनेकांना पटत नाही. मात्र ती असते. त्याशिवाय एकटाकी लिहिणे शक्य नाही. उत्कटतेचा अर्थ भावरम्यता वा लालित्य नाही. मला विचाराल तर सध्या ज्याला लौकिकार्थाने ललित लेखन मानले जाते, त्या स्वरूपाच्या लेखनासाठी वृत्तपत्र हे माध्यम नाही. वृत्तपत्रीय लेखनाने वाचकांना विचारांच्या नव्या कक्षा दिल्या पाहिजेत. चांगला लेखक ते करीत असतोच. अमेरिकेतील एका दैनिकाच्या संपादकांनी आपल्या मुलाखतीत फार छान सांगितलं होतं... इतर दैनिकांनी 'सेक्स क्राईम'विषयी काही मजकूर छापला, तर तो सवंगपणा असतो. आम्ही छापला यांच्या, प्रभावातून माझी मांडणी अधिक नितळ -निखळ- स्वच्छ होत गेली. नितळतेला सौंदर्य असतेच; पण तेजही सामान्य नसते! अर्थात, हे सारे झाले तरी... बोलणे सहजसुलभ आणि लिहिणे मात्र 'लेखी' असा काहीतरी समज माझा होता तो कॉलेजात असताना. त्यामुळे कॉलेजातील मासिकांत वगैरे लिहिताना मी तसे काहीसे लिहीत असे. तू काय लिहिलंस ते मला समजलंच नाही, असं कोणी म्हणालं तर त्याला मी चक्क कॉम्प्लिमेन्ट वगैरे मानत असे! तो अॅप्रोच बदलला, त्याचे कारण कुमार केतकर. केतकरांचे अग्रलेख-लेख मी वाचू लागलो आणि या कोंडीमधून माझी सुटका झाली! त्यामुळे लिहिणं ही माझ्यासाठी आनंदाची आणि नैसर्गिक गोष्ट होऊन गेली....

मी 'संचार'ला संपादक असताना अगदी प्रवासात वगैरे अग्रलेख लिहून फॅक्स करीत असे. मला आठवतं, विधानसभा निवडणुकांची मतमोजणी सुरू होती. या निवडणुकांचं लाईव्ह विशेषण सोलापूर

**रात्री जी हाणामारी होते आणि अगदी हातघाईची वेळ येऊन ठेपते, ती अनेकवेळा या नियोजनाच्या अभावामुळे. खऱ्या टीमवर्कचा प्रत्यय घ्यायचा असेल तर वर्तमानपत्राच्या निर्मितीची प्रक्रिया पाहावी. लीडर जेवढा द्रष्टा, सर्वसमावेशक, उत्साही आणि समंजस तेवढी ही टीम अधिक एनर्जेटिक. मग तर ही लढाई आणखी सोपी होऊन जाते... रोजच्या 'शॉर्टटर्म' लढाईसाठी 'लाँगटर्म' नियोजन संपादकांना करावे लागते.**

तर मात्र तो सोशिऑलॉजिकल स्टडी असतो... अॅप्रोच महत्त्वाचा असतो, तो असा.

माझ्यापुरते विचाराल तर, विषय कितीही मोठा असला, तरी तो नेमक्या शब्दात, नेमक्या वेळेत आणि श्रोत्यांना अपील होईल अशा पद्धतीनं मांडण्याची सवय मला शाळा- कॉलेजातील वक्तृत्व स्पर्धांनी लावली. शिवाय स्पर्धेसाठी भाषण करीत असल्याने स्वाभाविक स्पर्धात्मकता ( जी नॅचरली जर्नालिझममध्ये असते) त्यामध्ये होती. '' प्लेईंग टू गॅलरी '' हे वादस्पर्धांचे स्वरूप ; मतभेद स्वीकारण्यासाठीची सहिष्णूता आणि मांडतानाची आक्रमकता ही वादस्पर्धांची शिकवण आणि चळवळी-वाचनातून मिळालेले अधिष्ठान यांच्या मिश्रणातून कदाचित विचार- विश्लेषण आणि मांडणीची माझी अशी एक खास स्टाईल तयार होत गेली असावी. रानडे वा वाग्भट वादविवाद स्पर्धांसह अनेक वादसभा जिंकताना ही स्टाईल सशक्त होत गेली असावी. शिवाय अॅग्रिकल्चर कॉलेजचे वातावरण तसे एकदम सी थ्रू आणि उनाड. तिथं शालीतून जोडे वगैरे नव्हते. एकतर शाल किंवा डायरेक्ट जोडे. या वातावरणातून आणि कोल्हापुरी बाजातून मांडणीतले लटके लालित्य कमी झाले नि ती डायरेक्ट झाली. शाळेत असताना सायंटिफिक डायग्नोसिससह पोएटिक आणि अॅनालिटिकल मांडणी हे माझ्या भाषणांचे वैशिष्ट्य असे. ती भाषणे लिहून देणाऱ्या दादाच्या म्हणजे डॉ. प्रदीप आवटे आकाशवाणीवर विवेक घळसासी आणि मी करीत होतो. त्याचवेळी मला अग्रलेखही लिहून द्यायचा होता. अखंड चर्चा सुरू असताना, म्हणजे घळसासी किंवा गोरख शिवशरण बोलत असताना एक परिच्छेद, मग पुन्हा एक परिच्छेद असे करीत मी तो अख्खा अग्रलेख लिहून टाकला आणि ऑफिसला पाठवून दिला.

अकरा सप्टेंबरचा हल्ला झाल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी अग्रलेख होता तो केवळ 'संचार'मध्ये. अगदी ऑपरेटरमागे उभा राहून तो मला डिक्टेट करावा लागला! 'पर्ल हर्बर' ते 'वर्ल्ड ट्रेड सेंटर' या नावाचा हा अग्रलेख तर सोलापुरात गाजलाच; पण त्या विषयावरील माझ्या व्याख्यानांचीही चांगली दखल घेतली गेली... विदर्भात मी 'लोकमत'चा संपादक असताना, एका राजकीय नेत्याने आपल्या भाषणात 'लोकमत'वर राळ उठविली. म्हणजे एकूण प्रेसविषयी तो अनुदार बोलला होता. त्याची जाहीर सभा झाली रात्री आणि दुसऱ्या दिवशी 'लोकमत'मध्ये त्याविषयी अग्रलेख होता. अवघ्या तासाभरात तो लिहून झाला होता. पुण्यात 'लोकमत'मध्ये मी असताना आमच्या कार्यालयावर हल्ला झाला. कार्यकारी संचालक देवेंद्र दर्डा यांनी तो अग्रलेखाचा विषय असल्याचे सुचविले नि त्यानंतर तासाभरात तो अग्रलेख सर्व आवृत्त्यांना क्यू झाला होता.

अर्थात, उत्कटपणे एकटाकी लिहिणे ठीक आहे; पण 'लोकसंख्येचे' काय?... शब्दांच्या! कारण प्रत्येक दैनिकात शब्दमर्यादा

ठरलेली असते. म्हणजे उदाहरणार्थ अग्रलेख सातशे शब्दांचा, एडिटोरियल नोट तीन-चारशे शब्दांची, मिडल हजार शब्दांचा, ओपेडवरील लेख सहाशे शब्दांचा वगैरे. बातमी असो की लेख, तुम्हाला ही मर्यादा उल्लंघता येत नाही. अशा वेळी तुमच्या मूळ लेखाला कात्री लावावी लागते किंवा पाणीही घालावे लागते. माझ्यासारख्या सुसाट लिहिणाऱ्या माणसापुढे एकच पर्याय असतो... स्वत:चा मजकूर कापावा लागणं यासारखं दुर्दैव नाही. पण ज्याला 'डीलीट'ची 'की' नि:संकोचपणे वापरता येते, तोच तर उत्तम लिहू शकतो! शिवाय 'फेरलेखन' किंवा 'रिरायटिंग' म्हणजे काय, असा प्रश्न आम्ही पत्रकार विचारू, एवढी ती संधी धूसर.

अर्थात, अशी कसोटी केवळ लेख लिहिताना नाही तर सर्व कामे करताना सुरू असते. म्हणजे रात्री अचानक काही तरी मोठी बातमी येऊन आदळते. ती फोनवर घेऊन कंपोज करून पानात घालविणे आणि पानही वेळेत सोडणे अशी कसरत करावी लागते. अशा वेळी मूळ पानाचे सौंदर्य कमी होणार नाही व या महत्त्वाच्या बातमीचे स्थान दुय्यम होणार नाही अशी दक्षता घेत, 'प्रॉडक्शन'मधील कर्मचाऱ्यांच्या कपाळावरील आठ्या पाहात काम पूर्ण करावे लागते. कारण 'डेडलाईन'पेक्षा 'हेडलाईन'सुद्धा महत्त्वाची नाही, हे 'प्रॉडक्शन'चे मत असते आणि ते खरेही असते. काही वेळा तर महत्त्वाच्या बातम्या खूप व जाहिरातीही मजबूत अशी लढाई. अशा वेळी या साऱ्या बातम्या पानात घालवायच्या कशा, हा सवाल उपसंपादकापासून वृत्तसंपादकापर्यंत सर्वांसमोर असतो. त्यात पुन्हा ऐनवेळी एखादा दिग्गज काळाच्या पडद्याआड गेला, तर उपसंपादकाला कॉम्प्युटरच्या पडद्यावर अंधार दिसू लागतो. आता तर अनेक आवृत्त्या, वेगवेगळ्या पुरवण्या यामुळे प्रिंटिंग शेड्यूल्स एवढी 'टाईट' झाली आहेत की डेडलाईनचे प्रेशर कमालीचे वाढले आहे. शिवाय मजकूर कंपोज करण्यापासून पानांच्या मांडणीपर्यंत साऱ्या संगणकीय कसरती संपादकीय सहकारी करीत असल्याने, संस्थेचा एकूण वेळ वाचत असेलही कदाचित; पण त्यामुळे 'डेडलाईन' हीच 'लाईफलाईन' होण्याची वेळ पत्रकारांवर आली आहे! मोठ्या दैनिकांमध्ये मनुष्यबळ पुरेसे असल्याने ते जाणवत तरी नाही. अनेक जिल्हा दैनिकातील स्थिती मात्र बिकट.

पण, कोणी काही म्हणो... एक बाकी खरे. रात्र चढू लागली आहे, डेडलाईन अगदी अंगाशी खेटू लागली आहे, हाताशी बातम्यांचा ढीग आहे आणि पान लावायचे आहे... विशेषत: पहिले पान... ही प्रक्रिया अशी काही रोमांचकारी असते की बस्स! पहिल्या पानासमोर बसणारा उपसंपादक हाच दैनिकाचा खरा संपादक. पानांची मांडणी हा माझ्या आत्यंतिक आवडीचा प्रांत. 'संचार'ला मी असताना पानाच्या मांडणीसाठीची राज्यस्तरीय पारितोषिके 'संचार'ने दोन वेळा पटकावली.वाचकसंख्या वाढीच्या दरातही 'संचार राज्यात दुसऱ्या क्रमांकावर होता. संपादकीय कौशल्याचा आणि सौंदर्यदृष्टीचा कस लागतो तो पानासमोर. अर्थात् मजकुराच्या संपादनातली आणि अनुवादातली गंमतही काही कमी नाही. बातमीदारीएवढं 'हॅपनिंग' जगात आणखी कुठं असेल? पुरवण्यांचं संपादन ही तर आनंदाची पर्वणी. मी 'लोकमत'ला असताना 'सिंहावलोकन' नावाच्या पुरवण्यांची मालिका सलग सात दिवस वाचकांना दिली होती. वैदर्भीय वाचक आजही त्या संग्राह्य पुरवण्यांची आठवण करून देतात. तीच गोष्ट 'संचार'मधील 'तरुणाई', 'इंद्रधनु', 'अष्टपैलू' या साप्ताहिक पुरवण्यांची.

बेसिकली 'पॅकेज' हा माझ्या आनंदाचा विषय असल्याने, मूळ दैनिक असो वा पुरवणी किंवा दिवाळी अंक... त्याचे असे छान सर्वांगीण नियोजन करून, पेपरवर्क करून, स्वरूप ठरवून मग ते दिमाखात वाचकांपुढं मांडणं मला नेहमी आवडत आलंय. दैनिकाचं सुटंसुटं काम करीत बसण्यापेक्षा एकूण पॅकेजवर काम करणं हे मला कमालीचं आव्हानात्मक नि आवाहक वाटत आलं आहे. दररोजची भाषणे, व्याख्याने, मॅनेजमेंटच्या मिटिंग्ज, पीआर, अशा धामधुमीतही दैनिकाचा दर्जा उंच ठेवायचा, तर संपादकाला पॅकेजवर काम करावे लागते. पत्रकारितेच्या धबडग्यात सारंच अनिश्चित असलं तरी प्लॅनिंग व पेपरवर्कवर माझा नेहमी भरवसा असतो. आयुष्यासारखं आहे ते. आयुष्य कितीही अनिश्चित व बेभरवशाचे असले, तरी आपण प्लॅनिंग करीत नाही, असं होतं का? अगदी तसा अंक प्लान करावा लागतो. महत्त्वाचं म्हणजे, तो बाहेर पडण्यापूर्वी 'व्हिज्युअलाइज' करता यावा लागतो. जागेची आणि वेळेची लढाई संपादकाला लढायची असेल, तर ती दृष्टी असावी लागते. त्यासाठी संपादकाने तसे पॅकेज 'व्हिज्युअलाइज' करणे, रोजच्या रोज पेपरवर्क करणे आणि सहकाऱ्यांना ऑन पेपर 'रोडमॅप' देणे महत्त्वाचे ठरते. अशी शिस्तबद्ध फौज मग लढाई जिंकतेच. रात्री जी हाणामारी होते आणि अगदी हातघाईची वेळ येऊन ठेपते, ती अनेकवेळा या नियोजनाच्या अभावामुळे. खऱ्या टीमवर्कचा प्रत्यय घ्यायचा असेल तर वर्तमानपत्राच्या निर्मितीची प्रक्रिया पाहावी. लीडर जेवढा द्रष्टा, सर्वसमावेशक, उत्साही आणि समंजस तेवढी ही टीम अधिक एनर्जेटिक. मग तर ही लढाई आणखी सोपी होऊन

**आता तर अनेक आवृत्त्या, वेगवेगळ्या पुरवण्या यामुळे प्रिंटिंग शेड्यूल्स एवढी 'टाईट' झाली आहेत की डेडलाईनचे प्रेशर कमालीचे वाढले आहे. शिवाय मजकूर कंपोज करण्यापासून पानांच्या मांडणीपर्यंत साऱ्या संगणकीय कसरतीही संपादकीय सहकारीच करीत असल्याने, संस्थेचा एकूण वेळ वाचत असेलही कदाचित; पण त्यामुळे 'डेडलाईन' हीच 'लाईफलाईन' होण्याची वेळ पत्रकारांवर आली आहे!**

जाते... रोजच्या 'शॉर्टटर्म' लढाईसाठी 'लाँगटर्म' नियोजन संपादकांना करावे लागते. सर्व संपादक ते अर्थातच करीत असतात. आम्हाला लढाई नाही, युद्ध जिंकायचे आहे, असे इथे म्हणून चालत नाही. कारण या रोजच्या लढायांवर वर्तमानपत्रांची युद्धे अवलंबून असतात...

तर अशी ही लढाई... निखळ आनंदाचं राज्य दररोज हवाली करणारी, तर कधी मन:शांतीचा प्रांत तोडून घेणारी, पण खरं सांगायचं तर 'श्रीमंत' करणारी... फक्त ती श्रीमंती मिळविण्यासाठी तसं टेम्परामेंट हवं... तशी नशा हवी आणि पत्रकारांच्या शब्दात सांगायचं तर तेवढी 'खाज' हवी...

मात्र, या धामधुमीत गोची होते ती एकच. 'शॉर्टटर्म' लढाईची एवढी सवय पत्रकारांना लागून जाते की शांतपणे विचारपूर्वक प्रकल्प स्वरूपाचे लाँगटर्म काम करणं अवघड होऊन जातं. रॅपिड रीडिंगच्या भानगडीत मुळातून वाचण्याची सवय कमी होते आणि मन:पूर्वक आस्वाद घेण्याची क्षमता संपून जाऊ लागते. आता हेच पाहा ना, तुमचा लेख बारा ऑगस्टपर्यंत हवा आहे, असे पत्र मेहतांनी जूनमध्ये पाठविले असले, तरी संजय आवटे मात्र तो लेख लिहायला बसणार अकरा ऑगस्टलाच. (चला, मेहतांना परस्पर स्पष्टीकरणही दिलं गेलं) दीर्घकालीन मोल असलेलं लेखन पत्रकारांकडून अभावाने होते ते बहुधा अशा सवयींमुळे. अरुण साधू, डॉ. अरुण टिकेकर वा अंबरीश मिश्र असे काही म्हणूनच तर अपवाद. अशोक जैन किंवा अपर्णा वेलणकर यांच्या अनुवादांचं पत्रकारांना म्हणूनही अधिक मोल. एरव्ही शॉर्टटर्म डेडलाईनचं प्रेशर नसेल तर काम करणं पत्रकारांना अवघड होऊन जात असावं. खरं म्हणजे प्रेशरखालीच काम करण्याची एवढी सवय लागलेली असते की, निसर्गरम्य वातावरणात आणि तणावमुक्त एकांतात लिहिता येऊ नये!

याला साईड इफेक्ट म्हणायचं असेल, तर आपण म्हणू शकता!

तर... एकूण काय! पुण्यात जागेचा आणि मुंबईत वेळेचा जो काही भाव असेल, त्यापेक्षा कितीतरी पटीनं त्यांना जास्त भाव आहे तो इथे. म्हणून तर रोजचा दिवस म्हणजे लढाई.

आजदेखील कोणतेही काम करताना माझ्या मनात तीच हुरहूर असते आणि तेच काहूर. डोक्यात तीच गडबड, छातीत तीच धडधड. ते प्रेशर प्रत्येक लेख लिहिताना. तोच स्ट्रेस हवाहवासा वाटणारा. तो नसेल, तर खरोखर मी लिहू शकेन?...

'यात काय विशेष? असले शेकडो लेख मी लिहिले आहेत... हा आणखी एक', 'एवढे अंक काढले आहेत, हा आणखी एक...' टाकू एक पाटी... हॉटेल उघडलंच आहे, तर नवा काहीतरी मेनू गिऱ्हाइकांना द्यावाच लागेल, देऊ ठोकून काहीतरी... असं ज्या दिवशी वाटेल... ज्या दिवशी लेख लिहिताना वा न्यूज प्लान करताना छातीत धडधड नसेल, त्या दिवशी जर्नालिझम सोडून द्यायचं, असं इथं येतानाच मी ठरवलंय!

**sunjay.awate@gmail.com**

**नाव** : **संजय आवटे**
**शिक्षण** : बी.एस्सी (ॲग्रीकल्चर);
बी.सी.जे.; एम.एम.सी.जे.;
एम.ए. (राज्यशास्त्र);
डिप्लोमा इन ड्रामॅटिक्स; डिप्लोमा इन रुरल डेव्हलपमेंट

* 'महाराष्ट्र टाइम्स', मुंबई व 'आकाशवाणी', मुंबई येथील कार्यानुभवानंतर पुण्यातील 'केसरी' व 'सकाळ'मध्ये उपसंपादक
* 'संचार', सोलापूर; 'लोकमत', अकोला; 'गावकरी', औरंगाबाद या दैनिकांमध्ये वृत्तसंपादक- निवासी संपादक
* 'लोकमत'च्या पुणे आवृत्तीचे सहसंपादक
* सध्या 'लोकसत्ता'मध्ये सहसंपादक म्हणून पुण्यात काम पाहात आहेत.
* आंतरराष्ट्रीय संबंध, विकासाशी संबंधित प्रश्न, साहित्य, संस्कृती हे अभ्यासाचे विषय. त्याविषयी लेखन-संशोधन
* 'लिंगसमभाव जाणीव जागृती'साठी महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या पुस्तिकांचे लेखन
* विश्लेषणात्मक लेखन आणि व्याख्याने यासाठी विशेष ख्याती



# प्रवीण दवणे

**मला वाटतं, आपण समजतो त्याहून वेळ भरपूर असतो. वेळ कधी संपलीय असं होतच नाही हीच तर वेळेची गंमत आहे. आणि जो सतत वेळेच्या कणाकणाला स्पर्श करतो, त्याच्याच हे लक्षात येतं की अरे अजून आपण पुष्कळशा वेळेचा उपयोगच केला नाही.**

उदाहरण फारच मोठं देतोय.

पण द्यायला हरकत नाही.

मंडालेच्या तुरुंगात जेव्हा लोकमान्य टिळकांना जावं लागलं, तेव्हा त्यांचा पहिला उद्गार होता, 'बरं झालं, गीतारहस्य लिहायला मला वेळ हवाच होता.'

ब्रिटिश सरकारकडे त्यांनी फक्त कागद अन् लेखणी एवढीच व्यवस्था मागितली.

वेळेच्या व्यवस्थापनाचा हा उत्स्फूर्त नमुना आहे असं मला वाटतं.

माझ्या कामाचं स्वरूप विविधांगी आहे. इतर लेखकांहून खूप निरनिराळ्या गोष्टी करण्यात माझं मन नेहमी व्यग्र असतं. प्रत्यक्ष लेखन तर आहेच; पण अक्षरश: शेकडो कार्यक्रम, तेही विविध प्रकारचे लागलेले असतात. त्यात निवेदन, निरूपणापासून प्रमुख वक्ता, 'दिलखुलास','सावर रे!' असे स्वतंत्रही असतातच. शिवाय चित्रपटासाठीच्या गीतलेखनाच्या सतत होणाऱ्या बैठकाही आहेतच. आणि या सगळ्यात रोजचा अध्यापनाचा व्यवसाय- तोही आहेच की!

सर्वत्र एक प्रश्न मला वारंवार विचारला जातो, 'अजून कॉलेजात शिकवता तुम्ही? का व्हीआरएस घेतली?' सगळे मला असे का विचारतात- मला कळत नाही. मी म्हणतो- 'हो, अगदी आजही कॉलेजात जाऊन आलोय मी!'

कॉलेजमधलं अध्यापन हाही माझा लेखनाइतकाच सर्वात आवडता व्यवसाय आहे. ज्या ओढीनं नवं लेखन करण्यासाठी मी कोरे कागद समोर ओढतो; त्याच ओढीनं मी वर्गात जातो.

बरं, हे सर्व करताना घरात विविध कारणांनी- फोनही न करता- आलेल्या व्यक्तींचा, विद्यार्थ्यांचा राबता असतो. त्यांच्याशी बोलता बोलता फोन तोही घरातला; न् मोबाइल तो सुरूच असतो.

अरे, पत्रव्यवहाराबद्दल राहिलंच.

कार्यक्रम ठरवताना परिचयपत्र, होकारपत्र- झाल्यानंतर आभाराचं पत्र- शिवाय शेकडो वाचकपत्रांनाही उत्तरं द्यावीच लागतात. मला वाटतं, ही धावपळ जमते कशी? हाच तर आजच्या लेखनाचा विषय आहे.

मला वाटतं, आपण समजतो त्याहून वेळ भरपूर असतो. कितीही वेळेचा भरगच्च वापर केला तर अजून वेळ शिल्लक राहण्याची मोठीच शक्ती वेळेच्या अंगी आहे. वेळ कधी संपलीय असं होतच नाही- हीच तर वेळेची गंमत आहे. आणि जो सतत वेळेच्या कणाकणाला स्पर्श करतो- त्याच्याच हे लक्षात येतं की अरे अजून आपण पुष्कळशा वेळेचा उपयोगच केला नाही!

आपण स्वीकारलेलं काम आवडीनं स्वीकारलेलं असेल तर आपोआपच आपल्या उत्साहाला पंख फुटतात. फारच थोडी कामं मी अशी स्वीकारत असेन की जिथं माझा 'नाही' म्हणताना नाइलाज होतो. ती कामं माझी होता होत नाहीत. एकामागोमाग एक लेखन, वाचन करीत राहणं हा आता माझ्या जगण्याचाच एक भाग झाला असावा. विविध प्रकारचं कुतूहलानं लिहायचं यात एक झिंग असते. नंतर नंतर त्याचा प्रसिद्धी न् पैशासाठीही संबंध उरत नाही. मजेत लाँग ड्राइव्हला समुद्रकाठच्या चकचकीत रस्त्यानं निघावं तसं आपण सारं काही मजेनं करू लागतो. ती मजा जोपर्यंत शिल्लक आहे तोपर्यंतच कामात गती येत राहते.

लेखन करताना माझ्या प्रत्येक लेखनाचा अर्थात् मीच पहिला वाचक असतो. मनात तरंगत असलेले निराकार विचार कुठल्या शब्दांत कसे प्रगट होणार आहेत हे मला खरंच आधी माहीत नसतं. जणू लिहिणारा मी आणि लगोलग ते वाचणारा मी- यात एक धूसर- पण निश्चित अंतर असतं. म्हणूनच लिहिणाऱ्या मला कंटाळ्याची पहिली जांभई आली की मी लगेच पेनाला टोपणाच्या घरट्यात विसावू देतो. मला जांभई आली याचा अर्थ इथं वाचकांनाही येणार असा अर्थ मी काढतो. माझ्यातला ताजेपणा माझ्या लेखनात उतरेपर्यंतच लिहिण्यात मजा आहे.

विविध प्रकारचं लेखन असल्यामुळे एकाच बागेत जाण्याचा कंटाळवाणेपणा मला येत नाही. एखादा ललित लेख लिहून झाला की- चार पत्रांना मनमोकळी उत्तरं दिली तरी म्हटलं तर काम पुढं जातं- म्हटलं तर आपणच आपल्याला नवं करतो.

स्वत:ला नित्य नवं करण्याची कला वेळेच्या व्यवस्थापनात माझं लेखन- संपादकांच्या कचेरीत कसं पोहोचेल याची खबरदारी मी आग्रहपूर्वक घेत असतो. वीस-वीस पानांचा मजकूर फॅक्स करताना- प्रसंगी मिळणाऱ्या मानधनाची रक्कम पूर्णही खर्च होते; पण त्यावेळी लेखन वेळेत पोहोचल्याचा बहूमूल्य आनंद मला असतो.

सदर लेखनात ताजेपणा लागतो. विषय नवे लागतात. सातत्य अर्थात् लागतंच. हे विषय लेखनटेबलाजवळ बसल्यावर मी डोकं दाबून जबरदस्तीने सुचवून घेत नाही. कार्यक्रमाच्या मुशाफिरीत माझ्या बॅगेतल्या छोट्या डायरीत मी वाटेत, प्रवासात, गप्पांत सुचलेले विषय- थोडक्यात नोंदून ठेवतो. काही वेळा त्याचे पाच-सात मुद्दे काढतो. अशी तयारी झाली की सदरलेखन नव्या चैतन्याने करता येते. काही वेळा एक लेख 'नाही नाही जमला', 'मजा नाही येत', 'छे एकदम सुमार' असं वाटून ते मी दूर ठेवतो. नव्याने लिहितो. मला माझं न आवडलेलं लेखन- मग ते लेख-ती कविता- ते गीत फाडून टाकणं आवडत नाही. निर्मिती ही एक

**वेळ न पाळणारा एखादा कलावंत स्वर्गीय आनंद देतही असेल; पण तो वेळ पाळेल तर अधिक काहीतरी निर्माण करू शकेल. प्रतिभा ही पुन्हा आणखी वेगळीच गोष्ट आहे. पण वेळेचा सदुपयोग वेळेवरच करण्याचीही एक समयप्रतिभा असते, ती आपल्यापाशी असणं हे खरंच भाग्य असतं, असं मला वाटतं.**

फार महत्त्वाची आहे.

मी मित्रांच्यात, नातेवाईकांच्यात वा चित्रपट, नाटक बघण्यात कुठेही गर्क असलो तरी- मला आज काय लिहायचं आहे न् ते केव्हा लिहायचं आहे याचा पक्का विचार मी माझ्या अबोध मनात घट्ट करून ठेवलेला असतो. त्यामुळेच गप्पांमुळे माझं लेखन राहिलं असं सहसा होत नाही. तसं कधी झालंच तर मी मला क्षमा करीत नाही. गप्पा-मनोरंजन यापेक्षा माझं 'आजचं लेखन' ही माझी आजची मानसिक गरज आहे हे पक्कं माहीत असल्यानं, रात्र खणून, पहाट उकरून मी गेलेला वेळ कागदापुढे मांडून बसतो.

लेखन काय, कार्यक्रम काय हे माझ्यावर कुणीही लादलेले नसतात. त्यावरच्या मानधनावर आजची भाकरी अवलंबून नसते; म्हणूनच तो त्याचवेळी करण्याकडे माझा कल असतो. कारण आपणच आपल्याकडून शिस्तबद्ध रीतीनं ते नाही केलं तर ते आपल्याकडून कधीही होणार नाही- याची भीती असते.

गेली वीस वर्षे मी महाराष्ट्रातल्या जवळजवळ सर्व नामवंत नियतकालिकांसाठी सदर लेखन केलं. नंतर त्यांची पुस्तकंही अनेक आवृत्त्यांची दाद मिळणारी ठरली. 'सकाळ'मध्ये तर मी दररोज लिहिलं- तर 'लोकसत्ता'त साप्ताहिक लिहिलं. यामध्ये चारपाच नाटकं- एखाददुसरी कादंबरी- बालवाङ्मयही लिहिलंच. पण माझं लेखन वेळेवर पोहोचलं नाही अशी तक्रार कुणी करणार नाही. जगाच्या कोपऱ्यात कुठेही असेन तरी हरएक माध्यमातून सजीव गोष्ट आहे. व्यवहारात उपयोग नाही तर फाईलमध्ये बाजूला ठेवा- पण फाडणं ही मला का कोण जाणे हिंसा वाटते. गाण्यातल्या न घेतलेल्या ओळीही- वर्तुळ करून मी बाजूला ठेवतो- शब्द ही गोष्ट माझ्या जीवातून येते- ती पटो न पटो जीव घेणं मला आवडत नाही.

चित्रपटाचं गीतलेखनही काही वेळा वेळेचं व्यवस्थापन चुकवणारी गोष्ट ठरू शकते. ती एकांतात एकाग्रपणे करता येत नाही. लोकांसाठीच लेखन पुष्कळदा लोकांमध्ये बसूनच करावं लागतं. त्यातल्या अनेकांना नवं काही लिहिलं जातंय- शांत बसावं- एवढंही गांभीर्य नसतं. अशा वेळी आध्यापकीय अधिष्ठानानं शांत, संयमानं मन एकाग्र करून लिहावं लागतं. पुन्हा पुन्हा आणि पुन्हा पुन्हा.

मला स्फूर्तीसाठी इतर कुठल्याही बाह्य गोष्टींना साद घालावी लागत नाही. त्यामुळे अनेक प्रतिभासंपन्न लेखक-कवींचा ज्यात वेळ जातो- त्यात माझा वेळ जात नाही. हाही व्यवस्थापनातलाच भाग आहे. जाणीवा, संवेदनशील असल्याने निसर्गाचा आनंद, घटनांमधील चटका, माणसांचा सहवास, निरीक्षणातील सूक्ष्मता यामुळे सुचत जातं- मग अडून रहावं लागत नाही.

गाडीतल्या प्रवासासाठी मी पुरेपूर लाभ घेतो. उदा. ठाणे-कोल्हापूर न् कोल्हापूर-ठाणे असा दौरा असेल तर माझ्याकडून दोन-अडीचशे पानांचं पुस्तक अगदी सहज वाचून होतं. बॅगेत दोन तरी नवी पुस्तकं ठेवण्याचा मी प्रयत्न करतो. दोन्हीचे वाङ्मय प्रकार वेगळे असले तर छानच. समजा- चरित्र वाचनानं जरा

कंटाळा येतोय असं वाटलं तर लगेच प्रवासवर्णन उघडतो. काही पुस्तकं पान न् पान वाचण्यासारखी नसतात. ती धावती चाळली तरी अडत नाही. पण चर्चेतली पुस्तकं वाचायलाच हवीत. हा वाचक म्हणून माझ्यातल्या लेखकाला आग्रह असतो. वाचन हा लेखनाचाच रियाज आहे असं माझं मत आहे. या प्रवासातल्या वाचनाबरोबर- कॉलेजमधून आल्यावर- वा ऑफ तासात- माझं भरपूर वाचन होतं. सहकाऱ्यांशी गप्पा मारता मारता मी शिताफीने ग्रंथालयात सटकतो- तिथं पंधरावीस पानं वाचून आलं की पुन्हा गप्पांमध्ये रमतो. मध्ये जाऊन आलो याचा काहीवेळा अनेकांना पत्ताही नसतो.

आनंद वाटतो सांगायला- इतके जाहीर कार्यक्रम केले- पण कॉलेजला 'विदाऊट पे' अजून तरी घ्यावी लागली नाही. त्यासाठी खूप खूप आटापिटा करावा लागतो. समजा- कराडला रात्रौ नऊ ते अकरा कार्यक्रम केला- की लगेच मध्यरात्री गाडीत बसून पहाटे ठाण्याला  उतरायचं न् फक्त आंघोळ करून लगेच कॉलेजला जायचं. झोपेचं खोबरं होतं. पुरेशी झोप नाही मिळत. पण काहीतरी करायचं तर काही गोष्टींवर पाणीही सोडावं लागतंच ना! आपण जे करतोय ते हौसेनं, श्रद्धेनं, ध्यासानं- यावर माझी श्रद्धा आहे.

एखादं लेखन म्हणा, कार्यक्रम म्हणा आटपला की माझं तिथं उगीच चकाट्या पिटीत थांबणं सहसा होत नाही. पटकन् घरी निघणं हे माझं पहिलं ध्येय असतं. घरीही येताना मी फोन करतो- 'काही आणायचंय का? भाजी? दूध? वगैरे.'

कारण त्यामुळे घरातल्या आपल्या माणसांचाही वेळ वाचतो. जो स्वत: वेळ पाळतो त्याला दुसऱ्याच्याही वेळेची पर्वा असते. कदर असते- असा माझा अनुभव आहे.

वेळ न पाळणारा वक्ता, लेखक किंवा कुणीही मला कौतुकास्पद वाटत नाही.

अपवादात्मक स्थितीत सोडून द्या- पण वेळ पाळणारा माणूस त्याच्या त्याच्या मर्यादेत यशस्वी होतो.

स्वीकारलेल्या कार्यक्रमांना मी वेळेपूर्वी अर्धातास जातोच. 'दवणेंचा कार्यक्रम म्हणजे ते येण्याचं टेन्शन नाही' असंच तुम्हाला ऐकू येईल. का? असं का? तर- जमलेल्या लोकांचा वेळ घेण्याचा, त्यांना ताटकळत ठेवण्याचा मला अधिकार नाही हे मला पूर्ण माहीत असतं. वेळ न पाळल्यामुळे प्रेक्षकांना 'मी दिलगीर आहे' म्हणण्याची वेळ माझ्यावर अगदी नगण्यवेळा आली असेल.

वेळेचं व्यवस्थापन वेळ पाळल्यामुळेच होतं असं माझं स्पष्ट मत आहे. 'आज करू- उद्या करू- परवा पाहू' अशी ढगळ, ढिली माणसं प्रतिभावंत असतील आणि ती अजर-अमर साहित्य प्रसवतही असतील. वेळ न पाळणारा एखादा कलावंत स्वर्गीय आनंद देतही असेल; पण तो वेळ पाळेल तर अधिक काहीतरी निर्माण करू शकेल. प्रतिभा ही पुन्हा आणखी वेगळीच गोष्ट आहे. पण वेळेचा सदुपयोग वेळेवरच करण्याचीही एक समयप्रतिभा असते, ती आपल्यापाशी असणं हे खरंच भाग्य असतं, असं मला वाटतं.

माझ्या वेळेच्या व्यवस्थापनाबद्दल लिहायला सांगून संपादकमहाशयांनी माझी आयतीच आत्मप्रशंसेची सोय केली आहे. त्याचाच फायदा घेऊन मी असं म्हणेन- अन् मी माझ्या लेखनाच्या-वाणीच्या इवल्याशा प्रवासाकडे क्षणभरच मागं वळून बघतो तेव्हा वाटतं- पस्तीस पुस्तकं, सुमारे शंभर चित्रपट, दोन-अडीच हजार गाणी, अनेक कविता, हजारो कार्यक्रम हे सारं मी व्यवसाय सांभाळून संसारातही पूर्ण रस घेऊन कसं करू शकलो? काय आहे याचं उत्तर?

सद्‌गुरुकृपा, आईवडिलांचे आशीर्वाद हे तर आहेच, पण ग्रंथांप्रमाणे-

घड्याळ माझा गुरू।
घड्याळ कल्पतरू।।

हे ब्रीदही मी मनात तेवत ठेवले आहे- हेही आहे.

निसर्ग सर्वांगांनी- सर्व ऋतूत वेळेवर फुलतो- फळतो, की त्याच्याही कडे अंत:स्थ घड्याळ आहे! आपलं घड्याळ 'त्या घड्याळाशी जोडलं तर... तर काय अशक्य आहे?

Email : Dilkhulass@yahoo.co.in

**नाव : प्रा. प्रवीण दवणे**

पत्ता : ब/३०३, राजहंस, लुईसवाडी, ठाणे (पश्चिम) ४००६०४ फोन नं : २५८२३३३१

* ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे गेली २५ वर्षे मराठीचे प्रयोगशील अध्यापन.

* प्रकाशित ग्रंथसंपदा -

रोप अमृताचे,प्रकाशाची अक्षरे, मुक्तछंद,माझिया मना,सावर रे- भाग १ ते ४,अथांग,अत्तराचे दिवस,दिलखुलास, थेंबातलं आभाळ- भाग १ ते २,  द्विदल व इतरही अनेक

विविध प्रकारच्या गीतरचना. सुमारे १०० मराठी चित्रपटांसाठी गीतरचना. २००० भावगीते व भक्तिगीते,

* पुरस्कार -

सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचे सलग तीन वर्षे राज्य पुरस्कार,सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचा रेगे पुरस्कार.

सर्वोत्कृष्ट बालवाङ्मयासाठी अखिल भारतीय बालकुमार साहित्य संमेलनाचे तीन पुरस्कार

* 'दिलखुलास' आणि 'सावर रे!' या स्वतंत्र कार्यक्रमांचे अनेक प्रयोग



# प्राचार्य रा. रं. बोराडे

**काही कथांच्या बाबतीत या सर्वच घटकांकडे मला अधिक लक्ष पुरविता आले असते, असं मला आज वाटतं."**

वाङ्मयनिर्मितीच्या संदर्भात उर्मीचं महत्त्व मी नाकारीत नाही; पण सगळ्याच प्रकारचं वाङ्मय उर्मीतून जन्माला येतं, हे मात्र मला मान्य नाही. कवितेच्या बाबतीत कदाचित असं घडतही असेल. मी स्वत: कवी नसल्यामुळं काव्यनिर्मितीच्या संदर्भात मी निश्चयात्मक विधान करणार नाही. मात्र कथा, कादंबरी, नाटक आदी वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात मी तसं निश्चयात्मक विधान करू शकतो.

लेखकाला लेखनाची उर्मी आली तर ती किती वेळ टिकेल! फार फार तर काही तास. या काही तासांत कादंबरी लिहून होईल ही अजिबात शक्यता नाही. कादंबरीची तर बातच सोडा; पण या काही तासांत कथा लिहिली जाऊ शकेल, असं मला वाटत नाही. माझ्यापुरतं बोलायचं झालं तर मला स्वत:ला एक कथा लिहिण्यासाठी साधारणत: आठ दिवस लागतात. कादंबरीलेखनासाठी मला काही महिने, क्वचित प्रसंगी एक वर्ष देखील अपुरे पडते. कथालेखनाची अथवा कादंबरीलेखनाची मला आलेली उर्मी इतके दिवस टिकते, असे मी म्हणणे म्हणजे स्वत:बरोबर मी इतरांची फसवणूक करतो, असे होईल.

वस्तुस्थिती अशी असते की, कथेचे अथवा कादंबरीचे बीज अगोदरच माझ्या मनात पडलेले असते. हे कथाबीज ज्या क्षणी माझ्या मनात येऊन पडते तो क्षण माझ्या साहित्यिक आयुष्यातला अत्यंत मोलाचा क्षण असतो. या क्षणाची मला प्रतीक्षा करावी लागत नाही. नित्याप्रमाणेच माझे दैनंदिन व्यवहार सुरू असतात. माझे असे दैनंदिन व्यवहार सुरू असतानाच एखाद्या कथाकल्पनेचा माझ्या मनाला स्पर्श होतो. माझ्या मनाला झालेला हा परीस स्पर्श असतो. या कथाबीजाला अंकुर फुटलेला असतो. हा अंकुर माझ्या मनात विस्तारत जातो. त्या बीजामध्ये वाढण्याची जेवढी म्हणून क्षमता असते तेवढे ते बीजांकूर विस्तार जातं. बीजांकूराचा असा विस्तार होण्यास नक्की किती कालावधी लागेल, हे सांगणे फार अवघड असते. क्षमतेनुसार विस्तारलं बीजांकूर शब्दरूप मिळण्याची वाट बघत माझ्या मनात पडलेलं असतं. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये उर्मीला काही स्थान असते, असं मला वाटत नाही. उर्मी म्हणजे मनाची उत्कट अवस्था. वर नमूद केलेल्या निर्मितिप्रक्रियेत अथपासून इतिपर्यंत उत्कटता कायम राहते, असे मी म्हणणार नाही.

साधारणत: १९६० च्या आसपास मी कथालेखनाला प्रारंभ केला. हा मराठी कथेच्या वैभवाचा काळ होता. या काळात विपुल प्रमाणात कथा लिहिल्या जात होत्या. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, द. मा. मिरासदार, शंकर पाटील, शरच्चंद्र चिरमुले, वसुंधरा पटवर्धन आदी बिनीचे कथाकार त्या काळात कथालेखन करीत होते. हंस, मोहिनी, किर्लोस्कर, स्त्री, मनोहर, वसुधा, वीणा, दीपावली, पैंजण, बुवा, मेनका, जत्रा, प्रपंच, मानिनी आदी नियतकालिकांचे दिवाळी अंक झोकात प्रसिद्ध होत असत. वर नमूद केलेल्या बिनीच्या लेखकांच्या कथा या नियतकालिकांच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध होत असत. ही नियतकालिके त्या काळात मासिक स्वरूपात म्हणजेच प्रत्येक महिन्याला प्रसिद्ध होत असत. त्या काळात या मासिकांना पुरेसे वर्गणीदार होते. वाचक होते. या नियतकालिकांना आपल्या मासिक अंकात छापण्यासाठी मोठ्या प्रमाणात कथा हव्या असायच्या. मग व्हायचं असं की, वर नमूद केलेल्या बिनीच्या कथालेखकांच्या

कथा या नियतकालिकांच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध व्हायच्या. क्रिकेटच्या भाषेत सांगायचं झालं तर, वर नमूद केलेले बिनीचे कथालेखक क्रिकेटचे कसोटी सामने खेळायचे आणि मी व माझे समकालीन लेखक क्रिकेटचे रणजी सामने खेळायचो. रणजी सामन्यात चांगलं खेळणाराची जशी क्रिकेटच्या कसोटी सामन्यात वर्णी लागते तसं आमच्याही बाबतीत घडायचं. लेखनाच्या सुरुवातीच्या काळात आम्हाला अधूनमधून दिवाळी अंकातही स्थान मिळायचं. पुढं पुढं तर दिवाळी अंकात लेखन करण्यासाठी इतक्या नियतकालिकांची पत्रं येऊ लागली की त्यामुळं या नियतकालिकांच्या मासिक अंकातून लिहिणं मला अशक्य होऊ लागलं. प्रत्येक नियतकालिकाच्या संपादकांनी दिवाळी अंकासाठी कथा पाठविण्याची मुदत दिलेली असायची. दिलेल्या मुदतीत कथा लिहून पाठवावी लागायची. एकटाकी लेखन करणं मला जमत नाही. डिक्टेशन देणं तर मुळीच जमत नाही. लेखन मनाजोगतं व्हावं यावर माझा विशेष कटाक्ष असायचा. त्यामुळं वेळेचं व्यवस्थापन करणं फार अंकात प्रकाशित झाली. ही कथा अरविंद गोखले यांना आवडली. त्यांनी स्वत:च संपादित केलेल्या एका 'सर्वोत्कृष्ट मराठी कथा'या प्रातिनिधिक कथासंग्रहात ती समाविष्ट केली. हा कथासंग्रह प्रकाशित झाल्यानंतर त्यांची माझी भेट झाली. बोलण्यात 'माघारी'चा विषय निघाला असता ही कथा तिथे संपते तिथे ती संपायला नको होती, ती कथा कुठं आणि कशी संपायला हवी होती, हे त्यांनी मोजक्या शब्दांत सांगितले. 'माघारी'चा शेवट बदलणे मला शक्य नव्हते. पण 'माघारी'च्या अरविंद गोखले यांनी सुचविलेल्या आशयाचा आधार घेऊन त्यावर मी 'परवड' या नावाची कथा लिहिली. ही कथा नंतर दुसऱ्या एका दिवाळी अंकात प्रकाशित झाली.

अलीकडच्या काही वर्षांत माझे कथालेखन जवळपास बंद आहे. मध्यंतरीच्या काळात मी पुरेशा प्रमाणात नाट्यलेखन केले खरे; पण मी नाट्यलेखनात रमलो नाही. माझं हे नाट्यलेखन पुस्तकरूपाने झाले हे खरे; पण तरीही त्याबाबत मी समाधानी नाही.

**वेळेचं व्यवस्थापन वाङ्मयनिर्मितीला बाधक ठरतेच असं नाही.**

अवघड जायचं, पण व्यवस्थापन करण्याशिवाय गत्यंतर नसायचं.

इथं एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो आणि तो प्रश्न असा की, संपादकाच्या या दट्ट्यामुळं माझ्या या काळात नियतकालिकांच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झालेल्या कथा मनाजोगत्या लिहिल्या गेल्या नाहीत काय? संपादकाचा दट्ट्या नसता तर या कथांचं लेखन मनाजोगतं झालं असतं काय? लेखन मनाजोगतं होतं म्हणजे काय? कथेत घटनांची मांडणी असते. घटनांची वर्णने असतात. संवाद असतात. कथेचे हे सर्व घटक मूळ आशय अधिक समृद्ध करतात. वेळेच्या व्यवस्थापनाचा प्रश्न नसता तर काही कथांच्या बाबतीत या सर्वच घटकांकडे मला अधिक लक्ष पुरविता आले असते, असं मला आज वाटतं.

माझ्या सगळ्याच कथांच्या बाबतीत वेळेच्या व्यवस्थापनाचा प्रश्न उद्‌भवलेला होता, असं मात्र नाही. दिवाळी अंकासाठी कथा लिहिण्याविषयी संपादकाचं पत्र आलेलं आहे आणि त्या पत्रानुसार मी कथा लिहिण्यास सुरुवात केलेली आहे असं माझ्या सर्वच कथांच्या बाबतीत घडलेलं नाही. एरवीही माझं कथालेखन सुरू असायचं. कथा लिहून तयार असायची. दिवाळी अंकाला कथा पाठविण्यासंबंधी संपादकाचे पत्र आल्यावर मी ती कथा संपादकाकडे पाठवायचो. ती कथा दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्यावर त्या कथेत मला स्वत:ला काही कच्चे दुवे जाणवायचे. कधी कधी तर अगदी वेगळा प्रकार घडायचा. त्या कथेच्या संदर्भात एखादा जाणकार अथवा रसिक वाचक आपली प्रतिक्रिया नोंदवायचा. ही प्रतिक्रिया कथेची पुनर्मांडणी करण्याची निकड जाणवून द्यायची. पण कथा प्रसिद्ध झाल्यामुळे कथेचं पुनर्लेखन करणं मी टाळायचो.

'माघारी' या नावाची कथा 'साधना' साप्ताहिकाच्या दिवाळी

नाटक हे प्रेक्षकांसाठी लिहायचं असतं. आपण लिहिलेल्या नाटकाचे हौशी अथवा व्यावसायिक रंगभूमीवर प्रयोग व्हावेत, हा हेतू या नाट्यलेखनामागे असतो. मी प्रामुख्यानं ग्रामीण नाटकं लिहिली. लोकनाट्ये देखील लिहिली. एकांकिकाही लिहिल्या. पण हौशी म्हणा, व्यावसायिक म्हणा, रंगभूमीवर ती फारशी रुजली नाहीत. मराठी रंगभूमी अद्याप तरी नागर भागापुरती- विशेषत: मुंबई-पुण्यापुरती मर्यादित आहे. मुंबई-पुण्याचे प्रेक्षक ग्रामीण आशयाची नाटकं बघण्यास उत्सुक असत नाहीत. अशा परिस्थितीत नाटकं का लिहायची हा माझ्यासमोर प्रश्न आहे. मी नाटकं लिहिणं का बंद केलं? याचं उत्तर या प्रश्नात सामावलेलं आहे.

कादंबरीलेखनाच्या बाबतीत वेळेच्या व्यवस्थापनाचा प्रश्न माझ्यापुरता तरी उद्‌भवत नाही. एखाद्या दिवाळी अंकात माझी कादंबरी प्रकाशित व्हावी, यासाठी एखादा संपादक उत्सुक असल्याचे मला कधी जाणवले नाही. दिवाळी अंकात आपली कादंबरी प्रकाशित व्हावी, यासाठी मीदेखील उत्सुक नसतो. याचाच अर्थ अमुक इतक्या कालावधीत कादंबरीचे लेखन पूर्ण व्हावयास हवे, असे माझ्यावर बंधन असते  असं नाही. कादंबरीचे लेखन दीर्घकाळ चालत असल्यामुळे अगोदरचा लिहिलेला भाग मी पुन्हा पुन्हा वाचतो. आवश्यकता वाटल्यास मी त्या कादंबरीच्या लेखनात फेरबदल करतो. कादंबरी लिहून झाली आहे आणि लगेच ती प्रकाशकाकडे प्रसिद्धीसाठी पाठविलेली आहे, असे माझ्या कादंबरीलेखनाच्या संदर्भात घडत नाही. १९८८ साली प्रकाशित झालेली माझी 'आमदार सौभाग्यवती' ही कादंबरी मी आज पुन्हा वाचतो तेव्हा या कादंबरीत फेरबदल करण्याची आवश्यकता मला जाणवते.

* प्राचार्य रा. रं. बोराडे
* जन्म लातूर तालुक्यातील काटगाव येथे
* मराठवाड्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयात ७ वर्षे प्राध्यापक व ३० वर्षे प्राचार्य
* एकूण ३३ पुस्तके प्रकाशित.
* एकूण पाच पुस्तकांना उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचे राज्य पुरस्कार त्यामध्ये 'मळणी' (कथासंग्रह), पाचोळा (कादंबरी), 'पाच ग्रामीण नाटिका' (नाटिकासंग्रह), 'कणसं आणि कडबा' (कथासंग्रह), 'चोरीचा मामला' (एकांकिका संग्रह) या पुस्तकांचा समावेश.
* 'चारापाणी' या कादंबरीला १९९० चा मराठवाडा साहित्य परिषदेचा कै. नरहर कुरुंदकर साहित्य पुरस्कार, तसेच वाङ्मयीन क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दलचा स्वातंत्र्यसैनिक विनायकराव चारठाणकर प्रतिष्ठानचा सेवागौरव पुरस्कार.
* महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळावर, तसेच राज्य मंडळावर सदस्य म्हणूनही त्यांनी काम केले आहे.
* इ. स. २००० - २००४ या कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य.
* ग्रामीण साहित्यातील विशेष योगदानाबद्दल २००३ या वर्षीचा महाराष्ट्र फौंडेशनचा प्रतिष्ठेचा पुरस्कार लाभला.


## ग्रामीण साहित्यविश्व समृद्ध करणाऱ्या कादंबऱ्या

**चौंडकं**
देवदासी स्त्रियांची होरपळ मांडणारी कादंबरी
राजन गवस
**१२०रु.**

**भंडारभोग**
रूढी परंपरांचा बळी ठरलेल्या जोगत्यांच्या जीवनाचा अस्वस्थ करणारा आलेख
राजन गवस
**१५०रु.**

**एकोणिसावी जात**
समाजव्यवहारांना सूक्ष्म नजरेने टिपत केलेले मर्मग्राही लेखन
महादेव मोरे
**१२०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी ३०रु.**

**झोंबडं**
वेगवेगळ्या कारणांसाठी होणाऱ्या आंदोलनांची पार्श्वभूमी मांडणारी कादंबरी
महादेव मोरे
**१००रु.**

**तीन दगडाची चूल**
सामाजिक चळवळीत झोकून दिलेल्या दलित स्त्रिचं जळजळीत आत्मकथन
विमल मोरे
**१५०रु.**

**काट्यावरची पोटं**
घडण्यासाठी धडपडणाऱ्या व्यक्तीचे प्रांजल आत्मकथन
उत्तम बंडु तुपे
**१००रु.**



# मकरंद टिल्लू

**गेलेला क्षण हा 'पडलेल्या दातासारखा' असतो!
दात पडला की जीभ सारखी
त्याच ठिकाणी जाते. घोटाळत राहते.
गेलेल्या क्षणांच्या आठवणीपाशी
आपलं मन असंच सारखं घोटाळत राहतं....**

**प्र**सिद्ध गीतकार जावेद अख्तर यांच्या एका काव्याचा आशय फार सुंदर आहे. ते म्हणतात... आपण प्रवासाला निघतो. गाडीत बसून रस्त्यावरची मागे जाणारी झाडे पहात आपण म्हणतो... 'झाडं मागं गेली.' ...प्रत्यक्षात आपण पुढे जात असतो. झाडं मात्र आधीही तिथेच असतात आणि नंतरही तिथेच असतात आणि नंतरही तिथेच असतात. ...आपण वेळेबाबत म्हणतो '...वेळ गेली, क्षण गेला.' क्षणही त्या झाडांसारखाच आहे. तो आधीही तिथेच असतो नंतरही तिथेच! जीवनाच्या प्रवासात आपण पुढे जातो.

आयुष्याच्या या सुंदर प्रवासात परमेश्वराने प्रत्येकाला काही ना काही तरी दिलंय. कुणी श्रीमंत आहे, कुणी गरीब आहे. कुणी विचारवंत आहे, कुणी विचारहीन आहे. प्रत्येकाला मिळालेल्या गोष्टीत काही ना काही फरक आहे. फक्त एका गोष्टीबाबत दुजाभाव नाही. तो म्हणजे वेळ अर्थात 'टाईम'. प्रत्येकाला चोवीस तासच मिळतात. या तासांचा वापर तो काय करतो यावरच त्याचं आयुष्य अवलंबून असतं.

वेळ वापरण्याबाबतीत मी 'ORH+' हा नियम पाळतो. हा रक्तगट नाही तर कामांची आठवण करण्याचा कोडवर्ड आहे. यात 'O' म्हणजे Office, 'R' म्हणजे Residence, 'H' म्हणजे हसायदान! या गोष्टी पॉझिटिव्हली करणं म्हणजे या तीन कप्प्यांशी निगडित कामं आठवली की त्यांची नोंद खिशातल्या छोट्या डायरीत करतो... काम झालं की काट मारायची. याव्यतिरिक्त मोबाईल, डिजिटल डायरी व लॅपटॉपचा वापर काम पूर्ण करण्यासाठी करतो. एवढं करूनही काही विसरलोच तर 'घरातली माणसं' हे सर्वोत्तम रिमांइडर देणारं सॉफ्टवेअर!

एकपात्री कलाकार म्हणून मला 'रवंथ' करायला आवडतं. वाचायला आवडतं. पुस्तकं वाचायची, माणसं वाचायची, घटना वाचायच्या... या सगळ्याचा वैचारिक 'रवंथ' करताना अनेक मजेदार गोष्टी सापडतात... आणि हसू येतं. जे मला हसवतं ते मग इतरांशी बोलून मी त्यांना हसवतो. निसर्ग आवडतोच पण माणसांत रमायला जास्त आवडतं.

मी करत असलेल्या 'हसण्यासाठी जगा, जगण्यासाठी हसा' या कार्यक्रमाच्या प्रयोगाची वेळ अनेकांच्या औत्सुक्याचा व चर्चेचा विषय आहे. कारण प्रयोगाची वेळ असते ९.०१ वाजता, ५.२३ वाजता अनेकजण विचारतात 'असं का?' याची कारणं दोन. एक म्हणजे अशी वेळ दिल्याने ती लोकांच्या बरोबर लक्षात राहते. त्यामुळे प्रयोगही त्याचवेळी सुरू करता येतो. कारण प्रत्येकाची वेळ मौल्यवान असते. ...दुसरं म्हणजे आपल्या आयुष्यात इतरांबरोबर वेळ ठरवताना ९.३० वाजता, ५ वाजता, ८ वाजता अशा वेळा ठरवतो. पण आपल्या आयुष्यात इतरही क्षण येतात त्यांची जाणीव यानिमित्ताने होते. प्रत्येक क्षणाला किंमत दिली, त्याचा आनंद घेतला तर आयुष्य आपोआपच आनंदाचं होतं.

सर्वांना आनंद देणारं, लाडकं व्यक्तिमत्त्व म्हणजे पु. ल. देशपांडे. 'हास्यपंचमी ते हास्यपासष्ठी' हा आमच्या घरातील तीन पिढ्यांचा एकत्रित कार्यक्रम पुणे फेस्टिव्हलमध्ये आयोजित केला होता. त्यात वडील ज्येष्ठ एकपात्री कलाकार मधुकर टिल्लू, त्यांचा नातू रविराज आणि मी मधला. तीन पिढ्यांचा एकपात्री प्रयोग रंगभूमीवर प्रथमच घडणारा योग होता. वडलांचा व पुलंचा



परिचय होता. पुलंचे आशीर्वाद घ्यावेत असं मला वाटत होतं. पण त्यांची तब्येत बरी नसल्याने ते कोणालाही भेटत नव्हते. पण मनापासून इच्छा होती. मी भांडारकर रोडवर असलेल्या त्यांच्या फ्लॅटवर गेलो. दुपारची वेळ होती. बाहेरचा लोखंडी दरवाजा बंद होता. पण आतला दरवाजा उघडा होता. त्या जाळीच्या दरवाज्यातून घरातलं सगळं दिसत होतं. दरवाजा वाजवावा की नाही या विचारात होतो. दरवाज्यातून नजर समोरच्या पॅसेजमध्ये कोणी दिसतंय का? याचा शोध घेत होती... आणि अचानक आतल्या रूममध्ये असलेल्या पुलंचे पाय दिसले. रहावलं नाही... आणि तिथेच दरवाज्याबाहेर नमस्कारासाठी वाकलो... वरती डोळे मिटलेल्या अवस्थेत आलो... अचानक आवाज आला 'कोण आहात आपण? काय हवंय आपल्याला?' डोळे उघडले समोर सुनीताबाई उभ्या होत्या. पुलंच्या काळजीपोटी त्या कोणालाही त्यांना भेटू देत नाहीत असं समजलं होतं. ...मी म्हणालो, 'मला जे हवंय ते मिळालंय. येतो मी.' त्यांनी मला थांबवलं. मी का आलोय याची प्रेमाने विचारपूस केली. मी कारण सांगितलं. 'आशीर्वाद घ्यायचा होता म्हणून आलो होतो. नमस्कार केला. येतो मी.' त्या म्हणाल्या, 'बरोब्बर चार वाजता या. तुमच्या वडलांबरोबर. तुम्हा दोघांनाही भेटायला भाईंना आवडेल.'

मला अतिशय आनंद झाला. घाईघाईने आवरून आम्ही तिघेही त्यांना भेटायला गेलो. ज्योत्स्नाबाई भोळे व वडलांच्या एकदा गप्पा चालल्या असताना त्यांनी सांगितलं होतं, 'भाई वेळेचा अगदी पक्का आहे.' ते लक्षात होतं. बरोबर चार वाजता दरवाज्याची बेल वाजवली. दरवाजा उघडला. आत हसऱ्या चेहऱ्याने व्हिलचेअरवर बसलेले पुलं दिसले. ...वडलांबरोबर जुन्या आठवणी निघाल्या. त्यानंतर तिथे गप्पांची झकास मैफिल रंगली. ...आजही तब्येत चांगली नसतानाही वेळ पाळणारे 'पुलं' आठवतात!

...आठवणी अनेक आहेत. गमतीने बोलायचं झालं, तर गेलेला क्षण हा 'पडलेल्या दातासारखा' असतो! दात पडला की जीभ सारखी त्याच ठिकाणी जाते. घोटाळत राहते. गेलेल्या क्षणांच्या आठवणीपाशी आपलं मन असंच सारखं घोटाळत राहतं.

...पडलेल्या दातावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी असलेल्या दातांवर जीभ फिरवून ते शाबूत असल्याचा आनंद घ्यावा... भूतकाळातल्या क्षणांऐवजी वर्तमानाच्या क्षणांना महत्त्व देत त्यांचा आनंद घेतला तर भूतकाळही आनंदाचा होतो आणि भविष्यकाळही!

**नाव : मकरंद टिल्लू**
पत्ता : ५६९/६ ब, शिवाजीनगर, काँग्रेसहाऊसच्या मागे, पुणे ४११००५ फोन नं : २५५३३८००
शिक्षण : बी. कॉम् .

* मधुकर टिल्लू, मकरंद टिल्लू व रविराज टिल्लू हे टिल्लू कुटुंबातील आजोबा, मुलगा व नातू अशा तीन पिढ्या एकपात्री प्रयोग यशस्वीपणे सादर करीत आहेत. आत्तापर्यंत मकरंद टिल्लू यांचे ७००च्या वर प्रयोग झाले आहेत.
* 'हसण्यासाठी जगा व जगण्यासाठी हसा' या नावाने तणावमुक्तीसाठी कार्यक्रम सादर करतात. याच अनुषंगाने संपूर्णपणे विनोद व हसणे या विषयाचा सर्वांगिण प्रचार व प्रसार करण्यासाठी 'हसायदान फाऊंडेशन' ची स्थापना. व त्याचे कार्यकारी विश्वस्त.
* 'मिड डे' या वृत्तपत्रातर्फे ' बजाज ऑटो मॅन ऑफ द कॅलिबर' या संकल्पनेअंतर्गत विनोद क्षेत्रातील कार्याबद्दल पुरस्कृत.
* पूना हॉस्पिटलच्या हृदयरुग्णांसाठी राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमात सक्रीय सहभाग.

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शन













| | | |
|---|---|---|
| **आपण : आपले ताणतणाव- एक चिंतन** | अंजनी नरवणे | १०० |
| **निरामय यशासाठी ध्यान** | शुभदा गोगटे | ७० |
| **मनावर विजय : एकनाथ ईश्वरन्** | अनु. वैशाली जोशी | १२५ |
| **चिंतामुक्त जीवन** | आर. डी. मुनोत | १६० |
| **यशाचा कानमंत्र : अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ५० |
| **आत्मविश्वासाचा कानमंत्र : अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ४० |
| **उत्तम स्मृतीचा कानमंत्र : अनंत पै** | अनु. चारुलता पाटील | ५० |
| **आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र : अनंत पै** | अनु.प्रशांत तळणीकर | ८० |
| **पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र** | संजीव परळीकर | ७० |
| **पुढाकार घ्या प्रभावी व्यक्तिमत्वाचे सूत्र** | संजीव परळीकर | २०० |
| **मुलांच्या समृद्ध जीवनासाठी** | डॉ.सुचित तांबोळी | १५० |
| **मुलांवरचे संस्कार (राज्य पुरस्कार)** | शं. व्यं. काश्यपे | ९० |
| **असे बना अन् बनवा विद्यार्थी** | शं. व्यं. काश्यपे | १०० |
| **तुम्ही आणि तुमची मुलं** | रुपां. अविनाश भोमे | ८० |
| **सुजाण पालकत्व** | मीना टाकळकर | ६० |
| **प्रियाराधन आणि विवाह** : डॉ. विजय नागस्वामी | अनु.भारती पांडे | १५० |
| **चला! उठा! कामाला लागा!** : स्वाती शैलेश लोढा | अनु. अंजनी नरवणे | १२० |
| **द मॅजिक ऑफ थिंकिंग बिग** : डेव्हिड श्वार्झ | अनु. प्रशांत तळणीकर | २०० |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४० |

**पोस्टेज प्रत्येकी ३० रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# शरद दळवी



**रहस्यकथा आणि दैनिक या दोन्ही लेखनाला वेळेचं बंधन होतं.मग एकीकडे अग्रलेख तर दुसरीकडे रहस्यकथा असे करायचे. गंमत म्हणजे घाईगर्दीतल्या त्या कथा जमल्याचे वाचकांचे अभिप्राय यायचे.**

'एक तास खाल्ला त्यानं... मी घरात नाही असं सांगायला काय होत होतं...' माझा वैताग...

'अहोऽ पण तुम्ही घरात असताना तसं कसं सांगायचं...?' गृहमंत्र्यांचा प्रश्न.

'हो, तू म्हणजे हरिश्चंद्राचा अवतारच की नाही...'

'तर... तुम्हाला केव्हा भेटायचा मूड आहे आणि केव्हा नाही याचं मला काय स्वप्न पडतं...' स्वर वरच्या पट्टीत.

'नाही... मी जरा लिहिण्याच्या विचारात...'

'पुरे, नुसता विचारच मेला... आचार करायचं बघा...'

आवाजावरून आता माघार घेण्यातला शहाणपणा मला लगेच उमगायचा.

काही वर्षांपूर्वी हा किंवा अशा अर्थाचा संवाद घरात मधून मधून सतत झडत असायचा. ते आठवण्याचे कारण म्हणजे 'ग्रंथजगत'ने परत घातलेलं काळकामवेगाचं गणित. जे बालवयापासून आजवर सतत छळत आलंय.

साधारण सत्तर-बहात्तरच्या सुमारास मी गोव्यातील एका दैनिकात माधव गडकरींबरोबर सहसंपादक म्हणून काम करीत होतो. तिथं आणि तेव्हाच श्री. गुरुनाथ नाईक भेटले. या दोन बलदंड लेखकांनी मलाही लेखक करण्याचा चंग बांधला. मी नाईकांना दरमहा एक-दोन रहस्यमय कादंबरिका लिहून देण्याचे वचन दिले. प्रत्येकी सुमारे शंभर पाने, नोकरी, तीही दैनिकातली, उत्साहानं अंगावर घेत असलेली नवनवी कामं, वाढता मित्रपरिवार, आणि गोव्याला येणारे नातेवाईक या सगळ्या गोंधळात शांतपणे बसून लिहायला वेळ कुठला?... मग स्वत:वर आणि जगावर वैतागायचं आणि तो कुठंतरी काढायचा. खरंतर रहस्यकथालेखन हे अन्य लेखनप्रकारांइतकेच किंवा कांकणभर अधिकच अवघड प्रकरण आहे. याचे वाचक अल्पशिक्षित कामगार वर्गातली किंवा निम्न मध्यमवर्गातली माणसं असत. डॉ. राधाकृष्णन यांच्यासारखे सन्मान्य अपवाद. या वाचकांना गुंगवत आपल्याबरोबर नेण्याइतके ते लेखन प्रवाही आणि वेगवान हवे. कुतूहल सतत वाढवण्याइतकी गुंतागुंत हवी. पण त्यांना कंटाळा येण्याइतके अगम्यही नसावे. हे सारं करायला लागणारी शांतता आणि वेळ... ती मात्र तशी दुर्मिळच होती.

रहस्यकथा आणि दैनिक या दोन्ही लेखनाला वेळेचं बंधन होतं. कधी कधी दोन्हींकडची माणसं 'कंपोझिटर हात धरून बसलेत मॅटर द्या' असा तगादा घेऊन समोर थांबायची. मग एकीकडे अग्रलेख तर दुसरीकडे रहस्यकथा असे करायचे. गंमत म्हणजे घाईगर्दीतल्या त्या कथा जमल्याचे वाचकांचे अभिप्राय यायचे.

आधी कॉलेजमध्ये पाच वर्षे प्राध्यापकी केली होती. त्यामुळे शिक्षणक्षेत्रातली बजबजपुरी बरीच स्वानुभवाने माहीत होती. अनेक ओळखीचे 'शिक्षण सम्राट' होण्यासाठी वाटचाल करीत होते. मग त्या संदर्भात 'एकलव्य' मनात घोळू लागला. ती. भाऊसाहेब खांडेकर गोव्याला आल्यावेळी त्यांना ती कथा ऐकवण्याचे आगाऊ धाडसही केले. मग त्यांच्या आग्रही सल्ल्याने रहस्यकथा बंद करून ती लिहायला घेतली. पण दैनिकाचे काम सांभाळून ते काही जमेना. मग दैनिक सोडले. पूर्वीचा पेशा परत स्वीकारला. सकाळी आठ ते एकची नोकरी. आता काय वेळच वेळ. मनाला शांती व

समाधान लाभले. पण ते तात्पुरतेच ठरले म्हणा. 'एकलव्य' सिद्ध झाली. ज्येष्ठ सुहृद रणजित देसाई यांनी पाठीवर थाप दिली, तर अनिल मेहतांनी साथ दिली.

मग मनातले अनेक विषय पुढे येऊ लागले. भरपूर (?) आणि सकस (?) लिखाणाची स्वप्नं पडू लागली. पण... दिवास्वप्नं ती...

दैनिकामुळं असलेला जनसंपर्क, सर्वदूर पसरलेला मित्रपरिवार, त्यांना व नातेवाईकांना असलेले गोव्याचे आकर्षण, समाजकार्याची हौस, आणि वाचनाचं वेड वगैरेपैकी एखादं कारणदेखील लेखनसंकल्प आणि सिद्धी यांत अडथळा आणायला पुरेसं होतं. लेखनाचे बेत होते, पण वेध नव्हते. संकल्पामागं ना निश्चय होता ना वेळेचं नियोजन करण्याचं शहाणपण. केवळ काशीस जावे नित्य वदावे या चालीवर बोलाचाच भात शिजायचा. एकलव्यानंतर बारा वर्षे तशी भाकडच गेली. दिवाळी अंकांच्या संपादकांचाही विश्वास बहुतेक उडून गेला. अनेक मित्र खडे बोल सुनावत होते. एका टीकाकार हितचिंतकाने तर दै. लोकसत्तामधून कोपरखळी देत चांगलीच हजेरी घेतली होती. मोहन वेल्हाळांनी एक दिवस चांगले सुनावलेही. पण... एक तर आळशीपणा आणि दुसरे गप्पिष्टपणा, ह्यांतही ग्रामीण म्हणीत सांगायचं तर, बाई भिडस्त आणि गाव हग्याचा!

एक बराच मोठा आजार झाला. आणि मग मात्र मी स्वत:च सावध झालो. मोरोपंतांची 'कृतांतकटकामलध्वजजरा' दिसायला लागली होती.

त्याचवेळी अर्नेस्ट हेमिंग्वे भेटला. हेमिंग्वे मोठा जबरदस्त माणूस. जीवनाला अनेक अंगांनी भिडलेला. आणि त्याच्या अनुभूतीतून सकस अभिव्यक्ती करणारा साहित्यिक. त्यानं लेखकांना दिलेला सल्ला मी वाचला.

रोज ठरल्यावेळी ठरल्या ठिकाणी लेखनाला बसावे, चांगले ताव, सवयीची लेखणी वगैरे लेखनसाहित्य आधीपासून तिथे तयार ठेवावे. सुचले नाही तरी तिथेच आपल्या लेखनविषयाचा विचार करीत बसावे. हवे तर लेखन संदर्भ तपासावे, नोंदावे' वगैरे त्याने सांगितले होते.

प्रथम ते वाचून मला हसू आलं. कारण एका डॉक्टरने माझ्या समोरच एका संबंधिताला प्रातर्विधीच्या संदर्भात 'झालं' नाही तरी रोज जाऊन बसा सकाळी... होऊ लागेल' असा सल्ला दिला होता. पण हेमिंग्वे म्हणतो म्हणजे... शिवाय साहित्याची 'पर्गेशन ऑफ माईंड' वगैरे व्याख्या आठवली. मग ठरवलं. बस्स... हेमिंग्वे झिंदाबाद. आता वेळ किती आहे कोण जाणे, आपण ज्येष्ठ नागरिक झालो आहोत. आता थोर लेखकाचा अनुभवसिद्ध सल्ला अक्षरश: पाळायचा.

मग सकाळचा जनसंपर्क बंद केला. त्या वेळेतले वाचन, टीव्ही वगैरे सारे अवांतर मोह कटाक्षाने टाळू लागलो. 'चार अक्षरे छापून आली नाहीत तर स्वत:ला काय पुलं समजायला लागलाय काय...' वगैरे अप्रत्यक्षपणे कानी येणारे मनाआड करू लागलो. आणि मग हेमिंग्वेचा प्रयोग सफल होण्याची चिन्हे दिसू लागली. काळकामवेगाचे गणित थोडेफार सुटल्याचा सुखद अनुभव येऊ लागला. दोन सव्वा दोन वर्षांत दीडएक हजार छापील पृष्ठांचे लेखन झाले. 'सलामी, राजनीती, समर्पिता' वगैरे चारपाच पुस्तके सिद्ध झाली. छापलेली पुस्तके पाहिल्यावर नव्या लेखनाला उमेद येऊ लागली.

**मुख्य अडचण होती, वेळी-अवेळी मध्येच मनात उगवणाऱ्या कथाबीजांचे काय करायचे? कादंबरीचे काम सुरू असताना मध्येच एखादी कथाकल्पना सुचायची. शक्य असेल तर ती कल्पना टिपून बाजूला तरी ठेवायची. किंवा असे सारे तणकट निष्ठुरपणाने काढून टाकायचे. अशा उत्स्फूर्तपणे येणाऱ्या कथा-कल्पना कधीही वेळी-अवेळी येतात. कधी कधी तर मध्यरात्रीही मध्येच जाग येऊन त्या मनात धुमाकूळ घालायच्या. वेळापत्रकाला त्या जुमानायच्याच नाहीत.**

माझ्या विचारांना आकार आणि एक शिस्तशीर बैठक येऊ लागली. अर्थात् ती हेमिंग्वेच्या आणि मराठीतील एक सव्यसाची लेखक व समीक्षक श्री. शंकर सारडा यांच्या मार्गदर्शन व कानउघाडणीने आली हे त्यांचे ऋणही मान्य करायलाच हवे. एखादी गोष्ट निश्चितवेळी आणि निश्चितपणानं करायलाच हवी हे हेमिंग्वेमुळंच साधलं. त्यानं कामाला बैठक आणि नियमित-निश्चित अशी वेळ दिली. तर श्री. सारडांनी सातत्याचं भान दिलं. त्यांनीच सांगितल्याप्रमाणं आदल्या दिवशी सर्वच प्रसंग वगैरे पूर्ण न करता, थोडा राखून ठेवू लागलो. त्यामुळे दुसऱ्या दिवशी न अडता, सलग पुढचे लेखन सुरू होऊ लागले. लेखनाचा ओघ, गती आणि नियमितपणा खूपसा राखला जाऊ लागला. राखल्या वेळात राखले काम करायचेच असला नियमितपणा आयुष्यात पहिल्यांदाच आला.

पण हे एवढं सोपं आणि सहज होतं का? तसं असतं तर अचपळ मन माझे, नावरे आवरीता' असे उद्गार रामदासांसारख्या थोर संताला का काढावे लागले असते? मुख्य अडचण होती,

वेळी-अवेळी मध्येच मनात उगवणाऱ्या कथाबीजांचे काय करायचे? कादंबरीचे काम सुरू असताना मध्येच एखादी कथाकल्पना सुचायची. शक्य असेल तर ती कल्पना टिपून बाजूला तरी ठेवायची. किंवा असे सारे तणकट निष्ठुरपणाने काढून टाकायचे. अशा उत्स्फूर्तपणे येणाऱ्या कथा-कल्पना कधीही वेळी-अवेळी येतात. कधी कधी तर मध्यरात्रीही मध्येच जाग येऊन त्या मनात धुमाकूळ घालायच्या. वेळापत्रकाला त्या जुमानायच्याच नाहीत. पण मुख्य कामात व्यवधान येण्याच्या भीतीने मी सरळ भ्रूणहत्येचं पातक करत गेलो. पण त्यामुळे कादंबरीलेखन मात्र अधिक गतिमान झालं. त्याला जरा अधिक बाळसं आलं.

तसं पाहिलं तर, मी गेली तीस-पस्तीस वर्षं लिहितोय. 'सातत्यानं' हा शब्द मात्र मुद्दामच टाळलाय! पण अलीकडची काही वर्षं सोडली तर त्यांची गती, नियमितपणा, सातत्य वगैरे नव्हतं. शिस्तशीरपणा तर कधीच नव्हता. प्राध्यापकीतला 'बोलका शंख' दैनिकात आल्यावर लेखकू जाहला. पण सुरुवातीलाच कंपोझिंगमधला तगादा आल्याशिवाय लेखनाला वेग यायचा नाही, अशी सवय लागली. ललित लेखनात तसा तगादा लागण्याइतका मोठा लेखक थोडाच होतो? मग लेखनप्रवासात ही थोर माणसं भेटली. समय-नियोजनाची जाण आली. आणि मग काळकामवेगाचे बाळपणापासून छळणारे गणित थोडेफार सुटू लागले. यांत व्यवधानं येतात. सांसारिक अडचणी येतात; पण तरीही नियोजन होऊ शकते. मात्र ते स्वत:च स्वत:ला वळण लावून करावे लागते. कारण... सगळ्यांकडेच कुठं रमेश मंत्रींची कार्यकुशलता किंवा पुलंसारखी पत्नी असणार...?

**शरद दळवी**
४, ब्लू बेले, तांबा कॉलनी,
सांतानेज, पणजी गोवा ४०३००१
फोन ०८३२-२४२४१६७

## शरद दळवी यांची पुस्तके

### चाणक्य

**झलक**

'हा सिकंदर अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. सारं जग जिंकण्याची त्याची महत्त्वाकांक्षा आहे. तो शूर योद्धाही आहे.'

दुसऱ्या एकानं विचारलं,

'तो सिकंदर असेलही मोठा शूर! पण आजवर सिंधू ओलांडून कुणीही परकीय शत्रू भारतात आलेला नाही ना? मग चिंता कसली?'

चाणक्यानं सांगितलं,

'सिंधु ओलांडून कुणीही परकीय शत्रू भारतात आलेला नाही, हे खरं! परंतु स्वार्थासाठी आपल्यापैकीच कुणी त्याला आत घेतलं, तर? घरातलं वैमनस्य अशा तऱ्हेनं उगवून घेतलं, तर?... आपापसांतील वैमनस्यामुळं आपल्या वेगवेगळ्या गणराज्यांत एकीची भावना उरलेली नाही. बंधुभाव राहिलेला नाही. जो तो आ वासून दुसऱ्या भावाला गिळू बघतो आहे. घराबाहेरच्या शत्रूसमोर घरातल्या भावांची एकजूट करून त्या शत्रूचं आक्रमण परतून लावलं पाहिजे, ही भावनाच या आपल्या भूमीत उरलेली नाही!'

चाणक्य तळमळीनं बोलत होता आणि तिथली मंडळी एकाग्र मनानं त्याचं बोलणं ऐकत होती.

चाणक्य चिंतामग्न झालेला दिसत होता.

**किंमत २५०रु. पोस्टेज २५रु.**

### समर्पिता

**झलक**

म्हणजे दर्पणानं आजवर दाखवलेली सारी प्रतिबिंब खोटीच होती का?... तिच्या मनाने प्रश्न केला.

आपल्या कळत्या वयापासूनचा आपला जीवाभावाचा सखा दर्पण... कुमारिका... नवयौवना, नववधू... रूपगर्विता महाराणी... राजमाता. किती किती रूपं दाखवली होती त्यानं... पण आजचं हे म्लान, कोमेजून गेलेलं, सुरकुतलेलं रूप... हे... हे आपण कधीच पाहिलं नव्हतं... तिच्या मनात विचार आला. कदाचित् आपल्या जुन्या मैत्रीला स्मरून...

'नाही कैकेयी, आतासारखे डोळे उघडून कधी स्वत:ला पाहिले होतेस?'– तिच्या विवेकाने प्रश्न केला.

'अं... म्हणजे?' कैकेयी अभावितपणे परत मोठ्याने बोलू लागली. स्वत:लाही नकळत.

'कैकेयी, या आधी तू स्वत:ला कधीही आरशात पाहिलंच नाहीस. पाहिलंस फक्त एका रूपगर्वितेला, महाराणीला... वेगवेगळ्या भूमिकेत स्वत:ला पाहिलंस. चेहरा नव्हे मुखवटा पाहिलास. एक माणूस म्हणून दर्पणासमोर कधी आलीस? स्वत:वर असं अवास्तव प्रेम करणारी माणसं अभिमान, स्वार्थ, दंभ किंवा कशाने तरी आंधळी झालेली असतात. तूही तशीच आंधळी... वेगवेगळ्या रंगाच्या काचेतून स्वत:कडे पाहणारी...' विवेकाने फटकारले.

**किंमत २२०रु. पोस्टेज २५रु.**



# केशव मेश्राम

**साडेदहाच्या नंतर होते. सारे निद्राधीन असतात. मग कधी रात्री अडीचपर्यंत तर केव्हा केव्हा साडेपाच सहापर्यंतही बसून मी ते लेखन हातावेगळे करतो.**

नागपूरच्या 'सुषमा' नावाच्या अंकात १९५७ मध्ये माझी कविता छापून आली होती. हे जरी विसरून जायचे म्हटले तरी कळत्या वयापासून चाळीसपेक्षा अधिक वर्षे मी लेखन करीत आहे. मला स्वत:ला आनंद देणारी आणि मोडण्याघडण्याच्या रसायनात बुडवणारी प्रक्रिया म्हणजे लेखन होय. एक नाटक हा वाङ्मयप्रकार वगळला तर लेखनाचे सगळेच बाज मी हाताळले आहेत. मनामध्ये एकदा काय लिहायचे, याची संरचना झाली; की मग प्रत्यक्ष लेखन, ही सहज बाब वाटते.

सातत्याने लोकांमध्ये मिसळणे, सामाजिक अभिसरण, अन्याय, विषमता, धर्म, इतिहास, विद्यमान प्रगत आयुष्यातही वेगाने आलेले जागतिकीकरण, उदारीकरण, खुली अर्थव्यवस्था, आपल्या शासनातल्या धोरणाला सुरुंग लावणारे जातिबद्ध आयएएस अधिकारी, भ्रष्ट नोकरशाही आणि ज्याला त्याला त्याच्याच पूर्वजीवनाशी चतुराईने जखडणारे राजकीय पक्ष, आपल्या न्यायव्यवस्थेतील उच्चवर्णीयांची संकुचित मानसिकता वगैरे विषयांवर व्याख्याने देत मी फिरतही असतो. महात्मा गौतमबुद्ध, महात्मा फुले, शाहूमहाराज, महर्षी वि. रा. शिंदे, आगरकर, डॉ. आंबेडकर आणि समाजसुधारणेसाठी कारणीभूत झालेल्या व्यक्तींवर पुस्तक प्रकाशने, चर्चा, परिसंवाद, वाङ्मयीन आणि सांस्कृतिक कार्यक्रमात साधारणत: वर्षाला शंभर तरी सभासमारंभात गेली चाळीस-पंचेचाळीस वर्षे मी महाराष्ट्रभर आणि बाहेरही वावरत असतो. ह्याशिवाय विविध विद्यापीठांतील प्रबंधिका, काही मुलाखतींसाठी विषयतज्ज्ञ म्हणून आणि शिवाय मुंबई विद्यापीठातील दूरशिक्षण संस्थेत मराठी विषयाचा समन्वयक व काही ठिकाणी अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही, सहभागी होण्यात मला विशेष आनंद होतो. सभा-संमेलने, स्नेहसंमेलने, जयंत्या-पुण्यतिथ्या ह्याशिवाय मूलनिवासी-आदिवासींच्या अनेक जातीजमातींच्या प्रमुख साठसत्तरच्या वर बोलीभाषांचा आणि अपभाषांच्या शब्दसंपत्तीचा अभ्यास करण्यातही मला रस आहे.

त्यामुळे मला व्याख्यान तयारीसाठी सतत संदर्भवाचन, आलेल्या नव्या पुस्तकावर टाचण-टिपण, नव्या पुस्तकावर परीक्षणे, प्रस्तावना ह्या सगळ्यांसाठीच, घरातील, घरसंसारासाठीच्या आवश्यक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी द्यावा लागणारा अटळ वेळ वगळून मला स्वत: नियोजन अत्यंत गरजेचे असते. त्यातच सप्टेंबर २००४ पासूनच अखिल भारतीय मराठी साहित्यसंमेलन – नाशिकच्या २००५ च्या संमेलनाचा अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आल्याने आणि लोकसहभाग आणि बांधिलकी ही जीवनातील अत्यावश्यक मूल्ये मी स्वीकारलेली असल्याने त्या सोळासतरा महिन्यांच्या कालावधीत तर इतकी भटकंती घडली की घरात व मुंबईतही माझा पत्ता नसायचा. ह्या काळात दोनशे अठ्ठ्याण्णव कार्यक्रमांत मी सहभागी झालो होतो.

लेखनात कविता हा मला अधिक भावणारा साहित्यप्रकार आहे. मराठीत कविताप्रकारात प्रसिद्ध होणारी जवळजवळ पासष्ट टक्के कविता माझ्या वाचण्यात येते. त्यातल्या अनेकानेक प्रयोगांबद्दल मला कुतूहल अधिक असते, कूरकूर कमी. त्यामुळे माझे मन माझ्या स्वत:च्या छंदाने एखाद्या भाववृत्तीचा कुठेही वेध घेते. ही प्रक्रिया जपान मुक्कामी टोकियो किंवा हिरोशिमा येथेही कार्यरत असल्याचे माझ्या अनुभवात आहे. त्यामुळे असे काही अस्वस्थ करणारे किंवा गुंतवून ठेवणारे प्रतीत झाले की मनात काही

ओळींचा संच तयार होतो. आतल्या आत काही अभिव्यक्तीस अनुरूप शब्दांची निवड केली जाते. थोडी मोकळीक मिळाली की एका वहीत किंवा कोणत्याही स्वच्छ कोऱ्या कागदावर मी त्या ओळी किंवा ते आविष्काररूप उतरवून ठेवतो. एखाद्या सुट्या एकाकी एकक ओळीपासून तो सातआठ ओळीपर्यंत हे 'सुचणे' असते.

माझे बहुतेक लेखन रात्री साडेदहाच्या नंतर होते. सारे निद्राधीन असतात. क्वचित एखादे घरगुती भांडण, एखाद्या अस्वस्थ कुत्र्याचे ओरडणे, कधी कावळ्याची अवेळीची कावकाव तेवढी सोबतीला असते, मग कधी रात्री अडीचपर्यंत तर केव्हा केव्हा साडेपाच सहापर्यंतही बसून मी ते लेखन हातावेगळे करतो.

प्रवासात अनेक चित्रविचित्र गोष्टी घडतच असतात. तुमची इच्छा असो वा नसो, तुम्हालाही त्यात गुरफटावेच लागते. कितीतरी माणसे, त्यांचे रागलोभ, स्वभावरंग, वर्तनवैचित्र्य, असंगत-सुसंगत

माझ्या वाचनाच्या साठ वर्षाच्या कालावधीत असंख्य अजब-गजब विषय, ग्रंथरूपातून मला आकृष्ट करणारे आहेत, याचा माझा मलाच शोध लागला. लेखनासाठी टेबलाशी रात्रीचा बसलो की मग ह्यातले काही मी कागदावर उतरवतो.

मी वाचलेल्या माझ्या कितीतरी लेखक-परिचितांच्या कथा, प्रवासवर्णने, निर्मितीप्रक्रिया, त्यांची मत-मतांतरे मला सदोदित महत्त्वाची वाटतात. माझ्याकडे साचलेल्या मूलद्रव्याशी त्याची पडताळणी करता येते. विशेषत: गद्यलेखनासाठी ते साह्यकारी ठरते, असे मला वाटते.

तसे माझी लेखनाची सवय आडनीड आहे, सगळाच विषयाचा अर्क, माझ्या मनात एकवटत असतो. कोणाचीही कळतनकळत बदनामी होणार नाही. सत्य असले – प्रत्यक्षातले असले तरी एका नितळ तारतम्याचे भान, लिहिणाराने राखणे गरजेचे वाटते. माझ्या नियोजनात ह्याकडेही कटाक्ष असतो. आपण फार जगावेगळे अलौकिक

**हे सगळे व्यवस्थापन लेखक म्हणून मला एकट्यालाच करावे लागते. बाकीच्यांच्याबद्दलही खूपसे असेच असावे. पण काहींना झेरॉक्स करण्यापासून तो पोस्ट-कुरिअरचे व्यवहार करण्यासाठी कुटुंबातले काही लोक हौसेने मदत करतात. कोणाला लेखनिक घेऊन लेखन करण्याचे कसब उपलब्ध असते. मला ते जमत नसल्याकारणाने, माझी लेखनक्षमताही मर्यादित असल्यामुळे आणि भटकंती, व्याख्यानदौरे, अन्य व्याप बरेच असल्यामुळे एका मर्यादित पद्धतीने, मला काही आखणी करावीच लागते.**

बोलणे, स्वरावलीतले चढउतार, चकित करून जाणाऱ्या कृती ह्यातच आपणा सगळ्यांचे जगणे सामावलेले असते. त्या घटिताकडे आपण कसे पाहतो, त्याचा दाहक किंवा ओझरता उष्ण-अतिशीत स्पर्श आपले मन कसे सहन करते आणि त्यानंतर त्याची प्रतिक्रिया आणि मांडणी कशा रीतीने करते, ह्यासाठी मला वाटते प्रत्येक लेखकाच्या अंतरंगातला एक कोपरा सजग असतो. माझ्याबद्दल असेच घडते. मनातली ही सगळी रास मी एकत्र करून, त्याची कशी विभागणी व मांडणी करता येईल ते पाहतो. माझ्या नित्याच्या भटकंतीतलेच अनेक अनुभवकण मी ललितगद्याच्या रूपात पेश करीत असतो. कितीतरी पाहायला मिळते. थोडा अशा 'निराळ्या' व्यक्तींच्या कलाने, सक्तीचे वाटणार नाही, अशा तऱ्हेने त्यांना छेडले की काही लगेच, काही खूप वेळानंतर तर कोणी कोणी पत्रानेही काय काय लिहून आपले मन मोकळे करतात, संवाद साधतात. काही कोणत्यातरी त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार किंवा ज्ञातअज्ञात कारणांनी कधीच काही बोलत, लिहीत, कळवत नाही. अशी माणसे दीर्घकाळ मनात, आठवणींच्या कप्प्यात आदळत राहतात. कथालेखनाची कितीतरी बीजे अशातूनच मला उपलब्ध होतात.

ललितगद्य हा विमुक्त आविष्काराचा प्रवाही असा वाङ्मयप्रकार असल्याने, चरित्र-आत्मचरित्रांपेक्षा मला तो अधिक सहज वाटतो.

काहीही करीत नाही आहोत, हे स्वत:ला ठामपणे बजावून ठेवले आहे. त्यामुळे कच्चेपक्के काही मी करीत नाही. अर्थात हे बरोबर नाही, हे सुद्धा कळते, पण आता सवय आणि सरावही होऊन गेला आहे.

त्यामुळे त्या सगळ्या कालावधीत, ह्यावेळी मला काय लिहिणे आणि स्वाभाविकपणे त्यातला आनंद मिळविणे शक्य आहे, याचा नीट अंदाज येतो. सबंध वर्षात मला अजमासे दहाचौदा कविता सुचतात. तीनचार कथांचे विषय, तीनचार लेख आणि पाचसहा ललितगद्य लेखनासारखे जमून जाते. प्रासंगिक लेखन येथे विचारात घेतलेले नाही. उदाहरणार्थ खूप नवे आणि काही नामवंतही प्रस्तावना, पुस्तकप्रशस्ती (Blurb) त्यांच्या पुस्तकावर कोठे आस्वादात्मक किंवा मूल्यमापनात्मक लेखनाचा आग्रह धरतात. एकदा ह्या प्रवासवाटेने चालल्यावर; वय, अनुभव आणि प्रसिद्ध होणारी पुस्तके यांच्यामुळे असे बुजुर्गपण लिहिणारास येतेच. मुळातच मी माणसांच्या गर्दीत वावरणारा, प्रत्युत्तर देण्याबाबत, नाही म्हटले तरी खूपच त्वरेने आणि आठवणीने जागरूक असणारा असल्याने बहुजनसमाजातील असून, सर्वधर्मीय आणि महाराष्ट्राबाहेरही अनेक प्रांतप्रदेशातच नव्हे तर परदेशातही कितिकांशी संपर्क टिकवून ठेवणारा असल्याकारणाने माझ्या नियोजनात यांत्रिकपणा नाही. म्हणजे दिसामाजी काहीतरी

लिहावेच असे केव्हाही मी करीत नाही. नाही म्हणायला, पत्रव्यवहार सतत चालतो. आठवड्यातून दोनदा स्वत: पोस्टाच्या पेटीत सुपूर्द करतो. कमीतकमी वीसबावीस तरी पत्रे अजमासे आठवड्याभरात लिहिली जातात आणि रवानाही होतात.

अ.भा.सा. संमेलनाच्या धबडग्यात उतरल्यापासून पत्राबता आणि अन्य आग्रह-आमंत्रणे वाढली आहेत. त्यातच पंचवीस-तीस वर्षे काही प्रकाशकमित्रांकडे येणाऱ्या छपाईसाठीच्या पुस्तकांसाठी, त्यांच्या विनंतीवरून मी काम करीत आहे. येऊ घातलेल्या पुस्तकांचे असे आगाऊ वाचन घडते, हा त्यांच्या मेहनतान्यासोबतचा अधिकचा लाभ असतो. वेळेचे बांधणी आणि तारखा पाळाव्या लागतात.

त्यामुळे फक्त गेल्यावर्षी माझे लेखन होऊ शकले नव्हते. सततच्या भटकंतीमुळे, घराबाहेरच्याच वात्सल्यामुळे आणि अवतीभवतीच्या माणसांमुळे, माझ्यासाठीही मला वेळ देणे जमले नव्हते.

लोकसंवाद, अक्षरभेट, अक्षरपान वगैरे स्नेहपरिचितांचे चारपाच ह्याउलट एखाद्या नव्या शिलेदाराने त्याच्या नव्या आणि अनभिज्ञ, अनोळखी असणाऱ्या एखाद्या अंकाला लिहून, भेटून, फोनद्वारा आठवणी देऊन मागितले तरच मी लेखन देतो. प्रत्यक्षात लेखन, त्याची प्रत वा दर्जा, त्यातून प्रक्षेपित होणारी ऊर्जा, त्याचे मोजमाप काहीही असो, तो व्यवहार माझ्या मनाला समाधान देणारा आणि पटण्यासारखा असावा, एवढे एक पथ्य मी निग्रहपूर्वक सांभाळीत आलो आहे.

ठरवलेल्या वेळेत ते ज्यांना आपण कबूल केले ते मिळावे, ह्याकडेही माझा कटाक्ष असतो. त्यांनी आवर्जून, त्यांच्या धबडग्यातूनही किमान पोच पाठवावी, अशी अपेक्षा जशी मी बाळगतो. तसेच काही गडबड वाटली तर मी रवाना केलेले लेखन मिळाले की नाही, याची फोनने चौकशी करायलाही मला संकोच वाटत नाही. कारण ज्या अल्प प्रमाणात आणि मोजके लेखन करण्याची माझी शक्ती व क्षमता आहे त्यामानाने दुपटीतिपटीने लेखनाची विनंतीपत्रे दरवर्षी प्राप्त होत असतात. इतका उद्योग करून आपण दिलेले

**आपण फार जगावेगळे अलौकिक काहीही करीत नाही आहोत, हे स्वतःला ठामपणे बजावून ठेवले आहे. त्यामुळे कच्चेपक्के काही मी करीत नाही. ह्यावेळी मला काय लिहिणे आणि स्वाभाविकपणे त्यातला आनंद मिळविणे शक्य आहे, याचा नीट अंदाज येतो. सबंध वर्षात मला अदमासे दहाचौदा कविता सुचतात. तीनचार कथांचे विषय, तीनचार लेख आणि पाचसहा ललितगद्य लेखनासारखे जमून जाते.**

दिवाळी अंक अतिथी संपादक म्हणून बारापंधरा वर्षे मी पाहतो. असे बारापंधरा वेगळाले अंकही संपादनार्थ असतात. त्या त्या वेळच्या त्यांच्या संभाव्य संकल्पनेप्रमाणे कवी, लेखक, अभ्यासक मंडळींशी पत्रव्यवहार करणे, पाठपुरावा करणे, साहित्य मागवून त्यावरील संपादनासह काही संस्कार करून ते छपाईस, त्या त्या स्नेह्याकडे सुपूर्द करणे हा उद्योगही आनंददायक असतो. ह्या सर्वच गोष्टींसाठी मला माझ्या लेखनकाळाचे नियोजन करावे लागते.

माझ्याबाबतीत ही प्रक्रिया पूर्णत: ऐच्छिक आणि माझ्या मनाच्या नियंत्रणाखालील गोष्ट आहे. लेखनाचा कधी धंदा होऊ द्यायचा नाही हे मनोमन ठरवलेले गृहीतक मी पाळत आलो आहे. गेल्या दोन दशकात प्रामुख्याने दिवाळी अंकांसाठी आणि कितीतरी संपादक मित्रांच्या जिव्हाळ्यापोटी पण तरीही मला समाधान देणारे असेल तरच मी लिहिले आहे. त्यामुळे स्वीकृती देतानाच सबंधात किल्मिष किंवा खोटेपणा व खोट येणार नाही ह्याची मी दक्षता बाळगतो. लेखन ही मुळीच बेपर्वाईने करण्यासारखी गोष्ट नाही. ह्यावर माझी निष्ठा आहे.

मित्र जरी असले तरी लिखित पत्रव्यवहार केव्हा आणि कशा तऱ्हेने केला, ह्यावर माझी लेखनाची मान्यता अवलंबून असते. केवढे मोठे नाव असले, साहित्यक्षेत्रात आणि अभिजनात केवढाही बोलबाला असला तरी गेल्या पंचवीस वर्षांपासून अशा अंकांकडे किंवा माध्यमांकडे मी स्वत:होऊन कधीही काहीही पाठवीत नाही. साहित्य, कोणत्याही योग्यायोग्य कारणाने, त्यामध्ये पोस्टखाते, कुरियरवाले, ज्यांच्याकडे दिले ती व्यक्ती; कोणीही असू शकेल किंवा अखेरचा पर्याय, लेखनच जर संपादकांच्या दृष्टीने वादग्रस्त वगैरे असेल तर त्याने ते पाडून ठेवण्यापेक्षा, अन्य ठिकाणी पाठवणे मला शक्य होऊ शकते.

तसे मी सामान्यत: एकटाकी लिहितो. जेवढे जमेल तेवढ्याच लोकांना लेखन देण्याचे मान्य करतो. काही आकस्मिक गुंता झालाच तर पत्र टाकून, लेखन देता येणे शक्य नाही, किंवा आणखी आठदहा दिवस लागतील, चालेल का? अशी विचारणा करतो. किंवा कळवून लिखित माफीही मागतो. त्या त्या व्यक्तीचा तो तो धंदा-व्यवसाय असतो. त्यामागे गुंतवणूक असते. त्यांचेही काही ठोकताळे आणि आडाखे असतात. इतकेच नव्हे तर आपल्यासारख्या अनेक लेखकांचे पर्याय त्यांना उपलब्ध व खुलेही असतात.

हे सगळे व्यवस्थापन लेखक म्हणून मला एकट्यालाच करावे लागते. इतरांबाबतही खूपसे असेच असावे. पण काहींना झेरॉक्स करण्यापासून तो पोस्ट-कुरिअरचे व्यवहार करण्यासाठी कुटुंबातले काही लोक हौसेने मदत करतात. कोणाला लेखनिक घेऊन लेखन करण्याचे कसब उपलब्ध असते. मला ते जमत नसल्याकारणाने, माझी लेखनक्षमताही मर्यादित असल्यामुळे आणि भटकंती, व्याख्यानदौरे, अन्य व्याप बरेच असल्यामुळे एका मर्यादित

पद्धतीने, मला काही आखणी करावीच लागते. तसा माझ्याकडे संगणकही नाही. जुन्या टायपिंग प्रकारातलेही काही येत नव्हते. त्यामुळे स्वहस्ते, मनातील भावोद्‌गार, चिंतन आणि विचार लेखनाद्वारे प्रकट करणेच मला शक्य होते.

तसे सहा कवितासंग्रह, पाच ललितगद्यसंग्रह, दहा कथासंग्रह, तेरा समीक्षापर लेखन, दोन संपादने, दोन कादंबऱ्या, एक बालकथासंग्रह, एक संशोधनग्रंथ, एक रूपांतरित कवितासंग्रह अशी चाळीसएक पुस्तके माझी प्रसिद्ध झालीत.

एका गोष्टीचा थकवा आला की दुसरे काहीतरी करणे, वाचणे, टिपणे काढणे, आवडत्या विषयावरच्या एखाद्या व्याख्यानास केवळ श्रोता म्हणून जाणे, आनंद प्रदान करणाऱ्या वाङ्मय व सामाजिक परिवर्तनाच्या फुले-शाहू-आंबेडकर विचारांच्या आणि अभ्यासपूर्ण धर्म-इतिहास, समाजकारण, संस्कृतीविषयक सर्वच बाबतीत मनाने मी रमतो. वामकुक्षीही मला सवय नाही. त्यामुळे लेखनवाचन, व्याख्यानभटकंती आणि समूहसंपर्कात मला माझ्या वेळेची अशी आखणी करणे जमते. आणखी वेगळे काही करत नाही. प्रत्येक लेखकाच्या स्वभावाप्रमाणे आणि सभोवतीच्या त्याच्या उपलब्धीप्रमाणे ही नियोजन-संकल्पना भिन्नभिन्नच असणार. लेखनाचा आतून रेटा आला की बाकीचा प्रकार आपोआपच साकारतो, एवढेच मला स्वानुभवाने सांगता येईल. आणि तसे बाकीचे सारेच, माझ्याबाबतीत बेशिस्त नसले तरी फारच नियोजनबद्ध असते, असेही नाही.

**नाव : प्रा. केशव मेश्राम**
पत्ता : अ/२/३० अर्जूनराव सहकारी सोसा., गितांजलीनगर, माहीम(पूर्व), मुंबई ४०००१७ फोन नं : २४०९९७३०
जन्म : २४ नोव्हेंबर १९३७, अकोला (विदर्भ)
प्रमुख पुस्तके : उत्खनन (काव्य), हकिकत व जटायू, पोखरण (कादंबऱ्या) खरवड, कोळिष्टके, मरणमाळा (कथा)
२००५ साली नाशिक येथे भरलेल्या अखिल भारतीयमराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष

**वाचनीय ललितगद्य**










| | | |
|---|---|---|
| मालनगाथा : भाग २ | इंदिरा संत | २०० |
| मृद्‌गंध | इंदिरा संत | १६० |
| पासंग | दया पवार | १२० |
| जागल्या | दया पवार | ५० |
| लाइफ स्टाइल | सुधीर गाडगीळ | १२० |
| शेलका साज | शिवाजी सावंत | १४० |
| कांचनकण | शिवाजी सावंत | ८० |
| आनंदाचे अंतरंग : मदर तेरेसा | अनु. फ्रान्सिस दिब्रिटो | ७५ |
| मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी | संकलन : अरुण शेवते | १२० |
| रंगल्या रात्री | संकलन : अरुण शेवते | ८० |
| रात्र रंग | संकलन : अरुण शेवते | १८० |
| स्वप्नी जे देखिले | संकलन : अरुण शेवते | ९० |
| चित्तचित्रे | संकलन : अरुण शेवते | ९० |
| फुले आणि पत्री | माधुरी शानभाग | १५० |
| उद्याच्या सुंदर दिवसासाठी | नागनाथ कोत्तापल्ले | १०० |
| चिंतनाच्या वाटा | डॉ. निर्मलकुमार फडकुले | ९० |
| सुखशांतीच्या शोधात | अंजली ठकार | १०० |
| शोध सुखाचा | संजीवनी वाडेकर | ८० |
| बंजाऱ्याचे घर | यशोधरा भोसले | १५० |
| धागे : गुलज़ार | संपादन : अनंत दीक्षित | ६० |
| वाइज ॲंड अदरवाइज : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १५० |
| गोष्टी माणसांच्या : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १३० |
| मोनालिसाचे स्मित | कुमार केतकर | १२० |

**पोस्टेज प्रत्येकी ३० रु.**



**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# भालचंद्र पानसे

**आजवर मी अनेक हौशी आणि व्यावसायिक नाटकं केली ती जबरदस्त 'वुइलपॉवर'वर. फक्त तीव्र इच्छाशक्ती! त्या त्या वेळी जसं जसं सुचलं, तेच खरं म्हणजे माझं वेळेचं व्यवस्थापन.**

खरं पाहता शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊन किंवा कुणा बुजुर्गाचं प्रत्यक्ष मार्गदर्शन घेऊन, मी नट/निर्माता/दिग्दर्शक/नेपथ्यकार व्हायचं म्हणून या क्षेत्रात उतरलो नाही. तसं पूर्वनियोजित प्लॅनिंग कधी झालंच नाही. आजवर १७ हौशी व ३१ व्यावसायिक नाटकं केली ती जबरदस्त 'वुइलपॉवर'वर. फक्त तीव्र इच्छाशक्ती! त्या त्या वेळी जसं जसं सुचलं, तेच खरं म्हणजे माझं वेळेचं व्यवस्थापन. तरीही जसं 'सेन्स लेस सेन्स इज द फार्स' अशी 'फार्स' या नाट्य प्रकाराची व्याख्या करतात, पण तो सादर करताना काही तरी 'सेन्स' ठेवावाच लागतो. तसंच माझ्या आयुष्यात ठरवून काही केलं नसलं, तरी एखादं प्रोजेक्ट करायचं ठरवल्यावर, त्यानुसार त्यावेळेस योग्य असं वेळेचं व्यवस्थापन करावंच लागलं.

नाट्य आणि चित्रपट क्षेत्रातील व्यक्ती ही कायमच वेळेच्या बाबतीत अतिशय बेफिकीर समजली जाते. एखाद्या समारंभाला या क्षेत्रातील व्यक्ती प्रमुख पाहुणा म्हणून असेल तर समारंभ नक्की उशिरा सुरू होणार असा सामान्य व्यक्तीचा सहज (गैर)समज असतो. काही अंशी ते बरोबरही आहे. कलाकारातला कलंदरपणा त्याला समाजाच्या चौकटीमध्ये बंदिस्त होऊ देत नाही, आणि मग त्याच्याकडून ही बंधनं काही वेळा झुगारून दिली जातात. पण आपण दुसऱ्या बाजूने विचार केला तर सगळ्यात जास्त वेळेचं महत्त्व आणि वेळेचं भान या व्यक्तींना असावं लागतं.

अडतीस वर्षांपूर्वी मी जेव्हा या क्षेत्रात पदार्पण करण्यासाठी धडपडत होतो, तेव्हा तासन्तास तालमी आणि प्रयोग, यामध्ये मला वेळेचं भान उरायचंच नाही. पण हळूहळू जसजसा माझा हा छंद व्यवसायात रूपांतरित झाला, तसतसं माझ्या लक्षात आलं की या क्षेत्रातलं सगळ्यात महत्त्वाचं व्यवस्थापन काय असेल तर 'वेळ'.

मागे वळून पाहताना अडतीस वर्षांचा एक चित्रपट डोळ्यांसमोर दिसायला लागतो. घरच्या सामान्य परिस्थितीमुळे नाटक हेच करिअर करणं वगैरे, असा विचारसुद्धा डोक्यात आणणं शक्य नव्हतं. वडिलांना तर हे अजिबात मान्य नव्हतं. आईचा पाठिंबा होता परंतु स्वत:च्या पायावर उभं राहून, मग काय छंद करायचे ते करा, हा स्वाभाविक दृष्टिकोन. त्यामुळे १९६९ साली आर्किटेक्चरचं शिक्षण अर्धवट असूनही पुणे कॉर्पोरेशनमध्ये नोकरी धरली आणि वडिलांना हायसं वाटलं. आणि एक बाजू भक्कम झाल्यावर मी माझ्या छंदाकडे वळलो. इथूनच माझं समय नियंत्रणाचं शिक्षण सुरू झालं. दिवसभर कॉर्पोरेशनची नोकरी आणि संध्याकाळी/रात्री नाटकांच्या तालमी अशी तारेवरची कसरत! कॉर्पोरेशनची नोकरी सांभाळून 'सुनो जन्मेजय', 'हयवदन', 'रातराणी', 'सांगू नका कुणाला', 'असाही एक अश्वत्थामा', 'शाल्मली', 'एक कळी फुललीच नाही' अशी नाटकं राज्यस्पर्धेला केली. त्यांना सुदैवाने बक्षिसंही मिळाली, त्यामुळे हौशी रंगभूमीवर माझं बऱ्यापैकी नाव झालं. पण घरून आर्थिक पाठिंबा शून्य. त्यामुळे वेळेला हातातलं घड्याळ विकून बिलं भागवायची, अशी परिस्थिती. (आणि त्याबद्दल घरून जोडे निमूटपणे खायचे.) यात १९७४ साली लग्न झाल्यामुळे घरची जबाबदारी आणखी वाढली. पण माझ्या नशिबाने माझे सासरे राजाभाऊ थिटे हे तमाशा क्षेत्रातले कार्यकर्ते (आणि दै. सकाळच्या स्थापनेपासून नानासाहेब परुळेकरांचे सहकारी) त्यामुळे माझ्या बायकोला या क्षेत्राची पूर्ण माहिती होती. आपल्या नवऱ्याचा वेळ



'सुगंधा' चित्रपटातील एक भावमुद्रा

**दीडवर्षात 'कुर्यात्'चे ४२५ प्रयोग झाले होते. ४२५ व्या प्रयोगाला श्री. शम्मी कपूर यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचं ठरलं. तोपर्यंत अनेक कलाकारांनी 'कुर्यात्'मध्ये एकमेकांच्या अडचणीच्या वेळी कामं केली होती. साहजिकच श्री. शम्मी कपूर यांच्या समोर आपली कला सादर व्हावी असं प्रत्येक कलाकाराला वाटत होतं. यावर उपाय म्हणून 'एकाच वेळी कुर्यात्...चे दोन प्रयोग, दोन वेगवेगळ्या थिएटरमध्ये दोन वेगवेगळ्या संचात करायचं ठरलं.' माझ्या आयुष्यातली 'टाइम मॅनेजमेंट'ची ही सगळ्यात मोठी परीक्षा होती.**

आणि पैसा या दोन विरुद्ध दिशेने जाणाऱ्या गोष्टी आहेत, हे तिला सुरुवातीपासूनच मान्य होतं आणि म्हणूनच सुरुवातीपासूनच घरची संपूर्ण जबाबदारी तिने आपल्या डोक्यावर स्वखुषीने घेतली. (स्वत: एम.ए., बी.एड., बी.जे. अशी उच्चशिक्षित असतानाही आपल्या करिअरचा विचार न करता) आणि मला या बंधनातून मोकळीक मिळाली. घरची कामं, नातेवाईक, लग्नकार्ये यांत मला काहीच बघावं लागलं नाही. आणि तो वेळ मी नाटकासाठी देऊ शकलो.

१९७४ पर्यंत मी स्पर्धेची नाटकं आणि नोकरी यात पूर्ण बुडालो होतो. दिवसाचे ४८ तास असते तर बरं झालं असतं असं वाटायचं. पण यावर मात्र मी समाधानी नव्हतो. स्पर्धा करून बऱ्यापैकी अनुभव गाठीशी होता. तरीही माझ्याकडे ना नाटकाचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण होतं, ना कौटुंबिक पार्श्वभूमी, ना आर्थिक पाठबळ. होता तो 'फक्त नाटकासाठी वेळ', जिद्द आणि प्रचंड आवड!

इतक्या वर्षांच्या प्रतीक्षेनंतर माझं पहिलं व्यावसायिक नाटक चिं. त्र्यं. खानोलकर लिखित 'रखेली' १९७५ साली रंगभूमीवर आलं. निर्माते श्री. सुभाष नमाडे, नायक अरुण सरनाईक, संगीत भास्कर चंदावरकर आणि दिग्दर्शक मी. (याच नाटकात ज्योती चांदेकर गाजली. या नाटकाचे पुढे हजारच्या वर प्रयोग झाले.) हे नाटक प्रचंड यशस्वी ठरलं. या नाटकानंतर मात्र माझा वेळ मॅनेज करणं हे एक आव्हान होतं. कॉर्पोरेशननं 'कलाकार' म्हणून 'स्टँडिंग कमिटीत' ठराव पास करून मला सवलत दिली होती, त्यामुळे ऑफिसच्या वेळेचं मला कडक बंधन नव्हतं, पण तरीसुद्धा नोकरी म्हटल्यावर काही जबाबदाऱ्या अपरिहार्यपणे पार पाडाव्याच लागतात. आणि नाटकाचे तर एका दिवसात तीन-तीन प्रयोग आणि दहा-दहा दिवस दौरे. त्यामुळे सकाळी ८ ते ११ ऑफिस करून दुपारी १२.३० च्या प्रयोगाला जायचं, प्रयोग संपल्यावर नंतर ३.३० ला परत ऑफिस, थोडा वेळ काम करून पुन्हा सायं ५.३० व रात्रौ ९.३० चा प्रयोग करून रात्री एकदोन वाजता घरी असा दिनक्रम चालू झाला. त्यामुळे बऱ्याच वेळा घरी काय चालू आहे याचा पत्ताही नसायचा. दौऱ्यावरून फोन करणं वगैरे भानगडच नव्हती, कारण आजच्यासारखे मोबाईल वगैरे पर्यायच नव्हते, त्यामुळे दहा दिवसांतून एक फोन घरी करून हालहवाल कळायची. कधी कधी होमसिक व्हायचो पण एकदा प्रयोग सुरू झाला की या गोष्टींचा विसर पडायचा.

दौऱ्यातले वेळेचे व्यवस्थापन हा तर एक वेगळाच प्रांत! कारण रात्री प्रयोग झाला की जेवून पहाटे दुसऱ्या गावाला निघायचं. गाव जवळ असेल तर सकाळी त्या गावात पोहोचायचं आणि मग दिवसभर काम काहीच नाही. हा वेळ प्रॉडक्टिव्ह करायचा तर



'रखेली' नाटकात ज्योती चांदेकर बरोबर भालचंद्र पानसे

एकच पर्याय म्हणजे वाचन आणि रात्री प्रयोग. त्यामुळे माझं वाचन खूप झालं. 'रखेली'मुळे माझं व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण झालं आणि व्यावसायिक दिग्दर्शक म्हणून माझ्यावर शिक्कामोर्तबही झालं.

पण माझं ध्येय हे नुसतं व्यावसायिक नाटकाचं दिग्दर्शन करणं नव्हतं, मला स्वत:ला नाटकाच्या निर्मितीमध्ये रस होता. पण तेवढी आर्थिक कुवत नव्हती. घरची जबाबदारी वाढली होती. मुली लहान होत्या, पण तरीसुद्धा नाटक निर्मितीची खुमखुमी स्वस्थ बसू देत नव्हती आणि मग यातून १९८३ च्या सुमारास मी भागीदारीत 'गाढवाचं लग्न' नाटकाची निर्मिती केली. वेळेचं गणित आणखी अवघड झालं कारण जोपर्यंत मी दिग्दर्शक होतो तोपर्यंत नाटक बसवून दिलं की माझी भूमिका संपत होती. परंतु निर्माता आणि दिग्दर्शक अशा आता दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडायच्या होत्या. त्यामुळे ऑफिस, तालीम आणि निर्मितीचं काम अशा तिहेरी आघाड्यांवर माझी लढाई चालू होती.

मग मी वेळेचं विभाजन केलं. ऑफिसच्या कामाच्या वेळेला नाटकाचा विचार करायचा नाही आणि तालमीच्या वेळेला ऑफिसचं काम डोक्यात ठेवायचं नाही असं कप्पीकरण करून टाकलं. त्याची मनाला सवय झाली आणि मला सोपं गेलं. एका वेळी लागेल की घरच्या आघाडीवर मात्र मी पूर्ण निश्चिंत होतो. माझी आई आणि बायको पूर्णपणे तो भाग सांभाळत होत्या, त्यामुळे मुलींच्या शाळा, अभ्यास आणि घरचे व्याप यात माझा वेळ जात नव्हता.

१९८४ च्या सुमारास माझ्या व्यापात आणखी भर पडली. माझ्या सासऱ्यांचं निधन झाल्यामुळे त्यांची महावीर पब्लिसिटी ही जाहिरात संस्था चालवण्याची जबाबदारी माझ्या अंगावर पडली. माझी पत्नी यात मदत करीत होती. परंतु आता जाहिराती लिहिणे, पेपरला देणे यासाठीही वेळ देणं भाग होतं. नाटकांच्या जाहिरातींबरोबर – कमर्शिअल जाहिरातीपण मिळाल्या होत्या, त्यामुळे माझा वेळ त्यांच्या 'क्रिएटिव्ह ॲडस्' करण्यात जात होता. आत्तापर्यंत जे वेळेचे तुकडे करत होतो, त्यात आणखीन तुकडे झाले. म्हणजे कामं जास्त, वेळ कमी. आणि प्रत्येक कामाला मिळणारा वेळही कमी झाला. त्यामुळे माझं झोपेचं गणित मजेशीर झालं. दिवसांत पाच ते सहा तास झोप घ्यायचो पण वेळ मिळेल तशी. मध्येच तास, नंतर केव्हातरी वेळ मिळाला की दोन, असं करून पाच ते सहा तास झोप पूर्ण करायचो. म्हणजे अगदी ऑफिसकामासाठी बाहेर जाताना ऑफिस ते आऊटडोअर कामाचे ठिकाण या वीस मिनिटे ते अर्धातास या प्रवासातही मी गाडीत झोपायचो. मला

**जसजसे प्रसंग आले तसतसं वागत गेलो, आणि चुकांतून शिकत गेलो. कारण स्वतःला शिकवणारा मीच होतो आणि शिकणाराही मीच होतो. एकच गोष्ट मनाशी ठरवली होती, एकदा केलेली चूक परत करायची नाही आणि गेलेल्या वेळेचा विचार करायचा नाही.**

एकाच गोष्टीचा विचार करायची सवय झाली. एकेक समस्या सोडवत गेलं की वेळ वाचतो आणि काम लवकर पूर्ण होतं असं लक्षात आलं. सगळ्याच समस्या एकाच वेळी सोडवायला गेलं की सगळाच गुंता होतो आणि तो गुंता सोडवण्यात आणखी वेळ आणि श्रम खर्च होतात. फक्त एक गोष्ट मला मान्यच करावी



'मॅडम' नाटकात उषा नाईक बरोबर भालचंद्र पानसे

केव्हाही कुठेही लगेच झोप लागते. म्हणजे तशी सवयच लावून घेतली.)

–खरं सांगायचं तर आजपर्यंतच्या आयुष्यात मी ठरवून काहीच केलं नाही. नाटक करायचं हे एकच वेड निश्चित होतं. मग जसजसे प्रसंग आले तसतसं वागत गेलो, आणि चुकांतून शिकत गेलो. कारण स्वत:ला शिकवणारा मीच होतो आणि शिकणाराही मीच होतो. एकच गोष्ट मनाशी ठरवली होती, एकदा केलेली चूक परत करायची नाही आणि गेलेल्या वेळेचा विचार करायचा नाही. पुढे जे आव्हान येईल ते फक्त स्वीकारत जायचं आणि कोणत्याही परिस्थितीपासून पळून जायचं नाही. यामुळेच पुढे परीक्षेचे, कसोटीचे अनेक प्रसंग आले – नाटकाच्या बसचे ॲक्सिडेंटस् झाले, प्रयोगाच्या वेळी कलाकार आजारी पडले, तरीसुद्धा प्रयोग करायचा या जिद्दीने मी सगळ्या प्रसंगांवर मात करत गेलो.

१९८६ च्या एप्रिलमध्ये मी 'कुर्यात सदा टिंगलम्' हे शिवराज गोर्लेचं नाटक केलं. हे मी एकट्याने प्रोड्युस केलेलं पहिलं नाटक. या नाटकाने मला प्रसिद्धी, पैसा, नाव सर्वकाही दिलं. हजारच्या वर याचे प्रयोग झाले, अजूनही होतायत. 'कुर्यात्'मुळे मी प्रचंड बिझी झालो. महिन्याला चाळीस-चाळीस प्रयोग केले. जागरणं, दौरे, वेळी-अवेळी खाणं यामुळे मला कित्येकदा नोकरी सोडायचा



शम्मी कपूर यांच्या उपस्थितीत ४२५वा प्रयोग

मोह झाला. परंतु घरच्यांमुळे मी सोडली नाही. 'कुर्यात्'मुळे मी माझ्या वेळेचा खरा उपयोग करायला शिकलो. एका वर्षी अशी वेळ आली की ऑफिसमध्येही अर्जंट काम आणि दहाबारा दिवसांचा नाटकाचा दौरा. बरं कॉर्पोरेशनने मला आत्तापर्यंत इतकं सांभाळलं होतं की या वेळेला मला नाही म्हणणं शक्यच नव्हतं आणि प्रयोग तर ठरलेले. म्हणून मग दिवसभर काम करून मिळेल त्या वाहनाने बस, ट्रक... कसंही रात्री प्रयोगाच्या गावाला जायचं आणि प्रयोग संपल्यावर लगेच निघून कसंही परत पुण्याला यायचं आणि सकाळी परस्पर ऑफिसला जायचं, असा सगळा दौरा पार पाडला. प्रवासात मिळेल तेवढीच झोप, दिवसाचे दोन भाग करून अक्षरश: रोज दोन भूमिका केल्या. एक कलाकार आणि दुसरी कॉर्पोरेशनचा सेवक.

इथपर्यंतच्या माझ्या प्रवासात मला या वेळेच्या विभाजनाची सवय झाली होती. माझा वेळ मी नाटक आणि नोकरीमध्ये विभागून टाकला होता. परंतु पूर्णवेळ नोकरी आणि पूर्णवेळ व्यवसाय यामुळे मात्र वेळ संपत कसा होता ते कळतच नव्हतं. डिसेंबर १९८७ पर्यंत दीडवर्षात 'कुर्यात्'चे ४२५ प्रयोग झाले होते.

४२५ व्या प्रयोगाला श्री. शम्मी कपूर यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचं ठरलं. तोपर्यंत अनेक कलाकारांनी 'कुर्यात्'मध्ये एकमेकांच्या अडचणीच्या वेळी कामं केली होती. साहजिकच श्री. शम्मी कपूर यांच्यासमोर आपली कला सादर व्हावी असं प्रत्येक कलाकाराला वाटत होतं. यावर उपाय म्हणून 'एकाच वेळी कुर्यात्...चे दोन प्रयोग, दोन वेगवेगळ्या थिएटरमध्ये दोन वेगवेगळ्या संचात करायचं ठरलं.'

माझ्या आयुष्यातली 'टाइम मॅनेजमेंट'ची ही सगळ्यात मोठी परीक्षा होती. प्रथम बालगंधर्वमध्ये श्री. शम्मी कपूर यांच्या उपस्थितीत सुरुवातीलाच उद्घाटनाचा कार्यक्रम उरकून घेतला (तो संपताच, नाटक सुरू करण्यापूर्वी टिळक स्मारक मंदिरात फोन करून प्रयोग सुरू करण्याची सूचना दिली. दोन्ही प्रयोग एकाच वेळी सुरू होणं आवश्यक होतं. कारण दोन्ही थिएटरमध्ये यांनी मध्यंतरापर्यंत प्रयोग बालगंधर्वमध्ये पाहिला. मध्यंतर होताच त्यांना टिळक स्मारक मंदिरात नेलं. तोपर्यंत वेळेच्या हिशोबानुसार तिथेही मध्यंतर झाली होती. तिथे पोहोचताच तिथल्या कलाकारांचा नाटक सुरू करण्यापूर्वी सत्कार केला व मग शम्मी कपूर यांनी मध्यंतरानंतर नाटक तिथल्या संचात पाहिले. यामुळे दोन्ही टीममधल्या कलाकारांना श्री. शम्मी कपूर यांच्यासमवेत प्रयोग करण्याची संधी मिळाली. हे फक्त वेळेचं नियोजन, टीम वर्क आणि सगळ्यांचं सहकार्य यामुळेच शक्य होऊ शकलं.

'कुर्यात्...'च्या यशानंतर मी व्यावसायिक रंगभूमीवर बऱ्यापैकी स्थिरावलो. पळापळ चालू होतीच. एकाच वेळी चार-चार नाटकं चालली होती. एका ३१ डिसेंबरला माझ्या वेगवेगळ्या नऊ नाटकांचे, एकाच दिवशी प्रयोग झाले. 'कुर्यात्...'नंतर मी 'नवरा सांगा कुणाचा', 'अनैतिक', 'प्रेमात सगळंच माफ', 'त्या तिघी', 'मॅडम' अशा जवळ जवळ २६ नाटकांची निर्मिती केली. सगळ्यांचं दिग्दर्शन आणि नेपथ्य केलं. काही नाटकांत कामही केलं.

या सगळ्या नाटकांनी मला काय दिलं असेल तर प्रचंड मानसिक समाधान!

आता मी निवृत्त झालोय, माझा पूर्णवेळ आता मी माझ्या छंदाला देऊ शकतो. मला या क्षेत्राने वेळेची किंमत आणि महत्त्व दोन्ही असं काही पटवलं की आयुष्याच्या या टप्प्यावर माझ्या ओंजळीत, पूर्ण समाधान आणि या क्षेत्रात काम केल्याचा आनंद दोन्ही ओसंडून वाहत आहेत. मी जो वेळ या क्षेत्राला दिला त्याच्या दुप्पट समाधान मला त्यानं दिलं हे निश्चित!

**भालचंद्र लक्ष्मण पानसे**
मोबाईल. ९३७११३४३२५ फोन.२४४६६५५६

**भोगले ब्रदर्स**

**जवाहर स्टोअर्स अँड बुक डेपो प्रा. लि.**

**पत्ता :** ४ संजीवन, श्रद्धानंद रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई - ४०० ०५७.

**दूरध्वनी क्रमांक - २६१४३९०२, २६१४८७३५**



# नसिमा हुरजूक

**आपण नियोजन खूप उत्तम केले; पण प्रत्यक्षात काम पूर्ण गुणवत्तेने करणारे सहकारी हाताशी नसतील तर नियोजनाचे श्रम वाया जातात. सुदैवाने मला अनेक गुणवंत सहकारी लाभले आहेत.**

लहानपणापासून लागलेली एक सवय, कोणतेही काम वेळेआधी करावयाचे... म्हणजे नवीन येणाऱ्या कामासाठी आपण मोकळे असतो. ही सवय का व कशी लागली हे सांगणे कठीण आहे; पण वयाने मोठे झाल्यावर व विशेषत: अपंग पुनर्वसनाचे काम हाती घेतल्यावर तर ही सवय केवढी फायद्याची आहे हे लक्षात आले.

'वेळेचे व्यवस्थापन' करण्याची गरज कोणाला आहे? या प्रश्नाचे 'काम जास्त व वेळ कमी पडणाऱ्यांना' हे उत्तर! अशा वेळी मी काय करते तर- दुसऱ्या दिवशी करावयाच्या कामांची यादी बनवते. त्यात आदल्या दिवशीच्या अपूर्ण कामांची यादी मिळवते व मग प्रामुख्याने आधी करावयाच्या कामांची क्रमवारी लावते व ती कामे कोणत्या सहकाऱ्याकडून करून घ्यायची ते त्या कामासमोर लिहिते.

रात्री झोपायला किती वाजतात यावर बरंचसं नियोजन ठरतं. दुसऱ्या दिवशीच्या कामांची संख्या, त्यातील तातडीने करायची कामे, ही तातडीची कामे त्यादिवशी झाली नाही तर त्याचा झोपेवर होणार परिणाम यावर झोप अवलंबून असते. यादीतील कामे दिवसभरात संपतील हा विश्वास असेल तर झोप नियमानुसार पहाटे पाचपर्यंत लागते... पण ती कामे पूर्ण होण्यास जरादेखील शंका असेल तर माझी झोप रात्री दोन-अडीच, तीन अथवा चार वाजताच संपते. मग माझा दिवस सुरू होतो नीरव शांततेत... पहाटे पाचपर्यंत यादीतील कामाच्या संख्येत घट झाल्याचे समाधान काही आगळेच असते.

नेहमीप्रमाणे मग दिवसाची सुरुवात होते पहाटे पाचला. स्वप्ननगरी किंवा घरोंदा वसतिगृहात असले तर सर्व अपंग लाभार्थी-स्टाफ वेळेवर उठला आहे का? आपापल्या कामाला लागला आहे का..? याची चौकशी करते. उदा. पाणी सोडले का? गरम पाण्याची व्यवस्था झाली का? किचन स्टाफ उठून, आंघोळ करून किचनमध्ये गेला का? कॉलेजच्या मुलांना वेळेवर नाश्ता मिळणे आवश्यक असते. ६.४५ ला कॉलेजची मुले-मुली नाश्ता आटोपून संस्थेच्या बसने जातात... कॉलेज वसतिगृहापासून दहा कि.मी.वर आहे. साडेनऊ वाजता शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे डबे, खासकरून त्यासाठी लागणाऱ्या चपात्या वेळेवर होणे अशी किचनमधील अनंत कामे असतात. किचन हा कार्याचा केंद्रबिंदू आहे. येथील कामे वेळेवर व व्यवस्थित झाली तर सर्वांची पुढील दिवसभराची कामे वेळेवर होतात. वेळेवर डबे तयार झाले नाहीत तर स्वतंत्र माणूस रिक्षा देऊन पाठवावा लागतो. मुले उपाशी... नाश्ता न करता गेली तर शाळा, कॉलेज, कार्यालय, अभ्यासात... कामात लक्ष लागत नाही. मग वैद्यकीय तपासण्या, औषधे यांचे चक्र सुरू होते. सुरुवातीला असे घडायचे- आता सर्व वेळेवर होते. वसतिगृह सुरू झाले तेव्हा दिवसाच्या सुरुवातीस किचनच्या कामावर मी स्वत: देखरेख व प्रत्यक्ष मदत करत होते. पण आता दहा वर्षानंतर तशी गरज उरलेली नाही. स्टाफ, केअरटेकर प्रशिक्षित झाले आहेत. ही सर्व कामे ते स्वत: करतात. नाहीतर दुखऱ्या- मुंग्या येत असलेल्या हाताने माझ्या डायरीत नोंद घेऊन मग त्या व्यक्तीशी संपर्क साधावा लागतो. अशा वेळी खूप वेळ जातो व वैतागही येतो.

अर्थात अशी सर्व कामे वेळेचे नियोजन करून पार पाडताना योग्य सहकारी सोबत असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नियोजन

करतानाही मसुदा तयार झाल्यावर सहकाऱ्यांशी चर्चा करून त्यात योग्य तो बदल केल्यास नियोजनातील त्रुटी दूर होतात व नियोजनाची अंमलबजावणी करणेही सोयीचे जाते. आपण नियोजन खूप उत्तम केले; पण प्रत्यक्षात काम पूर्ण गुणवत्तेने करणारे सहकारी हाताशी नसतील तर नियोजनाचे श्रम वाया जातात. सुदैवाने मला अनेक गुणवंत सहकारी लाभले आहेत.

आतापर्यंत सांगितले ते एका ठिकाणी राहून करावयाच्या कामासंबंधी. पण पण असे नेहमीच नसते. घराबाहेर पडून करावयाची अनेक कामे असतात. त्याचे दिवस ठरलेले असतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रिक्षातून, गाडीतून जातानाचा वेळ वाया जाऊ नये व आपले छंद जोपासण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही अशी खंत वाटू नये म्हणून त्या वेळात विणकाम किंवा पुस्तक वाचन करते. विणत असताना अनेक नवीन कल्पना, प्रकल्प याचा आराखडा मनात तयार होत असतो. यालाच कदाचित स्वप्नरंजन असे म्हटले जाते. अशा कल्पनेच्या दुनियेतून (भविष्यकाळात हे असेल, ते असेल- सर्वच सुंदर व आनंद देणारे असेल) बाहेर आल्यावर सुद्धा खूप आल्हाददायक वाटते.

अनेक वेळा शासकीय कार्यालय, मंत्रालय येथे ज्यांना भेटावयाचे असते त्यांची भेट होईपर्यंत दोनचार तासही लागतात. अशा वेळी जेवण, चहा सर्व विसरायचे असते... कारण जागेवरून जरा हललो तर साहेब येऊन निघून जाण्याची धास्ती असते. मग विणकाम, पुस्तक वाचन, गप्पा-टप्पा सर्व संपून जांभया यायला लागल्या की लिखाणाचे काम सुरू करते. कधी पत्राचा मसुदा तयार होतो तर कधी लेख.

हा लेखही अशाच एका कार्यालयात साहेबांच्या केबिनशेजारील प्रतीक्षागृहात बसून लिहीत आहे. साहेबांच्या भेटीचा विषय आहे- अपंग व सुदृढ एकत्रित शाळेच्या समर्थ विद्या मंदिरच्या सातवीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेस बसावयाचे फॉर्म मिळावेत हा. इयत्ता पाचवीचा प्रस्ताव योग्य वेळेत देऊनही त्याला अजून मंजुरी आलेली नाही... अथवा त्यासंबंधी कोणतेही लेखी उत्तर नाही- आणि म्हणे पाचवी ते सातवीचे वर्ग अनधिकृत... त्यामुळे सर्व मुलांना इतर शाळेत प्रवेश घेऊन शिष्यवृत्ती परीक्षेस बसवा- आज फॉर्म भरायची शेवटची तारीख आहे, साहेब यायला खूप उशीर लागणार, पावसात व्हीलचेअरसहीत चढ-उतार करायला नको म्हणून या प्रतीक्षागृहात बसून विणकाम... अर्धातास केले. विणकामाने डोके थंड झाल्यावर दीड महिन्यापासून पेन्डिंग असलेला हा लेख लिहायला सुरुवात केली- सकाळी ११.३० ते १.३० इथं बसून लिहीत आहे- तर साहेबांचा फोन आला. ते कार्यालयात येणार नाहीत, गावाला निघालेत. पण फोनवर त्यांनी कामाची सविस्तर माहिती घेतली. ''थोडा वेळ तेथेच थांबा... चौकशी करून काय ते सांगतो, सोमवारी अवश्य भेटेन!'' बस! दोन तास सार्थकी लागल्याचे समाधान लाभले. पाच मिनिटांतच फोन आला- पाचवीच्या वर्गाच्या मान्यतेसाठी ना हरकत दाखला देण्यासाठी आदेश दिले आहेत... ''इयत्ता पाचवीस मंजुरी मिळाल्याखेरीज ५ वी, ६ वी, ७ वी सुरू करता येत नाही. सातवीच्या विद्यार्थ्यांना इतर शाळेतून शिष्यवृत्तीस बसवा, सोमवारी परत आल्यावर प्रत्यक्ष सविस्तर चर्चा करू.'' मी सोबत नेलेली पत्रपोच घेऊन कार्यालयात दिली व परतले... पुढील कामाचे- वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी. (इ. ५ वी ते ७ वी मान्यतेसाठी आता तीव्र आंदोलनाचे शस्त्र हाती घ्यायचे असा विचार मनात घोळत होता.)

**काम संपवण्याचा जादूचा मंत्र म्हणजेच रात्रीच्या शांततेत वेगाने होणारे काम. दिवसाच्या दहापट वेग येतो रात्री एकटेच काम करताना...**
**ही रात्रीची जादू अनुभवून पहा व ठरवा की झोप येत नाही म्हणून झोपेचे औषध घ्यायचे अथवा कामालाच औषध बनवायचे.**

कामे महत्त्वाची आणि मोठी असली की ती वेळेवर व शिस्तबद्ध होण्यासाठी त्या कामाचे विभाग केले की ती सोपी नि सुटसुटीत होतात व प्रचंड काम निभावून नेतात. आपण ताण न घेता ती एन्जॉय करू शकतो... आता पहा... आपली घरगुती सुट्टीतली ट्रिप असेल, आठदहा जणांची तरी पूर्ण तयारी करताना आणि काय काय विसरले हे आठवताना मेंदू अगदी शिणतो. आम्ही हेल्पर्सने तर व्हीलचेअरबाउंड, पराकोटीच्या अपंगांना समुद्राच्या लाटांपर्यंत, लाटांमध्ये नेलेय- ताजमहाल, लाल किल्ला, रामोजीराव फिल्मसिटी अगदी राष्ट्रपती भवनापर्यंत सर्व दाखवलंय. पर्यटनातील प्रत्येक आनंद कसा अनुभवायचा हे शिकवलंय. आणि अशा ट्रिपला संख्येने आम्ही ८० ते १०० जणही असतो... कधी कधी तर अगदी ५ ते ८ संख्येत शारीरिकदृष्ट्या सुदृढ मदतनीस एवढ्या मोठ्या ग्रुपसाठी लाभतात. पण सुरुवातीपासून कामाचं वाटप सर्वांच्या चलनवलनाच्या मर्यादा जाणून अगदी वेळेत केलं की सुलभ होतं. सर्वात आधी ज्यांना सहलीचा अनुभवच नाही अशांची यादी बनवणं- ट्रेनने जायचे असल्यास रेल्वे कन्सेशन्सनुसार पेशंट व एस्कॉर्ट यादी बनवून ६ च्या ग्रुपला एकप्रमाणे कॉलेज ग्रुपमधून मुले निवडून रिझर्वेशनसाठी पाठविणे, त्याच्या याद्या, अपंगत्वानुसार सीट वाटप, ग्रुप लीडर, लीडर, असिस्टंट, वैद्यकीय, खान-पान, स्त्री-पुरुष विभाग लीडर, कृत्रिम साधने मेंटेनन्स, बॅगांना लेबलिंग (नंबरनुसार, रंग-आकार-वर्णनानुसार बॅग लगेचच मिळते) पब्लिक रिलेशन व कार्यालयीन कामकाज विभाग- असे मुख्य विभाग

पाडून त्याचे मुख्य लोक निवडणे व त्यांच्याद्वारा लहान लहान कामांची यादी करून एकजुटीने कामे करण्यासाठी मानसिकता तयार होणेसाठी वेळोवेळी मिटिंग्ज घेणे महत्त्वाचे. अशा छोट्या बैठकांमधून एकमेकांच्या अडचणी समजून घेण्याची व अडचणी मांडून त्यावरील उपाय शोधण्याची वृत्ती वाढीस लागते.

२००१ मध्ये अमेरिकेच्या महाराष्ट्र फाउंडेशनच्या आमंत्रणावरून 'स्त्री-सबलीकरण वर्षानिमित्त'च्या समारंभास पाहुणी म्हणून मी गेले होते- तेव्हा अठरा दिवस स्त्री मदतनीसावाचून केवळ माझ्या स्वीय सहाय्यकांच्या मजबूत आधारावर मी राहिले व संस्थेसाठी मोठा निधी मिळवून आणू शकले. त्यापाठीमागेही वेळेच्या नियोजनाचे गणितच आहे. प्रत्यक्ष फिल्डवर्क मधली असो वा शारीरिक अडचणींवर मात करण्याबाबतची गोष्ट असो... यश येईपर्यंत वेळेच्या फ्रेममध्ये-बसेपर्यंत सातत्यपूर्ण सराव व उत्कृष्टतेचा ध्यास हे कोणत्याही यशाचे गमक असते, असा माझा अनुभव आहे.

ज्या दिवशी मी घरी असते तेव्हा रात्री साडेआठ ते साडेदहा मी रागात काही बोलले व दुसऱ्या दिवशी एक नव्हे दोन राजीनामे माझ्या हातात आले. तेव्हापासून कानाला खडा लावला. आपली सवय इतरांवर लादायची नाही. त्या सहकाऱ्यांची माफी मागितली. राजीनामा परत घ्यायला लावला व त्यानंतर खरोखर कोणतेही काम सहकाऱ्यांमुळे उशिरा झाले तरी रागाने बोलले नाही, कारण हे सहकारी जीवात जीव देणारे, रात्र-दिवस न बघता संस्थेचे कार्य स्वत:चे कुटुंब सांभाळून करणारे आहेत, याची पुरेपूर जाणीव मला आहे. त्यामुळे मला वाटते, वैवाहिक जीवन असणारे, कुटुंब असणारे यांचे वेळेचे व्यवस्थापन वेगळ्या प्रकारचे असावे.

अनेकजण मला म्हणतात, थोडी विश्रांती घ्यावी. कामातील बदल हीच माझी विश्रांती असते. एखाद्या दिवशी आईने खूपच आग्रह केला व पूर्ण दिवस मी पलंगावर आराम केला तर मात्र मी आजारी पडते. अंगाचा अणुरेणू दुखू लागतो. कधी कधी तर ताप येतो. त्यामुळे आई हल्ली पूर्ण दिवस पलंगावर आराम करण्याचा आग्रह धरीत नाही.

**कामे महत्त्वाची आणि मोठी असली की ती वेळेवर व शिस्तबद्ध होण्यासाठी त्या कामाचे विभाग केले की ती सोपी नि सुटसुटीत होतात व प्रचंड काम निभावून नेतात. आपण ताण न घेता ती एन्जॉय करू शकतो...**

पर्यंत आई कंपलसरी टी.व्ही. बघायला लावते. कधी कधी आग्रहाने थिएटरमध्ये सिनेमा बघायला पाठवते. दुपारी सहकाऱ्यांवर विविध कामे सोपूवन मी ३ ते ६ विनोदी सिनेमा पाहते.

कधी रात्री एक वाजताच जाग आली व परत झोप लागली नाही तर उशाशी असलेल्या फाईल्स- कोणा अपंगाला वसतिगृह प्रवेश, कोणाला कृत्रिम साधन, कोणाची शस्त्रक्रिया केव्हा करायची, कामचुकारपणा कोणी केला, नियमबाह्य वर्तन कोणी केले- यांना शिक्षा कोणती वगैरे निर्णय लेखी देऊन मग थकलेल्या मनाने परत चार-पाच वाजता गाढ झोपायचे. अशावेळी सहा-सात वाजता उठून मग दिनक्रम सुरू होतो.

रविवारीही मी सुट्टी घेत नाही. मी स्वत: काम करते व मोफत शिक्षण-प्रशिक्षण घेणाऱ्यांकडून दोन ते तीन तासाचे श्रमदान करून घेते. ज्यातून वसतिगृहाच्या प्रचंड कामकाजाचा भार हलका करावयाचा प्रयत्न असतो.

वरील वेळेचे व्यवस्थापन आहे, एक दोन्ही पाय व कमरेमध्ये ताकद नसलेल्या छप्पन्न वर्षीय, चाकाच्या खुर्चीवरील स्त्रीचे, जिला कुटुंबाची कोणतीही जबाबदारी नाही.

ठराविक वेळेचे ठराविक काम संपले पाहिजे या माझ्या ध्यासामुळे एकदा गंभीर प्रसंग ओढवला. माझ्या सहकाऱ्यांपैकी काहींचे काम ठराविक मुदतीत झाले नाही. त्यांच्या हाताखालील स्टाफच्या बेजबाबदार वर्तनामुळे हे घडले. याबद्दल माझ्या सहकाऱ्यांना

रात्री अपरात्री झोप आली नाही तर झोपेची गोळी घेण्यापेक्षा, कॉम्प्युटर किंवा शिलाई मशीनवर काम करणे मला आवडते. अशावेळी आठवते ती लहानपणी वाचलेली, ऐकलेली गोष्ट- सावत्र आई मुलीला खूप काम संपवायला देते. काम करता करता ती बालिका झोपते. सकाळी काम पूर्ण झालेले असते. ते एखाद्या परीने किंवा जादूच्या कांडीने पूर्ण करून दिलेले असते... असं काम संपवण्याचा जादूचा मंत्र म्हणजेच रात्रीच्या शांततेत वेगाने होणारे काम. दिवसाच्या दहापट वेग येतो रात्री एकटेच काम करताना... ही रात्रीची जादू अनुभवून पहा व ठरवा की झोप येत नाही म्हणून झोपेचे औषध घ्यायचे अथवा कामालाच औषध बनवायचे.

वेळेच्या व्यवस्थापनामुळे प्रत्येक वेळेस यश मिळेलच असे नाही. साहेबलोकांच्या उपलब्ध असलेल्या वेळेवर आपल्या कामाचे यश अनेकदा अवलंबून असते... २२ वर्षे सेंट्रल एक्साईज आणि कस्टमची नोकरी सांभाळून संस्थेचे काम केले... पुढे संस्थेचे काम वाढत राहिले आणि स्वेच्छानिवृत्ती घेतली पण अशा काळात की पेन्शनला पात्र ठरू शकले. अशा प्रकारे- यशस्वी ठरलेल्या वेळेच्या नियोजनाचे झालेले अपेक्षित परिणाम असे आहेत-

**१. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र** : जून १९९३ पासून कार्यरत प्रकल्प कदमवाडी येथे कोल्हापूर महानगरपालिकेकडून भाडेतत्त्वावर घेतलेल्या जागेमध्ये अपंग तरुणांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात येते. या केंद्रामध्ये कुबड्या, कॅलीपर्स, तीन चाकी सायकली,

कमोड, शालेय व कार्यालयीन फर्निचर इत्यादींचे उत्पादन होते. या केंद्रातील सर्व कर्मचारी शारीरिकदृष्ट्या विकलांग आहेत.

**२. हॅण्डिहेल्प गॅस सर्व्हिस :** १९९३ पासून कार्यरत प्रकल्प. अपंग व्यक्तींना प्रशिक्षण आणि लाभदायी रोजगार देणे तसेच संस्थेच्या पुनर्वसन कार्यासाठी निधीचा स्रोत या दृष्टिकोनातून ही गॅस सर्व्हिस कार्यरत आहे. 'इण्डेन' या घरगुती वापराच्या गॅसच्या वितरणाचे काम पाहणाऱ्या या एजन्सीमध्ये कार्यालयीन कामकाज पाहणारे सर्व कर्मचारी अपंग आहेत.

**३. घरौंदा वसतिगृह :** जून १९९६ पासून कार्यरत प्रकल्प. कोल्हापूरजवळील उचगाव येथील अपंगार्थ वसतिगृह तथा पुनर्वसन केंद्रामध्ये सध्या १३० अपंग विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशिक्षणार्थी अल्प मोबदल्यात वा पूर्णत: मोफत वास्तव्यास आहेत. हे रहिवासी बव्हंशी ग्रामीण आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील आहेत.

**४. समर्थ विद्या मंदिर** : जून २००० पासून कार्यरत शाळा. अडथळा विरहीत वास्तूमध्ये शारीरिक विकलांगांबरोबरच सुदृढ विद्यार्थी-विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी ही शाळा आहे. सध्या पहिली ते सातवीपर्यंत ३०४ विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. या शाळेत प्रतिवर्षी एका इयत्तेची भर पडते. येथे सर्वांना मोफत शिक्षण दिले जाते.

**५. दिलासा :** जानेवारी २००१ पासून कार्यरत प्रकल्प. पुण्याजवळील कान्हे फाटा येथील या निवास केंद्रामध्ये ३० मतिमंद बालक - बालिकांच्या पुनर्वसनाचा प्रयत्न चालू आहे. या केंद्रात शिक्षण, हस्तकला, संगीत शिक्षण, निवास, भोजन, आरोग्यसेवा याचबरोबर प्रेमळ वातावरणही दिले जाते. या केंद्रामध्ये १० अपंग व्यक्तींना रोजगार लाभला असून केंद्राची बहुतेक जबाबदारी तेच सांभाळतात.

**६. स्वप्ननगरी :** एप्रिल २००१ पासून कार्यान्वित प्रकल्प. गाव मोरे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथे १२ एकर क्षेत्रामध्ये कार्यान्वित असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प शारीरिक विकलांग स्त्री-पुरुषांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. पहिल्या टप्प्यामध्ये ६० विद्यार्थी-विद्यार्थिनी, प्रशिक्षणार्थी यांचेसाठी वसतिगृह बांधून पूर्ण झाले आहे. 'आनंद विद्यालय' हा विनाअनुदानित शाळा सुरू झाली आहे. भातशेती, भुईमूग, काजू, नारळाची लागवड आणि दूध डेअरी यशस्वीपणे चालू आहे. काजू प्रक्रिया केंद्र सुरू करून 'लाजवाब' काजूची विक्रीही नुकतीच सुरू केली आहे.

वेळेच्या पद्धतशीर व्यवस्थापनाचे भविष्यात अपेक्षित परिणाम- असे आहेत-

**१)** अपंगत्वाशी मित्रत्व सांगणाऱ्या इमारतीत पॅराप्लेजिक व्यक्तींसाठी निवासी पुनर्वसन केंद्र.

**२)** अनाथ अपंगांसाठी घरकुल

**३)** वृद्ध अपंगांसाठी घर

**४)** प्राथमिक पासून उच्च माध्यमिक स्तरापर्यंत शैक्षणिक सेवा उपलब्ध असलेली अपंग व सुदृढ विद्यार्थ्यांसाठी एकत्रित शाळा-महाविद्यालयं.

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **कु. नसीमा म. अ. हुरजूक** |
| **जन्मतारीख** | : | २ सप्टेंबर १९५० |
| **पत्ता** | : | 'नशेमन' २३५/११, ई, ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६००३ |
| **शिक्षण** | : | अर्थशास्त्र हा विषय घेऊन बी.ए. (ऑनर्स) १९७३ साली शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर |
| **नोकरी** | : | १९७७ पासून कोल्हापूर येथील सेंट्रल एक्साईज अँड कस्टम खात्यात नोकरी करून उपअधीक्षक या पदावरून १९९८ मध्ये स्वेच्छा निवृत्ती घेऊन 'हेल्पर्स ऑफ दि हॅण्डिकॅप्ड, कोल्हापूर' संस्थेच्या कार्यास पूर्ण वाहून घेतले आहे. |
| **सन्मान/गौरव** | : | अपंग सेवेसाठी अनेक संस्थांकडून त्यांचा गौरव झालेला आहे. |

१) १९८६ मध्ये दिल्लीचे मा. ले. गव्हर्नर श्री. एच. एल. कपूर यांचे हस्ते हॅण्डिकॅप्ड वेल्फेअर फेडरेशन, नवी दिल्ली यांच्यातर्फे दिला जाणारा 'राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.

२) १९९६ मध्ये प्रतिष्ठेचा मापला जाणारा इचलकरंजीच्या फाय फौंडेशनचा सन्मान मुख्यमंत्री मा. श्री. मनोहर जोशी महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते. पुरस्कार प्रकार ८ सन्मान चिन्ह व रु. १५,०००/-

३) अपंग कल्याणकारी संस्था वानवडी, पुणे यांचेकडून दि. १०-१२-२००० रोजी 'अपंग कल्याणकारी- सेवा पुरस्कार' मा. ना. लालकृष्ण अडवाणी, गृहमंत्री, भारत सरकार यांच्या शुभहस्ते प्रदान

४) मराठी ग्रंथालय, पुणे यांचेकडून 'दिव्यरथ पुरस्कार' सन २००१ रोजी 'मातृ स्मृती' पुरस्कार देऊन गौरव. पुरस्कार स्वरूप ८ रोख रु. १,५००/- व मानचिन्ह

५) संस्थात्मक पातळीवर दिला जाणारा FICCI चा पुरस्कार २४ डिसेंबर २००५ रोजी 'अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी' भारताचे प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचे हस्ते दिल्ली येथे प्राप्त. पुरस्कार स्वरूप- मानचिन्ह

# डॉ. दीपक टिळक



**अधिक ताजे वृत्त देण्याचे संपादकांचे धोरण वेळेचे बंधन पाळले नाही तर वृत्तपत्रास उपयुक्त न ठरता हानिकारक होते.**

'वेळेचे व्यवस्थापन' हा विषय व्यवस्थापन शास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम करत असताना मला शिकायला मिळाला खरा, पण त्या अगोदरच माझे वडील जयवंतराव टिळक व जपानमधील प्रा. अकिरा कावामुरा यांनी माझ्या अंगवळणी पाडला होता.

महाविद्यालयीन जीवनात साधारण कधीही उठावे. जवळपास जमल्यास वेळा पाळाव्यात अशी सर्वसाधारण मानसिकता असते. एखादा वेळेवर पोहोचला तर तो बावळट ठरतो व इतरांची वाट पहात त्याला बसावे लागते; पण माझे वडील दादा (जयवंतराव टिळक) याबाबत अतिशय काटेकोर होते. रोज सकाळी ६.१५ ला ते मला उठवत. जागरण झाले वगैरे कारणे चालत नसत. त्यामुळे जीवनशैलीलाच एक वेळेचे बंधन पाळण्याची सवय लागली आणि त्याचा उपयोग पुढील जीवनात झाला.

(जयंतराव टिळक स्वत:ही वेळा पाळण्यात अतिशय काटेकोर होते. अगदी ऊर्जामंत्री किंवा विधानपरिषदेचे सभापती असताना ते प्रत्येक कार्यक्रमाला वेळेवर पोहोचत. मंत्री तास-दोन तास उशिरा येतात. ह्या गोष्टीला दादा अपवाद होते. अनेक वेळा तर संयोजकांच्या अगोदर ते पोहोचले आणि वेळ लागल्यास पुढील कार्यक्रमाला निघून जात. अथवा कार्यक्रम सुरू करण्यास भाग पाडत. १ ऑगस्ट, केसरी वर्धापनदिन किंवा नीलफलक अनावरण असे स्वत: संयोजक असलेले कार्यक्रम देखील ते प्रमुख पाहुण्याची वाट न पाहता वेळेवर सुरू करीत. त्यामुळे समारंभाला येणाऱ्या लोकांना ताटकळत थांबावे लागत नसे व सर्वांचाच वेळ वाचे. त्यांची अजून एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे लांब प्रवास असला की ते १ तास अगोदरच तयार असत. तासभर काही गडबड झाली तर हाती असावा हा त्यांचा खाक्या. पूर्वी एकदा पुण्याहून मुंबईला जाताना टॅक्सीला उशीर झाला व विमान चुकल्याने राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांचेबरोबर मास्को दौऱ्यावरच ते कसेबसे दोन दिवस उशिरा पोहोचले. तेव्हापासून ते कधीही स्वत: वेळ चुकले नाहीत व दुसऱ्याला वेळ चुकवू दिली नाही.

जपानला ज्युदो शिकावयास गेलो असताना जपानी संशोधक प्रा. अकिरा कावामुरा हे आमचे पालक होते. दर आठवड्याला ते आम्हास भेटावयास येत व कोठे ना कोठे घेऊन जात. त्यांच्याकडूनही त्यांच्या वेळपालनात दोन मिनिटांचाही फरक नसे. तसेच पुढील दोन वर्षांचे कार्यक्रम ठरलेले असत. एकदा आम्हास एका स्टेशनवर त्यांनी बोलावले, तर दहा मिनिटे उशीर झाला. त्यामुळे ठरवलेली ट्रेन चुकली. ते अस्वस्थ झाले पुढे आमची इतकी धावपळ झाली की नंतर त्यांनी सांगितलेल्या वेळेअगोदर दहा मिनिटे आम्ही हजर रहात असू.

असे हे वेळेच्या व्यवस्थापनातील माझे गुरू.

वेळ, वेळेचे महत्त्व आणि वेळेचे नियोजन या सर्व गोष्टींना वैयक्तिक आयुष्यात किंवा कंपनीत अनन्याधारण महत्त्व आहे, हे कळावयास अनेकांना वेळ लागतो. अथवा काहींना कदाचित कळत नाही. पण ते स्वत:चे अथवा दुसऱ्यांचेही अतोनात नुकसान करीत असतात. वेळेच्या नियोजनामुळे व्यक्ती अथवा कंपनी अथवा संस्थेच्या कामाच्या क्षमतेत खूप मोठा फरक पडतो.

मी केसरी या वृत्तपत्रात काम करत असल्याने तेथे तर वेळेला खूपच महत्त्व. वृत्तपत्र ही नाशवंत गोष्ट आहे. वृत्तपत्र सकाळ ऐवजी

संध्याकाळी आपणाला दिले तर ते शिळे झालेले असते व त्याची रद्दी होते. वीस वर्षापूर्वी दिल्लीला कुतुबमिनारमध्ये घाबरून चेंगराचेंगरी झाली. त्यात दहाबारा लोक मृत्यू पडले. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. संपादकांनी तेथील फोटोग्राफरला कळवून फोटो मागितले. त्याकाळी मोडेम, फॅक्स, इंटरनेट नव्हते. फोटोग्राफरने कसाबसा फिल्म रोल सायंकाळच्या मुंबईच्या विमानात दिला. मुंबईत गाडी पाठवून तो गाडीतच डेव्हलप करण्याची व्यवस्था केली. त्यानंतर पुण्यात प्रिंट काढून त्याकाळच्या पद्धतीने ब्लॉक करून अखेर पहाटे ५ वाजता अंकाची छपाई सुरू झाली. तोपर्यंत अगोदरच्या कोल्हापूर, नगर आवृत्त्यांच्या वेळा निघून गेल्या होत्या. ती पार्सले पोहोचू शकली नाहीत. पुण्यातील विक्रेते देखील दुसऱ्या वृत्तपत्राच्या प्रती घेऊन निघून गेले. कसाबसा १० हजार अंक आम्ही विकू शकलो. त्या अंकाला आम्हाला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले, पण अंक वाचकांपर्यंत पोहोचू शकला नाही.

करावयाचा, याचा आराखडा त्यांच्या मेंदूत असे. आणि मग अतिशय सहजपणे दोन ते तीन तासांत विविध पदार्थ तयार होत. आपण एखाद्याच्या घरी जेवावयास जावे आणि यजमान स्त्री स्वयंपाकघरात धावपळ करीत आहे किंवा अरेच्या हा पदार्थ करावयाचा राहून गेला किंवा आज दमले, हे वाक्य ऐकले की आपल्यालाच ओशाळल्यासारखे वाटते. पण यामागे वेळ व कामाच्या नियोजनाचा अभाव इतकेच कारण असते.

माझी आई, वडील व पत्नी अचानकपणे मला सोडून गेले. आई व वडील पहात असलेल्या पंधरा ते वीस संस्थांची जबाबदारी माझ्यावर पडली. यात भर म्हणून केसरीबरोबर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पूर्णवेळ जबाबदारी मी उचलली. घरी कोणी नसल्याने संसार, स्वयंपाकघरही माझ्याकडेच आले. याशिवाय सामाजिक कार्यक्रमाची गर्दी, पण वेळेचे व्यवस्थापन आखून मी गेली तीन ते चार वर्षे सहजपणे पार पाडू शकलो. काही वेळा पळापळ होते,

**इतर संस्था, कार्यक्रम याकरता प्लॅनर उपयोगी पडतो. त्यामुळे सभा, कार्यक्रम व आपले कामाचे तास याचा एकमेकांत अडसर होत नाही. वाचन व लिखाणाचे काम मी शक्यतो रात्री करतो. दिवसा अनेक विषय, अनेक प्रश्न व समस्या यात मन स्थिर नसते. ती शांतता रात्री मिळते. यातूनही मित्राबरोबर गप्पाटप्पा करावयास रात्री आठनंतर वेळ असतोच.**

वृत्तपत्रात असे वेळेचे महत्त्व आहे. अधिक ताजे वृत्त देण्याचे संपादकाचे धोरण वेळेचे बंधन पाळले नाही तर वृत्तपत्रास उपयुक्त न ठरता हानिकारक होते.

हेच महत्त्व इतरही संस्थात आहे. कुठलेही उत्पादन, त्याला बनविण्यास लागणारा वेळ, वितरणाचा वेळ, याचे गणित असते. आणि ते व्यवस्थापकाला पाळावे लागते. पावसाच्या नंतर छत्र्यांचे उत्पादन झाले तर ते उत्पादन पडून राहणार. एवढे एकच उदाहरण सर्व सांगून जाईल.

जे संस्थेचे तेच वैयक्तिक आयुष्याचे. प्रत्येकाने आपल्या कामाचे योग्य वाटप व वेळेचे व्यवस्थापन केले, तर तो कामाचे प्रचंड डोंगर उपसू शकतो.

आपण आपल्या आजूबाजूला माणसं, 'आज फार दमलो', 'आज फारच धावपळ झाली' किंवा 'मला वेळच नाही' असे म्हणताना पाहतो. काहीवेळा ते खरेही असते; पण अधिकतम नियोजनाचा अभाव हेच त्यामागचे कारण असते.

माझी पत्नी गौरी व तिची बहीण जयश्री चांदेकर यांच्या मेंदूत जणू घड्याळ बसवलेले होते. मी व माझे मित्र त्यांची टिंगल करीत असू. ९ वाजताचा ब्रेकफास्ट ८.३० ला चालत नसे; पण याच त्यांच्या गुणामुळे तीस-चाळीस लोकांचे जेवण त्या सहजपणे करीत. कुठले पदार्थ करावयाचे, त्याची पूर्वतयारी काय, काय तयारी अगोदर करावयाची, काय नंतर, स्वयंपाक कधी सुरू

नाही असे नाही. पण वेळेचे व कामाचे नियोजन केले तर अनेक वेळा यातूनही मला वेळ मोकळा राहतो व अजूनही काहीतरी करावे अशी इच्छा निर्माण होते.

आपल्याकडे सकाळी सात ते रात्री आठ असे १३ तास असतात. यात काम विभागले की मधे अर्धवेळ मोकळाच राहतो.

सकाळी ६.३० ते ७.३० मी व्यायामाकरता राखून ठेवला आहे. त्यानंतर घरात मुलांकरिता ब्रेकफास्टची तयारी किंवा लोक सकाळी जेवावयास येणार असतील तर स्वयंपाकाची पूर्वतयारी. उरलेला भाग स्वयंपाकाची बाई सूचनांनुसार नंतर पूर्ण करते.

केसरी व विद्यापीठाकरिता मी ठराविक वेळ राखून ठेवला आहे व हाताखालच्या माझ्या व्यवस्थापकांना तो माहीत आहे. ते त्यावेळात माझेकडून निर्णय घेतात. दुपारीच बाहेर जाताना रात्रीच्या जेवणाच्या सूचना मी देऊन जातो. त्यामुळे पूर्वतयारी झालेली असते. तासाभरात स्वयंपाक होतो. दर रविवारी मंडई व घर आवरणे व शेत. आठवड्यातून एकदा शेतावर चक्कर मारून तेथील व्यवस्थापन पार पडते.

इतर संस्था, कार्यक्रम याकरता प्लॅनर उपयोगी पडतो. त्यामुळे सभा, कार्यक्रम व आपले कामाचे तास याचा एकमेकांत अडसर होत नाही. वाचन व लिखाणाचे काम मी शक्यतो रात्री करतो. दिवसा अनेक विषय, अनेक प्रश्न व समस्या यात मन स्थिर नसते. ती शांतता रात्री मिळते. यातूनही मित्राबरोबर गप्पाटप्पा करावयास

रात्री आठनंतर वेळ असतोच.

असे प्रत्येकाने आपापल्या कामाचे व वेळेचे नियोजन केले तर व्यक्ती आयुष्यात खूप काही करू शकतो. आणि कष्ट न होता त्याचे समाधानही मिळते.

मोठमोठे उद्योगपती, पंतप्रधान, मंत्री यांच्या सत्ता व संपत्तीचा आपणाला हेवा वाटतो. पण त्यांचे कामाचे तास व झपाटा आपण पहात नाही. इंदिराजी गांधी पहाटे ४ वाजता उठून व्यायाम करून फायली पहात असत. तर श्री. शरदराव पवार दिवसभर एका गावावरून दुसरीकडे भिरभिरत असतात. रात्री जेवणानंतर दोन ते तीन तास ते कार्यालयीन फायली पाहतात. उद्योगपतींच्या तर किती कंपन्या, त्यात किती समस्या! परंतु या सर्वांचे व्यवस्थापन व नियोजन त्यांनी केलेले असते. कोणीही उद्योगपती पैसा आहे, आज काम नाही म्हणून बसलेला तुम्हाला दिसणार नाही. मी या सर्वांना जवळून पाहिले आहे. शंतनुराव किर्लोस्करांची गाडी ठरलेल्या वेळेला कंपनीत शिरणार म्हणजे शिरणार. ठराविक वेळच ते स्वत:करता राखून ठेवत. याच वेळेच्या व्यवस्थापनामुळे या सर्वांनी डोंगराएवढी कामे पार पाडली. आपणही ते करू शकतो.

मग थांबता कशाला? आजच सुरू करा आणि पहा काय होऊ शकते ते!


| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **डॉ. दीपक जयंत टिळक** |
| **पत्ता** | : | टिळकवाडा, नारायण पेठ, पुणे |
| **दूरध्वनी** | : | ०२०-२४४५९०५१ |
| **शैक्षणिक पात्रता** | : | एमबीए, पीएच.डी. |
| **व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या** | : | कुलगुरू, टिळक महाराष्ट्र अभिमत विद्यापीठ, पुणे<br>संपादक, दै. केसरी पुणे, विश्वस्त, केसरी मराठा ट्रस्ट<br>टिळक स्मारक ट्रस्ट, शिवाजी मंदिर ट्रस्ट<br>अध्यक्ष, वक्तृत्वोत्तेजक सभा, वास्तू स्मृती समिती<br>वैदिक संशोधन मंडळ |



**झलक**

# पुढाकार घ्या

## प्रभावी व्यक्तिमत्त्वाचे सूत्र

**संजीव परळीकर**

*आज आपण जे व्यवस्थापन शिकलो आहोत ते म्हणजे प्रामुख्याने वेळेचे व्यवस्थापन आहे. साधारणपणे टाइम मॅनेजमेंट म्हणजे लगेच घड्याळ डोळ्यासमोर येतं. पण आज जे आपण शिकलो ती संपूर्णपणे वेगळी टाइम मॅनेजमेंट आहे. येथे घड्याळाचा वापर फार कमी करायचा आहे. तुम्ही खुशाल तुमचे घड्याळ फेकून द्या.*

*आपण सर्वच जण घड्याळ्याच्या मागे धावत असतो. घड्याळ आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग झालेला आहे. परंतु ह्या प्रकरणात तुम्हाला असं लक्षात येईल की घड्याळाला महत्त्व नाही. याचा अर्थ असा नाही की आपण ताळतंत्र नसल्यासारखं वागायचं. मी तर उलट असं म्हणतो की ह्या प्रकरणातील सूचना जर तुम्ही अमलात आणल्यात तर तुम्ही बहुतेक कामं वेळच्या वेळेवर पार पाडाल.*

**२०० रु.** **पोस्टेज ३० रु.**



# मृणालिनी गडकरी

**गृहिणींनी आपली गृहकृत्ये झटपट आवरून वाचलेल्या वेळेचा उपयोग टी.व्ही.वर तेच निकृष्ट चित्रपट किंवा रटाळ, अर्थहीन मालिका बघण्यात घालवला तर त्याला वेळेचे व्यवस्थापन म्हणायचे का? म्हणजेच वेळेच्या व्यवस्थापनाचे उद्दिष्ट ही फार महत्त्वाची बाब ठरते**

आकाशवाणीच्या 'विविध भारती केंद्रा'वरून ज्या दिवशी व्यापारविषयक जाहिराती सुरू झाल्या त्या दिवशी एका बँकेची जाहिरात तिच्या वेगळेपणामुळे मला आवडली होती आणि म्हणूनच ती माझ्या लक्षातही राहिली. जाहिरात अशी होती- 'समय संपत्ती है। दोनोंके बचतके लिए ××××× बँक.' त्या विशिष्ट बँकेत देण्यात येणाऱ्या तत्पर सेवेकडे लक्ष वेधण्याबरोबरच ह्या जाहिरातीने श्रोत्यांना वेळेचे भान द्यायचा प्रयत्न केला होता. वेळ संपत्ती आहे हे तर खरेच पण पैशाप्रमाणे वेळेची बँकेत बचत करून, पैशाप्रमाणे आपल्या गरजेनुसार त्याचा वापर आपल्याला नाही करता येत आणि मग येथेच आपल्याला वेळेच्या व्यवस्थापनाची गरज भासते.

खरे पाहता वेळेचे व्यवस्थापन ही काही नवीन गोष्ट नाही. प्रत्येकजण कळत नकळत वेळेचे व्यवस्थापन करतच असतो. अगदी आठ-दहा वर्षांचे मूलसुद्धा खेळ, छंद, अभ्यास ह्यांना आपल्या आवडीप्रमाणे अग्रक्रम देऊन वेळेचे व्यवस्थापनच करत असते. हल्लीचे युग हे यांत्रिक व तांत्रिक होत चालले आहे. त्याला 'मॅनेजमेंटचे युग' म्हणता येईल. प्रत्येकजण काही ना काही मॅनेज करतच असतो. कुणी सासूला, कुणी सुनेला. कुणी 'बॉस'ला तर कुणी मनाला. ह्याचे धडे देणारी पुस्तके पण निघत आहेत. व्यवस्थापन-तज्ज्ञांनी वेळेच्या व्यवस्थापनाचे एक शास्त्रच बनवले आहे. ह्या शास्त्राचा आधार घेऊन कंपन्यातील किंवा सरकारी अधिकारी, मोठे व्यावसायिक, कारखानदार अलीकडे आपल्या वेळेचे व्यवस्थापन करत असल्याचे दिसते.

वेळेचे व्यवस्थापन-शास्त्र भले वेळ कसा वाचवायचा ह्याचे मार्गदर्शन करत असेल, पण वाचलेल्या वेळाचे काय करायचे हा खरा प्रश्न आहे. म्हणजेच वेळेच्या व्यवस्थापनाचे उद्दिष्ट काय? उच्चपदस्थ अधिकारी, व्यवस्थापक, कारखानदार आणि व्यावसायिक अशा वाचलेल्या वेळेचा उपयोग आपली कार्यक्षमता वाढविण्यासाठी, आपल्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी किंवा आपली शारीरिक क्षमता योग्यप्रकारे राखण्यासाठी करत असतील. पण सामान्य लोकांचे काय? गृहिणींनी आपली गृहकृत्ये झटपट आवरून वाचलेल्या वेळेचा उपयोग टी.व्ही.वर तेच निकृष्ट चित्रपट किंवा रटाळ, अर्थहीन मालिका बघण्यात घालवला तर त्याला वेळेचे व्यवस्थापन म्हणायचे का? म्हणजेच वेळेच्या व्यवस्थापनाचे उद्दिष्ट ही फार महत्त्वाची बाब ठरते.

माझ्या मते 'वेळेचे व्यवस्थापन' म्हणजे आपली कर्तव्यकर्मे तत्परतेने करून वाचलेल्या वेळेचा उपयोग आपली उद्दिष्टे साध्य करण्याकरिता करणे. जीवनशैली आणि वेळेचे व्यवस्थापन ह्या गोष्टी एकमेकींवर अवलंबून असतात. वेळेच्या व्यवस्थापनात जीवनशैलीचे दर्शन घडते तर जीवनशैलीवर व्यवस्थापन अवलंबून असते. रुग्णाला अग्रक्रम देणारा, तरीही सकाळचा वेळ आपल्या शारीरिक क्षमतेच्या वाढीसाठी व्यायामावर खर्च करणारा आणि संध्याकाळी मोकळा वेळ मिळाल्यावर आपल्या कुटुंबातील लोकांबरोबर एखादा आवडता छंद किंवा कला जोपासण्याचा प्रयत्न करणारा डॉक्टर आणि घरातल्या माणसांच्या वेळा न सांभाळता, टी.व्ही. बघणारी किंवा मैत्रिणींशी गप्पा मारणारी, वेळ पुरत नाही म्हणून वैतागून ओरडणारी गृहिणी ही ह्याची उत्तम उदाहरणे ठरू शकतील.

मग आता खरा प्रश्न आहे की मी माझ्या वेळेचे व्यवस्थापन

करते का? एक गृहिणी म्हणून मला वेळेच्या व्यवस्थापनाची खरोखरच गरज आहे का? आणि गरज असल्यास मी ते कसे करते? म्हणजेच ह्यामागचा माझा उद्देश काय आहे?

आयुष्यात मी आता अशा ठिकाणी आलेली आहे की पैशासाठी किंवा एखाद्या क्षेत्रात नाव मिळविण्यासाठी वेळेचे व्यवस्थापन करावे असे मला वाटत नाही. मात्र वेळेच्या व्यवस्थापनाची मला गरज आहे, ती केवळ निखळ आनंदासाठी. वाचन आणि माझ्यावर झालेले संस्कार ह्यांच्यामुळे माझी वृत्ती रसिक आस्वादकाची झाली आहे.

भाषांतर करणे हा माझा एक छंद आहे. त्यातून मला आनंद मिळतो. पण मी स्वत:ला व्यावसायिक भाषांतरकार होऊ देत नाही. कारण भाषांतरापलीकडे माझे एक जग आहे. ते जगदेखील मला अतिशय मोठा आनंद देते. त्या जगातही मला वावरावेसे वाटत असते. त्याकडे पाठ फिरवून फक्त भाषांतर करण्यात गुंतून राहणे मला शक्य नाही.

चूल आणि मूल ह्या बाबतीत मी परंपरावादी आहे. ह्या दोन गोष्टी स्वत:च सांभाळणे मला आवडते कारण त्यात सर्जनशीलतेचा आनंद भरपूर मिळतो. पण म्हणून स्त्रीने 'चूल आणि मूल' ह्यातच गुंतून रहावे असे मी कधीही म्हणणार नाही. कामाचे योग्य नियोजन केले तर ह्या कामातूनही आपल्या आवडीच्या कामाला भरपूर वेळ मिळतो.

माझ्या दैनंदिन जीवनात आनंद देणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत आणि त्यांच्यासाठी वेळ काढणे मला आवश्यक वाटते. अर्थात हे नेहमीच जमते असे नाही. काही कामे तातडीने पूर्ण करायची असतात, काही अत्यावश्यक असतात. तेव्हा बाकी सर्वच गोष्टी बाजूला ठेवाव्या लागतात. पण एरवी वाचन हे मला निखळ आनंद देते. मी लहानपणापासूनच पुस्तकवेडी आहे. पुस्तकाबरोबरच रोजची वर्तमानपत्रे- ह्यात एक बंगाली, एक मराठी व एक इंग्रजी- वाचणे हा माझा नित्यक्रम. वर्तमानपत्रे मला काळाबरोबर राहण्यास मदत करतात.

**वेळेचे भान असणे जसे आवश्यक आहे तसेच वेळेचे भान नसणेही. वेळेचे भान न राहणे बऱ्याच वेळा आनंददायक ठरते. सुडोकू, स्वयंपाक, वाचन, भाषांतर, संगीत, खेळ अशा अनेक गोष्टींत मला रस असल्याने वेळेचे नियोजन हे माझ्या दृष्टीने कठीणच! शिवाय वेळेच्या किती आहारी जायचे हाही प्रश्न आहेच. वेळेच्या काटेकोर व्यवस्थापनाने माणूस एकलकोंडा व आत्मकेंद्रित होण्याचा धोका असतोच.**

मी एक गृहिणी आहे. म्हणून स्वयंपाक हे माझे सर्वात वेळखाऊ काम. त्यातून आम्ही चांद्रसेनीय कायस्थ प्रभू. जात सांगण्याचे कारण म्हणजे आमच्या स्वयंपाकाची पद्धत अतिशय किचकट आणि वेळ खाणारी. कडवे वाल किंवा मूग ह्यांना मोड आणून ते सोलून त्याची आमटी म्हणजे बिरढे आम्हाला नेहमीच लागते. माशाचे पदार्थ करताना प्रत्येक मासा चिरण्याची व स्वच्छ करण्याची पद्धत वेगळी. प्रत्येक माशाला मसाला वेगळा. रोज दोन-तीन प्रकारचे ताजे मसाले वाटून घ्यावे लागतात. शिवाय मासा तळला तर तो आतून बाहेरून व्यवस्थित तळला गेला पाहिजे; पण त्याचा तुकडा (आम्ही त्याला तुकडी म्हणतो) मोडता कामा नये. वेगवेगळ्या पालेभाज्या नीट निवडून स्वच्छ धुवायला हव्यात. अशा स्वयंपाकात आधुनिक उपकरणांचा फारसा उपयोग होत नाही आणि अशी तंत्रे सांभाळून स्वयंपाक करणारी बाई मिळणे अशक्यच. पण स्वयंपाकात वेळ वाचवणे मला पसंत नाही. कारण अन्नावरच आपले आरोग्य, व्यक्तिमत्त्व आणि बुद्धी अवलंबून असते. पोळ्यांच्याऐवजी ब्रेड हा शॉर्टकटही मला पसंत नाही. सकसता आणि स्वच्छता ह्यांचा विचार केल्यास मऊ, लुसलुशीत पोळीला पर्याय नाही. आणि खरे पाहिले तर भारतीय आहार इतका चौरस आहे की आता ब्रिटिश सैन्याला तो आवर्जून दिला जातो.

टी.व्ही.वरचे माहितीप्रधान कार्यक्रम, अभ्यासपूर्ण चर्चा आणि जगावर खोल परिणाम करणाऱ्या बातम्या ह्यात मला रस वाटतो. उदाहरणार्थ, करण थापरांनी मुशर्रफ किंवा कसुरी ह्यांची घेतलेली मुलाखत मला खूप काही देऊन गेली. खेळ बघणे आणि अभिजात संगीत ऐकणे हा माझा आवडीचा छंद. खेळातील आणि संगीतातील तांत्रिक गोष्टींचे मला ज्ञान नाही पण अमेरिकन धावपटू जॉकी जॉयनरचे हरणाच्या गतीचे पदलालित्य, जॉन मॅकेन्रोचा आक्रस्ताळेपणा पण शैलीदार खेळ, त्याचा मुख्य प्रतिस्पर्धी बोर्गची शांत वृत्ती आणि खेळातलं कौशल्य, शोएब अख्तरच्या गोलंदाजीचा वेग, त्याच्या गोलंदाजीवर ऐटबाज फटके मारणारा सचिन किंवा पॉंटिंग, भारतीय आणि पाकिस्तानी हॉकीपटूंचा झोकदार खेळ, ब्राझीलचा कलात्मक फुटबॉल, किशोरी आमोणकरांचा भूप, अमजद अली खाँचा खानदानी मालकंस, पं. जसराजांची बिलासखानी तोडी, अमीर खाँचा मेघ, भीमसेन जोशींची आसावरी तोडी, कुमारांची आर्त निर्गुणी भजने, गुलाम अलींच्या गझला ह्या सर्वांचे मला विलक्षण आकर्षण आहे. खेळ संगीत ह्यात अजिबात अप्रामाणिकपणा नसतो. त्यामुळे ह्यातून मिळणारा आनंद शुद्ध असतो. तो हृदयालाच हात घालतो.

संगणकामुळे ज्ञान, माहिती, मनोरंजन ह्यांचे भांडारच खुले

झाले आहे. ते भांडार लुटण्यास माणसाला एक जन्म पुरा पडणार नाही. ह्यासाठी वेळ हवाच.

मला आणखी वेळ हवा असतो तो निवांतपणासाठी. निवांतपणी आपलाच आपल्याशी संवाद घडतो, भावनांचे विरेचन होते आणि कल्पनेला पंख फुटून सर्जनाची नवी नवी क्षितिजे खुली होतात.

मात्र असा वेळ मिळविण्यासाठी काही गोष्टी सोडाव्या लागतात. वायफळ गप्पा, टी.व्हीवरच्या रटाळ, काहीही न देणाऱ्या मालिका, पत्ते, भिशी, मंडळे ह्यांच्या वाटेला मी जात नाही. पण ह्या गोष्टी मिळत नाहीत म्हणून मला अजिबात वाईट वाटत नाही.

वेळेचे भान असणे जसे आवश्यक आहे तसेच वेळेचे भान नसणेही. वेळेचे भान न राहणे बऱ्याच वेळा आनंददायक ठरते. सुडोकू, स्वयंपाक, वाचन, भाषांतर, संगीत, खेळ अशा अनेक गोष्टींत मला रस असल्याने वेळेचे नियोजन हे माझ्या दृष्टीने कठीणच! शिवाय वेळेच्या किती आहारी जायचे हाही प्रश्न आहेच. वेळेच्या काटेकोर व्यवस्थापनाने माणूस एकलकोंडा व आत्मकेंद्रित होण्याचा धोका असतोच. एकसुरी आयुष्य मला तरी आवडणार नाही. दुसऱ्याच्या वेळेवर आक्रमण करणे मला आवडत नाही. पण मी लिहीत असताना किंवा इतर काही कामात असताना अनाहूतपणे मला कुणी भेटायला आल्यास 'ती घरात नाही' असा घरातील कुणाकडून निरोप सांगणे मला पटत नाही. वेळेचे व्यवस्थापन करावे पण ते संयमाने, सभ्यतेने. नियोजन नसणे हेही एकप्रकारे नियोजन असते.

तेव्हा माझ्यापुरते बोलायचे झाल्यास वेळेचे व्यवस्थापन हे शास्त्र असेलही पण माझ्या मते ती कलासुद्धा आहे. जॉन एल. स्पाइडिंगने म्हटल्याप्रमाणे, 'What we love to do, we find time to do.'


# काबुलीवाल्याची बंगाली बायको

**सुस्मिता बॅनर्जी अनु. मृणालिनी गडकरी**

**झलक**

*'मुलेच देशाचे भवितव्य होत,' असं आपण म्हणतो, पण ह्या देशातील अडाणी आणि स्वार्थी माणसं मुलांच्या भविष्याचा खेळखंडोबा करतात. ह्या देशाला कसलं आलंय भवितव्य!*

*इथं माणसाच्या जिण्याला काहीही किंमत नाही. मुलांचाही विचार कोणी करत नाही. म्हणूनच औषधपाण्याविना किंवा चुकीच्या उपचारांमुळे भावी पिढी पार बरबाद होते आहे. अफगाणिस्तान हळूहळू एका भीषण काळोखाकडे चाललाय. हे कसंही करून थांबवता येणार नाही का? कसं येणार? उपाय तर दिसत नाही. मनातलं सगळं मनातच राहतं. विचारांनासुद्धा खीळ बसते.*

*डॉक्टरांकडून परतताच सुटकेचा श्वास घेतला. मला तर बरं व्हायचंच नव्हतं! इथं असं खितपत पडण्यापेक्षा मरण परवडलं. ह्या देशात बायको मेली तर अतोनात दुःख होतं. कारण बराच पैसा देऊन बायको विकत घ्यावी लागते. एक विकत आणलेली बायको मेली तर दुसरी विकत आणावी लागते. म्हणजे नुकसानच नुकसान!*

*इथं बाई म्हणजे शय्यासोबतीण, स्वयंपाकीण आणि मुलं पैदा करणारं मशीन. थ्री इन वन. कुटुंबातल्या सर्वांचं हवं-नको तिनं पाह्यचं आणि दरवर्षी मुलाला जन्म द्यायचा. जर मूल झालं नाही तर नशिबी सवत ठरलेली. हा नियम बदलणं अशक्यच.*

**१००रु. पोस्टेज ३०रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# विवेक सबनीस



**जाणारे आणि वाचले जाणारे लिखाण', अशी एक व्याख्या केली जाते. पण लिहिणाऱ्याने घाईत असताना काहीही लिहू नये. कारण वाचणारा प्रत्येक वेळी घाईत वाचणारा असेलच असे नाही!**

'**प**त्रकाराची लेखणी हे शस्त्र आहे' किंवा 'पेन इज मायटियर दॅन अ स्वोर्ड' अशी वचने पत्रकारितेमध्ये येण्याआधीपासूनच माझ्या वाचण्यात किंवा ऐकण्यात येत होती. ती वाक्ये तेव्हाही फार बालिशपणाची वाटायची. पत्रकार किंवा झुंजार पत्रकार असला तर त्याच्या हाती असणारी लेखणी ही एखाद्या शस्त्रासारखी काम करते असा त्या वाक्याचा अर्थ होता.

लोकशाहीचा चौथा महत्त्वाचा स्तंभ 'वॉच डॉग' म्हणून पत्रकारितेकडे पाहिले जात असल्यामुळे त्यातील आक्रमकतेला लढवय्याचा ग्लोरियस मुलामा चढवण्याची पूर्वीपासूनच फॅशन होती, असे आजही मला वाटते ते त्यामुळेच. पण पत्रकारिता हा धर्म आहे हे न सांगताही ज्या स्वातंत्र्यपूर्व काळात त्याचे आचरण होत असे तेव्हाच त्याचे मोल हे नक्कीच मोठे होते. म्हणून देशाच्या स्वातंत्र्यासाठी जवळ आली असताना आजच्या पत्रकारितेचे आणि त्यामागील प्रेरणेचे संदर्भ खूप बदलले आहेत हेही विसरून चालणार नाहीत.

या पार्श्वभूमीवर जेव्हा मी दोन दशकांहून जास्त काळ करिअर म्हणून काम केलेल्या पत्रकारितेकडे पाहतो तेव्हा अनेक गोष्टी लख्खपणे जाणवतात. माझा लढा हा मर्यादित जागेशी, वेळेशी असण्यापेक्षा तो इतर अनावश्यक गोष्टींशीच जास्त झाला असे वाटते! आजच्या 'इन्स्टंट फूड'च्या जमान्यातल्या काहीशी निरर्थक, बटबटीत आणि ढोंगी वाटेल अशा वाढत चाललेल्या 'इन्स्टंट पत्रकारिते'कडे पाहिले की आपण पत्रकारितेपासूनच किती लांब गेलो आहोत याची सल अधिक बोचू लागते!

वास्तविक 'दर्पण' पासून सुरू झालेली मराठी पत्रकारिता ही आज दीडशे वर्षांपेक्षाही अधिक जुनी आहे. पण आजही अनेक बंधने, चुकीचे समज आणि कल्पकताहीन अशा शृंखलांमध्ये ती अधिकाधिक बद्ध होताना दिसते. याशिवाय ग्लॅमर आणि सेन्सेशन या नावाने त्यामध्ये जे अनुचित प्रकार वाढू लागले आहेत, ते पाहता ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू यांच्यापासून अनेकांनी चिंता व्यक्त केली आहे.

'इन्व्हेस्टिगेटिव्ह जर्नालिझम' किंवा 'स्कूप' शोधून काढणाऱ्या पत्रकारितेच्या नावाने (विशेषत: इंग्रजी पत्रकारितेत) काहीही लिहिले जाते ते पाहून हा प्रश्न अधिक ठळक बनतो. वास्तविक बदलत्या काळाबरोबर आजचा शहरी वाचक बदलत चालला आहे. किंबहुना तो अधिक जागरुक बनला आहे. म्हणूनच या वाचकाला जे उपयुक्त आहे तेच देणे हे पत्रकारितेचे पहिले उद्दिष्ट आहे, असे मला प्रकर्षाने जाणवते. पत्रकारितेच्या आधुनिक संकल्पनाही आता त्यादृष्टीने लवचिक आणि लोकाभिमुख असायला हव्यात.

मला माझा लढा हा मर्यादित जागेशी अथवा वेळेशी आहे असे वाटत नाही, तो यामुळेच. लढा आहे तो प्रामुख्याने एक पत्रकार म्हणून मला काय समजून घ्यावेसे वाटते आणि ते वाचकांपर्यंत कशा पद्धतीने पोहोचवावेसे वाटतेय याचा. मग तो मुंबईतील बॉम्बस्फोटासारखा दहशतवादी विषयाशी संबंध जोडणारा असो, किंवा मराठीत नवे दर्जेदार पुस्तक कोणते आले आहे याची अभिरुचिसंपन्न माहिती देणारा असो.

पत्रकार म्हणून माझे स्वत:चे परस्पेक्टिव्ह हे जसे व्यापक असायला हवे तसे ते नेमकेपणाने बोट ठेवून सांगणाऱ्या अभिव्यक्तीने परिपूर्ण असायला हवे. त्यासाठी वर उल्लेखलेल्या दोन्ही विषयांमध्ये

माझी जाण, अभ्यास आणि त्यातील अद्ययावत ज्ञान ही आधी वाढवणे आवश्यक आहे. पत्रकारितेसाठी लागणारी बहुश्रुतता त्यामध्ये असायलाच हवी असा माझा ठाम आग्रह आहे. तरच आपण लिहीत असणारा 'इश्यू' नेमका कोणता आहे आणि तो योग्य आहे का याबद्दलची जाणही वाढवणारा ठरेल.

इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांच्या आजच्या काळात बऱ्याच वेळा जे पडद्यावर दिसते त्यामध्ये हा 'इश्यू'च त्यांना समजला आहे किंवा नाही असा प्रश्न अनेकवेळा पडतो. अर्थात याला टीव्ही चॅनल्सप्रमाणे अनेक मोठी वृत्तपत्रेही अपवाद नाहीत. पत्रकार हा प्रत्येक विषयात जरी तज्ज्ञ नसला तरी हाताळत असणाऱ्या विषयातील तर्कसुसंगत दिशा आणि त्यातील नेमका 'इश्यू' किंवा विषयाची जाण ही त्याच्या लेखनातून जाणवलीच पाहिजे.

आपण लिहीत असणारी माहिती त्या 'इश्यू'शी सुसंगत आहे, याची ठाम खात्री पटल्यानंतर आपल्या बातमीचा 'फोकस' किंवा रोख हा नक्की ठरत असतो. आणि इथेच खरी वेळेची आणि जागेची कसरत सुरू होते!

'वृत्तपत्रीय लेखन म्हणजे घाईत लिहिले जाणारे आणि वाचले जाणारे लिखाण', अशी एक व्याख्या केली जाते. ती मर्यादित अर्थानेच खरी आहे. कारण लिहिणाऱ्याने घाईत असताना काहीही लिहू नये, हेही तेवढेच खरे आहे. कारण वाचणारा मात्र प्रत्येक वेळी घाईत वाचणारा असेलच असे नाही! म्हणूनच वाचणारा वाचक हा लिहिलेल्या विषयात रस घेणार अथवा जाणकार असेल असे गृहित धरून लिहिणे हे पत्रकाराचे पहिले उद्दिष्ट असायला हवे. माझे तरी तेच ध्येय आहे.

त्यामुळे जागा अथवा वेळ कितीही मर्यादित असो आपण बातमीमधून देत असणारी माहिती ही संपूर्ण बरोबर आहे का? आपण ज्या विषयावर लिहितो आहोत तो विषय सुसंगत आहे का? या दोन मुख्य प्रश्नांची उत्तरे आपल्याला आपल्याच माहितीशी आणि ज्ञानाशी ताडून पाहता येतात.

हे पाहिले की, मर्यादित जागेत आणि वेळेत लिहिणे हे कोणत्याही सर्जनशील लेखनाइतकेच अवघड आहे, हे लक्षात येते. त्यासाठी अर्थातच ही लढाई ही सतत यशस्वीपणाने लढणे हेच महत्त्वाचे आहे, आणि तोच खरा पत्रकारितेचा धर्म आहे. यातून आपण केवळ पत्रकार म्हणून स्वत: घडतो असे नाही, तर एकूण पत्रकारितेलाही समृद्ध करण्यात कळत न कळत हातभार लावत असतो.

माझ्या आत्तापर्यंतच्या अनुभवानुसार जेवढी कमी जागा तेवढे तुमचे लिखाण अधिक टोकदार होते. पत्रकारितेच्या दृष्टीने कमी जागा हे एकप्रकारे वरदानच आहे. कमीत कमी शब्दात जास्तीत जास्त अर्थवाही वाक्य असणारी बातमी नेमका धागा पकडून मांडणे हीच यातली खरी कसोटी असते. चांगल्या बातमीलाही कधीकधी दीडशे ते दोनशे शब्दांची मर्यादा जागेच्या अनुपलब्धतेमुळे घातली जाते, पण तो अडथळा न मानता लेखनातला नेमकेपणा त्यातही आणणे हीच खरी कसोटी आहे, असे मला मनापासून सांगावेसे वाटते.

आता मुद्दा शिल्लक राहतो तो मर्यादित वेळेचा. 'डेड लाइन'चा बाऊ हा जाणकार पत्रकाराने कधीच करू नये. कारण आवश्यक ते सर्व विषय आणि त्यासाठी त्याच्याकडे असणारा 'डेटा बेस' हा जास्तीत जास्त 'अपडेट' असायला हवा. बातमी रंजक तसेच सनसनाटी करण्यापेक्षाही ती आधी आवश्यक त्या माहितीने तपशीलाने परिपूर्ण असायला हवी. जाणकार वाचकांना तेच हवे असते. वाचलेल्या बातमीतून वाचकाचे समाधान होणे आवश्यक आहे.

थोडक्यात, पत्रकाराने हाती आलेला विषय कोणत्या दृष्टिकोनातून आणि कसा मांडला आहे हेच महत्त्वाचे असते. बातमीसाठी निवडलेला विषय, त्यातील कालानुरुप अनुकूल असणारा महत्त्वाचा 'इश्यू' आणि त्याला अनुरुप असावी त्याची प्रत्यक्ष मांडणी यातून एखाद्या कथेसारखे हे लिखाण सर्जनशील होऊ शकते. पत्रकारितेत म्हणून बातमीला 'स्टोरी' असा शब्द वापरला जातो. बातमी लिहिणे जर 'स्टोरी टेलिंग' असेल तर ते नाट्यपूर्णतेबरोबरच (कमी जागेमुळेच) अधिक अर्थवाही का असू नये?

त्याअर्थाने पत्रकारिता ही इतर वाङ्मयातील इतर लेखनाप्रमाणेच सर्जनशील करता येते, अशी माझी ठाम श्रद्धा आहे. किंबहुना, इतर लिखाणातले कल्पित किंवा फिक्शनल एलिमेंट हे यामध्ये प्रत्यक्ष वस्तुस्थिती म्हणून तुमच्यापुढे हात जोडून उभे असतात. हे वास्तव, तसेच त्यास अनुरूप असणारी माहिती आणि तिचे विश्लेषण एक पत्रकार किती अर्थपूर्णरित्या मांडू शकतो इथे माझ्या लेखनाचा खरा कस लागतो.

त्यासाठी अशा प्रत्येक घटनांकडे शोधक नजरेबरोबरच तर्कशुद्ध आणि त्यातील ज्वलंत अथवा सर्वात महत्त्वाचा इश्यू याची माहिती अगोदर करून घेणे महत्त्वाचे ठरते. स्वत:ची बहुश्रुतता त्याचे

**आपण लिहीत असणारी माहिती त्या 'इश्यू'शी सुसंगत आहे, याची ठाम खात्री पटल्यानंतर आपल्या बातमीचा 'फोकस' किंवा रोख हा नक्की ठरत असतो. आणि इथेच खरी वेळेची आणि जागेची कसरत सुरू होते!**

वाचन, त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी संपर्क आणि केलेली चर्चा तेवढीच महत्त्वाची आहे. माझं स्वत:चं हे 'होमवर्क' जितकं पक्कं, तितकी पत्रकारिताही अधिकाधिक परिपक्व असे हे समीकरण आहे. आपली स्वत:ची पत्रकारिता त्याअर्थाने किती परिपक्व आहे हे ज्याचे त्यानेच स्वत:ला विसरून तपासले पाहिजे.

अशा लिखाणातूनच विधायक पत्रकारितेचा जन्म हातो. सरकारी यंत्रणेवर टीका करणाऱ्या बातम्या लिहीत असताना ती टीका अनाठायी आहे का, किंबहुना त्यातील नेमका प्रश्न कोणता आहे, तसेच त्याला आपण किमान स्पर्श तरी करतो आहोत का, हेही तेवढंच महत्त्वाचं आहे. आपल्या लिखाणातून एकीकडे टीका करत असतानाच दुसरीकडे त्यावरील तेवढाच तर्कशुद्ध मार्ग दाखवायला हवा. किंवा तो प्रश्न सोडवण्यासाठी काय करायला हवे याचे तज्ज्ञांच्या मदतीने व्यवहार्य मार्गदर्शनही असायला हवे.

वृत्तपत्रातील जागा, वेळेचे बंधन या गोष्टी कायम राहणारच आहेत. त्या आपण गृहीतच धरायला हव्यात, पण या दोन्ही अडचणींमध्ये आपण जे काही लिहीत आहोत, त्याचे किमान हसे होणार नाही याची तरी खबरदारी जबाबदारीने लिहिणाऱ्या प्रत्येक पत्रकाराने घ्यायला हवी. मीही ती काळजी आतापर्यंत अधिकाधिक डोळ्यांत तेल घालून घेत आलेलो आहे.

त्यापेक्षाही आपली प्रत्येक नवी बातमी या निकषांच्या आधारे अधिकाधिक परिपूर्ण कशी होईल याकडेही मी माझा कटाक्ष ठेवला आहे. बायलाईनसह (स्वत:च्या नावाने) छापून आलेली आपली प्रत्येक बातमी ही वाचकांच्या काही काळ तरी लक्षात राहील. पण त्यापूर्वी ती बातमी त्याच्या उपयोगाची असेल, त्याच्या माहितीमध्ये नवी भर घालणारी असेल हे माझ्या दृष्टीने अधिक मोलाचे असते.

एक पत्रकार म्हणून जागेशी असणारा माझा लढा हा चालणार आहेच, पण त्यापेक्षाही नवनवे विषय आणि त्याची वाचकाला उपयुक्त ठरेल अशी माझी स्वत:ची अर्थवाही दृष्टिकोण ठेवणारी मांडणी हीच माझी खरी लढाई किंवा कसोटी राहील!

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **विवेक कृष्णराव सबनीस** |
| **जन्मतारीख** | : | २६ जुलै १९५७ |
| **शिक्षण** | : | एम.ए. मानसशास्त्र आणि बॅचलर इन कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम (BCJ) पदव्युतर अभ्यासक्रम पूर्ण |

* बीसीजे करताना मराठी पत्रकारितेमधील प्रतिष्ठेची समजली जाणारी अच्युतराव कोल्हटकर शिष्यवृत्ती मिळाली.
* अण्णासाहेब मगर स्पोर्टस फौंडेशनचा उत्कृष्ट पत्रकारितेचा पुरस्कार तसेच महाराष्ट्र पत्रकार फौंडेशनचाही पत्रकारितेतील कामगिरीबद्दलचा पुरस्कार मिळाला.
* 'द टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये १५ वर्षे तर 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये तीन वर्षे वृत्तसंकलनाचा अनुभव.
* साहित्य, संस्कृती, कला, नाट्य, सिनेमा, विज्ञान, पर्यावरण क्षेत्रातील लेखनावर भर.
* लेख व कविता लेखनास सुरुवात.


## विज्ञानविषयक पुस्तके

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.**

**वैज्ञानिक खेळणी**
डी. एस. इटोकर
५०रु.

**फक्त खेळण्यांसाठी**
डी. एस. इटोकर
७०रु.

**खेळणीच खेळणी**
डी. एस. इटोकर
६०रु.

**विज्ञान गमती**
डॉ. अरुण मांडे
५०रु.

# जीवनाचं अस्सल दर्शन घडवणाऱ्या सत्यकहाण्या

| | | |
|---|---|---|
| **डायरी ऑफ ॲन फ्रँक** : **ॲन फ्रँक** | अनु. मंगला निगुडकर | १७५ |
| **चीपर बाय दी डझन** : **फ्रँक बंकर गिलब्रेथ** | अनु. मंगला निगुडकर | १०० |
| **काळोखाची लेक** : **कॅथरीन दी जीजस** | अनु. सरिता पदकी | १५० |
| **ऑन द विंग्ज ऑफ ईगल्स** : **केन फोलेट** | अनु. ज्योत्स्ना लेले | २५० |
| **चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट** : : **जॅक कूपर** | अनु.सिंधू जोशी | १३० |
| **द ब्रेडविनर** : **डेबोरा एलीस** (जी.ए.कुलकर्णी स्मृती पुरस्कार २००३) | अनु. अपर्णा वेलणकर | १०० |
| **परवाना** : **डेबोरा एलीस** | अनु. अपर्णा वेलणकर | छपाई चालू |
| **शौझिया** : **डेबोरा एलीस** | अनु. अपर्णा वेलणकर | छपाई चालू |
| **नॉट विदाऊट माय डॉटर**: **बेट्टी मेहमूदी** | अनु. लीना सोहोनी | २०० |
| **साम्राज्य बुरख्यामागचे** : **कारमेन बिन लादेन** | अनु. अविनाश दर्प | छपाई चालू |
| **व्हाईट मुघल्स** : **विल्यम डॅलरिंपल** | अनु. सुधा नरवणे | ३५० |
| **काबुलीवाल्याची बंगाली बायको** : **सुस्मिता बॅनर्जी** (बंगाली) | अनु. मृणालिनी गडकरी | १०० |
| **ब्लास्फेमी** : **तेहमिना दुर्रानी** | अनु. भारती पांडे | १०० |
| **जिहाद** | हुसेन जमादार | २२० |
| **मयादा** -इराकची कन्या : **जीन सॅसन** | अनु. भारती पांडे | २५० |
| **परमवीरचक्र** (रणांगणावरील आपले महान योद्धे) : **मेजर जनरल इयान कारडोझो** | अनु. ज्योत्स्ना लेले | १८० |
| **स्वप्नाकडून सत्याकडे** (कल्पना चावलाची कहाणी) | माधुरी शानभाग | ४० |
| **फिटे अंधाराचे जाळे** | भालचंद्र करमरकर | १२० |
| **चाकाची खुर्ची** | नसीमा हुरजूक | १८० |
| **द जॉय ऑफ कॅन्सर** : अनुप कुमार | अनु. माधुरी शानभाग | १५० |
| **स्ट्रगलर्स** | मुक्ता चैतन्य | ९० |

**पोस्टेज प्रत्येकी ३०रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# गिरिजा कीर

## तेव्हा माझ्यासाठी काळ थांबलेला असतो

वेळ आणि व्यवस्थापन या दोन शब्दांनी नेहमी वटारलेल्या नजरेनं माझ्याकडे पाहिलं आहे. घड्याळाच्या काट्यावर लिहिणं किंवा कॅलेंडरवर लक्ष ठेवून लेखणी वेठीला धरणं माझ्या कल्पनेत बसूच शकत नाही.

जे अंतरातून उफाळून येतं, ('Spontaneous overflow of powerful feelings'), 'मी हे सांगितलंच पाहिजे' अशी मनोवस्था निर्माण होते, निर्माण झालेली अस्वस्थताही आनंद देऊन जाते आणि मग अंतरीचे 'स्व-भावे' बाहेर पडतं ते वेळेच्या भूमितीत कसं बसवता येईल? त्यातून साहित्याच्या संदर्भात तर पूर्णांशानं झोकूनच द्यायचं असतं. मी तर जेवण-खाण-झोप कोणतीच गोष्ट लेखनाच्या आड येऊ देत नाही. या बाबतीत मी स्वत:ला मुक्त ठेवलंय. शांताबाईंच्या (शेळके) शब्दात सांगायचं तर-

''मी मुक्त कलंदर चिरकालाचा पान्थ
ही अज्ञातातुनि चालत आलो वाट...''

मी केव्हा अन् किती वेळ लिहिते याला कसलंच वेळापत्रक नाही. कधी रात्री दहा ते दीड-दोन पर्यंत सलग लिहिते. कधी समंजसपणे 'लवकर निजे-'चा घोष करत साडेदहाला दिवा शांत करते. झोपते. डोळे उघडेच. मग समोरच्या दुधी काचेवरची फुलं फुलू फुलू फुलतात. मनभर हसतात. म्हणतात, 'वेडी की काय तू? अगबाई, शहाण्यांच्या जगात आपण जायचं नसतं कधीच!'

हळूहळू समोरच्या झाडाच्या फांद्या काचेवर आकृती कोरू लागतात; कधी कलावंताच्या हातानं तर कधी विरहिणीच्या व्यथित मनानं. मग मला उठावंच लागतं. दिवा लावते अन् झपाटल्यागत लिहीत सुटते. मनातले हुंकार शब्दरूप घेतात.

कधी दुपारचं ऊन आग ओकत असतं. माझ्या खिडकीनजीकच्या गुलमोहोर अंगांगातून पेटलेला असतो. ती लाल-किरमिजी फुलं मी विस्फारल्या डोळ्यांनी पहात राहते. माझ्या कथेवर गुलाबी रंग चढतो.

कधी धुंवाधार पाऊस कोसळत असतो. आकाशाचं पोट उसवत विजेची लकेर अंधाराला छेद देऊन जाते. हृदयाचा ठोका चुकतो. आयुष्यातलं एकाकीपण डोकं वर काढतं, टोकतं, कुरतडत राहतं. मग मला लिहावंच लागतं. इतक्या गतीनं, की पाच बोटांची शक्ती अपुरी पडते. केव्हातरी थांबते. शिणल्या देहानं घड्याळाकडे पाहते. पहाट उमलत असते.

'आभाळमाया' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी मी अवघ्या चौदा दिवसांत लिहिली. पण त्या आधी चौदा वर्षं ती माझ्या मनात रुंजी घालत होती. ते सगळं प्रकरणच सांगते ना!

'गाभाऱ्यातली माणसं' हे माझं व्यक्तिचित्रणांचं पुस्तक. ते पुस्तक रसिकांनी प्रचंड उचलून धरलं (१९७४). त्या पुस्तकावरून वाचक माझा उल्लेख प्रेमानं, 'गाभाऱ्यातली गिरिजा कीर' असा करायचे. त्या पुस्तकात एक व्यक्तिरेखा लिहायची राहून गेली, दादांची! दादा मुळी पानांत मावणारे नव्हतेच. किमान चारदा मी त्यांच्यावर लिहायला घेतलं, पण थांबले. किती लिहिलं तरी वाटायचं, हे पुरेसं नाही.

त्या पुस्तकभर दादा पसरलेले आहेत; पण त्यांचं असं स्वतंत्र व्यक्तिचित्रण नाही. दादा मला आभाळाएवढे वाटायचे. त्यांना चिमटीत कसं पकडायचं? शब्दांत कसं अडकवायचं? मी अस्वस्थ व्हायची.

त्याच सुमाराला माझा कथाकथनाचा कर्नाटक दौरा होता. बेळगावला बसमध्ये माझ्या शेजारी पारगावकर आले. त्यांनी विचारलं, ''सध्या काय लिहिताय?''

''काहीच नाही.''

''ते कसं शक्य आहे?''

''सध्या मी फार विस्कटलेय राजाभाऊ. गेले कित्येक दिवस माझ्या जीवनाचा पट मी उलगडते आहे. त्यात मी आहे आणि माझे दादा. आईवेगळ्या मला दादांनी कसं वाढवलं, घडवलं, कोणते संस्कार केले...' मी दादामय झाले होते. पूर्ण पाच तास अखंड बोलत होते- स्वत:शीच! मी- मी नव्हतेच. बस कोल्हापुरात शिरत होती आणि मी गप्प झाले.

''हे सगळं विलक्षण आहे हो! तुम्ही लिहाच. मराठी साहित्यात एक वेगळी भर पडेल.''

''ती पडेल की नाही मला ठाऊक नाही, पण कोणत्या फॉर्ममध्ये लिहावं ते मला कळेनासं झालंय.''

''तरी छापलीत?''

''गिरिजाबाई, एवढे चांगले वडील असू शकतात? मला नाही खरं वाटत... मला तुमचा खूप हेवा वाटला. तुम्ही किती भाग्यवान आहात! तुम्हाला दादांसारखे वडील मिळाले...'' त्या भरभरून पुस्तकावर बोलत राहिल्या.

ही चौदा वर्षं चौदा दिवसांची कहाणी. साठा उत्तरी सुफळ संपूर्ण झालेली. आता सांगा, या लेखनाला वेळेच्या कोणत्या त्रैराशिकात बसवू?

गेली आठ वर्षं मी जन्मठेपेच्या गुन्हेगारांवर लिहिते आहे. येरवडा जेलला जाऊन आले की माझं मन पिळवटल्यागत होतं. त्यांच्या भवितव्याच्या विचारानं मी सुन्न होऊन जाते. कुठल्या मायेच्या ओटीतली ही लेकरं; पण माझंच पोट उसवतं. तशाच स्थितीत लिहायला बसते. संपादकांनी मागवलंय का? दिवाळीची तारीख कोणती? वगैरे काहीही डोक्यात नसतं. दिसत असतो

**''मूड लागेल तिथं कल्पना लिहून ठेवते. कधी प्रवासात तर कधी चक्क झोपेतसुद्धा? झोपेत एखादं कथानक डोळ्यांपुढून सरकत जातं. मी धडपडत उठते. घाईघाईत प्रचंड वेगानं ओळी खरडते. कल्पना कशी सुचली ते एका कोपऱ्यात लिहून ठेवते. कधी सकाळी उठल्यावर सर्व आवरून झालं की माझ्या खुर्चीवर येऊन बसते आणि लिहीत जाते- लिहीतच सुटते.''**

राजाभाऊ चटकन म्हणाले, ''तुम्ही फॉर्मसाठी का अडता? लिहायला लागा. शब्द आपोआप फॉर्म शोधतील.''

आणि पूर्ण चौदा वर्षांनंतर एक आकृतिबंध माझ्या मनात तयार झाला. माझी मैत्रीण स्टेनो होती. मी म्हटलं, ''पुष्पे, दादांवर कधीचं लिहायचंय. डोक्यात सगळं तयार आहे. तू फक्त माझ्या स्पीडनं लिहून घे. मी माझ्याशीच बोलेन. तू मधे काही बोलू नकोस. तू तिथं नाहीस असंच समज?''

''मी अदृश्य स्वरूपात लिहून घेईन.'' ती हसून म्हणाली.

पुढे चौदा रात्री दहा ते दोन-तीन मी बोलत होते, ती लिहीत होती. साक्षीला फक्त दिवा. एका रात्री मात्र ती एकदम थांबली. म्हणाली, ''रमा, मी थांबते. मला पुढं लिहिणं शक्य नाही-'' तिच्या वहीचं पान आसवांनी चिंब झालं होतं.

'आभाळमाया'च्या दोन आवृत्त्या हातोहात संपल्या. मनाला तुडुंब आनंद देणाऱ्या प्रतिक्रिया आल्या. आकाशवाणीवर मी त्याचं क्रमश: वाचन केलं. त्याचा फॉर्म चरित्रात्मक कादंबरीचा झाला.

प्रकाशिकेनं कादंबरी मागितली होती. मी आधीच सांगितलं, 'लिहून झाल्याबरोबर पाठवून देते.' पण केव्हा लिहून होईल ते काय सांगू?

प्रकाशिकेची प्रतिक्रिया मोठी मजेदार होती. पुस्तक घेऊन त्या माझ्या घरी आल्या. म्हणाल्या, ''मला ही कादंबरी मुळीच आवडली नाही.''

येरवड्याचा प्रचंड दरवाजा. त्या मागे आयुष्य काढणारी ती तरुण मुलं. त्यांच्या डोळ्यांतले उदास भाव आणि 'माई'ची वाट बघणं. माझ्या जाण्यानं उजळलेले चेहरे, कधी हसणारे- कधी डोळे गाळणारे त्यांचे शब्द- 'माई, पुन्हा कधी याल?'

'आई, जगानं टाकलेले आम्ही. आम्हाला तुम्हीच आहात...'

माझं मन कागदांवर सांडत जातं.

मात्र एका बाबतीत मी वेळेचं गणित कटाक्षानं पाळते. संपादकांना/प्रकाशकांना दिलेला शब्द, (एखादा अपवाद वगळता) मी नेहमीच पाळलेला आहे. अमुक तारखेला लेखन पाठवते असं कबूल केल्यावर कोणत्याही परिस्थितीत ती तारीख चुकवत नाही. जमणार नसेल तर तसं आधीच स्पष्ट सांगते.

याचा अर्थ तारखेवर लक्ष ठेवून लेखनाची बैठक मांडते असा मात्र नाही. मूड लागेल तेव्हा, मूड लागेल तिथं कल्पना लिहून ठेवते. कधी प्रवासात तर कधी चक्क झोपेतसुद्धा? झोपेत एखादं कथानक डोळ्यांपुढून सरकत जातं. मी धडपडत उठते. घाईघाईत प्रचंड वेगानं ओळी खरडते. कल्पना कशी सुचली ते एका कोपऱ्यात लिहून ठेवते. कधी सकाळी उठल्यावर सर्व आवरून झालं की माझ्या खुर्चीवर येऊन बसते आणि लिहीत जाते- लिहीतच सुटते.

तेव्हा माझ्यासाठी काळ थांबलेला असतो. अंघोळ, जेवण, झोप कशाचंही मला भान नसतं. तेव्हा फक्त मी असते आणि माझ्या शब्दांचं जग. एखादी घटना, त्याचं बीज, त्याचे माझ्या

मनावर झालेले आघात-प्रत्याघात; त्यातूनच उगवतं एखादं सूर्यफूल! काहीतरी वेगळं- नवं, त्या क्षणाला जन्म घेणारं! तेव्हा मी, 'मी' नसतेच. मनात जी घुसळण झालेली असते, त्याचा मी उद्‌गार असते. मीच कथा असते आणि मीच व्यथा असते. मी स्वत:च एक पूर्ण अनुभव-रूप असते!

कधी कथानकाची नोंद डायरीत पडून असते. मग डायरी चाळताना एखादं कथानक मला हाकारतं. मी आठवत जाते. मनात एक पूर्ण चित्र तयार होतं. हाताला गती येते. कधी फक्त शेवटच डोळ्यांना दिसतो. मग मी शेवट लिहून ठेवते. नंतर सुरुवात. मग मधली कारागिरी, धागे जुळवणं- जोडणं.

कथा संपादकांना पाठवण्यापूर्वी पुन्हा वाचते. आता मी त्रयस्थ असते. कधी वाटतं, 'वा! मस्त जमून गेलीय कथा!' सगळा दिवस अंगावर कोवळं ऊन सांडत राहतं. कधी वाटतं, 'छे! हे काहीतरीच झालंय.' मग पुन्हा लिहिते. फाडते. पुन्हा... मग सारी रात्र अशीच. केव्हातरी मनाजोगं लिहून होतं. आता खिडकीतून डोकावणारा चंद्र मिश्किल हसत असतो. मी स्वत:शीच काहीतरी गुणगुणते. अन् पहाटेची गार झुळूक अंगावर घेत मस्त झोपी जाते.

संपादकांनी १० ऑगस्ट तारीख दिलेली असते. मी दचकून उठते. दिवा लावते. आज तर ३० जुलै. मोठा श्वास टाकून मी शांतपणे डोळे मिटते.

यासाठी मी वर्षभर लिहीतच असते. आठवड्याचा हप्ता देणं मला जमत नाही. पैसा, प्रसिद्धी यासाठी लिहीत सुटणं मला मान्य नाही. माझ्या इच्छेनुसार, मनाचं समाधान होईतो मी लिहिते. आणि वेळेवर लेखन पाठवून डायरीत नोंद ठेवते. (एवढं झाल्यावर हक्कानं मानधन मागते. कुणी मान्य करतात, कुणी कायमचा राग धरतात. प्रत्येकाला स्वातंत्र्य आहेच ना!)

हे वेळेचं तंत्र सांभाळण्यासाठी मी वर्षभराची लेखिका असते. माझा मूड जितका महत्त्वाचा तितकंच संपादकांचं वेळापत्रक! मी 'अनुराधा' मासिकाचं दहा वर्षं संपादन केलंय. त्यामुळे संपादनाची तारेवरची कसरत मला ठाऊक आहे.

आपलं नाव पहिल्या पानावर झळकावं म्हणून मुद्दाम उशिरा लेखन पाठवणं मला तत्त्व म्हणून मान्य नाही. शेवटी हे टीमवर्क आहे. तेव्हा संपादकांचा शब्द पाळणं हे मी कर्तव्यच समजते.

'तुम्ही मागाल ते मानधन देतो. तयार असेल ती कथा मला द्या' अशी गळ घालणारी मंडळीही भेटतात. त्याचप्रमाणे, अमक्या तमक्याकडे लेखन केलंत तर आमचा अंक बंद, असं 'पार्टी पॉलिटिक्स'ही असतं. मी अशा मंडळींपासून दूर राहते. लेखनासंदर्भातली संहिता मी पाळते. बाकी शब्दांच्या जगात आपण राजे असतो. लेखणीचं कौतुक सांभाळण्यासाठी मी सरकारी नोकरीही सोडली. मात्र संपादकांची वेळ सांभाळण्यासाठी स्वत:चं वेळापत्रक बदललं.

शेवटी एक गोष्ट खरी; संपादक/प्रकाशक आमचे शब्द शेकडो लोकांपर्यंत पोहोचवतात. 'आमच्या लेखिका' म्हणून गौरव करतात, 'आपण कुणी आहोत' हे सिद्ध करण्याची वाट मोकळी करून देतात. मग आमच्या मनाला बाळसं येतं. मान उंच होते.

मनामनांशी नातं जोडणाऱ्या शब्दवेड्यांना आणखी आनंद तो कोणता हवा असतो? त्यांचं आकाश, चंद्र-सूर्य-ताऱ्यांसह त्यांच्या अंगणात उतरलेलं असतं.


**नाव :** **गिरिजा कीर**

**पत्ता :** ५, झपूर्झा, साहित्य सहवास, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१
फोन ०२२-२६५९१०८४


**साहित्यविषयक कार्य :**

* एकूण ९५ पुस्तके प्रसिद्ध
* 'आभाळमाया', 'माझ्या आयुष्याची गोष्ट' हे आत्मचरित्रपर लिखाण विशेष गाजले.
* कथाकथनाचे स्वतंत्र २०००च्या वर देशात आणि परदेशात कार्यक्रम.
* आदिवासी, दलित, उपेक्षित स्त्रिया, मुले यांच्या जीवनावर संशोधन. यावर आधारित 'इथं दिवा लागायला हवा' या पुस्तकाला राज्यपुरस्कार.



# विनिता पिंपळखरे

**वेळ वेळीच सुरू होतो**
**वेळ वेळेवर संपतो.**
**वेळेचा विचार माणसाला**
**वेळीच करावा लागतो.**

वेळ कधीच मिळत नसतो
वेळ काढावा लागतो
मृत्यूकडून जगण्यासाठी
वेळ मागावा लागतो
वेळ वेळीच सुरू होतो
वेळ वेळेवर संपतो.
वेळेचा विचार माणसाला
वेळीच करावा लागतो.

असे कुण्या एका कवयित्रीने कुठेतरी केव्हातरी म्हटले आहे (बहुधा मीच.) जी व्यक्ती वेळेचं चांगलं नियोजन करू शकते ती नक्कीच यशस्वी होते. एका अति विशिष्ट ब्रॅण्डेड जमातीचे आपण प्रॉडक्ट असल्यामुळे वेळ आणि पैसा मॅनेज करणं हा आपला हातखंडा आहे, असा माझा स्वत:बद्दलचा (गैर) समज! एकाच वेळी दहा कामं अंगावर घेण्याची हौस आणि नव्वद कामं अशी की जी करण्याशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे काळ, काम आणि वेग ह्याचं गणित सतत सोडवणं ह्याला पर्यायच रहात नाही.

चाळीस एकांकिका, दहा दोन अंकी नाटकं, दोन कवितासंग्रह हजारच्या वर निवेदनाचे कार्यक्रम, आकाशवाणी, दूरदर्शन मालिका लेखन, अनेक कार्यक्रमांचे दिग्दर्शन एवढी पूर्णवेळ सांस्कृतिक चळवळ (वळवळ!) म्हणजे एक पूर्णवेळ काम. बँकेची पूर्णवेळ नोकरी (लोकांना वाटतं बँकेत पगार खूप आणि काम कमी. अशा लोकांना १ तारखेला पेन्शन पेमेंट करायला कॅश काउंटरवर बसवलं पाहिजे.) एक पूर्णवेळ नवरा (इतरांच्या मते खूपच समजूतदार असलेला. शिवाय एकांकिका, नाटकं वगैरे लिहिणाऱ्या लेखिकेचा नवरा. बिच्चारा!) एक पूर्णवेळ छोकरी (वय वर्ष सहा. सगळा वेळ आणि लक्ष वेधून घेणारी, सॉलिड डिमांडिंग) शिवाय घरसंसार, पै पाहुणा, आला गेला, सणवार... बाप रे! एकाच वेळी पाचसहा ट्रॅकवर काम करावं लागतं. स्वत:ला proactive ठेवलं तर परिस्थितीवर नियंत्रण राहतं. reactive व्हावं लागलं तर फक्त समोर येणारा बॉल प्लेड करत राहणं एवढंच हातात उरतं. शिवाय लेखिकेच्या घरात 'आज किनई कवितांची कोशिंबिर आणि एकांकिकेची बिर्याणी आहे जेवायला' असं म्हणून भागत नाही. त्यामुळे Change of work is rest हेच तत्त्व अंगिकारावं लागतं.

'तुला काय २४ ऐवजी ४८ तास मिळतात का ग?' असा कुठूनतरी प्रश्न येतो. तेव्हा मी म्हणते, करता येतात. २४ चे ४८ तास करता येतात. करावे लागतात. पण त्यासाठी बऱ्याच गोष्टींना फाटा द्यावा लागतो. कामाचा उत्साह कायम टिकवावा लागतो. दूरदर्शन मालिका लिहीत होते तेव्हा पहाटे साडेतीन वाजता उठून लिहीत होते. आकाशवाणीवरची 'गुडमॉर्निंग विको', पुढच्या दोन महिन्यांचे Episode आधी तयार करून ठेवते. (लिहून झालेलं नसेल तर ह्रदयावर अनेक टनाचा दगड ठेवलाय असं टेन्शन येतं. काही वेळा दूरदर्शन मालिका लिहिताना ह्रदयावर दगड ठेवून लिहावी लागते ती गोष्ट वेगळी!)

घरातून बाहेर पडतानाची मी नेहमीच फार विनोदी असते. सतत कुठली ना कुठली वेळ गाठण्याच्या मागे असलेली. कट टू कट बँकेत पोहोचते. नाटकाचा प्रयोग किंवा कार्यक्रम असेल तर मी पोहोचल्यावर तिसरी बेल होते आणि क्षणात कार्यक्रम चालू होतो. एका विश्वातून क्षणार्धात दुसऱ्या विश्वात जाण्याची सवय.

सगळे कंपार्टमेंट वॉटर टाइट. त्यामुळे त्या क्षणाला जे काम हातात असेल त्यातच पूर्ण एकाग्रता होते. ती एक आपोआप लागलेली सवय.

अगदी मिनिटामिनिटाचं गणित आखलेलं नसतं. तरी अमुक एक काम करायचं असं मनात असतं. मग फोन न करता आलेली व्यक्ती नकोशी वाटते. शेजारणीशी जाता येता हसताही येत नाही. ती दोन वाक्यं बोलली तर वेळ जाईल ह्या भीतीनं (असा खत्रूडपणा हा त्या वेळेच्या नियोजनाचा By product आहे.)

भूतकाळात रमण्यात जास्त वेळ घालवू नये. स्वप्न बघण्यातही वेळ घालवू नये असं म्हणतात. हातात आलेला क्षण चांगला जगावा म्हणजे भूतकाळही चांगला होईल आणि भविष्यकाळही हे पूर्णपणे मनात बिंबलेलं. आपण आपल्या क्षमतेच्या फक्त दहा टक्के कार्यक्षमता वापरत असतो, नव्वद टक्के आपल्याबरोबर असते ती आपण वाया घालवतो. ती आपल्याबरोबर जळून जाते तास तालीम तीन महिने करून प्रयोग सादर होत असे. नाटक छान मुरत असे. पण आता आयुष्याची गती लक्षात घेता, मर्यादित वेळेत नेमक्या प्रयत्नाने कलाकृती साकारण्याचं कसब कमवावंच लागलं. त्यात थोडा फायदा असाही झाला की थोड्याच वेळात नेमकेपणानं कलाकारही शिकले. त्यांना स्वत:लाही त्यात प्रयत्न करावा लागला. त्यांचा आत्मविश्वासही पटकन वाढला.

वेळेच्या व्यवस्थापनामध्ये वेग हा खूपच महत्त्वपूर्ण भाग आहे. सुदैवानं तो लाभला आहे. एखादी ओळ जिथे लिहायची सोडली, तिथूनच पुढे चार दिवसांची गॅप केली तरी मागचं न वाचता संगणकाची फाईल ओपन व्हावी तसं सगळं लक्षात येऊन पुढे लिहिता येतं. बँकेच्या अर्ध्या तासाच्या लंचटाइममध्ये दहा मिनिटांत डबा खाऊन उरलेल्या वीस मिनिटांत एकदोन सीन लिहून मोकळी होते. लोकांना म्हणे, लेखनासाठी हिलस्टेशनवर जावं लागतं. म्हणूनच सध्या माझी बदली लोणावळ्याला झाली आहे.

**जगणं म्हणजे काय नुसतंच वेळ घालवणं किंवा नियोजनानं वेळ वापरून काढणं, त्याची उस्फूर्तता हरवली तर जगण्यातली सगळी मजाच गेली. काही क्षणांना मजेत लांबवते, त्या क्षणात सुखानं रेंगाळते. ‘Time please’ म्हणते.**

हे मनोमन पटलेलं. आणि लहानपणापासूनच, ‘काम करावं, भरपूर करावं. काम केल्यानं माणूस मरत नाही. आजपर्यंत एकही माणूस काम करून मेल्याचं ऐकिवात नाही’ असं बाळकडू बाबांनी दिलेलं. ह्या साऱ्याचा हा एकत्रित परिणाम असावा.

एखादा कार्यक्रम बसवत असेन, एखाद्या ऑफिसचा किंवा कंपनीचा तर कलाकारांनी अत्यंत वेळेत यायला पाहिजे हा माझा आग्रह. प्रत्येक उशीर होणाऱ्या मिनिटाला मी दहा रुपये दंड करेन असं मी सांगते. अर्थात कामाच्या वेळेत लोक आवर्जून वेळेत प्रॅक्टिसला येतातच. रोज एकदोन तास प्रॅक्टिस करण्यापेक्षा सलगच आठनऊ तास प्रॅक्टिस सुट्टीच्या दिवशी केली तर जाण्यायेण्याचा वेळ वाचतो व सलग तालमीमुळे नाटकही भराभर बसते असा अनुभव. सगळ्यांची निवांत वेळ कोणती? ह्यातूनच शनिवार रात्रीच्या तालमीची कल्पना पुढे आली. रात्री दहा ते सकाळी सहा (दूधवाल्याबरोबरच घरी जायचं असं आम्ही म्हणतो.) नाटकाच्या तालमीचंसुद्धा चित्रपटाच्या शूटिंगसारखं शेड्यूल करतो. अमुक एका वेळी सीन ची प्रॅक्टिस त्यावेळी फक्त त्याच सीन मधल्या कलाकारांनी यायचं. पूर्वीच्या काळात हौशी नाट्यसंस्थांत रोज दोन गेले दहा महिने अप-डाऊन करत आहे. प्रवासात चार तास जातात (आणणार कुठून?) लोकलमध्ये वाचता येईल, लिहिता येईल असा सल्ला लोक देतात. (त्यांनी कधीच लोकलनी प्रवास केलेला नसतो. लेडीज डब्यातला कलकलाट, टेकल्यासारखं बसणं किंवा अर्ध्या पायावर उभं राहून प्रवास करणं ही काय चीज आहे, ते फक्त लोकलचे प्रवासीच जाणू शकतात.)

सतत काहीतरी करण्याची उर्मी. प्रचंड उत्साह आणि हार न मानण्याची वृत्ती, ह्यातून एक नवीन वेळापत्रक तयार केलं. ‘दर्द का हदसे बाहर बढना है दवा हो जाना...’

जगणं म्हणजे काय नुसतंच वेळ घालवणं किंवा नियोजनानं वेळ वापरून काढणं, त्याची उस्फूर्तता हरवली तर जगण्यातली सगळी मजाच गेली. काही क्षणांना मजेत लांबवते, त्या क्षणात सुखानं रेंगाळते. ‘Time please’ म्हणते.

‘एवढे सगळे उपद्व्याप करून तू नोकरीसाठी पुणे-लोणावळा अप-डाऊन करतेस?’ भुवया ताणून प्रश्न येतो. ‘How do you manage?’ मी फक्त हसते. म्हणते, ‘Its very easy. I just mismanage!.’

**विनिता पिंपळखरे**
डी-११, पूजा हाईट्स,८७,
गांधीभवन रोड, कोथरूड, पुणे-४११०३८
फोन- २५३८१८४७, मोबाईल ९८२२३१४३२०



# सुरेश वसंत नाईक

**न्यायाधीशांचे वेळेच्या नियंत्रणाबाबतचे काम सर्कसच्या मॅनेजरसारखे असते. सर्कसच्या मॅनेजरप्रमाणे न्यायाधीशाला सुद्धा स्वतःप्रमाणेच कर्मचारी, वकील व पक्षकार ह्या सर्वांवरतीच वेळेचे बंधन लादणे भाग असते.**

वेळेच्या व्यवस्थापनाच्या प्रश्नाकडे मी न्यायसंस्थेचा एक घटक जिल्हा न्यायाधीश (निवृत्त) ह्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. अर्थात् न्यायसंस्था व वेळेचे व्यवस्थापन हा मुळात विरोधाभास आहे अशी सर्वसामान्यांची कल्पना आहे. न्यायसंस्था व वेळेचे व्यवस्थापन हा लोकांच्या हास्याचा व टीकेचा विषय झाला आहे. किंबहुना न्यायसंस्थेला काही वेळेचे भान असते हे न्यायसंस्थेच्या अधिकाऱ्यांनाही माहीत नसावे, असा लोकांचा समज आहे. रेंगाळणे म्हटले की त्याची सांगड दोन गोष्टींशी असते. पहिली म्हणजे शाळेत नाखुषीने जाणारी मुले व न्यायालयातील खटले. त्यात शाळेत जाणाऱ्या मुलांच्या रेंगाळण्याचे निदान शाळा सुटेइतक्या तरी वेळेचे बंधन असते. न्यायालयातील खटल्यांना तेवढेही बंधन नसते. तोंडाळ बाईच्या बडबडीप्रमाणे खटले हे कायम चालूच असतात असेच लोकांना वाटते. अर्थात् जनमानसात असे न्यायसंस्थेबद्दल मत व्हावे अशीच परिस्थिती दिसते. असे म्हटले जाते की नवऱ्याने बायको ताब्यात मिळविण्यासाठी जर कब्जा दाखल केला तर त्याचा निकाल लागताना नातवाला आजीचा ताबा मिळण्यांत लागतो. अजूनही अनेक न्यायालयांत शंभर वर्षांहूनही जास्त जुने झालेले दावे रेंगाळलेले आहेत. तर बिहारसारख्या राज्यात गुन्ह्यास सांगितलेली शिक्षेची कालमर्यादा उलटून गेली तरी सुनावणीला सुरुवातही न झालेले असंख्य खटले पडून आहेत. बाबरी मशिदीच्या जमिनीचा वाद, चारा घोटाळा प्रकरण ह्यासारखे अनेक महत्त्वाचे खटले हे अखंड चालतच राहणार असल्याची जाणीव लोकांत आहे. न्यायसंस्थेला वेळेचे काहीही बंधन नसल्याची ही नमुन्यादाखल काही उदाहरणे आहेत. आपल्या बहुतेक सर्व देवता गानप्रिय आहेत. त्या वादी व संवादी सुरांच्या जोडीने अनेकविध राग आळवत असतात. न्यायदेवता सुद्धा वादी व प्रतिवादी ह्या सुराअसुरांच्या मदतीने फक्त विलंबित ख्याल आळवीत असावीत असे वाटते. निदान तिला न्यायप्रक्रियेत होणाऱ्या विलंबाचा तरी खयाल असावा ही अपेक्षा.

विधिमंडळाने काही कायदे करून निदान न्यायालयात किती वेळेत दावा प्रकरण दाखल करावे ह्याला काही निश्चित मर्यादा घातलेली आहे. भारतीय कालमर्यादेचा कायदा (इंडियन लिमिटेशन ॲक्ट) असा कायदा करून ठराविक मुदतीनंतर आपणावरती काहीही अन्याय झाला तरी दिवाणी स्वरूपाचा दावा दाखल करण्यास मनाई आहे. अशीच थोडीफार कालमर्यादा क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्येही काही फौजदारी खटल्यात घातलेली आहे. त्याशिवाय एखाद्या निकालाविरुद्ध पुनर्वाद किंवा अपील वगैरे करणे असेल तरीसुद्धा त्यास कालमर्यादेचे बंधन घातले आहे. तेव्हा न्यायालयात एखादे प्रकरण दाखल करणे असेल तर त्यासाठी वेळेचे योग्य असे व्यवस्थापन केले आहे.

परंतु एखादे प्रकरण न्यायालयाचे चरकात घातल्यानंतर मात्र त्याचा निकाल केव्हा लागेल ह्याबद्दल मात्र अनेक प्रयत्न करूनही काहीही कालमर्यादा सांगता येत नाही. मात्र वेळेच्या व्यवस्थापनाचा प्रश्न मात्र निकालात मिळाला आहे असे वाटते. दहा वर्षांपूर्वी एका उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीने सांगितले होते की सर्वोच्च न्यायालयात इतके खटले तुंबले आहेत की यापुढे एकही खटला दाखल करून घेतला नाही व रेंगाळलेलेच खटले निकाली काढायचे ठरविले तर सर्वोच्च न्यायालयाला पंचेचाळीस वर्षे लागतील. हे दहा वर्षांपूर्वी

झाले तर मग आत्ताचे काय! परवा जो अहवाल प्रसिद्ध झाला त्यानुसार एकूण तीन कोटी प्रकरणे न्यायालयात रेंगाळलेली आहेत. यावरूनच वेळेचे व्यवस्थापन आणि न्यायालये ह्यांचा संबंध लक्षात यावा.

अर्थात ह्या न्यायालयीन प्रक्रियेला वेळ लागू नये असे वरिष्ठ न्यायालयातील अधिकाऱ्यांना निश्चित वाटते; पण 'अधिक धान्य पिकवा' असे पोस्टर्स लावून किंवा जाहिरात करून जसा दुष्काळ हटत नसतो तसेच ह्या रेंगाळणाऱ्या प्रकरणांचे होते.

मग प्रश्न पडतो की ह्या न्यायालयातल्या प्रकरणांना वेळेचे व्यवस्थापनाचे नियम लावताच येणार नाहीत का? वेळेचे व्यवस्थापन ही संकल्पना औद्योगिक क्षेत्रात जिथे उत्पादनाचा संबंध येतो तेथे काटेकोरपणे लावता येणे शक्य आहे. अमेरिकेत पर्ट थेअरी म्हणून प्रकाशात आली, पण हे न्यायसंस्थेला लागू पडणार नाही. ह्याचे मुख्य कारण ही न्यायव्यवस्था ज्या व्यक्तींवरती अवलंबून आहे तर त्यास प्रथम स्वत:, आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांना, पक्षकारांना तसेच वकिलांना सुद्धा वेळेचे बंधन पाळणे भाग पाडावे लागेल. हे करताना त्यास इतरांची अप्रीती ओढवून घ्यावी लागते. त्यामुळेच हे काम सहसा न्यायाधीश टाळतात. उच्च न्यायालयाने जरी न्यायालयाच्या कामकाजाची वेळ ११ वाजता सुरू होईल असे ठरविले तरी ह्याच वेळेवर किती न्यायालयांचे काम सुरू झालेले आढळते? वेळेचे व्यवस्थापन करण्यासाठी आपल्या अंगातील व इतरांचे अंगात मुरलेला आळशीपणा, कामे दिरंगाईने करण्याची सवय कडकपणे दूर करणे जरूर आहे. जो न्यायाधीश होणाऱ्या अप्रीतीला पत्करूनसुद्धा कडकपणे धोरण राबवेल त्यालाच वेळेचे व्यवस्थापन करता येईल.

वेळेच्या व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून न्यायाधीशांकडे पाहिले तर त्यांचे ह्या वेळेच्या नियंत्रणाबाबतचे काम सर्कसच्या मॅनेजरसारखे असते. सर्कसच्या मॅनेजरला फक्त स्वत:वर वेळेचे नियंत्रण असून

**आपल्याकडे अंती सत्याचाच जय होतो असे म्हटले जाते; पण असा न्याय देताना न्याय मागणाऱ्याचाच अंत होत नाही ना हे पाहिले पाहिजे. मात्र फार घाईघाईने दिलेला निर्णय ह्या अन्यायाचा असू शकतो हेही लक्षात ठेवून ह्या दोन्ही विचारांची तारेची कसरत करणे जरूर आहे.**

भागत नाही. त्याला सर्कशीतील जनावरे, कर्मचारी व प्रेक्षक ह्या सर्वांवरच वेळेचे नियंत्रण लादावे लागते. न्यायाधीशाला सुद्धा स्वत:प्रमाणेच कर्मचारी, वकील व पक्षकार ह्या सर्वांवरतीच वेळेचे बंधन लादणे भाग असते. 'यथा राजा तथा प्रजा' म्हणतात, तसे 'जसे न्यायाधीश तसे त्यांचे न्यायालय' असते. न्यायालयाची सुरू होण्याची सरकारी वेळ जरी ११ वाजता असली तरी कित्येक न्यायाधीश ह्या वेळेत कधीही न्यायालयात हजर नसतात. ते कसली शिस्त लावू शकतील? कित्येक ठिकाणी खुद्द न्यायाधीश महाशयच मुळी बारा-साडेबाराचे सुमारास न्यायालयात येतात, तर मग वकील एकच्या सुमारास. मग दुपारी केव्हातरी थोडंफार काम झाले की चहाची सुट्टी. नंतर न्यायदरबार भरेलच असे नसते.

मी माझ्यावर वेळेचे नियंत्रण अगदी काटेकोरपणे लावून घेतले होते. न्यायालयात ठरलेल्या वेळेपेक्षा एक मिनिटही कधी उशीर होणार नाही हे ठरवून तसे वागू लागलो. काही दिवसांनंतर बऱ्याच वकिलांची तक्रार आली की मी जरा उशीरा कामकाम सुरू करावे. त्यांना सकाळी धड जेवूनही येता येत नाही. माझ्याप्रमाणे अनेक न्यायाधीश वेळ गाठण्यासाठी सकाळचे जेवण न घेताही कित्येकदा न्यायालयात हजर असतात हे त्यांना पटवून दिले. वेळेवर हजर झाल्यानंतर मग ठराविक वेळेत किती काम होईल ह्याचा अंदाज घेऊन ज्यांची कामे वेळेअभावी किंवा अन्य कारणांनी घेता येणार नाही त्यांना ताबडतोब सोयीच्या तारखा देऊन मोकळे

त्या समाजास कोणतीही गोष्ट वेळेवर न करणे, घेतलेल्या कामात कुचराई किंवा दिरंगाई करणे ह्या गोष्टी हाडीमांसी खिळल्या आहेत. तसा समाजाचा स्वभावच बनला आहे. नानी पालखीवाला यांनी 'वुई द पीपल' ह्या पुस्तकात ह्याबद्दल फार मार्मिक शब्दांत विवेचन केले आहे. ते म्हणतात, कोणतीही दिरंगाई न करता आपण आपल्या पंचवार्षिक योजना जर वेळच्या वेळी पूर्ण केल्या असत्या तर भारताचे हजारो कोटी रुपये वाया गेले नसते. ते म्हणतात, हिंदी भाषेत काल व उद्यासाठी कल हा एकच शब्द आहे. त्यावरूनच आपण काळ ह्या संज्ञेशी किती जागरूक आहोत ते लक्षात येते. सरकार मग ते भारत सरकार असो किंवा महाराष्ट्र सरकार, बरीच प्रकरणे दिरंगाईमुळे नुसती पडून आहेत व यदाकदाचित् एखाद्या लवादाने किंवा कमिशनने काही निर्णय दिलाच तर त्यावर कोणताही निर्णय न होता ते धूळ खात पडून आहेत.

दुसरे असे की न्यायालयात एक न्यायाधीश अंदाजे किती प्रकरणाचा निकाल लावू शकेल तितकीच प्रकरणे त्याच्याकडे सोपवावयास हवी. हल्ली प्रत्येक न्यायाधीश त्याच्या न्यायालयात दाखल झालेल्या असंख्य प्रकरणांमुळे अत्यंत जेरीस आलेला असतो. तेव्हा न्यायालयात प्रविष्ट होणाऱ्या प्रकरणांच्या संख्येच्या प्रमाणातच न्यायाधीश नेमले गेल्यास न्यायाधीशांना वेळेचे व्यवस्थापन करणे सोयीचे जाईल.

एखाद्या न्यायाधीशाने जर वेळेचे व्यवस्थापन करावयाचे ठरवले

करणे हेही वेळेच्या व्यवस्थापनाचे दृष्टीने महत्त्वाचे असल्याने तसे करीत असे. त्यानंतर जी कामे चालणार असतील त्यातील दोन्ही बाजूस त्या-त्या प्रकरणाबद्दल विचारून अंदाजे किती वेळ लागेल ह्याचा अंदाज घेत असे. जे मुद्दे उभयता मान्य असतील त्याबद्दल विनाकारण उलटतपासणीसाठी वेळ वाचत असे. वेळेचा दुसरा अपव्यय टाळण्यासाठी लांबलचक चालणाऱ्या वकीलांच्या युक्तिवादावर बंधन घालणे जरूर होते. त्यासाठी त्यांचे भाषणाचे सुरुवातीसच ते कोणता मुद्दा विशद करणार असल्याचे विचारून घेत असे व तो मुद्दा लक्षात आल्यावर तो आपल्याला कळला असेल असे सांगितले, तर मग त्यांची भाषणे थोडक्यात आटोपली जाऊ लागून बराच वेळ वाचू लागला. अशा तऱ्हेने बराचशा वाया जाणाऱ्या वेळेवर नियंत्रण ठेवता येणे शक्य होऊ लागले. शक्यतो खटल्याचे निकाल ठरलेल्या वेळेवर देण्याने निकालासाठी प्रकरणे रेंगाळणे होत नसे.

न्यायालयातील कामकाज वेळेचे व्यवस्थापनाखाली आणण्यासाठी सतत वेळेबद्दल जागरू रहावे लागणे जरूर आहे. म्हणून ज्या ज्या न्यायालयीन प्रक्रियेत विलंब लागतो त्याकडे लक्ष दिले तर तसा विलंब टाळता येतो. न्यायालयीन प्रक्रियेस विलंब लागून न्याय देणे जर फार विलंबाने होऊ लागले तर न्यायच दिला जात नाही अशी म्हण आहे. 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाइड' तेव्हा न्यायालयीन निर्णय शक्यतो लवकर देणे जरूर आहे, ह्याचे सतत भान ठेवणे आवश्यक आहे.

आपल्याकडे अंती सत्याचाच जय होतो असे म्हटले जाते; पण असा न्याय देताना न्याय मागणाऱ्याचाच अंत होत नाही ना हे पाहिले पाहिजे. मात्र फार घाईघाईने दिलेला निर्णय हा अन्यायाचा असू शकतो हेही लक्षात ठेवून ह्या दोन्ही विचारांची तारेची कसरत करणे जरूर आहे.

न्यायाधीश म्हणून केलेल्या कामाचे व्यवस्थापन हे फक्त न्यायालयातील प्रकरणाशीच संबंधीत राहता माझ्या दैनंदिन आयुष्यावर पण त्याचा परिणाम होऊ लागला. घरातील इतर सर्व व्यवहारातही वेळेचे व्यवस्थापन आपोआप होऊ लागले. सर्व दैनंदिन जीवनाला कडक शिस्त लागू लागली. खाणे-पिणे-जेवणे-निजणे इतर सर्व कार्यक्रम ठराविक वेळेतच होऊ लागले. अर्थात् ही शिस्त सहज अंगवळणी पडली तरी घरातील इतरांवरही विशेषत: बायकोवर त्याचे फार बंधन पडू लागले. त्यामुळे घरातील सर्वच लोकांना हे व्यवस्थापन बऱ्याच प्रमाणात त्रासदायक वाटू लागत असे व त्यावरून किरकोळ कुरबुरी होणे अशक्य नव्हते.

आता ह्या निवृत्त जीवनात वेळेच्या व्यवस्थापनाची सवय अंगवळणी पडल्यामुळे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवू लागली आहे, की माझे जीवन हा माझ्या वैयक्तिक वेळेच्या व्यवस्थापनाचा विषय नसून तो परमेश्वराच्या वेळेच्या व्यवस्थापनाचा एक अंश आहे व माझी जीवनयात्रा त्याच्या वेळेच्या व्यवस्थापनाप्रमाणे चालू आहे. जीवनाच्या अगदी सुरुवातीपासूनच ते शेवटच्या श्वासापर्यंत प्रत्येक क्रिया ही त्याने ठरविलेल्या वेळेच्या व्यवस्थापनानुसारच होत असते. माझा जन्म, बालपण, तारुण्य, वृद्धापकाळ त्याचप्रमाणे शारीरिक, मानसिक, वैचारिक बदल हे सर्व त्या जगत्नियंत्याच्या वेळेच्या व्यवस्थापनानुसार होतात. आता उरलेल्या माझ्या आयुष्याच्या वेळेचे त्याने काय व्यवस्थापन करावयाचे ठरवले आहे ते पाहण्यातच मौज आहे.


**झलक**

**यासुखांनो**

**सुरेश वसंत नाईक**

*मधमाशी निरनिराळ्या फुलांतून जशी थेंब थेंब मध गोळा करते तसे माणसाने हे बारीकसारीक सुखद प्रसंग पार अंतर्मनात साठवून ठेवले पाहिजेत. Love is many splendor thing या चित्रपटामध्ये एक उत्कृष्ट प्रसंग आहे. एक वृद्ध आजी टेकडीवरच्या एकाकी पण सुरेख बंगल्यात रहात असते. बंगल्याशेजारी तिने लावलेली फुलांची बाग बहरलेली असते. तिची तरुण नात तिला भेटायला येते आणि ती आजीला म्हणते, "तुला एकटीला इथं करमत नसेल, मला वाटतं या सुंदर बागेत आणि बंगल्यात मी पण यावे." यावर तिला तिची आजी जे उत्तर देते ते फार मार्मिक आहे. ती म्हणते, "मी या बंगल्यात एकटी नाहीये. माझ्या आयुष्यातले सगळे सुखद प्रसंग या फुललेल्या फुलांसारखे मला सुखावताहेत. त्या साऱ्या सुखद प्रसंगांची मला सोबत आहे म्हणून मी आनंदी आहे. तू येथून तुझ्या जगात जा, बारीक सारीक सारे सुखद प्रसंग गोळा कर, मगच तू या बंगल्यात ये. उतारवयात सुखद आठवणींच्या सोबतीखेरीज दुसरी कोणतीही सोबत असत नाही. या आठवणींवरच मी जगत आहे." आयुष्यातले लहान-मोठे सुखद प्रसंग म्हातारपणाच्या बेगमीकरिता का होईना पण जरूर गोळा करून ठेवले पाहिजेत.*

**१७०रु. पोस्टेज ३०रु.**



# डॉ. सुवर्णा दिवेकर

**शारीरिक-आर्थिक-कौटुंबिक-सामाजिक परिस्थिती जाणून घेऊन आपल्या वेळेचं नियोजन आपल्याइतकं सुंदर-सुबक कोणीच करू शकणार नाही. त्यासाठी 'ती' दृष्टी मात्र हवी. आणि मिळवायलाही हवी...**

आमच्या लहानपणी पाठ्यपुस्तकात एक धडा होता. 'घड्याळाचे गुलाम' नावाचा. धड्यातली मुख्य व्यक्तिरेखा म्हणून विनायक किंवा अशाच तत्सम नावाचा एक मध्यमवर्गीय, साधासा माणूस होता. तो घड्याळाच्या काट्याबरोबर उठायचा- जेवायचा- कामाला जायचा- झोपायचा- वागायचा. सगळे लोक त्याला 'घड्याळाचे गुलाम' म्हणून खिल्ली उडवीत चिडवायचे. साहजिकच धडा वाचता वाचता आम्ही मुलेही विनायकरावांची चेष्टा करीत असू. वेळ पाळणं- सांभाळणं- वेळ वापरणं किंवा वेळ पुरवणं ही त्रिसूत्री बिंदूभरच अस्तित्वात होती. आणि तीही महानगरांपुरतीच मर्यादित. महानगरात तरी काय, वेळ पाळण्याशिवाय दैनंदिन जीवन जगताच येत नसे म्हणून. वेळेचं महत्त्व पटलं म्हणून नाहीच. आमच्या निमशहरी भागात त्याकाळी अवघाच आनंद. 'कायदा पाळा गतीचा काळ मागे लागला, थांबला तो संपला' या माधव ज्यूलियनांच्या ओळी कवितेपुरत्याच होत्या. वास्तवात शाळा-कॉलेजची दुसरी घंटा वाजल्यावर शाळेत जाणं, परीक्षेपूर्वी अवघे दोन तास शाई-कागदाची व्यवस्था पाहणं, गॅदरिंगच्या नाटकाच्या ड्रेपरीची दीड दिवस अगोदर जमवाजमव करणं, किंवा परीक्षेचा पूर्व अभ्यास आठ दिवस अगोदर सुरू करणं, असा सुखेनैव मामला होता. समाजाचा आणि अर्थात माझाही.

कलाशाखेची पदवी- लग्न- पुण्यातले वास्तव- वर्षभराने मूल- घरसंसार असं ऋतूचक्र फिरून पंधरा वर्षांचा काळ झाला. ही पंधरा वर्षं खूप बदललेली. पुण्यातलं पंधरा वर्षापूर्वीचं जीवनही गती पकडू लागलं होतं. परंतु तोपर्यंत मी फक्त गृहिणी होते आणि आवड म्हणून सवड काढून लेखन करीत होते. सर्व तऱ्हेचं वाचन मात्र अफाट होतं. पण तरीही वेळेचा तगादा नव्हता. वेळ छान वापराचा होता; पुरवायचा नव्हता.

दुसरा मुलगा झाला आणि तो अगदी लहान सहा महिन्यांचा असताना पदव्युत्तर शिक्षण घेण्याचं मनात आलं. लिहिता लिहिता माझ्या लक्षात येत होतं की विचार व्यक्त करायला शब्दसंपदा कमी पडते. शिवाय निरुद्देश वाचन करताना साहजिकच ललित साहित्य किंवा कथा-कादंबरी-मनोरंजनात्मक साहित्य वाचते. लीळाचरित्र-बखरी-समीक्षा-संतसाहित्य यांच्या वाटेला जात नाही. तेव्हा मराठी साहित्यात एम.ए. करायचा निर्णय मी घेतला. पदवी परीक्षेपर्यंत 'मराठी' हा माझा कधीच विषय नव्हता. तेव्हा मराठीचा थोडा मागे जाऊन अभ्यास करणंही अगत्याचं होतं. शिवाय शिक्षणाचा अट्टहास करायचा तो चूष, गंमत, ट्रायल अशा वरवरच्या पातळीवरचा नाही. मन:पूर्वकच अभ्यास करायचा. प्रथमश्रेणी (च) मिळवायची. शक्यतो प्रत्येक विषयात सर्वोच्च गुण मिळवायचे (तसे मिळालेही) ही जिद्द होती.

ही जिद्द मनात होती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी महत्त्वाची होती. वेळ आणि वेळापत्रकाची पहिली ओळख तिथे झाली. (म्हणूनच ही पूर्वपीठिका सांगितली) मूल लहान, एक मुलगा काहीसा मोठा, मोजक्याच कामाला नोकर असल्याने बऱ्यापैकी घरकाम. तेव्हा तयार पिठे, मसाले, चिरलेल्या भाज्या, निवडलेली धान्ये अशा सुविधा नसल्याने स्वयंपाकाच्या पूर्वतयाऱ्यांना आठवड्यातले दोन दिवस द्यावे लागत. शिवाय 'झेरॉक्स'ची सोय नसल्याने मिळेल ती अभ्यासाची सामग्री स्वहस्ते लिहून काढायची असे. मी बहिस्थ विद्यार्थी म्हणून नाव नोंदवले असल्याने विद्यापीठाची

लायब्ररी- लेक्चर्स- तयार नोटस्- सेमिनार्स यांचाही फायदा नव्हता. खाजगी क्लास जॉईन करणंही मुलाला घरी ठेवून शक्य नव्हतं. तेव्हा पहिल्यांदा जाणीव झाली ती वेळेच्या नियोजनाची. शिवाय आपले शिक्षण चालले आहे म्हणून घराकडे, मुलांकडे दुर्लक्ष नको, ही मनाची दाटवणीही होती.

माझ्या नावाचा रजिस्टर फॉर्म विद्यापीठात भरला आणि काळ-काम-वेग या गणिती तत्त्वाची अंमलबजावणी सुरू केली. अनेकदा चुकत अनेकदा अनपेक्षित पाहुण्यांनी चुकवत, कधी अकस्मिक अडचणी हुलकावण्या देत, मी बऱ्यापैकी वेळापत्रक बसवले. पहिल्यांदा संदर्भ साहित्याची जुळवाजुळव महत्त्वाची होती. विद्यापीठाची लायब्ररी दूर आणि दुपारच्या वेळची. लहान मुलाला ठेवून किंवा घेऊन तिथं पुस्तक वाचायला किंवा बदलायला जाणं अशक्य होतं. मग मी संध्याकाळी उपलब्ध असलेली जोगेश्वरीच्या बोळात असलेली विश्वास संदर्भग्रंथ लायब्ररी लावली. आठवड्यातून एकदाच जायचे काम सोपे होऊन जाई. अर्थात हे वेळापत्रक अनेकदा हुकवले जाई. बहुतेक आकस्मिक पाहुण्यांकडून, न कळवता केव्हाही 'दत्त' म्हणून येणाऱ्या अनाहूतांकडून. त्यांना शिक्षणाचं, वेळेचं महत्त्व वाटायचंच नाही. 'नाही केला दोन दिवस अभ्यास, कुठं बिघडलं? नाहीतरी नोकरी नाहीच ती' अशा बेपर्वाईचा मनात राग येई. नोकरी करणारी स्त्री कशी काहीही होवो, घड्याळाच्या ठोक्यावर बाहेर पडते. (आज इतक्या वर्षांनीही लेखनाच्या-वाचनाच्या माझ्या वेळांबद्दल त्याच प्रतिक्रिया- 'नाही लिहिलं दोन दिवस- कुठं बिघडलं?' 'डेड लाईन' या पाच अक्षरांबद्दल अतिथीदेवांना/देवींना कल्पनाच नसते.) असो!

घराचे वेळापत्रक, लायब्ररीचे वेळापत्रक जमवले. आता वेळापत्रक अभ्यासाचे. छोटा मुलगा सकाळी उशिरा उठायचा. मग मी साखरझोप रद्द करून साडेपाचला (पहाटे) उठू लागले. प्रातर्विधी-चहा आटोपून मी लेखनाचे म्हणून जे काम असते, म्हणजे टिपणे, नोटस्

**माझे वेळापत्रक अनेकदा हुकवले जाई.बहुतेक आकस्मिक पाहुण्यांकडून, न कळवता केव्हाही 'दत्त' म्हणून येणाऱ्या अनाहूतांकडून. त्यांना शिक्षणाचं, वेळेचं महत्त्व वाटायचंच नाही. 'नाही केला दोन दिवस अभ्यास, कुठं बिघडलं? नाहीतरी नोकरी नाहीच ती' ही अशी बेपर्वाई**

आणि तीन ते चार पुस्तके नेण्याची मी मुभा मिळवली. (डिपॉझिट तेवढे दुप्पट दिले.)

आता माझे मिस्टर स्वतंत्र व्यवसाय करतात. परंतु त्यावेळी ते ११ ते ६ अशा बँकेच्या नोकरीत होते. त्यांच्या संमतीने मंगळवार हा वार पक्का केला आणि मुलांना संध्याकाळी त्यांच्याजवळ ठेवून लायब्ररीत (आणि जोगेश्वरीला) जाऊ लागले. मंगळवार कधी चुकवला नाही. 'अजून पुस्तक वाचून व्हायचे आहे- टिपणे झाली नाहीत' अशी सबब एकदाही सांगितली नाही. (आणि एवढी मदत आणि फॉर्म फीचे पैसे देणे या व्यतिरिक्त मिस्टरांची कुठलीही मदत घेतली नाही. त्यांची जबाबदारीची पोस्ट जाणून घरकामात कुठलीही मदत अपेक्षिली नाही.) त्यासाठी आठवडाभराचे अभ्यासाचे आणि गृहकृत्यांचे व्यवस्थित नियोजन केले. गृहकृत्याचे नियोजन म्हणजे मंगळवारी लायब्ररी बदलून झाल्यावर मी गावातल्या मंडईत जायचे. आठवड्याभराची फळे-भाजीपाला घेऊन जायचे. रिक्षाचे पैसे घातले की एकात दोन कामे होत. (पूर्वी भाज्यांच्या हातगाड्या भांडारकर रोड किंवा डेक्कन जिमखान्यावर येत नसत.) शनिवार हा मोठ्या मुलाच्या सुट्टीचा वार. त्यामुळे तो धाकट्याशी बऱ्यापैकी खेळत असे. म्हणून गृहकृत्यांपैकी तांदूळ निवडून ठेवणे, सायीचं ताक करणे, सुक्या चटण्या- एखाद-दोन खाद्यपदार्थ करणे, स्वच्छता अशा गोष्टींसाठी शनिवार मुक्रर केला. म्हणजे माझे आठवड्याभराचे ज्यासाठी एकाग्रता लागते, ते काम करून टाकायची. म्हणजे दिवसभरात लेखनकाम करायचे नाही. (तयार नोटस् मी वापरणार नव्हते.) जो भाग पाठांतराचा होता- जसे अलंकार शास्त्र... त्याच्या नोटस् तयार करून भिंतीवरच्या फोल्डरमध्ये ठेवल्या. मुलाला खेळणी वगैरे देऊन खेळवत बसवले की एकएक कागद हातात घेऊन पाठांतर करायचे. आणि त्याच्या दुपारच्या झोपेत वाचन. दिवसाच्या तीन टप्प्यांत थोडा थोडा अभ्यास केल्याने (रविवार सुट्टी) शीण वाटला नाही. वेळेच्या नियोजनामुळे गृहव्यवस्थाही नीट राहिली. परीक्षेत अपेक्षेपेक्षाही यश मिळाले.

त्यानंतरच्या वेळेच्या नियोजनाचा टप्पा पीएच.डी.चा. (मुले मोठी झालेली- गृहव्यवस्थाही बऱ्यापैकी सुटसुटीत झालेली) एव्हापर्यंत लेखिका म्हणून माझा छानपैकी जम बसला होता. विविध नियतकालिके, आकाशवाणी, पेपर, टीव्हीसाठी मी विहित होते. ही बैठक माझ्यालेखी महत्त्वाची होती. शिवाय डॉक्टरेटचा अभ्यासही करायचा होता. लायब्ररीची व्यवस्था पूर्वीसारखीच संध्याकाळची. आठवड्यातून एकदाच. फक्त 'विश्वास'ऐवजी भरतनाट्यमंदिरची लायब्ररी. (विषय नाटकांचा असल्याने) बाजारहाटाची तीच पद्धत. त्यानंतर मी माझा दिवस दोन भागांत विभागला. सकाळी ११ वाजेपर्यंत सर्व गोष्टी आटोपून ११ ते १ या वेळात मी ललितलेखन किंवा अभ्यासेतर लेखन करीत असे. एव्हापर्यंत 'गुरुदेव दत्त' म्हणून येणाऱ्या

अवचित पाहुण्यांची सवय झाल्याने राग येईनासा झाला होता. दुपारच्या वेळी ३ ते ५ या वेळी डॉक्टरेटचा अभ्यास. कुलमिलाके सिर्फ चार घंटे! परंतु व्यवस्थित नियोजनामुळे दोन्ही डगरींवर एकाच वेळी पाय ठेवूनही मी छानपैकी पैलतीरी पोहोचले.

आता प्रश्न असा, हे सर्व सहज सुलभ झाले का? अर्थातच नाही! प्रकृती अस्वास्थ्य... कौटुंबिक अडचणी... पाहुणे... असे अडथळे येतच होते. मुख्य अडथळा माझ्या सुखप्रवृत्तीचा येई. कोणी मैत्रिणी सिनेमाला जात, पॉटलकची जेवणे करीत, मनात आलं, की हॉटेलिंग... केळवणं... तिळवणं... शॉपिंग... तुळशीबागेत दिवस छान घालवणं, असं करीत. त्यावेळी माझं मन मला टोकरायचं 'छान मस्त, मजेत रहायचं. या बायकांसारखं, कशाला वेळेला किंवा अभ्यासाला असं उगीच बांधून घ्यायचं?' मग मीही एखाददोन दिवस अशी मनमुक्त घालवायची. दुपारच्या नियोजित अभ्यासाच्या वेळात 'वैशालीत' वगैरेही जायची. पण दोनच दिवस! पुढे आपोआपच करिअरची साद ऐकू यायची आणि काळ-काम-वेगाचं गणित ताळ्यावर यायचं.

आता माझं एवढंसं बडिशेपेच्या गोळीएवढं चिमुकलं करिअर. त्यालाही वेळेचं नियोजन करावं लागलं आणि लागतं. मग अभिनेते/नेत्री, मंत्री, राजकारणी, उद्योगपती, कार्पोरेट वर्ल्डमधले व्हीआयपीज यांना किती मिनिटामिनिटाचं गणित बसवायला लागत असेल? आजकाल 'टाइम मॅनेजमेंट' हे मॅनेजमेंट गुरूकडून भक्कम फी देऊन शिकण्याचं शास्त्र मानलं जातं. परंतु माझ्या मते स्वत: इतका टाइम मॅनेजमेंट दुसरा गुरू असूच शकत नाही. आपली शारीरिक-आर्थिक-कौटुंबिक-सामाजिक परिस्थिती जाणून घेऊन आपल्या वेळेचं नियोजन आपल्याइतकं सुंदर-सुबक कोणीच करू शकणार नाही. त्यासाठी 'ती' दृष्टी मात्र हवी. आणि मिळवायलाही हवी... कारण आता जमाना असा आहे... वेळेचं नियोजन करणाऱ्याला आता घड्याळाचा गुलाम म्हणून चिडवत नाहीत. उलट काळाची गरज ओळखलेला टाइम मॅनेजर म्हणतात. आखिर समय समय की बात है।


| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **डॉ. सुवर्णा दिवेकर** |
| **शिक्षण** | : | एम.ए. मराठी साहित्य (पुणे विद्यापीठ) प्रथम श्रेणी विशेष प्रावीण्यासह. पीएच.डी. पुणे विद्यापीठ. विषय- सामाजिक मराठी नाटक (१९५० ते १९९०) |
| **मार्गदर्शक** | : | डॉ. वि. भा. देशपांडे |
| **अनुभव** | : | गेली वीस वर्षं सातत्याने लेखन. कथा- ललितलेखन- एकांकिका- समीक्षा- सदर लेखन- विडंबन काव्य- शैक्षणिक कॅसेटस् साठी लेखन- ई.टीव्हीसाठी लेखन- आकाशवाणीसाठी लेखन- अनेक स्पर्धांतून साहित्य पुरस्कार- साहित्य स्पर्धांचे परीक्षक म्हणून काम. दोन पुस्तके प्रकाशित. एक प्रकाशनाच्या मार्गावर. |



## सांगावेसे वाटले म्हणून

**शान्ता शेळके**

शान्ताबाई शेळके यांनी जीवनविषयक विविध पैलूंची सोप्या आणि रसाळ भाषेत करून दिलेली ओळख

**१००रु.**

**पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# अरुण पटवर्धन

**वेळेचे व्यवस्थापन म्हणजे केवळ दिनचर्या नव्हे तर कायम सावध राहून डोळसपणे कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा याचं आटोपशीरपणे केलेलं नियोजन.**

कोणताही गोष्ट योग्य वेळेत झाली की त्यापासून मिळणारे समाधान वेगळेच असते आणि अशी गोष्ट वेळेत करण्यासाठी घेतलेले कष्ट आणि सोसलेला त्रास यांची आठवण नवीन काम करण्याची स्फूर्ती देते.

वेळेचे नियोजन योग्य प्रकारे केल्यामुळे यश मिळाल्याची अनेक उदाहरणे आहेत. वेळेचे नियोजन करणे ही एकाएकी जमणारी गोष्ट नाही. अनेक वेळा योग्य वेळ साधता न आल्यामुळे झालेली फटफजिती, सहन करावे लागणारे अपमान, आर्थिक नुकसान या साऱ्या गोष्टींनी प्रत्येक वेळी सणसणीत चपराक दिली आणि अनुभवातून हे लक्षात आलं की उद्या काय करायचंय, कुठं जायचंय, कुठलं काम कधी करायचंय, त्याला किती वेळ द्यायचा, हे आधी ठरवलं तर फारसा त्रास होत नाही.

वेळ न पाळल्यामुळे पहिली अद्दल घडली ती शाळेत असताना, नाटकासाठी मुले निवडण्यासाठी सरांनी दुपारी २ वाजता शाळेत बोलावले. शाळा १२ वाजता सुटली. घरी गेलो, जेवलो आणि झोपलो. २.३० वाजता उठलो. धावत शाळेत गेलो. मुलांची निवड झाली होती. सर म्हणाले, तू चांगलं काम करतोस म्हणून तुझ्यासाठी रोल ठेवला होता. आता शिक्षा म्हणून या वर्षी तू बॅकस्टेजला काम करायचं. नाही म्हणण्याचं धाडस नव्हतं. त्या प्रसंगाने माझी दुपारची झोप उडवली ती कायमची; त्यानंतर प्रत्येक वर्षी सगळ्यांच्या आधी हजर रहायचो. त्यामुळेच, 'मी उभा आहे', 'बेपत्ता', 'पुढारी पाहिजे', 'सोन्यानं घातला गोंधळ', 'आधी होता पाग्या' या नाटकांत शाळेत व आंतरशालेय नाट्यस्पर्धेत भरपूर बक्षिसे मिळाली. शाळेत असतानाच नाटकाच्या प्रॅक्टिससाठी रोज बुधवार पेठ ते महर्षिनगर चालत जाऊन नाटकाचा केलेला प्रयोग आणि आयुष्यात पहिल्यांदा प्रेक्षकांकडून मिळालेलं बक्षीस याची आठवण आजही ताजी आहे.

घरच्या आर्थिक बिकट परिस्थितीमुळे कॉलेजमध्ये जाता आले नाही. शाळेतील शिक्षण संपल्यावर लगेच 'राजा बहादूर मिल'मध्ये नोकरीला लागलो. आणि बहिस्थ विद्यार्थी म्हणून स्वाध्याय कॉलेजला ॲडमिशन मिळायला सुरुवात झाली. नाटक, नोकरी, शिक्षण यांच्या वेळेचं गणित जमवताना त्रेधातिरपीट उडायची. स्वाध्याय कॉलेजमध्ये महाजन सरांनी कधीही कॉलेजमध्ये बसायला परवानगी दिली. म्हणूनच अर्थशास्त्रासारख्या अवघड विषयात नोकरी सांभाळून मी पदवी घेऊ शकलो. कॉलेजमध्ये 'अर्ध्याच्या शोधात दोन' या नाटकातील रमेशच्या भूमिकेमुळे मी चक्क हिरो झालो. याच कालावधीत 'तीन चोक तेरा', 'वरचा मजला रिकामा', 'देव नाही देव्हाऱ्यात' या नाटकाचे प्रयोग चालू होते. पण 'बिन पैशाचा तमाशा' आणि 'राजकारण गेलं चुलीत' या नाटकाच्या प्रयोगांनी मला वेळेचे नियोजन अधिक काटेकोरपणे कसं करावं हे शिकवलं.

'तुला हे सगळं कसं जमतं? एवढं करतो तरी कधी? वेळ कसा मिळतो?' कॉलेज व नोकरीमधील सहकारी नेहमी विचारायचे. माझं उत्तर ठरलेलं असायचं, 'आवड असेल तर सवड मिळतेच.' या काळात जेवण, झोप, विश्रांती यांना वेळच नव्हता.

१९८१ ते १९९५ या काळात 'राजकारण गेलं चुलीत' या नाटकात काम करताना निळूभाऊंचा (निळू फुले) सहवास लाभला. आणि इतक्या मोठ्या आणि व्यस्त अभिनेत्यांच्या सान्निध्यात राहून वेळेचे नियोजन कसे करावे ते कळले. ज्या भागात भाऊंचे शूटिंग

असायचे, त्याच्या जवळच्या गावात आमचे प्रयोग असत, शूटिंग संपवून भाऊ यायचे ते तडक मेकअपला बसायचे. स्टेजवर पाऊल ठेवताच टाळ्या. हे दिवस दिवसभर शूटिंग करून थकले असतील असं कधी वाटलंच नाही. प्रयोग रात्री १ वाजता संपायचा. त्यापुढे जेवण, झोपायला ३ वाजायचे. पण दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता भाऊ शूटिंगला गेलेले असायचे.

याच कालावधीत मिलमध्ये स्नेहसंमेलनात दरवर्षी नवीन नाटक करण्याची संधी मिळाली. पदवीधर होताच टीव्ही सिरियलचे प्रोड्युसर विजय धुमाळे यांच्याशी ओळख झाली. आणि माझी धडपड पाहून त्यांनी माझ्याकडे व्यवस्थापनाची जबाबदारी टाकली. सिरियल व्यवस्थापन करताना खऱ्या अर्थाने मी वेळेचे नियोजन शिकलो. शूटिंग सुरू होण्याच्या वेळेआधी दोन तास मेकअप, ड्रेपरी, लाइट, स्पॉटबॉय, या विभागातल्या लोकांना सेटवर आणणे, गाड्यांची आखणी करणे, कोणत्या कलाकाराचे किती काम, तो येणार कधी, जाणार कधी, दुसऱ्या कलाकारांची वेळ, या सर्व गोष्टींची आदल्या दिवशी आखणी करून शूटिंग वेळेवर सुरू झाले की, धुमाळे सर कौतुक करायचे. महात्मा फुले यांच्या जीवनावरील 'पहला भागी महात्मा', साईबाबांवरील 'शिर्डी के साई', लोकमान्य टिळकांवरील 'लोकमान्य' या टीव्ही फिल्म तर अनेक सिरियलचे व्यवस्थापन करण्यात यशस्वी झालो ते वेळेचे नियोजन योग्य प्रकारे केल्यामुळेच.

१९८७ मध्ये राजा बहादूर मिल बंद पडल्यानंतर हॉटेल पेशवा येथे मॅनेजरची नोकरी पत्करली तेव्हा हॉटेल व्यवसायातही वेळ पाळल्यामुळे किती फायदा होतो ते समजले.

ऑगस्ट १९८८ मध्ये डॉ. चित्रा नाईक यांच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन' संस्थेत नोकरी मिळाली. त्या संस्थेत तयार केल्या जाणाऱ्या अनेक चित्रफितीमध्ये वेगवेगळ्या भूमिका केल्या. 'कलारंजन' ही प्रेक्षकांना स्वस्त दरात नाटक दाखविणारी संस्था. या संस्थेत चार वर्षे उपाध्यक्ष म्हणून बाकी सर्व व्याप सांभाळून काम पाहिले. राज्य नाट्य स्पर्धेचे अभिनयाचे बक्षीस कलारंजन तर्फे सादर केलेल्या 'अर्ध्याच्या शोधात दोन' या नाटकासाठी मिळाले.

**सिरियल व्यवस्थापन करताना खऱ्या अर्थाने मी वेळेचे नियोजन शिकलो. शूटिंग सुरू होण्याच्या वेळेआधी दोन तास मेकअप, ड्रेपरी, लाइट, स्पॉटबॉय, या विभागातल्या लोकांना सेटवर आणणे, गाड्यांची आखणी करणे, कोणत्या कलाकाराचे किती काम, तो येणार कधी, जाणार कधी, दुसऱ्या कलाकारांची वेळ, या सर्व गोष्टींची आदल्या दिवशी आखणी करून शूटिंग वेळेवर सुरू झाले की, धुमाळे सर कौतुक करायचे.**



'मात्र कमाल झाली'नाटकात अरूण पटवर्धन

नाटक, सिरियल, चित्रपट, नोकरी, संसार सर्व आघाड्यांवर काम करताना वर्षे कशी संपली ते कळलेच नाही. याचकाळात अनेक एकांकिका स्पर्धेत भाग घेऊन अभिनय, दिग्दर्शन यांची बक्षीसे मिळाली. 'पैज लग्नाची' या चित्रपटाची निर्मिती प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारून अनेक कलाकारांना यामध्ये संधी दिली. १९९६ मध्ये डॉ. आ. दि. कर्वे यांच्या पुढाकाराने स्थापन केलेल्या ॲप्रोप्रिएट रुरल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूटमध्ये सध्या नोकरी करीत आहे. या संस्थेत २००२ ते मार्च २००६ पर्यंत सेक्रेटरी या पदावर काम करताना वेळेचे नियोजन अधिक काटेकोरपणे करावे लागले.

देश-विदेश मधल्या मोठमोठ्या व्यक्तींची ओळख झाली.



'स्वामी'नाटकात अरूण पटवर्धन

त्यांचे दौरे, गावांच्या भेटी यांचे नियोजन करताना मागच्या अनुभवांचा फार उपयोग झाला. आणि आपल्या श्वासाइतकेच वेळेला महत्त्व देणाऱ्या डॉ. आ. दि. कर्वे यांच्या बरोबर राहण्याने योग्य वेळी योग्य काम करायची सवय लागली. 'जीवनसंध्या', 'प्रत्यांतर', 'टोकन नंबर', 'नंदादीप', 'रेशीमगाठी', 'अवंतिका' अशा सिरियलमधून छोट्या भूमिका तसेच 'पैज लग्नाची', 'जवाहर मला जगायचंय', 'द लिजंड ऑफ भगतसिंग' अशा चित्रपटांतून भूमिका करून सध्या बालनाट्ये चालू आहेत.

माझ्या आयुष्यात आलेल्या अशा मोठ्या व्यक्तींबद्दल लोकांना खूप कौतुक असते. पण या सगळ्या मोठ्या लोकांमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने आढळते ती म्हणजे त्यांनी केलेले वेळेचे व्यवस्थापन.

मोठमोठे उद्योजक, खेळाडू कलाकार, राजकीय व्यक्ती, साहित्यिक हे वेळेचे नियोजन करून वागल्यामुळेच यशस्वी झाले आहेत. वेळेचे व्यवस्थापन म्हणजे केवळ दिनचर्या नव्हे तर कायम सावध राहून डोळसपणे कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा याचं आटोपशीरपणे केलेलं नियोजन.

**नाव** : **अरुण श्रीराम पटवर्धन**
**जन्मतारीख** : १-११-१९५४
**शिक्षण** : बी.ए. अर्थशास्त्र
**नोकरी** : ॲप्रोप्रिएट रुरल टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, आरती संस्था
**नाट्य, चित्रपट व्यवसायातील कामगिरी :**

भारत मराठी विद्यालय, आदर्श विद्यालय नातूबाग या शाळेत शिक्षण
डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स, D.I.C स्वाध्याय महाविद्यालय येथे पदवीपर्यंत शिक्षण.
शाळेत कै. जयंतकुमार त्रिभुवन यांच्याकडून नाटकाचे शिक्षण, कुमार कला केंद्र, जिल्हा परिषद आंतरशालेय नाट्यस्पर्धेत बक्षिसे.
('बेपत्ता', 'मी उभा आहे', 'पुढारी पाहिजे', 'सोन्यानं घातला गोंधळ', 'आधी होता पाग्या', ही शाळेतील नाटके.
व्यावसायिक नाटके : 'वरचा मजला रिकामा', 'लावणी भुलली अभंगाला', 'तीन चोक तेरा', 'देव नाही देव्हाऱ्यात', 'सखा माझा मंत्री झाला', 'तीन पैशाचा तमाशा', 'अर्ध्याच्या शोधात दोन', 'राजकारण गेलं चुलीत', 'बाप बिलंदर बेटा कलंदर', 'श्रीमान योगी'

**सिरियल** : 'विषयांतर', 'जीवनसंध्या', 'रेशीमगाठी', 'टोकन नंबर', 'नंदादीप', 'भूमिका', 'अवंतिका', 'रामदास', 'तूच खरी लक्ष्मी'
**चित्रपट** : 'जवाहर', 'पैज लग्नाची', 'मला जगायचंय', 'द लिजंड ऑफ भगतसिंग'.


**जी व न या त्रा**
**अभिनेता दिग्दर्शक मा. विनायक**

**मा. विनायक यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वाचा चित्रदर्शी आढावा.**

**भाई भगत**

**१५० रु. पोस्टेज २५रु.**



# श्याम भुर्के

**आपण काही करावं ही प्रबळ इच्छा असली की मग वेळ काढला जातो. आवड असली की सवड होते.**

'साष्टांग नमस्कार' हे आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांचं नाटक मी लहानपणी पाहिलं. त्यातील एक पात्र सतत म्हणायचं-

घटका गेली, पळे गेली
राम का रे म्हणाना
आयुष्याचा नाश होतो
काम का रे करा ना

वेळेचं महत्त्व हे चपखलपणे मांडणाऱ्या या ओळी आहेत. आपण सारे भाग्यवान की आपल्याला मनुष्यजन्म लाभला.

देव रंगारी रंगारी
त्रिभुवनाचा रंग करी
लक्ष चौऱ्याऐंशीचे ठसे
वेगळाले केले कसे?

पृथ्वीवरील 'मनुष्य' हा सर्वाधिक महत्त्वाचा ठसा आपल्याला लाभला. मनुष्याचे जीवन सुखी व्हायचे असेल तर या जीवनाची त्रिमिती पूर्ण व्हावयास हवी. ही त्रिमिती आहे- लांबी, रुंदी, खोली. लांबी म्हणजे दीर्घायुष्य. आरोग्यसंपन्न दीर्घ आयुष्य जगायचं. शंभर वर्षे जगायचा निश्चय करायचा. रुंदी म्हणजे शिक्षण, अभ्यास, वाचन, व्यवसाय, धनप्राप्ती, नोकरी, कला, छंद यामध्ये प्रगती करावयाची. खोली म्हणजे आपल्या दीर्घ आयुष्याचा, संपत्तीचा काही भाग तरी दुसऱ्यांना सुखी करण्यासाठी वापरायचा. या तीनही गोष्टी परिणामकारकपणे साधावयाच्या असतील तर वेळेचे महत्त्व जाणायला हवे. वेळेचे नियोजन करायला हवे.

वेळ हे असे साधन आहे की ते सर्वांना सारख्याच प्रमाणात उपलब्ध आहे. पंतप्रधानांनाही दिवसाचे चोवीस तासच उपलब्ध असतात. एखाद्या कार्यालयातील साध्या कारकुनालाही तेवढाच वेळ मिळतो. एका दृष्टीने वेळ हा पूर्णपणे समाजवाद पाळणारा आहे.

कोणत्याही उत्पादनाला कच्चा माल वापरला जातो. नियमितपणे व्हावे म्हणून त्या कच्च्या मालाचा साठा केला जातो. परंतु वेळ हे असे साधन आहे की त्याचा साठा अजिबात करता येत नाही. तो निश्चयपूर्वक वापरला पाहिजे. नाहीतर प्रत्येक घटकेला तो वाया जाईल. गळणाऱ्या पाण्याच्या नळाप्रमाणे.

वेळेचे नियोजन करण्यासाठी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपणास काही तरी करावे, आपण मोठे व्हावे असे वाटले पाहिजे. मी सातारा येथे न्यू इंग्लिश स्कूलमध्ये भेटीसाठी आलेले साहित्यिक पाहिले. त्यांची भाषणे ध्यानपूर्वक ऐकली. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, क्रांतिसिंह नाना पाटील, दत्तो वामन पोतदार यांची भाषणे ऐकली. त्यावेळी मनात आले, आपणही काही लिहावं, आपण काही करावं ही प्रबळ इच्छा असली की मग वेळ काढला जातो. आवड असली की सवड होते.

मी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये अधिकारी म्हणून काम पहात होतो. वर्षातून एक महिना हक्काची रजा असायची. या रजेत एक पुस्तक पुरे करायचेच असा निश्चय केला. 'सभेत कसे बोलावे' हे पुस्तक लिहायला घेतले. एकूण पुस्तक एकशे वीस पानांचे आहे. माझ्याकडे वीस दिवस आहेत. मग रोज दहा पाने तरी लिहून व्हायलाच हवीत असं ठरवलं. सुरुवातीस हे वेळापत्रक जमेना. दहाच्या ऐवजी तीनच पाने लिहून झाली. मग विचार केला, आपला वेळ जातो कुठं?

सकाळी साडेपाचला उठल्यावर सहा ते सात फिरणं होतं. सात ते आठ वर्तमानपत्र वाचण्यात जायचा. यामध्ये मी सर्व बातम्या, लेख, जाहिराती न वाचता निवडक भाग वाचू लागलो. सुमारे अर्ध्या तासाचा वेळ मला लिखाणासाठी मिळाला. दूरदर्शन हे फक्त संध्याकाळी सातच्या बातम्यांसाठी पहायचे ठरविले. एक पान लिहायला सुरुवात केली की ते किती वाजता सुरू केले हे वेगळ्या कागदावर लिहिले. त्यामुळे प्रत्येक पानाला किती वेळ लागला व कुठे किती वेळ वाया गेला किंवा कशासाठी गेला हे समजू लागले व वेळेचा वापर अधिक परिणामकारक करण्याचा निश्चय बळावला.

टेलिफोनचा वरचेवर व्यत्यय नको म्हणून दुसरीकडे निवांत ठिकाणी लिहायला बसलो. येणाऱ्या टेलिफोनचे क्रमांक लिहून ठेवणारा घरच्या मंडळींना सांगितले. लिखाणाच्या वेळी अधूनमधून विश्रांती हवी. त्यासाठी स्नान, नाष्टा, भोजन इ. नियमित कार्यक्रम पाहतो. ती त्यांना व्यवस्थित समजावून सांगतो. कशी करावयाची या बाबतीत मार्गदर्शन करतो. इतरांना सांगितलेली कामे लिहून ठेवतो. त्यांना ती कामे करण्यासाठी किती वेळ लागेल याचा अंदाज घेतो. त्या वेळेपर्यंत ते काम झाले ना हे पाहतो.

स्वत: करावयाच्या कामाची पुन्हा आखणी करून महत्त्वाचे व तातडीचे काम प्रथम हाती घेते. मग कमी तातडीचे परंतु महत्त्वाचे काम करायचे ठरवितो. त्यानंतर क्रमांक लागतो तो तातडीचे परंतु कमी महत्त्वाचे व शेवटी कमी तातडीचे व कमी महत्त्वाचे.

या आखणीमुळे मी बँकेत क्लार्कपासून सुरुवात करून अधिकारीपदावर पोहोचलो. तीन क्षेत्रांचा प्रमुख म्हणून काम केले. उपमहाव्यवस्थापक या पदापर्यंत पोहोचलो. वेळेची उत्पादकता वाढवीत गेलो. त्यामुळे बँकेत नोकरी चालू असताना पंधरा पुस्तके लिहिली. सोळा नाटकांतून कामे केली. साहित्य, व्यवस्थापन अशा विषयांवर २००० च्या वर व्याख्याने दिली. सौ. गीता भुर्के बरोबर

**वेळ हे असे साधन आहे की ते सर्वांना सारख्याच प्रमाणात उपलब्ध आहे. पंतप्रधानांनाही दिवसाचे चोवीस तासच उपलब्ध असतात. एखाद्या कार्यालयातील साध्या कारकुनालाही तेवढाच वेळ मिळतो. एका दृष्टीने वेळ हा पूर्णपणे समाजवाद पाळणारा आहे.**

त्या विश्रांतीच्या वेळात बसवले.

लिखाणासाठी वाचनही करावे लागते. प्रवासाचा वेळ हा बराचसा वाचनासाठी वापरला. नवी कल्पना सुचली की ती एका कागदावर लिहून ठेवायचो. हे कागद घरी एका ड्रॉवरमध्ये टाकून ठेवायचो. लिखाणाच्या वेळी ते वापरले जायचे.

अन्य माणसे बोलतात ते लेखकासाठी वाचनच असते. त्यांच्या बोलण्याचा उद्देश लक्षात घेतला तर मानवी स्वभाव वैशिष्ट्ये ध्यानात येतात. हे इतरांचे बोलणे ऐकताना वेळ गेला व समजता तो उपयुक्त ठरविता आला.

सकाळी उठल्यावर आज कोणत्या गोष्टी करायच्या आहेत हे मी कागदावर लिहून ठेवतो. त्याची तीन प्रकारात विभागणी असते. एक - बँकेचे (नोकरीचे) काम. दोन - घरातील काम व वैयक्तिक छंद - उदा. लिखाण, व्याख्यान. तीन - इतरांसाठी करावयाची कामे. उदा. नातेवाईकांना भेटणे, मित्राने सांगितलेले काम करणे.

या यादीतील कोणती कामे दुसऱ्या व्यक्ती करू शकतील ते 'खुमासदार अत्रे', 'पु.ल. एक आनंदयात्रा' अशा प्रकारच्या सात कार्यक्रमांचे शेकडो प्रयोग केले. योगासनाच्या अनेक वर्गांना गेलो. स्वत: लोकांना योग शिकविला. आकाशवाणीवर व्याख्याने दिली. कोयनानगर भूकंपग्रस्तांना डोंगरदऱ्यात फिरून सहाय्य केले. लातूर भूकंपग्रस्तांसाठी फिरती बँक सुरू करून त्या त्या भागात बँकसेवा दिली. आंतरराज्य छात्र जीवनदर्शन, विवेकानंद स्मारक, गोवावीर मोहन रानडे सुटका, दुष्काळग्रस्तांसाठी अन्नछत्र अशा अनेक सामाजिक कार्यात स्वत:ला झोकून दिले.

या वेळेच्या नियोजनामुळे बरेच काही करता आले. 'आता काय करायचे?' असा प्रश्न कधीही निर्माण झाला नाही.

इंग्रजीत असं म्हणतात, Time is money. मला वाटतं, टाईम इज मोअर दॅन मनी!

**श्याम भुर्के**
गंगातारा, ९१७/७ गणेशवाडी
डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.
फोन : ९४२२०३३५००



# दीपक आलेगावकर

**कलाकार हा स्वतःसाठी कमी व प्रेक्षकांसाठी व इतरांसाठी जास्त जगतो व जगवतो. कायम आनंदी राहतो. ह्यात त्याच्या घरच्यांचा सर्वात मोठा वाटा असतो.**

**ज्या**ला आवड असते तो सवड कशीही काढतो. मग ते कुठलेही क्षेत्र असो. त्यासाठी तुम्हाला मनापासून आवड लागते. काही क्षेत्रं उगाच जाता जाता जोपासण्यासारखी नसतात. त्यातल्या त्यात नाट्य, चित्रपट हे क्षेत्र तर नाहीच नाही. ह्या कामासाठी तुम्हाला संपूर्ण त्यात झोकून द्यावं लागतं. हा पार्टटाईम व्यवसाय नाही. इथे दिवस दिवस तुम्हाला नाटकाच्या तालमी कराव्या लागतात. त्याही बरेच दिवस. त्यासाठी तुम्हाला तुमच्या कामाचं वेळापत्रक आखावं लागतं व त्यानुसारच चालावं लागतं. कलाकाराला हे सगळं करावं लागतंच व त्यासाठी त्याच्या अंगी अभिनयकौशल्य असावं लागतं. काही प्रमाणात सरावानंही तो यशस्वी होऊ शकतो, सर्वात महत्त्वाचे म्हणजे तो शिक्षित व सुशिक्षित हवा. त्याचे वाचन चांगले पाहिजे. निरीक्षणशक्ती उत्तम पाहिजे. भाषेवर प्रभुत्व पाहिजे. शब्द उच्चारण चांगले पाहिजे. (अपवाद असू शकतात.) बरेचसे कलाकार डॉक्टर, इंजिनिअर, द्विपदवीधर, कमीत कमी पदवीधर तर आहेतच. मग ते नाट्यक्षेत्र असो किंवा चित्रपटक्षेत्र असो. नाहीतर आता कुठेच काही जमत नाही म्हणून चला नाट्यचित्रपट क्षेत्रात जाऊ. तुम्ही समजता इतकं हे क्षेत्र सोपं नाही. रात्रंदिवस मेहनत करावयाची तयारी पाहिजे. वेळेचं बंधनही रहात नाही. ही काही नोकरी नाही, नऊ ते पाच काम केलं की संपलं. हे सगळं जमवून कलाकाराला अभिनयाचा आपला एक वेगळा ठसा उमटवून प्रेक्षकांच्या मनी उतरावे लागते. त्यात भरपूर कॉम्पिटिशन. तू नाही तर दुसरा आहेच. यात जर तुम्ही यशस्वी ठरला व काही गोष्टींच्या आहारी गेला नाही तर कदाचित सरतेशेवटी तुम्ही गाठीला काही शिल्लक ठेवू शकता.

तुमची इच्छाशक्ती व आत्मविश्वासावर नाट्य क्षेत्रात तुम्ही यशस्वी होऊ शकता. मग पुढचं पाऊल. चित्रपट व दूरदर्शन मालिका. एकदम वेगळं क्षेत्र. ग्लॅमरस व श्रीमंत. म्हणूनच जास्त जबाबदारी, जास्त मेहनत. ह्या क्षेत्रात तुम्ही क्षणांत घराघरात प्रवेश मिळवता. ह्यात प्रेक्षक तुमच्याकडे येत नाही तर तुम्ही प्रेक्षकांच्या जवळ जाता. कौतुकही लगेच सुरू होतं. तुम्हाला डोक्यावर घेतलं जातं. तसेच क्षणात खाली आपटलंही जाऊ शकतं. माझ्यामते ह्या पडद्याच्या क्षेत्राकडे येण्याअगोदर कलाकाराने रंगमंचावर जास्त काम केले तर ते त्याच्यादृष्टीने जास्त फायदेशीर ठरेल.

नाटकात सगळं नॉनस्टॉप. ना कट ना रिटेक, पण पडद्याच्या माध्यमाचं सगळंच वेगळं; ह्यात खरी तुमची चिकाटी व पेशन्स पणाला लागतात. ह्यात नाटकासारखे काही सलग नसते. सगळं काही त्या-त्या वेळेच्या परिस्थितीवर अवलंबून.

आणि चित्रित केलेले उत्तमातले उत्तम प्रेक्षकांना दाखवायचे. ह्यात प्रेक्षक हा नंतरचा भाग असतो. पण नाटकात कलाकार व प्रेक्षक एकाच वेळी समोरासमोर असतात. इथं कलाकार असं म्हणून शकत नाही, 'सॉरी, हा डायलॉग परत घेतो.' हे चित्रीकरणाच्या वेळी चालू शकते, नाटकात नाही. पण असे नाटकात सहसा होत नाही आणि होऊन चालणारही नाही. आणि समजा, झालेच तर समोरचा कलाकार लगेच सांभाळून घेतो. खरेतर नाटकाच्या तालमीत दिग्दर्शकाच्या मार्गदर्शनाखाली कलाकार स्वत:ला परिपूर्ण करावयाचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी त्याला बऱ्याच लोकांची साथ असते. जसे दिग्दर्शक, लेखक, नेपथ्य, कपडेपट, रंगभूषा, लाईट म्युझिक ह्या सगळ्यांच्या मदतीने कलाकार स्टेजवर पूर्ण होतो. ह्या

सगळ्यांना साथ असते ते अगदी ट्रान्सपोर्ट, जाहीरातदार ते तिकीटविंडोवर तिकीट विक्री करणारे आमचे सहकारी मित्र असो किंवा ह्या सर्वांच्या अडीअडचणींवर मात करून काम सुरू करणारा आमचा मॅनेजर असो. सर्वांच्या अडीअडचणी किंवा तक्रारींचे शांत डोक्याने निवारण करणे हे तसे सोपे काम नसते. न चिडता न भडकता सर्वांशी प्रेमाचे संबंध ठेवून प्रयोग पार पाडणे ह्यात मॅनेजरचा फार मोठा वाटा असतो. ज्यात वरचीही मॅनेजमेंट त्याच्याकडेच असते. ह्या सर्व धावपळीत घरच्यांनाही आनंदी ठेवणं तेही स्वत:च्या तब्येतीची पर्वा न करता ही तारेवरची कसरतच आहे. कलाकाराच्या वाट्यालाही ही कसरत असतेच. फक्त त्यांना त्वरित बदली कलाकार देऊन बाजूला होता येत नाही. कधी कधी तापाने फणफणलेल्या अवस्थेतही नाइलाजाने प्रयोग करावा लागतो.

नटाला कामाच्या व्यस्ततेमुळे विश्रांती हा प्रकार नसतोच. पण आराम करून कसे चालेल, घरप्रपंच आहे. घरगुती अडचणी, घरातले कमीत कमी वास्तव्य, घरापासून कायम दूर. त्यात कधी मोकळा दिवस मिळाला तर स्वत:ची कामे, पोराबाळांची औषधपाणी, बायकोची हौसमौज यात रमून जायचे.

**नटाला कामाच्या व्यस्ततेमुळे विश्रांती हा प्रकार नसतोच. पण आराम करून कसे चालेल, घरप्रपंच आहे. घरगुती अडचणी, घरातले कमीत कमी वास्तव्य, घरापासून कायम दूर. त्यात कधी मोकळा दिवस मिळाला तर स्वतःची कामे, पोराबाळांची औषधपाणी, बायकोची हौसमौज यात रमून जायचे.**

कलाकार हा स्वत:साठी कमी व प्रेक्षकांसाठी व इतरांसाठी जास्त जगतो व जगवतो. कायम आनंदी राहतो. ह्यात त्याच्या घरच्यांचा सर्वात मोठा वाटा असतो.

कलाकारांना प्रयोगाच्या वेळी फार मजेशीर प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यातल्या त्यात मंडळाच्या कॉन्ट्रॅक्टचे प्रयोग असले तर विचारूच नका.

असाच एक संस्थेला दिलेला प्रयोग होता. प्रयोग हाऊसफुल्ल. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या आवाजात कलाकारही रंगात आले होते. प्रयोगही चांगलाच रंगला होता. पहिला अंक संपला. अजून दोन अंक होते. पाहता पाहता रंगमंचावर पुढारी कार्यकर्ते ह्यांचे साम्राज्य प्रस्थापित झाले. भाषणंवर भाषणं सुरू झाली, सत्कार सुरू झाले. ते काही केल्या संपेना. आम्हाला काळजी पुढच्या दोन अंकांची. मॅनेजर अस्वस्थ फेऱ्या मारू लागला. पुढचे दोन अंक झाल्याशिवाय प्रयोगाचे पैसे मिळणार नाही ही त्याची काळजी. शेवटी न संकोचता आम्ही संयोजकांना पकडले व त्यांना सांगितले, अजून दोन अंक आहेत ते संपवून आम्हाला पुढच्या प्रयोगाला जायचे आहे. तो म्हणाला, ठीक आहे, दुसरा अंक किती वेळाचा आहे? आम्ही सांगितले, एक तासाचा आहे. तो लगेच म्हणाला, मग ठीक आहे. दुसरा अंक करू नका. डायरेक्ट तिसरा अंक करा. बरोबर वेळ ॲडजेस्ट होते. आम्ही सर्वजण मटकन खालीच बसलो. त्यांना आम्हां कलाकारांच्या भावनेशी काहीही देणेघेणे नसते. त्यांना नाटकाचे प्रयोग म्हणजे ह्यांच्या कार्यक्रमाला गर्दी गोळा करण्याचे एक साधन. सर्व कळत असून आमचा नाइलाज असतो.

ह्या सर्व प्रकारांचा धोका शुटिंगच्या वेळी फार कमी असतो. समजा, एखादा पुढारी, त्याचे कार्यकर्ते मुहूर्ताला आलेच तर पुढील शुटिंगचे काम पाहण्याचे पेशन्स त्यांच्यात राहात नाही. ते लगेच काढता पाय घेतात. इथे प्रत्येकजण आपापल्या कामात

असताना माझं आणि मुक्ताचं (माझी बायको) जमलं, पण नंतर बऱ्याचदा ते तुटायच्या मार्गावर होतं. मी वेळ न पाळल्यामुळे! मी तिला भेटायला एक वेळ द्यायचो आणि नेमके त्याच वेळेला काहीतरी काम निघायचे. आता त्यावेळी कामाला नाही म्हणता येणं शक्य नव्हतं, कारण उमेदवारीचा तो काळ आणि मुक्ताला कसं नाही म्हणणार? इकडे आड तिकडे विहीर. अशा प्रसंगी मी कामाला प्राधान्य देत असे. मुक्ता चिडत असे, पण बायकांच्या चिडण्याची सुद्धा वेळ ठरलेली असे. तुझं माझं जमेना अन् तुझ्यावाचून करमेना असं म्हणत आम्ही भेटायचो आणि जेवढा वेळ भेटायचो तो वेळ मजेत घालवायचो. त्यावेळी मोबाइल नव्हता.

पुढे स्टुडिओ चालू केला. मला वाटले होते की I.M.E. मध्ये आपण काम करतो म्हणजे सगळी जबाबदारी आपली. बॉस फक्त सांगून निघून जातात. पण स्वत:चा व्यवसाय चालू केल्यावर समजले की किती अवघड आहे एखादी फर्म चालवणे.

स्टुडिओ चालू केला त्या सुमारास संस्कार भारतीबरोबर काम करीत होतो. जवळ जवळ २०० कलाकारांना घेऊन 'क्रांतिसूर्य सावरकर' हे महानाट्य करण्याची जबाबदारी अंगावर घेतली. तेव्हा असं लक्षात आलं की एखाद्या ध्येयाने झपाटून काम करीत असताना काम कितीही अवघड असो, त्याचा त्रास होत नाही. आणि मोठे काम करीत असताना संघटन - व्यवस्थापन फार गरजेचे. आमच्या या कार्यक्रमाकरिता आठवड्यातून किमान तीन ते चार वेळा बैठका होत. मोहन शेटे नाटक दिग्दर्शित करीत होते. त्यांना दिग्दर्शनात मदत करणे आणि इतर सर्व कामे आखणे अशा दोन दगडांवर एकाच वेळी मी उभा होतो. तेव्हा आम्ही प्रत्येक कामाची जबाबदारी प्रत्येक एका व्यक्तीकडे दिली आणि त्याच्या हाताखाली साधारण ५ व्यक्ती होत्या. सर्वच जण एकाच वेडाने पछाडलेले. ते म्हणजे आपल्याला हे महत्कार्य पार पाडायचे आहे. आणि अत्यंत यशस्वीपणे आम्ही हे शिवधनुष्य पेलले. जवळ जवळ २५० लोकांची टीम एकत्रित काम करते तेव्हा सर्वांच्या वेळा, अडचणी, एकमेकांमधील हेवेदावे वर येणार नाहीत याची फार खबरदारी घ्यावी लागते. नाहीतर काम यशस्वी होऊ शकत नाही.

कधी कधी कामाच्या प्रचंड ताणामुळे एखाद्याला दिलेली वेळ पाळणं जमत नाही तर कधी कधी आपल्याला दिलेली वेळ लोकं पाळत नाहीत. एक छोटासा प्रसंग सांगतो. एकदा एका मित्राने फोन केला. 'मल्या, माझं अर्जंट एक काम आहे. प्लीज आजच्या आज व्हॉईस ओव्हर करून एडिट करून दे.' मी त्याला सांगितलं, 'अरे आज पूर्ण दिवस बुकिंग आहे.' 'मग रात्री करू. बारानंतर सुद्धा चालेल.' अशी त्याने मला गळ घातली. माझा एक वाईट गुण आहे. मी कुणाला नाही म्हणू शकत नाही. त्यामुळे मी त्याला घाईघाईत हो म्हटले आणि नंतर असे लक्षात आले की दिवसभर चालणारे रेकॉर्डिंग रात्री अडीचला संपणार आहे. मी परत माझ्या मित्राला फोन केला. 'अरे थोडा उशीर होईल.' तेव्हा आयत्या वेळेला आलेला माझा मित्र त्याच्या झोपेचं खोबरं होईल म्हणून माझ्यावरच चिडला. मला माझे सगळे नातेवाईक म्हणतात, 'कसलं तुझं काम? लोकांना जरा ९ ते संध्याकाळी ७ या वेळेत यायला सांग.' पण आमचा दिवस सातनंतर उजाडतो हे यांना कोण समजविणार?

लोकांना समोरच्या माणसाच्या वेळेची किंमत नसते. स्वत:चं काम असलं की केव्हाही फोन करतात. घर आणि स्टुडिओ जवळ असल्याचा हा मोठा तोटा.

माझ्या आजपर्यंतच्या कामांमध्ये गणपती मंडळांचे रेकॉर्डिंग हा एक मजेशीर आणि तेवढाच तापदायक अनुभव आहे. सर्व

**त्यावेळची एक गंमत सांगतो. आय.एम.इ. मध्ये नोकरी करीत असताना माझं आणि मुक्ताचं (माझी बायको) जमलं, पण नंतर बऱ्याचदा ते तुटायच्या मार्गावर होतं. मी वेळ न पाळल्यामुळे! मी तिला भेटायला एक वेळ द्यायचो आणि नेमके त्याच वेळेला काहीतरी काम निघायचे. आता त्यावेळी कामाला नाही म्हणता येणं शक्य नव्हतं, कारण उमेदवारीचा तो काळ आणि मुक्ताला कसं नाही म्हणणार?**

मंडळे गणपतीच्या दोन दिवस आधीपर्यंत झोपलेली असतात आणि मग एकदम सुनामी येते. मग प्रत्येकालाच आपलं काम लवकर मिळवण्याची घाई. अध्यक्षाचं नाव राहिलं, कार्यकर्ता नाराज होईल असे शब्द वापरून 'काय राव करा की एवढं' अशी गळ घालून काम भरकन् करून घेण्याच्या मागे हे सगळे लोक असतात, पण त्याचा प्रचंड ताण स्टुडिओवर पडतो हे ते लोकं लक्षात घेत नाहीत.

कधी कधी असा कामाचा ताण सहन झाला नाही की खोटं बोलावं लागतं आणि मोबाइल स्वीच ऑफ करावा लागतो. अति कामामुळे त्रास झाला की मी कोकणात जातो. तिथे मोबाइल वाजत नाही आणि (शहरातला) माणूस दिसत नाही. शांतपणे समुद्रावर पडून दोन दिवस माईंड फ्रेश करून पुढच्या कामाला तयार होतो. याच वेळात भविष्यात काय करावं आणि भूतकाळात कुठे कसं नियोजन चुकलं याचा विचार होतो. त्यावर उत्तर सापडते आणि पुढच्या प्रवासाला पुन्हा नव्या जोमाने सुरुवात करता येते.

नाट्य - चित्रपटक्षेत्रात वावरताना सांघिक काम यशस्वी करणे, लोकांना सांभाळून घेऊन काम करणे, लोकांमधील आणि आपल्यातील मैत्रीपूर्ण संबंध वाढविणे याकडे माझा कल जास्त आहे. प्रायोरिटी ठरवून कामं करताना कित्येक गोष्टींना बाजूला सारून (उदा. नाटकाचा ग्रुप, मित्र) काम करावे लागते. त्यांची चिडचिड होते पण ती माझ्याबद्दलच्या प्रेमातून होते. अशी माणसं आजूबाजूला असतील तर निश्चित एक चांगले कार्य हातून घडेल; ठरविलेले उद्दिष्ट वेळेवर पूर्ण होईल यात शंकाच नाही.

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | **महेश सुरेश लिमये** |
| **पत्ता** | : | डी १/५, मणिबंध कॉम्प्लेक्स, हिंगणे खुर्द, विठ्ठलवाडी, हॉटेल वृषाली लेन, नित्यानंद हॉलसमोर, पुणे ४११०५१ |
| **दूरध्वनी** | : | २४३४८१७५ |
| **जन्मदिनांक** | : | ३ सप्टेंबर १९७९ |
| **शिक्षण** | : | बी.कॉम. |
| **व्यवसाय** | : | ध्वनिमुद्रण आणि छायाचित्रण संकलन |

**कलाक्षेत्रात केलेले काम (व्यक्तिगत) :**

**१)** विजय कोंडके निर्मित- दिग्दर्शित माहेरची साडी या चित्रपटात बालकलाकार म्हणून काम.

**२)** राष्ट्रीय थिएटर फेस्टिव्हलमध्ये १९९८ साली 'ओपुन्शिया' ही दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिका असलेली एकांकिका सादर.

**३)** अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकरिता 'इतिहास रंगभूमीचा' या प्रकल्पामध्ये मास्टर अविनाश, भालचंद्र पेंढारकर, चित्तरंजन कोल्हटकर, निळू फुले, मधुकर तोडरमल, चंद्रकांत गोखले, अनंत वर्तक, लालन सारंग, श्रीकांत मोघे इ. कलाकारांच्या ध्वनि-चित्रफिती तयार केल्या आहेत.


# सर्व प्रकाशनांची लोकप्रिय पुस्तके एकत्र पहा, चाळा व सवलतीने विकत घ्या

**मिहीर उद्योग केंद्र**
'केशव अर्चना', गांधी चौक, अकोला.
फोन नं. ०७२४ - २४४२१३८



# शुभदा चौकर

**पत्रकार म्हणून मी डेडलाइन नावाच्या कैदाशिणीच्या अक्षरशः ऋणात आहे. ती नसती ना, तर काही खरं नव्हतं. एवढं काम झालंच नसतं हातून. तिनं काय काय दिव्य करवून घेतलंय!**

अर्थशास्त्र आणि पत्रकारिता या दोन्ही विषयांचा अगदी निकट संबंध आहे. अर्थशास्त्र हा विषय घेऊन बी.ए. होत असतानाच मी पत्रकारितेची वाट निश्चित केली होती. अर्थशास्त्र हा विषय पत्रकारितेच्या करिअरमध्ये उपयुक्त ठरेल असा सल्ला तेव्हा बुजुर्ग शिक्षकांनी दिला होता, पण अर्थशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांचे उपयोजन इतक्या चपखलपणे पत्रकारितेला लागू होईल, याची कल्पना मला या क्षेत्रात शिरण्यापूर्वी नव्हती. 'मॅक्झिमम युटिलायझेशन ऑफ स्केअर्स रिसोर्सेस' आणि 'लॉ ऑफ डिमिनिशिंग मार्जिनल युटिलिटी' ही अर्थशास्त्रातली प्रमुख तत्त्वं. पत्रकारितेत ती ठायी ठायी लागू होतात. या करिअरच्या सुरुवातीला जेव्हा याची जाणीव झाली तेव्हा मला या योगायोगाची भारी गंमत वाटली.

आम्ही पत्रकार फार थोडक्या साधनसामुग्रीच्या व वेळाच्या जोरावर रोजच्या रोज वेळेत वृत्तपत्राची निर्मिती करीत असतो. वेळ फारच मर्यादित. त्यात अधिकाधिक माहिती मिळवायची. कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त पैलूंचा विचार करायचा; लेखनाची दिशा ठरवायची; कमीत कमी वेळेत आणि कमीत कमी जागा व्यापत आपले विचार शब्दबद्ध करायचे किंवा आपली माहिती वाचकांपर्यंत पोहोचवायची. या लेखनासाठी शांतपणा, मूड, निवांतपणा, पुरेसे संदर्भस्रोत... वगैरेंची अपेक्षा ठेवणं तर फारच अनाठायी.

एखाद्या सार्वजनिक कार्यालयापेक्षाही काही सार्वजनिक असेल तर ते वृत्तपत्राचं कार्यालय. मंत्रालयसारख्या कार्यालयांना तरी वेळ-काळ असते. वृत्तपत्र-कार्यालयात सकाळी ११ ते रात्री ११ असे बारा तास अव्याहतपणे लोकांची आवक-जावक चालू असते. कुणी बातमी द्यायला, कुणी तक्रार नोंदवायला, कुणी जाब विचारायला, कुणी लेखक घेऊन, कुणी पीडित मदत मागायला, कुणी वाचक जिव्हाळ्यापोटी सहज भेटायला– असा माणसांचा राबता सुरूच असतो. हा अखंड वाहता माणसांचा झरा कमी म्हणावा, इतके अचाट संख्येने फोनकॉल्स येत असतात. आणि त्या फोनकॉल्सचं निमित्त काहीही असू शकतं – अगदी कल्पनेपलीकडचं. अलीकडे 'बालरंग'च्या कव्हरवर आम्ही विंदांची 'पत्ता' कविता छापली होती, 'गणपतीला असते शाळा, असतो हा अभ्यास' हा त्या कवितेतला संदर्भ घेऊन बालगणपतीचं खांद्यावर दप्तर व गळ्यात वॉटरबॅग घेतलेलं आमच्या नीलेश जाधवचं मस्त चित्र त्यावर छापलं होतं. आम्ही सर्व संपादकीय टीममधली मंडळी त्या बालरंग-निर्मितीवर जाम खूश होतो. आतल्या पानांवरही दोन छान गणपती होते. एक अक्षरलेखनकार अच्युत पालवांचा भौमितिक गणेश आणि दुसरा नीलेशचा भाज्यांपासून बनवलेला गणपती – मजकूरही मनासारखा जमला होता. 'बालरंग' वितरित झाल्याबरोबर सुरुवातीचे काही फोन तो आवडल्याचे आलेच – अपेक्षेप्रमाणे. पण दुसऱ्या दिवशीपासून अकल्पितच घडलं. कव्हरवर तुम्ही शाळकरी गणपती छापून गणपतीचा अपमान केलाय, अशा आशयाचे फोन सुरू झाले. अगदी दर पाच मिनिटाला एक फोन याप्रमाणे हेच वाक्य बोलणारे फोन येऊ लागले. बहुदा ती संस्कृतिरक्षकांची टोळी असावी. आणि प्लॉट केल्याप्रमाणे ठरवून सतत फोन करत राहिली असावी. ते त्रासदायक फोन संयमाने स्वीकारत, त्यांना शांतपणे उत्तरे देत आम्ही मंडळी आमचं 'लोकरंग' निर्मितीचं काम निर्वेधपणे पार पाडीत होतो. कारण आमचं काम पुढे ढकललं जाऊ शकत नाही. दैनंदिन आवृत्तीचं तर नाहीच नाही, पण साप्ताहिक

पुरवण्यांचंही नाही. कारण साप्ताहिक पुरवण्यांनाही 'डेडलाईन' असते. प्रिंटिंगचंही एक ठराविक वेळापत्रक असतं व ते पाळलं नाहीतर वेळच्या वेळी पुरवणी वितरित होऊ शकत नाही.

तात्पर्य काय, तर अशा धबडग्यात पत्रकार मंडळी काम करत असतात. आमची कार्यालये म्हणजे कॉर्पोरेट हाऊससारखी बंदिस्त, निवांत आणि फॉर्मल नाहीत. पत्रकारांचं वाचकांशी अतिशय अनौपचारिक नातं असतं. ते जपत, विकसित करत हा व्यवसाय पुढे चालू असतो. वाचक हक्काने, आपुलकीने वृत्तपत्रातील पत्रकारांशी संपर्क ठेवत असतात. 'ग्राहको देवो भव' या उक्तीनुसार त्यांचा आदर ठेवत, त्यांचा संपर्क हा अडथळा न मानता, पत्रकारमंडळी नेहमीची कामं वेळच्या वेळी पार पाडत असतात. बातमी मिळवत असतात, बातमीची सत्यासत्यता पडताळत असतात, त्या आनुषंगिक माहिती मिळवत असतात, एखाद्या बातमीवर विश्लेषणात्मक लिखाण करीत असतात, वैचारिक लेखन करीत असतात, अतिरिक्त माहितीपर विस्तृत लेख साकारला होता. चारपाच दिवसांत संपूर्ण प्रोजेक्ट पार पाडला होता. झटपट काम करणं हे वृत्तपत्रसृष्टीचं पहिलं तत्त्व. या लेखानंतर सर्व प्रकारच्या भावना व्यक्त करणारे अनेक फोन मी घेतले होते. समाजातला बदल झटकन व पहिल्यांदाच टिपल्याबद्दल अभिनंदनपर, लेखनकौशल्याची प्रशंसा करणारे, समाजातील या नव्या ट्रेंडवर स्वत:चं अनुकूल-प्रतिकूल मत प्रकट करणारे, अशा ठिकाणी जाऊन माहिती मिळवल्याबद्दल माझ्या धैर्याचं कौतुक करणारे, असे विषय करताना 'जरा जपून' असा संदेश देणारे– बहुपेडी वाचकांशी मग नाळ जुळत गेली ती कायमचीच.

या प्रतिसादावरून काही कायमस्वरूपी धडे मिळत असतात. ज्या वृत्तपत्रात आपण काम करतो, त्याचा वाचक नेमका कसा आहे, त्याच्या भावना, विचारसरणी, आवडी-निवडी याबद्दल अधिकाधिक कळत जातं. पत्रकार आणि त्यातही संपादक म्हणून यशस्वी व्हायचं तर 'आपला वाचकवर्ग ओळखणं' ही कळीची

**डेडलाइन पुढ्यात उभी ठाकल्याशिवाय कागद-पेन किंवा आजच्या जमान्यात की-बोर्ड चालवायचा नाही ही वाईट सवयही पत्रकारितेमुळे जडलीय. डेडलाइन लांबची असेल तर आधी जेव्हा निवांतपणा मिळेल तेव्हा लिहून ठेवावं. पण छे! हे जमतच नाही. जेव्हा छापला जाणार, तेव्हाच ताजा-ताजा मजकूर लिहायचा. हाच शिरस्ता झालाय.**

काही लिहीत असतात. आजूबाजूच्या घटना, समाजातले विचार, बदल अशा अनेक विषयांबद्दल अधिकाधिक मजकूर रोज निर्माण होत असत. या कार्यालयात आणि हा सृजनाचा सोहळा अत्यंत घाई-गडबडीच्या वातावरणात फुलत असतो.

करिअरच्या सुरुवातीला हे सारं मलाही कठीण वाटायचं. त्यातही मी 'फ्री प्रेस जर्नल'मधून 'लोकसत्ता'त आलेली. 'फ्री प्रेस जर्नल'चा वाचकवर्ग फारच थोडा. तिने रोजच्या रोज वाचकांशी संवाद होण्याचा प्रसंग विरळाच. उलट आपण काहीही लिहिलं तरी प्रतिसादच नाही, ही खंत वाटायची. अशा पेपरमधून मी 'लोकसत्ता'त आले आणि वाचकांच्या प्रतिसादाने भारावून गेले. जरा काही चांगलं लिहिलं की वाचकांच्या कौतुकाचा वर्षाव व्हायचा आणि मग अंगावर मूठभर मांस चढायचं.

१९९३ च्या सुमारास मुंबईत लेडीज सर्व्हिस जेंटस् ब्युटी पार्लरचं पेव फुटलं होतं. अनेक जेंटस् सलूनमध्ये वस्तरा लेडीज्च्या हाती आला होता. वस्तरा चालवता चालवता त्या 'ग्राहकाची मागणी व समाधान' या तत्त्वानुसार सलूनमध्ये आलेल्या पुरुषांना हेड मसाज, फेस मसाज, फेशिअल अशा सुविधाही त्या महिला-सेविका पुरवू लागल्या होत्या. मी हा प्रकार पाहिला आणि त्यावर विस्तृत लेख लिहिला होता. या सेविकांच्या मुलाखती, या सलूनमध्ये जाणाऱ्या ग्राहकांशी गप्पा, सलून-मालकाशी प्रश्नोत्तरं यातून तो बाब असते. आज 'चतुरंग-लोकरंग'चं संपादन करताना अनेक धीट विषय हाताळले आहेत. काही चोखंदळ वाचकांनी त्याची वेळोवेळी दादही दिली आहे; त्या धीटपणाचं कौतुकही केलं आहे. पण हा धीटपणा दाखवण्याचं बळ त्या त्या वेळी येतं, ते आमचा वाचकवर्ग पक्का माहितीये म्हणून. आमच्या वाचकांच्या अभिरुचीबद्दल मला खात्रीने माहीत असतं आणि त्यामुळे कुठला विषय, कोणत्या वेळी, कशा पद्धतीने हाताळावा – हे कळत जातं. अगदी अलीकडचं उदाहरण देते. 'विटाळ संकल्पनेचं भूत' हा विषय गेली अनेक वर्षं मनात घोळत होता. पण तो विषय विनासंदर्भ मांडला, तर समाज तो स्वीकारेल का, अशी शंका मनात होती. 'शबरीमलय' विटाळल्याची व शुद्धीकरणाची बातमी आली आणि मग तातडीने 'विटाळ' हा विषय हाताळायचं ठरवलं. 'शबरीमलय'च्या बाबतीत प्रतिगामी भूमिका घेणारे 'संस्कृतिरक्षक' मोजपट्टीच्या टोकावर उभे असले तरी त्याच मोजपट्टीच्या मध्यावर कुठेतरी आपला सुशिक्षित मराठी समाजही आहे, जो शिवाशिव पाळतो, ऋतुमतीला देवधर्म करणं वा देवळात प्रवेश नाकारतो, घरच्या देवधर्मकांडात बाजूला बसवून ठेवतो, पाळीपुढे जाण्यासाठी गोळ्या घेतो... मासिक पाळीविषयक बुरसट कल्पना दूर फेकण्याचा आग्रह धरणारे हे लेख छापताना टायमिंग जुळवून येण्याची प्रतीक्षा मी करीत होते. 'शबरीमलय'ने वातावरणनिर्मिती झाल्यावर हा विषय घ्यायचं ठरवलं आणि तो

'हिट' झाला. त्याला उत्तम, सकारात्मक आणि मराठी पुरोगामित्व सिद्ध करणारा प्रतिसाद लाभला.

गेल्या वर्षी जेव्हा 'A चित्रपट' दूरचित्रवाणीवरून न दाखवण्यासंदर्भात कायदा झाला, तेव्हा दूरचित्रवाणी या माध्यमाचं बल व मर्यादा, पालक-प्रेक्षकांची भूमिका अशा विषयांचा ऊहापोह करणारे लेख मी लिहिले, तेही असेच – टायमिंगचा फायदा घेत. मुलींना मोफत शिक्षण कशाला, 'नेट'च्या विळख्यातली तरुणाई, 'शिक्षा'प्रद शिक्षण, जड मोत्याचे आत्मवृत्त, का नको मराठी शाळा? टीनएज मुलांचं असं का होतंय? असे माझे काही वाचकप्रिय ठरलेले लेख याच सदरात मोडणारे. विषय बराच काळ मनात रेंगाळलेला – पण प्रत्यक्ष लेखन मात्र त्या त्या वेळच्या घडामोडींच्या अनुषंगाने, टायमिंगचा फायदा उठवत, झटपट, अगदी मोजक्या वेळात एकटाकी लिहिलेले. एकटाकी लेखन ही तर पत्रकारांची खासियतच. 'रफ-फेअर'साठी वेळ कुठे असतो? डेडलाइन नामक त्यामुळे आधी मी ते समजून घेणं आणि मग आमच्या वाचकांना समजेल अशा रीतीने लिहिणं – असा तो लांबलचक रस्ता होता; शॉर्टकट हा पर्यायच नव्हता. मीही त्या हर्षद मेहताच्या केसमध्ये इतकी समरसून गेले होते की ते सर्व कष्ट आनंदाने घेत होते. 'डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक्स' कायम पर्समध्ये बाळगत होते. दरम्यान वित्तीय संकल्पना समजायला अडचण होते, हे लक्षात आल्याने मी मुंबई विद्यापीठाचा 'फायनान्शिअल मॅनेजमेंट'चा डिप्लोमाही करायला घेतला.

जागतिकीकरणाचे धोरण जाहीर झाल्यानंतरच्या काळातही बातमीदार म्हणून अशी अनेक आव्हानं आली. रुपया परिवर्तनीय झाल्याची रिझर्व्ह बँकेची घोषणा ही असंच एक आव्हान घेऊन आली. रिझर्व बँकेच्या त्या पत्रकारपरिषदेला मी हजर होते. ते स्टेटमेंट स्पष्ट पण त्रोटक होतं. 'रूपी इज नाऊ कन्व्हर्टेबल ऑन करंट अकाऊंट' हे आणि इतकंच ते स्टेटमेंट होतं. आता त्याचं

**आजूबाजूच्या घटना, समाजातले विचार, बदल अशा अनेक विषयांबद्दल अधिकाधिक मजकूर रोज निर्माण होत असत. या कार्यालयात आणि हा सृजनाचा सोहळा अत्यंत घाई-गडबडीच्या वातावरणात फुलत असतो.**

कैदाशीण सतत तलवार घेऊन उभी ठाकलेली असते ना समोर!

पत्रकार-लेखक म्हणून मी या डेडलाइन नावाच्या कैदाशिणीच्या अक्षरश: ऋणात आहे. ती नसती ना, तर काही खरं नव्हतं. एवढं काम झालंच नसतं हातून. तिने काय काय दिव्य करवून घेतलंय...

माझ्या उमेदीच्या काळात, 'लोकसत्ता'त प्रवेश केल्याकेल्या हर्षद मेहताची केस कव्हर करण्याचं काम मला मिळालं. हे काम भयंकर अवघड होतं. शारीरिक व बौद्धिक कुवतीची परीक्षा घेणारं होतं. त्या पाचसहा महिन्यांत मी हर्षद मेहतामय झाले होते. सकाळी कोर्टात जायचं, दुपारी एखाद्या बँकेत किंवा युनिट ट्रस्ट वा तत्सम वित्तीय आस्थापनेत जाऊन गफल्याची बित्तंबातमी खणायचा प्रयत्न करायचा, संध्याकाळी सीबीआय कार्यालय वा रिझर्व बँक – अशा बहुस्थळी यात्रा करायची. रात्री ऑफिसमध्ये येऊन बातमी फाईल करायची. अनेकदा ती न्यायालयीन भाषा वा वित्तीय आकडेमोड डोक्यावरून जायची. न्यायालयीन अडचण तत्पर दूर व्हायची, कारण कायदेतज्ज्ञ, वरिष्ठ सहकारी अजित गोगटे ती बाजू सांभाळायचे. वित्तीय बातमीतल्या अडचणी सोडवायला मग 'इंडियन एक्सप्रेस'चे वरिष्ठ सहकारी रघुनंदन धर यांचा आधार घ्यावा लागायचा. बिनचूक आणि आमच्या मराठी वाचकाला कळेल अशी बातमी डेडलाईनपूर्वी लिहायची हे दिव्य होतं. इंग्रजी पत्रकार अनेकदा बँकेची परिपत्रकं किंवा सीबीआयचं स्टेटमेंट जसंच्या तसं छापून मोकळे व्हायचे. पण मला मात्र माझ्या वाचकांसाठी भाषांतर करण्यावाचून गत्यंतर नव्हतं. आणि तेही शब्दश: केलं तर वाचकांना कळणं दुरापास्तच. शब्दश: भाषांतर केलं असतं तर ते माझ्या वाचकांना कळणं शक्य होतं का? मग मी ऑफिसमध्ये आले आणि त्या स्टेटमेंटशी लढू लागले. माझ्या अर्थशास्त्रीय ज्ञानाची मर्यादा स्पष्ट झाली होती, पण बेसिक संकल्पना पक्क्या होत्या. त्या बळावर डिक्शनरी ऑफ इकॉनॉमिक्सचा आधार घेत, अर्थशास्त्राच्या माझ्या प्राध्यापकांशी सल्लामसलत करून मी 'परिवर्तनीय रुपया म्हणजे काय?' हा लेख लिहिला. अक्षरश: एका तासात. दुसऱ्या दिवशी 'रुपया परिवर्तनीय झाला' या बातमीसोबत ठळक चौकटीत तो माझा लेख होता. इतक्या पटकन त्या बातमीचा अर्थ सोप्या भाषेत स्पष्ट केल्याबद्दल माझ्या संपादकांची व वाचकांची प्रशंसा मिळाली होतीच; पण चक्क अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव, डॉ. पी. आर. जोशी अशांचीही शाबासकी मिळाली होती! आज त्याचीही कात्रणंही माझ्याकडे नाहीत, पण ते कौतुकाचे भाव मेमरी बॉक्समध्ये स्टोअर झालेले आहेत!

बातमीदारीच्या प्रांतात अर्थ-व्यापार, शिक्षण अशा विषयांवर मुशाफिरी करता करता अचानक आणि अपघाताने फीचर्स विभागात प्रवेश झाला, तो जरा नाखुषीनेच. त्या विभागातले काही जण नोकरी सोडून गेल्याने तिथे गरज निर्माण झाली होती. तोपर्यंत मी हौसेखातर फीचर्स लिहू लागले होते. त्यामुळे माझी त्या विभागात हंगामी बदली झाली. ती मी नाखुषीनेच स्वीकारली. तेव्हा डॉ. अरुण टिकेकर (तत्कालीन संपादक) मला म्हणालेही, 'बघ, हे काम तुला आवडेल.' त्यावेळी ते फारसं पटलं नव्हतं, पण पुढे

मात्र त्या कामात मी रमले, याची कबुली टिकेकरांना दिलीही. पुरवणी विभागात आल्यानंतर लिखाण, संपादन व प्रत्यक्ष निर्मिती असं बहुपेडी काम करण्याची संधी मिळाली. हे काम तुलनेने अधिक कौशल्याचं वाटू लागलं. तेव्हाचे पुरवणी समन्वयक दत्ता पंचवाघ यांच्या मार्गदर्शनाखाली काटेकोर संपादनाचं ट्रेनिंग मिळालं. पुढे मग २००१ साली- 'चतुरंग' व त्यानंतर 'लोकरंग' या अनुक्रमे शनिवार व रविवारच्या पुरवण्यांचं स्वतंत्रपणे संपादन करण्याची संधी मिळाली. आत 'बालरंग'ही मी पाहते.

या तीनही पुरवण्यांचे विषय ठरवणं, त्यासाठी वेगवेगळ्या लेखकांशी संपर्क साधून त्यांच्याकडून लिहवून घेणं, त्याचं संपादन, प्लेसमेंट आणि सौंदर्यपूर्ण मांडणी – असं हे कामाचं चक्र चालू असतं. दर आठवड्याला नवनवीन विषय काढणं व त्यासाठी लेखक शोधणं हे आव्हान असतं. अर्थात संपादकांची साथ असते. कुमार केतकर आणि तत्पूर्वी अरुण टिकेकर हे दोन्हीही विद्वान संपादक बॉस म्हणून लाभल्याने हे आव्हान 'लोकसत्ता' कायम पेलू शकतंय. आज 'लोकसत्ता'च्या पुरवण्यांना मोठा वाचकवर्ग आहे. कुमार केतकरांची सततची सामीलकी आणि स्वातंत्र्य यामुळे मीही हे काम एन्जॉय करतेय.

पुरवणी निर्मितीच्या या प्रवासात अनेक प्रकारचे लेखक भेटतात. काही थोडके लेखक असे असतात की ज्यांना विषय सांगताच ताबडतोब तो कळतो व त्यावर ते चांगलं लिहून देतात. परंतु अशा लेखकांची संख्या कमीच. बाकी बऱ्याच लेखकांना सविस्तर ब्रीफ द्यावं लागतं. काहींकडून पुन्हा लिहून घ्यावं लागतं. काहींच्या लेखनावर संपादकीय संस्कार करताना पुनर्लेखन करावं लागतं. अनेक जण असे असतात ज्यांच्याकडे वाचकांना सांगण्यासारखं खूप असतं. कुणाकडे वेगळा अनुभव असतो, कुणाचा वेगळा अभ्यास असतो, पण लेखनकौशल्य नसतं. अशांना लिहितं करणं हे जरा जिकिरीचं पण समाधानाचं असतं. असे अनेक लेखक घडवण्याचं भाग्य मला 'लोकसत्ता'च्या कृपेने मिळालंय.

बऱ्याच लेखकांना 'डेडलाईन' पाळत, तातडीने लिहून देणं हा जाच वाटतो. आम्ही एखाद्या लेखकाला फोन करावा आणि म्हणावे, 'अमुक या विषयावर लिहून द्या. आज सोमवार आहे, लेख बुधवारी हवाय.' अशावेळी बहुतेकांची प्रथम प्रतिक्रिया असते, 'छे! एवढ्या तातडीने कसं लिहून होईल.' मात्र आग्रहाने सांगितलं, होईल हो, असा दिलासा दिला की लिहून मिळतंही. 'दमछाक झाली हो, एवढ्या चटकन लिहिताना' या त्यांच्या प्रतिक्रियेवर आमचं उत्तर असतं – 'डेडलाइनच्या प्रेशरखाली चांगलं लिहून होतं. अन्यथा या विषयावर लिहायचं राहून गेलं असतं ना!' यावर मग प्रत्येक जण सहमत होतो.

डेडलाइन पुढ्यात उभी ठाकल्याशिवाय कागद-पेन किंवा आजच्या जमान्यात की-बोर्ड चालवायचा नाही ही वाईट सवयही पत्रकारितेमुळे जडलीय. डेडलाइन लांबची असेल तर आधी जेव्हा निवांतपणा मिळेल तेव्हा लिहून ठेवावं. पण छे! हे जमतच नाही. जेव्हा छापला जाणार, तेव्हाच ताजा-ताजा मजकूर लिहायचा. हाच शिरस्ता झालाय.

आम्ही पत्रकार केव्हाही, कुठेही, लिहितो. विषयाची निकड व तातडी हेच अनेकदा लेखनाला प्रेरित करत असतात. काहीतरी लिहिण्याची उर्मी जरूर असते, पण 'सहज सुचलं म्हणून' वगैरे फार क्वचित. संपादकांचा आदेश, एखाद्या विषयावर आपल्याकडे अधिक सांगण्यासारखं असणं आणि वृत्तपत्राची निकड म्हणून ती वेळ साजरी करणं – अशा काही कारणांनी आम्ही लिहीत असतो. अधिकाधिक चांगलं वाचकांना देण्याची आस मनोमन असते. आयत्या वेळी लिहितो म्हणून कसंतरी ते पूर्ण करायचं, असा भाव मनात नसतो; तर मजकुरातील मुद्दे, विचार आणि शैली या सर्व निकषांवर आपलं लेखन सकस व्हावं, यासाठी आम्ही पत्रकार आग्रही असतो.

आजच्या जमान्यातले अनेक ज्येष्ठ पत्रकार असे आहेत, ज्यांनी विपुल लेखन केलंय. ज्येष्ठ म्हणजे वयाने सीनिअर नव्हेत, कार्याने. अनेकांनी आपापले विषय ठरवले आहेत. त्या विषयांची इत्थंभूत माहिती त्यांच्याकडे असते. मतं असतात, विचार असतात. वेळोवेळी जुने संदर्भ देत, नवा विचार मांडत वाचकांना दिशादर्शन करण्याचं आणि वाचनानंद मिळवून देण्याचं काम वृत्तपत्रांतील लेखक करत असतात. अनेक वाचक वृत्तपत्रांतील लेखांची कात्रणं काढून ठेवतात. त्या त्या लेखकांना फोन करून, पत्र पाठवून दाद देतात. काही लेखांवर चर्चा करतात. 'का नको मराठी शाळा?' या माझ्या लेखाचं तर पुढे एका मंच-निर्मितीत रूपांतर झाले. त्या लेखावरून एक चांगली चळवळ उभी राहिली. 'चतुरा' पुरवणी सुरू करतानाच 'म्हणे मी चतुरा' हा लेख मी मुंबई-पुणे प्रवासात लिहिला होता. त्यात ललितकथेचा फॉर्म वापरला होता.

बैठक-बिठक न मारता, प्रचंड धबडग्यात पत्रकारमंडळी लिहीत असतात. आमचे संपादक कुमार केतकर यांना तर याबाबतीत सलाम ठोकायला हवा. ते कारमध्ये, ट्रेनमध्ये तर लिहितातच, पण अनेकदा भेटायला येणाऱ्या लोकांची रीघ लागलेली असते आणि त्यांना भेटता-भेटता, त्यांचं म्हणणं ऐकून घेता घेताही केतकर सर लिहीत असतात.

लिहिते पत्रकार हे खरे हुकमी लेखक. पण तरी आजही पत्रकार म्हटलं की बहुतांश समाजाच्या डोळ्यांसमोर बातमीदाराचीच इमेज येते. प्रत्यक्षात बहुतांश पत्रकार हे सुरुवातीची बातमीदारीची काही वर्षं सरली की स्वतंत्रपणे लेखन करू लागतात – कधी माहितीपर तर कधी वैचारिक. काहीजण ललित लेखनाकडे वळतात, काहीजण व्यक्तिमत्त्व रेखाटन उत्तम करू लागतात, काहीजण विनोदी खुसखुशीत लिहितात. आज आमच्या 'लोकसत्ता'च्या कार्यालयात असे अनेक उत्तम पत्रकार-लेखक आहेत, ज्यांनी बाहेर लेखक म्हणून इमेज निर्माण केली आहे. नावं घ्यायची म्हटली तर एक-दोन नाही अनेक घ्यावी लागतील म्हणून ती इथे घेणं टाळतेय. पण सच्चे वाचक त्यांना ओळखतातच.

'लोकसत्ता'च्या माजी संपादकांपैकी विद्याधर गोखले, माधव गडकरी, डॉ. अरुण टिकेकर व आत्ताचे संपादक कुमार केतकर यांनी उत्तम लेखक म्हणून नाव मिळवलंय. आजच्या पिढीतही तो वारसा अनेकजण पुढे चालवू पाहताहेत. माझे अनेक पत्रकार सहकारी आज उत्तम लिहून वाचकांची पसंती मिळवताहेत. अगदी साहित्यिकांचीही दाद मिळवताहेत.

खंत वाटते की, तरीही पत्रकार-लेखकांना साहित्यवर्तुळात स्थान मिळत नाही, याचं. अर्थात याची खंत करत बसायला ना वेळ असतो, ना रुची असते. पत्रकार सेवेत असेपर्यंत तरी लेखणी चालवत राहणारच असतो. त्याला इतर प्लॅटफॉर्मचीही गरज नसते, कारण काही लाख खपाचं वृत्तपत्र हा त्याचा हक्काचा मंच असतो. पण साहित्यवर्तुळ पत्रकारांना दुय्यम स्थान का देतं, हे मात्र कोडं वाटतं. पत्रकार-लेखकांना समाजातील अनेक सांस्कृतिक मंडळं कायम आमंत्रित करीत असतात, पण साहित्य संमेलनांमध्ये मात्र हे आमंत्रित नसतात. गेल्याच वर्षीच्या साहित्य संमेलनात 'मराठी विनोदनिर्मिती कमी का?' या विषयावर परिसंवाद होता. त्या परिसंवादात आमच्या 'हास्यरंग' पुरवणीचं यश मान्य करून, त्या यशाचं गमक जाणून घेण्यासाठी त्या पुरवणीचे समन्वयक श्रीकांत बोजेवार यांना बोलावण्याचं औचित्य संमेलन-आयोजकांना का वाटलं नाही? तीच बाब 'महिलांचं लेखन' या विषयावर वारंवार संमेलनात घडणाऱ्या चर्चेची. 'चतुरंग'ने गेल्या काही वर्षांत अनेक महिलांना लिहितं केलंय. विविध विषय दर्जेदारपणे हाताळते. पण साहित्यवर्तुळ त्याची पुरेशी दखल का घेत नाही? आज अनेक नवोदित लेखकांना वृत्तपत्रसृष्टी घडवतेय. आधी त्यांचं लेखन वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतं, त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्याचं समजताच प्रकाशक त्यांना गाठतात. मग त्यांची पुस्तकं होतात. या नवोदित लेखकांना साहित्य संमेलनात कुठे स्थान मिळतं?

पत्रकार-लेखकांच्या बहुतांश लेखनाला तात्कालिकता असते. पण म्हणून ते दुय्यम ठरत नाही. तात्कालिकता हे निमित्त असतं. त्या लेखनातील आशय आणि शैली या निकषांवर ते सार्वकालिक ठरू शकतं. अलीकडे अनेक पत्रकार वृत्तपत्रातील लेखांव्यतिरिक्त स्वतंत्र लेखनही करू लागले आहेत. पण त्यांची संख्या मोजकीच. अन्यथा बहुतांश पत्रकारांना निवांत बैठक मारून विपुलतेने स्वतंत्र लेखन करणं जमत नाही. तेवढा वेळच त्यांच्याकडे नाही. संगणकीकरण आणि तीव्र स्पर्धेच्या युगात पत्रकारांचा कामाचा व्याप खूप वाढलाय. स्पर्धेमुळे वेग वाढलाय. संगणकीकरणामुळे आता पत्रकार स्वत: संगणकावर कॉपी ऑपरेट करतात. पेजमेकिंग, लेआऊट ही कामंही स्वत: करतात.

कामाच्या अशा धबडग्यात शांतपणे सृजनात्मक लेखन होत नाही. पण तरीही पत्रकाराची हुकमी लेखणी केव्हाही चालू असते. साहित्यवर्तुळ त्याला मान्यता देवो, अथवा नाही, पत्रकार-लेखकाची निष्ठा त्याच्या वाचकांशी असते. वाचकांसाठी ते लिहीत असतात. आपल्या नावाखाली चांगलं लिहून व्हावं ही असोशी असतेच. बायलाइनचं आकर्षण कायम असतं. हक्काचं माध्यम हाताशी असतं. अन्य लेखकांप्रमाणे 'माझं लेखन कोण छापेल?' ही धाकधूक नसते. जरा वावगं काही लिहिलं की लगेच दुसऱ्या दिवशी वाचकांची टीका सहन करावी लागेल, याचं भान सतत असतं. चांगलं लिहिलं की खुषीपत्र आणि स्तुतीफोन्सच्या माळा गळ्यात पडतात. 'आपलं कोण वाचेल?' अशी आशंकाही नसते. चांगल्या पत्रकार-लेखकांना वेळोवेळी दाद देणारे, त्यांच्याशी मैत्री ठेवणारे अनेक समकालीन साहित्यिकही आहेत. अशोक नायगावकर, मुकुंद टांकसाळे, कविता महाजन, अवधूत परळकर, रामदास फुटाणे, मेघना, प्रवीण दवणे आणि असे अनेक समकालीन साहित्यिक आहेत जे आजच्या पत्रकार-लेखकांशी मैत्र बाळगून आहेत.

हेच पत्रकार लेखक अनेक नवोदित लेखकांना आज 'ग्रूम' करीत आहेत. त्यांच्याकडून नवनवीन लिहून घेऊन ते वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत. पत्रकार-लेखकांचं समाजासाठी हे उल्लेखनीय योगदान आहे. समाजातील चोखंदळ वाचक याची नोंद घेत असतात, दाद देत असतात. दर्दी वाचकांची दाद, यापेक्षा लेखकाला अधिक काय हवं?


**नाव** : **शुभदा चौकर**
**जन्मतारीख** : १५-१२-१९६९
**शिक्षण** : B.A. (Eco), Dip. Journalism, Dip. Financial Mngt. (Mumbai University)
**पत्ता** : ए ४०१, बाळकृष्ण अपार्टमेंट, गोगटे वाडी लेन, आरे रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३, फोन नं. २८७७१६८०


* गेली चौदा वर्षं 'लोकसत्ता'त
* तत्पूर्वी काही काळ Free Press Journal व Financial Express मध्ये.
* अलीकडेच 'राष्ट्रीय पत्रकारिता कल्याण न्यास'चा शांताबाई परांजपे पुरस्कार मिळाला.
* मध्यंतरी National Population Foundation ची शिष्यवृत्ती मिळाली. त्याअंतर्गत Women's Reproductive Health या विषयावर संशोधन.
* १९९८ मध्ये रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी पाठ्यवृत्ती अंतर्गत मुंबईतील बिअर बारमध्ये काम करणाऱ्या मुलींवर संशोधन.



# जालंदर सोनुने

## प्रशासकीय सेवेत माझे टेबल नेहमी साफ असे

शाळा-कॉलेजपासूनच वेळेचं नियोजन होऊ शकले तर उर्वरित आयुष्यात त्याचा चांगला फायदा घरी-दारी, ऑफिसात होऊ शकतो. मला वेळेचं महत्त्व शाळेपासूनच कळायला लागलं. बुलढाण्यातील दिवाकरभैय्या आगाशे यांनी स्थापन केलेल्या 'भारत माध्यमिक विद्यालय' (आता भारत ज्यु. कॉलेज) मध्ये आठवीच्या वर्गात प्रवेश मिळविला. कडक शिस्त आहे, श्रमदान करावे लागते म्हणून हॉस्टेलच्या काहीजणांनी सोबत आलेल्या थोरल्या भावाचे कान भरले. पण मी त्याच विद्यालयात प्रवेश घेतला.

ड्रॉईंग शिकवणारे मोकाशी सर छत्र्यांवर (आठवडी बाजाराच्या दिवशी) आणि लोखंडी पेट्यांवर नावे टाकून पैसे जमवा. जाहिरातीच्या सिनेमा स्लाईड बनवा. शुभेच्छा कार्डस् तयार करून विका. बॅनर लिहून कमाई करा – आणि हां! मुख्य म्हणजे कामाची मुळीच लाज बाळगू नका.

संस्थाचालक दिवाकरभैय्या आगाशे सरांचं तर, ध्येयच होतं, 'माझ्या संस्थेतून बाहेर पडणारा विद्यार्थी समाजात कसाही फेकला तरी तो स्वत:च्या पायावरच उभा राहिला पाहिजे. त्याच वेळी अशा आगळ्या ध्येयानं भारावून काम करणारे आदरणीय रमेश कोरडे सर, काका लिखिते, सौ. सुधाताई कोरडे, सौ. शशीकला आगाशे, सौ. मंगला इंगळे आणि आणखी अनेकजण. साऱ्याच शिक्षकांनी शिस्त लावली. श्रमदानातून कष्ट करायची जाणीव करून दिली. मेहनत अंगवळणी पडली. गुरुवारी वसतिगृहातील सामूहिक पूजेसाठी उपयोगात आणलेली फुले 'क्षय आरोग्य धाम' मधील खंगणाऱ्या रोग्यांना वाटायला लावून, त्यांच्या जीवनात सुगंध पेरण्याची प्रेरणा दिली. झाडाझुडपांची, फळाफुलांची जोपासना करायला तिथंच शिकलो. वाचनाची गोडी लागली ती त्याच परिसरात 'शालेय मंत्रीमंडळा'त 'स्वास्थ्यमंत्री' होण्याचाही योग आला.

पुढे मी प्रशासकीय सेवेत शिरलो. भारत सरकारच्या आरोग्यखात्यात डायरेक्टर पदापर्यंत प्रगती केली. वेळेचे नियोजन करून बहुधा सर्वच फायली मी हातावेगळ्या करत असे. नो पेंडिंग बिझनेस. सायंकाळी टेबल स्वच्छ. संपूर्ण ३४ वर्षांच्या कार्यकाळात हाच परिपाठ होता. सकाळी फायलीचा ढीग असायचा. परंतु सायंकाळी क्लीअर! त्यामुळं खालच्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांनाही ताबडतोब फायली निकाली काढाव्या लागत. 'मोठ्या साहेबांची सही राहिली' वगैरे सबबीला मुळीच जागा नव्हती. मीच मधून मधून ××× फाईलचं काय झालं विचारत असे. सगळ्या विभागाच्या फायली मी पार करू शकतो, मग तुम्ही तुमच्या एका विभागाच्या फायली का निपटारू शकत असा सवाल करीत असे. त्यामुळे अधिकारी, कर्मचारी अडचणीत यायचे. कधीकधी माघारी कुजबूज करत कर्मचारी ''हे काही बरं नाही बुवा साहेबांचं. रोजच्या रोज फायलीचा निपटारा करणं!'' अंदमानात असताना कर्मचारी उशीरा कार्यालयात आला तर त्याला तेवढाच वेळ – ऑफिस वेळेनंतर काम करायला लावायचो. तो प्रयोग मात्र महाराष्ट्र शासनात राबविता आला नाही. अंतरिक्षयानाचं नियोजन कसं सेकंदासेकंदात केलेलं असतं, तुम्ही सेकंदासेकंदाचं नियोजन नका करू, तासातासाचं तर करा.'' हाँगकाँगमधील उद्यागपती – रुनी चॅन यांनी म्हटलंय की, ''मला माहीत असलेल्या, जगातील दर दहा बुद्धिवान माणसांमध्ये तीन भारतीय आहेत.'' पण तरीही हा देश अजस्र अजगरासारखा सुस्तावलेला होता. ''बट टू मी, इंडिया फॉर द पास्ट मेनी डिकेड्स्

वॉज द ग्रेटेस्ट वेस्टेज ऑफ मॅन पॉवर.''

आपण वक्तशीर राहिलो तर इतरही त्याप्रमाणे अनुकरण करतात. दोनतीन अनुभव आवर्जून सांगावेसे वाटतात.

एकदा रामटेकचे खासदार सुबोध मोहिते यांनी काही तांत्रिक माहिती घेण्यासाठी मला रविभवन (नागपूर) येथे बोलाविले होते. मी वक्तशीर असल्याचं त्यांना कळलं होतं. मी करेक्टर दहालाच हजर झालो. मला ठीक वेळेवर आल्याचं बघून ते प्रथमत: हसले. म्हणाले, ''तुम्ही वक्तशीर असल्याचं कळलं होतं. आम जनताही राजकारण्यांना दोष देते वेळेबद्दल! पण मी आज वेळ पाळली ना!''
दुसरा प्रसंग मित्रवर्य राज बब्बर साहेबांचा. दिल्लीत ठीक नऊच्या ठोक्याला ठरल्याप्रमाणं त्यांच्या निवासस्थानी हजर झाल्याचं पाहून त्यांनाही आश्चर्य वाटलं होतं. ते म्हणाले होते, ''यार सर्वजण जर वक्तशीर राहिले तर!... तर किती उन्नती होईल देशाची, नाही?''
तिसरा प्रसंग परदेशातील आहे. तेव्हा मी अमेरिकेत वॉशिंग्टन (डी.सी.) मधील 'विश्व स्वास्थ्य संघटने'च्या विभागीय कार्यालयात रुजू होण्यासाठी गेलो होतो. दहा वाजता रिपोर्ट करायचा होता. मी पाच मिनिटं आधीच पोहोचलो. तेथील औपचारिकता पूर्ण केली. नंतर नॅन्शी बॅरेनस्टाईन बाईला भेटून रुजू अहवाल सादर करायचा होता. ''जाऊ का सहाव्या मजल्यावरील त्यांच्या कक्षात?'' असे विचारले. त्यावर रिसेप्शनिस्ट म्हणाले, ''अजून दोन मिनिटं बाकी आहेत. मी दुसऱ्या फेलोस सूचना देत आहे. जस्ट वेट फॉर टू मिनिटस्.'' मी चाटच पडलो.

डॅलस (अमेरिका) मधील अभ्यास दौऱ्यातील व्याख्यानादरम्यान जॉन रॉबर्ट जॉन या शास्त्रज्ञाने सुद्धा मी भारतीय म्हणून की काय, वेळेच्या नियोजनाबद्दल आमचं कौतुक केलं. वाचन-लेखनाची जोड असल्यामुळं, वैचारिक बैठक भक्कम झाली. चौदा पुस्तकांचं लेखन करता आलं. नसता माझ्यासारख्या खेड्यातील अल्पभूधारक परिवारात जन्मेलला मामुली माणूस संचालकपदापर्यंत जाऊन, आठ-दहा परदेशांत दौरा करून आला असता का?

**जालंदर सोनुने**
ए-१/३०२- श्रीयश गार्डन,मोहननगर धनकवडी, पुणे ४११०४३

# पुणे ते पंतप्रधानांचे कार्यालय

**बी. जी. देशमुख** **अनुवाद : अशोक पाध्ये**

## झलक

१९८४ मध्ये जेव्हा राजीव गांधी यांनी पंतप्रधान म्हणून देशाचा कारभार हाती घेतला तेव्हाच त्यांनी राजकारणातील घाण दूर करून ते स्वच्छ करायचे ठरवले. विशेषत: काँग्रेस पक्षातील सत्तेचे दलाल आणि भ्रष्टाचार या दोन्ही गोष्टी निपटून काढायच्या ठरवल्या होत्या. कोणत्याही करारात, व्यवहारात कोणत्याही मध्यस्थाला, दलालाला उभे राहू द्यायचे नाही हा एक मोठा निर्णय त्यांनी घेतला होता. परंतु त्यांच्याजवळ राजकीय अनुभव नसल्याने आणि शासकीय यंत्रणा, नोकरशाही व सरकारी चक्रे यांची अपुरी माहिती असल्याने त्यांचे हेतू फारसे फलद्रूप झाले नाहीत. त्यांच्या नवीन धोरणांबाबत राजकीय यंत्रणा नाके मुरडत होती. त्यातून जेव्हा त्यांनी बाहेरून तरुण तज्ज्ञांना कारभार सुधारण्यासाठी बोलावून त्यांच्यावरती ते अवलंबून राहू लागले तेव्हा हीच राजकीय यंत्रणा त्यांचा दु:स्वास करू लागली. बोफोर्सच्या बाबतीतही राजकारणी आणि काही अधिकारी यांनी राजीव गांधी यांच्या मार्गदर्शक तत्त्वांकडे बेधडक दुर्लक्ष केले आणि शांतपणे त्यांना पाहिजे तशाच मार्गाने ते जात राहिले, याची मला खात्री आहे. त्याही पुढे जाऊन जेव्हा त्यांना बोफोर्सची दलाली घेतलेल्यांची नावे कळली तेव्हा हेच राजकारणी व अधिकारी मंडळी यांनी त्यांना असा सल्ला दिला असला पाहिजे की, ''काही काळजी करू नका. पूर्वी असे अनेक वाईट प्रसंग ओढवले होते तरीही त्यातून आम्ही सर्वांना आरामात बाहेर काढले होते.'' 'पूर्वी' म्हणजे ज्या काळात इंदिरा गांधी व संजय गांधी हे राजकीय घडामोडींच्या पार शिखरावरती पोचले होते तेव्हा. राजीव गांधी यांचे निकटवर्तीय व सल्लागार मंडळी यांनीच त्यांना अपयशी केले, अन् ह्या क्रियेमध्ये त्यांनी राजीव गांधी यांचे तर मोठे नुकसान केलेच पण राजकीय व्यवस्थेचेही अपरिमित नुकसान केले.

**किंमत ४००रु. पोस्टेज ३०रु.**

**फक्त सभासदांसाठी**



# दीप योजना

आमच्या प्रकाशनाची कोणतीही
दर्शनी **२५००रु.** किंमतीची पुस्तके घ्या व त्यावर मिळवा
दर्शनी **८७५रु.** किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी **२०००रु.** किंमतीची पुस्तके घ्या
व त्यावर मिळवा दर्शनी **६००रु.** किंमतीची पुस्तके मोफत!
दर्शनी **१५००रु.** किंमतीची पुस्तके घ्या
व त्यावर मिळवा दर्शनी **४००रु.** किंमतीची पुस्तके मोफत!

---

**म्हणजेच २५००रु. द्या व ३३७५रु. ची पुस्तके मिळवा.**
**२०००रु. द्या व २६००रु. ची पुस्तके मिळवा.**
**१५००रु. द्या व १९००रु. ची पुस्तके मिळवा.**

---

**मुदत**
**३१ डिसेंबर २००६**
**पर्यंतच!**

**पोस्टखर्च वेगळा अंदाजे १००रु.**
योजनेचा लाभ घेण्यासाठी आजच सभासद व्हा.
संपूर्ण सूची मागवा.
योजना पुस्तके उपलब्ध असेपर्यंतच!

## दीप योजनेतील मोफत पुस्तकांची यादी

| | | |
|---|---|---|
| अभोगी | रणजित देसाई | १५०/- |
| पावनखिंड | रणजित देसाई | १००/- |
| समिधा | रणजित देसाई | १००/- |
| प्रतिक्षा | रणजित देसाई | ८०/- |
| आलेख | रणजित देसाई | १२०/- |
| तुझी वाट वेगळी | रणजित देसाई | ६०/- |
| संचित (निवडक अध्यक्षीय भाषणे) | रणजित देसाई | ६०/- |
| पहिले प्रेम | वि. स. खांडेकर | ९०/- |
| दोन ध्रुव | वि. स. खांडेकर | १८०/- |
| क्रौंचवध | वि. स. खांडेकर | १८०/- |
| फुले आणि काटे | वि. स. खांडेकर | ६०/- |
| प्रसाद | वि. स. खांडेकर | १५०/- |
| वेचलेली फुले (अनु.) | वि. स. खांडेकर | ५०/- |
| अविनाश | वि. स. खांडेकर | ५०/- |
| रानफुले | वि. स. खांडेकर | ७०/- |
| आस्तिक | वि. स. खांडेकर | ६५/- |
| माऊली | आनंद यादव | १२०/- |
| नटरंग | आनंद यादव | १४०/- |
| माळावरची मैना | आनंद यादव | ११०/- |
| उखडलेली झाडं | आनंद यादव | १५०/- |
| भूमिकन्या | आनंद यादव | ९०/- |
| झाडवाटा | आनंद यादव | ९०/- |
| उगवती मने | आनंद यादव | १००/- |
| पाणभवरे | आनंद यादव | १२५/- |
| ग्राम संस्कृती | आनंद यादव | १२५/- |
| वपु ८५ | व. पु. काळे | ६०/- |
| सखी | व. पु. काळे | १२०/- |
| रंग मनाचे | व. पु. काळे | १८०/- |
| तू भ्रमत आहासी वाया | व. पु. काळे | ७०/- |
| ही वाट एकटीची | व. पु. काळे | १२०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाणपोई | व. पु. काळे | ५०/- | मध्यरात्रीचे पडघम | रत्नाकर मतकरी | १००/- |
| प्लेझर बॉक्स भाग-१ | व. पु. काळे | १६०/- | मुलांसाठी गमती-जमतीचा स्वयंपाक : | | |
| प्लेझर बॉक्स भाग-२ | व. पु. काळे | २००/- | रोहिणी सिंग | अनु. आशा परुळेकर | ६०/- |
| चिअर्स | व. पु. काळे | १००/- | मायक्रोवेव्ह ओव्हन | राजश्री नवरे | ७०/- |
| कथा ही दिवावादळाची (अनु.) | वि. स. वाळिंबे | १००/- | अन्नसंरक्षण | राजकुमार कांबळे | १२०/- |
| वॉर्सा ते हिरोशिमा | वि. स. वाळिंबे | ३००/- | अंतराळ | अनु. उमा कुलकर्णी | १००/- |
| नेताजी (सुभाषचंद्र बोस) | वि. स. वाळिंबे | ३५०/- | अवस्था | अनु. उमा कुलकर्णी | ११०/- |
| ध्यानसूत्र | अनु. माधव कर्वे | १००/- | डोंगराएवढा | अनु. उमा कुलकर्णी | ८०/- |
| मी धार्मिकता शिकवतो, | | | नियती | माधवी देसाई | ६०/- |
| धर्म नाही | अनु. मृणालिनी गडकरी | १००/- | धुमारे | माधवी देसाई | ७०/- |
| विद्रोही | अनु. माधुरी काबरे | १२०/- | किनारा | माधवी देसाई | ९०/- |
| लज्जा | अनु. लीना सोहोनी | १२५/- | शुक्रचांदणी | माधवी देसाई | १००/- |
| नष्ट मेयेर नष्ट गद्य | अनु. मृणालिनी गडकरी | १२०/- | अणसार | अनु. अंजनी नरवणे | १८०/- |
| निर्बाचित कबिता | अनु. मृणालिनी गडकरी | ७०/- | वडवाई | अंजनी नरवणे | २००/- |
| फरासि प्रेमिक | अनु. सुप्रिया वकील | २००/- | तत्त्वमसि | अंजनी नरवणे | १४०/- |
| चौघीजणी | शान्ता शेळके | ३००/- | टेक् २५ | अनु. अंजनी नरवणे | ४००/- |
| पूर्व संध्या | शान्ता शेळके | ५०/- | गहाण पडलेली टेकडी | अनु. अंजनी नरवणे | १२०/- |
| कविता स्मरणातल्या | शान्ता शेळके | १२०/- | काँगो : मायकेल क्रायटन | अनु. अरुण मांडे | १६०/- |
| सांगावेसे वाटले म्हणून | शान्ता शेळके | १००/- | डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन | अनु. माधव कर्वे | २२०/- |
| मजल दरमजल | अनु. भारती पांडे | ८०/- | ज्युरॅसिक पार्क | | |
| ॲज आय सी... | अनु.माधुरी शानभाग | २००/- | : मायकेल क्रायटन | अनु.डॉ.प्रमोद जोगळेकर | २५०/- |
| निसर्गपुत्र (अनु.) | निरंजन घाटे | ८०/- | द फोर्थ के : मारिओ पुझो | अनु. वनिता सावंत | २००/- |
| पर्यावरण प्रदुषण | निरंजन घाटे | १३०/- | क्रोमोझोम-६ : रॉबिन कुक | अनु. वैशाली जोशी | ३५०/- |
| वेध पर्यावरणाचा | निरंजन घाटे | १५०/- | द हॉट झोन : रिचर्ड प्रेस्टन | अनु.डॉ.प्रमोद जोगळेकर | २००/- |
| वसुंधरा | निरंजन घाटे | २५०/- | काळोखाची लेक | | |
| यंत्रलेखक | निरंजन घाटे | ११०/- | : कॅथरीन दी जीजस | अनु. सरिता पदकी | १५०/- |
| फार फार वर्षापूर्वी | निरंजन घाटे | १२०/- | द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १००/- |
| युगंधर (विज्ञान) | निरंजन घाटे | १००/- | द ब्लाइन्ड असॅसिन | | |
| विदेशी विज्ञान चित्रपट | निरंजन घाटे | १२०/- | : मार्गरेट ॲटवूड | अनु. चारूता नानिवडेकर | २५०/- |
| नवे शतक | निरंजन घाटे | १५०/- | चाईल्ड ऑफ द होलोकॉस्ट | | |
| हॅलो, मी इन्स्पेक्टर | | | : जॅक कूपर | अनु. सिंधू जोशी | १३०/- |
| प्रधान बोलतोय | व. कृ. जोशी | १२०/- | देवदास : शरच्चंद्र चट्टोपाध्याय | अनु. मृणालिनी गडकरी | ९०/- |
| रक्तदान | व. कृ. जोशी | १३०/- | ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | अनु. भारती पांडे | १००/- |
| निर्मनुष्य | रत्नाकर मतकरी | १००/- | शिवा डान्सिंग : भारती कर्चनर | अनु. मंजुषा गोसावी | २५०/- |

# परदेशात राहूनही जपलेला मराठी बाणा

दिवाकर कारखानीस
मनोज शहाणे
डॉ. जगन्नाथ वाणी
विजया दंडे
जयश्री हुपरीकर
डॉ. उषादेवी कोल्हटकर
जयंत कुलकर्णी
ललिता गंडभीर
डॉ. शारदा सबनीस
माधवी सबनीस
वसंत घाग



अमेरिकेत दोन वर्षांपूर्वी गेलो असताना सीअॅटल, ह्युस्टन, ऑस्टिन, सॅनफ्रॅन्सिस्को, सांताक्लारा, सॅन होझे वगैरे ठिकाणी बरीच मराठी माणसे भेटली. ती सर्व संगणक-माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाचे काम करीत आहेत. अमेरिकेतील जीवनशैलीचा अंगीकार बहुतेकांनी केला असला तरी आपले मराठीपण ते जपत असतात, आपले मराठी सणउत्सव भारतीय मंदिरात वा एकत्र येऊन साजरे करतात. तेथील भारतीय दुकानात सर्व प्रकारच्या भारतीय वस्तू मिळतातः भारतीय खाद्यपदार्थ त्यामुळे घरी होत असतात. भारतीय चित्रपटही भारतात ज्या दिवशी प्रदर्शित होतात त्याच दिवशी अमेरिकेतील अनेक शहरांत प्रदर्शित होतात आणि त्यांनाही भारतीय हाऊसफुल गर्दी करतात. भारतीय कलावंतांचे कार्यक्रम होतातः नाट्यप्रयोग होतात. गावोगाव महाराष्ट्रमंडळे आहेत. त्यांच्या माध्यमातून कोजागिरी, दिवाळी, मकर संक्रांती, होळी, गणेशोत्सव वगैरे सण-उत्सव सामुदायिकरीत्या साजरे केले जातात... इंटरनेटवर बुलेटिन वा न्यूजलेटरद्वारे ताज्या घडामोडींची माहिती देण्यात येते किंवा आगामी कार्यक्रमांची कल्पना देण्यात येते... एकूण, आपली मराठी वा भारतीय माणसे आपले मराठीपण, आपला मराठी बाणा जपण्यात धन्यता मानतात... न्यूयॉर्क वगैरे ठिकाणी तर मराठी दिवाळी अंकही काढण्यात येतो... काही लेखनगुण असणाऱ्या व्यक्ती तेथेही मराठी कथाकवितांद्वारे अमेरिकन जीवनाचे रंगढंग पेश करीत असतात.

यंदा जूनमध्ये अमेरिकेला जाण्याचा पुन्हा योग आला. त्याचवेळी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकाची रूपरेषा ठरवण्यात येत होती. तेव्हा अमेरिकेत राहणाऱ्या मराठी माणसांच्या लेखांना व मनोगतांना त्यात स्थान द्यावे असा एक विचार मनात आला. परदेशात राहूनही आपली माणसे आपला बाणा जपत असतात, आपल्या परंपरेचे पालन करीत असतातः ते करताना येणारे अनुभव, अडचणी वा समाधान याबद्दल त्यांना लिहावयास सांगावे असे ठरवले.

मी अमेरिकेत गेल्यावर न्यूयॉर्कचे महाराष्ट्र मंडळ, सीअॅटल महाराष्ट्र मंडळ वगैरेंच्या पदाधिकाऱ्यांकडून अनेक पत्ते मिळवले. त्यांना ई-मेल केल्या... त्याचबरोबर मुलाकडे काही दिवसांसाठी आलेले, रोमन लिपीचे पुरस्कर्ते म. ना. गोगटे यांनीही काही पत्ते कळवले... पन्नासावर व्यक्तींशी संपर्क साधला. काहींनी होकार कळवले. काहींनी वेळेअभावी जमणार नाही असे कळवले. ह्युस्टनच्या दादा कारखानीसांनी 'सावली'चा अंक काढण्यात आल्याची माहिती दिली. तो अंक पाठवणे त्यांना जमले नाही. पण त्यांनी लेख पाठवला. जयंत कुलकर्णींनी 'रंगदीप'चा दिवाळी २००५ चा अंक पाठवला. ते स्वतः अनेक वर्षांपासून सिनेगीतांच्या रेकॉर्ड्सचा संग्रह करत आहेत. ललिता गंडभीर यांनीही बरीच धावपळ करून लेखन पाठवले... फोनवर मराठी बोलायला कोणी मिळाले म्हणून उषादेवी कोल्हटकरांना अफाट आनंद झाला. बोइंगमध्ये काम करणाऱ्या निसरगड यांनी ४ सप्टेंबरच्या लेबर डे च्या सुटीचा फायदा घेऊन लिहितो असे कळवले. डॉ. गजानन सबनीस त्यावेळी भारतात काही दिवसांसाठी आले होते... पण त्यांनी अमेरिकेला परतल्यावर मराठी लेख स्कॅन करून पाठवला... त्याची काही पाने ई-मेलच्या अॅटॅचमेंटमध्ये गायबच झाली... फोटोबद्दल लिहिले तर एकीने कसे जमणार असे कळवले. आता इंटरनेट, वेब कॅमेरा, स्कॅनिंग वगैरे सर्व सुविधा असताना अमेरिकेत दीर्घकाळ राहिलेली बाई फोटो कसा पाठवणार असा प्रश्न ई-मेलवरच करते तेव्हा – आपल्या मराठी बाण्याचे आणखीनच मोठेपण जाणवले... डॉ. जगन्नाथ वाणी कॅनडामध्ये कॅलगरी विद्यापीठात मॅथ्सचे प्राध्यापक आहेत. त्यांनी आपल्या कामाची अन्यत्र आलेली माहिती पाठवली.

अनेकांच्या सहकार्यामुळे 'परदेशात राहून जपलेले मराठीपण' वाचकांपुढे येत आहे. एक मात्र जाणवले, अमेरिकेत दीर्घकाळ राहूनही काहीजण ई-मेल वगैरेची उत्तरे पाठवण्याबाबत उदासीन दिसले. लेखनाचा उत्साहही फारसा जाणवला नाही. कामाच्या दैनंदिन धबडग्यात अमेरिकेतील माणसे फारच व्यग्र असतात. शनिवार-रविवार हे सुटीचे दिवसही आठवड्यात राहून गेलेली कामे करण्यात गुंतून पडतात. आपापल्या विषयात तज्ज्ञ असणारी ही मंडळी मराठीत लिहिण्यासाठी उत्सुक नसतात. लेखनगुण असणाऱ्या व्यक्ती मात्र याबाबत संधीची वाट बघत असतात.

मल्टिकल्चरल लिटरेचरला अमेरिकेत महत्त्व आहे. आपल्या लेखकांनी इंग्रजीत भारतीय आणि अमेरिकन जीवन यांच्या संयुक्त पार्श्वभूमीवरचे लेखन केले तर ते लक्षवेधक ठरेल. अशा पुस्तकांचे स्वतंत्र विभाग तेथील ग्रंथालयात बघायला मिळाले.

सीअॅटल येथे २८ जून ते १ जुलै २००७ या दरम्यान बृहन्महाराष्ट्र मंडळाचे द्वैवार्षिक अधिवेशन भरणार आहे. त्याची तयारी सुरू झाली आहे. अमेरिका बघायला जायची हौस असेल तर या अधिवेशनाच्या निमित्ताने व्हिसा मिळवणे सोपे जाईल. त्याबद्दलची माहिती ग्रंथजगतमध्ये वेळोवेळी देण्याचा प्रयत्न करू.

**शंकर सारडा**



# दुवा... मायबोलीचा

**दिवाकर कारखानीस**

१९७० सालच्या जून महिन्यात भारतातून प्रथमच आलेल्या माझ्या आईला घेऊन आम्ही सर्व कुटुंबीय अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन पाहण्यास गेलो. मेमोरियल मान्युमेन्ट, व्हाईट हाऊस पाहून झाल्यानंतर कॅपिटॉल बिल्डिंग पहाण्यास गेलो. कॅपिटॉल बिल्डिंगच्या पायऱ्या चढून गेल्यानंतर माझी पंच्याहत्तर वर्षांची आई थकली आणि मला म्हणाली :

''नाना... दमले रे मी फार चालून चालून. बसते मी जरा या बाकड्यावर...''

तिचे हे शब्द ऐकून आजूबाजूच्या गर्दीतून एक वयस्कर बाई लगबगीने पुढे आल्या आणि म्हणाल्या,

''अय्या... तुम्ही मराठी बोलता? किती बरं वाटलं मराठी शब्द ऐकून...''

छत्तीस वर्षांपूर्वी असा परिचय झालेल्या डॉ. सुरेश प्रधानांची ओळख अद्याप टिकून आहे. माझी आई आणि त्यांची आई दोघी निवर्तल्या. परंतु त्यावेळी भाषेच्या दुव्याने सांधले गेलेले हे स्नेहबंध अद्याप कायम आहेत.

१९७० सालात न्यूयॉर्क मराठी मंडळ स्थापन करण्यासाठी झालेली पहिली बैठक अद्याप स्मरणात आहे. मी, सौ. सविता गोखले, कै. जगन टेंबे, डॉ. सुधीर शिराळी, प्रा. गाडगीळ, प्रकाश रणदिवे इत्यादी मंडळी या बैठकीला हजर होती आणि तिथे मॅनहॅटनच्या त्या गोखल्यांच्या बेसमेन्टमध्ये ''मराठी तितुका मेळवावा'' या इच्छेने न्यूयॉर्क मराठी मंडळाची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्या नंतरच्या या सदतीस वर्षांच्या कालावधीत ''मेन पासून मयामी पर्यंत आणि न्यूयॉर्कपासून ते कॅलिफोर्नियापर्यंत जवळजवळ ५० मराठी मंडळे आणि संस्था अस्तित्वात आल्या. त्याला एकच कारण म्हणजे मराठी भाषेबद्दलची वाटणारी आपुलकी आणि मराठी बाण्याचा वाटणारा सार्थ अभिमान.

त्या सुरुवातीच्या कालात न्यूयॉर्क शहर हेच प्रामुख्याने मराठी माणसाच्या आगमनाने प्रवेशद्वार होते. त्यामुळे नवीन आलेला मराठी माणूस कुठेही भेटला... अगदी कलुस्तियानच्या ग्रोसरी स्टोअरपासून ते क्विन्स मधल्या सॅम अॅन्ड राजमध्ये खरेदी करताना दिसला, तरी जणू फार वर्षांनी भेटलेल्या भावासारखा वाटत असे. मग तो पुण्याच्या सदाशिवपेठेतला असो, मुंबईच्या मुगभाटांतला असो किंवा नागपूरच्या चिटणविसपुऱ्यातला असो! आपपर भाव जाऊन तिथे मैत्रीचे – स्नेहाचे धागे जुळलेच म्हणून समजा, याला कारण एकच की आम्हां सर्वांची असलेली एकच भाषा. मायबोली मराठी... त्या कालातल्या सुखदु:खांची देवाणघेवाण करण्यासाठी, आत्मीयतेने वापरलेली एकच भाषा... मराठी! गेल्या कित्येक वर्षांत या भाषेच्या जपणुकीमुळे नुसते स्नेहसंबंधच निर्माण झाले नाहीत तर संस्था निर्माण झाल्या आणि साहित्यही निर्माण झाले. मराठी भाषिकांप्रमाणेच इतर प्रांतातून आलेल्या गुजराथी, कन्नड, तेलगू, पंजाबी, बंगाली भाषिकांनी आपापल्या भाषा बोलणाऱ्यांच्या संस्था निर्माण केल्या आणि अमेरिकेच्या चालू सामाजिक प्रवाहात मिसळूनसुद्धा आपल्या भाषेची, संस्कारांची, चालीरीतींची, सणावारांची जपवणूक केली. सण, संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या प्रामाणात साजरे होऊ लागले आहेत.

मातृभाषेची जोपासना करणे याला संकुचित प्रादेशिक अहंकार म्हणणे चुकीचे म्हणावे लागेल. कारण मागील अनेक शतके या भाषांनी निर्माण केलेले काही गद्य आणि पद्य साहित्य अजरामर झालेले आहे. बाराव्या शतकात ''माझा मराठीचा बोल कवितके...'' म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांपासून ते विसाव्या शतकातील गदिमा, पुलं, विंदा करंदीकरांपर्यंतच्या रथीमहारथींनी हा मराठी साहित्याचा रथ पुढे चालविला आहे. या साहित्य दिंडीत सामील असणारे काही

इथलेही साहित्यिक वारकरी आहेत ही निश्चित अभिमानाची गोष्ट आहे.

अमेरिकेत येऊन स्थायिक झालेले पहिल्या पिढीचे मराठी भाषिक ज्याप्रमाणे आपले सणवार आणि संस्कार जपण्याचा आटोकाट प्रयत्न निरनिराळ्या सांस्कृतिक कार्यक्रमातून करतात त्याच अट्टहासाने आपले मराठी साहित्य जपण्याचा आणि त्यात भर घालण्याचा शर्थीने प्रयत्न करीत आहेत. टोरांटो मधून प्रसिद्ध होणारे 'एकता त्रैमासिक' न्यूयॉर्क-न्यूजर्सीमध्ये प्रसिद्ध होणारा 'रंगदीप', शिकागोतले 'रचना', वॉशिंग्टनमधले 'हितगुज', बृहन महाराष्ट्र मंडळाचे मासिक वृत्तपत्र आणि ह्युस्टनमधून प्रसिद्ध होणारा 'सावलीचा' वार्षिक अंक - या सर्वांमधून उत्तम, दर्जेदार मराठी साहित्य नियमितपणे वाचकांपुढे येत आहे. याशिवाय न्यूजर्सीहून श्री. सुहास पै यांनी संगणकावर (internet website) चालविलेली 'अंतराळ' (www.antaraal.com) आणि मराठी मित्र मंडळ - नॉर्थ अमेरिका यांनी प्रसारित केलेली 'सावली वेबसाईट' या दोन्ही माध्यमांतून उत्कृष्ट मराठी साहित्य आणि माहिती पुरविली जाते.

येथे आलेली पहिली पिढी भाषेचा हा वारसा, येथे नवीन जन्माला आलेल्या पिढीला जाणीवपूर्वक देण्यात प्रयत्नशील आहे. कवाडे उघडी होऊ लागली आहेत आणि विश्वास आहे की ही मायबोली मराठी आपला 'वेलु गगनावरी' पोहोचविल्याशिवाय राहणार नाही.

**ह्युस्टन - टेक्सास**

# आगामी

# अमेरिकेतील पापनगरी
## एक वारी




**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

*माणसाला दोन मनं असतात हे खांडेकरांनी केव्हाच ओळखलं- एक देवाचं व दुसरं पशुचं. (दोन मने- कादंबरी) याची खरी प्रचिती अमेरिकेत येते. इथे या दोन्ही प्रवृत्तींना आव्हान देणारी भिन्न स्थळं सापडतात.*

*फ्लोरिडा (Florida) नावाच्या दाक्षिणात्य प्रांतातील डिस्नि वर्ल्ड (Disney World) हे सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ जगात बाळगोपाळांपासून थोरापर्यंत सर्वांना ठाऊक आहे. इथे निर्भेळ, कौटुंबिक मनोरंजनासाठी लक्षावधी लोक येतात. या बाबतीत त्यांची निराशा होत नाही. कारण डिस्नि कंपनी कौटुंबिक मूल्य जोपासण्याकडे कटाक्षानं लक्ष देते. इथे धूम्रपान करता येत नाही. कसल्याही प्रकारच्या उन्मत्त लैंगिक वर्तनाचा निषेध केला जातो. त्यांच्या पार्कमध्ये (park) मद्य औषधालाही मिळत नाही. थोडक्यात म्हणजे मनुष्यातील देवत्वाला आव्हान देणारं वातावरण इथं निर्माण करण्यात आलं आहे.*

*लास वेगास याच्या दुसऱ्या टोकाला आहे. तिथे मद्याच्या नद्या वाहतात. अल्प कटीवस्त्र परिधान करून व वक्षस्थळं अनावृत ठेवून नृत्य करणाऱ्या नर्तिका इथे मुबलक प्रमाणात सापडतात. धूम्रपानाचं इथं स्वागत होतं. शरीरसुखाचे अनेक स्रोत इथे उपलब्ध आहेत. थोडक्यात म्हणजे सर्वार्थानं व सर्वांगानं मनुष्याच्या वामवृत्तीला उत्तेजन देणारं वातावरण इथं सापडतं. मनुष्यातलं पशुत्व इथं उफाळून येतं.*

*या दोन टोकांच्या स्थळांमध्ये लोकांना कुठलं स्थळ जास्त आवडतं? या देशात यापैकी कोणत्याही स्थळाला भेट देण्याचं स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. मग देवत्व व पशुत्व यांमधील कुठली प्रवृत्ती प्रभावी ठरते?*

*माणसाचा कल पशुत्वाकडे असतो हे निर्विवाद. का?*

*कारण, मनुष्य मुळातच पापप्रवृत्त आहे.*



# न्यू जर्सीतला आमचा मराठीचा ओव्हरडोस

**मनोज शहाणे**

मला न्यू जर्सीला येऊन आता जवळजवळ आठ वर्षे होतील. ह्याआधी मी टेनेसीला होतो. त्यामुळे इथे आल्यावर लगेचच मला मराठीचा ओव्हरडोस झाला. म्हणजे मी हे वाईट अर्थाने म्हणत नाही हो, पण एकदम दुष्काळातून हे असे मराठीच्या गंगेत वाहून गेल्यावर दुसरे काय वाटणार?

संक्रांत, होळी, वसंतोत्सव, गणपती, दिवाळी हे सगळे सण इतके पॉवरफुल असतील याची मला कल्पनाच नव्हती. मुंबईतसुद्धा मी कधी संक्रांत किंवा वसंतोत्सव साजरा केला नाही. एवढेच काय तर वसंतोत्सव म्हणजे नक्की काय हेसुद्धा मला माहीत नव्हते. तेव्हा इथे अनेक वर्षे काढलेल्या एका मित्राला मी याबद्दल विचारले, ''अरे वसंतोत्सव म्हणजे ज्या दिवशी सगळे पालक आपल्या लहानापासून मोठ्या मुलांना घेऊन नाचाच कार्यक्रम व टॅलेन्ट शो सादर करतात तो दिवस. तू फक्त तुझी मुलं नाचाच्या वयाची होईपर्यंत थांब, मग मला सांग बच्चू!'' असे उत्तर मिळाले. त्या पश्चात् मला हळूहळू कळायला लागले की ही एक नवीनच संस्कृती दिसते. त्याला मग आपण OVER-SEAS मराठी संस्कृती म्हणू या!

इथे काही वर्षे घालवल्यावर, आपण कोणाला कितीही शिव्या दिल्या किंवा ''आम्हाला बुवा ह्यात फारसा इंटरेस्ट नाही'' असे जरी बाकीच्या लोकांना दाखविले तरी मनातला मराठी माणूस असा सहजासहजी थोडाच गप्प बसतोय! आपला जेनेटिक मेकअपच संस्कृत बुडवून काढलेला आहे. त्यानुसार आम्ही मग 'विश्वात' (म्हणजे 'मराठी विश्वात') समाविष्ट झालो व छान छान कपडे घालून कार्यक्रमांना जायला लागले. जसे ड्रगचे किंवा दारूचे व्यसन कधी लागते ते कळत नाही तसेच हे कार्यक्रम तुमच्यात कधी शिरतात ते कळत नाही. तदनंतर हे नुसते प्रेक्षकात बघून पोट भरत नाही, त्यात आपलाही सहभाग असावा अशी तीव्र इच्छा होते. मग नाटक कर, नाचाच्या कार्यक्रमात भाग घे हे असे स्वरूप होते. कधी कधी तर वीकडेज् मधले काम खरे की वीकएंडचे खरे असा प्रश्नही पडतो.

कामेरकर, नेरुरकर, बंजारी, जोगळेकर ही अशी नावे अगदी ओळखीची वाटू लागतात. त्यांचा जोश बघितला की ही माणसं हे सोडून दुसरे काही काम करतात का? असा प्रश्नही पडतो. ही यांची प्रतिभा मी जवळून बघितली. मुंबईच्या किंवा भारताच्याबाहेर पडल्यामुळे की काय, ह्या मंडळींची साहित्यिकता किंवा सोप्या भाषेत सांगायचे तर टॅलेंट जास्तच धारदार झाली आहे असे मला वाटते. त्यांच्या शोज् च्या कॅसेटस् बघितल्या. मुंबईची रंगभूमी आणि ब्रॉडवेचे शो ह्यांच्यामध्ये कुठेतरी हे सगळे आहेत यात वाद नाही. सध्याच मुंबईला गेलो असताना काही नाटके बघितली. एक 'सही रे सही' सोडले तर एकही नाटक तिकिटातले दोन रुपयेसुद्धा वसूल करू शकले नाही. मला आश्चर्य इतकेच वाटते की सगळी नाटके सुमार असली तरी त्यांची तिकिटे सुमार नव्हती. मग प्रश्न असा पडतो, जर आपण मुंबईत पैसे देऊन सुमार नाटके बघू शकतो तर इथे थोडे पैसे घालून आपण इथले कार्यक्रम का बघत नाही? आपले काम व कुटुंब सांभाळून ही मंडळी जीव ओतून जी मेहनत करतात त्याला कंजूषपणा न करता मदत करा. 'विश्वाचे' वर्षाचे पैसे भरले म्हणजे सगळ्या कार्यक्रमांकरता पैसे दिले असे होत नाही. नाट्यगृहाचे भाडे, बाकीचा खर्च इतका असतो की त्या पैशात सगळा कार्यक्रम बसेल असे नाही.

मित्रहो, इथल्या कार्यक्रमात तुम्ही तिकिटाला किती पैसे दिलेत ते बघता पण कार्यक्रम बघून झालेला आनंद, तृप्ती कशी मोजणार? कबूल! काही कार्यक्रम माफक असतीलही, पण सच्च्या दिलाने केलेले असतील. 'मराठी विश्वा'चे असतील, 'कलाभवन'चे असतील, थिएट्रिक्सचे असतील, बाहेरगावचे असतील. आपण

मराठी जनतेनेच त्या सगळ्यांवर मेहेरनजर केली पाहिजे. माझे काही गुजराती व पंजाबी मित्र आहेत. त्यांना जर विचारले तर ते जातातच जातात आणि भरपूर पैसे देऊन जातात. माझा पंजाबी मित्र म्हणाला, ''अरे यार, इसके लिए हम पैसा नही देंगे तो और कौन देगा?''

आपणही आपल्याला जशी आणि जेवढी मदत करता येईल ती करून आपल्या लोकांना प्रोत्साहन दिलेच पाहिजे. वीकएंडला तुम्ही जेव्हा गाढ झोपेत असता तेव्हा ही मंडळी हातात डोनटची स्ट्राँग कॉफी घेऊन डोळे चोळत गाडी चालवत असतात. आपण जेव्हा चहा घेऊन टाइम्स वाचत असतो तेव्हा ही मंडळी कुठल्या ना कुठल्या हॉटेलमध्ये कसली ना कसली प्रॅक्टिस करीत असतात.

आपल्याला जर मराठी माणूस ब्रॉडवेपर्यंत जायला हवा असेल तर आपण हे केलंच पाहिजे. जसं जमेल त्याप्रमाणे हातभार लावलाच पाहिजे. आपापसातील छोट्या-मोठ्या तक्रारी बाजूला ठेवून, एक होऊन साहित्यिक व सांस्कृतिक प्रगती केलीच पाहिजे. हे फक्त माझे म्हणणे नाही तर प्रत्येक सुसंस्कृत मराठी माणसाच्या मनातही असेच विचार आल्याशिवाय राहणार नाहीत. त्यावर आपण फक्त किती अंमलबजावणी करतो हे आपणा सगळ्यांवर अवलंबून आहे.

**mshahane@optonline.net**

---

**एक झलक...** — # इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज्

**झुंपा लाहिरी**

**अनु. भारती पांडे**

*आत्तापर्यंत विमानाने जाण्याइतके पैसे माझ्याजवळ साठले होते. मी प्रथम विमानाने कलकत्त्याला माझ्या स्वतःच्या लग्नासाठी गेलो. एका आठवड्यानंतर मी बॉस्टनला माझ्या नव्या नोकरीवर रुजू होण्यासाठी विमानाने निघालो. विमानाच्या प्रवासात मी, विद्यार्थ्यांना उत्तर अमेरिकेची माहिती देणारं एक स्वस्त पुस्तक वाचून काढलं. लंडन सोडण्यापूर्वी टॉटनहॅम कोर्ट मार्गावर मी हे पुस्तक सात शिलिंग सहा पेन्सला विकत घेतलं होतं. आता मी विद्यार्थी नसलो तरी विद्यार्थ्यांप्रमाणेच काटकसरीनं राहणं मला भाग होतं. अमेरिकन लोक रस्त्याच्या डाव्या बाजूने गाडी चालवत नाहीत, तर उजव्या बाजूने चालवतात, लिफ्टला 'एलेव्हेटर' म्हणतात आणि एंगेज्ड असलेल्या टेलिफोनला 'बिझी' टेलिफोन म्हणतात, हे ज्ञान मला मिळालं. ''उत्तर अमेरिकेतील आयुष्याचा वेग ब्रिटनमधील आयुष्यापेक्षा वेगळा आहे, हे तुम्हांला लवकरच कळेल.'' त्या माहितीपुस्तकाने हेही मला शिकवलं. ''प्रत्येकालाच यशाचे शिखर गाठायचे असते. इंग्लिश पद्धतीचा चहा मिळण्याची आशा ठेवू नका.'' बॉस्टन खाडीवर माझं विमान उतरू लागलं, तेव्हा विमानचालकानं बॉस्टनमधील वेळ आणि तापमान जाहीर केलं आणि पुढे सांगितलं, की राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी आज देशभर सुटी जाहीर केली आहे - दोन अमेरिकन माणसांनी चंद्रावर पाऊल ठेवलं होतं. अनेक प्रवाशांनी आनंदाच्या आरोळ्या ठोकल्या. 'गॉड ब्लेस अमेरिका' आणखी एकजण ओरडला. माझ्या शेजारी बसलेली एक स्त्री देवाची प्रार्थना करत होती.*




**१७० रु.**

**पोस्टेज ३० रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# कॅनडातील महाराष्ट्र सेवा समिती

**डॉ. जगन्नाथ वाणी**

**खू**पशी अनिवासी भारतीय मंडळी कॅनडात अथवा इतर देशांत स्थलांतरित होण्यापूर्वी आपले बरेचसे शिक्षण भारतात पूर्ण करतात. त्यामुळे त्यांचाच नव्हे तर त्या त्या दत्तक देशाचाही खूप मोठ्या प्रमाणात फायदा होतो. माझेच उदाहरण घ्यायचे झाले तर मी कॅनडात उच्च शिक्षणासाठी गेलो त्यावेळी माझे एम.एस्सी.पर्यंतचे शिक्षण भारतातच झाले होते. माझ्या दत्तक देशाच्या, कॅनडाच्या, सरकारला जर माझ्या एम.एस्सी.पर्यंतच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागला असता तर ती रक्कम कित्येक दशलक्ष डॉलर्स झाली असती. अशा प्रकारे मीच नव्हे तर कॅनडाचे सरकारदेखील भारताचे देणे लागते.

ही भावना मनात ठेवून आम्ही १९८४ साली, महाराष्ट्र सेवा समितीची स्थापना केली. काही उद्दिष्टे समोर ठेवली. कॅनडातील मराठी माणसांकडून देणग्या जमविणे, महाराष्ट्रातील स्वयंसेवी संस्थांनी चालविलेला योग्य प्रकल्प निवडणे, तो प्रकल्प कॅनडा सरकारच्या आंतरराष्ट्रीय विकासकार्यासाठी अर्थसहाय्य देणाऱ्या विभागाकडे एकास एक अथवा एकास दोन अशा वाढीव मदतीसाठी मंजुरीस पाठविणे आणि अशी वाढीव मदत मिळवून मुळात निवडलेल्या प्रकल्पासाठी भारतात मदत पाठविणे. १९८४ पासून आजतागायत समितीने साठहून अधिक वेगवेगळ्या संस्थांना एकूण निदान ५ कोटी रुपयांची मदत पाठविली आहे. भारतातील आम्ही निवडलेल्या स्वयंसेवी संस्थांच्या विश्वासार्हतेची कल्पना येण्यासाठी काही संस्थांची नावे नमूद करतो.

* लोक बिरादरी प्रकल्प, प्रकाश आमटे, आदिवासी शिक्षण आणि आरोग्य

* उत्थान, भीमराव गस्ती, देवदासी शिक्षण आणि पुनर्वसन

* हेल्पर्स ऑफ द हँडीकॅप्ड, नसिमा हुरजूक, अपंगांचे पुनर्वसन

* विद्यार्थी सहाय्यक समिती, अच्युतराव आपटे, गरीब होतकरू विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि व्यक्तिविकास

* मानवलोक, डॉ. शैला लोहिया, असहाय्य स्त्रियांचे औद्योगिक प्रशिक्षण आणि पुनर्वसन

* स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन, यशवंत ओक आणि अनेक सहकारी, स्किझोफ्रेनियासंबंधी जनजागरण मोहीम आणि स्किझोफ्रेनिया रुग्णांचे पुनर्वसन

ह्या यादीवरून लक्षात येईल की आम्ही निवडलेल्या संस्थांत नि:स्वार्थी आणि निरलस समाजसेवक कार्यरत आहेत. येथे आम्ही पाठविलेल्या मदतीला कुठल्याही प्रकारे गळती लागण्याची भीती नसते. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्वत:च सांगितल्याप्रमाणे भारतात गळतीचे प्रमाण ८५% आणि खऱ्या अर्थाने मदतीचे प्रमाण केवळ १५% आहे. काही ठिकाणी गळतीचे प्रमाण १००% ही असू शकते हे आमच्या नुकतेच लक्षात आले आहे. एका स्वयंसेवी संस्थेला त्यांच्या प्रकल्पाच्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ताच नव्हता. त्यांनी तो श्रमदानातून करवून घेतला आणि नंतर त्यांना समजले की गावच्या सरपंचाने तो रस्ता ग्रामपंचायतीने केला असे दाखवून बरीच मोठी रक्कम आपल्या खिशात घातली. हे उदाहरण लक्षात घेऊन आमची समिती रस्ता, बंधारा, पूल अशा कामांना मदत करीत नाही. या संदर्भात आमच्या एका राजकारणी मित्राने सांगितलेला विनोद माझ्या पक्का लक्षात राहिला आहे. (अभियंता विनोद- १०% अमेरिकन, १५% जपानी, १००%

भारतीय.)

समितीचे अनिवासी भारतीय देणगीदार अथवा कॅनडाचे भारतातील स्वयंसेवी संस्थांना मदत करून भारतावर उपकार करीत आहेत अशी आमची मुळीच भावना नाही. आमचे देणगीदार आणि आमचे सरकार दोघांचाही भारतामुळे फायदा झाला आहे. त्या फायद्याची अंशत: परतफेड आम्ही करीत आहोत अशी आमची प्रामाणिक भावना आहे.

स्थलांतरितांच्या कर्तृत्वाचा दत्तक देशांना फार मोठ्या प्रमाणात फायदा झाला याची बऱ्याच मंडळींना जाण आहे. परंतु या फायद्याचा विस्तार किती व्यापक आहे याची कल्पना सर्वांना असेलच असे मात्र नाही. दोन ब्रिटिश संशोधकांनी या फायद्याच्या व्याप्तीचे आर्थिक मोजमाप घेऊन त्या संदर्भातील संशोधनपर प्रबंध १९९१ साली प्रसिद्ध केला. प्राध्यापक ॲलन स्मिथर्स (मँचेस्टर विद्यापीठ) आणि प्राध्यापक जॉन प्रॅट (सरे विद्यापीठ) यांच्या अभ्यासातून निष्पन्न झालेले आर्थिक निरीक्षण आणि निष्कर्ष थक्क करणारे आहेत. केवळ भारतातून आलेल्या स्थलांतरितांनी १९६७ ते १९८५ या कालावधीत अमेरिकेच्या आर्थिक उत्पन्नात ५१ अब्ज अमेरिकन डॉलर्सची भर घातली आहे. (५१ अब्ज म्हणजे ५१०० कोटी), कॅनडाच्या उत्पन्नात १३ अब्ज अमेरिकन डॉलर्सची तर ब्रिटनच्या उत्पन्नात २ अब्ज ८ कोटी अमेरिकन डॉलर्सची! हे मूल्यमापन १९९१ च्या अमेरिकन डॉलर्सच्या किंमतीनुसार आहे. अमेरिकन डॉलर्सच्या आजच्या मूल्यमापनात ही किंमत आणखी खूपच वाढेल. हे मूल्यमापन करताना दोन गोष्टी त्यांनी मुख्यत्वेकरून विचारात घेतल्या. संशोधक अथवा इंजिनिअर निर्माण करण्यासाठी लागणारा खर्च आणि त्यांच्या आर्थिक उत्पादन क्षमतेतून निर्माण झालेली आर्थिक सुबत्ता!

अनिवासी भारतीय तीन प्रकारे मराठी आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी मदत करतात. (१) काही परदेशातच राहून मराठी भाषेच्या आणि संस्कृतीच्या विकासासाठी आणि जतनासाठी प्रयत्नशील असतात. उदा. एकता त्रैमासिक आणि त्याचे संपादक मंडळ. (२) काही भारतात येऊन महाराष्ट्राच्या विकासासाठी जिद्दीने काम करतात. उदा. विज्ञान वाहिनी आणि देशपांडे दांपत्य आणि (३) काही परदेशातच राहून मराठी भाषेच्या आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी इकडे आर्थिक मदत पाठवतात. उदा. महाराष्ट्र सेवा समिती.

आपणापैकी बऱ्याच मंडळींच्या मनात एक रास्त शंका येणे स्वाभाविक आहे. भारतासंबंधीची ही आस्था आमच्या पिढीसोबतच अस्ताला जाईल का? सुदैवाने तसे होणार नाही. ASHA for Education आणि AID या तरुणांनी चालविलेल्या दोन संस्था खूपच भरीव स्वरूपाचे काम करीत आहेत. अनिवासी तरुणांच्या सहभागाचा आवाका आणि त्याच्या परिणामाची कल्पना फारच थोड्या मंडळींना आहे. अनिवासी भारतीय तरुणांनी चालविलेल्या ह्या दोन संस्थांचे काम खूपच उल्लेखनीय आहे. त्यांचे सर्व स्वयंसेवक विनामूल्य काम करून देणगीची शंभर टक्के रक्कम भारतात पाठवतात. भरघोस आर्थिक मदतीखेरीज हजाराहून अधिक स्वयंसेवक ४५ शाखांतून जगभर विखुरलेले आहेत. भारताच्या २० राज्यांतून निरनिराळ्या ६०० शैक्षणिक प्रकल्पांसाठी त्यांनी आजवर ४० लक्ष डॉलर्सहून अधिक रकमेची मदत पाठविलेली आहे. निधी संकलनासाठी भारतीय संगीत आणि नृत्याचा उपयोग करून परदेशात भारतीय संस्कृतीचा अनायासे प्रसारही ते करतात. AID चे चारशेहून अधिक स्वयंसेवक ३६ शाखांतून विखुरलेले आहेत. भारताच्या १८ राज्यांतून विविध क्षेत्रातील निरनिराळ्या १०० प्रकल्पांना त्यांनी मदत पाठविलेली आहे. प्रकल्पाचे मूल्यमापन करण्यासाठी त्यांचे स्वयंसेवक वर्षातून निदान दोनदा प्रकल्पाला भेट देतात.

मित्रांनो, आम्ही अनिवासी मंडळी करीत असलेल्या योगदानात येथील राजकारणी मंडळींनी आणि नोकरशहांनी सहकार्य करून आमचा या कामातील उत्साह वाढवावा अशी आमची रास्त अपेक्षा आहे. आम्हाला आमचा दत्तक देश कॅनडा एकास दोन अशी वाढीव मदत देतो. तशी अपेक्षा आम्ही महाराष्ट्र अथवा भारत सरकारकडून करीत नाही. त्यासाठी त्यांच्या तिजोरीत पैसे आहेत की नाही याची आम्ही चौकशीही करीत नाही. आमचे हे मदतकार्य सुकर होण्यासाठी त्यांनी एकच गोष्ट करावी. ती म्हणजे त्यांनी आमच्या कार्यातील येणारे भारतातील अडथळे दूर करावेत. उदाहरणार्थ, आमची मदत स्वीकारण्यासाठी येथील स्वयंसेवी संस्थांना FCRA ची गरज असते. FCRA च्या ऑफिसातील नोकरशहांच्या आडमुळेपणामुळे एका स्वयंसेवी संस्थेला ३५ लाख रुपयाच्या अनुदानाला मुकावे लागले. भारतातील एकूणच वेळखाऊ आणि वेळकाढू धोरणामुळे आम्ही देऊ केलेले ८० लाखाचे अनुदान कालबाह्य ठरून मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनाचा एक मोठा प्रकल्प सोडून द्यावा लागला. अशा अनेकविध अडचणींचे निवारण राजकारणी मंडळी आणि नोकरशहा करू शकतात. अनिवासी भारतीय भारतासाठी बरेच काही करू इच्छितात. परंतु त्यांना नाउमेद करणाऱ्या नोकरशहांना आमच्या राजकारणी मंडळींनी काबूत ठेवायला हवे.

(जागतिक मराठी अकादमी, १ जानेवारी २००५ मध्ये दिलेल्या भाषणावरून)

**wani@math.ucalgary.ca**



# सेतू बांधूया अंतरी

**डॉ. जगन्नाथ वाणी**

कॅलगरीत २००१ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात डॉ. अभय बंग यांनी आपल्या भाषणात अनिवासी मराठी भारतीय आणि महाराष्ट्र यात आंतरिक सेतू बांधायची कल्पना मांडली. या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याच्या उद्देशाने २००२ साली विश्वसेतू असोसिएशन या संस्थेची स्थापना करण्यात आली. संस्थेचे उद्दिष्ट 'सेतू बांधूया अंतरी' (Bridging Miles and Minds') ह्या समर्पक घोषवाक्यातून प्रतीत होते.

पहिल्या तीन वर्षाच्या वाटचालीत संस्थेने तीन संमेलने आयोजित केली. संस्थेचे बोधवाक्य हेच पहिल्या संमेलनाचे ब्रीदवाक्य होते. त्याला अनुसरून विश्वसेतू २००२ या पहिल्या संमेलनात अनिवासी मंडळींच्या पहिल्या पिढीने महाराष्ट्राबाहेर मराठी संस्कृतीच्या जोपासनेसाठी आणि महाराष्ट्राच्या विकासासाठी केलेल्या कामगिरीचा आढावा सादर करण्यात आला. या कार्याचे प्रतिबिंब पहिल्या संमेलनानिमित्त काढलेल्या स्मरणिकेत पाहायला मिळते. या संमेलनातून नसिमा हुरजूक यांनी अपंगांसाठी सुरू केलेल्या संस्थेची आणि त्यातून निर्माण झालेल्या अनेक कर्तृत्ववान अपंगांच्या अपूर्व कामाची ओळख झाली. संमेलनाला उपस्थित बऱ्याच मंडळींनी संमेलनानंतर 'हेल्पर्स ऑफ हॅंडिकॅप्ड' या त्यांच्या संस्थेशी एक जवळचे नाते निर्माण करून 'सेतू बांधू या अंतरी' या बोधवाक्याला उजाळा दिला.

''अनिवासी महाराष्ट्रीयन मंडळींच्या पहिल्या पिढीने सुरू केलेले कार्य दुसरी पिढी पुढे चालू ठेवील का?'' हा प्रश्न पहिल्या संमेलनात खूपदा ऐकायला आला. म्हणून दुसऱ्या संमेलनाचे, विश्वसेतू २००३ चे, ब्रीदवाक्य ठरले. 'तरुणांच्या सहभागाने सेतू बांधू या अंतरी!' ('Role of Youth in Bridging Miles and Minds.') अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांनी आणि तरुणांनी सुरू केलेल्या Asha For Education आणि AID या संस्थांनी केलेल्या भरीव कार्याची ओळख दुसऱ्या संमेलनात करून देण्यात आली. दुसऱ्या संमेलनाच्या स्मरणिकेत वरील दोन्ही संस्थांच्या कार्याचा सखोल परिचय करून दिला आहे. 'स्वदेश' सिनेमाच्या निर्मितीचे बीज AID Indian च्या एका प्रत्यक्ष कृतीत उतरविलेल्या प्रकल्पात आहे हे बऱ्याच जणांना माहीत नाही. नर्मदेच्या परिसरात बेळगाव येथे मेधा पाटकरांच्या मार्गदर्शनाखाली AID India या संस्थेने उभारलेल्या आणि 'स्वदेस' सिनेमाच्या निर्मितीचे बीज असलेल्या प्रकल्पांची संपूर्ण माहिती एका लेखाद्वारे या स्मरणिकेत दिली आहे. लेखाचे नाव आहे 'An Electrifying Performance...' आणि तो लिहिला आहे अरविंदा आणि रवी कुचीमांची या AID India च्या संस्थापकांनी!

तिसऱ्या संमेलनाचे, विश्वसेतू २००५ चे, ब्रीदवाक्य होते 'सेतू संस्कृतीचा बांधू या अंतरी!' ('Role of Culture in Bridging Miles and Minds.') संस्कृतीच्या सेतू बंधनात साहित्य निर्मितीचाही मोठा सहभाग असतो. अनेक अनिवासी भारतीय लेखकांनी सातासमुद्रापलीकडील एका नव्या समकालीन संस्कृतीचा आणि संस्काराचा अनुभव अत्यंत नेमकेपणाने आपल्या साहित्यातून व्यक्त केला. त्यात मराठी लेखकांचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. हे लक्षात घेऊन NRI साहित्य संमेलनाचा विश्वसेतू २००५ मध्ये समावेश करण्यात आला होता. ब्रीदवाक्याला अनुसरून कार्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांचा या संमेलनात सत्कार करणे ओघानेच आले. डॉ. नरेंद्र जाधवांनी लिहिलेल्या 'आमचा बाप आणि आम्ही' या पुस्तकाच्या इंग्रजी रूपांतराच्या प्रकाशन हक्कासाठी नामवंत प्रकाशकांत चढाओढ लागली. आणि सायमन अँड शूस्टर या कंपनीने त्यात आघाडी मारली. मराठी साहित्याचे यशस्वी जागतिकीकरण करण्यात डॉ. जाधवांनी दाखविलेली ही धडाडी मराठी माणसाला नक्कीच अभिमानास्पद आहे. या संमेलनात

विजय तेंडुलकरांच्या हस्ते त्यांचा या यशाबद्दल सत्कार करण्यात आला. नाटकाच्या माध्यमातून सांस्कृतिक देवाणघेवाण करून सुयोग नाटक कंपनीने आपला खास वेगळा ठसा निर्माण केला. तसेच मराठी संस्कृतीचे परदेशात जतन करण्यात कॅलिफोर्निया आर्टस असोसिएशन नेहमीच आघाडीवर राहिली आहे. 'सेतू संस्कृतीचा बांधू या अंतरी!' हे ब्रीदवाक्य सार्थ करणाऱ्या या दोन संस्थांचाही या संमेलनात डॉ. कुमार केतकरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

माणसामाणसांशी नाते जोडणारे नुसतेच मराठी व्यासपीठ न होता विश्वसेतू हे एक सक्रिय कृतीशील आंदोलन व्हावे या दृष्टीनेही आमचे प्रयत्न सुरू आहेत. संमेलनातून नसिमा हुरजूक यांच्या 'हेल्पर्स ऑफ हँडिकॅप्ड' या संस्थेशी अनिवासी भारतीयांचे नाते जोडणे ही त्या प्रयत्नांचीच फलश्रुती आहे. अशाच प्रकारचे अधिक दृढ नाते अनिवासी भारतीय तरुण आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये निर्माण करण्यातही विश्वसेतूने प्रगती केलेली आहे. भारतात येऊन स्वयंसेवी संस्थांना मदत करण्याची इच्छा असणाऱ्या अनिवासी भारतीय तरुणांना विश्वसेतू मार्गदर्शन करीत असते. गेल्या काही वर्षांत चार अनिवासी भारतीय तरुणांची त्यांच्या दृष्टिकोनातून योग्य अशा स्वयंसेवी संस्थांशी विश्वसेतूने सांगड घालून दिली आहे.

**wani@math.ucalgary.ca**




# ॲलिस्टर मॅक्लीन यांची अत्यंत गाजलेली पुस्तके

**अनु. अशोक पाध्ये**

**फिअर इज द की —— १६० रु.**

वाचकांना खिळवून ठेवणारी कलाकृती

**द गोल्डन गेट —— २२० रु.**

विशिष्ट मनसूबा साध्य करण्यासाठी घडविण्यात आलेल्या चित्तथरारक नाट्याची भिषण कहाणी

**द डार्क क्रुसेडर —— २४० रु.**

संहारक क्षेपणास्त्रासारख्या स्फोटक नायकाची थरारक विजयगाथा

**द गोल्डन रॉन्देव्हू २०० रु.**

बोटीवरील जीवनाचे दर्शन घडविणारी रहस्यमय उत्कंठावर्धक कादंबरी

**साऊथ बाय जावा हेड २५० रु.**

माणसाची कितीही कोंडी झाली तरी तो संकटावर मात करून परिस्थितीचा मालक बनतो हा संदेश देणारी युद्धाच्या पार्श्वभूमीवरील विलक्षण कथा

**पोस्टेज प्रत्येकी ३०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# अमेरिकन जेनीने केला मराठी भ्रतार

**विजया दंडे**

"गोरी गोरी पान, फुलासारखी छान'' अशी वहिनी दादाने आणणं ही लहानपणची सुखाची परमावधी गाठणारी भाबडी कल्पना होती, पण प्रत्यक्षात मात्र जेव्हा आमच्या दादासाहेबांनी गोरी-गोरीपान वहिनी आम्हां दोघी बहिणींसाठी आणण्याची तयारी दाखवली तेव्हा मात्र आम्ही सर्वजण म्हणजे आई-बाबा, आम्ही दोघी बहिणी आणि आमचे दोघींचे पतिदेव, सर्वजण पार हादरून गेलो. आम्ही दोघी बहिणी म्हणजे मोठी अक्का आणि धाकटी मी ताई, आणि सर्वात धाकटा दादा.

त्याचं असं झालं की, आमचा दादा म्हणजे आम्हां दोन बहिणींच्या पाठीवर झालेलं शेंडेफळ, अतिशय हुशार, रुबाबदार व चलाख पण होता आणि म्हणूनच सर्वांचा लाडका, त्यातून तो आयआयटी मधून इंजिनिअर झाला आणि वाहत्या वाऱ्याप्रमाणे त्याने परस्पर अमेरिकेची तयारी केली. सर्व तयारी झाल्यावर आम्हाला सांगायला आला की अमेरिकेच्या युनिव्हर्सिटीची शिष्यवृत्ती मिळाली आहे आणि मी अमेरिकेला चाललो आहे. अर्थात सर्वांना आनंद झाला. आईनेही सत्यनारायण वगैरे करून त्याच्या जाण्याची हसतमुखाने तयारी केली. त्याआधीच मीही लग्नानंतर नवऱ्यासह अमेरिकेत येऊन संसार थाटला होता.

रीतीप्रमाणे दादाचं अमेरिकेतलं शिक्षण पूर्ण झालं. माझाही संसार मुलाबाळांनी बहरला. आणि एक दिवस रविवारी सकाळी दादाचा फोन आला की ताई मी येत आहे. मला तुम्हा दोघांशी बोलायचं आहे. दादा येणार या आनंदात मीही सारी कामं भरभर आटपत होते. एवढ्यात दादा आला आणि त्याच्या हसण्याने सगळं घर भरून गेलं. मुलंही 'मामा, मामा' करत त्याच्या मागेपुढे करत होती. जेवण झाल्यावर मीच विषय काढला... "अरे, तू काही बोलणार होतास ना?'' तर त्याने एकदम बॉम्बच टाकला की मी जेनीशी लग्न करणार आहे. क्षणभर काहीच उमजले नाही आणि नंतर अवाक् होऊन आम्ही त्याच्याकडे बघतच बसलो. कारण तिकडे मुंबईला आई सगळी विवाहमंडळं शोधत होती. सगळ्या मासिकांतून 'वधू पाहिजे'च्या जाहिरातीवर भरमसाट खर्च करत होती. पत्रिका, फोटो, बायोडाटा यांच्या अनेक प्रती सर्वांना देत होती.

साहजिकच घरात वधूपित्यांची ये-जा वाढली होती आणि आई-बाबा व माझी मोठी बहीण अक्का मिळून चर्चा करत होत्या की आमच्या दादाला कोणती मुलगी पत्नी म्हणून शोभेल. मलाही फोन करून सगळा अहवाल कळवत होत्या. वधूपित्यांच्या दृष्टिकोनातून दादाचं स्थळ उत्तमच होतं. इंजिनिअर, उच्चविद्याविभूषित मुलगा, वडिलांचा भरभराटीला आलेला कारखाना, सुबत्तेत राहणाऱ्या दोघी मोठ्या बहिणी, जबाबदारी काहीही नाही. कशशाला काही कमी नाहीच. अशा परिस्थितीत इतरांच्या आणि आम्हां सर्वांच्याच अपेक्षा बऱ्याच वाढल्या होत्या. तसा दादा अमेरिकेतील शिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वेळा मुंबईला जाऊन आला होता. आईने मुली पाहण्याचा हेका धरला म्हणून चारसहा फराळाचे कार्यक्रमही पार पाडले होते. आता हा म्हणतो की मी जेनीशी लग्न करणार.

मी लगेच अक्काला आणि मेव्हण्यांना फोन लावला. हे प्रकरण त्यांच्या कानावर घातलं आणि तिकडे माझ्या माहेरी काय वादळ उठलं असेल याचं कल्पनाचित्र डोळ्यांसमोर आणत बसले. दादाचं मित्रमंडळ आम्हां दोघांच्याही परिचयाचं होतं... त्याच्या मित्रमंडळात काही मैत्रिणीही होत्या. काही अमेरिकन होत्या तर दोन भारतीय पण होत्या. सर्वजणी आपापल्या परीने हुषार, सुंदर होत्या. जेनीलाही मी ओळखत होते. हुशार, शिकलेली, सुंदर, जेनीही खूपच गोड मुलगी आहे हे मनाशी कबूल करत होते. पण तरीही तिला वहिनी म्हणून स्वीकारायला मन तयार होत नव्हतं. याला कारण दोन संस्कृतीतला फरक हे होतंच, तसंच परधर्मीय, परदेशीय

अशी जेनी आपल्या घराला आपलंसं करू शकेल का? ही शंका मनात होतीच.

मग आई, बाबा, अक्का, आम्ही दोघं अशी खूपच फोनाफोनी झाली. सर्वजण फोनवर आणि प्रत्यक्षात बोलत होतो, खूप तऱ्हेने दादाला समजण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेतल्या मुली किती चटकन घटस्फोट घेतात, काडी मोडताना नवऱ्याला कशा धुवून काढतात याचं भडक चित्र उभं केलं, आई-बाबांना या वयात दु:ख देऊ नकोस, भावनेला आव्हान करून पाहिलं, अनेक प्रकारे दादाला समजावले पण तो त्याच्या निर्णयाशी पक्का होता. त्याचं म्हणणं एकच होतं की आई-बाबांनी इथं यावं, जेनीशी व्यवस्थित बोलावं. मग मी सगळं पक्कं करीन. या बाबतीत त्याचा अगदी ठाम निश्चय होता आणि आम्हालाही त्याचं म्हणणं शेवटी मानावंच लागलं.

आई-बाबा इथं आले. बाबांनी वधूपरीक्षेत जेनीला खूप प्रश्न विचारले. तिनेही समाधानकारक उत्तरं दिली असं आम्ही समजून चाललो आणि लग्न पक्कं केलं. खरं म्हणजे दुसरा पर्यायच नव्हता! हो ना करता करता सगळं पक्कं ठरलं आणि लग्न मुंबईला करायचं असं सर्वांनी मान्य केलं. जेनीचे आई-वडील, भाऊ-भावजय, काका-काकू असे अनेक नातेवाईक आमच्या घरी जमले आणि साखरपुडा त्यांच्या पद्धतीने अमेरिकेत साजरा करायचा आणि लग्न आपल्या पद्धतीने मुंबईला करायचं, असा निर्णय झाला आणि माझ्या डोळ्यांसमोर अनेक प्रश्न उभे राहिले. आमच्या नव्या नोकऱ्या, मुलांच्या शाळा, जाण्या-येण्याचा खर्च हे सांभाळून लग्नाला कसं जावं हा प्रश्न पडला.

लग्नाला इथून जेनी, तिचे आई-वडील व भाऊ-भावजय जाणार असं ठरलं. मी जेनीला म्हटलं, आई सांगेल ते कपडे, दागिने, इतर सर्व विधी करण्याची तयारी असेल तरच तिकडे जा. उगीच तिकडे जाऊन गोंधळ नको. इकडे आमच्या आईने मला शपथ घालून तिकडे लग्नाला येण्याचा हुकूम केला. कारण आईचं तर्खडकरी इंग्लिश आणि या लोकांचं खास अमेरिकन इंग्लिश यात या दोघींना मध्यस्थ हवा होता आणि अर्थात ते काम माझ्याकडे आलं.

इकडे जेनी, तिची आई आणि वहिनी यांनी मिळतील ते हिंदी, इंग्रजी, भारतीय सिनेमे पाहण्याचा धूमधडाका लावला. अमेरिकेतल्या कॅसेट्स आणि DVD मध्ये खाली इंग्लिश टायटल्स असतात. त्यामुळे या लोकांना सिनेमा समजायला अवघड जात नाही. 'मान्सून वेडिंग', 'हम आपके', 'दिलवाले दुल्हनिया', 'कुछ कुछ होता है', 'अमेरिकन देसी', 'कभी खुशी कभी गम' इ. अनेक सिनेमांची पारायणं या लोकांनी केली. अमेरिकन देसीप्रमाणे मोठ्यांना नमस्कार केला की पैसे मिळतात, लग्नात नवऱ्या मुलाचे जोडे लपवले की गिफ्ट मिळते, मेंदी लावताना खूप गाणी म्हणून नाचायचं असतं व पैसे ओवाळून टाकायचे, घास देणे, उखाणे घेणे इ. रीतिरिवाजाची माहिती करून घेतली. हे फिल्मी रीतिरिवाज काश्मीर ते कन्याकुमारी सर्व भारतीय कसोशीने आचरतात असा गोड गैरसमज या लोकांनी करून घेतला. पण आपला मराठी हिसका काय असतो त्यांची त्यांना कल्पना कशी येणार? 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा!' असं महाराष्ट्राचं वर्णन त्यांना कोणीच सांगितलं नाही.

या सर्व रीतिरिवाजाचे पूर्ण होमवर्क करून हे मुलीचं वऱ्हाड मुंबईला आलं. अर्थात त्या लोकांची सोय जवळच्या हॉटेलमध्ये केली होती, पण जेनी व तिची आई घरातून जायला तयारच नव्हत्या. तीन बेडरुमचा आमचा फ्लॅट एरवी खूप मोठा वाटत असला तरी लग्नघर व पाहुणे यांनी गजबजल्यावर लहान वाटत होता. त्या दोघी तरीही 'मॉम, मॉम' करत आईभोवती घोटाळत होत्या. आईला खूष ठेवायचं असा दादासाहेबांचा हुकूम होता म्हणून बिचाऱ्यांची धडपड होती हे आम्हालाही कळत होते.

लग्नाच्या दोन दिवस आधी मेंदीवाली आली आणि जेनीला मेंदीवालीपुढे बसवून डिझाईन वगैरे सांगून आम्ही दोघी बहिणी बाजारात गेलो. दादा मित्रांबरोबर गायब झाला.

बाबा मोठ्या मनाने आईला म्हणाले ''मी इथे आहे तर तू जेवायचं बघायला समोरच्या ब्लॉकमध्ये जा'' आणि ते कॉटवर आडवे झाले. त्यांना डुलकी लागली. इकडे हाताला मेंदी लावून झाली आणि पायाला लावायच्या आधी जेनीला लागली भूक. घरात कोणीच नाही. मेंदीवाली आणि जेनी. अमेरिकेतल्या पद्धतीने नववधूला संकोच ही चीज नाहीच. झालं. जेनी गॅलरीत उभी राहून ओरडू लागली, ''मॉम, आय ॲम हंग्री'' आणि आमच्या सगळ्या सोसायटीत बातमी पसरली की या लोकांनी अमेरिकन सुनेला उपाशी ठेवलं! अशी कशी सासू! घरात मुळीच कुणाचंच लक्ष नाही! सगळ्या बसल्या नुसत्या नाचत इ. अनेक मुक्ताफळं नंतर ऐकू आली.

या लोकांची देणीघेणी आईबाबांनी आल्या-आल्याच केली. विहिणीला सुंदर शालू, निरनिराळ्या भारी पर्सेस, सुटपीसेस इ. अनेक आहेर केले. त्या लोकांनीही त्यांच्या पद्धतीने परफ्यूम्स, क्रोकरी, वॉचेस इ. आहेर सर्वांना केले. जरा रुळल्यावर दोन दिवसांनी जेनीच्या आईवडिल,भाऊ-भावजय यांनी हिंडायला सुरुवात केली. सुरुवातीला गाडी, ड्रायव्हर घ्यायचे, पण जरा सर्व भागांची ओळख झाल्यावर केव्हाही उठायचे आणि भटकून यायचे. नंतर अगदी मोकाटच सुटले होते. टॅक्सीतून भटकायला लागले. दादरला जायला २०-२५ रुपये म्हणजे अर्धा डॉलर लागतो. आणि बोरिवलीत संजय गांधी उद्यानापर्यंत जाऊन यायला टॅक्सीने १०-१२ डॉलरच खर्च येतो असे ठोकताळे त्यांनी मांडले. खरेदी करताना तर अगदी ताळच सोडला. केव्हाही पाहा, पिशव्या भरभरून खरेदी असायचीच.

झालं! लग्नाचा दिवस उजाडला. या अमेरिकन नवरी-मुलीला सर्व विधींचा अर्थ इंग्रजीतून सांगणारा भटजी हवा म्हणून ज्ञानप्रबोधिनी, पुणे इथून भटजी आयात करायचा असं ठरलं. सर्व व्यवस्थित बोलणी झाली. लग्न सकाळी अकरा वाजता लागणार होतं म्हणून भटजी पहाटेच्या बसने निघून बरोबर नऊ वाजता हॉटेलवर परस्पर हजर राहणार होते. आईबाबा अगदी निश्चिंत होते. पण सगळी तयारी झाली, सगळे पाहुणे जमा झाले, नटणं-सजणं झालं. साडेनऊ-पावणेदहा झाले तरी पुण्याच्या भटजींचा पत्ताच नाही.

मग गडबड करून धावपळ करून दादरच्या भटजी मंडळातून तीनचार हजार रुपये भरून एक भटजीबुवा आणले. आणि दहानंतर शांतपणे पुण्याचे भटजीबुवा उगवले. आणि या दोन्ही भटजींची जुगलबंदी सुरू झाली.

दादरच्या भटजींनी जेनीला सांगितलं की मी बोट वर केलं की तू 'मम' म्हणायचं. झालं! दोघांपैकी कोणीही हात वर केला की ही बडबडायची 'मम'. मग त्या दोघांचं सुरू व्हायचं ''not now, not now, afterwards'' आणि हेही हातवारे करूनच. या गोंधळात आमची हसून हसून पोट दुखायची पाळी आली.

साग्रसंगीत लग्न लागलं आणि जेनीनी कुठल्याशा सीरियलमध्ये पाहिलं की माळ घालताना मुलाचे मित्र त्याला वर उचलतात, आणि मग मुलीला तिचा काका, मामा कोणीतरी वर उचलतात व नवरा-नवरी एकमेकांना माळ घालतात. इथे जेनीला उचलायला कोणीच नव्हतं म्हणून तिने आधीच एक युक्ती मनाशी ठरवली होती. अंतरपाट दूर झाल्याक्षणीच तिने दादाला इतक्या पटकन माळ घालून टाकली की दादाच्या मित्रांना काय घडले याचे क्षणभर आकलनच झाले नाही.

नंतर 'घास देताना' उखाणा घ्यायचा असतो हे होमवर्क जेनी करून आली होती, आणि एका मराठी मैत्रिणीने एक उखाणा 'क्लिअर डिअर' असं यमक जुळवून तयार करून दिला होता, तो ती पाठ करून आली होती. घास देताना, उखाणा घेताना लाजायचं असतं हे गावीही नसल्याने नाव घे असं कोणी सांगायच्या आधीच दादाच्या तोंडात लाडू कोंबून 'listen' असं म्हणून ठसक्यात उखाणा घेतला.

मग मी, जेनी व जेनीची आई संध्याकाळची रिसेप्शनची तयारी करायची म्हणून एका जवळच्या ओळखीच्या पार्लरमध्ये गेलो. तिथे जेनीचा मेकअप चालू असताना जेनीची आई मला तिच्या पर्समध्ये काय आहे ते दाखवायला लागली. आणि पर्समधली वस्तू बघून मी चकितच झाले. आत होत्या आमच्या दादाच्या लग्नाच्या वेळेस घातलेल्या मोजड्या, वर म्हणते कशी की ''now I will get a big gift.'' हो! 'हम आपके है कौन' मध्येच असं दाखवलं आहे आणि ते बघून ही अडुसष्ठ वर्षांची बालिका करवलीचं काम करत होती.

घरी आल्यावर दादाला त्या मोजड्या दाखवल्या तर त्याला वाटलं सासुबाईंनी आपली खेटरं नीट सांभाळली म्हणून त्या पायात घालून पटकन 'थँक्यू' म्हणून स्वारी निघून गेली आणि ही पद्धत आम्हां मराठी लोकांत नाही हे सांगताना माझी पुरेवाट झाली.

संध्याकाळी रिसेप्शनच्या वेळेस हे व्याहीविहिणीचं जोडपं नववधूवरांच्या शेजारी मेकअप करून, साजशृंगार करून ड्रेसअप होऊन हजर झालं आणि त्या वधूमायचा ड्रेस बघून आम्ही चकितच झालो. आईने दिलेल्या भारी शालूचा त्या बाईने आमच्या जवळच्याच शिंप्याकडून स्कर्ट व ब्लाऊज शिवून घेतला होता आणि भारी जरीच्या पदराचं नवऱ्याला जॅकेट शिवून घेतलं. रिसेप्शनच्या वेळेस हा पोषाख करून हे जोडपं स्टेजवर हजर होतं आणि प्रत्येकाला ''nice, beautiful, cute'' इ. छान छान, गोड गोड शब्दांची खैरात करत खूष करत होते. काहीही भाषा न समजता लग्नसमारंभ पूर्णपणे एंजॉय करणाऱ्या ह्या अमेरिकन जोडप्याचा मला त्याक्षणी खूप हेवा वाटला. आणि स्वत:बद्दल किंचित खंत मनात दाटली.

लग्नसमारंभ पूर्णपणे आटोपून व्याहीविहीण दिल्ली-आग्रा बघायला आणि नववधू-वर हनीमूनसाठी केरळला रवाना झाले आणि आम्ही सर्वांनी श्वास सोडला...

...आज रविवार असल्याने जरा सावकाश उठावं असा मी विचार करत असतानाच

नेहमीप्रमाणे जेनीचा फोन आला आणि ती म्हणत होती की, ''ताई, माझ्या मेंदीच्या वेळेस काहीच मजा आली नाही!'' मी म्हटलं, ''का ग बाई, काय झालं?'' तर ती म्हणते, ''काल मी पाहिलं की 'भाभी' या सीरियलमध्ये मेंदीच्या वेळेस सर्वजणी काय नाचत गात होत्या, आणि माझ्या मेंदीच्या वेळेला तुम्ही सर्वजणी बाहेरच निघून गेलात.''

आज वर्षांनी या बयाला ही आठवण झाली. मी कपाळावर हात मारून घेतला आणि म्हटलं, 'अमेरिकनने केला मराठी भ्रतार' की असंच व्हायचं.'

**suchi@us.ibm.com**




# स्वप्नाकडून सत्याकडे

**(कल्पना चावलाची कहाणी)** **माधुरी शानभाग**

कल्पना चावलाची आणि आपल्या उच्च ध्येयाकडे झेप घेण्यासाठी तिने केलेल्या संघर्षाची मार्गदर्शक कहाणी

**४० रु.** **पोस्टेज २० रु.** **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# मराठीपण जपण्यासाठी...

**जयश्री हुपरीकर**

१९६६ साली भारत सोडला ते तीन वर्षांनी परत यायचे असे मनात ठेवून. पण अजूनही इथेच आहोत. माझा मुलगा मला म्हणतो, "आई, इतक्या वर्षांनंतरदेखील तू अजून मराठीच राहिलीस." तो वेगळ्या कारणासाठी म्हणत असेल कदाचित्, पण दरवर्षी भारतात येते तेव्हा बरेचसे लोकही असेच काहीसं म्हणतात. प्रत्येकाचे मन, विचार, वेगळे असतात, मला माझे मराठीपण टाकावेसे वाटलेच नाही, किंवा टाकावे लागले नाही, हे जितके खरे तितकेच ते टिकवण्यासाठी जे प्रयत्न करता येतील ते सर्व करण्यात माझा खारीचा वाटा आहे हेही तितकेच खरे! इतक्या वर्षांत मराठीपण जपण्यासाठी ज्या प्रयत्नात मी स्वत: लक्ष घातलं होतं ते प्रयत्न हे असे. काही वैयक्तिक आनंदासाठी तर काही मराठी समाजाला जमवण्यासाठी केलेले हे प्रयत्न आम्हाला इतके दिवस अमेरिकेत आनंदाने टिकवू शकले असं मला वाटतं.

'महाराष्ट्र मंडळ, शिकागो'ची रचना

ही सगळी सुरुवात आमच्या investment club मधे झाली असेच म्हणायला हवे. किंबहुना तो क्लबदेखील अमेरिकेत मराठी लोकांचा असा पहिलाच असावा. अधिकृत मंडळ १९७० साली गुढीपाडव्याच्या दिवशी सुमुहूर्तावर आमच्या क्लबातील गोडबोले, मणेरीकर, हुपरीकर, शेंडे, बोराडे, कामत, कुळकर्णी इत्यादी कुटुंबियांच्या सहभागाने सुरू झाले.

१९६९ सालच्या दिवाळी कार्यक्रमाच्या वेळी मंडळाची योजना उपस्थितांसमोर सादर केली. पन्नास-साठ कुटुंबीय व काही विद्यार्थी त्या कार्यक्रमाला हजर होते. त्यानंतर मात्र रीतसर स्थापना होऊन दरवर्षी पाच, गुढीपाडवा, सहल, गणेशोत्सव, दिवाळी आणि मकरसंक्रांत असे कार्यक्रम करण्याचे ठरविले. श्री. दत्तात्रेय मणेरीकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारिणी नेमली आणि कार्याचा शुभारंभ केला. या पाच कार्यक्रमांबरोबरच नाटक तथा संगीताचे कार्यक्रम करण्याचेही मनात होते. मंडळ रजिस्टर्ड करण्याचे काम सर्वप्रथम शिकागोच्या मंडळानेच केले व त्याचा अनुभव इतर ठिकाणच्या मंडळांना पुढे उपयोगी ठरला.

सुरुवात उत्साहात झाली. मंडळाचे मुखपत्र म्हणून 'रचना' चा अंकदेखील मोठ्या दिमाखात निघाला. त्यावर प्रामुख्याने गोपाळ व पुष्पा प्रचंड, प्रभाकर भोसले आणि जयश्री हुपरीकर यांनी मेहनत घेतली. अशा प्रकारचे मराठी पत्रकदेखील अमेरिकेत शिकागोनेच सर्वप्रथम सुरू केले.

मंडळात सगळे सणवार गोडाधोडाच्या जेवणाने साजरे होत, ते सगळे जेवण हौशी महिला उत्साहाने करीत असत. त्यामुळे कार्यक्रमात आपुलकीची झालर असे. आज ३२ वर्षे मंडळ टिकून आहे तरी १९७० साली घातलेला पायंडा सुस्थिर आहे. आता भारतीय जेवण बाहेर मिळण्याची सोय झाल्याने कुणाला करावे लागत नाही, पण कार्यवाही मंडळाचीच असते. वाढता मराठी समाज मंडळात वावरताना पाहून त्या पहिल्या दिवसापासून उपस्थित असलेल्या जुन्या सभासदांना कृतकृत्यतेचा प्रत्यय येतो.

महाराष्ट्रमंडळ, शिकागो सहर्ष सादर करीत आहे
सामाजिक नाटक 'प्रेमा तुझा रंग कसा'
दिनांक : १७ एप्रिल १९७१

महाराष्ट्रमंडळाची स्थापना झालेली होती. अध्यक्ष श्री. मणेरीकर सारखे म्हणत होते, "शंकरराव, नाटक कधी करताय?" शेवटी १९७० च्या थंडीत डॉ. शंकर हुपरीकरांनी नाटकाची प्रॅक्टीस सुरू केली. म्हणजे त्यानिमित्ताने थंडीत भेटीगाठीही होतील असा एक विचार. आमच्या मित्रमंडळातीलच संच उभा राहिला. काही पडद्यावर तर काही पडद्याआड, पण सगळ्यांचा भरपूर पाठिंबा. सगळ्यांची लहान मुले, सगळेजण अपार्टमेंटमध्ये राहणारी पण सगळ्यांना

जबरदस्त हौस! जानेवारीपासून सगळे वीकएंडस् आम्हां सगळ्यांचा एकच कार्यक्रम – प्रॅक्टीस, प्रॅक्टीस आणि प्रॅक्टीस! अर्थात त्याबरोबरच ज्याच्या घरी प्रॅक्टीस असेल त्याच्या घरी चमचमीत खाणेपिणे होतेच.

मुलांनादेखील मजा येत असे, एक कौटुंबिक activity च झाली होती, जशी काही! नाटक बसत होते, 'रचना'तून बातमी गेली होती. लोकांचे फोन्स येत होते पण जागा शोधण्यात खूप वेळ गेला. शेवटी Northwestern university तील एक स्टेज असलेला हॉल मिळाला.

१७ एप्रिल रोजी अमेरिकेतील पहिले तीन अंकी मराठी नाटक रंगभूमीवर आले. पहिलावहिला प्रयोग नेटका झाला, प्रेक्षकांच्या अपेक्षेपेक्षा सरस झाला. कित्येकांना भारतातच असल्यासारखे वाटले. एका मान्यवर सभासदाने उत्स्फूर्तपणे देणगी देऊन कलाकारांचे कौतुक केले आणि दरवर्षी नाटक करायचेच असे अध्यक्षांनी घोषित केले. आणि खरेच त्यावर्षीपासून दरवर्षी 'नाटक' हे मंडळाचे अविभाज्य आकर्षण ठरले. आजवर डॉ. शंकर हुपरीकरांनी सातत्याने ३१ नाटके सादर केली पण त्या पहिल्या प्रयोगाची गोडी अजूनही अवीट आहे.

१९७६ साली आमच्या 'कथा कुणाची व्यथा कुणा' या नाटकाचे मिल्वॉकी आणि डेट्रॉइट इथे झालेले प्रयोग हेही दुसऱ्या गावी जाऊन केलेले बहुधा पहिलेच मराठी प्रयोग.

मराठीचे वर्ग

१९७३ साली आम्ही दहा कुटुंबियांनी एकत्र येऊन मुलांची रविवारची शाळा सुरू केली. श्लोकांनी सुरुवात करून हळूहळू मराठी शिकवायला लागलो. साधारण सोळा मुले होती. वये दोन ते आठ. सतत आठ वर्षे शाळा चालवली. जयश्री हुपरीकर मराठी शिकवीत तर श्री. करंदीकर श्लोक. मुलांचे मराठीतून कार्यक्रम मंडळात सादर केले. वर्षातील सर्व सण क्लासतर्फे न चुकता साजरे केले. त्यामुळे मुलांना अनेक रीतिरिवाज समजले. त्या सणांचे महत्त्व व गोष्टदेखील आम्ही सांगत होतो. सामुदायिकरीत्या हे शिकल्यामुळे मुलांना उत्साह होता. नाहीतर प्रत्येकाच्या घरी ते जमत नव्हते. ही सगळी मुले अजूनही मराठी बोलू शकतात.

बृहन्महाराष्ट्रमंडळ आणि बृहन्महाराष्ट्रवृत्त

१९८० साली शिकागोत श्री. विष्णू वैद्य, श्री. शरद गोडबोले आणि सौ. जयश्री हुपरीकर यांनी बृहन्महाराष्ट्रमंडळाची स्थापना केली. स्थानिक मंडळांना एकत्र बांधणारी संस्था. महाराष्ट्र व अमेरिकेतील मराठी लोकांमध्ये दुवा साधण्याचा प्रयत्न करणारी संस्था. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या ब्रीद वाक्याला जपण्यासाठी सुरू केलेली ही संस्था. बृहन्महाराष्ट्रमंडळाचे मुखपत्र म्हणून बृहन्महाराष्ट्रवृत्त सुरू केले.

१५ जानेवारी १९८१ रोजी वृत्ताचा पहिला अंक शिकागोतून उत्तम अमेरिकेत सर्वत्र रवाना झाला. संपादक होत्या जयश्री हुपरीकर. वृत्ताचे स्वरूप 'ऐल ते पैल' केवळ बातम्या पुरवण्यासाठी मर्यादित केले होते. कारण साहित्य 'एकता' त्रैमासिकातून प्रसिद्ध होत असे आणि त्याच्याशी स्पर्धा करण्याची भावना नव्हती, तसे त्यांना कळवलेही होते. त्यावेळी इंटरनेटवर 'सकाळ' दिसत नसे, किंबहुना मराठी सॉफ्टवेअरदेखील उपलब्ध नव्हते. तेव्हा हे काम आजच्याइतके सुलभ नव्हते. म्हणून त्याची गरज अधिक होती.

'महाराष्ट्र टाइम्स' व 'लोकसत्ता' अशी दोन वर्तमानपत्रे दररोज सुरू केली. दर महिन्याच्या १५ तारखेस वृत्त प्रसिद्ध करायचे ठरवले होते. तेव्हा दर महिन्याच्या निवडक बातम्या योग्य त्या सदरात लिहून (हस्तलिखित), शिवाय स्थानिक बातम्यांना प्रसिद्धी देऊन वृत्तपत्रे १० तारखेपर्यंत तयार करावे लागे. सुरुवातीपासूनच वाचकांशी संपादकीयातून हितगुज करण्याची प्रथा पाडली होती. आणि कालांतराने वाचकांना ते आवडल्याची पावती मला वरचेवर मिळू लागली. इतकी की नंतर जेव्हा वृत्ताची कॉम्प्युटर कॉपी निघू लागली तेव्हा काही वाचकांना परक्यासारखे वाटू लागले, त्यातली ओढ नाहीशी झाल्यासारखी वाटली. सतत सहा वर्षे वृत्त शिकागोतून निघाले. त्यानंतर पुण्यातून तयार संकलित बातमीपत्र मिळवण्याच्या आमच्या प्रयत्नांना यश आल्यानंतर व त्याचबरोबर मराठी सॉफ्टवेअर उपलब्ध करून दिल्यानंतरच खांदेपालट केली गेली.

सुरुवातीला कामाचे काही वाटत नसे, पण वृत्त स्वयंपूर्ण कसे होईल याची काळजी अधिक होती. पदरमोड किती दिवस करणार? पण प्रयत्नांना यश आले. अनेक वाचकांनी उत्स्फूर्तपणे सातत्याने मदत केली. त्यांचा हातभार हा जगन्नाथाचा रथ चालवू शकला. आजवर वृत्त टिकून आहे यातच संस्थापकांच्या प्रसववेदना विरघळून गेल्या आहेत.

२००१ पासून बृहन्महाराष्ट्रवृत्त पुन्हा जयश्री हुपरीकर संपादित करीत असून त्यात महाराष्ट्रातील बातम्यांचे एकच पान दिले जाते. आणि मराठी लोकांच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत त्यांचा परिचय, अमेरिकेतील मराठी लोकांच्या मनाशी विविध विषयांवर संवाद, महाराष्ट्र मंडळातून फेरफटका या सदरांना प्राधान्य दिले जाते. बृहन्महाराष्ट्रमंडळाची वेबसाईट : www.bmmonline.org अशी आहे. सविस्तर माहितीसाठी त्याला जरूर भेट द्या.

पहिले अधिवेशन

अधिवेशन खरे म्हणजे १९८३ साली करावे असे मनात होते पण योग नव्हता. पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही आणि ते पुढे ढकलावे लागले. जुलैच्या अंकात जुलै १९८४ मधे पहिले अधिवेशन करण्याचे जाहीर केले. १२ व १३ जुलै- औद्योगिक व १४ व १५ जुलैला संमेलन भरविण्याचे ठरविले. बऱ्याच पत्रव्यवहारानंतर शंकरराव चव्हाण प्रमुख पाहुणे ठरले. जयश्री हुपरीकर भारतात जाऊन मुख्यमंत्र्यांच्या सदिच्छा आणि बालकलाकार आनंदगंधर्व याच्या कार्यक्रमाची देणगी घेऊन आल्या. त्याचवेळी औद्योगिकांना भेटून आगामी अधिवेशनाचे निमंत्रणही केले गेले.

मे १९८४ पर्यंत कार्यक्रम तर पक्के झाले. जागा ठरवली. दहा ठिकाणी चौकशी केली पण प्रमुख अडचण होती की कितीजण

येतील याचा अंदाज येत नव्हता. निश्चिती कुणीच देत नव्हते. तेव्हा सारी तयारी अनुमानधक्क्यानेच चालली होती. खर्च आमच्या पदरचाच व्हायचा होता निदान सुरुवातीला तरी– तेव्हा थाटमाट करण्यास मन धजत नव्हते. (आता थाटामाटाची दरवेळी स्पर्धाच वाटते) पर्यायी अशा दोन जागा राखून ठेवल्या. कमीत कमी ३०० लोकांना पुरतील अशा जेवण्याची सोय केली. येणाऱ्या लोकांची राहण्याची सोय आसपासच्या मराठी मंडळींच्या घरीच करायची होती. तेही काम वेळेवर करायला हवे होते. (हल्ली हॉटेल्सचे पत्ते पुरवले जातात) तो पत्रव्यवहार आम्ही तीनही कुटुंबे – वैद्य, गोडबोले, हुपरीकर – सगळा रिकामा वेळ याच कामात देत होतो त्यामुळे ते सुरळीतपणे पार पडले. एखाद्या घरच्या कार्यासारखेच! म्हणूनच आमचे नाटक न करण्याचे ठरवले, कारण मग कामाचा भार कुणी पेलायचा? पण नंतर शिकागोकरांना अधिवेशनात कधीही नाटक करण्याची संधी दिली गेली नाही, याची खंत वाटते खरी!

सगळी तयारी सुरळीत चाललेय तोच शंकरराव चव्हाण अपरिहार्य कारणाने येऊ शकत नसल्याचे कळले. पुन्हा धावाधाव! शेवटी कथाकार द. मा. मिरासदारांना विनंती केली आणि त्यांनी ती मान्य केली.

ही मराठीची हाक, आईच्या मायेची
जुळवुनी आणा तुम्ही भेट सकळांची.

जूनच्या वृत्तातून ही कळकळीची हाक दिल्यानंतर आम्ही त्या घटकेची वाट पहात होतो.

तो दिवस उगवला. पहिलेवहिले अधिवेशन गुढ्यातोरणांसह उत्साहात पार पडले. सुमारे २७५ उपस्थिती होती. भरगच्च कार्यक्रम, लहानमोठ्यांचे रंगलेले चर्चासत्र, आनंदगंधर्वचे सुरेल गायन, लक्ष्मण देशपांडे यांचे 'वऱ्हाड चाललंय लंडनला'चा प्रयोग द. मा. मिरासदार यांचे खुमासदार कथाकथन. त्याशिवाय इतर अनेक मान्यवर बोलले, इथल्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी. कार्यक्रमाची आखणी इतकी योग्य होती की अजूनही अधिवेशनात तसेच कार्यक्रम असतात. उपस्थितांना निघताना भारावून आले होते. दोन दिवसांतील भेटीगाठींनी मने जुळून आली होती. नव्हता कुठे बिग स्क्रीन टीव्ही किंवा नव्हत्या राखीव खुर्च्या की नव्हता कसलाही थाटमाट. होता गाठी आपुलकीचा ओलावा आणि कौतुकमिश्रित अभिमान आणि डोळ्यांत निरोपाची आर्तता! लोकांना अधिवेशने इतकी आवडतात की सॅनफ्रॅन्सिस्कोला ५००० उपस्थिती होती. कॅलगिरीला येथे अधिवेशन झाले आणि २००७ मध्ये सीॲटल येथे होणार आहे. वैद्य, गोडबोले व हुपरीकर यांनी शिकागोत पेरलेल्या रोपाचा मोठा वृक्ष झालाय खरा!

पंधरा वर्षांनंतर पुन्हा वृत्ताची जबाबदारी घेतलीय, केवळ आवड म्हणून! मंडळाची महत्त्वाकांक्षी योजना आहे ती मराठी विज्ञान परिषदेच्या सहकार्याने Online Marathi university सुरू करण्याची! तंत्रयुगाची ही पायरी सयुक्तिकच आहे. त्याचा मराठी लोकांना जगभर उपयोग होईल, याची खात्री वाटते. त्यासाठी सर्व कार्यकारिणी पडेल ते काम करणार आहे. त्याबरोबरच पुढील अधिवेशनाची तयारी सुरू आहेच.

मराठीपण जपण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहोत, तरी कधीकधी इथे राहिल्याने पुरेसे मराठी वाचन होत नाही, साहित्याची गती कळत नाही, तिथे कालानुसार होणारे बदल अचानक जाणवतात. अशा कितीतरी जाणिवा निसटून जातातच!

**5345 Davis St.**
**Skokie, IL 60077**
**Email : Jayahuprikar@hotmail.com**

**शिकागो येथील परिषदेत**
**आपल्या अद्वितीय विद्वत्तेने सर्वांना**
**उजळून टाकणाऱ्या स्वामीजींची**
**तेजोमयी जीवनगाथा**

आधुनिक भारताचे प्रेषित
**स्वामी विवेकानंद**
गौतम घोष  अनु. माधव मोर्डेकर




**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.** **१८०रु.** पोस्टेज ३०रु.



# हे बंध मराठीचे!

**डॉ. उषादेवी कोल्हटकर**

मायबोलीच्या आधारे जोपासलेले अस्तित्व पश्चिमी परिवेशात येऊन स्वत:चा नवा परिचय कायम करते. परिश्रमांचे चीज होते. सुखसमृद्धी, सुखासीनतेच्या तेजात, अर्थसंचयात अर्थपूर्णता शोधताना मन सुखावते व अहंकाराला स्टॉक एक्सचेंजची भाषा गोंजारू लागते. अल्पावधीत स्वत:च्या मालकीची वास्तू अमेरिकेच्या जमिनीवर पाय रोवून उभ राहते. येथील जीवनपद्धती व्यक्तीला, संधी, भौतिक सुखसमृद्धी, स्थैर्य व सन्मान देते हे वास्तव अनुभवीत, या जीवनपद्धतीची निर्मिती व्यक्तिविकास व समाजस्वास्थ्याला पूरक आहे, असे ठामपणे विधानही करता येते. तरीही हे सुखदायित्व, बंधनांची दृढता निर्माण करण्यात कुठेतरी कमी पडते आहे, समृद्धीलाही अभावाची झालर आहे असे अनुभव येऊ लागतात. सारे कसे चित्रासारखे देखणे, सुनियोजित, सुव्यवस्थित तरीही का कोण जाणे मराठी व्यक्तीला, स्वत:च्या अस्मितेचे खरेखुरे, नेमके प्रतिबिंब, मराठी भाषेच्या आरशातच सुस्पष्टपणे दिसते, रेखीव दिसते. कोणत्याही विषयावरील प्रतिक्रियांची बहूमूल्यता, मातृभाषेच्या कोंदणात गुंफल्यावर कशी अर्थपूर्ण होते, उजळून निघते, अंतर्मनाला स्पर्शून जाते या सत्याचे दर्शन होते. आपल्या परिचयाला पूर्णपणे प्रतिबिंबित करणारे मराठी भाषेचे बोलके माध्यम आपले संचित आहे या वास्तवाची अपूर्वाई वाटू लागते.

स्वत:बरोबर जीवाभावाचा संवाद साधण्यासाठी जे शब्द आपल्या अंत:करणाशी सलगी करू लागतात त्या आपल्या भाषेची जपणूक करण्याचे अगत्य जाणवू लागते. मातृभाषेबद्दलची आस्था, प्रेम हे 'नॉस्टाल्जिया' (Nostalgia) या शब्दातून व्यक्त होणारी केवळ हळवी स्पंदने राहत नाहीत तर येथे आल्यावर पृथ्वी, आकाश, तेज, वायू व जलाशयाइतकीच मायबोलीही जगण्यासाठी अत्यावश्यक वाटू लागते. येथे आल्यावर परिवर्तनाच्या प्रक्रियेत बरेच काही बदलते. बदलत नाही तो व्यक्तित्वात रुजलेला, मुळावलेला 'मराठी बाणा' किंवा 'मराठीपण'. व्यक्ती व समूहाच्या परिचयाला कायम स्वरूपाचे अधिष्ठान देणारी भारतीय संस्कृती व ऐतिहासिक, सामाजिक, नैतिक, धार्मिक मूल्ये जपण्याचे संस्कार देणारी आपली मातृभाषा यांचे माहात्म्य प्रकर्षाने जाणवू लागते. विश्वकोशाची मदत न घेता, मतांची, विचारांची, भावनांची अर्थपूर्ण देवाणघेवाण करण्याचे कसब शिकविणाऱ्या आपल्या संस्कृतीला, मायबोलीला, आगळेवेगळे रूप देण्याच्या निर्धाराने आपण देशभक्ती तथा भाषेवरील प्रेमाला कार्यरत बनवू लागतो. समान देश व समान भाषा आधार बनते, आपल्या मानसिक, भावनिक स्थैर्याचे, ऐक्याचे कारण बनते.

मराठी बाण्याच्या दिंडी-दरवाजातून स्मृतींचा हात धरून डौलाने 'महाराष्ट्र' नावाच्या बालेकिल्ल्यात प्रवेश करण्यात मराठी मन अधिक सुखावते. अमेरिकेला दत्तक-देश बनविले तरी येथील गतिशीलतेत जेव्हा चार विसाव्याचे क्षण वाट्याला येतात तेव्हा मराठी साहित्य वाचले जाते, लिहिले जाते, ध्वनिफिती उलगडून मराठी संगीत ऐकले जाते. महाराष्ट्र-मंडळ, मराठी-विश्व, महाराष्ट्र फाऊंडेशन सारख्या संस्था अस्तित्वात येतात. काही संस्थांच्या वास्तू उभ्या राहतात. 'रंगदीप', 'स्नेह', 'बृहन्महाराष्ट्रवृत्त' यांसारखे दिवाळी अंक निघू लागतात. दिवाळी अंकांच्या जागतिक स्पर्धांमध्ये 'रंगदीप' २००५ हा न्यूयॉर्कचा दिवाळी अंक पहिल्या पारितोषिकाचा मानकरी ठरतो. 'एकता' त्रैमासिक, रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करून, सुवर्णमहोत्सवाकडे वाटचाल करू लागते. मुलांना मराठी लिहिता, वाचता, बोलता यावे म्हणून सुरू केलेले उपक्रम यशस्वी होऊ लागतात. सध्याच्या भारतीय तरुण पिढीमध्ये, परिदृश्यांमध्ये, सिनेसृष्टीमध्ये पाश्चिमात्य अंधानुकरणाची चढाओढ पाहून, भारतीय सांस्कृतिक पर्यावरणाबाबत येथील मराठी व्यक्ती अधिक व्यथित

होतात. तळमळीने लिहू लागतात. स्वत:च्या अनुभव-आलेखांना शब्दबद्ध करून, आपला वारसा जपण्याचा वारंवार आग्रह करतात. मराठी साहित्यात मोलाची भर घालून सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य पूर्ण करण्यात येथील लेखक-लेखिकांचे योगदान खरोखरच उल्लेखनीय आहे. मराठी भाषेचे आणि साहित्याचे काही खरे नाही अशी टीका हल्ली ऐकू येते. विश्वसाहित्यात, हाताच्या बोटांवर मोजण्याइतपतच मराठी रचना आहेत ही खंत काही विचारवंत व्यक्त करीत आहेत. हे वास्तव 'मराठी व्यक्तींच्या आत्मसंतुष्ट स्वभावामुळे असेल' असेही मत माझ्या वाचण्यात आले आहे. ज्ञानपीठ पुरस्कार, पारितोषिके, बहुभाषांतील भाषांतरे, पुस्तकांच्या आवृत्तींची मोजदाद या मर्यादित निकषांवर भाषेची समृद्धी, समर्थतता व भविष्याची उज्वलता ठरविली जावी का? हा मला पडलेला प्रश्न. येथील मराठी साहित्यिकांचे प्रयत्न नजरेआड करून चालणार नाही.

भारतीय संस्कृती, मराठी भाषा, मराठी बाणा व मराठी अस्मितेचे वैभव प्रकट करणारी, उत्तर अमेरिकेच्या शहरोशहरी होणारी बृहन्महाराष्ट्र संमेलने मोठ्या परिश्रमाने 'मराठीपण' जपताहेत.

उदाहरणच द्यायचे झाले तर जुलै २००३ मध्ये अकरावे बृहन्महाराष्ट्र संमेलन न्यूयॉर्क येथील मॅडिसन स्क्वेअर गार्डनमध्ये संपन्न झाले व मराठी भाषेच्या भवितव्याच्या उज्वल रूपाला न्यूर्यार्कच्या कलानगरीने मानाचा मुजरा केला. अमृतवाणीचा वारसा सांगणाऱ्या भाग्यवंतांच्या दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत, अगत्यशील आदरातिथ्य बृहन्महाराष्ट्र मंडळ, जागतिक संमेलनाच्या निमंत्रक समितीचे अध्यक्ष श्री. सुरेश देशमुख व त्यांच्या साथीदारांनी केले. जगद्‌विख्यात मॅडिसन स्क्वेअर गार्डन या वास्तूवर महाराष्ट्राचा भगवा झेंडा फडकाविला. मराठी जनांचे व या आलिशान वास्तूच्या डोळ्यांचे पारणे फिटावे अशा भव्यदिव्य सोहळ्यामागे दोन वर्षांचे परिश्रम होते. सुरांचा ईश्वर 'सुरेश' व त्यांचे साथीदार मराठी भाषिकांना नादब्रह्माची अनुभूती देण्यात यशस्वी झाले. भूपाळीपासून भैरवीपर्यंत पाहुणे - वारकरी सूर, ताल, साहित्य-आस्वादात हरवले होते. सुरेश देशमुखांनी डॉ. शरदकुमार दीक्षितांच्या मानवीय योगदानाच्या सत्यतेपर्यंत मराठी जनमानसाला घेऊन जाण्याचे विधायकत्व दाखविले. डॉ. प्रकाश व डॉ. सौ. मंदा आमटे यांच्या हेमलकसा सेवाकार्याला भरघोस आर्थिक हातभार लावला. या संदर्भात संजीव लाटकरांचे विधान होते, ''मराठी मातीतल्या माणुसकीला आमटे दांपत्याने आज वैश्विक परिमाण दिले.'' संमेलनाची सांगता होईपर्यंत, डोळ्यांसमोर संपूर्ण वैभवाने सजलेले मायबोलीचे रूप होते व डोळ्यांतील आनंदाश्रू माय-मराठीला ऐकवीत होते-

आले पूर्वेचे आकाश, पश्चिमेच्या अंगणात
तुझी स्वप्नपूर्ती दिसे, माझ्या अश्रु-दर्पणात।

माझ्या समाधानी नेत्रांसमोर संत नामदेवांच्या हातातील एकतारी अखंड वीणा दिसू लागते, जिचा उल्लेख दिंडी म्हणूनही केला जातो. येथील मराठी बांधवांचा समूह ही संत नामदेवांच्या हातातील दिंडी आहे. या अखंड वीणेची तार आहे आमची मायमराठी. ही तार छेडून जीवनाला सुस्वरतेचा साज चढविणार आहे आमची एकता. या अखंड वीणेच्या झंकारातून मराठी संगीत, साहित्य, कला, अभिनय, मूल्ये, परंपरा अशा अनेकविध अभिव्यक्ती-माध्यमांची बरसात होत राहील. ऐक्याच्या निरभ्र आकाशात मायबोलीच्या इंद्रधनुष्याला ध्रुव-ताऱ्यासारखे अढळपदही मिळेल, जोपर्यंत अक्षुण्ण आहेत –

हे बंध मराठीचे!


**3345 73rd St.**
**Jackson Heights**
**NY 11372-1105**



## शिवा डान्सिंग




**भारती कर्चनर**

'आपण भारताबद्दलच कादंबरी लिहिली तर? मोंगल किंवा ब्रिटिश राजवटीवेळचा नव्हे, तर आजचा भारत. सुमारे शंभर कोटी लोकसंख्येचा, शेकडो भाषा आणि बोलीभाषा असलेला, चारशे आदिवासी जमातींचा, अनेक धर्म आणि त्यांच्या देवतांचा,जगातली दुसऱ्या क्रमांकाची रेल्वे असलेला आणि जगातलं चौथ्या क्रमांकाचं भूदल असलेला. भारत, जगातील सर्वात मोठी लोकशाही, ज्या ठिकाणी अठराविश्वे दारिद्र्य आणि कल्पनातीत संपत्ती शेजारी शेजारी नांदतात आणि देवदेवतांची दोन्ही समपातळीवर उपासना करतात. भारत, सतत वांशिक संघर्षाला सामोरा जाणारा आणि तरीही या जगाला 'गांधी' देणारा. त्याला ही संस्कृती नेमकी काय आहे त्याचं आकलन होईना आणि ते कधीच होणार नाही. तरीपण त्याविषयी लिहायला काय हरकत आहे? ज्यावेळी तो भारताबद्दल विचार करू लागला तेंव्हा त्याच्या लक्षात आलं की हे विषय आणि या कल्पना आजपर्यंत त्यानं जे लिखाण केलं होतं त्यापेक्षा कितीतरी पटीनं ताकदवान होत्या, विस्तृत होत्या.'

**—'शिवा डान्सिंग' या पुस्तकातून..**

**अनु. मंजुषा गोसावी**

**२५० रु.** पोस्टेज ३०रु.



# परदेशातही जपलेले भारतीय सिनेसंगीत

**उषादेवी कोल्हटकर**

एके सकाळी एक अनपेक्षित फोन येतो. आर्जवी स्वरात एक प्रश्न, होकार गृहीत धरून, विचारला जातो. ''तुम्हाला एक मिनिट वेळ असेल तर माझे जीवनसूत्र बनलेल्या गीतातील पुढील बोल ऐकाल का?'' त्यानंतर 'अनाडी' चित्रपटातील भावपूर्ण गीताचे बोल कानावर पडतात...

किसीकी मुस्कुराहटों पे हो निसार
किसीका दर्द मिल सके तो ले उधार
किसीके वास्ते हो मेरे दिलमें प्यार
जीना इसीका नाम है...!

गीताचे सूर धीमे होतात, धन्यवादाची औपचारिकता निभावीत जयंत कुळकर्णी फोन बंद करतात आणि या आगळ्यावेगळ्या चित्रकाराच्या व्यक्तित्त्वाबद्दल मी नकळत विचारू करू लागते.

त्यांच्या अंतरंगात डोकावताना जाणवले की भारतीय चित्रपटसंगीतातील दुर्लभ, दुर्मिळ गीतांनी जयंतांना ओलीस म्हणून ठेवले आहे.

वास्तव किंवा वास्तवतेचे रूप प्रत्येक व्यक्तीच्या नजरेला वेगळे दिसते. न्यूयॉर्कसारखे शहर कोणाला कमालीचे असुरक्षित वाटते तर कुणाला स्वत:कडेच परक्या नजरेने पाहणारे वाटते. याच शहरात वास्तव्य करणाऱ्या जयंतांना मात्र, या शहराचे कोणतेच रूप अस्वस्थ करीत नाही. त्याचे कारण आहे त्यांचा सुरीला छंद. ज्या ज्या क्षणी ते आपल्या लाडक्या छंदाचा बिलोरी आरसा हातात धरतात, तेव्हा त्यांना प्रतिबिंब दिसते ते १९४० ते १९६० या कालावधीत सिनेसंगीताच्या सुवर्णकाळाचे. तो काळ असा होता की सुरांना त्यांच्या आरोहवरोहांची मिजास सांभाळली जाईल याची खात्री होती. गीतांच्या बोलांतील अर्थपूर्णता बोलकी होती. तालवाद्ये, तंतुवाद्ये आणि इतर अनेक वाद्यांच्या नादमाधुर्यात पूर्वेकडील संगीतसाधनेचे वैभवी झंकार सामावले होते. अशा आशयपूर्ण, सूरमधुर सिनेगीतांचा शिस्तबद्ध संग्रह हे जयंतांच्या छंदाचे मनोवेधक रूप हा छंद त्यांनी ३६ वर्षे, पूर्ण तीन तपे, आस्थेने जपला. आनंदाने जोपासला.

स्वरसान्निध्याची अनाम ओढ त्यांना बेचैन करीत असे. दुर्मिळ ध्वनिमुद्रिका मिळवण्यासाठी अनेक वेळा मुंबईतील चोरबाजार पालथा घालणे, पायपीट करणे, प्रसंगी प्रवास करणे, ज्या कोणाकडे हवे असलेले गीत किंवा गीते असतील तेथे जाऊन, लागेल ती किंमत देऊन ती मिळवणे हे सर्व त्यांनी न कंटाळता केले. वेळेचा व पैशाचा हिशेब या व्यवहारी गोष्टींना त्यांच्या छंदाच्या दुनियेत किंमत नव्हती. समाजात छंदापायी वेळ वाया घालवणारे आहेत तसेच छंदाच्या निमित्ताने वेळेचा सदुपयोग करणारेही आहेत. जयंतांसारखी व्यक्ती छंदाला माध्यम बनवून मनोरंजनातून नि:स्समी आनंदाचा अनुभव घेते आणि मित्रपरिवार वाढविण्यासाठी देखील या आगळ्या छंदाचे लोभस रूप कारणीभूत ठरते. जयंत चित्रकार आहेत म्हणून त्यांच्याठायी सौंदर्यदृष्टी आहे हे गृहीत मानले तरी त्यांच्या प्राध्यापक, लेखक पित्याच्या (वि. ह. कुळकर्णी) मित्रपरिवाराने जयंतांना सौंदर्यदृष्टी जपण्याची आणि फुलविण्याची दृष्टी दिली असे विधान केल्यास वावगे ठरू नये. वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, कवी यशवंत, विंदा करंदीकर, प्रभाकर पाध्ये, रा. भि. जोशी आणि यांच्यासारखे अनेक मराठी साहित्यातील रथी-महारथी यांची जयंतांच्या पित्याच्या घरी सतत वर्दळ असे. त्यामुळे त्यांच्या साहित्यचर्चेचा आस्वाद घेणे हा जयंतांचा गीतसंग्रहासारखाच छंद बनला. काळाच्या ओघात साहित्यासोबत, लाडक्या गाण्यांचे श्रावण ही जयंतांच्या जीवनातील अपरिहार्य गरज बनली. संबंध जोडणे, टिकविणे आणि जपणे या कलेतही त्यांच्या छंदाने प्राविण्य मिळवायला सुरुवात केली. प्रसिद्ध संगीतकार सी. रामचंद्र स्वत:च्या हरवलेल्या गीतांचा शोध घेत जयंतांच्या मुंबईतील निवासस्थानी आले आणि त्यांचे मित्र बनले. नाना पाटेकरांसारख्या कित्येक

संगीतशौकीन मित्रांनी, स्वत:च्या आवडीची गाणी ऐकत, जयंतांबरोबर रात्री जागविल्या आणि जयंतांच्या चाहत्यांसाठी चहा करताना सौ. वीणावहिनी थकून गेल्या. हा अनमोल गीतसंग्रह जयंतांचा व्यक्तिगत ठेवा असला तरी त्यांच्या नकळत तो सामाजिक मालमत्ता (Social asset) बनला. पुढेमागे, 'भारतीय चित्रपटसृष्टीतील संगीताची सरगमी वाटचाल' अशा विषयावर डॉक्टरेट करणारे विद्यार्थी जयंतांच्या म्युझिक लायब्ररीचे ऋण कबूल करू लागले तर मला आश्चर्य वाटणार नाही.

स्वरांच्या ध्यासापायी लता मंगेशकरांना प्रत्यक्ष भेटण्याचे स्वप्न पूर्ण तीस वर्षे त्यांनी मनी जपले आणि ते साकारही झाले. स्वरसम्राज्ञीसमवेतच्या भेटीला जसे त्यांनी शब्दरूप दिले तसेच सी. रामचंद्र, अनिल विश्वास, मीना कपूर, सज्जाद हुसेन यांच्याही परिचयात असंख्य रसिकांना सामावून घेतले. स्वरआकाशातील या तेजस्वी तारकांची मला अपूर्वाई आहे; तुम्हीही या आनंदात सहभागी व्हा असे म्हणत आनंद भरभरून उधळला. नामवंत संगीतकार, ख्यातनाम गायिका व गायक यांच्या संगीतक्षेत्रातील योगदानाची रसिकांना जाणीव करून देणे, यात समाजऋणाची अल्पशी फेड करण्याचा नम्रपणाही आहे हे निश्चित. 'अमर-लता','सुन जा दिलकी दास्तां', 'सरगम' यासारखे अनेक कार्यक्रम सादर करताना स्वत:च्या निर्भेळ आनंदात संगीतप्रेमी रसिकांना मनापासून सामील करून घेणे हा एकमेव स्तुत्य हेतू होता. या कार्यक्रमांच्या देखण्या प्रस्तुतीकरणात दिसतो तो हातचे राखून न ठेवता जगणारा एक दिलदार दाता. भारतीय संगीताच्या या विशेष विद्येवर जीवापाड प्रेम करणारे जयंत, या छंदातून लाभणाऱ्या सुखाची, आनंदाची, मन:शांतीची भागीदारी करतात तेव्हा फक्त एवढेच जाणवून देतात की या स्वरलहरीतून तुम्हाला लाभलेले समाधान हेच खऱ्या अर्थाने माझे परिश्रमिक.

चंदेरी दुनियेचा निरोप घेऊन, पडद्याआड गेलेल्या अभिनेत्री पद्मिनीच्या घुंगरांचा मागोवा घेत, तिचे मनोगत जाणून घेण्याचे त्यांना अगत्य आहे. कमालीच्या यशस्वी चरित्रनायिका म्हणून ज्या स्त्रीने अभिनयसृष्टीला अनेक सशक्त भूमिकांनी सजवले त्या श्रीमती लीला चिटणीस यांच्या वृद्धावस्थेतील एकाकीपणाचीही जयंतांना काळजी आहे. इंद्रसूत जयंताला स्वरसुमनांचे अर्घ्य द्यावे लागत असे किंवा नाही याची मला कल्पना नाही. परंतु जयंत कुलकर्णी मात्र सप्त स्वरांना अर्घ्य देत असतात स्वत:च्या तन्मयतेने. या व्यक्तीचा जीवनोत्साह वाखाणण्याजोगा आहे. प्रपंचाच्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून मित्रपरिवाराच्या संगीत संदर्भातील फर्माईशी पूर्ण करणे ही त्यांच्या छंदाची सुधारून वाढवलेली आवृत्ती आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरू नये. स्वत:च्या संगीत-खजिन्यातील सूरमाला, ध्वनीफितीत ओवून ती आत्मीय स्वरफुले फर्माईशी करणाऱ्यांकडे स्वत: नेऊन पोहोचविणे हेही जयंतांचे मनपसंत काम. या उद्योगात डॉ. प्रकाश लोथे यांच्या घरी मयूरपंख चित्रपटातील दुर्लभ गाणी जाऊन पोहोचतात आणि मनाचा मोर पिसारा फुलवून नाचू लागतो. कुणाला खुर्शिद गायिकेच्या स्मृती ताज्या करण्याची संधी मिळते, तर 'ख्वाब चुन रही है रात' हे दर्दभरे गीत कुणाच्या एकांताला खुशबूदार करून जाते. अश्रूंच्या ओठांवर हास्याची महिरप सजविण्यात या चित्रकाराचा कुंचला कुठेही कमी पडत नाही. एकाकीपणात सुरांचे रंग भरण्याचे कसब जयंतांकडून शिकावे. 'किसीका दर्द मिल सके तो ले उधार...' या बोलातील अर्थ प्रत्यक्षात कुणी जगून दाखवावा तर तो जयंतांनी, हे मी साधिकार अभिमानाने सहज म्हणू शकेन.

श्री. शि. द. फडणीस यांचा महाराष्ट्र मंडळात कार्यक्रम आयोजित करणे असो किंवा श्री. जयंतकुमार त्रिभुवन याचा सत्कार करण्यात पुढाकार घेणे असो, आत्मीयतेने मदत करणे एवढीच मनी इच्छा. त्यांच्यासारखा सहृदय सहयात्री भेटणे म्हणजे प्रवास निर्विघ्न होणे याची साक्ष हवी असेल तर डॉ. शरदकुमार दीक्षितांची भेट घ्यावी. या सद्‌गृहस्थाला खूप खूप बोलायला आवडते, पण ते स्वत:बद्दल काही बोलतच नाहीत. त्यांच्या बोलण्यात असते चिरंजीव सलीलची हुशारी, सौ. वीणावहिनींची गृहिणी या भूमिकेतील लाजवाब कर्तबगारी किंवा बहीण सौ. इरावतीने वडिलांचे लेखनगुण हुबेहूब उचललेत या समाधानाची कबुली. क्वचित भेटीला आले तरी हातात असतो माझ्या सुमीतबाळासाठी चिमणचारा. अशावेळी वाटते आचार, उपचारांतदेखील शिष्टाचार शिकायला जयंतांकडे जावे. 'आईविना दिनांची गणता अपूर्ण असते' ही खंत वारंवार व्यक्त करणारे, स्वत:च्या वंदनीय वडिलांच्या संदर्भात अभिमानाने अथक बोलणारे जयंत अंतर्मुख होऊन जेव्हा वडिलांनी लिहिलेल्या 'जॉर्ज बर्नार्ड शॉ' या पुस्तकाचे मुखपृष्ठ रंगवितात तेव्हा जॉर्ज बर्नार्ड शॉ यांच्या रूपातील, व्यक्तिमत्त्वातील रहस्यानुभूती, गूढरम्य भाव इतक्या सुस्पष्टपणे रेखाटतात की त्याच्यातील चित्रकाराच्या रूपाला योग्य न्याय मिळाला असेही भाव मनी लागतात हे तितकेच खरे.

मैत्रीला प्रतिमैत्रीची अपेक्षा असते पण दान देताना दात्याला निरपेक्ष आणि समर्थच राहावे लागते. जयंतांमधील दाता असा समर्थ रहावा हीच प्रार्थना.

ताण-विमोचनासाठी मानसशास्त्रज्ञाकडे जावे किंवा केविलवाण्या एकाकीपणाची सोबत करण्यासाठी कुत्रा किंवा मांजर पाळावे हा अमेरिकन प्रघात काही अंशी ठीक आहे. मानवी भावनांना घातक सिद्ध होईल असे त्यात काही वावगेही नाही. येथील समाजजीवन, जीवनपद्धतीतून बरेचदा जाणवणारे मानसिक शैथिल्य, ताण-तणाव, दुर्बलता, असहायता, एकाकीपण, हताश मन:स्थिती यावरील अमोघ उपाय म्हणून जयंतांनी अगाध भक्तिभावाने जपलेल्या या छंदाची भागीदारी करावी. मुग्ध भावाने आकर्षित होऊन मंत्रमुग्ध होईपर्यंत त्या सुरांना स्वत:च्या भावजीवनाचा अर्थपूर्ण संदर्भ बनवावे. सुख-दु:ख, मीलन-विरह, यश, आनंद, भक्ती, शक्ती सारे सारे भाव या गीतांच्या बोलातून अनुभवावेत. या सहज, स्वाभाविक आणि प्रसंगी समाधी अवस्थेचे सुख देणाऱ्या गीतांना मनमित

बनवावे. काही क्षणांच्या विस्तारामध्ये सामावलेले मन:शांतीचे गूढ अगदी सहज, सरळ आणि सोपे होऊन तुम्हाला भेटेल.

आवेग नसलेला वेग आहे या समाजजीवनात. या वेगाने होते ती फक्त दमणूक, दमछाक. मानवता या शब्दांचा पदोपदी अपमान होतो आहे असे अनुभव येतात, कटु सत्य निरखावी लागतात. सुबत्तेची जाहिरात करणाऱ्या आलिशान घरात डोके ठेवायला जागा मिळते खरी पण अंतरानुभूतींची तहान वाढतच जाते. ही व्याकुळता असह्य होण्याआधी जयंतांसारख्या छंदिष्ट कलावंताचा शोध घ्या. सापडतील ते तुम्हाला, एखादे मधुर गीत ध्वनीफितीत ओवताना, तुमच्या चेहऱ्यावरची तगमग वाचतील. त्यांच्या बोलण्यातही तुम्हाला आनंद, समाधान लाभावे याची लगबग जाणवेल. जे काही ऐकवतील ते बहुधा त्या शायरने लिहिले तितकेच अर्थपूर्ण असेल. जयंतांच्या शब्दांतूनही काहीसे असेच भाव जाणवतील...

चश्मे पुरनम भी खरीद सकता हूँ *
जुल्फे बरहम भी खरीद सकता हूँ *
मेरी खुशी अगर कहीं बिक सके
तो तेरा गम भी खरीद सकता हूँ।

तसे पाहिले तर काहींना असेही वाटण्याची शक्यता आहे की जयंतांचा हा छंद अद्‌भुत, असाधारण नाही. छंद अद्‌भुत नसेल परंतु वारसा जपणे ही अपरिहार्यता निभावण्याचे त्यांचे मनस्वीपण फार फार असाधारण आहे. संगीत... मन, संवेदना, स्पंदनांना मदहोश करणारे अभिव्यक्तीचे एक अत्यंत सुरमधुर माध्यम. या माध्यमाला इतक्या कलात्मक लडिवाळपणे सांभाळणारा कलेचा खरा प्रामाणिक उपासक मला आजपर्यंत भेटला नव्हता. संगीताच्या अनुभूती अनुभवताना देश, भाषा वा कोणत्याही सीमा व्यक्तीला जाणवत नाहीत. एक विशुद्ध आनंद, समरस होऊन लुटायची तयारी असणारे मन ज्याच्याठायी आहे त्याने हे सीमातीत सुख भान हरवून उपभोगावे. त्यांचा छंद जणू सुचवतोय– जपण्यासारखे खूप आहे, व्यक्तीचे मन, आवडीनिवडी, भावना, संस्कृती, परंपरा, मूल्ये, कला आणि बरेच, बरेच. जयंतांच्या व्यक्तित्त्वात आस्था आहे, व्यवहारात माणुसकी आहे, प्रयत्नांना निश्चित उद्देश आहे, तथ्यपूर्ण, अर्थपूर्ण लयबद्ध शोधण्याची, जपण्याची ओढ आहे. या सुरांच्या भागीदारीत कशाची अपेक्षा नाही. हृदय, संवेदना, स्पंदनांना जिंकणाऱ्या सुरांच्या बेसुमार वैभवाचे रंग ज्यांच्या जीवनात मिसळले आहेत त्या जयंतांची भेट घ्या आणि जीवनातील सहजतेत स्वाभाविकपणा शोधण्याची कला शिकून घ्या. जयंत तुम्हाला कानमंत्र देतील, तो स्वत:ला विसरून जगण्याचा आणि तुमचा निरोप घेताना दिलखुलास हसून तुम्हाला ऐकवतील...

हम हैं और आपकी खुशी हैं आजकल
जिंदगी, जिंदगी हैं आजकल...

त्या क्षणी तुमच्या जागी मी असेन तर निश्चित म्हणेन...

"My hats off to you Jayant...!"

* चश्मे पुरनम = अश्रूपूर्ण नेत्र,
** जुल्फे बरहम = स्वर्गीय तेज असलेले सोनेरी केस

**JVKNY1@gmail.com**


## सीॲटल महाराष्ट्र मंडळ

पदाधिकारी
सीॲटल महाराष्ट्र मंडळ
स्वाती अनगोळकर, अध्यक्ष
रोहित चाफेकर, उपाध्यक्ष
मौसुमी परांजपे, कोषाध्यक्ष
सुचेता पार्डीकर, सचिव
विद्या अनगोळकर, सदस्य
संजीव कारंडे, सदस्य
शंतनु सरदेसाई, सदस्य
नीता भुरकुटे, सदस्य
शैलेंद्र उपाध्ये, सदस्य
रुपाली शेठ, संपादिका, सारथी, स.न.वि.वि.
ई-मेल : President@seattle.mm.org
reachrupali@gmail.com
Seattle Maharashtra Mandal,
16541 Redmond way, PMB # 113-C
Redmond Wa 98052

## बृहन्महाराष्ट्र मंडळ

**(२००५-०७)**

अध्यक्ष - जगदीश वासुदेव
President@bmmonline.org
उपाध्यक्ष - कल्पना निमकर
sknimkar@yahoo.com
- नीता इनामदार
ninamdar47@yahoo.com
- किरण जोगळेकर
dholki@hotmail.com
संपादक - मोहन रानडे, फिलोडेल्फिया
neelamvdo@comcast.net
Brihan Maharashtra Mandal
26 Rocky Hill Road,
Princeton NJ 08540 USA



# इमान

ललिता गंडभीर

अमेरिकेत वाढणाऱ्या भारतीय मुलांच्या मन:पटलावर भारतीय संस्कृतीची झिलई चढवण्यासाठी
आम्ही कल्चरल स्कूल सुरू केलं. वर्गणी जमवली, एका शाळेत जागा मिळवली,
'मुलांना काय शिकवायचं?' याचा विचार सुरू झाला आणि मला समजलं
'भारतीय कल्चर म्हणजे काय?' हे आम्हा कुणालाच नक्की माहीत नव्हतं.
मला स्वत:ला तर नव्हतंच नव्हतं. संस्कृतीचे संस्कार सभोवतालच्या वातावरणातून आपोआप होतात.
परकीय समाजात राहून तासा दोन तासात आपलं कल्चर मुलांना शिकवता येईल का?
हा गहन प्रश्न मला सतावत होता. करिक्युलमसाठी ब्रेनस्टॉर्मिंग सेशन झालं.
त्यात अनेक सूचना मांडल्या गेल्या.
भारतीय संस्कृती म्हणजे
''भारतीय कला, नृत्य, गायन, नाटक,''''भारतीय खेळ हुतुतू, खो खो,''
''भारताचा इतिहास आणि भूगोल,'' ''भारताच्या भाषा, हिंदी, मराठी, बंगाली,''
''वेद, उपनिषदं व भगवद्गीता.'' ''भारताचं वाङ्मय, महाभारत, रामायण, शाकुंतल,''
''भारतीय परंपरा, स्वार्थत्याग, कुटुंबप्रेम,'' ''भारतीय स्वयंपाक, वेगवेगळ्या पद्धतीचा,''
ह्या मतामतांच्या गलबल्यातून कसाबसा करिक्युलम् तयार झाला.
दर रविवारी सकाळी शाळा भरू लागली. भाषेचा एक तास आणि कल्चरचा दुसरा.
ज्यांच्या कल्याणासाठी धडपडून शाळा सुरू केली होती ती मुलं मात्र जाम वैतागली.
''We live in America. Why do we have to learn Indian culture?''
''You have ruined our Sundays.''
कल्चरच्या वर्गात कोण काय शिकवत होतं ह्याविषयी मी अंधारात होते.
पण मुलांचे प्रश्न सुरू झाले.
''What was Radha and Krishna's relationship?''
''How can a man have ten heads?''
''I liked सत्यनारायण पूजा today.''
''प्रसाद was good but stories were kind of dumb.In those stories people had to bribe God.''
एक दिवस तर कहर झाला. मुलांनी अमराठी शिव्यांची यादी म्हणून दाखवली.

मी कपाळाला हात लावत म्हटलं,''शिव्या हा सुद्धा संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.''
कल्चरच्या तासात इतर मुलांनी हे शिक्षण दिलं होतं!

२

भारतभेटीत लक्षात आलं, ''माझ्या लहानपणची पुणेरी मराठी संस्कृती आता पुण्यातच अस्ताला जात होती.'' भारतातले कझिन्स आता इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जात होते. ते आमच्या मुलांशी इंग्लिशमध्ये बातचीत करीत होते. आणि इतरांशी मंग्लिश (मराठी-इंग्लिश) बोलत होते.
मला एक भाची म्हणाली,''तू किती टॉप मराठी बोलतेस.हाऊ प्युअर!''
गुढीपाडवा, तुळशीचं लग्न असे सण फक्त माझ्या पिढीच्या स्मृतीत तग धरून होते. माझ्या लहानपणी लांछनास्पद मानलं जाणारं दारू पिणं आता केवळ समाजमान्य नव्हे, अभिमानास्पद झालं होतं. ''आम्ही पितो.''एकेकाळच्या सोवळ्या पुण्यात घरोघरी अभक्ष्य शिजत होतं. थोडक्यात माझी मराठी संस्कृती फक्त माझ्या मनात नांदत होती. लहानपणी मी पुणे, मुंबई, कोल्हापूर, कोकण, अहमदाबाद, इंदूर अशा गावांची वेगवेगळी संस्कृती अनुभवली होती. भारतातल्या प्रवासात भारतातल्या वेगवेगळ्या प्रांतांच्या संस्कृतीची निरनिराळी झलक मला स्पर्श करून गेली. मग पिढ्यान्‌पिढ्या स्थलांतरित आफ्रिकन, कॅरेबियन, युरोपियन भारतीयांची संस्कृती मला भेटली. भारतीय संस्कृतीच्या या तारांगणात मी वर्षानुवर्ष मराठी संस्कृतीची चांदणी शोधत राहिले.

३

कधीतरी केव्हातरी उमजलं भारतीय संस्कृती हा कॅलिडोस्कोप आहे. ती आपले रंग सतत बदलते.
भारतीय संस्कृती हे मृगजळ आहे. ती सापडते न सापडते तोच हरवते.
भारतीय संस्कृती ही नवरत्नांची खाण आहे. तिच्यामधून विविध रत्नांची उधळण होते.
भारतीय संस्कृती समुद्राच्या लाटांसारखी आहे. प्रत्येक लाट वेगळी दिसते आणि समुद्रकिनाऱ्यावर विरून जाते. आणि भारतीय संस्कृतीचे हे सगळे आविष्कार माझेच आहेत.

४

अमेरिकेतील मराठी समाजाने कल्चरल स्कूल्स काढली. मासिके व वृत्तपत्रं सुरू केली. लावण्यांचे कार्यक्रम केले.पुस्तके लिहिली. कविता केल्या. मराठी मंडळे स्थापन केली. सामुदायिकरीत्या व घरात सण साजरे केले. देवळं बांधली.रांगोळ्या काढल्या. आकाशकंदील केले. सत्यनारायणाच्या पूजा केल्या. घरी मराठी बोलण्याचा पायंडा पाडला. मुलांना भारतभेटीस पाठवलं. भारतातून कलाकार बोलावले. मुलींना नृत्य शिकवलं. मुलांच्या मुंजी केल्या. तरुण मुलामुलींसाठी 'स्नेहबंध' संमेलनं भरवली. अमेरिकन मुलामुलींशी भारतीय पद्धतीने आपल्या मुलामुलींची लग्नं लावली. अधिवेशनं भरवली, चर्चासत्रं केली, एकांकिका स्पर्धा घेतल्या अमेरिकेत साहित्य संमेलनं भरवली. 'इंडिया डे' साजरा करायला सुरुवात केली.
प्रतिष्ठानं स्थापन करून उत्तम मराठी साहित्याला बक्षिसं दिली. भारतात निबंधस्पर्धा सुरू केल्या.
जे सुचेल ते करून अनिवासी मराठी भारतीयांनी आपल्या अगम्य, बहुरंगी, बहुरूपी संस्कृतीला स्वत:च्या ओंजळीत धरलं आणि आपल्या संस्कृतीशी इमान राखलं.


65 Oxford Rd.
Newton Centre
MA 02459 U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com



# मुलांवरचे मराठी संस्कार

डॉ. सौ. शारदा ग. सबनीस

खरंच! मराठी बाणा म्हणजे काय? आणि तो मी परदेशात कसा काय सांभाळला?

मी एक मध्यमवर्गीय मराठी कुटुंबात जन्मलेली व मराठी माध्यमातून शिकलेली, इंग्लिश माध्यमातून डॉक्टरची पदवी घेऊन अमेरिकेत राहणारी, करिअर (व्यवसाय) सांभाळून, घर सांभाळणारी मराठी स्त्री! अमेरिकेला येण्यापूर्वी 'मराठी संस्कृती - मराठी बाणा' असा वेगळा विचारच केला नाही. कारण तशी गरजच वाटली नाही. शाळेत आणि घरी सतत मराठी वातावरण असल्याने कळत नकळत मराठी संस्कृतीचा/मराठी बाण्याचा थेंबाथेंबाने अभिषेक होत राहिला. मुंबईत वाढल्याने इतर प्रांतीय आणि इतर धर्मीय संस्कृतीलाही सामोरे जावे लागले. पण शाळेतील, घरातील मराठीपणाने पाय मराठी मातीत घट्ट रोवलेले आहेत.

अमेरिकेला आल्यानंतर मराठी बाण्याची व्याख्या फक्त मराठीपुरती मर्यादित न राहता 'भारतीय' बाण्यात परिणत झाली, मात्र ह्या विस्ताराचा पाया मराठीच राहिला. माझ्या सदतीस वर्षांच्या अमेरिकेतील वास्तव्यात प्रथम प्रथम मराठी माणूस भेटणे किंवा मराठीत कोणाशी बोलायला मिळणे म्हणजे एक पर्वणीच असे. त्या दिवसांत टेलिफोन डिरेक्टरीमध्ये मराठी नावे दिसली की लगेच त्यांना फोन जात असे. आणि ओळखी होत असत. अशा परिस्थितीत मराठीत काही करायला मिळाले, वाचायला किंवा ऐकायला मिळाले तर खूप आनंद होत असे. भारतापासून लांब म्हणून असेल किंवा मराठीची ओढ म्हणून असेल पण 'मराठी'साठी काही करण्याची संधी कधीही हातातून निसटू दिली नाही. त्यासाठी नाटकाच्या संचाला घरी ठेवून घेणे, घरात मराठी कार्यक्रम करणे, मराठी सणानिमित्त मराठी माणसांना एकत्र आणणे, मराठी मासिके, दिवाळी अंक, ध्वनिफिती, पुस्तके व पुढे व्हिडिओ जमा करणे, मराठी माणसांची सहल (पिकनिक) काढणे व त्यातूनच पुढे मराठी मंडळाची स्थापना करण्यात सहभाग, मराठी औद्योगिक, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांना मदत करणे, भारतातून येणाऱ्या मराठी कलाकारांना स्पॉन्सर करणे, घरी ठेवून घेणे ह्या सर्वांतून मराठीचे देणे देत राहिले आणि नकळत 'मराठी बाणा' जोपासत राहिले.

हे सर्व 'मराठीपणा' वरील प्रेमाखातर होत गेले. कारण खरे सांगायचे तर मराठी बाणा वगैरे प्रगल्भ विचार त्यावेळी मनाला शिवतही नसत. ऐन उमेदीचा काळ आणि अमेरिकेत बस्तान बसविण्यासाठी धकाधकीचे आयुष्य – आपण मराठीला कायम ठेवले पाहिजे हा विचार करायलाही वेळ नसे. मात्र आयुष्य जरा स्थिरस्थावर झाल्यावर व मुले मोठी होऊ लागल्यावर ह्या 'मराठी बाण्या'चे विचार सुचू लागले. आम्ही दोघे, मराठी शाळांतून व घरी मराठी वातावरणात वाढलेले. तेव्हा मराठी भाषेचे प्रेम, मराठी वाङ्मय आणि प्राधान्याने मराठी सण त्यांचे संस्कार लहानपणापासून होतेच. पण ही मराठी संस्कृती मुळात कशी रुजवायची हा प्रश्न भेडसावू लागला.

मुले लहान असताना बाडबिस्तरा गुंडाळून कायमचे मुंबईला/महाराष्ट्रात जाण्याचा असफल प्रयत्नही केला. मात्र एकदा अमेरिकेत स्थायिक होण्याचे ठरले तेव्हा 'मराठी'पणा टिकविण्याचे सक्रिय प्रयत्न सुरू झाले. मराठी बाराखडी, कित्ता गिरविण्याची पुस्तके, मराठी पौराणिक चित्रमाला पुस्तके आली. मराठी गाणी, टेप्स आणि मराठी भाषा घरांत ऐकू येऊ लागली. मोटारीने लांबच्या प्रवासात असताना मराठी कथाकथन, गाणी, नाटके, भाषणे यांच्या ध्वनिफिती वाजू लागल्या. मराठीच्या त्या माऱ्याला मुले कंटाळली की तात्पुरते त्यांच्या कलाने घेऊन पुन्हा मराठीचा मारा होऊ लागला. प्राथमिक शाळेत असताना मुलांनी मराठी विरुद्ध बंडही

केले आणि मराठीत बोलण्याचेच बंद केले. तरीही आम्ही दोघांनी त्यांच्याशी मराठीतच संवाद कायम ठेवला. अगदी टोकाला जाऊन 'मराठी बोलला नाहीत तर जेवण बंद' असा पर्याय मात्र कधी वापरला नाही (आमच्या काही चिनी मित्रांनी हा पर्याय वापरला आहे). तरी मुलांच्या इंग्रजीला वाव देऊन आम्ही मराठीतच जास्त करून संवाद कायम ठेवला. हा आमचा मराठीचा आग्रह मुलांना कॉलेजमध्ये गेल्यावर पटला. वेगवेगळ्या भाषांतून बोलणारे सहविद्यार्थी पाहून त्यांनाही आपल्या भाषेत बोलणे कमीपणाचे नाही हे पटू लागले. कॉलेजच्या वसतिगृहातून आलेल्या फोनवर मराठी वापरले जाऊ लागले. इतर मुलांबद्दल तक्रारी करताना मराठी सर्रास वापर होऊ लागला. आईबाबांनी मराठी शिकविले ते योग्यच केले असे त्यांना पटू लागले.

शाळा-कॉलेजातील वर्षात दरसाल नाताळच्या रजेत दोनतीन आठवड्यांसाठी मुले मुंबईला भेट देत. ह्या भेटीतून मुंबईतील मराठी संस्कृती रीतिरिवाज, भाषेची ओळख झाली. ती वृद्धिंगत होत गेली. कित्येकदा मुंबईतील भावंडे तसेच नातेवाईक त्यांच्याशी आवर्जून इंग्लिशमध्ये बोलत. अशावेळी "Mom, we are trying to speak in marathi but our relatives speak to us in English." असे आश्चर्यजनक उद्‌गारही ऐकायला येऊ लागले. मुले मराठी नाटके-सिनेमा आवडीने पाहू लागली. ह्याला पूरक असे अमेरिकेतही गणपती, दिवाळी, भाऊबीज, रक्षाबंधन, सत्यनारायणपूजा असे जमतील ते सण-उत्सव घरात साजरे करून त्याची सवय लावली. "मॉम, तुझा मन्डे फास्टिंग (श्रावणी सोमवार) चा मंथ कोणता? Are there four or five mondays, what can I eat on those mondays?" इत्यादी धार्मिक प्रश्न ऐकून वाटलं की आपण जो संस्कृती जपण्याचा प्रयत्न केला त्याला थोडे का होईना पण यश आले. आता मुलेच सणांबद्दल विचारतात. तेव्हा त्यांना सोपे जावे म्हणून इंग्लिशमधील निर्णय सागर कॅलेंडर दिले जाते. मुलगा त्याच्या अमेरिकन ख्रिश्चन मैत्रिणीला सत्यनारायण पूजा समजावून सांगतो व त्यातील एक अध्याय इंग्रजीमधून वाचतो. मुलगी आपल्या ऑफिसमधल्या मैत्रिणींना सणांचे महत्त्व समजावू लागते. तेव्हा वाटते की केला तो 'मराठी'चा अट्टाहास काही फुकट गेला नाही. मुलांना 'अमेरिकन' म्हणून वाढू दिले पण त्या वाढीत मराठीचे खतपाणी घातले. तेव्हा कोठे हे हायब्रिड रोप वाढीला लागले व दोन्ही संस्कृतीच्या चांगल्या गोष्टी घेऊन सरसरून वाढले.

आता उरली काळजी त्यांच्या पुढच्या पिढीची! माझे सासू-सासरे आमच्याबरोबर अमेरिकेत राहिल्याने हा मराठीपणा टिकविण्यात खूप मदत झाली. परंतु हल्लीच्या स्वकेंद्रित (न्यूक्लिअर) कुटुंब पद्धतीत आम्ही आमच्या नातवंडांच्या वाट्याला कितीसे येऊ देव जाणे! तीन गावात तीन दारे, तेव्हा संबंध तेवढेच कमी होत जाणार हे दिसते आहेच. आपल्या उर्वरित आयुष्यात त्यांच्यावर आपला भार न टाकता त्यांच्या मुलांवर मराठी संस्कार करणे ही तारेवरची कसरत नव्हे फोनवरची कसरतच ठरणार आहे! मात्र त्यांची मुले मोठी होऊ लागली की त्यांनाही त्यांच्या 'मराठी/भारतीय'पणाची आठवण होऊ लागेल, आणि मग "ममी, तू आम्हाला झोपविताना म्हणायचीस ते गाणे मुलांसाठी गा ना!" असे उद्‌गार ऐकून मराठीचा वेलू आता गगनावेरी गेला आहे असे वाटेल. त्याची पाळेमुळे अमेरिकेत घट्ट रोवली गेली आहेत हे नक्की!

**४०९, नॉर्थव्हू ॲव्हेन्यू,**
**सिल्व्हर स्प्रिंग, मेरिलँड २०९०५ U.S.A.**
**sharadasubnis@yahoo.com**

**मुलांच्या विकासासाठी मार्गदर्शक**

**सुजाण पालकत्त्व**

**मीना टाकळकर**

**६०रु.**







**मुलांवरचे संस्कार**

(राज्य पुरस्कार)

**शं. व्यं. काश्यपे**

**९०रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# दोन्ही देशांतील चांगल्या गोष्टी मिळण्याचे अनोखे भाग्य

माधवी गजानन सबनीस

माझा जन्म अमेरिकेत राहणाऱ्या मराठी कुटुंबात झाला. मी अमेरिकेत अमेरिकन नागरिक म्हणून वाढले. तरीही मोठ्या अभिमानाने सांगू शकते की माझ्या आईवडिलांनी माझ्यात दोन्ही संस्कृतीची मूल्ये रुजवली आणि त्याचा मला खूप फायदा झाला. गेले कित्येक वर्षे म्हणून आम्हाला थोड्याशा हेटाळणीच्या शब्दात 'American Born Confused Desi's' (अमेरिकन बॉर्न कनफ्युज्ड देसीज्) म्हणून म्हटले तरी आम्ही American Born Confident Desi आहोत असेच खरेतर म्हणायला हवे.

लहान असताना माझे विश्व अमेरिकन टीव्हीवरच्या 'जीआयजो', 'ट्रॅन्सफॉर्मर्स' आणि 'झुबिली-झू' इत्यादी कार्यक्रमापुरतेच मर्यादित होते. घर, शाळा, टीव्ही आणि जोडीला भावाबरोबर खेळ यांच्या पलीकडे दुसरे विश्व असू शकते याची पुसटशी कल्पना नव्हती. घरात आईवडील किंवा काका-काकी मराठीत बोलत, त्यामुळे दुसरी भाषा पण असते याची जाणीव होती. तसेच आपली नावे, घरातली वागणूक इतर (शाळेतल्या) मुलांपेक्षा वेगळी आहे हे पण कळत होते. लहान असताना मुलगी म्हणून केस वाढवायचे, त्यांची वेगळी निगा ठेवायची किंवा आंघोळ केल्यावर देवाला नमस्कार करायचा, आणखी गोड खोबऱ्याचा नैवेद्य (बाप्पाचा प्रसाद) म्हणून खायचा हे पण तेवढेच पटले होते. आणि (आजी-आजोबांशी बोलताना) खूप लांब भारतात ते राहतात, हे पण मुंबईला गेल्यावर कळले होते. थोडक्यात अमेरिकेत जन्माला येऊन पण काही मित्रमैत्रिणींप्रमाणे (मेक्सिको, इस्राईल याप्रमाणे) भारतात पण आपली मुळे आहेत याची जाणीव होती.

माझा भाऊ राहुल माझ्याहून साडेचार वर्षांनी मोठा आणि घरातला पहिलाच म्हणून आईवडिलांनी त्याच्यावर मराठी थोडीतरी लादलीच. पण त्याच्या दृष्टीने माझे दोन्ही काका एकटेच असल्याने आणि आमच्याच घरी राहत असल्याने मराठी बोलायचे. शिवाय दोन्हीकडचे आजी-आजोबा आलटून पालटून असायचे. त्यामुळे त्याचा फायदा त्याला झाला. मला मात्र धाकटी आणि तोपर्यंत भाऊ शाळेत असल्याने इंग्रजीत बोलायची जास्ती सवय आणि लाड म्हणून औपचारिक मराठी खूपच कमी शिकवले गेले. तरी रोजच्या मराठी संभाषणातून आणि देवाची प्रार्थना मराठीत करायची त्यामुळे मी मराठी शिकायचा प्रयत्न केला. पुढे थोड्या वर्षांनी माझे आजोबा गेल्यावर 'बा' आजी (वडिलांची आई) आमच्याकडे रहायची त्यामुळे आजीने हौसेने मला मराठी शिकवले. त्याचे फायदा मुंबईला गेल्यावर इतर नातेवाईकांशी किंवा घरच्या नोकरमाणसांशी बोलताना खूप जाणवला. येथे एक गोष्ट मुद्दाम सांगावीशी वाटते. ती म्हणजे माझ्या आईवडिलांनी दरवर्षी ख्रिसमसच्या वेळी दोनतीन आठवडे मुंबईला (भारतात) जाण्याची सवय लावली. सर्व नातेवाईक इतक्या दूर राहून पण दरवर्षी भेटायचेच त्यामुळे अगदी सुरुवातीला ''हेच घाण आहे'', ''हेच आवडत नाही'' असे उद्‌गार बाकीच्या मुलांपेक्षा आमच्याकडे खूप कमी प्रमाणात वापरले गेले. मुंबई म्हणजे मुंबई आणि परत गेल्यावर वॉशिंग्टन हे आपले गाव एवढी कल्पना मात्र नक्की होतीच. मला मात्र ही डिसेंबरची ट्रीप खूप आवडायची. कारण सर्व नातेवाईक कौतुक करायचे. वाढदिवस २३ डिसेंबर म्हणून इकडे (शाळेत सुटीच्या आधी) आणि नंतर दोन आजी-आजोबांच्या घरी मिळून तीन वेळा वाढदिवस व्हायचे. तसेच थंडी नसल्याने कोट, मोजे इ. गोष्टींना पण सुटी मिळे.

शाळेतून पुढे हायस्कूलपर्यंत नाही म्हटले तरी आजीच्या सान्निध्यात मराठी (बोलण्यासाठी) खूप येऊ लागले. मात्र त्याचा फायदा कॉलेजच्या पहिल्या वर्षात झाला. त्या वर्षी फॉरिन लॅंग्वेजची गरज असायची. ॲडमिशनच्या वेळेस तरी माझी स्पॅनिश भाषेची पूर्ण तयारी होती म्हणून सूट मिळेल असे सांगितले होते. पण दुसऱ्या सत्रामध्ये नाही सांगितल्यावर आणखी दुसरी फॉरिन भाषा येते म्हटल्यावर मी 'मराठी' सांगितले. ते मान्य करून ॲलन टाऊनला एका स्थानिक प्रोफेसरने माझी मराठीची परीक्षा घेऊन (वाचायची व बोलायची) पास केले. अर्थात परीक्षा सोपी होती. पण मराठीचा उपयोग घरून लांब गेल्यावर आम्हां भावंडात किंवा आईवडिलांना सिक्रेट सांगायला मराठी फार उपयोगी पडते हे पण जास्त पटले. तेव्हापासून मराठीची आणखी जवळीक झाली. शिवाय कॉलेजचे कॅफटेरियात तेच तेच खाऊन 'मराठी' घरचे जेवण आणखी चवदार लागायची पण सवय झाली.

मराठी आणि स्पॅनिश भाषा शिकल्याने काही शब्द सारखे असतात त्यामुळे त्याबद्दल आणखी कुतूहल पण वाढले. उदा. पगार, बाबा (lovingly calling child) हे शब्द मराठीत आणि स्पॅनिशमध्ये पण आहेत. मी स्वत:ला दोन्ही भाषेत प्रवीण समजत नाही तरीही दोन्ही भाषांचा आत्मविश्वास वाटतो आणि मुंबईला किंवा मी जेव्हा स्पेनला गेले तेव्हा कोणी फसवणार नाही याची खात्री पण वाटते.

माझ्या आईवडिलांनी अगदी लहानपणापासून कुटुंब आणि शिक्षण यांचे आयुष्यातील महत्त्व मनावर ठसवले. पुष्कळदा इतर अमेरिकन मुलांप्रमाणे आपणही पैसे मिळवावेत असे वाटे. परंतु त्या बाहेरच्या कामापेक्षा घरची ठराविक कामे (कचरा काढणे, मधून मधून भांडी-धुणे इ.) कामे करणे किती महत्त्वाचे आहे हे पण पटले. शिवाय वडिलांच्या बरोबर (जास्तीकरून) काम करायची सवय लागली. माझी आईपण पॅथालॉजिस्ट म्हणून काम करत असली तरी घरी आल्यावर फक्त घरपण एवढेच करायची. वडिलांचे काम तर कायमचेच. हे फॅक्स करून दे, त्याची कॉपी कर, मेल बघ ही कामे माझा भाऊ आधी आणि तो कॉलेजला गेल्यावर माझ्याकडे आले. त्याचा पण खूप उपयोग झाला. भारतीय संस्कृतीप्रमाणे शिक्षण महत्त्वाचे असल्याने त्यावर जोर दिला गेला आणि मुख्य म्हणजे आम्ही दोघे भावंडे पदवीधर झाल्यावर आमच्यावर कोणत्याच लोनचे ओझे नव्हते. कॉलेजला वर्षाला जवळजवळ ३०,००० डॉलर्स खर्च हा सर्व आईवडिलांनी केला. हे त्यांचे आम्हाला मोठेच देणे आहे. या शिकवण्याच्या तत्त्वांनी आम्ही दोघे आमच्या क्षेत्रात बऱ्यापेक्षा यशस्वी आहोत असे म्हणावेसे वाटते.

आमच्या आईवडिलांची शिकवण ही घरापुरतीच मर्यादित न राहता शाळेपर्यंत पण पोहोचली होती. धर्म, राजकारण, लग्नसंस्था कोणताही विषय असो, त्या फक्त अमेरिकन बाजू नसून (भारतीय/मराठी) बाजूही असू शकते हे जाणवून दिले. त्यामुळे मी वेगळे विचार मांडले की शाळेत शिक्षक त्यावर त्यांचे विचार नीट मांडून इतर विद्यार्थ्यांचा गोंधळ कमी करीत. अशा चर्चांतून माझ्या या अमराठी मित्रमैत्रिणींचे भारताबद्दलचे (किंवा आपल्या मराठी संस्कृतीचे) कुतूहल पण खूप वाढले. माझा स्वत:चा त्यात खूप फायदा झाला. मराठी भाषेबरोबर आमच्या घरी इतर मराठी संस्कारपण खूप झाले. जर लहान असताना हॅलोबियन, थॅंक्सगिव्हिंग, ख्रिसमस हेच सण असे वाटायचे. पण मोठी होताना आपले स्वतंत्र असे सण असतात हे पण लक्षात आले. रक्षाबंधन, भाऊबीज शिवाय गणपतीची पूजा (शंभर मैल अंतरावर असलेल्या) मॉरिसबर्गला सहस्रबुद्धे यांच्या घरी हळदीकुंकू आणि सत्यनारायण पूजा हे नियमित होणारे सण आमच्याकडे व्हायचे. भावने बहिणीला भेटवस्तू देताना त्यामागची परंपरा पण सांगितली जायची. त्यामुळे आमच्या मनात कोणत्याही धर्माबद्दल आकस आला नाही. उलट दोन्ही प्रथांबद्दल आवडच निर्माण झाली. मुंबईला गेल्यावर गणपती/कृष्णाष्टमी --- त्यांच्या पूजा, आरत्या यांची पण माहिती झाली. सणाबरोबर मुख्य म्हणजे वेगळे जेवण पण खूप आवडायचे. श्रावणी सोमवार सबंध दिवस उपवास. (म्हणजे मीठ, कांदा इ.) न खाता दही, फळे खाऊन केल्यावर संध्याकाळचे जेवण म्हणजे वरण, भात, बटाट्याची (फ्लुरोसंट हळदीची) भाजी या गोष्टी मनावर ठसून गेल्या. शिवाय केशरी किंवा नारळी भात, खीर, प्रसादाचा शिरा, उकडीचे मोदक इ. गोष्टी खूपच आवडू लागल्या.

हे संस्कार आम्ही येथे राहून आमच्यावर झाले; पण दुर्दैवाची गोष्ट म्हणजे परत भारतात गेल्यावर तेवढेसे दिसले नाहीत. आमच्या वयाची नातेवाईकांची मुले पण मराठी न बोलता आईवडिलांशी इंग्रजीतच का बोलतात? किंवा पटकन उलट उत्तरे कसे देतात हे पाहिल्यावर आश्चर्य वाटते. खरे म्हणजे त्यांना तर त्या गोष्टी नेहमीच्या असतात पण कदाचित आम्हीच आमच्या आईवडिलांच्या शिकवण्याने संस्कृती जपून ठेवली असे जास्त वाटते.

अजूनपर्यंतच्या आयुष्याचा आढावा घेतला तर वाटते, मी इतरांपेक्षा खूप भाग्यवान आहे. मला दोन्ही देशांतील चांगल्या गोष्टी मिळाल्या आहेत. (आय हॅड द बेस्ट ऑफ बोथ वर्ल्डस्) पण अजून नुकती सुरुवात आहे. आणि अजून आयुष्याचा खूपसा प्रवास व्हायचा आहे. बरेच काही (मराठी आणि अमेरिकन) संस्कृतीतून शिकायचे आहे आणि कोणत्या ना कोणत्या तऱ्हेने माझ्या मूळ मातीचे ऋण फेडायचे आहे.

**madhavi@sabnis.com**

**शब्दांकन : शारदा ग. सबनीस**



# अमेरिकेत आपले उपरेपण सतत जाणवते

**वसंत घाग**

अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे ९ वर्षे वास्तव्य केल्यानंतर मी तीन महिन्यांपूर्वी भारतात परतलो.

मराठी माणसांबाबत एक विनोद कधी मधी सांगितला जातो तो असा की दोन मराठी माणसे एकत्र आली की तीन मंडळे काढतात; स्वत:चं प्रत्येकी एक आणि दोघांचे मिळून एक. यातला विनोदाचा भाग सोडला तरी एकत्र येणं, आपली संस्कृति जपणं आणि त्यानिमित्ताने सण वगैरे साजरे करणं हा मराठी माणसाचा स्वभाव आहे; नव्हे स्थायीभांव आहे. मग तो जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी त्यात बदल होत नाही. किंबहुना कधी कधी ती त्याची अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मूलभूत गरजांसारखी एक गरज बनते.

न्यूयॉर्कमधील माझ्या वास्तव्यात मला हीच गोष्ट प्रकर्षाने जाणवली. म्हणूनच न्यूयॉर्कमधेच नव्हेत तर अमेरिकेत एकूण ५० महाराष्ट्र मंडळे अस्तित्वात आहेत आणि मंडळातर्फे सादर होणाऱ्या विविध कार्यक्रमात हा मराठी बाणा जपण्याचा एक मार्ग तेथील मराठी माणसांनी शोधून काढला आहे. यात इतरही विविध कार्यक्रम सादर होत असले तरी गुढी पाडवा, गणपती उत्सव आणि दिवाळी हे कार्यक्रम आवर्जून साजरे केले जातात. अर्थात अमेरिकेसारख्या महाकाय देशात ५० मंडळे म्हणजे काहीच नाहीत. शिवाय जेथे ही मंडळे आहेत ती शहरे तर सोडाच पण संपूर्ण अमेरिकेत इतरही छोट्या शहरात मराठी माणसं राहताहेत आणि मंडळ नसतानाही एकत्र येताहेत आणि आपली गरज पूर्ण भागवताहेत.

या झाल्या सामूहीक पातळीवर घडणाऱ्या गोष्टी. पण वैयक्तिक पातळीवरही अनेकजण आपला मराठी बाणा जपण्याचा प्रयत्न (कधी कधी केविलवाणा) करत आहेत. यामध्ये आपल्या अमेरिकेत जन्मलेल्या मुलांना मराठी शिकविणे, घरात बोलताना त्यांच्याकडे मराठीचा आग्रह धरणे, मराठी शाळेत पाठविणे आदी गोष्टी येतात. याकामी त्यांना मदत होते ती म्हणजे आजी-आजोबांची (ते कदाचित आईकडून नाहीतर बाबांकडून) अमेरिकेतील आपल्या मुलीकडे किंवा मुलाकडे रहाणाऱ्या या आजी आजोबांना मात्र बरेचदा भारताची आठवण येत असते आणि अमेरिकेत सर्वकाही छान असूनही असल्या रहाण्यामुळे येणारं परावलंबित्व आवडत नाही. मला जाणवलेली आणखी एक गोष्ट म्हणजे कोणाच्याही घरी अचानकपणे जाऊन त्याला 'सरप्राईज' करणं क्वचितच होत असे. फोन केल्याशिवाय कोणाकडे जाता येत नसे. छोट्या कुटुंबातील सर्वचजण बहुधा नोकरीला जात असल्यामुळे घरी कोण भेटण्याची शक्यता कमीच त्यामुळे कुठलं सरप्राईज आणि काय!

मराठी बाणा म्हणजेच आपली मराठी संस्कृती जपण्याच्या आणखी काही प्रकारामध्ये आवर्जून उल्लेख करायचा म्हणजे **ब्रायडल शॉवर** (केळवण) आणि **बेबी शॉवर** (डोहाळेजेवण) यांचा. येथे राहाणारी अनेक मराठी माणसे, बहुतेक सुखवस्तु असल्यामुळे show मराठी पण प्रेझेंटेशन अमेरिकन अस काहीसा प्रकार या दोन्ही गोष्टीमध्ये होतो. मराठी माणसांची लग्नेही मोठ्या थाटामाटात साजरी होतात. अर्थात मुंबई-पुण्याकडील लग्नाचा सोहळा तिकडे बघायला मिळत नाही. सगळं 'अमेरिकन' पद्धतीने 'सादर' केलं जातं. मग त्यात मंगलाष्टकांचा इंग्रजीतून अर्थ कधी कधी नवरा नवरीने सादर केलेलं नृत्य, आलेल्या पाहुण्यांचा सामूहिक नृत्यात सहभाग वगैरे वगैरे.

मात्र मराठी बाणा जपता जपता येथील मराठी माणसांची कुतरओढ होते ती गणपती उत्सव आणि दिवाळी साजरी करताना. पाण्यात गणपतीचे विसर्जन करण्यावर प्रतिबंध अल्यामुळे मुंबई-पुण्यासारखे घरोघरी गणपती हे स्वप्नरंजनच ठरेल. (अर्थात संगणकातील तंत्रज्ञानामुळे नजिकच्या काळात कदाचित घरोघरी व्हर्च्युअल गणपती पहायला मिळतील कदाचित) शिवाय भटजींची

टंचाई पाच-सात-दहा दिवस गणपती ठेवण्यासाठी अमेरिकेसारख्या वर्कहोलिक देशात न मिळणारा वेळ यासारख्या अडचणी त्यांच्यासमोर उभ्या असतात. तरीसुद्धा न्यूजर्सी येथे एकजण गेली २७ वर्षे घरी गणपती आणताहेत आणि त्यांच्या गणपतीला सार्वजनिक गणपतीचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. म्हणूनच बहुतेक मंडळी महाराष्ट्र मंडळामध्ये साजऱ्या करण्यात येणाऱ्या गणपतीला आवर्जून हजेरी लावतात. तेथील गणपतीची पूजा झाल्यावरच सकाळपासून 'धरलेला उपवास' सोडतात. या मंडळांची परिस्थिती काही वेगळी नाही. कारण एका दिवसात, तेही जवळचा शनिवार किंवा रविवार पकडून, गणपती उत्सव आटोपता घ्यावा लागतो. त्यामुळे सकाळी प्रतिष्ठापना, दिवसभर कार्यक्रम आणि संध्याकाळी उत्तरपूजा व विसर्जन आदी सर्व विधि करावे लागतात.

जी गोष्ट गणपतीची तीच दिवाळीची. दिवाळी हा जरी गोडधोड खाण्याचा व एकमेकांना भेटण्याचा सण असला तरी दिवाळीला फटाक्यांशिवाय पूर्णता येत नाही. पण पुन्हा फटाके किंवा तत्सम ज्वलनशील पदार्थावर येथे बरेचसे निर्बंध असल्यामुळे फटाकेच उडविता येत नाही. पहाटेपासून रात्रीपर्यंत वाजणाऱ्या फटाक्यांच्या आवाजात महाराष्ट्रात चार दिवस दिवाळी साजरी होत असते. पण ती उणीव कार्यक्रमाच्या ठिकाणी आकाशकंदील, रांगोळी तसेच पणत्या वगैरे लावून भरून काढतात. ते बघून आपले जुने दिवस आठवत हळहळायचे!

आणखी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे आपली मुले! येथील बहुतांश मुले एकतर लहान वयात आईवडिलांबरोबर आलेली आहेत किंवा अमेरिकेत जन्मलेली आहेत. या दोन्ही प्रकारात मुलांची खूप ओढाताण होत असते. घरात आईवडिलांकडून संस्कृतीची जपणूक आणि बाहेर अमेरिकन वातावरण. शिवाय आयुष्य अमेरिकेत काढायचेय हे दडपण. म्हणून घरातील भारतीय वातावरणात मुलं गुदमरून जातात व आईवडिलांच्या इच्छेखातर बऱ्याच गोष्टी करत असतात.

अमेरिकेत मराठी माणूस येऊन ५० वर्षांपेक्षाही जास्त वर्षे झाली आहेत आणि मराठीच का, भारतातील इतरही भागातूनही लोक इकडे आले आहेत. पण कोणीही अमेरिकन संस्कृतीशी एकरूप झालेलं नाही; होऊ शकलेलं नाही. या संदर्भात 'इंडिया अब्रॉड' या तेथून प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रात २००० साली वाचलेला एक विनोद सांगावासा वाटतो. एका चित्रात दोन वयोवृद्ध माणसे दाखविली होती. त्यातील एक म्हणतो "१९७७ सालापासून मी विचार करतो आहे की अमेरिकेत स्थायिक व्हावं की भारतात परत जावं." आजही कित्येक लोकांची हीच दोलायमान परिस्थिती आहे. याचं मुख्य कारण म्हणजे दोन्ही संस्कृतीतील भिन्नता आणि विरोधाभास. स्वत्व आणि स्वातंत्र्य जपणारी अमेरिकन संस्कृती आणि एकत्र राहणारी आणि एकमेकांसाठी झटायला शिकवणारी भारतीय संस्कृती. मुलगा मार्गाला लागेपर्यंत पूर्ण जबाबदारी घेणारी भारतीय संस्कृती यात समतोल साधण्याची कला बहुतेक लोकांना जमलेली नाही. म्हणूनच मग इथली सगळी मंडळी आपापल्या संस्था स्थापन करून आपलं वेगळेपण (आपला बाणा) जपायचा प्रयत्न करताहेत. 'राजस्थानी असोसिएशन ऑफ नॉर्थ अमेरिका', महाराष्ट्र मंडळ, गुजरात समाज, कन्नड कुटा आदी निरनिराळ्या संस्था जन्माला येतात. येथील भारतीय मराठी, गुजराथी, कन्नड, सिंधी असेच ओळखले जातात.

आणखी एक गोष्ट म्हणजे अमेरिकन लोक खऱ्या अर्थाने आपल्या लोकांना त्यांच्यात सामावून घेत नाहीत. त्यांच्यासाठी तुम्ही 'उपरेच' असता. शिवाय अमेरिकन लोकांपेक्षा वेगळी असलेली चेहरेपट्टी, रंग आदी गोष्टीसुद्धा नाही म्हटलं तरी एकरूपतेच्या मार्गात आडव्या येतात.

भारतीय वंशाची काही माणसे उच्च पदाला पोचली आहेत, अमेरिकन जीवनाच्या मुख्य प्रवाहात त्यांना मान आहे. पण अशी उदाहरणे विरळाच!

आणखी एक गोष्ट आपण भारतीय माणसेच वेगवेगळ्या आकडेवारीवरून कोणत्या क्षेत्रात किती टक्के भारतीय आहेत वगैरे गोष्टी जाहीर करतो आणि आपण भारतीय वेगळे असल्याची जाणीव करून देत असतो. तेथील अमेरिकन नागरिकत्व स्वीकारलेल्या भारतीयांनाही आपण 'भारतीय' म्हणत असतो. नुकतीच अस्तित्वात आलेली द्वि-नागरिकत्वाची सोयही अमेरिकेशी एकरूप होण्यापासून परावृत्त करणारी ठरू शकेल.

एकूण माझा अनुभव असा की परदेशात राहूनही मराठी माणसे मराठी बाणाच जपताहेत : ती त्यांची एक गरज आहे. छान रहाण्याचा एक मार्ग आहे.

**वसंत घाग, अहमदाबाद.**


# तत्त्वमसि

ध्रुव भट

अनु. अंजनी नरवणे

**१४०रु. पोस्टेज ३०रु.**



परदेशी वास्तव्य करणारा, मूळ भारतीय वंशाचा एक आधुनिक तरूण आदीवासींच्या जीवनाचा अभ्यास करण्यासाठी येतो. आणि...
भारतीय संस्कृतीबद्दलचे त्याचे ठाम पूर्वग्रह सोडायला लावणारे संस्कृतीचे दर्शन त्याला घडते.

**आधुनिक जीवनशैली व शाश्वत मूल्यविचार यांचा संघर्ष चितारणारी जबरदस्त कलाकृती.**



# वंदे मातरम्

## डॉ. द. भि. कुलकर्णी

वंदे मातरम् । वंदे मातरम् ।
सुजलां सुफलां मलयजशीतलाम् सस्यश्यामलाम् मातरम् ।।धृ।।
शुभ्र ज्योत्स्ना पुलकितयामिनीं
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीं
सुहासिनीं सुमधुरभाषिणीं सुखदां वरदां मातरम् ।।१।।
सप्तकोटि-कोटि-कंठ-कलकल-निनाद-कराले
द्विसप्तकोटि भुजैर्धृत-खर-कराले
के बोले मां तुमि अबले?
बहुबलधारिणीं नमामि तारिणीं
रिपुदलवारिणीं।। मातरम् ।।२।।
तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म
त्वं हि प्राणा: शरीरे
बाहु ते तुमि मां शक्ति, हृदये तुमि मां भक्ति
तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे मंदिरे
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणीं ।। वंदे मातरम् ।।
कमला कमलादलविहारिणीं
वाणी विद्यादायिनीं
नमामि त्वां नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्।। वंदे मातरम् ।।४।।
श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम्। वंदे मातरम् ।।५।।

– **बंकिमचंद्र चट्टोपाध्याय**

कठीण शब्दांचे अर्थ :
(१) सस्य = धान्य (२) ज्योत्स्ना = चांदणे (३) यामिनी = रात्र
(४) खर = तीक्ष्ण (५) कराले = कराल, भीषण
(६) करवाल = तलवार, शस्त्र (७) तोमारइ = तुझीच
(८) घडि = घडवितो(९) हि = च; कारण (१०) कमला = लक्ष्मी

### १

शब्दांना स्वप्न पडते तेव्हा त्यातून भावकाव्य जन्मास येते.

स्वप्ने अनेक प्रकारची असतात : इच्छा-चिंतन, भविष्यसूचन, नेणिवेचे स्पंदन, बाल्यानुभवाचे आवर्तन; आणि अर्थात आध्यात्मिक अनुभवन.

स्वप्ने अनेक प्रकारची असतात.

भावकविताही अनेक प्रकारच्या असतात.

एखादी भावकविता कवीची नेणीव आविर्भूत करते; तेव्हा मानसतज्ज्ञाकडे जायचे नसते; कवितेची नेणीव चाचपायची असते.

एखादी भावकविता समूहाची नेणीव आविर्भूत करते; तेव्हा समूहतज्ज्ञाकडे जायचे नसते; कवितेची नेणीव जाणायची असते.

कवितेची नेणीव जाणवण्यासाठी केंद्रापसारी वृत्ती नव्हे तर केंद्रानुगामी वृत्ती उचित ठरते. शब्दनाद, शब्दांचा वाच्यार्थ, वृत्त, चाल, निमित्त, कवीचे चरित्र, कवितेचा काळ हे सारे केंद्रापसारी वृत्तीने कळू शकते; तो कवितेचा इतिहास असतो; त्याचा कवितेच्या नेणिवेशी काही संबंध नसतो. इतिहास कालसापेक्ष असतो; भावकविता कालनिरपेक्ष असते – नव्हे अनुभव कालातीत होतो तेव्हाच शब्द भावकविता होतात; त्यांना स्वप्ने पडतात.

वाच्यार्थाने भावकविता कालमय असते; प्रतीतीने कालोत्तीर्ण असते.

भावकाव्याची ही कालमयता आणि कालोत्तीर्णता जाणवली पाहिजे.

## २

'वंदे मातरम्'ची कालसापेक्षता आपणास ज्ञात आहे. बंकिमबाबूंच्या 'आनंदमठ' या कादंबरीतील हे गीत क्रांतिकारकांच्या कंठातील कंठमणी झाले; 'तुझ्या यशाचे पवाड गातां गळ्यांस ये तात' असे कंठपाशही झाले; या गीताने भीरू हृदयांना धीरवान केले; धैर्यवंताना सर्वस्वार्पणाचे स्वप्न दिले. असे म्हणतात की वासुदेव बळवंत यांची केस मॅजिस्ट्रेट बंकिमबाबूंकडे आली होती; पण ही कविता काही व्यक्तिसापेक्ष, प्रसंगसापेक्ष नाही; तेव्हा म्हणजे १८८२ मध्ये भारतावर आणि बंगालवर कोणाची अधिसत्ता होती हे, हे गीत सांगत नाही; हे गीत जीवनलावण्य, जीवनवैभव, जीवनशौर्य यांचा गौरव करते; यांच्या विरोधाला विरोध करते. ही मांगल्याची आरती आहे; हा पराक्रमाचा पोवाडा आहे; हे मातेचे स्तोत्र आहे.

या गीतात 'देश' किंवा 'राष्ट्र' असा शब्द नाही; 'माता' असा शब्द आहे; पण ही माता कोण? गर्भधारणा-प्रसव-संगोपन इत्यादी धर्म असलेली स्त्री नव्हे; हे आणि याहून अधिक गुणविशेष असलेली ही 'राष्ट्रमाता' आहे. हे आपणास कसे कळते? या पाच कडव्यांच्या गीतात मातेचे जे चित्रण आहे, त्यावरून; ते लौकिक मातेस लागूच पडत नाही. यालाच मुख्यार्थबाध असे म्हणतात.

पण इथे राष्ट्राला माताच का म्हटले? सुता, स्नुषा, भगिनी, भार्या असे काही का नाही म्हटले? झाड सरसरून वाढावे म्हणून त्याच्या डहाळ्यांची छाटणी करतात; वाच्यार्थ बहरावा म्हणून मुख्यार्थबाध करतात. छाटणी फांद्यांची करायची असते; झाडाचा समूळ उच्छेद करायचा नसतो. माता-अपत्य यांच्यांतील भावबंध – आणि – मूल्यभाव राष्ट्र-जन यांच्यातही, उन्नत स्वरूपात आहे, हे या गीताला जाणवले; सुता-स्नुषा इत्यादी उपमाने वापरली असती तर असा भावबंध – आणि मूल्यभाव अभिव्यक्त झाला नसता आणि वर मुख्यार्थाचा समूळ उच्छेद झाला असता, ते वेगळेच.

म्हणून या गीताने मातृभाव तर स्वीकारला पण त्यातील लौकिक भावाची डहाळी छाटून तिथे उन्नत राष्ट्रभक्तीने कलम बांधले – मुख्यार्थाने लाक्षणिक अर्थाचे साह्य घेतले.

काय आहेत या राष्ट्राची आणि राष्ट्रभक्तीची लक्षणे?

एखाद्या प्रचारगीतामध्ये जसा राष्ट्रगौरव वाच्यार्थाने प्रकटतो तसा तो इथे प्रकटलेला नाही. राष्ट्रा, तू महान आहेस, तुझ्यासाठी आम्ही प्राण देऊ असे हे राष्ट्रगीत म्हणत नाही. प्रिय, ज्येष्ठ, आदरणीय व्यक्तीचे नाव घ्यायचे नाही असा भावसंकेत आहे ना; जणू हे गीत त्याच भावसंकेताला अनुसरत आहे!

हे संबोधनगीत आहे; हे स्तोत्र आहे; ही भारतमातेची आरती आहे.

धर्मभावना देववाणीतून प्रकटावी तद्वत् ही आरती संस्कृत वाणीतून प्रकटली आहे. गीर्वाणवाणीमुळे या गीतास अल्पाक्षरत्व, भारदस्तपणा, पावित्र्य इत्यादी गुण प्राप्त झाले आहेत.

पण आरती एकांडेपणाने करायची नसते; समूहाने करायची असते, नाही? हे सामूहिक राष्ट्रगीत आहे : कोटी कोटी कंठ राष्ट्रभक्तीचे मंत्रोच्चारण करीत आहेत असा समूहाचा गजर या गीतातून झंकारत आहे.

मुख्यार्थ आघातनिष्ठ नादासारखा असतो.

लाक्षणिक अर्थ अशा आघातनिष्ठ अर्थाचाच विस्तार असतो; पण व्यंग्यार्थ अनाहत नादासारखा आघातमुक्त असतो; तो श्रुतीने नव्हे प्रतिभेने ग्रहण करायचा असतो; तो व्यूहात्मक असतो; तो स्वप्नासारखा स्थलकालमुक्त आणि साक्षात्कारासारखा अलौकिक असतो.

## ३

आता पाहा, हे अलौकिक भावकाव्य : अनुप्रास, यमक आणि समास यांच्यामुळे एकाच वेळी त्याला नादमाधुर्य, वेग आणि सौष्ठव प्राप्त झाले आहे. काही नादमधुर व्याजगीतांमध्ये केवळ नादानुसंधान असते; त्यात मंत्रशक्ती नसते, रुग्णशक्ती असते; त्यांत वेग नसतो, आवर्त असतात; त्यात सौष्ठव नसते, सच्छिद्रता असते. म्हणून तर अशा व्याजगीतांतील काही ओळीच आपल्या मनात झिरपत राहतात; संपूर्ण गीत कधीच मानसगोचर होत नाही.

'वंदे मातरम्' हे मंत्रगीत एखाद्या दिव्य मूर्तीसारखे अखंडचे अखंड आपल्या चित्ताला गोचर होते : आपल्या मुखातून आपोआप शब्द बाहेर पडतात :

सुजलां सुफलां मलयजशीतलाम्  
सस्यश्यामलां मातरम्।। वंदे मातरम्।।

निषादाची निर्घृणता पाहून आदिकवीची आर्ष वाणी जशी अनुष्टुभ पावली तशीच आपलीही वाणी मल्हार रागिणी होते; कवीची वाणी आपण अनुसरतोय असे आपणास वाटतच नाही; ती आपलीच वाणी असते. म्हणून तर या मंत्रगीतातून समूहमनाचा गजर, सामूहिक नेणिवेचा घोष ऐकू येतो. तो चोखोबांचा अभंग पाठ आहे ना? त्यातून विठ्ठलभक्तीचा उत्कट भाव तर प्रस्फूर्त होतोच; पण तितकाच समूहमनाचा गजरही जागृत होतो. हा भक्त विठ्ठलविरहाने एकाकी झालाय तद्वत् समाजविरहानेही विव्हल झालाय. आता त्याला वारकरी दिंडीने आपले म्हटले म्हणून तर तो 'विठ्ठल विठ्ठल गजरी। अवघी दुमदुमली पंढरी' असे हर्षाने म्हणतोय. निवृत्तिज्ञानदेवसोपानासह अपार वैष्णव जमले आहेत म्हणून तो सुखावला आहे. तिथे तो एकटा नव्हे तर हरिभक्तांची तिथे दाटी झाली आहे हे पाहून त्याचे आत्मबळ वाढले आहे; त्याचे एकाकीपण खुंटले आहे.

विठ्ठल विठ्ठल गजरी  
अवघी दुमदुमली पंढरी  
होतो हरिनामाचा गजर  
दिंड्या पताकांचा भार

निवृत्तिज्ञानदेव सोपान
अपार वैष्णव ते जाण
हरिकीर्तनासी दाटी
तेथे चोखा घाली मिठी

या भजनामध्ये भक्तिभावनेत दंग झालेला मानवसमूह आहे तर 'वंदे मातरम्' या मंत्रगीतामध्ये, प्रारंभी, सृष्टिसौंदर्याने लवथवलेली राष्ट्रमाता आहे. मानवी देहाचे चित्रण मस्तकापासून पायापर्यंत तर देवतेचे चित्रण चरणांपासून मस्तकापर्यंत करावे, असा कविसंकेत आहे.

या राष्ट्रभूमीवर रात्र (यामिनी) आहे पण ती काळीकुट्ट नाही; शुभ्र चांदण्याने (ज्योत्स्ना) ती रोमांचित (पुलकित) झालेली, रम्या आहे.

शुभ्र ज्योत्स्नापुलकितयामिनीं
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीं
सुहासिनीं सुमधुरभाषिणीं सुखदां वरदां मातरम् ॥१॥

राष्ट्रमातेचे हे रूपदर्शन तर पाहा : ही माझी राष्ट्रमाता शुभ्र चांदण्याने रोमांचित झाली आहे; ही सुखकारक चांदणी रात्रच आहे; हा उत्प्रेक्षा अलंकार आहे. हिच्या भूमीवरील वृक्ष (द्रुम) पूर्ण उमललेल्या फुलांनी लदबदलेले आहेत; ही माझी राष्ट्रमाता फुले-पाने-डहाळ्या-वृक्ष यांनी शोभिवंत झाली आहे. मग ती स्मितवदना, गोड बोलणारी, सुख देणारी, आशीर्वाद देणारी का होणार नाही? जी स्वत: विद्रूप, अतृप्त आहे ती इतरांना काय सुखशांती देणार, नाही?

या मंत्रगीतातील अर्थाची ही एक लाट आहे; पण हे गीत याच लाटेपाशी थांबत नाही. तसे झाले असते तर हे गीत भुंडे आणि एकसुरी नसते झाले?

कवी न सांगता सांगतो, माझी माता अशी नुसती साजरी गोजरीच नाही. अशा नाजूक साजूक, रूपवंत व्यक्तीवर जग टपलेलेच असते की! माझ्या मातेचे वैशिष्ट्य हे की ती जितकी रूपस आहे तितकीच ओजसही आहे – लक्षात ठेवा.

कवितेतील शब्दार्थच ग्रहण करायचा नसतो तर तिच्यातील व्यूहार्थही स्वीकारायचा असतो, हे म्हणणे अशा स्थळी पटते. अशा व्यूहार्थातूनच तर कवितेतील मौन मुखर होत असते.

कवितेतील मौन ऐकू येणे हे आपले आणि कवितेचे भाग्य असते.

सप्तकोटिकंठ-कलकल-निनाद-कराले
द्विसप्तकोटि भुजैर्धृत-खर-करवाले ॥

ही माझी माता प्रसंगी उग्र रूपही धारण करू शकते, हे लक्षात ठेवा : ती कोट्यवधी देशवासीयांच्या मुखांनी विक्राळ (कराले) ललकारी देईल; सावधान; आणि त्याच्या दुप्पट हातांनी, त्या हातांत तीक्ष्ण (खर) शस्त्रे (करवाले) धारण करून, ती वैऱ्याचा नि:पात करील.

ही दुसरी लाट. विरुद्ध अर्थाची. 'क्रांतीचा जयजयकार' ही कविता आठवते? तिच्यातही अर्थाच्या अशा उलटसुलट लाटांचे विभ्रम आहेत. कविता अर्थातिरेकाने प्रभावी होत नाही– भडक आणि प्रचारकी होते; अशा अर्थविभ्रमाने ती रूपस्वी आणि तेजस्वी होते.

के बोले मा तुमि अबले
बहुबलधारिणीं नमामि तारिणीं
रिपुदलवारिणीं। मातरम् ॥२॥

काय नवल आहे पाहा : देववाणीतून बोलता बोलता कविता अकस्मात लोकवाणीतून बोलू लागते – 'के बोले मा तुमि अबले?' –असे; आणि का नये बोलू? प्राचीन काळातील काही कवी संस्कृत-प्राकृत अशी मिश्र रचना करीत; त्यात आपले भाषाज्ञान मिरविण्याची हौस असे. इथे तसे नाही. सामूहिक घोषणा करणारा जनसंमर्द सहजच मातृभाषेत गजर करू लागतो – तितक्या उत्स्फूर्तपणे हे बंगाली शब्द प्रकटले आहेत – 'के बोले मा तुमि अबले?' अशा व्यक्तीला माते, कसे (के) कोण अबला म्हणेल? माते, तू अबला नाहीस, सबला आहेस. आम्ही तुझे अगणित पुत्र शत्रूला कराल आव्हान देतोय, आम्ही आमच्या उभय भुजांमध्ये लखलखती शस्त्रे धारण केली आहेत – हे कंठ आणि हे बाहू तुझेच तर आहेत; तू आणि आम्ही काय विभक्त आहोत?

किती अनवटपणे इथे गीताने राष्ट्रमाता आणि तिचे सुपुत्र यांच्यांतील अभेद प्रकट केला आहे! अशा प्रतीतिगम्य अभिप्रायालाच तर व्यंग्यार्थ म्हणतात; तोच कवितेचा प्राण असतो.

अशी माता –
बहुबलधारिणीं नमामि तारिणीं
रिपुदलवारिणीं। मातरम्॥

– असणार हे काय सांगायला हवे? ती विविध-विपुल शक्तिमान, शत्रूसेनेचा नाश करणारी, आमचे रक्षण करणारी असणार – तिला आमचा नमस्कार असो; 'अबला कैनो मां ॲटो बले?' इतके बळ असणारी माता अबला आहे असे कोण म्हणेल, असा पाठभेदही आहेच!

पहिल्या कडव्याला आपण 'लाट' म्हटले; पण खरोखर ती लाट नव्हती; तो एक सुकुमार तरंग होता. ही दुसरी लाट मात्र लाटच आहे आणि ती क्षुब्ध लाट आहे. तिच्यात लोकवाणीचा आणि लोकशक्तीचा गजर आहे; तिच्यात आत्मबलाच्या जाणिवेने आलेला आत्मविश्वास आहे.

पहिले कडवे जर राधाकमल असेल तर हे दुसरे कडवे श्रीकृष्णाचे सुदर्शनचक्र आहे. नाही, हे उपमान काही उचित नाही. पहिले कडवे जर देवीच्या हातातील किणकिणते कंकण असेल तर हे दुसरे कडवे तिच्या हातातील खणखणते खड्‌ग आहे. 'रुद्रास

आवाहन' ही कविता जशी आमूलाग्र रौद्र रसात्मक आहे तशी ही राष्ट्रगाथा नाही. हिचे आद्य कडवे शांतरसात्मक तर द्वितीय कडवे वीररसात्मक आहे. या दहा हातांच्या देवीस्तोत्रातून नऊ रस नाहीत, पण शांत-वीर-भक्ती हे तीन रस निश्चित प्रकटले आहेत. त्यामुळे या गीताला अनुभूतीची संपृक्तता व व्यामिश्रता लाभली आहे; अशा अर्थन्यासामुळे गीताला अर्थनृत्याचे विलोभनीय रूप प्राप्त झाले आहे; आशय थिजल्यागत झाला नाही; गतिमान, चैतन्यमय झाला आहे. अस्सल कलाकृतीत हा गुण असतो म्हणून तर तिला आपण 'जिवंत अस्तित्व' म्हणतो. जिवंत अस्तित्व बदलत असते, वाढत असते हेही इथे लक्षात ठेवायचे.

तिसऱ्या कडव्यात शांत भाव आणि वीर भाव यांचे संतुलन आहे : हे माते, तू विद्यारूप, तू धर्मभय, तूच आमचे काळीज, तूच आमचे मर्मस्थान, एवढेच काय, तूच आमचे देह – आणि प्राण; ही जी अनेक देवदेवतांची मंदिरे – प्रार्थनामंदिरे आम्ही घडवितो (गडि) ती सारीच्या सारी तुझीच (तोमारइ) देवळे आहेत; हे पंथभेद, पूजाभेद तुझ्यात विरून जातात; कारण (हि) तू दहा हातांत दहा शस्त्रे धारण केलेली. दुर्गादेवी आहेस – अशा विक्रमी देवतेपुढे कोणी अमंगळ भेदाभेद उभे करील?

तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म
त्वं हि प्राणा: शरीरे
बाहु ते तुमि मा शक्ति हृदये तुमि मा भक्ति
तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणीं ॥ वंदे मातरम् ॥३॥

कोटि कोटि भारतीयांचे बाहू, त्यांतील बळ, त्यांच्या हृदयातील राष्ट्रभक्ती जर दैवी रूप धारण करील तर त्यांच्यांत दुर्गेचे तेज अवतरेल हे काय सांगायला हवे?

दुसऱ्या कडव्यात 'के बोले मां तुमि अबले?' (अबला कैनो मां ॲटो बले?' असे वंग भाषी शब्द आले होते; इथे तिसऱ्या श्लोकातही तसेच 'तोमारइ प्रतिमा गडि मंदिरे मंदिरे' असे बंगाली शब्द आले आहेत. बहुभाषक गृहस्थ निद्रित असताना नानाने त्याच्या अंगावर गार पाणी शिंपडले; त्याबरोबर त्याच्या मुखातून नकळत मातृभाषा प्रकटली; प्रतिभेने जेव्हा स्फूर्तीवर अमृत शिंपडले तेव्हा आपोआप तिला उच्च जागृती आली; ती मातृभाषेत बोलू लागली!

चौथे कडवे पुन्हा शांत रसात्मक आहे : हे माते, तू कमळात वास्तव्य करणारी लक्ष्मी (कमला) आहेस; तू विद्या देणारी सरस्वती आहेस – अशा लक्ष्मीरूप, सरस्वतीरूप निर्मळ आणि निस्तुळ माते, तुला नमस्कार असो. तू केवळ रिपुनाशिनी विध्वसंकच नाहीस; तू जलधारिणी, फलधारिणी म्हणजे संभविनीही आहेस. 'लवथवती विक्राळा' ही शंकराची आरती आठवते ना?

लवथवती विक्राळा ब्रह्मांडमाळा
विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा

हे त्या महादेवाचे विक्राळ रूप आहे. त्याने कवट्यांची माळ गळ्यात घातलेली नाही तर अगणित ब्रह्मांडे भस्मसात करून त्यांची माळा गळ्यात धारण केली आहे, यापेक्षा आणखी भीषण संहार तो काय असणार? भय वाटते ना या विनाशाचे? असा कसा हा देव असे वाटते ना? नाही; पुढच्या ओळी पाहा :

लावण्यसुंदर मस्तकीं बाळा
तेथुनिया जळ निर्मळ वाहे झुळझुळा ॥

ही केवळ संहारक देवता नाही; ही सृजनाचीही देवता आहे – शंकर आणि दुर्गा; राष्ट्रमाता आणि राष्ट्रभक्त जनता; पण मग अंतिमत: ती आहे कशी? ते अंतिम कडव्यात आले आहे :

श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम् । वंदे मातरम् ॥

ही देववाणी इतकी सुबोध आहे की तिचा लोकवाणीत अर्थ सांगायची गरजच नाही.

शांत भावाने आरंभ झालेले हे गीत शांत भावाने परिपूर्ण झाले आहे.

**डॉ. द. भि. कुलकर्णी**
डीएसके विश्व, ई- ०००४, 'वसुधा'
ऑफ सिंहगड रोड, धायरी, पुणे ४११ ०४१.
फोन : (०२०) २४३८०८९४



भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महत्वपूर्ण सहभाग असूनही
इतिहासापासून अनाम अशा काही धीरोदात्त
स्त्रीयांची अभ्यासपूर्ण दखल

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया**

नवाझ मोदी अनु. वासंती फडके

**३००रु.**

**पोस्टेज ३०रु.**

# माझा वाचनप्रवास

## संस्कार वाचनाचा

डॉ. बाळ फोंडके

यशवंतराव चव्हाण एक चोखंदळ वाचक - डॉ. आनंद पाटील

दीपक शिकारपूर

## वाचन प्रवास

डॉ. समीर नारायण मोने
(प्रथम क्रमांक)

प्रभाकर कर्वे
(द्वितीय क्रमांक)

अर्चना ठोके
(तृतीय क्रमांक)

## उत्तेजनार्थ

सुधा चान्दोरकर

शालिनी वैद्य

श्रीकृष्ण कर्वे

ब. अ. अळवणी

माधव गजानन साने

सौ. सुमेधा पोळ

मेधा तेलंग



'मेहता मराठी ग्रंथजगत'च्या दिवाळी अंकाच्या निमित्ताने दरवर्षी आम्ही वाचकमित्रांसाठी लेखनस्पर्धांचे आयोजन करतो. त्याला वाचकांकडून उत्स्फूर्त प्रतिसादही मिळतो. आपले वाङ्‌मयीन क्षेत्रातील विविध प्रकारचे अनुभव इतर वाचकांशी पडताळून बघण्याची संधी यानिमित्ताने वाचकांना मिळते... वाचकही आपल्या वाचनसंस्कृतीबद्दल भरभरून लिहितात.

या वर्षी आम्ही वाचकांसाठी 'माझा वाचन प्रवास' हा विषय दिला होता. महाराष्ट्राच्या सर्व भागातून रसिक वाचकांनी आपले लेख पाठवले. बरेच लेख वाचनीय असल्यामुळे आम्ही पूर्वी जाहीर केलेल्या संख्येपेक्षा अधिक लेख दिवाळी अंकात समाविष्ट करण्याचे ठरवले. जागेच्या मर्यादेमुळे अंकात समावेश होवू न शकलेल्या पण उल्लेखनीय लेखन केलेल्या इतर वाचक-स्पर्धकांची नावे आम्ही स्पर्धा निकालात जाहीर केली आहेत.

हे सर्व लेख चाळत असताना एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे 'ग्रंथजगत'चा वाचकवर्ग वाचनाविषयी अतिशय चोखंदळ आणि जागरूक आहे. 'काय वाचावे' याची जाण वाचकवर्गाला आहे. हीच जाण त्यांच्या लेखनातूनही स्पष्ट झाली. वाचलेल्या साहित्यकृतीचे रसग्रहण, संपूर्ण वाचनप्रवासाचे सिंहावलोकन सर्वच स्पर्धकांनी समर्पक शब्दात मांडले आहे.

काही नामवंत व्यक्तींच्या वाचनप्रक्रियेविषयी अभ्यासपूर्ण लेखही आपल्याला वाचावयास मिळतील. या व्यक्तींचे कार्यक्षेत्र साहित्यविश्वाहून भिन्न असूनही त्यांनी साहित्याविषयी जपलेली आवड प्रकट होते.

दिसामाजी काहीतरी लिहावे,
प्रसंगी अखंडित वाचीत जावे!

हे समर्थांचे सुवचन वाचकांनी सदासर्वदा आचरणात आणावे
हीच या स्पर्धेच्या निमित्ताने अपेक्षा...





# वाचन उत्क्रांती



**डॉ. बाळ फोंडके**

वाचनाची गोडी तशी लहान वयातच लागली. अभ्यास करून झाला, की जो काही मोकळा वेळ मिळे त्याचा उपयोग करण्याची दोनच साधनं होती. मैदानी खेळ किंवा गोष्टींची पुस्तकं. मैदानी खेळात रुची बेताचीच होती. आणि त्यासाठी आवश्यक अशी शरीरयष्टीही नव्हती आणि गोष्टींची पुस्तकंही मजेची होती. ती वाचण्यात मन रमायचं. वडिलांनी गोष्टींच्या पुस्तकांना कधीच नाही म्हटलं नाही.

त्यावेळी आम्ही सोलापुरात होतो. कामानिमित्त वडिलांच्या मुंबईला वरचेवर फेऱ्या होत. प्रत्येक वेळी न चुकता ते माझ्यासाठी गोष्टींची पुस्तकं आणत. त्यामुळे माझा स्वत:चा ग्रंथसंग्रहही बऱ्यापैकी वाढला होता. शाळेचंही सुसज्ज ग्रंथालय होतं. त्यात दररोजची इंग्रजी-मराठी वर्तमानपत्रं, शालापत्रक, मनोरंजन वगैरेसारखी नियतकालिकंही येत. चित्रमयजगतही येत असे. आणि पुस्तकांचा, विशेषत: गोष्टींच्या पुस्तकांचाही चांगला संग्रह होता.

शिक्षकांनीही या पुस्तकांच्या वाचनाला कधी आडकाठी केली नाही. एखादे शिक्षक एखाद्या तासाला गैरहजर असत. मग तो गोष्टींचा तास होई. त्यासाठी एक त्या पुस्तकांची पेटी शाळेत होती. ती पेटी त्या तासाला आणली जाई आणि बदली शिक्षकांच्या उपस्थितीत त्यातली पुस्तकं वाटली जात. त्यातल्या गोष्टी वाचत तो तास जाई. काही वेळा ती पेटी न आणता मुलांनाच गोष्ट सांगण्यास सांगितलं जाई. त्या वेळी सांगण्यासारखी गोष्ट आपल्याजवळ असावी, म्हणूनही गोष्टींची पुस्तकं वाचली जात.

अभ्यासाचं दडपण शिक्षकांनीही कधी जाणवू दिलं नाही. उलट विद्यार्थी बहुश्रुत व्हावेत अशीच त्यांची धारणा असे. मग इतिहासाचे शिक्षक पानिपतच्या लढाईची माहिती व्हावी म्हणून चिंतामणराव वैद्यांची 'दुर्दैवी रंगू' वाचण्याची शिफारस करत. भूगोलाचे शिक्षक श्री. म. माट्यांचे 'जगाचे प्रवासी' वाचण्याचा आग्रह करत. एका वर्षी दिवाळीच्या सुटीत दिवाळी अंक वाचून त्यातल्या आवडलेल्या लेखाचं किंवा गोष्टीचं आपल्या शब्दात पुनर्लेखन करण्याची स्पर्धा मराठीच्या शिक्षकांनी लावली होती. सुटीचा काळ सत्कारणी तर लागलाच, पण वाचन-लेखन करण्याची गोडीही लागली.

त्या काळात अनेक उत्तमोत्तम गोष्टींच्या पुस्तकांचं वाचन झालं. काहींची तर पारायणंही झाली. महादेवशास्त्री जोशींच्या पुराणातल्या आणि संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या कथा होत्या, सानेगुरुजींच्या 'गोड गोष्टी' होत्या. ना. धों. ताम्हनकरांच्या 'गोट्या'ची ओळख त्यावेळचीच. श्री. शं. खानवलकरांचा खोडकर 'चंदू'ही मनात घर करून बसलेला. पाश्चात्य कथांची ओळखही त्यावेळीच झाली. मार्क ट्वेनचा 'टॉम सॉयर', ड्युमाचे 'तीन शिलेदार', स्विफ्टच्या 'गलिव्हरचे प्रवास', सर्वान्टेसचा 'डॉन कियोटे', 'रॉबिन हूड' सगळेच वाचले होते. त्यानंतर आले भा. रा. भागवत आणि त्यांचा बालमित्र. त्यातून मग 'चंद्रावर स्वारी' झाली. 'झपाटलेल्या प्रवाशा'बरोबर पृथ्वीप्रदक्षिणा झाली. 'अदृश्य माणूस', 'समुद्रसैतान' झपाटल्यासारखे वाचले. अरबी भाषेतील सुरस कथा तर होत्याच. झालंच तर बिरबल, तेनालीरामही सोबतीला होते. पंचतंत्र, हितोपदेश, इसापनीती, वेताळपंचविशी सगळं काही त्यावेळी वाचलं होतं.

साधारण आठवी नववीत गेल्यावर बाबुराव अर्नाळकरांनी वेड लावलं. धनंजय-छोटू, झुंजार-विजया, काळापहाड, तीन न्यायाधीश, चंद्रहास यांच्या करामतीच्या नवनवीन रहस्यकथा दर महिन्याला मिळत. त्यांचंही अधाशासारखं वाचन होत होतं. हे मात्र वडिलांना चोरून करावं लागत असे. हे साहित्य मुलांनी वाचू नये, खरं तर कोणीच वाचू नये असा मतप्रवाह त्या काळात होता. अर्नाळकरांना प्रचंड लोकप्रियता लाभली. पण साहित्यवर्तुळात कधीही त्यांना मानाचं स्थान दिलं गेलं नाही. यालाही त्या वाङ्मयप्रकाराबद्दल असलेली नाराजीच कारणीभूत होती. पण माझ्या पिढीतल्या अनेकांना त्या रहस्यकथांनी वाचनाची गोड लावली यात शंका नाही. किंबहुना

त्या वाचत असतानाच केव्हा तरी लेखनाची इच्छाही मनात रुजली.

त्या सुमारासच आचार्य अत्रे, विमादी पटवर्धन, चिं. वि. जोशी, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, बाळकराम यांच्या विनोदी साहित्याचीही गोडी निर्माण झाली होती. ओसाडवाडीचे देव, हास्यकळ्या, सुदाम्याचे पोहे यांचं वाचन झालं. यापैकी काही लेखकांच्या कथा मराठीच्या पाठ्यपुस्तकातही होत्या. त्यामुळे शिक्षकांनीच त्यांचं वाचन करायला प्रोत्साहन दिलं होतं. ह. ना. आपटे यांच्या कादंबऱ्यांच्या संक्षिप्त आवृत्त्या बालवाचकांसाठी प्रकाशित झाल्या होत्या. त्याही वाचल्या. नाथमाधवांची स्वराज्यमालिकांचंही असंच वाचन झालं. फडके-खांडेकर त्या मानानं थोडेफार न कळणारे होते.

त्यानंतरचा काळ हा मराठी नवकथांचा, नवकाव्याचा आणि खऱ्या अर्थानं दिवाळी अंकांचा सुवर्णकाळ होता. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, शांताराम, दि. बा. मोकाशी यांच्या उत्तमोत्तम कथा-मासिकांमधून, दिवाळी अंकांमधून वाचल्या. त्यांचेच कथासंग्रह प्रकाशित झाले. तेही वाचनालयांमधून मिळवून वाचले. पु.लं.नीही याच सुमारास आपल्या नवख्या आणि निखळ विनोदानं भारावून सोडलं. त्याच धुंदीत जयवंत दळवीही वाचले गेले.

या साहित्याच्या धबधब्यात नाहतानाच द. पां. खांबेटे 'माझं नाव रमाकांत वालावलकर' असं म्हणत एका नवीन साहित्यप्रकाराची ओळख करून द्यायला पुढं सरसावले होते. त्यालाच विज्ञानकथा म्हणतात, हे त्यावेळी ध्यानात आलं नव्हतं. पण मनाच्या सांदीकोपऱ्यात कुठं तरी त्यानं स्थान पटकावलं होतं. याची जाणीव त्यानंतर जवळजवळ दीड दशकानं झाली. प. म. कर्वे, चिं. श्री. कर्वे, ना. वा. कोगेकर प्रभृतींनी विज्ञानाचे आविष्कार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यावरचं गहनतेचं अवगुंठन दूर सारून त्याच्या अभिजात सौंदर्याचं दर्शन घडवायला सुरुवात केली होती. त्यांचंही वाचन अभावितपणे झालं.

तोपर्यंत एसएससीचा उंबरा ओलांडून मी महाविद्यालयात प्रवेश केला होता. विज्ञानाचा विद्यार्थी झालो होतो. पण साहित्याचं वाचन सुटलं नव्हतं. विल्सन महाविद्यालयाचं ग्रंथालय समृद्ध होतं. त्यामुळं अत्र्यांची समग्र नाटकं वाचून काढली. सुटीत घरी गेल्यावर शेक्सपियर वाचला. इंग्रजी भाषेतल्या साहित्याच्या वाचनाची आवड तोवर निर्माण झाली होती. डिकन्स, सॉमरसेट मॉम, हार्डी, जेन ऑस्टिन, एजे क्रोनिन, जेम्स हिल्टन यांच्या कादंबऱ्यांबरोबरच पी जी वुडहाऊसचीही ओळख त्याच सुमारास झाली. महाविद्यालयाच्या ग्रंथसंग्रहालयात जवळजवळ समग्र वुडहाऊस होता. तो सगळाच्या सगळा वाचून काढला.

याचवेळी केव्हातरी मादाम क्युरीचं चरित्र वाचनात आलं. त्याचा प्रभाव नकळत पडला आणि विज्ञान संशोधनाच्या क्षेत्रानं आवाहन करायला सुरुवात केली. त्यावेळी त्याची स्पष्ट कल्पना आली नव्हती. पण त्या ओढीमुळेच मूलभूत विज्ञानाच्या अभ्यासाला प्राधान्य देण्याची इच्छा प्रबळ झाली. त्यातूनच मग जॉर्ज गॅमावचं 'वन टू थ्री इन्फिनिटी', त्याच धर्तीचं 'मायक्रोब हंटर्स', यांचं वाचनही झालं. पण अशा विज्ञानविषयक साहित्याच्या वाचनाबरोबर ललित साहित्याचं वाचनही होतच राहिलं होतं. आता ते फक्त मराठी भाषेतल्या साहित्याचंच न राहता इंग्रजी साहित्याचंही होत होतं. अभिजात साहित्याबरोबरच ज्यांना 'बेस्ट सेलर्स' असं म्हणतात अशा ललितकृतींचंही वाचन होत होतं. खरं तर या बेस्ट सेलर्सकडे समीक्षक तुच्छतेनं का पाहतात हे कोडंच आहे. कारण त्यांच्या लेखनासाठीही हे लेखक किती प्रचंड मेहनत घेतात, किती संशोधन करतात हे सहज दिसून येतं.

आयर्विंग वॉलेसच्या 'द प्राईज'मध्ये नोबेल पारितोषिकांविषयी इतकी माहिती देण्यात आली आहे की ती एकाच ठिकाणाहून मिळवायची तर त्यासंबंधीच्या ज्ञानकोशाचाच आधार घ्यावा लागायचा. आणि त्यातूनही पडद्यामागच्या घटनांची माहिती मिळणारच नाही. आजवर असंख्य वेळा विमानानं प्रवास केला आहे. जगभरातल्या अनेक विमानतळांवर उतरलो आहे किंवा तिथून विमानं पकडली आहेत. पण या विमानतळांचं कामकाज कसं चालतं, विमानांच्या उड्डाणांचं अचूक नियंत्रण कसं होतं, हे आर्थर हेलीचं 'एअरपोर्ट' वाचल्यानंतरच समजलं. लिऑन युरीसच्या 'एक्झोडस'वरून ज्यूंचा आणि इस्रायलनिर्मितीचा इतिहास, तर त्याच्याच 'ट्रिनिटी'वरून आयर्लंडचा इतिहास सहजगत्या आणि हसतखेळत समजला की इतिहासाच्या पुस्तकाचं पारायण करूनही त्याचं तितकंसं आकलन झालं नसतं. अलीकडचं गाजत असलेलं 'द दा विंची कोड' तर या सर्वांवर कडी करणारं आहे.

याच सुमारास पीएच.डीच्या पदवीसाठी संशोधन करण्याच्या निमित्तानं मी लंडनमध्ये तीन वर्षं काढली. त्यावेळी माझा एक सहाध्यायी आणि जिवलग मित्र टॉनी फॉरेस्टर यानं सायन्स फिक्शन या साहित्य प्रकाराची ओळख करून दिली. प्रस्थापित विज्ञानाचं बोट धरून भविष्यात डोकावून पाहत त्यावेळच्या आयुष्यक्रमाचं, जीवनशैलीचं, मानवी व्यवहारांचं मनोहारी चित्रण या साहित्यात कसं असतं, कित्येक वेळा त्या कल्पनेच्या भरारीतूनच नवीन संशोधनाला कशी चालना मिळते, कित्येक वैज्ञानिक या प्रकारचं लेखन कसं करतात, यांचा परिचय त्यानं करून दिला. आयझॅक ॲसिमॉव्ह हा या क्षेत्रातला दादा आहे, हेही त्यानंच सांगितलं. त्यानंतर तिथल्या सार्वजनिक वाचनालयातून मी सायन्स फिक्शन आणून वाचायला सुरुवात केली. त्यावेळी त्याची तितकीशी गोडी लागली असं वाटलं नाही. काही तर समजायला अवघडही गेलं. पण परत एकदा मनात कुठंतरी कोपऱ्यात त्यानं आपली रुजवात करून घेतली होती. पुढं त्या प्रकारचं लेखन मी स्वत:च करू लागलो तेव्हा त्याची जाणीव झाली. मायकेल क्रायटनच्या 'ॲन्ड्रोमेडा स्ट्रेन', 'टर्मिनल मॅन' यासारख्या किंवा रॉबिन कूकच्या 'कोमा' यासारख्या ललितकृतींच्या वाचनानंतर त्याला अंकुर फुटायला सुरुवात झाली.

सुरुवातीस विज्ञान संशोधन, त्यानंतर विज्ञान पत्रकारिता आणि त्यानंतर या दोन्हींची सांगड घालणारं विज्ञान प्रसाराचं क्षेत्र अशी माझी व्यवसायाची कारकीर्द फुलत गेली. विज्ञान प्रसाराचं काम आज निवृत्तीच्या वयानंतरही चालूच आहे. यापैकी प्रत्येक क्षेत्रात वाचनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे लहान वयातच सुरु झालेल्या वाचनात कधी खीळ पडली नाही. वेळोवेळी त्याच्या बाह्यरूपात बदल होत गेले. वाचनात उत्क्रांती होत गेली. लहान वयात अधिकतर गोष्टींच्या पुस्तकांचं वाचन झालं. त्यानंतर अभिजात ललितकृतींचं वाचन होत गेलं. त्यानंतर वैज्ञानिक साहित्याच्या वाचनाला प्राधान्य मिळत गेलं. अधूनमधून मन रिझवणाऱ्या रहस्यकथांचा मोह मात्र कधीच सुटला नाही.

कॉनन डॉयलचा 'शेरलॉक होम्स', अॅगाथा ख्रिस्तीचा 'पॉयरॉ' तसंच 'मिस पार्पल', अर्ल स्टॅन्ले गार्डनरचा 'पेरी मेसन' हे तर सर्वकाळचे आवडते मित्र. निरनिराळ्या रहस्यांचा उलगडा त्यांच्याबरोबर करताना अतीव आनंद मिळत गेला. कित्येक वेळा तर त्याच त्याच कथा पुन्हापुन्हा वाचल्या गेल्या. कारण त्यांच्यामध्ये जसा थरार होता, कुतूहल शमवण्याची क्षमता होती तसंच एक बौद्धिक आव्हानही होतं. या गुप्तहेरांना पडलेलं कोडं आपल्यालाही पडलं आहे. आपणही त्यांच्या खांद्याला खांदा देऊन ते सोडवण्याचा प्रयत्न करत आहोत. घटनास्थळी किंवा तिथं हजर असलेल्या व्यक्तींच्या वक्तव्यातून मिळालेली सूचक माहिती यांचा उपयोग करून आपणही त्या रहस्याचा भेद करत आहोत असं ते वाचताना वाटत राहतं. किंबहुना मनातल्या मनात खरोखरच गुन्हेगार कोण असावा याचा तर्क आपण करत राहतो. हेच तर खरं रहस्यकथांचं आकर्षण आहे. चांगला लेखक वाचकाला ते कोडं सोडवण्याचं आव्हानही देतो तसंच त्यासाठी मदतही करतो. अशा वेळी आपला तर्क खरा ठरला तर असीम आनंद तर मिळतोच. पण तो चुकला तरी आपण कसे फसलो आणि भरकटलो हे पाहूनही गंमत वाटते. आपला पराभव झाला अशी भावनाच होत नाही.

त्यामुळेच रहस्यकथांचं माझं वाचन भरपूर झालं. त्यातलं ते बौद्धिक आव्हान भावून गेलं. पण या रहस्यकथांच्या प्रांतातही उत्क्रांती होत गेली. डॉयल, ख्रिस्ती किंवा गार्डनर यांच्यापेक्षा अतिशय वेगळ्या प्रकारची, त्याला ललितकथांचा बाज देणारी रहस्यकथा एरिक अॅम्बलरनी लिहिलेली आहे. या लेखकाची मराठी वाचकाला फारशी माहिती नाही. पण बौद्धिक श्रेणीत त्याची रहस्यकथा वरची गणली जाते. दोन महायुद्धांच्या मधल्या काळात मध्य व पूर्व युरोपात गुप्तहेरांचा सुळसुळाट झाला होता. त्या प्रदेशाचा राजकीय नकाशा दर महिन्याला बदलत होता. आणि त्यामुळे गुप्तहेरांना आणि त्यांच्या कारवायांना भरपूर वाव होता. याचंच चित्रण अॅम्बलरच्या रहस्यकथांमध्ये आढळतं. त्यानंतरच्या शीतयुद्धाच्या काळातल्या आंतरराष्ट्रीय गुप्तहेरगिरीचं भेदक चित्रण जॉन ल कारेनं केलेलं आहे. याच्या रहस्यकथांनी बौद्धिक पातळीची आणखी एक वरची पायरी गाठलेली आहे.

पण या सर्वांवर माझ्या दृष्टीनं कडी केली ती वैज्ञानिक रहस्यकथांनी. आयझॅक अॅसिमॉव्हनं अशा प्रकारच्या सायन्स फिक्शन मिस्टरीज बऱ्याच लिहिलेल्या आहेत. रहस्याची उकल करताना एखाद्या विज्ञानसूत्राचा खुबीनं वापर केलेला असतो. किंवा ते रहस्यच मुळी त्या विज्ञानसूत्राच्या आविष्कारपोटी उभं राहिलेलं असतं. या कथांमधलं बौद्धिक आव्हान अधिकच थरारक आणि आनंददायी ठरतं. अशाही अनेक रहस्यकथांचं वाचन मधल्या काळात झालं.

कामाचा व्याप वाढत गेला तसं वेळेचे नियोजन करायला महत्त्व आलं. वाचनासाठी देऊ शकणारा वेळ मर्यादित होता. त्यामुळे मग बेबंद वागू पाहणाऱ्या मनाला थोडा लगाम घालत वाचनात थोडी शिस्त आली. ज्या वाङ्मयाचं वाचन कामासाठी, लेखनासाठी आवश्यकच आहे, त्याला अग्रक्रम मिळू लागला. ज्याचा पुढंमागं कधीकाळी उपयोग होऊ शकेल अशा साहित्याच्या वाचनाला त्यानंतरच क्रमांक मिळाला. आणि केवळ मनोरंजनासाठी करायच्या वाचनाला वाट पाहावी लागू लागली.

आज वैज्ञानिक साहित्याचं वाचन अधिक होतं. त्यातही ज्याला पॉप्युलर सायन्स म्हणतात अशा सुबोध किंवा ललित अंगानं लिहिलेल्या विज्ञानविषयक साहित्याला अग्रक्रम आहे. अशा प्रकारचं विपुल साहित्य इंग्रजी भाषेत आज उपलब्ध आहे. निरनिराळ्या वयोगटांसाठी असं लेखन केलं जात आहे. किंबहुना एकाच विषयाची हाताळणी प्रौढ वाचकासाठी आणि बालवाचकांसाठी वेगळ्या प्रकारे कशी केली जाते हे पाहण्यात मोठा आनंद मिळतो. एखादं पुस्तक केवळ गृहिणींना डोळ्यांसमोर ठेवून केल्याचाही प्रत्यय येतो. विषय तोच, त्यातली तत्त्वं आणि प्रमेयं तीच. पण मांडणी, त्यासाठी दिले जाणारे दाखले, उपमा, साक्षात्कार हे मात्र त्या त्या वाचकाला भावतील अशा प्रकारे वापरलेले. लेखनाचा वस्तुपाठ घालून देणारी अशी एखादी साहित्यकृती हाती आली की 'लाजवाब' हा उद्गार नकळत ओठांवर येतो.

या साहित्याच्या लेखकांमध्येही बरीच विविधता आहे. एका टोकाला अव्वल वैज्ञानिक. त्यातले काही तर नोबेल पुरस्कार विजेते. काहींचं लेखन आत्मचरित्रपर असलं तरी त्यात वैयक्तिक आयुष्यातील घटनांपेक्षा व्यावसायिक आयुष्यातले चढउतारच अधिक चित्रित केलेले असतात. त्यातही एखादा शोध कसा लागला याचं चित्रण अस्सल रहस्यकथांनाही लाजवणारं असतं. तोच थरार, तेच अज्ञाताचं गूढ, तीच तर्कसंगतरीत्या केलेली उकल आणि हे सर्व विज्ञानातील गहन अनाकलनीय भाषा टाळून सुबोध, प्रासादिक भाषेचा वापर करत केलेलं.

दुसऱ्या टोकाला तर पत्रकार. औपचारिकरीत्या विज्ञानाचं अध्ययन यापैकी जवळजवळ कोणीही केलेलं नाही. तरीही त्यांच्या लेखनात कोणत्याही तथ्यात्मक चुका आढळत नाहीत. तर्कविसंगतीचा स्पर्शही या लेखनाला झालेला नसतो. दोन वर्षांपूर्वी ज्याला प्रतिष्ठेच्या अशा अव्हेन्टिस पुरस्काराचा सन्मान लाभला त्या 'ए शॉर्ट हिस्टरी ऑफ

नियर्ली एव्हरीथिंग' या पुस्तकाचा लेखक बिल ब्रायसन यानं तर तोपर्यंत केवळ प्रवासवर्णनचं लिहिली होती. ती अनोख्या धाटणीची होती. पण प्रवासवर्णनंच. तोच बाज ठेवत त्यानं विज्ञानजगताचं प्रवासवर्णनच जणू या पुस्तकात लिहिलं आहे. मराठी साहित्यक्षेत्रात अशा प्रकारची मुशाफिरी करण्याचं धाडस कोणत्याही साहित्यिकानं दाखवलेलं नाही. अगदी विज्ञानकथांच्या क्षेत्रातही आघाडीच्या साहित्यिकांनी प्रवेश करण्याचा प्रयत्नही केलेला दिसून येत नाही.

आज विज्ञानविषयांच्या वाचनावर अधिक वेळ खर्च होत असला तरी या विविधतेमुळे त्यात एकसुरीपणा कधीच जाणवला नाही. शिवाय ललितलेखनाच्या दिशेनं त्यात कशी उत्क्रांती होत आहे याचा वेध घेण्यातही एक वेगळाच माझा मिळतो आहे.

वाचनानं जागेपणीचा चाळीस टक्के काळ तरी व्यापला असेल. तो संपूर्ण सत्कारणी लागला तसंच आनंद देऊन गेला याविषयी यत्किंचितही संदेह नाही.


५ रागिणी , साहित्य सहवास,
बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१.
फोन नं. २६६३२६४६



## डॉ. बाळ फोंडके यांची विज्ञानविषयक पुस्तके




**विज्ञान प्रपंच**

१५०रु.

**ग्यानबाचं विज्ञान**

१३०रु.




**खिडकीलाही डोळे असतात**

१४०रु.







**विज्ञान विशेष**

११०रु.




**व्हर्च्युअल रिॲलिटी**

१५०रु.

**विश्वातील सजीवसृष्टी**

६०रु.




पोस्टेज प्रत्येकी ३०रु.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.



# यशवंतराव चव्हाण : एक चोखंदळ वाचक

## डॉ. आनंद पाटील

यशवंतराव चव्हाण यांनी सदैव स्वत: एक नम्र 'साहित्यप्रेमी रसिक' ही भूमिका जन्मभर जपली. त्यांच्या वाचनाचा व्यासंग हीच एक दंतकथा बनली. त्यांच्या घरी अमक्या जागी इतकी पुस्तके व नियतकालिके असत, प्रवासात गाडीतही ती असत, आलटून पालटून एकाच वेळी एकदोन पुस्तके ते वाचत, पुस्तकावर खुणा करत, बरीच पुस्तके स्वत: पैसे मोजून खरेदी करत, विद्वानांशी चर्चा करत, आवडलेले पुस्तक इतरांनी वाचावे म्हणून स्वत:च्या हस्ताक्षरात चांगली शिफारस करत : "सोबतचे पुस्तक मी संपूर्ण वाचले आहे. चांगले आहे. आपणही वाचावे." मुख्यमंत्री असताना सहकारी मंत्र्यांसाठी अशा चिठ्ठ्या लावलेली पुस्तके ते पाठवत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, द्वा. भ. कर्णिक, डॉ. भास्कर भोळे, यांच्यासारखे नामवंत पंडित, बहुसंख्य प्राध्यापक, वसंतदादा पाटील यांच्यासारखे पुढारी आणि अनेक कार्यकर्ते यांनी चव्हाणसाहेबांच्या ग्रंथवाचनाचे संदर्भ जागजागी दिले आहेत.

विद्वानांच्या सभासंमेलनात सहसा न मिसळणाऱ्या वसंतदादांनी एक मार्मिक आठवण सांगितली आहे. मिरजेच्या एका राजाला स्वत:च्या वाचनाच्या व्यासंगाचे प्रदर्शन करायची फार हौस होती. त्यांनी बऱ्याच ग्रंथांची मांडणी नजरेत भरेल अशा तऱ्हेने केली होती. एकदा यशवंतरावांशी त्यांनी ग्रंथचर्चा केली. तेव्हा चव्हाणसाहेबांच्या व्यासंगाने ते चकित झाले.

यशवंतरावांनी काय वाचले याचे अनेक उल्लेख स्वत:च केले आहेत. इतरांनीही त्यात भर घातली आहे. परंतु 'वाचायला शिकणे' आणि 'शिकण्यासाठी वाचणे' याचे सामाजिक, आर्थिक व ऐतिहासिक संदर्भ कोणते? व्यक्तिविकासात त्यांचे स्थान काय? स्वत: यशवंतरावच लिहितात,

"माझे लहानपण हे इतर लक्षावधी गरीब घरातील मुलांच्याप्रमाणे गेले आहे. खेड्यात राहणाऱ्या छोट्या गरीब शेतकऱ्यांची संख्या त्यावेळी पुष्कळ होती. अशा एका कुटुंबातील मी एक, म्हणून माझ्या जीवनामध्ये इतरांपेक्षा फार काही विशेष होते असे नाही. सर्वसामान्यत: अडीअडचणी व गरिबी यालाच तेव्हा जीवन असे नाव होते."

यशवंतरावांची अशी बोलकी प्रांजळ निवेदने 'वाचा म्हणजे वाचाल' या पारतंत्र्यातील दारिद्र्य रेषेखालील अल्पभूधारक शेतकरी कुटुंबात पाश्चात्त्य विचारांचा प्रवेश झाल्याची ऐतिहासिक निशाणी ठरतात.

यशवंतरावांच्या एका पंडित मित्राने त्यांना प्रश्न केला,

"यशवंतराव! तुमच्या बुद्धीचा केसरीकारांपासून परांजपे यांच्यासारख्या पुण्यातील विद्वानांना दरारा वाटतो. इतके असूनही तुमच्याबद्दल त्यांना प्रेम का वाटत नाही?"...

यशवंतरावांनी या प्रश्नाचे उत्तर अगदी मोकळेपणाने दिले.

"पुण्याच्या विद्वान मंडळींना असे वाटते की दुसऱ्यांनी नेहमी आपल्या पायाशी बसून आपला आशीर्वाद घ्यावा. मला आयुष्यात असा कुणाचा आशीर्वाद घेण्याची सवय नाही. मी कुणाबद्दलही एकदम बरावाईट ग्रह करून घेत नाही व माझी दृष्टी चुकीची असली तरी एकमेकांत मित्रत्वाने होणाऱ्या खुल्या चर्चेनंतर मी दुरुस्त करतो."

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत यशवंतराव "प्रथम वाचायला शिकण्यासाठी" धडपडले. "शिकण्यासाठी वाचनाची" जोड देताना पुस्तक पांडित्य अथवा पोकळ पोपटपंची वळण टाळायला त्यांना काही छंद उपयोगी पडले. त्याबाबत ते म्हणतात,

"मला काही छंद होते. मनमुराद संगीत ऐकावे, गाणे गावे या माझ्या छंदापायी मी भजनी मंडळात जात असे. संगीत भजनासाठी मी रात्र रात्र मंडळात जात असे. संगीत भजनासाठी मी रात्र रात्र जागलो आणि हिंडलो. नाटके पाहण्याचा छंदही असाच मनमुराद

केला. नाटकासाठी कऱ्हाडहून कोल्हापूरला जावे लागे. मला नेण्याचे माझ्या एका शिक्षक स्नेह्याने कायमचेच ठरविले होते. सोबत म्हणून ते मला मोटारने नेत असत. नाटक पाहण्याच्या याच नादातून मला नाट्यवाचनाचा छंद लागला. गडकऱ्यांच्या नाटकातले संवाद मला तोंडपाठ होते. राजसंन्यास मधला तर एक सबंध प्रवेश मी पाठ केला होता.''

त्यांच्या ग्रंथालयात बर्नार्ड शॉ, ओ'नील, बेकेट आदि आधुनिक नाटककारांच्या समग्र वाङ्मयाचे संग्रह जमा होण्यामागील रहस्य या विधानात लपलेले आहे. या जडणघडणीनेच त्यांना शॉच्या नाटकावर मार्मिक भाष्य करायला किंवा मराठी नाट्यसंमेलनाच्या उद्घाटनाचे भाषण व्यासंगपूर्ण व उत्तम दर्जाचे बनवायला बळ पुरवले.

यशवंतरावांची निरीक्षणक्षमता, भाषाप्रभुत्व, स्मरणशक्ती आणि अफाट वाचन यांच्या आधारे यशवंतराव चव्हाण यांचं जीवन आणि कार्य अधिक चांगलं वाचता येतं असं माझं मत बनलं आहे. स्वत:ला घडवण्यासाठी, स्पर्धेत टिकण्यासाठी त्यांनीच पुढे म्हटले तसे 'विरंगुळ्या'साठी ते वाचत गेले. त्यातूनच माणसं व आजूबाजूचं वास्तव वाचायला शिकले. मार्क ट्वेन म्हणतो :

The man who does not read good books has no advantage over the man who cannot read.

अडाण्याच्या पेक्षा वेगळं काहीतरी मिळवायचं, अज्ञानाच्या अंधारात खितपत पडायचं नाही म्हणून तर त्यांनी ग्रंथांना गुरू केलं.

**वाचनाने यशवंतरावांना सृजनक्षम व द्रष्टा (visionary) बनवल्यामुळेच त्यांनी स्वत:च्या किंवा कुटुंबाच्या गोतावळ्याच्या खाजगी संस्था मुळीच उभ्या केल्या नाहीत. ह्याचा उलगडा कसा करायचा? त्यांच्या नावे हजारो संस्था मात्र महाराष्ट्रात उत्स्फूर्तपणे उभ्या राहिल्या याचे कारण काय? ते काही प्रमाणात त्यांच्या वाचनवेडात व सृजनक्षमतेतच सापडते.**

पुणे आकाशवाणीवरील 'माझा विरंगुळा' या भाषणात यशवंतराव म्हणतात :

''लहानपणी शाळेत असताना किंवा तरुणपणी राजकीय चळवळीत रमलो असताना मला कधी कधी काव्यकल्पना सुचत आणि मी त्यावेळी कागदावर देखील उतरीत असे. कॉलेजात असल्यापासून काव्य आणि साहित्य यांचे मला मोठे आकर्षण वाटत असे. अद्यापही ते वाटते.

अठरा वर्षे वयाच्या या तरुणाचे त्या काळातील वाचन, सांस्कृतिक उपक्रमातील सहभाग आणि कार्यकर्त्यांची स्वेच्छेने स्वीकारलेली भूमिका हे सगळे दारिद्र्यातही त्याला कसे जमले? 'असेल आवड तर होईल सवड' ही म्हण याचे पुरते उत्तर देऊ शकत नाही. दुर्दम्य आशावाद आणि कठोर परिश्रमाने मनाची मशागत करायची वृत्ती असल्यानेच समाजातील सर्व जातीधर्मातील माणसं त्यांना भेटल्याचे दिसते.

कुठल्याही वाङ्मयीन संस्कृतीत विशिष्ट काळातील पर्यावरण अभिरुची घडवत/बिघडवत असते. तशा व्यक्ती व संस्था सांस्कृतिक सत्र राबवत असतात. त्यांचे वाद आणि वादळे अटळ असतात. परंतु ग्रंथांच्या विषयी चर्चा करता करता स्वत:ची 'भूमिका' बनवूनही वाद टाळून राजकीय सावधगिरी बाळगीत 'नम्र रसिक, साहित्यप्रेमी वाचक' अशा लेबलात स्वत:ला बांधून घेण्याची सुरवात इथेच झाली असे दिसते.

वाचन माणसाला 'परिपूर्ण' बनवते यावर त्यांची चांगली श्रद्धा होती. सकारात्मक दृष्टिकोनातून रचनात्मक कार्य करण्याचे स्वप्न उरी बाळगलेल्या या बऱ्याच अर्थाने ध्येयवेड्या तरुणाला वाचनाचे 'व्यसन' तारक ठरल्याचे दिसते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून, अपयशातून व वैफल्यग्रस्त पेचप्रसंगातून यशस्वी होणारा नेता म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांचे उदाहरण नेपोलियन हिल व डब्ल्यू. स्टोन यांनी 'सक्सेस थ्रू ए पॉझिटिव्ह मेन्टल ॲटिट्यूड' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिले आहे.

यशवंतरावांच्या बाबतीतही तंतोतंत अशीच प्रक्रिया घडल्याचे दिसते.

दोघांच्या आयुष्यात दारिद्र्य, टीका, विरोध, अपयशाचे क्षण बरेच आले. आर्थिक स्थिती आणि ध्येयवादातही बरेच साम्य आहे. लिंकनप्रमाणेच वाचनातून सकारात्मक दृष्टिकोन घडवत यशाकडे वाटचाल करण्याच्या त्यांच्या धोरणात मोठे साम्य आहे. मॅट्रिकच्या आधीच 'लोकल' अथवा 'लोबल'कडून ग्लोबल ग्रंथांच्या वाचनाकडे एका अडाणी शेतमजुराच्या मुलाने वळणे ही त्याकाळी व आजही साधी बाब नाही. ही दमछाक, दु:ख, दैन्याचे तपशील ऊरबडव्या भाषेत मांडणे त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोनात बसत नाही. नम्रता व सौम्यपणा ही त्यांच्या शैलीची खास वैशिष्ट्ये आहेत. तीदेखील वाचनाबद्दलच्या परिपक्व भूमिकेतूनच अवतरली आहेत. स्वत:च्या वाचनप्रक्रियेविषयी एवढे सखोल विचार विविधांगांनी मांडलेले अन्य उदाहरण शोधणे कठीण आहे. मॅट्रिक झाल्यानंतर तुरुंगात त्यांची इंग्रजी पुस्तके वाचण्याची इच्छा ज्येष्ठ विद्याव्यासंगी नेत्यांच्या सहवासात बळावणे स्वाभाविक होते. जॉन बनियन, लोकमान्य टिळक, जवाहरलाल नेहरू वगैरे अनेक लेखकांच्या उत्कृष्ट ग्रंथांचे लेखन तुरुंगातच झाले आहे. आफ्रिकन बहुसंख्य लेखकांना ती हवा खावी लागल्याने त्यांची फार चांगली ग्रंथनिर्मिती झाली. त्यामुळेच काहींना नोबेल पुरस्कारही मिळाले. विनाप्रहार नाहीत हार! राजकैद्यांना तुरुंगाची हवा सृजनात्मकता व कल्पकतेला उत्तेजक ठरते हे वैश्विक सत्य आहे. अशी ग्रंथनिर्मिती करण्याचे यशवंतरावांचे वय नव्हते. परंतु ते तुरुंगात आपल्या वाचनाविषयी जास्त सजग व अंतर्मुख झाले. ते 'कृष्णाकाठ' (१२५) मध्ये लिहितात,

''प्रथम मला अवघड वाटणाऱ्या आणि माझ्या काहीशा आवाक्याबाहेर असणाऱ्या पुस्तकांच्या वाचनाला मी हात घातला. इंग्रजी शब्दकोशाचा वारंवार उपयोग करून आणि अवतीभोवतीच्या मित्रांशी चर्चा करून मी बर्ट्रांड रसेल यांचे 'रोडस् टू फ्रीडम' हे

पुस्तक वाचले.''

तरुणपणी वाचलेल्यांपैकी पुढील राजकीय आयुष्यात त्यांच्या बरोबर काय शिल्लक राहिले? त्याचा उपयोग त्यांनी कसा केला? चारित्र्य घडवण्याचा एक मार्ग म्हणजे ग्रंथवाचन.

हा अभ्यास म्हणजे चारित्र्याचाच भाग बनल्याचे पुरावे त्यांच्या भाषणात, लेखनात व आचार-विचारात सर्वत्र शोधता येतात.

रसेलचे एकच पुस्तक तुरुंगात वाचून ते 'गंभीर, नैतिक व सखोल' तत्त्वचिंतक बनले असे नाही. पण त्यांच्या खाजगी ग्रंथालयातील रसेलची व त्याच्या लेखनावरची डझनभर पुस्तके होती. रसेलच्या विचारांनी त्यांच्या अनेक संकल्पना स्पष्ट झाल्या असणार.

वाचनाने यशवंतराव तुलनात्मक विवेचन व चिंतनाकडे वळले. आकडेवारी, योग्य उदाहरणे, पुरावे देत विरोधकांचा हल्ला लीलया परतवण्यात ते नेहमीच वरचढ ठरले.

पुस्तके आयुष्यात कोणत्या टप्प्यावर, कोणत्या परिस्थितीत व कोणत्या पर्यावरणात प्रवेश करतात यालाही महत्त्व आहे. त्यातील काही व्यक्तींच्या जाणीवेच्या पृष्ठभागावर तरंगत राहतात. काही विस्मृतीत गडप होतात. काही हिमनगासारखी सुप्त जाणीवेत दडून-पडून राहतात. त्यांचा एक अष्टमांश भागच वर दिसतो. तसे काहीसे मॅक्झिम गॉर्कीच्या 'मदर' या कादंबरीच्या संदर्भातील यशवंतरावांच्या लेखनात घडलेले आहे असे वाटते. विशिष्ट ग्रंथ कोणत्या वयात वाचला यालाही फार महत्त्व आहे. यशवंतराव लिहितात,

''मॅक्झिम गॉर्की याची आई ही कादंबरी मी ज्यावेळी वाचली त्यावेळी माझ्या हृदयात अतिशय कालवाकालव झाली. असे काही अक्षरवाङ्मय वाचले की आपले स्वत्व क्षणभर विसरून जातो आणि सुखाच्या निवांत क्षणात रममाण होतो.''

आजच्या जागतिकीकरणातील स्पर्धेत टिकून रहायला यशवंतरावांचे 'रोल मॉडेल' मला फार महत्त्वाचे वाटते. आता वाङ्मयीन प्रभाव, 'साहित्य' वगैरे संकल्पनांचे अर्थ बदलले आहेत. आंतरराष्ट्रीय आंतरवाङ्मयीनता वाढवण्याची मोठी गरज 'ग्लाबल व्हिलेज'मध्ये भासत राहणार. अशा स्थित्यंतराच्या काळात यशवंतरावांनी देशी-विदेशी साहित्याच्या संतुलित आंतरसंहितात्मकतेचा घालून दिलेला आदर्श हे एक 'प्रकाशाचे बेट' आहे यात शंका नाही.

**डॉ. आनंद पाटील**
२०२, प्रतीक्षा प्लॉट २१७ ब, सर्व्हे नं. ९६
उजवी भुसारी कॉलनी, कोथरूड, पुणे ४११०३८


# वादळमाथा

**राम प्रधान**

## एक झलक...

*''टाळ्यांच्या गजरात व भारावलेल्या मनाने यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा निरोप घेतला.*

*त्याच दिवशी संध्याकाळी, १९ नोव्हेंबर १९६२ रोजी आपला राजीनामा राज्यपालांना सादर करण्याअगोदर चौपाटीवरील एका भव्य सभेत मुंबईच्या जनतेचा निरोप घेतला. ही देशाची हाक आहे, ती देशाच्या नेत्याने दिलेली हाक आहे आणि त्याकरिता सैनिक म्हणून, प्रसंग पडला, तर जान देण्यासाठी मी जात आहे, या शब्दांत त्यांनी जनतेचा निरोप घेतला. मुंबईसाठी महाराष्ट्राने जो लढा दिला, त्या मुंबईच्या जनतेला, 'आपण जात असलो, तरी आपण दिलेली आश्वासने पाळली जातील,' याची जाणीव त्यांनी करून दिली.*

*त्याच रात्री आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात यशवंतराव म्हणालेः*

*''या मातीतच मी प्रथम रांगलो आणि रंगलो पुढे*
*हीच, गड्यांनो, माती माझ्या रक्तामध्ये चढे...''*

*''स्वराज्यावर घाला आला असताना कुठलीही वैयक्तिक अडचण आम्हांला रोखू शकत नाही, हा महाराष्ट्राचा बाणा आहे, असा इतिहासाचा दाखला आहे.''*

*शेवटी ते म्हणाले,*

*''मी देशाच्या सेवेसाठी जात असताना माझ्याबरोबर सह्याद्रीचा निधडेपणा, कृष्ण-नर्मदेची सखोलता, वैनगंगेची विशालता, कोकणाचा कष्टाळूपणा आणि पैठणची भाविकता घेऊन जात आहे.''*

**किंमत २००रु. पोस्टेज ३०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



# माझे वाचन

**दीपक शिकारपूर**



वाचन हा ज्ञानप्राप्ती, मनोरंजन, छंद तसेच संवादाचे साधन आहे. वाचनाची ही प्रक्रिया बालपणी अभ्यासाच्या भीतीदायक वातावरणातून सुरू होते. गोष्टीच्या पुस्तकांपासून, वयाच्या सहाव्या वर्षापासून झाली व ती आजतागायत चालू आहे. मला लहानपणापासूनच मेंदूला चालना देणारी पुस्तके वाचायला आवडतात. कै. व. कृ. जोशींच्या पोलीस चातुर्यकथा तसेच शेरलॉक होम्स च्या सर्व रहस्यमय शोधकथांचे मी अनेकवेळा पारायण केले आहे. त्यानंतर पेरी मॅसन, हर्क्युलस पायरो हे गुप्तहेर माझ्या वाचनात आले. याच उत्साहाने मी 'सीआयडी' सारख्या दूरचित्रवाणीवरील मालिकाही बघतो. तणावापासून मुक्त होण्यासाठी हलकेफुलके वाचनही करतो. अशा वाचनासाठी वर्तमानपत्रे हे एक उत्कृष्ट साधन आहे, कारण सध्या वर्तमानपत्रात येणाऱ्या ९०% गोष्टी या विसरून जायच्या असतात. पण शनिवार, रविवारच्या पुरवण्या त्याला अपवाद आहेत.

पुलं, आचार्य अत्रे आणि चिं. विं. जोशी यांचे विनोदी लेखन जरी जुने असले तरी मी आवर्जून वाचतो. प्रचलित लेखकांत बाळ गाडगीळ, मुकुंद टांकसाळे, मंगला गोडबोले, शिरीष कणेकर, द्वारकानाथ संझगिरी हे माझे सध्याच्या पिढीतले आवडते लेखक.

माझ्या व्यावसायिक ज्ञानप्राप्तीसाठी मी अनेक मासिके वाचतो. त्यात डेटाक्वेस्ट, फॉर्च्यून, लिव्हिंग डिजिटल, पी. टी. क्वेस्ट, बिझनेस इंडिया सारख्या मासिकांचा मी वापर करतो. मला कामानिमित्त सतत प्रवास करावा लागतो. या प्रवासामुळेच माझा वाचनवेगही वाढलेला असतो. इंटरनेटचा वापर करून अनेक वेबसाईट मी सतत वाचत असतो.

एक पुस्तक गेल्या अनेक महिन्यांत मी अनेक वेळा वाचले आहे ते म्हणजे 'फाईंडिंग स्ट्रेन्थ इन डिफिकल्ट लाईन' हे पुस्तक 'डेव्हिड व्हिस्कॉट' यांनी लिहिले आहे. यातील अनेक अर्थगर्भ वाक्यांचा मी कळत-नकळत चाहता झालो आहे. तसेच 'इग्निटेड माईंड' हे आपल्या विद्यमान राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचे पुस्तकही खूप भावले. देशातील हजारो विद्यार्थ्यांना उपदेश व भाषणे करताना आलेल्या अनुभवातून हे पुस्तक लिहिले गेले आहे. या पुस्तकातून डॉ. कलाम यांच्या स्वभावातील वेगळीच बाजू दिसते. आणि ते म्हणजे ते महत्त्वाकांक्षी भावूक व दूरद्रष्टे वाटतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक धड्याचा शेवट हा आपल्याला वेगळीच अनुभूती देऊन जातो. त्यामुळे आपल्या देशाचे भवितव्य उज्ज्वल कसे बनवू शकतो हे कळते. मला असे वाटते की देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या अभ्यासिकेत या पुस्तकाची एक तरी प्रत असायलाच हवी. आणि प्रत्येक राजनेता, उद्योगपतीच्या टेबलावरही हे पुस्तक असलेच पाहिजे. यातील एक वाक्य फार प्रभावी आहे ते म्हणजे, attitude of candle in all our citizen to make india into a great nation.

असेच एक दुसरे पुस्तक म्हणजे विक्रम सेठेचे 'द गोल्डन गेट'. लेखक स्वत: अमेरिकेत रहात असल्याने तिकडच्या युवापिढीचे विचार, राहणीमान त्यांना व्यवस्थितपणे मांडता आले आहे. हे पुस्तक काव्यात्मक आहे. पाश्चात्त्य युवा पिढीच्या आयुष्यातील नोकरीच्या ठिकाणी असलेल्या, त्यांच्या वेगवेगळ्या नात्यांमधील समस्या दर्शवतात. एकदा वाचावयास सुरुवात केली की हे पुस्तक मध्येच ठेववत नाही. जसे जसे एक पान वाचतो तसे तसे त्यात अधिक गढून जातो.

विक्रम सेठ यांचे दुसरे एक पुस्तक मला आवडते ते म्हणजे 'टू लाइव्हज्'. या पुस्तकात त्यांनी त्यांच्या काका व काकूच्या आयुष्याची कथा सांगितली आहे. पुस्तक सुरू होते ते विक्रम सेठ यांच्या काकांच्या इंग्लंडमध्ये येण्यापासून त्यांचा पाश्चात्य देशात राहण्यासाठीचा संघर्ष, एका विदेशी मुलीशी लग्न, त्यांच्या पत्नीसोबतचे नातेसंबंध, मुलं नसल्याने होणारा मानसिक त्रास या बाबींचे वर्णन केले आहे. या पुस्तकातून विक्रम सेठ यांचे काकांसोबत असलेले जिव्हाळ्याचे नातेही स्पष्ट होते.

आणखी एक असेच पुस्तक नुकतेच माझ्या वाचनात आले ते म्हणजे 'शांताराम'. ग्रेगरी रॉबर्ट यांनी लिहिलेले. ही लेखकाची स्वत:ची कथा आहे. यात ते ऑस्ट्रेलियाच्या कैदेतून पळ काढून भारतात कसे आले, मुंबईच्या झोपडपट्टीत राहून ते हिंदी व मराठी कसे शिकले, त्यांच्या आत्मबलाने व जीवनाबद्दलच्या सकारात्मक दृष्टिकोनामुळे ते जीवनात कसे यशस्वी झाले ते वर्णन केले आहे. या पुस्तकामुळे एक गोष्ट कळते की एखादा गुन्हेगार स्वत:च्या सकारात्मक विचाराने खूप काही चांगले करू शकतो.

'द मोन्क हू सोल्ड हिज फेरारी' या रॉबिन शर्मा यांच्या पुस्तकानेही माझ्यावर खूप प्रभाव टाकला. हे पुस्तक वाचल्यावर आपला आपल्या जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोनच बदलतो. प्रत्येक गोष्ट, वाक्य अशा काही सहजतेने मांडली आहेत की पुन: पुन्हा पुस्तक वाचावेसे वाटते. आपण आयुष्यातील समस्यांकडे वेगळ्या अर्थाने बघायला लागतो. मग ती समस्या एक समस्या रहात नाही तर ती एक ध्येय होते.

**नाव** : **डॉ. दीपक शिकारपूर**
**पत्ता** : २५, स्वप्नशिल्प, गांधी लॉन्सपुढे, कोथरूड, पुणे ४११०३८
**शिक्षण** : मेकॅनिकल इंजिनिअर (वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग)

**व्यवस्थापकीय जबाबदाऱ्या :**

* संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, ॲटोलाईन डायमेन्शन्स इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड,पुणे
* संचालक, माहिती तंत्रज्ञान उपसमिती, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर, पुणे
* संचालक, कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया
* संचालक, संगणकीय व्यवस्थापन विभाग, पुणे विद्यापीठ
* अध्यक्ष, पुणे रोटरी क्लब

**विशेष पुरस्कार :**

* १९९२ सालच्या 'वर्ल्ड सॉफ्टवेअर कॉन्फरन्स' साठी भारतातर्फे विशेष निमंत्रित
* १९९९ साली 'आयटी मॅन ऑफ द इयर' म्हणून निवड
* 'सायन्स काँग्रेस, पुणे' तर्फे नोबेल पुरस्कार विजेते आणि जगातील वरिष्ठ शास्त्रज्ञांच्या परिषदेत हजेरी. सदर परिषदेत तीन स्वतंत्र व्याख्याने दिली.
* माहिती तंत्रज्ञानावरील सात मराठी पुस्तकांना राज्य सरकारचे पारितोषिक
* २००५ साली मराठी विज्ञान साहित्यासाठी 'वीर सावरकर पुरस्कार'




# अंतरिक्षाचा वेध

**सुधा रिसबूड**

डॉ. कार्ल सॅगन यांच्या अत्यंत गाजलेल्या 'कॉसमॉस' या विज्ञानावरील सुरस पुस्तकाचा परिचय घडवणारे पुस्तक

१५०रु

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**पोस्टेज ३०रु.**

# माझा वाचन प्रवास




डॉ. समीर नारायण मोने

## विचारांना आणि मूल्यांना प्रगल्भता देणारी वाचनयात्रा

माझा वाचनप्रवास सुरू झाला तो अगदी नकळत, आवड, छंद म्हणून नव्हे तर गरज म्हणून. लहानपणी अतिशय आजारी असल्यामुळे अगदी जन्मापासूनच सुरुवातीच्या खेळण्याबागडण्याच्या व नंतर शाळेच्या वेळात जास्तीत जास्त अंथरुणालाच खिळलेला असल्यामुळे, झोपल्या झोपल्या वेळ घालवण्याचे एखादे साधन आवश्यक होते.

तीस वर्षांपूर्वीच्या त्या काळात टी.व्ही. नसल्यामुळे, किमान मध्यमवर्गीयांच्या घरात न पोहोचल्यामुळे, आजारी मुलाला वेळ घालवण्यासाठी पुस्तके हेच एक सोयीचे साधन होते. त्यामुळे पाच-सहा वर्षांच्या वयातच अक्षरओळख झाल्या झाल्या माझी वाचनयात्रा सुरू झाली. बाकी प्रगती मंद असली तरी वाचायला मात्र मी लवकर शिकलो. त्या वेळी सुरू झालेल्या त्या प्रवासाचे आनंदयात्रेत कधी रूपांतर झाले; गरज छंदात, आवडीत कधी बदलली ते कळलेही नाही. अजूनही तो प्रवास चालूच आहे... चालूच राहील.

वडिलांनी कसलीही बंधनं न ठेवता, कुठलेही मार्ग न आखता, माझे बोटही न धरता मला या गर्द जंगलात सोडून दिले. न बोलता त्यांनी मला दाखवून दिले, सांगितले की कसलेही पूर्वग्रह बाळगू नकोस. चाकोरीबद्ध काही करू नकोस. निम्नमध्यमवर्गीय घरातून आलेला मी पानात पडेल ते खायचे या संस्काराप्रमाणेच समोर येईल ते, परवडेल ते वाचत गेलो. स्वत:च निवड करत गेलो.

वडील फार श्रीमंत नव्हते. नवीकोरी पुस्तके आवर्जून विकत घेऊन देणे परवडण्याजोगे नव्हते. परंतु त्यांच्याकडे दूरदृष्टी होती. समृद्ध पुस्तक ग्रंथालयांचे ते सभासद होते. तिथून व जुन्या पुस्तक बाजारातून, जिथून मिळेल तिथून त्यांनी नानाविध प्रकारची पुस्तके आम्हा भावंडांपर्यंत – माझ्यापर्यंत पोहोचवली. जी पुस्तके प्रत्यक्ष पोहोचवणे शक्य नव्हते, ती मौखिक परंपरेने त्यांनी माझ्याकडे सोपवली.

हॅन्स ॲन्डरसन, ग्रिम बंधूंच्या परीकथांतून माझ्या वाचनाची सुरुवात झाली खरी, पण नंतर त्याला नानाविध फाटे फुटले. अमर चित्रकथेचा सुवर्णकाळ होता तो. चाणक्य, हर्षवर्धनापासून पृथ्वीराज, शिवाजीपर्यंतचा संपूर्ण चित्ररूप इतिहास गोष्टीस्वरूपात माझ्यापर्यंत आला आणि तो नेहमी सुरसच राहिला. कंटाळवाणा झाला नाही. कुमार, किशोर या बालमासिकांबरोबरच फुलबाग, एकलव्य, पिनाशिओ, (करामती पिट्टू) सारख्या वाङ्मयाचा माझा परिचय होत गेला. अर्थात या गोष्टी सहज घडत नव्हत्या. कधी एखादा मधला अंकच मिळायचा नाही. कधी पाने फाटलेली असायची तर कधी पुढच्या अंकानंतर मागील अंक हाती यायचा. यातून कथानकाचे सूत्र चुकवताना माझी कल्पनाशक्ती मात्र चांगलीच वापरली जायची. त्यामुळे आजही कल्पनाहीन अशा सीरियलचा कुठलाही भाग कुठूनही पाहिला तरी मला कथानक जाणून घ्यायला कसलीही अडचण येत नाही.

या बालमासिकांच्या बरोबरीनेच चांदोबा, इंद्रजाल कॉमिक्स, मँड्रेक, वेताळ (फॅन्टम) आणि विक्रम-वेताळाच्या अद्‌भुत दुनियेत मी तासन्‌ तास गुंग होऊन जाई.

त्याच सुमारास माझा परिचय झाला तो सानेगुरुजी आणि शेक्सपिअरशी. श्यामच्या आईच्याही अगोदर गोड गोष्टी मला सामोऱ्या आल्या. मनूबाबा, दु:खी हे जागतिक साहित्य आहे याचा पत्ताही माझ्या मनाला लागला नव्हता. अंथरुणात पडून, अश्रू गाळून मन मोकळे करण्याचे महत्त्वाचे काम मात्र या पुस्तकांनी केले. त्याची खरी थोरवी काही वर्षांनी मला जाणवली, पण त्याचमुळे कसलेही दडपण न घेता मी त्यांचा आस्वाद घेऊ शकलो, हे श्रेय सानेगुरुजींचे. अगदी पुढे 'ला मिझराब्ल'चा भा. रा. भागवतकृत अनुवाद वाचतानाही माझ्या डोळ्यांसमोर सतत येत होते ते छोटेसे दु:खी पुस्तक. शेक्सपिअरशीही त्याच्या दडपणाशिवाय ओळख झाली तीही, अशीच. आपटे यांनी कथारूप शेक्सपीअर अशी छोटी छोटी पुस्तके मराठीत काढली होती. प्रत्येक पुस्तकात शेक्सपिअरच्या एका नाटकाची कथा थोडक्यात मांडली होती. त्यामुळेच 'रोमिओ ॲन्ड ज्युलिएट', 'ऑथेल्लो', 'हॅम्लेट', मर्चंट ऑफ व्हेनिस'ची मला ओळख झाली.

या काळात खऱ्या अर्थानी माझ्या जाणिवा समृद्ध केल्या त्या भागवतांनीच. बालमित्र मधून येणारे त्यांचे विविध अनुवाद, मला विलक्षण मोहित करून गेले. Twenty Thousand Leagues Under the Sea या त्यांच्या क्रमश: येणाऱ्या अनुवादित कादंबरीने आमच्या सगळ्या पिढीलाच वेड लावले होते. Alice in Wonder-land, Wizard of oz यासारख्या बाल-प्रौढ कादंबऱ्यांचे मर्म त्यांच्यामुळेच मला कळले. बालपणी त्यातील अद्‌भुतरम्यताच जाणवली, पण आज मोठेपणी त्यातील प्रौढताही भावते. याचे श्रेय भा. रा. भागवतांचेच. निव्वळ मनोरंजनासाठी त्यांचे बिपिन बुकलवार आणि फास्टर फेणे सारखे मानसपुत्र होतेच.

असाच मी वाचत गेलो, वाचत गेलो, वाचतच गेलो. नानाविध पायवाटा एकत्र मिसळून महामार्ग बनत गेला. मनाला कधी कधी खंत वाटायची की झाडी विरळ होत चालली आहे आणि इमारती वाढत चालल्या आहेत की काय? पण नंतर जाणवले की बदल तर अपरिहार्यच आहेत, पायवाटांचे राजमार्ग होणारच आहेत. झाडे

गेली आणि इमारती वाढल्या तरी चालेल, पण त्या अस्ताव्यस्त नसाव्यात. सुबक, रेखीव असाव्यात एवढेच.

महासागराच्या काठाशी मी डुबक्या घेत होतो, घेत आहे. खोल पाण्यात जाण्याची भीतीच वाटते. पण काठावर सुद्धा जोरदार लाटा अनेक वेळा अंगावर कोसळतातच. थरकाप उडतो जीवाचा. प्रमत्त लाट अंगावर घेताना मजाही वाटते. त्या काळात अधाशासारखे वाचताना असेच होत होते. अनेक पुस्तके अंगावर कोसळत होती. मनाला भिडून जात होती, उमेद देत होती, कधी भेडसावत होती, पण स्पर्श करून जात होती. पुस्तकातील जग आपले स्वत:चे आहे असे भासणारे वय होते ते. प्रत्येक पुस्तक गुरफटवून घेत होते स्वत:मध्ये. मग 'चौघीजणी' वाचताना तिच्यात आपल्या भावंडांची स्वभाववैशिष्ट्ये मिसळून जात होती. त्या चौघीत लिंगाचाही विचार न करता कधी ॲमी तर कधी बेथ होत होतो मी! न कळत्या वयात शरदबाबूंच्या श्रीकांत बरोबर हिंडत होतो. नदीच्या प्रवाहात इंद्रनाथ बरोबर. देवदासच्या दु:खाच्या खोलीचा अंदाजच लागत नव्हता, तर चरित्रहीन, काही कळतच नव्हतं त्या वयात, रवींद्रनाथांच्या क्षुधित पाषाणांनी अंगावर सरसरून भयाचा काटा येत होता, तर वीरधवल, शशी भागवतांच्या कादंबऱ्यातील अद्‌भुततेने रोमांच उभे रहात होते. प्रत्येक पुस्तक वैयक्तिक अनुभव देत होते.

वय वाढत गेले तसतशी ती अनुभूती कमी होत गेली. एक तटस्थता येत गेली. वाचक म्हणून त्रयस्थ नजरेने वाचायला शिकलो मी! हे चांगले की वाईट... माहीत नाही...

नवनवी पुस्तके येत होती, वाचली जात होती. काही आवडत होती, काही आवडत नव्हती. खोल समीक्षेत मात्र मन घुसायला तयार नव्हते... अजूनही नाही. पुस्तक चांगले किंवा वाईट असे दोनच प्रकार मानले जायचे. पुस्तक हातात धरल्यानंतर, काही वेळाने कंटाळवाणे वाटले तर ठेवून देत असे. पण काळ शिकवत गेला. काही पुस्तके चमकदार भुईनळ्यासारखी असतात. दोन मिनिटे जोरदार झगमगतात त्यानंतर काही नाही. मात्र काही मेणबत्तीप्रमाणे शांत जळत राहतात. सतत मिणमिणता प्रकाश देत. काही मात्र ट्यूबलाईटप्रमाणे, कधीही लावा, झगझगीत प्रकाश देतात. अखंड, अविरत, पुन्हा धुराचा त्रासही नाही. या काळात मी शिकलो की काही पुस्तके नेटाने वाचावी लागतात. मग मात्र ती मनाच्या गाभाऱ्यात अखंड दरवळत राहतात. डोस्टोव्हस्कीची इडियट, ब्रदर्स कारामोझोव्ह ही अशी पुस्तके. नकळत्या वयात न आवडलेले जी.ए. काही काळाने भावून जातात आणि लक्षात येते त्या वेळी आपण अपरिपक्व होतो. ते लिखाण आपल्याला झेपत नव्हते. आता पेलू शकतोय हे खरे. अजूनही हा प्रवास चालूच आहे.

त्या त्या वयात ती ती पुस्तके आवडत गेली, देवस्वरूप पावली. पण काही काळाने संदर्भ बदलल्यावर ती त्या काळची आवडती पुस्तके म्हणून उरली. त्यांचे देवत्व लोप पावले. मात्र काही पुस्तके ध्रुवताऱ्यासारखे अढळ स्थान मिळवून बसली. त्यांच्यात क्रम लावणेही अवघड. जी.एं.ची स्वामी ही कथा, काजळमाया अखंड पुस्तक, जॉर्ज ऑरवेलचे १९८४ (कुठेतरी मनात स्वामी - जी.ए. - त्याचे साधर्म्य साधले जाते) मॉमच्या विशिष्ट कथा आणि Up on the Villa ही अप्रतिम कादंबरी, युद्धाचे वैफल्य प्रथमच जाणवून देणारी हेमिंग्वेची For Whom The Bell Tolls, मनाच्या सगळ्या नाजूक भावनांचा नाश करणारी विल्यम गोल्डींगची Lord of the Files ही कादंबरी तसेच तेंडुलकरांची 'शांतता कोर्ट चालू आहे' व 'गिधाडे' यांसारखी नाटके. हेन्री डेंकरचे विद्रोह (Out-rage) सारखे पुस्तक पुन्हा जगण्याचे बळही देते; पण सतत मनात रेंगाळत राहते ते, जीवनरस पुरवते ते, मार्जोरी किनन रोलिंग्जचे 'द यर्लिंग' हे पुस्तक ( अर्थात श्री. राम पटवर्धन कृत 'पाडस' हा त्याचा अनुवाद.) जीवन हे सुंदर आहे पण सोपे नाही हे वास्तव अगदी सहजतेने माझ्यावर बिंबवले त्यांनी. त्या पुस्तकांनी दिलेली दुसरी शिकवण मला आज जास्त मोलाची वाटते, म्हणजे वयानुसार तुमचे संदर्भ बदलत जातात, तुमची उद्दिष्टे बदलतात. तुमचा भाबडेपणा जाऊन तुम्ही परिपक्व बनता हा त्यातून मिळणारा संदेश. पण परिपक्वतेची एवढी किंमत योग्य आहे का? आणि परिपक्वता आवश्यक असली तरी आदर्श आहे का?... असे प्रश्नही ते पुस्तक निर्माण करते.

पुस्तकांनी मला खूप काही दिले. माझ्या मनावर खोलवर परिणाम केला. आपले विचार, मूल्ये तपासून बघण्याची दृष्टी दिली. आयुष्यावर आपली मुद्रा उमटवली आहे या वाचनयात्रेने. आज नाटक, सिनेमा बघताना सुद्धा प्रथमत: जाणवते ते त्यातील कथानक, सूत्रबद्धता आणि मग त्या अनुषंगाने अभिनय व इतर गोष्टीं. वाचनाच्या प्रभावामुळेच की काय पण 'गाईड' या चित्रपटाचा सन्माननीय अपवाद वगळता मला कादंबऱ्यांवर आधारित चित्रपटांपेक्षा मूळ कादंबऱ्याच अधिक प्रभावशाली वाटल्या. मग ती दळवींची 'चक्र' असो, खानोलकरांची 'चानी' असो वा पास्तरनाकची 'डॉ. झिवॅगो' असो. कदाचित कादंबऱ्या वाचताना माझ्या मन:पटलावर जो चित्रपट चालू असतो, तो माझा स्वत:चा असतो. त्यामुळे दुसरा दिग्दर्शक माझ्यात आणि कादंबरीत लुडबुडतोय अशी माझी भावना असावी... हा वाचनाचा परिणाम.

पूर्वी खंत वाटत असे की आपण इंग्रजी खूपच कमी जवळजवळ नाहीच वाचले. अनुवादित साहित्यच मी खूप वाचले... वाचतो. तसंच दुसरी एक खंत म्हणजे नियोजनपूर्वक काही वाचले नाही याची. पण नंतर या तक्रारी दूर होत गेल्या. कारण प्रत्येक माणूस आपले प्रतल आखत असतो, त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे. अथांग आभाळ बाहेर पसरलेले आहे. माझ्या नजरेच्या कवेत ते संपूर्ण येणे शक्यही नाही. त्यामुळे माझ्या खिडकीतून दिसणारा, माझ्या नजरेच्या टप्प्यात सामावणारा आभाळाचा तुकडा हेच माझ्यापुरते माझे आभाळ. तो तरी आनंद निर्भेळपणे घ्यावा हेच खरे! माझी वाचनानंद यात्रा माझ्या मर्यादेत माझ्या कुवतीनुसार अशीच आयुष्यभर चालू राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**डॉ. समीर नारायण मोने**
१६ ब हनुमाननगर, पुणे म्यु. सेवक वसाहत,
सेनापती बापट रोड जवळ, पुणे ४११ ०१६.
फोन नं. (०२०) २५६७४११३



## द्वितीय क्रमांक

**प्रभाकर कर्वे**

# अनुवाद वाचून मूळ इंग्रजी पुस्तके वाचण्याकडे वळलो

**सा**धारणपणे वयाच्या बाराव्या-तेराव्या वर्षी मी वाचनास प्रारंभ केला. आता वयाची साठी झाल्यानंतरही माझे वाचन चालूच आहे. पुण्याला, जुन्या वाड्यात, माझे लहानपण गेले. साहजिकच वाड्यातल्या सर्वच घरांमध्ये मुलांना प्रवेश असायचा आणि अशाच एका वाचनवेड्या घरात माझे वाचन सुरू झाले. या घरातील गृहस्थांना पुस्तके विकत आणून वाचायचा छंद होता. त्यामुळे, आर्थिकदृष्ट्या परवडत नसतानाही, इतर गरजांकडे दुर्लक्ष करून हे गृहस्थ तऱ्हेतऱ्हेची पुस्तके विकत आणीत. त्यामध्ये, कथा, कादंबऱ्या, नाटके, प्रवासवर्णने, आत्मचरित्रे नि चरित्रे, इत्यादी सर्वच प्रकार असत. हाताशी भरपूर वेळ असल्याने मी त्यांच्या घरात सतत वाचीत बसे आणि तेथूनच माझ्या वाचनाचा प्रवास सुरू झाला, तो आजही सुरू आहे.

आत्तापर्यंत वाचलेल्या पुस्तकांची संख्या काढल्यास ती शेकड्यांनी सहज भरेल. एखाद्या वाळवीसारखाच मी पुस्तके खात असे, असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही.

वयाच्या तेविसाव्या वर्षी मी नोकरीला लागलो आणि तेथून वाचनालयाच्या पुस्तकांबरोबरच मी आवडणारी पुस्तके तसेच आवडणाऱ्या लेखकांची पुस्तके विकत घेण्यास सुरुवात केली. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी सवलतीच्या दराने तीन रुपयात घेतलेली 'स्वामी' ही कादंबरी आणि सहा रुपयांना घेतलेले 'व्यक्ती आणि वल्ली' आजही माझ्याजवळ आहे. तरुण वयात जी पुस्तके आवडली व काही काळ संग्रही बाळगली. अभिरुची बदलल्याने तसेच जागा नसल्याने १२५/१५० पुस्तके वाचनालयांना देणगीदाखल देऊनही आज माझ्याजवळ ३००/३२५ पुस्तके आहेत. त्यामध्ये मला आवडणारी अनेक पुस्तके आहेत, ती मी वारंवार वाचत असतो.

इतकी पुस्तके वाचल्यानंतरही दशांगुळासारखे उरून माझ्या मनावर अधिराज्य करणारे पुस्तक म्हणजे गो. नी दांडेकरांचे 'कर्णायन' हे पुस्तक होय. स्वत: वारंवार वाचून व आग्रहाने इतरांना वाचण्यास देऊन हे पुस्तक जीर्ण होत राहिले. माझ्या घरात या पुस्तकाची पाचवी प्रत मी आता वापरत आहे.

पु.ल., रणजित देसाई, ब. मो. पुरंदरे, गो. नी. दांडेकर, भा. रा. भागवत, द. मा. मिरासदार इत्यादी लेखकांची जास्तीतजास्त पुस्तके मी वाचली आहेत. झपाटून टाकणाऱ्या कवींमध्ये बोरकर, सुरेश भट, ना. घ. देशपांडे, सुधीर मोघे, मंगेश पाडगावकर इत्यादी कवीही येतात. त्यांच्या कविता मी माझ्या संग्रही स्वहस्ताक्षरात लिहिलेल्या आहेत.

इतरही अनेक लेखकांच्या पुस्तकांनी मला रिझवले आहे. माझ्या वाचन-आनंदात भर घातलेली आहे. यापैकी काही पुस्तके अशी – १) राब - अनंत मनोहर २) वाटचाल - अनंत मनोहर ३) मर्मभेद - शशी भागवत ४) वृक्षगान - शरदिनी डहाणूकर ५) नदीकाठी - वासंती मुजुमदार ६) स्पर्शकमळे - आनंद यादव ७) ज्ञानेश्वरीचे भावविश्व - श्री. गुणे ८) रुपोत्सव - अरुणा ढेरे ९) महानायक - विश्वास पाटील १०) एक होता कार्व्हर - वीणा गवाणकर ११) लव्हाळी - श्री. ना. पेंडसे १२) संस्कृतीच्या पाऊलखुणा - राजलक्ष्मी देशपांडे १३) पूर्णत्वाचे प्रवासी - शरद कुलकर्णी १४) डोह - श्रीनिवास कुलकर्णी १५) बलुतं - दया पवार १६) मी आणि माझा बाप - नरेन्द्र जाधव १७) मयूरपंख - ब्रह्मानंद देशपांडे १८) असा हा गोमंतक - माधव गडकरी १९) लोकरंग - डॉ. सरोजिनी बाबर २०) सारे प्रवासी घडीचे - जयवंत दळवी २१) आर्य - वसंत पटवर्धन २२) उद्या काय झालं - (सं) बाळ फोंडके २३) बांधला परिसर सारा - प्रकाश पाठक २४) मेघदूत (मराठी) - बा. भ. बोरकर

एकीकडे अशा तऱ्हेने माझे वाचन चालू असता मी काहीसा इतरांच्या साहित्यसेवेलाही हातभार लावला आहे असे म्हणता येईल. मी केलेले साहित्यविषयक काही उपक्रम थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष वाचक चळवळीत मी भाग घेतला नसला तरी काही ना काही समाजोपयोगी कृती माझ्या हातून झाली, ती अशी –

१) नोकरीचे सुरुवातीस मी ज्या कार्यालयात काम करीत असे तिथे मी एक सर्क्युलेटिंग वाचनालय चालू केले. माझ्यासह १२ सभासद या उपक्रमात सहभागी झाले होते. हा उपक्रम चारपाच वर्षे म्हणजे माझी बदली होईपर्यंत चालला. या चारपाच वर्षांत माझ्या व अन्य अकरा घरांत प्रत्येकी २५/३० मराठी पुस्तकांची भर पडली, हाच त्यातला महत्त्वाचा फायदा होय.

२) वाशी, नवी मुंबई येथे गेली काही वर्षे माझे वास्तव्य आहे. येथील एका वाचनालयात काही वर्षे सभासद होऊन दिवाळी अंक वाचल्यावर एका वर्षी मी एक उपक्रम केला. वाचनालयात जाऊन, सर्व आवश्यक माहिती मिळवून मी त्या माहितीचे विश्लेषण करून एक अहवाल तयार केला. त्यामध्ये वाचनालयातील एकूण दिवाळी अंक, प्रत्येक अंक एकूण किती सभासदांनी नेला, किती

**पान नं.१४९ वर...**



## तृतीय क्रमांक

**अर्चना ठोके**

# विशिष्ट विचार, पंथ वा प्रवाह यांचा विचार न करता विविध लेखकांच्या कलाकृतींचा आस्वाद घेण्याची प्रवृत्ती

**वाचन प्रक्रिया :**

''You read without reflecting, is like
eating without digesting.'' [BURKE]

अगदी थोडक्यात पण अचूक शब्दांत लेखकाने वाचण्याच्या प्रक्रियेतील असे मर्म सांगितले. आपण जे वाचन करतो ते आपल्या अभिव्यक्तीतून व्यक्त होणे अभिप्रेत असते. वाचनातील एकाग्रता, समरसता आणि विविधता व्यक्तीच्या बोलण्यातून, लिहिण्यातून आणि वर्तनातून परावर्तित होत असेल तर त्या वाचनप्रक्रियेला एक सुंदर परिमाण लाभले असे म्हणता येते. 'माझा वाचनप्रवास' या विषयावर मनोगत मांडत असताना मी तर असे म्हणेन :

''नाव, गाव, वय, काम ही देहाची ओळख आहे
शब्द माझे, काव्य माझे मम आत्म्याची गाज आहे.''

मला माझ्या अभिव्यक्तीचा आणि लेखनकलेचा सूर गवसला तो माझ्या वाचनातून. वाचनाची आवड निर्माण होण्याचे मूळ कारण म्हणजे कुटुंबाची गरिबी. ज्या वयात मुलामुलींमध्ये असंख्य छंद-फंद निर्माण होतात, निरनिराळ्या कला जोपासण्याची उर्मी उत्पन्न होते किंवा क्रीडा, अभिनय, गायन, वादन, चित्रकला अशा क्षेत्रांत कारागिरी करण्याची उत्सुकता असते त्या वयात माझ्या वाट्याला घरगुती काम आणि शाळा एवढंच येऊ शकलं. शालेय जीवनात अभ्यासाची व काही शालेय वाचनालयाची पुस्तके वाचनात आली. त्यात नाथमाधवांची स्वराज्यावरील पुस्तकांची मालिका उदा. स्वराज्याचा श्रीगणेशा, स्वराज्याचे तोरण इ. आणि सावळ्या तांडेल ही पुस्तके स्मरणात राहिली. राष्ट्रप्रेम, स्वराज्य आणि वीर रसाची ओळख या पुस्तकांनी करून दिली.

**वाचनाचा शुभारंभ :**

इयत्ता नववीची परीक्षा दिल्यानंतर वाचनासंदर्भात माझ्या जीवनात एक चमत्कार झाला. माझ्या मातोश्री नव्याने भांडुपच्या 'कस्तुरी हायस्कूल'मध्ये शिक्षिका म्हणून रुजू झाला. एक वर्षाचा सेवाकाल पूर्ण झाल्याने मे महिन्यात शाळेच्या वाचनालयातील पुस्तके घरी नेण्यास अनुमती होती. मला झपाटून टाकणारे पहिले पुस्तक म्हणजे छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या जीवनावरील रणजित देसाई यांची कादंबरी 'श्रीमानयोगी'. या कादंबरीने पर्यायाने लेखकाने मला झपाटून टाकले. ''माणसाला थोडे यावे पण त्याला तोड नसावी'', ''तलवारी मागायच्या नसतात त्या जिंकूनच आणायच्या असतात हे सत्य आहे पण जिंकायच्या असतात त्या शत्रूच्या तलवारी, भावाच्या नव्हेत.'' किंवा ''यशाचे कौतुक सारेच करतात पण अपयश आले की बोल मोजक्यांनाच लागतात...'' अशा अनेक वाक्यांतून श्रीमंत संस्कार या कादंबरीने केले. भाषेतील प्रासादिक गोडवा, वर्णनातील जिवंतपणा आणि श्रीमंत राजाचे विरक्त योग्याचे रूप श्रीमान योगीतून अनुभवले. यानंतर रणजित देसाई हे माझे कायम आवडते लेखक राहिले. 'स्वामी', 'राधेय', 'पावनखिंड', 'गंधाली' अशी अनेक पुस्तके मी वाचतच राहिले. पुढील कालखंडात अनेक लेखकांच्या साहित्यकृतीनी वेड लावले. पण वयाच्या चौदाव्या वर्षी 'श्रीमान योगी'ने वाचनप्रवासाचा जो श्रीगणेशा झाला तो एक दुग्धशर्करा योग ठरला. मला लेखनाची प्रेरणा मिळाली ती इथूनच!

**वाचनाच्या कक्षा :**

ऐतिहासिक पुस्तकांचे कथानक, तत्कालीन संस्कृती व राहणीमान यांची चित्रणे व प्रासादिक भाषा यामुळे ती पुस्तके विस्मरणात जात नाहीत. उदा. शिवाजी सावंतांचे 'मृत्युंजय' व 'छावा', ना. स. इनामदारांचे 'शहेनशहा', विश्वास पाटीलांची 'पानिपत' इ. या साऱ्या पुस्तकांनी मनावर मोहिनी घातलीच आहे. या पुस्तकांच्या माध्यमातून इतिहासाचे दर्शन घडविले जाते. याचा अर्थ मी इतिहासातच रमले असा मात्र नाही हं! शाळा आणि महाविद्यालयीन जीवनाच्या दिनक्रमात मला आणखी एका लेखकाने झपाटले ते म्हणजे वि. स. खांडेकर. खांडेकरांच्या सर्व कादंबऱ्या मी वाचल्या. 'हिरवा चाफा', पहिले प्रेम', 'ययाती', 'अमृतवेल', ' आणि 'अश्रू' ही कायम स्मरणात राहिलेली त्यांची ग्रंथसंपदा. 'ययाति'ने तर वेड लावलेच पण ''संसार हे दारूपेक्षाही भयंकर व्यसन आहे'' हे अश्रूमधील त्यांचे वचन ठायी ठायी प्रत्ययाला येते. 'अमृतवेल'मधील देवदत्त आजही आपल्या आजूबाजूला वावरताना दिसतात. खांडेकर वाचत असताना मी 'युगंधरा' नावाची कादंबरी वाचली. ती पूर्ण झाल्यावर मी ओक्साबोक्शी रडले. माझ्या व्यक्तिरेखेत व युगंधरामधील स्त्री व्यक्तिरेखेत काही साधर्म्य असावे म्हणून किंवा टोकाची शोकांतिका होती म्हणून असेल म्हणा, पण 'युगंधरा'सारखी कादंबरी पुन्हा न वाचण्याचा मी निर्णय घेतला व तो आत्तापर्यंत पाळला.

यानंतरच्या वाटचालीत मी कथा, कादंबऱ्या, कवितासंग्रह, नाटके व ललितगद्य यांचे बरेच वाचन केले. पु. ल. देशपांडे, वि. वा. शिरवाडकर, ना. सी. फडके, शांता शेळके, सुमती क्षेत्रमाडे, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, योगिनी जोगळेकर, गौरी देशपांडे इ.

**विविध विषयांचे वाचन :**

मुळात 'साहित्य' हा माझा पिंड पण शिक्षणात मी वाणिज्य व कायदा शाखा निवडल्या त्यामुळे मराठी/हिंदीशी माझी फारकत झाली. पुस्तके वाचायला वेळ मिळेनासा झाला. तरीही मी पुस्तक वाचन चालू ठेवले. जॉर्ज ऑरवेल्चे 'Animal Farm' मला विलक्षण वाटले. प्रेमचंदची 'गोदान', 'बडे घर की बहू' मला हृदयस्पर्शी वाटली. अमृता प्रीतमचे 'रसिदी तिकट' तर एक आगळाच अनुभव देऊन गेले. वाचन हा छंद म्हणून मी जोपासला असला तरी वयोमानानुसार मी मनन, चिंतन करू लागले. अभ्यास आणि चिंतन या दृष्टिकोनातून 'नाच ग घुमा' व 'असं म्हणू नकोस' ही माधवी देसाईंची पुस्तके, सुनीता देशपांडेंचे 'आहे मनोहर तरी' आणि कांचन घाणेकरांचे 'नाथ हा माझा' ही पुस्तके जवळची वाटली. स्त्री लेखिका आपले मनोगत व्यक्त करताना किती भान ठेवतात आणि आत्मकथनाशी त्या किती प्रामाणिक असतात हे जाणवले.

स्त्री लेखिकांमध्ये शांता शेळके यांनी विविध प्रकारचे लेखन केल्याचे अनुभवास आले. त्यांचे 'मदरंगी', 'एकपानी' हे ललित गद्य 'जपानी हायकू'चे मराठी रूपांतर ही फार वेगळ्या ढंगाची पुस्तके होती. 'सांगावेसे वाटले' म्हणून या त्यांच्या पुस्तकात पं. जवाहरलाल नेहरूंचे एक वचन त्यांनी उद्धृत केले होते. 'तुमच्या सहवासात आलेल्या कुठल्याही माणसाला अवघडल्यासारखे वाटता कामा नये, तरच तुम्ही खरे सुसंस्कृत.' हे सत्य आज आपण सारे विसरल्यासारखे वागतो. विलासराव साळुंखे यांचे 'उदक चालवावे युक्ती' हे पुस्तक, मिलिंद बोकीलांचे 'उदकाचिये आर्ती' हे पुस्तक प्रत्येक भारतीयाने वाचावे असे आहे. मिलिंद बोकिलांची 'अधिष्ठान' कादंबरी मला विशेष आवडली. प्रवीण दवणे आणि व. पु. काळे यांनीही झपाटून टाकले. 'सावर रे', 'दिलखुलास' ही प्रवीण दवणेंची पुस्तके म्हणजे खुसखुशीत मेजवानीपण आहे आणि पांढरपेशी वर्गाला घेतलेले चिमटेही!

''प्रामाणिकपणा असतो किंवा नसतो. तो शिकवता येत नाही'' हे खास वाक्य फक्त आणि फक्त व.पु.च लिहू शकतात. 'ही वाट एकटीची' कादंबरीची नायिका 'विद्युल्लता फडके' म्हणजे आपणच नव्हे का असे प्रत्येक तरुणीला वाटावे इतकी जिवंत व्यक्तिरेखा. 'आपण सारे अर्जुन', 'व.पु. ८५', 'वपुर्झा', 'पार्टनर', 'महोत्सव', 'वपूर्वाई' अशी वपुंची कितीतरी पुस्तके मी वाचली. सहज-सुंदर, ओघवती भाषा, दिलखेच संवाद, जिवंत व्यक्तिचित्रण आणि सर्वसाधारण माणसांच्या समस्या हे त्यांचे विषय. व.पुं.चे 'सखी' आणि तप्तपदी एकदम लाजवाब आणि याहीपेक्षा चिरकाल स्मरणात राहणारी लहानशी मर्मस्पर्शी कादंबरी म्हणजे 'तू भ्रमात आहासी वाया'.

''व्यवहाराला गंध नसतो, स्पर्श नसतो, सूर नसतो, गोंगाट असतो,

''रुचीच नसते मग अभिरुचीची बातच दूर...''

''अपमान-अहंकार, दुःखापेक्षा ताठ असतो.''

''चैतन्याचा स्वीकार करायला चेतन मनच हवं'' हे तत्त्व फक्त व.पु.च तुमच्या मनावर खास व.पु. शैलीतून बिंबवू शकतात.

'एक होता कार्व्हर', 'माझा साक्षात्कारी हृदयरोग' किंवा 'विज्ञान कुतूहल' विज्ञानाचे तर्कशुद्ध ज्ञान घडवतात. डॉ. अब्दुल कलामांचे 'अग्निपंख'ही तितकेच प्रभावी पुस्तक. विज्ञानाची पुस्तके वाचताना खूप पेशन्स लागतो. काही भाग क्लिष्टही वाटतो. किरण बेदींचे 'I dare' संग्राह्य वाटले. कधीही निराश वाटले, कंटाळा आला की 'आय डेअर' वाचायला घेते.

**वाचन संस्कार :**

माझा वाचनप्रवास अखंड चालू आहे. माझ्या जडणघडणीत, विचारप्रणालीत, लेखन साहित्यात पुस्तकांचा प्रभाव जाणवेल. वाचनातून मला विलक्षण आत्मिक आनंद व समाधान मिळते. वाचनासाठी वेळ काढण्याची सवय लागली आहे. वाचनावर चर्चा करावी असे सहकारी मंडळ मला लाभले नाही, पण माझ्या एकटेपणी, निवांतपणी 'वाचन' साथ-संगत करते त्यामुळे मला वेळ कसा घालवावा हा प्रश्न पडत नाही. साहित्यातले अनेक प्रवाह मला मोलाचे वाटतात. संतसाहित्यापासून अगदी नवलेखकांपर्यंत सर्व साहित्यिक मला वाचावेसे वाटतात, अभ्यासावे वाटतात. तुकाराम मला विलक्षण द्रष्टे वाटतात, ज्ञानेश्वर ज्ञानसंपन्न वाटतात, तर रामदास मनाचे 'मनस्वी', 'तपस्वी' वाटतात. असे असताना मला अशोक नायगावकर, रामदास फुटाणे यांचे काव्यही भावते. महात्मा गांधी किंवा लोकमान्य टिळक यांचे लेखन स्फूर्तिदायक, प्रेरणादायी वाटते. व्यंकटेश माडगूळकर, ह. मो. मराठे, मधू मंगेश कर्णिक, श्री. म. माटे, जी. ए. कुलकर्णींही वारंवार वाचावेसे वाटतात. थोडक्यात काय, मी अमुक एका विचारसरणीचा किंवा पंथाचा किंवा प्रवाहाचा विचार न करता विविध लेखकांचा, विचारांचा आस्वाद घेते.

मला गझलांचा अभ्यासही प्रिय आहे, भीमराव पांचाळांच्या, सुरेश भटांच्या गझलाही वाचते, ऐकते. म्हणून...

''स्मरल्या मला न तेव्हा, माझ्याच गीत पंक्ती...

मग ओळ शेवटाची सुचवून रात्र गेली...''

अशी माझी ही स्थिती मी अनेकदा अनुभवली आहे.

वाचक, अभ्यासक, लेखक अशा विविध भूमिकांतून वाचन करते. कविता, शेर-शायरी, ललित गद्य व निबंध लेखन करते. माझ्या या निर्मितीला माझ्या वाचनाने अमूल्य जोड दिली आहे.

आयुष्यभर निवांत साथ देणारं केव्हाही हवंहवंसंच वाटणारं विचारात गुंग करणारं
सर्वार्थानं समृद्ध करणारं पुस्तक.... पुस्तक..... अन् केवळ पुस्तक!

अमुक एका पुस्तकाने किंवा लेखकाने मला झपाटून टाकले असे म्हणण्यापेक्षा 'वाचनानेच' मला झपाटून टाकले आहे असे मी म्हणेन. इंग्रजी साहित्याचे मी वाचन करू शकले नाही याची मला विलक्षण खंत आहे, पण पुढे निवृत्तीनंतर इंग्रजी साहित्य वाचन व हिंदी साहित्याचा अनुवाद करण्याचा माझा मानस आहे.

मंडळी ''तुमच्या मार्गात आणि तुमच्या पायातून सदैव भळभळ रक्त वाहात राहावं हा दुःखान्त नसतो...

तुम्ही रक्तबंबाळ पायांनी एकाजागी शेवटी येऊन थबकलेले असता

जेथून पुढे चालण्यासाठी कुठलाच रस्ता तुम्हाला आमंत्रण देत नसतो हा दुःखान्त आहे

...तुम्ही आयुष्यभर आपल्या प्रेमाच्या काकडणाऱ्या

शरीराकरता वस्त्र विणत राहावीत हा दुःखान्त नसतो...

तर या वस्त्रांना शिवण्याकरता आवश्यक असलेला विचारांचा धागाच कच्चा निघावा

आणि तुमच्या लेखणीरुपी सुईचं नेढंच तुटून जातं हा दुःखान्त असतो.''

'अमृता प्रीतम'च्या शब्दांतील ही कैफियत माझीदेखील आहे, पण या वैयक्तिक दुःखापेक्षाही माणसांनी माणसात भिंती उभ्या करण्यापेक्षा पूल बांधावेत असे मला वाटते. आज सगळीकडे 'दहशतवाद' बोकाळला असताना माणसाने कसे वागावे किंवा काय घडले तर देशातील वातावरण बदलेल हे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलामांचे काव्य उद्धृत करते.

''जिथे हृदय बरोबर असते तेथे चारित्र्यात सौंदर्य असते,
जेथे चारित्र्यात सौंदर्य असते तेथे घरात सामंजस्य असते,
जेथे घरात सामंजस्य असते तेथे देशात सुव्यवस्था असते,
जेथे देशात सुव्यवस्था असते तेथे जगात शांतता असते...''

**सौ. अर्चना ठोके**
ए/५ न्यू ठाणा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे (प) ४०० ६०२.
फोन नं. २५४०६६३३

**(पान नं.१४६ वरून पुढे...)**

दिवस ठेवला, सर्वात लोकप्रिय अंक अशी सर्व माहिती तयार करून ती वाशीतीलच एका नियतकालिकात प्रसिद्ध केली. या कामाबद्दल काही लोकांच्या अभिनंदनाचा स्वीकार करत असताना अहवालातील परखड माहितीमुळे संस्थाचालक माझ्यावर रुष्ट झाले व मला तिथले सभासदत्व रद्द करावे लागले, पण एक वेगळा उपक्रम केल्याचे समाधान मला लाभले.

३) गेली काही वर्षे 'मेहता पब्लिशिंग हाऊस' ही संस्था अनेक प्रसिद्ध इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवाद प्रसिद्ध करीत आहे. त्यातील २५/३० अनुवादित पुस्तके वाचल्यानंतर त्या पुस्तकांची मूळ इंग्रजी पुस्तके वाचाविशी वाटून अशी काही इंग्रजी पुस्तकेही मी वाचली व त्या पुस्तकांनी अनुवादित पुस्तकांइतकाच आनंद मला दिला याचाही उल्लेख करणे गरजेचे वाटते.

४) एखादी उत्तम कथा झपाटून टाकते व मग ती कथा लोकांपर्यंत पोहोचवावीशी वाटते. काही वर्षांपूर्वी कथाकथनासाठी तीन कथा निवडल्या व कथाकथनाचे कार्यक्रम स्वयंस्फूर्तीने केले. त्या कथा अशा – १) माझी पहिली चोरी - हास्यकथा - श्री. द. मा. मिरासदार २) निरोप - हास्यकथा - द. मा. मिरासदार ३) सदाशिवरावाचा तोतया - विज्ञानकथा - बाळ फोंडके. मात्र माझा हा छंद मला विस्तारता आलेला नाही.

५) माझ्या मराठी कवितांच्या वाचनाचा उपयोग मी एका आगळ्या-वेगळ्या कार्यक्रमाने केला. मी प्रथम 'शब्द-सुरांची मोहिनी' या नावाने एक कार्यक्रम लिहिला. यामध्ये कवितेच्या व्याख्येपासून सुरुवात करून, पहिली मराठी काव्यपंक्ती, पहिले मराठी गद्यपुस्तक इत्यादी माहिती विषद करीत करीत एकाच विषयावरच्या (उदा. पाऊस, चांदणे, प्रेम इत्यादी) अनेक मराठी कवींच्या कविता एकत्र सादर केल्या व या शब्दांना सुरांची साथ म्हणून माझ्या तीन मुलांनी मराठी सुगम संगीत मधून मधून सादर केले.

इतिहास, ऐतिहासिक कादंबऱ्या, चित्रकला, संगीतकला, शिल्पकला, भारतीय संस्कृती हे माझे आवडीचे विषय आहेत. या विषयांवरील पुस्तके मी अधिक रुचीने वाचतो व गरज भासल्यास पुस्तकाचा/लेखाचा सारांश दोनतीन पानांत लिहून माझे संग्रही ठेवतो. यातील २३ संग्रह तयार करून त्याला या लेखांच्या झेरॉक्स पुस्तकाच्या १६० प्रती विनामूल्य वितरित केल्या. हा माझा उपक्रम अजूनही चालू आहे.

माझे पुस्तकवाचन, त्यातून उद्‌भवलेली माझी किंचित समाजसेवा यांचा विचार करताना मला कविवर्य विंदा करंदीकरांच्या ओळी आठवतात.

देणाऱ्याने (लेखक, कवि) देत जावे;
घेणाऱ्याने (म्हणजे मी) घेत जावे
घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे।।'

माझ्या कुवतीनुसार मी याचा पाठलाग केला आहे, हे माझे मोठेच समाधान होय.

**प्रभाकर त्र्यंबक कर्वे**
१९, अर्चेन सोसायटी, प्लॉट ३७,
सेक्टर ४, वाशी, नवी मुंबई, ४००७०३
दूरध्वनी : ९५२२-२७८२१८२८




**सुधा चान्दोरकर**

## पुस्तकाबद्दलच्या प्रतिक्रिया नोंदवहीत लिहून काढण्याचा कटाक्ष वाचन प्रक्रियेला अर्थपूर्ण बनवतो

कोल्हापूरला आमची गल्ली ही लेखक-कलावंतांची गल्ली म्हणून ओळखली जाई. फडके, खांडेकर यांची घरे आमच्या घराजवळच असल्यामुळे त्यांच्या पुस्तकांनी गच्च भरलेल्या अभ्यासिका, खेळायला त्यांच्या घरी गेलं की पाहायला मिळत. आमच्यासमोर राहणारे डॉ. गोगटे यांच्या घरी लहान मुलामुलींना वाचण्यायोग्य मुलांची मासिके व पुस्तके बरीच येत. ती मासिके, पुस्तके त्यांच्या मुलांआधी माझीच वाचून होत. त्या गल्लीतले, खासबागेतले सुसंस्कृत वातावरण आणि गोगट्यांचे घर यामुळेचं मला वाचनाची आवड लागली.

चौथीपर्यंत बालसाहित्यात रमलेल्या मला महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूलच्या लायब्ररीमध्ये जणू जादूची गुहाच गवसली. शाळेत मधल्या सुटीपूर्वी व नंतर असे दोन तास आठवड्यातून लायब्ररी असायची. 'हवं ते वाचा पण काय वाचलंत? आवडलं का नाही आवडलं, आवडलं तर का आवडलं? इत्यादी नोंद करायला वही असे. चांगल्या वाचनाला व लेखनाला परीक्षेत मार्कही ठेवलेले असत. मग काय आनंदीआनंद. पुस्तकवाचनाचा झपाटा तर वाढलाच. मधल्या सुटीतल्या खाण्याला दांडी मारून सलग दीडएक तास वाचन करायचं. त्यामुळे त्या तीन वर्षातील माझी शाळेची लायब्ररी जवळजवळ पूर्ण झाली. एवढेच नव्हे तर उत्तम वाचन व वाचन नोंदीसाठी तीनही वर्षे पहिला नंबर मिळाला, वाचनाला शिस्त लागली.

तेव्हापासून आजतागायत या वेडानं मला झपाटलेलंच आहे. हातात कुठलंही पुस्तक आलं की जेवण व झोप यांची आठवणही राहीनाशी झाली. खूप बोलणी खाल्ली या छांदिष्टपणापायी. आपलं हे असं वाचणं म्हणजे आपण कुठं चुकतो का? याचं उत्तर मला रामदासांनी दिलं. ''दिसामाजी काहीतरी ते लिहावे। प्रसंगे अखंडित वाचीत जावे।।'' मग माझी अपराधीपणाची भावना मनातून गेली.

(थोरल्या) बहिणीचं लग्न झालं. पुण्यात सदाशिव पेठेत घर (वाडा), तिथून जवळच गोखले हॉलमध्ये लायब्ररी होती. मी तोवर आठवी-नववीत गेलेली. मी बहिणीची परवानगी मिळवून घरात ११-१२ वाजता जेवणं झाली की वही-पेन्सिल घेऊन गोखले हॉल गाठायची. तिथं बंकिमचंद्र, शरच्चंद्र यांचं अनुवादित साहित्य वाचून पार केलं. मग ह. ना. आपटे, माटे, दातार इत्यादी गद्यवाचन बरेच झाले. नंतर रघुनाथ, वामनपंडित यांच्यापासून सुरुवात करत तांबे, बालकवी, टिळक, केशवसुत इत्यादी कवींच्या मार्गाकडे वळले. काही आवडलं की त्याची नोंद वहीत होई. चारशे पानी वही भरत आली. संध्याकाळी ५-५।। वाजता घरी आले की सारेजण माझ्या वाचनवेडाची थट्टा करत.

त्या दिवसांनी मला खूप समृद्ध केलं. पुणं आणि वाचनालय यावर अपार भक्ती निर्माण झाली.

लग्नानंतर यांच्या विमानदलातल्या नोकरीनं मला अंबाल्याला आणून सोडलं. दिवसभर मी एकटीच घरी असायची. परका मुलूख, मराठीखेरीज दुसरी भाषा न येणारी, पुस्तकी इंग्लिश व हिंदी येत असलं तरी मौखिकमध्ये नापास. त्यामुळे संवाद घडेना. या अशा एकाकीपणात मला महाराष्ट्र मंडळाच्या लायब्ररीचा लाभ झाला. एखादी मैत्रीण भेटावी असा आनंद झाला. आठवड्याला चारसहा पुस्तके मिळत. माझी वाचनाची उपासमार पाहून मला हे आवर्जून जरा लग्गा लावून ८ पुस्तके आठवड्याला आणून देत. माडखोलकर, भावे, माडगूळकर, गोखले, गाडगीळ असे बरेच लेखक वाचायला मिळाले. माझे वाचन फास्ट आणि वेळ भरपूर. मग काय? ती लायब्ररी पाचसहा महिन्यांत वाचून संपली. माझ्या या वेडाची गणना आता 'व्यसन' या शब्दात होऊ लागली. मला चहाचेसुद्धा व्यसन नाही.

विमानखात्यातील नोकरी भारतयात्रा करून १९६२-६५ च्या दोन युद्धांच्या मानसिक व शारीरिक कष्टानंतर संपली. यांना एअर इंडियात नोकरी लागली. मुक्काम पोस्ट मुंबईला आलं.

मुलांची शिक्षणं करता करता त्यांनाही माझ्या वाचनवेडाचा संसर्ग झाला. मुलगा इंग्लिश मीडियमचा. त्याला त्या वयात एनिड ब्लायटनचे लिखाण खूप आवडायचे. त्या लेखिकेनं मलाही झपाटलं. बेडटाइम स्टोरीज् पासून वेगवेगळ्या वयोगटांसाठी मोठ्या आकर्षक रहस्यकथा एवढेच नव्हे, तर पक्षीनिरीक्षणावरची तिची पुस्तकेही फार रोचक असत. मुलानं मला हा 'आढ्याचं पाणी वळचणीला' असा वारसा दिला. मी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय सुरू केलं. तिथले (गोरेगावचे) पुस्तके देणारे दाणी, साटम आदी स्टाफचे लोक मला ओळखू लागले. नवीन पुस्तक आलं की आवर्जून नोंदणी व स्टँप मारून मला प्रथम मिळू लागलं. माझं जीवन आणि वाचन या माझ्या आयुष्यातल्या अभिन्न समांतर रेषा आहेत.

मुलांची शिक्षणं संपतासंपता माझं लवकर लग्नामुळं अपुरं राहिलेलं शिक्षण चाळिशीनंतर पुन्हा मार्गी लागलं. संदर्भग्रंथ व पाठ्यपुस्तकांचं वाचन करताना मजा आली. वाचनाची जाणीव

प्रगल्भ बनली. एम.ए.ला 'ज्ञानेश्वर' हा लेखक निवडल्यानं बरंचसं संतसाहित्य वाचलं. ज्ञानेश्वर वाङ्मयाची तर अजूनही पारायणं करतेय. भाषासौंदर्याची जाण वाढली. आशयाची, अभिव्यक्तीचीही जाण वाढली. आता ज्ञानेश्वररूपी पाथेय तर उरल्या आयुष्याच्या मार्गाची सोबत ठरलंय. अजूनही व्यसन सरत नाही. म्हणतात ना, 'व्यसन सुटत नसतं. माणसालाच सोडवतं.' खरंच आता त्याच्या संगतीत एखादे वेळेस डोळ्याला चष्मा व छातीवर पुस्तक अशी नेहमीसारखी, पण काळझोप लागायची, कुणास ठाऊक!

**सुधा चांदोरकर**
१०, प्रोफाईल ईडन, प्रभात रोड, गल्ली क्र. ८,
३९/२ एरंडवन, पुणे ४११००४
फोन : ३२९०९२५३




**शालिनी वैद्य**

## रोज नियमित होणारे वाचन हीच माझी देवाची पूजा... दुसऱ्या पूजेची गरजच वाटत नाही.

**मी** एका मिल मजुराची सर्वात मोठी मुलगी. इतरांप्रमाणे नगरपालिकेच्या शाळेत इयत्ता १ ते ४ पर्यंत शिकले. त्यानंतर त्यापेक्षा थोड्या बऱ्या शाळेत ५ ते १० वी पर्यंत शिकले. घरी आईबाबा नेहमी म्हणत असत. आपण कुणाचे चांगले करू शकत नाही तर वाईट सुद्धा करू नये. सहाव्या वर्गात आम्हाला 'गोप्या' हे पुस्तक अभ्यासाला होते. ते पुस्तक मी वाचले आणि खूप रडले. शाळेत आम्हाला एक तासिका वाचनाची असे. त्यावेळी शिक्षक आम्हाला गोष्टींची पुस्तके वाचायला देत असत. ती पुस्तके मी वाचून काढी. आमच्या शाळेत बऱ्यापैकी वाचनालय होते. त्या वाचनालयात मी जात असे. ग्रंथपाल चांगले होते. माझी आवड पाहून ते मला निरनिराळी पुस्तके वाचायला देत असत. घरी आईवडिलांना पुस्तकांचे फारसे ज्ञान नव्हते. आजूबाजूचे वातावरणसुद्धा मजूरवर्गाचेच असल्यामुळे कोणती पुस्तके वाचावी याचे मार्गदर्शन मिळत नसे. परंतु काही गुरुजनांकडून रामायण-महाभारत यातील गोष्टी ऐकत असे. त्यामुळे रामायण, महाभारत हे ग्रंथ मी ग्रंथपालाला मागितले. त्यांनी मला मराठी अनुवादित ग्रंथ मोठ्या आनंदाने घरी वाचण्याकरिता दिले. माझा आनंद गगनात मावेना. मी ते ग्रंथ घरी नेऊन आठ दिवसांत वाचून काढले. त्या ग्रंथातील खालील प्रसंग मला खूप आवडले.

महाभारतात युद्ध संपल्यानंतर स्वर्गारोहणाच्या वेळी रस्त्यात अर्जुन, नकुल, सहदेव, भीम, द्रौपदी सर्व गतप्राण होतात. शेवटी धर्मराज आणि त्याचा कुत्रा दोघेच उरतात. धर्मराजाला स्वर्गातून न्यावयास रथ येतो त्यावेळी धर्मराज स्पष्टपणे सांगतो की 'मी येईन तर कुत्र्यासह, अन्यथा नाही.' हे वाचून धर्मराजाचे प्राणीमात्रावरील प्रेम, त्याचा स्पष्टवक्तेपणा आणि सत्यनिष्ठा पाहून आनंद होतो.

दुसरा प्रसंग रामायणातील. भरत रामाला वापस आणण्याकरिता वनात जातो, तेव्हा म्हणतो, 'तुझे राज्य तू वापस घे.' तरीही राम वेगवेगळी उदाहरणे देऊन त्याला वापस पाठवितो. भरत नाइलाजाने रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवतो. स्वत: मात्र वल्कले धारण करून चौदा वर्षे राज्य सांभाळतो. स्वत: रामाप्रमाणेच कंदमुळे फळे खाऊन जगतो. त्यावेळी अंत:करण भरून येते.

ही दोन्ही पुस्तके वाचली त्यावेळी मी आठव्या वर्गात होते. हातात पडेल ते पुस्तक वाचत असे. दहावी सायन्स ६८% घेऊन पास झाले. घरच्या मंडळींकडून थोडी शाबासकी मिळते. पुढे काय? हा प्रश्न असतोच. घरी खाणारी तोंडे जास्त मिळकत कमी. शेवटी डी.एड. पास होऊन एका खेडेगावात जिल्हापरिषद शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून नोकरी लागते. आमच्या मजूर वस्तीत एक भले मोठे कामगार कल्याण केंद्र आहे. त्या केंद्रात नाममात्र फी भरून पुस्तके वाचावयास मिळत असत. त्या केंद्रातून मी 'छावा', 'मृत्युंजय', 'बुमरँग', 'श्यामची आई' अशा प्रकारे कितीतरी पुस्तके, आणून वाचत असे. आमच्या मुख्याध्यापकांनी माझा वाचनाचा छंद पाहून शाळेतील वाचनालयाचा कार्यभार माझ्याकडे सोपविला होता. मी त्या वाचनालयातील संपूर्ण पुस्तके वाचली. 'स्वामी', 'तीन मुले' ही विशेष लक्षात राहिली. रोज रात्री बारापर्यंत एक पुस्तक वाचत असे. शाळेतील शिक्षिका विचारत, ''एका दिवशी एवढे मोठे एक पुस्तक तुम्ही कसे वाचून काढता? न वाचताच वापस करीत असाल?'' या त्यांच्या प्रश्नाला मजजवळ उत्तर नसे. शंभर शिक्षिकांच्या एका शिबिरात मी गेले. सरकारी पद्धतीने ते शिबिर झाले. त्या शिबिरात चंद्रकांत शहा आणि श्रीधर

राजगुरू हे दोघे मार्गदर्शक होते. जाताना समारोप प्रसंगी शहा काका म्हणाले, ''आपण सर्व शिक्षक आहात. वीणा गवाणकर लिखित 'एक होता कार्व्हर' हे पुस्तक जरूर वाचा.'' 'एक होता कार्व्हर'मधील खालील प्रसंगाने मला बदलवून टाकले.

कार्व्हरला अमेरिकेतील राष्ट्रपतींचे बोलावणे येते त्यावेळी सर्व शिष्यगण म्हणतात, ''गुरुवर्य, आजपर्यंत आपण एकच पोषाख धुवून घातला. आज आपणाला राष्ट्रपतींकडे जावयाचे आहे. आम्ही आपणास नवीन पोषाख शिवून देतो. तो घालून आपण जावे.'' हे ऐकताच कार्व्हर म्हणतात, ''जर राष्ट्रपतीला पोषाखाची भेट घ्यावयाची असेल तर आपण पोषाख त्यांना पार्सल करा. पण माझी जर भेट घ्यावयाची असेल तर मी जसा आहे तसाच त्यांचेकडे जाईन.''

माणसाचे कर्तृत्व पोषाखावर नसून त्याच्या कर्तृत्वावर असते हे समजले.

पुढे गाडे गुरुजींनी पवनार येथे सात दिवसांचे शिबिर घेतले. त्या शिबिरात विविध मान्यवरांचे विचार ऐकले. त्यावेळी असे वाटले की हे विचार पंधरा वर्षांपूर्वी आपणास मिळाले असते तर आपला जीवनमार्ग वेगळ्या दिशेने गेला असता. त्या शिबिरात विविध पुस्तकांची यादी दिली ती सर्व मी विकत घेतली. श्री. गाडे गुरुजी शिक्षकांना नेहमी म्हणत असत की दर महिन्याला शिक्षकांनी काही रक्कम पुस्तके घेण्यासाठी काढून ठेवावी. ती पुस्तके वाचावीत. त्याप्रमाणे मी दर महिन्यात शंभर रुपये गाडे गुरुजींना पुस्तके घेण्याकरिता देत असे. आज मजजवळ पाच हजाराची स्वत:ची पुस्तके आहेत. गांधी-विनोबांच्या विचारांची पुस्तके तुलनेत जास्त आहेत. गांधी-विनोबांची पुस्तके वाचून माझा पक्का विचार झाला आहे की त्यांनी सांगितलेल्या मार्गाने आजची तरुणपिढी गेली तर आपला भ्रष्टाचारी भारत सदाचारी झाल्याशिवाय राहणार नाही. आणि स्वराज्याचे सुराज्य होईल. गांधींची श्रमनिष्ठा आणि अपरिग्रह या दोन गोष्टी तर मला खूपच आवडल्या. त्याप्रमाणेच मी जीवन जगण्याचा निश्चय केला. त्यांचे विचार वाचून मला असे वाटले, आपण जो पगार घेतो तो आपल्या गरजेपेक्षा कितीतरी जास्त आहे, म्हणून चोवीस वर्षे नोकरी केल्यावर ३१ जुलै १९९७ ला स्वखुषीने निवृत्ती घेतली. अजून सोळा वर्षे बाकी होती. यापुढे आपण काही तरी सेवा करावी असे वाटू लागले. म्हणून गाडे गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली सर्वोदय आश्रम नागपूर येथे राहते. श्रमाधिष्ठित आणि अपरिग्रह युक्त असे जीवन जगते. फक्त खादीच्या दोन साड्या घरच्या आणि दोन साड्या बाहेरच्या अशा वापरते. रोज एक तास चरख्यावर सूत कातते आणि एक तास नियमित वाचन करते. असा नियम मी स्वत:ला घालून घेतला आहे. तीच माझी ईशपूजा. दुसरा देव मी राहते त्या ठिकाणी नाही. मला दुसरा देव ठेवावा अशी गरजही वाटत नाही.

आमच्याकडे साऱ्याजणी मिळून 'साधना', 'वनराई', 'साम्ययोग', 'मैत्री' अशी विविध मासिके येतात. ती तर वाचतेच, परंतु दुसऱ्या पुस्तकाचेही एक तास वाचन करीत असते. उदा. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, संत तुकाराम, वि. स. खांडेकर, राम शेवाळकर अशा अनेक लेखकांच्या साहित्याचा आस्वाद घेत असते.

वाचनामुळेच माझ्यामध्ये परिवर्तन झाले हे मी स्वत:च्या अनुभवाने सांगू इच्छिते. आजच्या तरुण पिढीने वाचन करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने तरुणपिढीत वाचनाची आवड दिसत नाही. कॉम्प्युटर, इंटरनेट या व्यतिरिक्त त्यांच्या फारशा चर्चा नसतात. मनी ओरिएंटेड तरुणाची जीवने दिसतात हे पाहून खेद होतो.

आज परीक्षेला बसायचे म्हणून फक्त अभ्यासक्रमाची पुस्तके वाचतात. 'परीक्षा संपली की डोके साफ', विनोबांच्या भाषेत सांगायचे म्हणजे 'रेचक घेतले की पोट साफ' तशी ही परीक्षा.

वाचनाचा आनंद हा आगळावेगळा आनंद असतो. वाचनामुळे संवेदनशीलता जागृत होते. माणूस विचारशील होतो. बाबा आमटेंचे एक वाक्य मला आठवते. ''मी सानेगुरुजींना ऐकले किंवा पाहिलेले नाही. परंतु त्यांच्या साहित्य वाचनाने माझे आनंदवन निर्माण झाले.'' केवढी ही क्रांती! आज संपूर्ण जगात बाबा आमटे आणि त्यांचे आनंदवन यांचा गौरवाने उल्लेख केला जातो.

वि. स. खांडेकर म्हणतात, ''आज तरुणांना स्वत:च्या आनंदाकरिता खूप पैशाची साधने लागतात. जसे टी.व्ही., रेडिओ, क्रिकेट, इंटरनेट वगैरे. पण माझ्या आनंदाकरिता मला महिन्याचे दोन रुपये लागतात. ते कसे, तर मी दर महिन्याला वाचनालयाला दोन रुपये फी देतो. फीच्या बदल्यात मला महिनाभर पुस्तके वाचून भरगच्च शाश्वत चिरंतन टिकणारा आनंद मिळतो.''

**शालिनी वैद्य**
सर्वोदय आश्रम संस्कार परिवार
अमरावती मार्ग, बोले पेट्रोल पंपाजवळ
धरमपेठ, नागपूर ४४००१०
फोन (०७१२) २५४१३७२

वेळेचं बंधन जिथे झुगारून द्यावंसं वाटतं असं केवळ 'पुस्तक'.




**श्रीकृष्ण कर्वे**

## साहित्याच्या वेगवेगळया प्रवाहांचा आस्वाद घेण्याची आरंभापासूनच आवड

वयाच्या पाचव्या वर्षापासून मी वाचतो आहे. वयाच्या बाराव्या वर्षी मी गाव सोडून मुंबईत दाखल झालो. तोपर्यंत आमच्या 'भाऊ गणपत लायब्ररीतील बहुतेक पुस्तके मी वाचून काढली होती. मुक्तामाला, मंजुघोषा, कांचनगडची मोहना, सिंदबादच्या सफरी, समग्र खांडेकर, फडके, माडखोलकर, हना-नाह आपटे, चिंवि-वावि जोशी, ठोकळ, नाथमाधव, हडप, सर्वांचा मी फडशा पाडला. मी कुठेही दिसलो नाही तर 'भाऊ गणपत'मध्ये असणार हे घरच्यांना ठाऊक असायचे. घरी दुपारच्या वेळी मोठ्या माणसांसमोर अनेक पौराणिक ग्रंथ न समजता वाचले. पांडव प्रताप, जैमिनी अश्वमेध, कथा कल्पतरु (ह्यांतील काही उल्लेख चांगले नसत. ते गाळून पुढे वाचायला सांगत असत) वाचले. रात्रीच्या वेळी दारे लावून कंदिलाच्या उजेडात सावरकरांच्या पुस्तकांचे वाचन हळू आवाजात मी केले आहे. माझी जन्मठेप, काळे पाणी, मॅझिनीचे चरित्र वगैरे. माझे काका शाळेत हेडमास्तर होते. त्यामुळे खेळगडी, चित्रमय जगत, शालापत्रक, उद्यम आदि मासिके वाचून होत. चित्रमय जगतातील युद्धाची चित्रे पाहून अंगावर वेगळेच रोमांच उभे रहात असत. चित्रांत पाहिलेला रणगाडा शहापूरला आग्रारोडवरून जाताना प्रत्यक्ष पाहिला तेव्हा काय वाटले हे सांगणे कठीण आहे. ह्या काळात वाचलेल्या पुस्तकांपैकी फारच थोडी स्मरणात राहिली आहेत. त्यांमध्ये अर्थातच स्मृतिचित्रे (लक्ष्मीबाई टिळक) चा प्रथम क्रमांक आहे. बहुसंख्य आत्मचरित्रे ही जंत्रीवजा असतात. आपले अपयश झाकणे, आपल्यावरील अन्यायाला अन्य कसे जबाबदार होते हे सांगणे हेच अशा आत्मकथनाचे सूत्र आढळते. त्यांत कृत्रिमता असते. काहीतरी लपवण्याचाही प्रयास असतो. अप्रिय घटना टाळल्या जातात. दोन व्यक्तींचा संबंध असेल तर दोन्ही व्यक्तींची आत्मचरित्रे वाचणे अपरिहार्य ठरते. जसे बेहेरे-विजापुरे, अत्रे-वनमाला वगैरे. आजही स्मृतिचित्रे रेंगाळत राहतात त्यांतील अकृत्रिमपणामुळे. खऱ्याखुऱ्या अर्थाने ती आपल्यासमोर शब्दचित्र उभे करतात. कोणतेही अन्य आत्मचरित्र ह्या पुस्तकाच्या जवळपास पोहोचू शकत नाही. एक हजाराहून अधिक पुस्तकांच्या माझ्या संग्रहातील पहिले पुस्तक आहे. 'स्मृतिचित्रे'. दुसरे आहे 'माझी जन्मठेप'. हेही आत्मवृत्तच, पण वेगळ्या प्रकारचे. जीवनाचा दाहक अनुभव सावरकरांसारख्या समर्थ साहित्यिकाकडून शब्दबद्ध होतो, तेव्हा तो हृदयाला भिडतो. दोन वर्षांपूर्वी अंदमान भेटीत सावरकरांची कोठडी पाहिली आणि तिच्यात जेलरांच्या परवानगीने वंदे मातरम् म्हटले तेव्हा अंगावर रोमांच उभे राहिले.

कविता हा माझ्या आवडीचा प्रांत. अनेक कवी माझ्या आवडीचे आहेत. माधव ज्युलियन (पटवर्धन) ह्यांची 'संगमोत्सुक डोह' (एकत्र गुंफून जीवित धागे), कुसुमाग्रजांचे 'पृथ्वीचे प्रेमगीत' (युगामागून युगे चालली ही), रेंदाळकरांची 'अजून चालतो वाट- माळ हा सरेना', ह्या कविता मनात रेंगाळत असतात. बोरकरांच्या अनेक कविता मला मनापासून आवडतात.

मराठीच्या बरोबरीने मी इंग्लिश पुस्तकेही वाचतो. इतिहास, भूगोल, प्रवासवर्णने हे आवडीचे विषय – 'ब्ल्यू नाईल', 'व्हाईट नाईल', 'डिक्लाइन ऑफ इंकाज', 'हिस्टरी ऑफ मिडल एजेस', 'राईज ॲण्ड फॉल ऑफ ऑटोमन एम्पायर' ही त्यांतील काही पुस्तके. गिबनच्या 'डिक्लाइन ॲण्ड फॉल ऑफ रोमन एम्पायर' ह्या ग्रंथाचे सर्व खंड मी तीन वेळा वाचले आहेत.

वाचक चळवळीत मी पूर्वीपासून भाग घेत आलो. गेली पन्नास वर्षे कुठच्या ना कुठच्या ग्रंथालयाचा सभासद/वाचक राहिलो आहे, साहित्यिक कार्यक्रमांना उपस्थित रहात आलो आहे. भाऊ गणपत, राजाराम, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, गिरगाव, दादर-मुलुंड, ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय, सार्वजनिक वाचनालय नाशिक, केळकर ग्रंथालय, खांडेकर ग्रंथालय मुलुंड ह्यांच्या अनेक कार्यक्रमांत मी सक्रिय सहभाग घेतला आहे.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मुलुंड शाखा, खांडेकर ग्रंथालय ह्यांच्या कार्यकारिणीवर अनेक वर्षे सक्रिय सहभाग घेतला आहे. मराठी भाषेच्या प्रसारासाठीही थोडासा हातभार लावला आहे. पाच वर्षे एलआयसीत आणि पंधरा वर्षे माटुंगा येथील अमोलक विद्यालयात अमराठी भाषिकांसाठी इंग्लिशमधून मराठीचे वर्ग चालवले. 'इन्ट्रोडक्शन टू मराठी' हे पुस्तक १९७६ मध्ये प्रसिद्ध झाले आहे. मराठी भाषिकांसाठी तमिळचे वर्ग चालवले. 'तमिळ शिका' हे पुस्तक पुण्याच्या नितीन प्रकाशनने प्रसिद्ध केले आहे. 'विमा'विषयक १५ पुस्तके इंग्लिश-मराठीत प्रसिद्ध झाली आहेत. मराठी विश्वकोशासाठीही लेखन केले आहे. एलआयसीच्या विलेपार्ले येथील कार्यालयात साखळी वाचक योजनेत सहभागी होतो. मॅजेस्टिक बुक क्लब, बॉम्बे बुक क्लब ह्यांच्या सभासदत्वाच्या माध्यमातून अनेक पुस्तके घेतली आहेत. एलआयसीची प्रचंड लायब्ररी, ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी ह्यांचा भरपूर उपभोग घेतला आहे. ग्रंथालीचा अनेक वर्षे सदस्य होतो. १९५७ चे विदर्भ साहित्य संमेलन, १९५७ चे औरंगाबाद, १९५८ चे मालवण इथपासून अनेक साहित्य संमेलनांना

उपस्थिती लावली. मराठीवरील प्रेमामुळे साहित्य प्राज्ञ-विशारद ह्या परीक्षा दिल्या. कॉमर्स, लॉ, स्टॅटिस्टिक्स ह्यांचा विद्यार्थी असूनही महाविद्यालयीन जीवनात साहित्य भित्तिपत्रिका चालवली, विनोदाचे व्याकरण ह्या विषयावरील अत्र्यांचे पहिले व्याख्यान आमच्या कॉलेजात आयोजले. पुरंदरे वक्तृत्व स्पर्धा, रानडे वक्तृत्व स्पर्धा ह्यामध्ये महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. वयाच्या ६५ व्या वर्षी 'साहित्यभूषण' ही कुसुमाग्रज प्रतिष्ठानची परीक्षा दिली. तीत कृष्णाबाई पारितोषिक मिळाले. सज्जनगडच्या दासबोधाच्या परीक्षा दिल्या. वयाच्या ५० व्या वर्षी भाषा विज्ञानात पीएचडी मिळाली. विषय होता, 'लिंग्विस्टिक स्टडी ऑफ तुकाराम'. बायबलने सांगितलेली 'तीन विसा आणि दहा' ही आयुर्मर्यादा ओलांडल्यानंतर संपूर्ण दासबोध रोमन लिपीत लिहून त्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ सांगून संपूर्ण श्लोकाचा अर्थ लिहिण्याचे काम मी पूर्ण केले आहे. हा ग्रंथ अमेरिकेतील एक ट्रस्ट प्रसिद्ध करणार आहे. नाथद्वारा येथील पुष्टीमार्ग संप्रदायाच्या ४३२ संस्कृत श्लोकांचे मराठी भाषांतर मी पूर्ण केले आहे. गेली चाळीस वर्षे मराठी - हिंदी - इंग्लिश व्यावसायिक भाषांतरकार म्हणून काम करीत आहे. सारांश केवळ मराठी वाचक म्हणूनच नव्हे तर मराठीचा प्रसारक म्हणूनही मी सातत्याने कार्यरत आहे आणि ह्यापुढेही राहीन.

मराठी पुस्तक प्रसाराचा भाग म्हणून सुमारे १५० पुस्तके मुलुंडमधील तीन ग्रंथालयांना भेट दिली आहेत. सुमारे २५ पुस्तके माझ्या काही वाचकप्रेमी मित्रांनी परत केलेली नाहीत, पण त्याची मला खंत नाही.

सारांश गेली पन्नास वर्षे सातत्याने ग्रंथालय चळवळीशी वाचक/कार्यकर्ता ह्या नात्याने संबंध आहे.

ज्या पुस्तकांनी/लेखकांनी झपाटून टाकले अशांची यादी खूपच मोठी आहे. काही वेळा झपाटले जाणे हे तात्कालिक स्वरूपाचे असते. महाविद्यालयीन जीवनात झेंडूची फुले झपाटून गेली. कदाचित माझ्या तरुण वयाला ती भावली असतील. आज ती वाचतो तेव्हा माझी वृत्ती तटस्थ असते. अत्र्यांची 'सुएझ कालवा' ही कविता मला झपाटणारी वाटली. तांब्यांच्या एकूण कवितांनीच मला एकेकाळी झपाटून टाकले होते. आज त्यांच्या २२० च्या आसपास असलेल्या कवितांपैकी पाचसहाच कविता झपाटणाऱ्या वाटतात. मला झपाटून टाकणारे कवी आहेत, बा. भ. बोरकर. निसर्गाचे अप्रतिम शब्दशिल्प ते आपल्यासमोर साकारतात मोजक्या पण चपखल शब्दांनी. ग्रामीण/प्रादेशिक रतीब घालणाऱ्या लेखकांनी मला झपाटून टाकले नाही. आमच्या कोकणातील 'श्री.ना.'ही त्यात आले. गोनीदांचा बाज प्रवचनकाराचा आहे. त्यामुळे तो मनाला भिडत नाही. जिवंत अनुभव आहे सावरकरांचा. आयुष्य पणाला लावून जीवनाचा होम करणारे साहित्यिक सावरकर म्हणूनच झपाटून टाकतात. माझी जन्मठेप, काळे पाणी, मनाला कायमची चिकटून राहणारी पुस्तके. नाथमाधवांच्या स्वराज्यावरील मालिकेने लहानपण झपाटून टाकले होते. आजही वाचावीशी वाटणारी त्यांची पुस्तके म्हणजे 'वीरधवल', 'रायक्लब उर्फ सोनेरी टोळी'.

'वीरधवल' कल्पित असले तरी मनाचा ठाव घेणारे आहे. भाषेची जडजंबालता कृत्रिमता त्यांत नाही, जी अशा पुस्तकांतून हमखास आढळते. उदा. 'भागवतांची रत्न प्रतिमा'. 'रायक्लब उर्फ सोनेरी टोळी' हे पुस्तक मी आजही वाचतो, त्याचा आनंद घेतो. ठगांची जबानी (मेडोज टेलर) हे असेच आजही खिळवून ठेवणारे पुस्तक आहे. पुलंची पुस्तके ही प्रत्यक्ष त्यांच्या तोंडून ऐकल्यावर जास्त प्रभावी ठरतात. 'बटाट्याची चाळ' मनाची पकड घेत नाही, पण तिचे रंगभूमीवरील सादरीकरण प्रभावी ठरते. तीच गोष्ट 'व्यक्ती आणि वल्ली'ची. पुलं झपाटून टाकणारे कलाकार आहेत, पण त्यांच्या पुस्तकांनी मला झपाटून टाकले नाही. त्यांची शाब्दिक कलाकुसर, कोट्या मनाला आनंद देतात, पण तो चिरस्वरूपी नसतो. कालमानानुसार त्यातले अनेक संदर्भ कालबाह्य झालेले वाटतात. आत्मचरित्र हा प्रकार मला आवडतो. आधी उल्लेखिल्याप्रमाणे लक्ष्मीबाईंच्या आठवणींनी मला झपाटून टाकले. माझी जन्मठेप झपाटून गेली. दोन्ही पुस्तकांची मोहिनी आजही माझ्या मनावर आहे. गिबन्सच्या रोमच्या इतिहासाने मात्र (डिक्लाइन आणि फॉल ऑफ रोमन एम्पायर) गेली कैक वर्षे मला झपाटून टाकले आहे. पण एकूण पाहता झपाटून टाकणारी पुस्तके मराठीत फारशी आढळत नाहीत. अनुवादित पुस्तकांत अर्थातच मूळ पुस्तकाचा आशय आला तरी आशयघनता येत नाही. त्यामुळे अनुवादित पुस्तके झपाटून टाकत नाहीत.

मला स्वत:ला जरी इतिहास, समीक्षा ह्या विषयांत रुची असली तरी अन्य साहित्याचाही मी आस्वाद घेत आलेलो आहे. व. पु. काळे, वि. आ. बुवा, मिरासदार, पाटील, सबनीस यांची कथाकथने, पाडगावकर-करंदीकर, बापट किंवा अलीकडचे अरुण म्हात्रे, नायगावकर अशा अनेक कवींचे काव्य वाचन/गायन यांना मी आवर्जून उपस्थित असतो.

अनेक कथासंग्रह, काव्यसंग्रह, कादंबऱ्या माझ्याजवळ आहेत. त्यांचे वाचन मी केले आहे. त्यांचा साहित्यिक आस्वाद मी घेतला आहे. समीक्षात्मक साहित्य मला विशेष आवडते. ते मी वाचतो. अशा कार्यक्रमांना मी उपस्थित राहतो. अशा चर्चांतून मी भाग घेतो. मी केवळ मला आवडणारीच पुस्तके वाचत नाही, तर अगदी मला न पटणाऱ्या विचारधारेतील पुस्तकेही मी वाचतो. 'पुन्हा तुकारामच्या' दीर्घ प्रस्तावनेतील दिलीप चित्र्यांचा एकांतिक अभिनिवेश मला पटत नाही. त्यांनी केलेल्या अभंगाची निवडही पटली नाही. पण ते पुस्तक मी गंभीरपणे वाचले. 'शेष प्रश्न'मधील कॉ. सुळे ह्यांच्या विचारमंथनातील काही विचार पटले नाहीत. पण मी त्या पुस्तकाचा आस्वाद घेतला. पुलंची राजकीय शेरेबाजी काही वेळेस पटत नाही. पण त्यांची पुस्तके वाचनीय असतात.

लेखक आणि वाचक यांचे विचार जुळले पाहिजेत असे नाही.

एकेकाळी दिवाळी अंक त्यातील कथा-कादंबऱ्यांसाठी वाचनीय असत. समीक्षात्मक लेखही उच्च दर्जाचे असत. 'वर्षाव'सारख्या

कादंबऱ्या दिवाळी अंकांच्या माध्यमातून पुढे आल्या. आता दिवाळी अंक ही संस्था राहिली नसून व्यापारी वस्तू झाली आहे. जास्तीत जास्त जाहिराती मिळवण्यांचे एक साधन, राजकारणी लोकांना जाहिरातीच्या माध्यमातून भरपूर पैसा मिळविण्याचा मार्ग असेच त्यांचे स्वरूप राहिलेले आहे. प्रसिद्धीसाठी हपापलेले लेखक-लेखिका असतातच. त्यांच्या आधारावर ही मासिके चालतात.

माझ्या साहित्यिक जाणिवा विस्तारण्याचे काम अनेक ग्रंथालयांनी केले. ख्यातनाम पत्रकार संपादक मनोहर देवधर यांचा ह्या संदर्भात उल्लेख करावासा वाटतो. १९४६ ते १९५० या कालखंडात मी त्यांचा शेजारी होतो. ते त्यावेळेस लोकसत्तेत सहाय्यक संपादक होते. त्यांच्याकडे पुस्तक परीक्षणासाठी पुस्तकांचा खच असे. अनेक मासिके, दिवाळी अंक त्यांच्याकडे असत. त्यांचा भरपूर लाभ मी घेतला. साहित्याच्या वेगवेगळ्या प्रवाहांचा आस्वाद घ्यायची सवय आणि आवड तेव्हापासून मी जोपासली आहे. वैदिक गणित मी जितक्या तन्मयतेने वाचतो, पीटर ड्रकरमध्ये मी जितका रंगून जातो, तेवढ्याच तन्मयतेने मी गाडगीळ, गोखल्यांच्या कथा वाचतो. इन्शुरन्सवरील पुस्तके मी जितक्या आत्मीयतेने अभ्यासतो तितक्याच तन्मयतेने मी आस्वादक समीक्षा अभ्यासतो. दामले, गोविलकर, अर्जुनवाडकर, मोने ह्यांची मराठी व्याकरणे मी अभ्यासली आहेत. तसेच हलकेफुलके कथासंग्रह वाचले आहेत. गाडगीळांच्या खुसखुशीत नर्मविनोदी कथांनी मला रिझवले. तसेच मतकऱ्यांची गूढकथाही मला गुंगवून गेली. पारंपरिक, आधुनिक सर्वच कविताप्रवाहाचा मी मागोवा घेतला आहे. मला त्या आवडल्या आहेत असा भाग नाही. संत साहित्य आणि समाजवादी, प्रस्थापितांविरुद्ध असलेले साहित्यही मी अभ्यासतो. ऐतिहासिक, सामाजिक सर्वच कादंबऱ्या मला प्रिय आहेत. मला काहीही वर्ज्य नाही.

वाचकाने कोणताही वाङ्मय प्रकार वर्ज्य मानू नये. लेखकांच्या मतानुसार आपली मते बदलू नयेत. लेखक पुस्तके ह्यांची मतप्रणाली नुसार वर्गवारी करू नये. आपले मन खुले ठेवावे. वाचक हा निखळ वाचकच असावा.

**डॉ. श्रीकृष्ण लक्ष्मण कर्वे**
B.com. (Start) L.L.B.M.A. (Linguistics) Ph.D.
राष्ट्रभाषा प्रवीण, हिन्दी शिक्षक सनद
मराठी साहित्य विशारद, मराठी साहित्य भूषण वंगभाषा कोविद
निवृत्त उपसचिव (विपणन)
भारतीय आयुर्विमा महामंडळ केन्द्रीय कार्यालय, मुंबई

www.mehtapublishinghouse.com

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली**
**संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

## आत्तापर्यंत १,५००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!

कॅलिफोर्निया, व्हर्जिनी, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, व्हिस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्ड, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

### आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये

- **लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार, पुस्तकाच्या नावानुसार पुस्तके इंग्रजी स्पेलिंगद्वारा 'सर्च'करण्याची सुलभ सुविधा.**
- **पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय**
- **प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परिक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती**
- **नवीन पुस्तकांची माहिती इमेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा**
- **आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती**
- **क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा**

**आजच भेट द्या.**
**व आपली मागणी नोंदवा.**




**ब. अ. अळवणी**

## समवयस्क साहित्यप्रेमी मंडळींशी सतत संपर्क ठेवून समृद्ध केलेला ग्रंथसंग्रह

**मा**झा जन्म दक्षिण कोकणातील एका छोट्या गावात झाला. जवळपास शाळा नसल्याने थोड्या उशिराच माझा शाळाप्रवेश झाला. परंतु त्याआधी घरच्या घरी वाचावयास शिकविले होते; शाळेत प्रवेश झाल्यावर वाचनाची जी गोडी लागली ती अजूनपर्यंत टिकून आहे. वडिलांची शिक्षकाची नोकरी. वारंवार शाळा बदलल्या जरी गेल्या तरी जाऊ तेथे वाचनाची काहीबाही सोय नव्हतीच. कमीतकमी राष्ट्रसेवादलाच्या शाखेत सानेगुरुजींना गोड गोष्टींची पुस्तके हमखास वाचावयास मिळायची. माध्यमिक शिक्षण संपेपर्यंत श्री. वि. स. खांडेकर यांच्या त्यावेळपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व कादंबऱ्या वाचून झाल्या होत्या. 'ययाती' मी एस.एस.सी. होण्याआधीच वाचली होती.

शाळेतल्या शिक्षकांनी पण या वाचनवेडाला खतपाणी घातले. मराठीच्या क्रमिक पुस्तकांनी जे निरनिराळ्या लेखकांच्या पुस्तकातील वेचे असावयाचे; त्यांची मूळ पुस्तके शाळेच्या वाचनालयात घेऊन ती विद्यार्थ्यांना वाचावयास उद्युक्त केले जात असे. फार गहन साहित्यचर्चा न करता, वाचनाचे योग्य संस्कार होतील एवढीच काळजी घेतली जात असे. 'सत्यकथा', 'मौज'चे अंक पण या वयात वाचले. पुढील आयुष्यात 'प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' हा समर्थ संदेश आचरणात आणण्यासाठी एवढी बेगमी पुरेशी होती.

महाविद्यालयात शिकण्याची संधी फार थोडा काळ मिळाली. जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र राहणे आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखे नव्हते. नोकरीचा पर्याय अठरा वर्षे पुरी होण्यानंतरच उपलब्ध होता. तोपर्यंत इंग्रजी कादंबऱ्यांच्या लघु-आवृत्त्या वाचून इंग्रजी साहित्याची तोंडओळख करून घेतली. नोकरी व बाहेरून विद्यापीठाच्या परीक्षा देता देता, नियतकालिकांचे वाचन चाले. त्यावेळी वृत्तपत्रात 'महाराष्ट्र टाइम्स'ने विशेषत: सुरुवातीच्या काही वर्षांत वाङ्मयाभिरुचीची चांगलीच जोपासना केली होती. काय वाचावे हे समजण्यासाठी त्याचापण फायदा झाला. शंकर सारडांनी 'विश्वसाहित्यातील फेरफटका' या मटामधील सदराद्वारे विश्ववाङ्मयातील उत्कृष्ट कलाकृतीचा परिचय करून दिला. सत्यकथेची वर्गणी पहिल्याच पगारात भरली (१९६२) व मासिक बंद होईपर्यंत (१९८४ पर्यंत) अखंड वाचक राहिलो. त्यातून आधुनिक समीक्षा, कथा, कविता, ललित लेखन यांची जाण प्रगल्भ होण्यास मदत झाली. पुढे 'ललित' द्वारे नव्या पुस्तकांची ओळख व साहित्यक्षेत्रातील 'ठणठणपाळी' घडामोडी समजू लागल्या.

काही चांगले वाचल्यावर लेखकाला कळविणे आवश्यक वाटू लागले. असेच एकदा श्री. वि. स. खांडेकरांनी व्यासंग कसा करावा याचे थोडक्यात मार्गदर्शन केले. त्यांनी एक लेखक घेऊन त्याचे सर्व वाङ्मय वाचावयास सांगितले होते. सुरुवातीच्या काळात ऐतिहासिक कादंबऱ्यांनी वेड लावले. ह. ना. आपटे, नाथमाधव, इनामदार यांच्या सर्व कादंबऱ्या वाचल्या. नंतर गो. नी. दांडेकर यांच्या शिवशाहीवरील व संतचरित्रावरील कादंबऱ्यांचा फडशा पाडला. पुढे हा प्रवाह महाकाव्यावरील कादंबऱ्यांकडे वळला. काव्य शाळाकॉलेजात अभ्यासले तेवढेच. पुढे ते समजण्यापलीकडे गेले. जे सहज समजले त्याचा आनंद घेतला. आरती प्रभू, सुर्वे, विंदा, कुसुमाग्रज, पाडगावकर, बापट पुन्हा पुन्हा वाचले, पण 'ग्रेस'च्या वाट्याला जाणे जमले नाही. पुढे काव्यवाचन ही एक 'प्रयोगशील कला' (परफॉर्मिंग आर्ट) झाली; त्यांच्या प्रस्तावनांतून थोडी गोडी निर्माण झाली पण ते तेवढेच!

आपण वाचलेल्या पुस्तकाचे नाव, त्याचा लेखक, प्रकाशक इत्यादींचे छोटे टिपण एका स्वतंत्र रोजनिशीत करून ठेवण्याची सवय मला प्रथमपासूनच होती. त्यामुळे आपल्या वाचनप्रवासात आपण काय मिळविले, त्यापासून आपण किती समाधानी आहोत हे वेळोवेळी पाहता आले.

**समवयस्क साहित्यप्रेमी मंडळींनी एकमेकाला 'शिफारिश' केलेली पुस्तके वाचणे, त्यावर चर्चा करणे, साहित्यिक कार्यक्रम, व्याख्यानांना हजेरी लावणे व आपली जाण अधिक वाढविणे हा स्वयंशिक्षणाचा 'राजमार्ग' झाला. विशेष आवडलेली पुस्तके विकत घेऊन आपला संग्रह समृद्ध करणे व इतरांना ती वाचण्यास देणे यातून 'समानशील' मित्रामधील संबंध अधिक घनिष्ठ होण्यास मदत झाली.**

वाचनातून 'बरेवाईट' समजू लागल्यावर काल्पनिक कथा, कादंबऱ्यांत मन रमेनासे झाले. अर्थात् गोनीदांच्या सुरुवातीच्या कादंबऱ्या (शितू, पडघवली, कोणा एकाची भ्रमणगाथा) श्री. ना. पेंडसे, जयवंत दळवी, अरुण साधू, भालचंद्र नेमाडे यांचे संपूर्ण वाङ्मय हे सन्मान्य अपवाद. सर्व व्यक्तींची आत्मचरित्रे, आठवणी, चरित्रे, स्त्रियांची आत्मकथने, दलित लेखकांची आत्मनिवेदने, य. दि. फडके यांचे विसाव्या शतकातील व्यक्तींवरचे संशोधनात्मक लिखाण, ललित लिखाण – श्रीनिवास कुलकर्णी, प्रकाश संत, दुर्गा भागवत (पैज, व्यासपर्व), इरावती कर्वे (यांचे समाजशास्त्रीय लेखन - युगांत, धर्म, हिंदू समाज, संस्कृती), रा, भि. जोशी,

शांता शेळके, शिरीष पै, सरोजिनी वैद्य, अजिता काळे, पद्मजा फाटक, अरुणा ढेरे यांचे ललित गद्य मन आकर्षून घेऊ लागले. व्यक्तिचित्रे – रामदास भटकळ ((जिगसॉ), विद्याधर पुंडलिक (आवडलेली माणसे), अनंत भालेराव (मांदियाळी), रवींद्र पिंगे (अंगणातलं चांदणं, शतपावली, पश्चिमेचे पुत्र, देवाघरचा पाऊस) पुलं व सुनीता देशपांडे यांची सर्व पुस्तके, टाळता न येणारी. विशेष आवडणारे कथालेखक/लेखिका – गंगाधर गाडगीळ, दि. बा. मोकाशी, श्री. दा. पानवलकर, विद्याधर पुंडलिक, व्यंकटेश माडगूळकर, जी. ए., शरच्चंद्र चिरमुले, आशा बगे, सानिया, गौरी देशपांडे, मेघना पेठे, निसर्गलेखक मारुती चितमपल्ली, प्रकाश गोळे व शेवटी न टाळता येणारे अनिल अवचट यांचे सर्व लिखाण हा अखंड आनंदाचा ठेवा. समीक्षकांमधे म. ना. धोंड, विजया राजाध्यक्ष, य. दि. आणि वा. ल. कुलकर्णी हे खास आवडीचे. संगीतावरील लिखाणात ना. सी. फडके (गानलुब्धाच्या आठवणी, कटाक्ष), गोपाळकृष्ण भोळे, केशवराव भोळे (वसंतकाकाची पत्रे, अस्ताई, अंतरा, माझे संगीत) वामनराव देशपांडे (आलापिनी - घराणेदार गायकी), रामकृष्ण बाक्रे (षड्ज गांधार), कृ. द. दीक्षित (सहवास, अत्तर सुगंध), प्रभा अत्रे (स्वरमयी, सुस्वराली), शंकर अभ्यंकर (स्वरभास्कर) व आताचे अच्युत गोडबोले (नादवेध) या सर्वांनी संगीताभिरुची समृद्ध केली. वृत्तपत्र संपादकांत गोविंदराव तळवलकर – यांची सर्व पुस्तके वाचनसंस्कृती जोपासणारी. अरुण टिकेकर (स्थलकाल, अक्षरनिष्ठांची मांदियाळी) जुन्या संपादकांपैकी ग. वा. बेहरे (सोबत) आचार्य अत्रे (मराठा) यांचे अग्रलेख, श्री. ग. माजगावकर यांचे 'माणूस'मधील लेखन आवडीने वाचले होते.

नवीन लेखकांत, विश्वास पाटील (झाडाझडती, महानायक, पानिपत), मिलिंद बोकील (शाळा, उदकाचिया आर्ति, समुद्रापारचे समाज), अनंत मनोहर (राव, अरण्यकांड), ह. मो. मराठे (बालकाण्ड), अनंत सामंत (एम.आय.टी.आयवा मारु), यशवंत पाठक (अंगणातले आभाळ), प्रभाकर पेंढारकर (रारंग ढांग, चक्रीवादळ) हे आवडतात. लक्ष्मण लोंढे, सुबोध जावडेकर, जयंत नारळीकर, बाळ फोंडके, निरंजन घाटे यांच्या विज्ञानकथा व रत्नाकर मतकरी यांच्या गूढकथा अजूनही वाचाव्याशा वाटतात. वर्तमानपत्रांत सदर लेखन करणारे आपल्या निवडक लेखांचे संग्रह प्रसिद्ध करतात. त्यातील कित्येक लेख प्रासंगिक स्वरूपाचे असतात ते पुढे पुस्तकरूपात अनाकर्षक ठरतात. परंतु, शांता शेळके (सांगावेसे वाटले म्हणून, रंगरेषा), विजया राजाध्यक्ष (तळ्यात मळ्यात) विजय तेंडुलकर (कोवळी उन्हे) यांचे सदरलेखन सदा प्रसन्न वाटते. प्रदीप कर्णिक यांचे 'जावे ग्रंथाच्या गावा' हे सदर पुस्तकरूपाने दहा वर्षांनंतर प्रसिद्ध झाले तरी आज आवडीने वाचले जाईल इतके ताजे वाटते.

वैचारिक लेखनात नरहर कुरुंदकरांनी आपले युग निर्माण केले (जागर, शिवरात्र, धार आणि काठ), विंदा करंदीकर, रा. चिं. ढेरे, चित्रकार द. ग. गोडसे यांची सर्व पुस्तके माहितीपूर्ण व संग्रही ठेवण्याजोगी. जी. ए. कुलकर्णी यांच्या पत्रांचे चार खंड मौजने प्रकाशित केले. त्यांच्या व्यासंगाची व्याप्ती पाहून थक्क होतो. इतिहास लेखन तेही रंजक पद्धतीने, ही सेतुमाधवराव पगडी यांची खासियत. परचुरे प्रकाशनने प्रसिद्ध केलेली त्यांची सर्व पुस्तके आपल्या इतिहासविषयक ज्ञानात स्पृहणीय भर घालतात. त्यांच्या 'जीवनसेतू' आत्मचरित्रात त्यांच्या वाचनाची गती, मुख्यत: विद्यालयीन जीवनातील, पाहून आश्चर्य वाटते. मीना प्रभू यांनी प्रवासवर्णनात लक्षणीय भर घातली आहे (चिनी माती, दक्षिणपर्व, इजिप्तायन इ.) प्रवासवर्णन हा लेखनप्रकार कोणत्याही लेखकाचा असला तरी मी चाहून वाचतो.

इंग्रजी लेखकांत – स्टीफन झ्वाईग, आयर्विंग वॅलेस, पर्ल बक, कोस्लर, जिम कार्बेट, सॉमरसेट मॉम, ऑर्थर हेली, ए. जे. क्रोनिन, पी. जी. वुडहाऊस, ॲन रँड, ॲगाथा ख्रिस्ती यांचे सर्व महत्त्वाचे लेखन वाचले. भारतीय इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर, आर. के. नारायण, नॉयपॉल यांच्या कादंबऱ्या वाचल्या. भाषांतरित इंग्रजी लेखन मी सहसा वाचत नाही. पण भारतीय भाषा भगिनींच्या (बंगाली, कन्नड, गुजराथी, पंजाबी) लेखकांचे लेखन आवर्जून वाचतो. अशोक जैन यांनी अनुवादित केलेली पुस्तके तसेच पत्रकारांची पुस्तके (निळू दामले, माधव गडकरी, कुमार केतकर) चुकवून चालत नाही.

गेल्या पंचेचाळीस वर्षांतल्या वाचनाचा हा जोखानामा.

साहित्यातील वेगवेगळे प्रवाह वाचनाच्या आड आले नाहीत. वाचनीयता हाच पुस्तके निवडण्याचा निकष. विषयाचे नावीन्य, सोपी पण परिणामकारक अर्थवाही शैली मी पसंत करतो. पुष्कळशा लेखकांना शब्दबंबाळ लिखाण करावयास आवडते. छोट्या स्फुटलेखनात जरी हे चालून जात असले तरी कथा, कादंबरीची परिणामकारक अशा शैलीने नष्ट होते. प्रकाशनगृहाकडे असलेल्या ग्रंथसंपादकांकडून अशा लिखाणावर संस्कार करणे आवश्यक आहे याची लेखकांना कल्पना नसते. या बाबतीत 'मौज' प्रकाशनगृहाची थट्टा पूर्वी बऱ्याच वेळा केली जात असे. तरीसुद्धा त्यांची प्रकाशने ही किती देखणी, विषयसुसंगत, मुद्रणदोषरहित, अचूक तपशिलांनी समृद्ध असतात याचा प्रत्यय वाचकाला, प्रकाशनव्यवसायाच्या तांत्रिक बाजू माहीत नसताना सुद्धा येतो. पॉप्युलर, राजहंस, पद्मगंधा यांची प्रकाशने सुद्धा या संदर्भात पाहावी.

मला प्रत्यक्ष वाचकचळवळीत न भाग घेणे शक्य झाले नाही. पण ऑफिसमध्ये वाङ्मयमंडळाच्या स्थापनेत पुढाकार, ग्रंथालयासाठी

**वेळेचं बंधन जिथे झुगारून द्यावंसं वाटतं असं केवळ 'पुस्तक'.**

पुस्तकांची निवड, असा सहभाग राहिला. निवृत्तीनंतर वाचनासाठी भरपूर वेळ व स्वास्थ्य लाभल्यामुळे शिस्तशीर वाचन सुरू झाले. 'दिवा' वाचकस्पर्धेत (२००५) पहिल्या पारितोषिकाला पात्र झालो.

काही पुस्तकांनी त्या त्या काळात झपाटून टाकले. त्यातील काही – रणांगण (विश्राम बेडेकर), स्वामी (रणजित देसाई), विश्रब्ध शारदा (संपा. हरी मोटे), झाडाझडती (विश्वास पाटील), स. ह. देशपांडे, मंगला गोडबोले संपादित- अमृतसिद्धी भाग १/२, बारोमास (सदानंद देशमुख), बखर एका राजाची (त्र्यं. वि. सरदेशमुख), आमचा बाप आन् आम्ही (नरेंद्र जाधव), संकलन (श्री. बा. जोशी), एक होता कार्व्हर, भगीरथाचे वारस (वीणा गवाणकर), हल्ली वाचलेल्यांत - कायदेआझम बॅ. जिना (आनंद हर्डीकर), चकवाचांदण (मारुती चितमपल्ली), ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी (प्रतिभा रानडे), अज्ञाताचे विज्ञान (डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी), बापलेकी (संपा. पद्मजा फाटक व इतर), काबुलीवाल्याची बंगाली बायको (अनु. मृणालिनी गडकरी), गंगाजळी भाग १/२ (श्री. बा. जोशी) ही सहज आठवणारी काही. ही कधीही वाचावीत – आनंद, केवळ आनंदच देतील.

**ब. अ. अळवणी**
११, सहवास, बी. पी. क्रॉस रोड नं. ४, बँक ऑफ इंडियासमोर, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०००८०
फोन ०२२-२५६४१९४९ भ्रमणध्वनी ९८१९९७०९६७




**माधव गजानन साने**

## प्रत्येक शुभकार्यात आवर्जून पुस्तकांचीच भेट देण्याचे व्रत

ते १९६० साल होतं. त्यावेळेस मी प्राथमिक शाळेत होतो आणि माझे काका दादा साने ह्यांच्याकडे राहात होतो. माझ्या वाचनप्रवासाचे सर्व श्रेय त्यांना आहे. त्यांचे माझ्यावरचे ऋण हे न फिटणारे आहे. आईवडिलांनी मुलांवर संस्कार कसे करावेत हे त्यांच्याकडून शिकावे. पूर्वीच्या काळी पैशाची श्रीमंती नव्हती, पण मनाची श्रीमंती खूप होती. आपल्या पाच मुलांसाठी व माझ्यासारख्या पुतण्यासाठी त्यांनी जे अपार श्रम केले त्याला तोड नाही. घरची परिस्थिती चांगली नसूनसुद्धा ते पुस्तकांचा संग्रह करायचे. वेळोवेळी फुटपाथवर स्वस्तात मिळणारी पुस्तके ते दोनचार आण्याला विकत घेत व संग्रहात भर घालत. त्याकाळी मुलांच्या भावविश्वात 'चांदोबा'चे स्थान फार मोठे होते. त्याची सुबक छपाई, सुंदर चित्रे, आकर्षक पण बोधपर गोष्टी यांचे सगळ्यांना खूप आकर्षण होते. त्यातल्या क्रमश: गोष्टी आम्ही सर्वच मुले आतुरतेने वाचावयाचो आणि दर महिन्याला ठराविक दिवशी चांदोबा येण्याची आतुरतेने वाट बघायचो. माझ्या काकांनी प्रत्येक वर्षाचे १२ अंक बाईंड केलेले होते. त्यामुळे क्रमश: गोष्टी सलग वाचता यायच्या. त्यांनी निर्माण केलेला खजिना अफाट होता. या खजिन्यात सानेगुरुजी, वि. वा. बोकील, महादेवशास्त्री जोशी अशी कितीतरी रत्ने होती. या खजिन्यात नाना विषयांची जवळजवळ १००० पुस्तके होती. एखाद्या घरात एवढी पुस्तके असणे ही खरोखरीच अभूतपूर्व गोष्ट होती.

या खजिन्याने माझे भावविश्व अतिशय समृद्ध झाले. वेगवेगळ्या विषयांची मला लहान वयातच ओळख झाली. त्याकाळी वाचलेल्या समुद्रसैतान या कॅ. नेमोच्या पाणबुडीचं जग अजूनही माझ्या स्मरणात आहे. वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत समुद्र व होडी न पाहिलेला मी, पण या पुस्तकाने झपाटून गेलो होतो. वाचताना माझी तहानभूक हरपत असे. कित्येक वेळा आई व काकूंची बोलणी खाऊन मी जेवायला बसत असे.

'ग्रंथ हे गुरू' असं का म्हणतात हे मला बऱ्याच वर्षांनी कळलं, पण वाचनाचे संस्कार माझ्यावर लहान वयात झाल्यामुळे माझ्यात दिसेल ते पुस्तक वाचण्याची आवड माझ्यात निर्माण झाली. मग त्यानंतर माझी वाचनाची भूक वाढतच गेली. शाळेतील सर्व पुस्तके पालथी घातल्यानंतर मी नवीन वाचनालयांकडे माझा मोहरा वळविला. दरवर्षी परीक्षा संपल्यावर तीन महिने, नवीन शालेय वर्ष सुरू होईपर्यंत मी वाचनालयात बुडून जात असे.

त्याकाळी किताब मिनार, प्रभात वाचन मंदिर आणि महाराष्ट्र राज्य वाचनालय ह्यांनी माझं वाचनाचं वेड भरपूर पुरवलं. त्याकाळी अर्नाळकरांच्या रहस्यकथांनी मला वेड लावलं होतं. धनंजय, झुंजार आणि काळापहाड ह्यांच्या रोमांचित करणाऱ्या साहसांमध्ये मी रममाण होत असे. अर्नाळकरांच्या रहस्यकथांना मराठी वाङ्मय न समजणाऱ्यांची मला अतिशय कीव येते. त्यांच्या त्या छोट्याशा १२० पानी पुस्तकांत वाचकाला खिळवून ठेवण्याची अद्‌भुत

शक्ती होती; साहसवृत्ती जोपासण्याची प्रेरणा होती तसेच बुद्धिचातुर्याने गुन्हे उकलण्याची कल्पकतापण होती. दोनशे-तीनशे रहस्यकथांचा फडशा मी त्याकाळी पाडला.

शाळेत असताना ऐतिहासिक कादंबऱ्या वाचण्याची गोडी मला लागली. त्याकाळी वि. वा. हडप यांच्या 'पेशवाई'वरच्या कादंबऱ्या, 'शिवाजी' महाराजांवरच्या कादंबऱ्या वाचून मी अतिशय भारावून जायचो. 'वीरधवल', 'इंद्रभुवन गुहा' यासारख्या अद्‌भुत आणि रोमांचकारक कादंबऱ्यांनी मला खूप आनंद दिला. 'सोनेरी टोळी' या कादंबरीत व्हाईट कॉलर गुन्हे करणाऱ्यांना, पोलिसांकडे न जाता कशी जरब बसविली आहे, तसेच गरीब व फसविलेल्या माणसांना कशी मदत केली होती ह्यांचे फार सुंदर वर्णन आहे. ह्यातील बुद्धिचातुर्याच्या गोष्टी वाचून मला ह्या सर्वसामान्य पण कल्पक नायकाचे अतिशय कौतुक वाटायचे. टीव्हीवर गाजलेली 'व्योमकेश बक्षी' ही मालिका बघताना या पुस्तकाची आठवण झाली आणि पुन:प्रत्ययाचा आनंद प्राप्त झाला.

बोकील, ना. सी. फडके, पु. भा. भावे, इ. लेखकांच्या कादंबऱ्या मी वाचल्या, पण माझं मन त्यात फार रमलं नाही.

'स्वामी' ही कादंबरी सर्वार्थाने मराठी साहित्यात एक मैलाचा दगड ठरावी. साहित्यगुणांनी तर ती सर्वांगसुंदर होतीच, पण मराठी साम्राज्याच्या इतिहासात माधवराव पेशव्यांचे स्थान तिने सुवर्णाक्षरात लिहिले. लेखक रणजित देसाई हे या एकाच कादंबरीने अजरामर झाले. या कादंबरीइतकी परिणामकारक, बांधेसूद कादंबरी माझ्या पाहण्यात नाही. ही कादंबरी म्हणजे मराठी सारस्वत्याच्या गळ्यातील कौस्तुभ मणीच आहे.

या कादंबरीचा दुसरा विशेष म्हणजे रा. ज. देशमुख या प्रकाशकांनी केलेली तिची सवलत योजना. पुस्तक प्रसिद्ध व्हायच्या आत वाचकांनी या कादंबरीसाठी रांगा लावून ॲडव्हान्स बुकिंग केलं होतं. ज्याप्रमाणे घरोघरी ज्ञानेश्वरी आणि तुकारामाची गाथा असते त्याप्रमाणे या पुस्तकाने त्याकाळी मराठी माणसाच्या घरोघरी स्थान पटकावले.

माझ्या इतिहासकालीन कादंबऱ्यांचा ओघ पुढे 'झेप', 'झुंज' (ना. सं. इनामदार), पर्यंत चालू राहिला आणि आता 'पानिपत' व 'संभाजी' (विश्वास पाटील) यापर्यंत येऊन पोहोचला आहे. विश्वास पाटीलांची 'पानिपत' माझ्या डोळ्यांत पाणी आणून गेली. 'स्वामी'ने मला अभिमानाचे स्फुरण दिले, तर 'पानिपत'ने दु:खाच्या आठवणी दिल्या. पण विश्वास पाटलांनी आणि इतिहासाशी प्रामाणिक राहून एक अतिशय परिणामकारक सुंदर कादंबरी वाचकांना दिली आहे.

माझ्या या वाचनप्रवासात दिवाळी अंकांनाही मोलाचे स्थान आहे. मला वाटतं, मराठी माणूस आणि दिवाळी अंक ह्यांचं अतूट नातं आहे. ह्या दिवाळी अंकांनी अनेक लेखकांना जन्माला घातलं, ज्याप्रमाणे गाणं ऐकणारे अनेक कानसेन असतात त्याप्रमाणे दिवाळी अंकांनी अनेक वाचक निर्माण केले.

आचार्य अत्रे ह्यांच्या साहित्यपरंपरेचा तसेच संपादकीय अग्रलेखांचा मी चाहता होतो. त्यांचे अग्रलेख म्हणजे जिवंत व तेजस्वी वाङ्मयाचा वस्तुपाठ होते. त्यांचे अग्रलेख म्हणजे भाल्याची पाती होती, आसूड होते.

या साहित्यगंगेच्या पाण्याने शैशवापासून ते आतापर्यंत आनंदच आनंद झाला. जीवन समृद्ध झाले. भावविश्व विस्तारले. मन सुसंस्कृत झाले. जगण्याची उमेद दिली. लढण्याचे बळ दिले. गरिबांबद्दल किंवा गरजवंतांबद्दल कणव निर्माण केली आणि त्यांना मदत करण्याची बुद्धी दिली.

ज्या माझ्या पितृतुल्य काकांनी हा साहित्याचा वृक्ष माझ्या मनात निर्माण केला त्यांचे ऋण फेडण्याची वेळ आता आली आहे. असे अनेक वृक्ष निर्माण करून या साहित्य अंकुरांना रुजविण्याची वेळ आली आहे. त्यासाठी प्रत्येक शुभकार्यात गेली पंचवीस वर्षे आहेर म्हणून मराठी पुस्तके देण्याचे व्रत मी आचरत आहे. तसेच वाचकांचा एक संघ निर्माण करून दर महिन्याला नवीन पुस्तके विकत घेऊन वाचक संस्कृती वाढवण्याचा प्रयत्न करीत आहे.

परवा इंग्रजीत शिकणाऱ्या, अमेरिकेत राहणाऱ्या नातवाचा फोन आला आणि कृतार्थ वाटलं. त्याच्या मुंजीत त्याला दिलेल्या पुस्तकांचे वाचन तो आवर्जून करतोय, त्याचीपण माझ्याप्रमाणेच तहानभूक हरपत आहे, हे ऐकून नकळत डोळ्याच्या कडा ओलावल्या आणि काकांच्या आत्म्याला समाधान वाटेल, असं आपण काही करू शकलो हे जाणवून मन आनंदाने भरून आलं.

**माधव गजानन साने**
९१७,६, गणेशवाडी 'शंकर' बंगला,
डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४
फोन २५६५६३०९

**हवंहवंसं वाटतं पण काय ते सांगता येत नाही असं जे काही असतं ते भरभरून 'पुस्तक' देतं**



## उत्तेजनार्थ

**सौ. सुमेधा पोळ**

### हिंदी भाषेच्या प्रदेशात राहूनही मराठी पुस्तकांचे आमच्या घरात समृद्ध साम्राज्य.

**सा**धारणत: १९७४-७५ ची गोष्ट असेल. मी तिसरी किंवा चौथीत होते. वडील बँकेत नोकरीला असल्याने दर दोनतीन वर्षांनी बदली ठरलेली! प्रत्येक वेळी नव्या जागी नव्याने सुरुवात करावी लागत असे. त्यावर्षी वडिलांची नाशिकहून पुण्याला बदली झाली होती. शहर नवीन, आजूबाजूला ओळखी व्हायच्या होत्या, शाळा सुरू व्हायची होती, त्यावेळी वडिलांनी तीनचार 'अमर चित्रकथा' आणून दिल्या होत्या. आणि पहिल्यांदा आपण काही वाचतोय याची जाणीव झाली. कारण तोपर्यंत वाचायची सवय नव्हती आणि समजण्याचं वयही नव्हतं, पण 'अमर चित्रकथा'ने वाचायची आवड निर्माण करण्याचं काम केलं. आईवडील दोघांनाही वाचनाची आवड होती. आईने पुण्यात येताच लायब्ररी लावली. ती लायब्ररी बघितल्यावर काय वाचू, कुठून सुरुवात करू समजेनासे झाले. लेखकांची नावे माहिती नव्हती. आपल्याला काय आवडू शकतं याचा अंदाजच नव्हता. कारण तोपर्यंत अमर चित्रकथा आणि चंपक व्यतिरिक्त दुसरं काही वाचलंच नव्हतं. त्यामुळे सुरुवात झाली ती २४ पानी छोट्या छोट्या पुस्तकांनी 'जादूचा घोडा', 'जादूची सतरंजी' अशा प्रकारच्या नावांची ती पुस्तकं त्या वयात फारच आवडायची. रोज संध्याकाळी लायब्ररीत जाण्याची ओढ लागायची. थोडं मोठं झाल्यावर 'हिमगौरी आणि सात बुटके', 'हॅन्स ॲण्डरसनच्या परीकथा' भा. रा. भागवत, लीलावती भागवत, आशा भाजेकर यांची काही पुस्तकं वाचनात आली आणि त्या पुस्तकांची त्या वयात मनावर जबरदस्त मोहिनी होती. पाचवीच्या वर्गात हुजूरपागा शाळेत ॲडमिशन झाली आणि खऱ्या अर्थाने वाचनाला सुरुवात झाली. त्या शाळेचं वाचनालय तेव्हा खूप मोठे वाटायचे. दहा मिनिटांच्या सुट्टीत डबा खायचा आणि मोठ्या सुटीत पुस्तकांसाठी वाचनालयाकडे धाव घ्यायची हे अगदी ठरून गेलेलं होतं. तिथेच सानेगुरुजींची 'श्यामची आई', 'तीन मुलं' ही पुस्तकं वाचायला मिळाली. 'कुमार', 'फुलबाग', 'किशोर', 'आनंद' या मासिकांची ओळख झाली. 'फास्टर फेणे', 'गोट्या', 'चिंगी' हे मित्र झाले. त्यावेळी चांदोबाही मनापासून आवडायचा. त्यातील वेताळ तर अजूनही आवडतो.

नंतर वडिलांची बदली वर्धा जिल्ह्यातील आर्वी या छोट्या गावी झाली. मन खट्टू झालं की आता आपल्याला पुस्तकं कशी मिळतील? शिवाय पुण्यातून एकदम छोट्या गावात जाणं म्हणजे एक प्रकारचा कल्चरल शॉकच होता. तिथे जाऊन स्थिरस्थावर झाल्यावर एक दिवस तिथल्या वाचनालयाचा शोध लागला आणि खजिना सापडल्याचा आनंद झाला. तेव्हा वय अर्धवट होतं. लहान मुलांच्या पुस्तकांमधली रुची कमी झाली होती, पण मोठ्यांच्या कथा-कादंबऱ्या वाचण्याचे वयही नव्हते. पण तरी आई ज्या कादंबऱ्या आणत असे त्या तिच्या नकळत वाचायला मजा येत असे. तिथेच पु. ल. देशपांडेंच्या साहित्याची ओळख झाली. त्यांच्या 'बटाट्याची चाळ' या पुस्तकाने हसायला शिकवलं. विनोदी साहित्यप्रकाराची ओळख करून दिली. 'पूर्वरंग', 'अपूर्वाई'ने प्रवाणवर्णनं वाचायची उत्सुकता निर्माण केली. हळूहळू चतुरस्त्र वाचनाची सवय विकसित होऊ लागली होती.

आणि पुन्हा वडिलांच्या बदलीने त्यात व्यवधान आणलं. नांदेडला गेलो. नांदेड छोटंसं शहर! गुरुद्वारासाठी प्रसिद्ध. इथेही चांगले वाचनालय मदतीला आले. नांदेड नगरपालिकेची सुंदर लायब्ररी बघितली आणि एकदमच नांदेड शहराच्या प्रेमात पडले. त्या चार-साडेचार वर्षांत भरपूर पुस्तकं वाचली. त्यात वयानुसार प्रणयरम्य कादंबऱ्यांची भर पडली. कुसुम अभ्यंकर, योगिनी जोगळेकर, सुमती क्षेत्रमाडे, कुमुदिनी रांगणेकर, नयना आचार्य, गिरिजा कीर यांची पुस्तकं आवडू लागली. त्यातही सुमती क्षेत्रमाडेंच्या कादंबऱ्या मनात घर करून राहू लागल्या.

नांदेडला नरहर कुरुंदकरांच्या घराजवळ रहात होतो. तेव्हा पहिल्यांदा वैयक्तिक पुस्तक संचयाचा परिचय झाला. नरहर कुरुंदकरांकडे खूप पुस्तके होती. ते रस्त्याने चालत जात असताना सुद्धा त्यांच्या हातात एखादे पुस्तक असे. त्यावेळी मनात कुठेतरी आपल्या घरीही पुस्तकं असावीत असे वाटू लागले. तोपर्यंत लायब्ररीच्या पुस्तकांनीच मन तृप्त होत होते. एकदा वडिलांनी माझ्या वाढदिवसाला मला एकदम ५ पुस्तकांची भेट दिली. ती माझ्यासाठी एक अविस्मरणीय गिफ्ट ठरली. त्यानंतर वेळोवेळी घरी पुस्तकं विकत घेतली गेली. 'श्रीमानयोगी', 'स्वामी', 'मृत्युंजय' ही आपली हक्काची पुस्तकं वाचताना वेगळाच आनंद होऊ लागला.

पुढे कॉलेज शिक्षणासाठी पुण्यात गेल्यानंतर कॉलेजच्या लायब्ररीतून अभ्यासाव्यतिरिक्त इतर पुस्तकं घेण्यातच अर्धे वर्ष निघून जायचे. लायब्रेरियन सरांना पटवून पुस्तकं घेण्यात बरीच शक्ती/युक्ती खर्च करावी लागे, पण त्यातही गंमत होती. त्यावेळी 'व्होल्गा जेव्हा लाल होते', 'इस्त्रायल छळाकडून बळाकडे', 'आयडास्कडर', 'वंशवृक्ष', 'माते नर्मदे', 'प्रकाशवाटा' इ. पुस्तकं वाचल्याचे आठवते.

एवढं सगळं असलं तरी घरी, परिवारात पुस्तकांबद्दल चर्चा करण्याव्यतिरिक्त अन्य कुठल्या सार्वजनिक वाचन चळवळीशी संबंध आला नाही.

लग्नानंतर मध्यप्रदेशात जबलपूरला आले. आता तर प्रांतच बदलला होता. आजूबाजूला सर्व हिंदी, अपरिचित वातावरण पण पतींना वाचनाची प्रचंड आवड, अगदी व्यसनच ते! पण त्यामुळे भरपूर वेगवेगळ्या प्रकारची पुस्तकं वाचायला मिळाली. त्यांच्यामुळे अनुवादित साहित्याचा परिचय झाला. अनुवादित पुस्तकं वाचायची आवड निर्माण झाली. वाचनाचे बंधन असे काहीच राहिले नाही. त्यांना पुस्तके विकत घेऊन वाचायचा छंद आहे त्यामुळे आज आमच्या घरात जिकडे तिकडे पुस्तकांचेच साम्राज्य आहे. सातशे-आठशे वेगवेगळी पुस्तके आमच्याकडे असतील. त्यात धार्मिक, आध्यात्मिक, चरित्र, आत्मचरित्र, विनोदी, ललित, ऐतिहासिक, सामाजिक, वैचारिक, कथा, कादंबऱ्या, लघुकथा, कविता... सर्व प्रकार आहेत. स्वामी विवेकानंदांच्या साहित्यापासून अगदी आत्ताच्या नवोदित लेखकांपर्यंत सर्व पुस्तके गुण्यागोविंदाने आमच्या घरी नांदत आहेत.

असे वाचन चालू असताना मनात रेंगाळणारे पुस्तक म्हणाल तर एखादेच नाव सांगून चालणार नाही. पु.लं.चं 'गणगोत' मनात रेंगाळतं म्हणताना व.पुं.च्या 'पार्टनर'ची आठवण येते. कुठेतरी पु.भां.चे प्रथम पुरुषी एकवचनी आठवत असते, तर कधी तरी एकदम किरण बेदीचे 'आय डेअर' आठवते. मधूनच सुमती क्षेत्रमाडेंची 'महाश्वेता' आठवते, तर त्याच वेळी बेट्टी मेहमुदीचे 'नॉट विदाऊट माय डॉटर' किंवा भारती पांडेंचे अनुवादित 'मयादा : इस्रायल कन्या' मनाला अस्वस्थ करून जाते. इतक्यात मनात घर करून राहणारी पुस्तके म्हणजे सुधा मूर्तींची 'गोष्टी माणसांच्या' आणि 'वाईज ॲण्ड अदरवाईज', शांता शेळकेचे 'आंधळी' ही सांगता येतील. 'मयादा...' 'द दा विंची कोड' ही नवीन पुस्तकेही विचार करायला लावणारी आहेत तर 'इडली ऑर्किड आणि मी' किंवा 'ही श्रींची इच्छा' ही पुस्तके मेहनतीचे महत्त्व अधोरेखित करतात. आजच्या तरुण पिढीने – ही पुस्तके वाचलीच पाहिजेत.

वाचक चळवळीत कधी भाग घेतला नाही, पण आमच्या महिलांच्या ग्रुपमध्ये एकेका पुस्तकावर वाचन आणि गप्पा असा कार्यक्रम सुरू केला आहे. नवीन पुस्तके नाही मिळाली तरी आम्हाला मिळणारे प्रत्येक पुस्तक आमच्यासाठी नवीनच असते.

हिंदी प्रदेशात रहात असल्याने हिंदी साहित्य वाचायचा प्रयत्न सुरू केला आहे. हळूहळू रुची वाढते आहे. मालती जोशी, शिवानी यांची पुस्तके आवडू लागली आहेत.

मराठीतील प्रथितयश लेखकांचे सर्वच लेखन आवडते असे नाही, पण तरी पु. ल. देशपांडे, व. पु. काळे यांनी त्या त्या वयात झपाटून टाकले होते. आशा बगे, सानिया यांच्या कथांमध्ये मन रमले होते. ना. सं. इनामदार, रणजीत देसाई, शिवाजी सावंतांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांनी वेड लावले होते, पण शिरीष कणेकरांचे लेखन एव्हरग्रीन म्हटले पाहिजे. कॉलेजच्या वयापासून आत्तापर्यंत त्यांचे जवळपास सर्वच लेखन वाचले आहे.

इतक्या प्रकारची पुस्तकं वाचत असताना कुठला साहित्यप्रकार जास्त आवडतो याचा विचार केला तर आत्मचरित्र, चरित्र, ललित आणि स्फुट लेखनाचे संकलन हे जास्त आवडते.

वाचक म्हणून काही वेगळी भूमिका नसते. मात्र मला आवडलेली पुस्तकं घरात सर्वांना आग्रहाने वाचायला लावणे, मैत्रिणींना वाचायला देणे, त्यावर प्रयत्नपूर्वक चर्चा करणे, लेखकाला लेखन आवडल्याचे पत्र लिहिणे इ. गोष्टी चालू असतात.

तर असा हा वाचनप्रवास अविरत चालू राहणारच आहे. या वाचनछंदाने आमच्या आणि आता मुलांच्याही आयुष्याला वेगळे वळण दिले आहे.

**सौ. सुमेधा पोळ**
११२६, 'मैत्र',समाधान अस्पताल के पास
राईट टाऊन, जबलपूर ४८२००२




# द दा विंची कोड

डॅन ब्राऊन    अनु. अजित ठाकूर

**एवढे या पुस्तकात आहे तरी काय?**

एका खुनाच्या शोधातून समोर आलेली अनेक सांकेतिक चिन्हं.. धार्मिक संकेत आणि त्यातून उलगडत गेलेले प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले गूढ प्रक्षोभक रहस्य...

**३२०रु. पोस्टेज ३०रु.**




**मेधा तेलंग**

## वाचनाचा प्रवास अजून सुरुवातीच्या टप्प्यावर आहे. क्षितिजापलीकडे बरेच काही अंधुक दिसतेय

**वा**चनप्रवासाचेच सिंहावलोकन करायचा विचार सुरू केला तेव्हा मी शाळेच्या विश्वात गेले, कारण वाचनप्रवासाला सुरुवात श्री गणेशा पासून होते. तो प्रवास छान झला. प्राथमिक शाळेचा अभ्यास आणि त्याकाळात वाचनात येणाऱ्या 'ये रे ये रे पावसा'पासून टिळक, गांधीजी त्यांच्याबद्दलच्या जाड आणि मोठ्या अक्षरातील पुस्तकं पुढे आली. बाटलीतला राक्षस, परीकथा - सारं सुंदर, सुगंधी विश्व. त्यावेळचा 'चांदोबा', 'कुमार', 'तेनालीराम', छोटी छोटी रामायण-महाभारताच्या गोष्टींची पुस्तकं, सुंदर शंभर विनोद, सर्व सणांची माहिती सांगणारी पुस्तकं असं बरंच काही वाचलेलं आठवलं. चांदोबातली ती रंगीत चित्रं बघणं हा माझ्या आवडीचा विषय होता. अजूनही मला लहान मुलांच्या भावविश्वात आणि त्यांच्या पुस्तकातल्या त्या अप्रतिम चित्रांत रमायला खूप आवडतं. दिवाळीचा धडा असेल आणि पुस्तकात खेड्यातलं कौलारू घर, तिथे लावलेला आकाशकंदील, एखादी ताई रांगोळी काढते, दारापुढची ओसरी वगैरे चित्र मला खूप वाचायला आवडतात. माझ्यामते चित्र बघणं आणि त्यात एकरूप होणं म्हणजे आपण त्याच्याशी संवाद करतो तिथेच मनातलं वाचन सुरू होतं. माणसांचे चेहरे वाचणं हा माझा आवडता छंद.समोरचा काय विचार करत असेल हे मी त्याच्या चेहऱ्यावरून वाचू शकते. असं मला वाटतं.

शालेय विश्व संपलं आणि कॉलेजच्या जगात वावरू लागले त्यावेळी सुमती क्षेत्रमाडे, योगिनी जोगळेकर, कुसुम अभ्यंकर, शैलजा राजे, विजया राजाध्यक्ष, ना. सी. फडके. वि. स. खांडेकर यांची पुस्तके वाचली.

महाविद्यालयात मराठी विषय घेतल्यामुळे वाचनात भर पडली. मराठी नाटकातील शोकांतिका याचा अभ्यास केला आणि 'सवाई माधवरावांचा मृत्यू', 'एकच प्याला', 'उद्याचा संसार', 'हिमालयाची सावली' यातून नाटक आणि त्याच्या आशयाकडे बघण्याची नजर मिळाली. त्यानंतर अनेक नाटकं वाचली. त्यात विजय तेंडुलकर, जयवंत दळवी, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, त्यांचे 'लेकुरे उदंड झाली' बघायला खूप आवडले. जयवंत दळवींचं 'नातीगोती', 'बॅरिस्टर', 'लग्न' ही नाटकं आपण बघतो म्हणते काय? तर त्यातील भाषा, संवाद, वातावरण निर्मितीत रममाण होतो. तिथेच मनातल्या वाचनाचा प्रवास सुरू होतो असं मला वाटतं. वाचणं म्हणजे फक्त पुस्तकं वाचणं एवढ्यापुरतं ते मर्यादित नसावं.

विनोदी लेखकांत प्र. के. अत्र्यांचे 'मी कसा झालो?', 'कऱ्हेचे पाणी', वाचताना मजा आली. पु. ल. देशपांडेंची सगळी पुस्तकं, 'अपूर्वाई', 'पूर्वरंग', 'बटाट्याची चाळ', 'अघळपघळ' यातून अनुभवलेली मानवी जीवनाशी असणारी जवळीक बरंच काही शिकवून जाते. पुलंच बालवाङ्मय माझ्या मनाला इतकं भिडलं की, मी 'वयम् मोठम् खोटम्', 'नवे गोकुळ'मध्ये लहान होऊन रमून गेले. त्यांचं 'गांधीजी' चरित्रात्मक पुस्तक किती गोष्टीरूप आहे. खरंच एखाद्या नेत्याची माहिती अशा पद्धतीने लहान मुलांशी संवाद साधून करता येते हे त्या पुस्तकामुळे समजलं. मोठेपणी बालवाङ्मय लिहिणं म्हणजे त्या विश्वात रममाण होणं. त्याशिवाय ती भाषा, शब्दरूपाने उमटणारच नाही. ते 'वयम् मोठम् खोटम्' नाटकात म्हणतात, 'चिडकी बिब्बी, ढब्बी कुठली, आणि ते दोणकन बसणं' यातून चित्रमयता अनुभवाला येते. गांधीजींबद्दल लिहितात, 'चिमुकला मोहन पोरबंदरच्या प्राथमिक शाळेत जायचा.' या वाक्यातूनच ते काहीतरी छान सांगणार असं वाटून पुढे वाचत रहावेसे वाटते. विनोदी लेखकांत द. मा. मिरासदार, रमेश मंत्री, वसंत सबनीस, राम गणेश गडकरी (बाळकराम), चिं. वि. जोशी यांची पुस्तकं वाचनात आली.

त्यानंतर खर्डेघाशी – राजाध्यक्षांचं तर 'अनुबंध', 'सांगावेसे वाटले म्हणून', ''निवडक शांता शेळके' ही शांता शेळक्यांची, 'नारायण संतांचं 'शारदा संगीत', तर 'चीपर बाय दी डझन' - अनुवाद मंगला निगुडकर, 'श्रीमान योगी' - रणजित देसाई, 'पत्र' - माधव आचवल, 'वळचणीचे पाणी' - बाळ गाडगीळ, 'अखेरचे आत्मचरित्र' राजेंद्र बनहट्टी यांचे पुस्तक मला फार आवडले. त्यांची लेखनशैली आणि तो प्रवास इतका सुरेख रीतीने लिहिला आहे – पुस्तक अगदी छोटं आहे आणि म्हणूनच ते प्रभावी आहे. ते म्हणतात, '६५ व्या वर्षी पहिल्यांदा आत्मचरित्र लिहिलं, ऐंशी पूर्ण झाल्यावर दुसऱ्यांदा आता ९३ उलटल्यावर...' पत्नीबद्दल म्हणतात, 'अंतरपाट बाजूला झाल्यावर अंतर मिटले ते कायमचे... ७५ वर्षं हिच्या सहवासात ७५ मिनिटाप्रमाणे गेली. वयापरत्वे बाहेर जाणे मंदावले, अंथरुण हेच घर झाले. शरीरभर पसरलेली उत्साहाची लाट ओसरून गेली.' ही वाक्यं विसरता येत नाहीत. त्यानंतर 'नॉट विदाऊट माय डॉटर, अनुवाद - लीला सोहोनी हे पुस्तक तर खाली ठेववतच नाही. विवेकानंदांच्या जीवनावरची पुस्तकं वाचली. 'एका कळीची निगराणी' - डॉ. ऋजुता विनोद, 'शाळा' - मिलिंद बोकील, 'आधेअधुरे' - प्रतिभा रानडे यांच्या या पुस्तकाची भाषा, प्रश्न विचारण्याची शैली आणि दुर्गाबाईंची उत्तरे

अप्रतिम ‘सत्तांतर’ - व्यंकटेश माडगूळकर, ‘कळ्यांचे नि:श्वास’- विभावरी शिरुरकर, ‘आस्वाद आणि आक्षेप’ - दुर्गा भागवत, ते आत्ताच्या आघाडीच्या लेखिका मेघना पेठे - ‘आंधळ्याच्या गायी’, ‘स्थलांतर’- सानिया, ‘महर्षी ते गौरी’- मंगला आठलेकर, ‘अग्निपंख’- एपीजे अब्दुल कलाम (आत्मचरित्र) ‘स्पीड पोस्ट’- शोभा डे, ‘दासबोध’, ‘गोंदवलेकरांची प्रवचने’ ही आणि अशी कितीतरी पुस्तके वाचनात आली. या प्रवासात कवितांची पुस्तके मागे नाहीत. त्यात पूर्वीचे कवी ‘संतवाङ्मय’, ‘मेघदूत’, ‘ज्ञानेश्वरी’, भा. रा. तांबे, बालकवी, कुसुमाग्रज, केशवसुत, इंदिरा संतांची - ‘गर्भ रेशीम’, ‘रंगबावरी’, शांता शेळके - कवितासंग्रह, विंदा करंदीकरांची बालवाङ्मयापासून ते सर्व कवितासंग्रह, आठवणीतल्या कविता चारही भाग, मंगेश पाडगावकरांचं बोलगाणी, सुधीर मोघे यांचं ‘पक्ष्यांचे ठसे’, ‘लय’ ही माझी आवडती पुस्तकं. आताचे लोकप्रिय कवी संदीप खरे यांच्या कविता म्हणजे तर एक आगळावेगळा सुखद अनुभव. ‘मी माझा’ - चंद्रशेखर गोखल्यांच्या चारोळ्यांनी तरुणांच्या मनाची पकड घेतली.

प्रवासवर्णनात पु. ल. देशपांड्यांची प्रवासवर्णने फारच भावली. आणि प्र. के. घाणेकरांचे ‘हिमाईच्या कुशीत’ हे पुस्तक खूप आवडले. ‘गंगोत्री’, ‘यमुनोत्री’, ‘बद्रिनारायण’, ‘केदारनाथाचे त्यांचे वर्णन वाचून चारधाम करावेसे वाटतात. ‘आम्ही घरचे’ ही यात्रा करून आलो आणि त्या निसर्गाने मला इतकं आपलंसं केलं की मी ‘चारधाम यात्रा’ हे छोटं पुस्तक लिहिलं.

या पुस्तकं वाचनाचा आढावा घेतला तर वाचायला किंवा विचार करायला, कवितेत रमायला आवडतं. पण जास्त माणूस वाचायला आवडतो.

पूर्वीच्या लेखकांपासून आताच्या लेखकांपर्यंत आणि अगदी ज्ञानेश्वरांच्या अभंगापासून – संदीप खरेच्या कवितांपर्यंत बरंच वाचलंय असं वाटत असताना अजून खूप वाचायला हवं आहे. मांडायचं सांगायचं खूप आहे. वाचनाचा प्रवास अजून सुरुवातीच्या टप्प्यावर आहे. क्षितिजाच्या पलीकडे बरंच काही आहे ते अंधुक दिसतंय. त्या प्रवासापर्यंत जाण्यासाठी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत वाटचाल करावी लागणार आहे. पुढे गेलं तरी क्षितिज पुढे सरकणार आहे; म्हणून म्हणावंसं वाटतं,

शब्दांकडे हसतमुखाने
बघणं किती छान असतं
सूर, लयीची साथ घेत
जगणं किती सुंदर होतं
(शब्दरूपी) गीत असतं आपल्याबरोबर
फक्त ते समजावं लागतं
शब्द सुरांचं अतूट नातं
हृदयापर्यंत पोचावं लागतं.

या सगळ्यातून आकारत असतं वाचन आणि त्यातून निर्माण होणारा विचारांचा अनुबंध. असंख्य पुस्तकं आणि लेखकांचा उल्लेख बाकी आहे पण मर्यादा लक्षात घेणं आवश्यक आहे म्हणूनच वळणावळणाचा हा छोटासा वाचनप्रवास.

**सौ. मेधा तेलंग**
४७८/अ, शनिवार पेठ
ओम अपार्टमेंट, पुणे ४११ ०३०.
फोन - २४४५६१३८

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादीत पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

## टी बुक क्लब १५ - सभासद फी ५०रु.

**सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा! या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

**● टी बुक क्लब म्हणजे दर्जेदार अनुवादाची हमी ●**

या बुक क्लबचे सभासद **५० रु.** भरून होता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. **ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.** या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके २५% सवलतीत मिळतात.

**टी बुक क्लब १५ मधून प्रकाशित होणारी पुस्तके**

| | | |
|---|---|---|
| द स्पाय हू लव्हड् मी | इयान फ्लेमिंग | अनु. अजित ठाकूर |
| द लास्ट फ्रन्टियर | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये |
| प्रे (सावज) | मायकेल क्रायटन | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर |
| सीज़र | रॉबिन कुक | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर |
| परवाना | डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर |
| साम्राज्य बुरख्यामागचे | कारमेन बिन लादेन | अनु. अविनाश दर्प |



# बालनगरी

## अनुक्रमणिका






| | |
|---|---|
| समुद्रातील खजिना | १६५ |
| चकड्यांची चमालध | १६८ |
| गोष्ट पृथ्वीच्या चुंबकाची | १६९ |
| चित्र रंगवा | १७४ |
| शहाणा बाबू | १७५ |
| फुले रंगवा | १७७ |
| कुऱ्हाडीचा दांडा | १७८ |
| भुलभुलैय्या | १८१ |
| स्पेशल टीचर | १८२ |
| परीची गोष्ट | १९० |
| अशी झाली फजिती | १९३ |




# समुद्रातला खजिना

**मंजूषा आमडेकर**

**दा**दा तांडेलाचा पोरगा लहानू काठावर का होईना, दहावी पास झाला एकदाचा! एकदाचा म्हणजे? तो काही ढ वगैरे होता की काय? छे हो, तसं काही नाही. त्याचं काय झालं, लहानू एकदा मित्रांबरोबर टायटॅनिक सिनेमा बघायला गेला. आणि त्या सिनेमाने झपाटलंच की त्याला! काय झालं विचारू नका. दिवसरात्र त्याला समुद्रातल्या खजिन्याचीच स्वप्नं पडायला लागली. खाणंपिणं सुचेना, झोप येईना, की अभ्यास करवेना. दादांनी त्याची फार समजूत घातली, ओरडून पाहिलं, न बोलून पाहिलं, पण तो काही ऐकायलाच तयार नव्हता. त्याला शाळा सोडून खजिनाच शोधायला जायचं होतं. शेवटी वैतागून ते त्याला म्हणाले, ''हे बघ लहान्या, कसा पन का होईना, धावी फास हो. मंग खयलीकडं जायचा तिकडं काळा कर थोबाड. मी बी बगतंय, कंचा खजिना गांवतोय ते.''

हे ऐकल्यावर लहानूची कळी खुलली. जोमानं अभ्यास करून तो चाळीस टक्के मार्क मिळवून पास झाला कसाबसा. आता दादा काय बोलतायत? नारळी पौर्णिमेच्या मुहूर्तावर त्यांनी त्याला जायची परवानगी दिली नाइलाजाने. आता तुम्हाला वाटेल लहानूकडे जबरदस्त प्लॅन असणार कसला तरी, नकाशा असणार, खजिना नक्की कुठे सापडेल याची माहिती असणार, खजिना शोधायला लागेल तेवढा खच्चून पैसा असणार, चिक्कार मदतनीस असणार! वेडे की काय? असलं काहीसुद्धा नव्हतं त्याच्याकडे. तो सरळ बाबू लाँचवाल्याकडे गेला. खजिन्याचा विषय काढताच तो खदखदून हसायला लागला. म्हणाला, ''अरे, खुळा की काय तू? अरे, असे खजिने सापडत असते तर मी आणि माझ्यासारखी शिकलेली माणसं या धंद्यात आली असती का लेका? माझं ऐक, घरी परत जा. भरपूर शिक. जोमानं काम कर. पाहिजे तितके पैसे भेटतील.''

पण पालथ्या घड्यावर पाणी! लहानूची समजूत काही पटेना. हट्टाने तो एकटाच जायला निघाल्यावर मात्र बाबूला राहवेना. मनात काहीतरी बेत आखून तो म्हणाला, ''बरं, चल. आज मी पण नारळ द्यायला जाणारच होतो, कामाला सुरुवातही करणार होतो. तू पण चल माझ्याबरोबर. बघू काही माग लागतो का! पण जर का खजिना भेटला तर निम्मा वाटा माझा. कबूल?'' आपलं म्हणणं बाबूला पटलेलं बघून आनंदाने लहानू म्हणाला, ''कबूल, कबूल.'' त्यावर हसत हसत बाबू म्हणाला, ''आणि समजा खजिना नाही भेटला तर मी सांगीन तसं करायचं, कबूल?'' ''कबूल. पण अशी वेळच येणार नाही.'' लहानू ठासून

म्हणाला. गालातल्या गालात हसून बाबूने मान डोलावली. नारळ, फुलं, नैवेद्य समुद्राला वाहून बाबूने लाँच पाण्यात घातली.

लाँचमध्ये आणखीही काही माणसं होती. मध्येच बाबू जाऊन त्यांना काही सूचना देऊन



आला. मग गप्पा करत त्यांच्या साहसयात्रेला सुरुवात झाली. बाबूच्या लक्षात आलं की लहानू उत्साही आणि कष्टाळू होता. असं नव्हतं की तो आळशी असल्यामुळे कष्ट न करता आयते पैसे मिळावेत म्हणून खजिना शोधायला निघाला होता. पण तो भोळा होता. स्वप्नाळू होता. मग बाबूने हळूहळू त्याचा विश्वास संपादन केला. गप्पांच्या नादात दोन तास कसे निघून गेले कळलंसुद्धा नाही. आता ते खोल समुद्रात चालले होते. बाबू एकाएकी गप्प होऊन समोर बघायला लागला. तो काय एवढं पाहतोय असं वाटून लहानूही समोर बघायला लागला.

बघता बघता लहानू समुद्रात हरवून गेला. इतक्या आत तो आजवर कधीच आला नव्हता. नजर टाकेल तिकडे पाणीच पाणी होतं. ते अजस्र, महाकाय, गहन, गंभीर पाणी बघून लहानूच्या काळजात धडकीच भरली. त्यानं घाबरून बाबूकडे पाहिलं. पण हे काय? बाबू कुठे गेला? त्याने इकडे तिकडे पाहिलं. छोटा जिना उतरून खाली पाहिलं. पण तिथे ना बाबू होता ना त्याची माणसं! लाँच बंद पडली होती. तो परत धावत वर आला. त्याने आपल्या सभोवार

पाहिलं. त्या आख्ख्या समुद्रात तो अगदी अगदी एकटा होता. तो जबरदस्त हादरला. वेड्यासारखा गोलगोल फिरत त्या महाभयंकर समुद्राकडे डोळे फाडफाडून बघायला लागला आणि चक्कर येऊन खाली पडला.

थोड्या वेळाने त्याने डोळे उघडले. कोणीतरी त्याच्या तोंडावर पाणी मारत होतं. दोन क्षण गेल्यावर त्याच्या लक्षात आलं की तो बाबू होता. चटकन त्याचा हात धरून लहानू म्हणाला, ''ब... बाबू... क... कुठे होतास तू?'' बाबू म्हणाला, ''अरे, लाँच बंद पडली म्हणून बघायला गेलो होतो. का रे, काय झालं?'' ''अरे पण मला सांगून का नाही गेलास?'' रडकुंडीला येऊन लहानू म्हणाला. हसू दाबत बाबू म्हणाला, ''त्यात काय सांगून जायचं? तू थोडाच घाबरणार होतास? मी आज तुझ्याबरोबर आलो नसतो तर तुझा तू एकटा जाणारच होतास की खजिना शोधायला. खरंच लहानू, तू खूपच शूर आहेस. मला तुझं कौतुक वाटतं.''

लहानूला काय बोलावं तेच कळेना. तो नुसताच गप्प बसून राहिला. बाबू म्हणाला, ''बरं तर मग. तू तुझं काम चालू ठेव. तुला एक होडी देऊन मी परत जातो. कारण लाँच बंद पडतेय. दुरुस्तीचं बघायला लागेल. आता खजिना तू एकटाच शोधणार असल्यामुळे मला निम्मा वाटा नाही दिलास तरी चालेल. मग निघू आम्ही?'' लहानू अवाक् होऊन त्याच्याकडे बघतच राहिला. मग त्याने समुद्राकडे पाहिलं. आणि मग मात्र त्याच्या अंगाला दरदरून घाम फुटला. बाबू शांतपणे त्याच्याकडे पहात होता. सावकाश म्हणाला, ''खजिना शोधल्यावर आम्हाला बोलावशील ना बघायला?''

आता मात्र लहानू पुरता खचला. त्याच्या डोळ्यांत टचकन पाणीच आलं. बाबूचा हात धरून तो म्हणाला, ''बाबू, मला सोडून जाऊ नकोस रे. मी पण येतो तुझ्याबरोबर. मला तुझं बोलणं पटलं. सिनेमातलं वेगळं आणि खऱ्या जगातलं वेगळं.'' बाबूने त्याला जवळ घेऊन थोपटलं. मग लांबवर बोट दाखवत तो म्हणाला, ''ते बघ तिकडे काय आहे ते.'' लहानूने



उत्सुकतेने पाहिलं. डॉल्फिन माशांची एक झुंड दूरवर समुद्रात उंच उंच उसळ्या मारीत होती. ते दृश्य इतकं सुंदर दिसत होतं की लहानू हरकूनच गेला. बाबू म्हणाला, ''आपण इथे पर्यटकांना घेऊन आलो तर आपल्याला खूप पैसे मिळतील. शिवाय खायचे मासे पकडून नेले तर बाजारात हवी तितकी मागणी आहे ताज्या माशांना. हाच आपला खजिना आहे रे लहानू. समुद्र आपला देव. त्याने स्वतःच्या पोटात आपल्यासाठी किती माणिकमोती साठवून ठेवलेत बघितलंस का? यापेक्षा वेगळा खजिना काय पाहिजे तुला बोल.'' लहानू उजळल्या चेहऱ्याने बाबूला म्हणाला, ''बाबू, मी आजपासून तुझ्याकडे येऊ का रे कामाला? मला हाच खजिना पाहिजे.'' बाबू हसला. घराकडे आल्यावर बाबूने लहानूच्या वडिलांना सगळं सांगितल्यावर त्यांना गहिवरूनच आलं. त्यांनी लहानूला बाबूबरोबर काम करायची आनंदाने परवानगी दिली. ■

# चकड्यांचीआ चमालध

**खाली लिहिलेली एकूण बेरीज येण्यासाठी**
**रिकाम्या चौकौनात योग्य आकडे घाला**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | □ | □ | | |
| + | ६ | ७ | ६ | ८ |
| □+ | ४ | ३ | ५ | ६ |
| □+ | ३ | ३ | २ | १ |
| □ | □ | □ | □ | □ |
| २ | ४ | ४ | ४ | ४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | १ | ८ | ४ | ५ | ३ |
| + | ८ | ६ | ५ | ४ | ८ |
| + | ७ | ४ | ८ | ६ | ७ |
| + | ४ | २ | ३ | ५ | ५ |
| □ | □ | □ | □ | □ | □ |
| ३ | २ | २ | २ | २ | २ |

# थोडीशी गंमत...

खालच्या आकृतीत १२ काड्या वापरून
३ चौकोन केले आहेत.
त्यापैकी ४ काड्या उचलून
अशा ठिकाणी जोडा की त्यातून
४ चौकोन तयार होतील.



१० काड्या वापरून
खालील आकृती केली आहे.
यातून ५ काड्या उचलून
अशा ठिकाणी जोडा की त्यातून
एक घराची आकृती तयार होईल.





# गोष्ट पृथ्वीच्या चुंबकाची...

**अभिजीत घोरपडे**

'ढॅन टॅडॅन...!' आपल्याला सापडलेला दगड इतका भन्नाट आहे, हे समजल्यावर छोटा अजय अत्यंत खूश झाला. उड्या मारतच घरी निघाला. पाठीवर शाळेची बॅग आणि एका हातात तो दगड घेऊन तो धावत होता. अजयकडं असलेला दगड फारच वैशिष्ट्यपूर्ण असल्याचं त्या सरांनी सांगितल्यापासून त्याचा आनंद गगनात मावत नव्हता. (नुसता गगनातच नाही, तर कुठंच मावत नव्हता!) पण असं काय झालं होतं आणि काय होतं त्या दगडात...?

आता आला ना मूळ मुद्दा... त्याचं झालं असं. अजय आणि त्याचे मित्र दर रविवारी एका माळावर क्रिकेट खेळायला जायचे. घराजवळ खेळायला पटांगणच नव्हतं. मग बिच्चारे करणार तरी काय? म्हणून लांब असलेल्या त्या पटांगणात जायचे. हातात बॅट, बॉल, स्टंप घेऊन दहा-पंधरा मिनिटं चालत जायचे. दोन-तीन तास खेळून झालं, की त्यांची आठ-दहाजणांची टोळी थकून भागून माघारी यायची. दोन आठवड्यांपूर्वी रविवारी गंमत झाली. टिल्ल्याने 'सिक्सर' मारला आणि बॉल लांबच्या एका झाडाजवळ जाऊन पडला. अजय बॉल आणायला गेला. बॉल उचलत असताना त्याला जवळच एक काळाकुट्ट दगड दिसला. दगड काळा असूनही त्याला विशिष्ट चमक असल्यामुळं त्याने तो उचलून खिशात टाकला. त्याने दगड घरात आणून आपल्या पुस्तकांच्या कप्प्यात ठेवला. हा कप्पा फक्त पुस्तकांसाठी नव्हता, तर त्यात अजयच्या सगळ्या उद्योगाच्या गोष्टी असायच्या. रंगबिरंगी दगड, शंख-शिंपले, झाडाची पानं, सुकलेली फुलं, लोहचुंबक, तुटक्या वस्तू, खेळणी असं सगळं त्याच कप्प्यात असायचं.

हा दगड तिथं आणून ठेवल्यावर अजयही विसरून गेला. गेल्या आठवड्यात त्याला लोहचुंबक पाहिजे होतं. नेमकी उत्तर दिशा कोणती, अशी त्याची लहान भावाशी म्हणजे अजिंक्यशी पैज लागली होती. तो पाचवीत होता. त्यासाठी अजयने पुस्तकांच्या कप्प्यातलं लोहचुंबक काढलं. अजय म्हणजे फारच अत्यंत धडपड्या मुलगा. सातवीत शाळेतल्या बाई चुंबकाचा धडा शिकवत होत्या. अजयलाही वेगवेगळे प्रयोग करायची सवय असल्याने त्याने आईकडं हट्ट धरून एक छान लोहचुंबक विकत घेतला. ते चुंबक म्हणजे बोटासारखी पट्टी होती. त्याची दोन्ही टोकं लाल रंगवली होती. एका बाजूला 'उत्तर ध्रुव' आणि दुसऱ्या बाजूला

'दक्षिण ध्रुव' लिहिलं होतं. हा चुंबक दोऱ्यानं बांधून धरला, की उत्तर ध्रुव लिहिलेले टोक उत्तर दिशेकडं स्थिर रहायचं आणि दक्षिण ध्रुव लिहिलेलं टोक दक्षिण दिशेकडं. छोट्या अजिंक्यने ते चुंबक दोऱ्याला बांधून टांगलं. ते स्थिर झालं, तेव्हा अजय म्हणत होता तीच उत्तर दिशा असल्याचं स्पष्ट झालं. अजयने पैज जिंकली होती. आता छोटा अजिंक्य चुंबकाशी खेळत होता. दोऱ्याला बांधलेलं चुंबक तो इकडं तिकडं नाचवत होता. ते चुंबक त्या काळ्या चकचकीत दगडावर आलं, तेव्हा मात्र गंमतच झाली. गंमत? हो हो गंमत!

गंमत म्हणजे झालं असं- उत्तर दिशा दाखवणारं चुंबकाचं टोक विरुद्ध दिशेला स्थिर झालं. म्हणजे ते उत्तरेऐवजी दक्षिण दिशा दाखवू लागलं. ते पाहून अजिंक्यने आश्चर्याने तोंडाचा मोठा 'ऑ' वासला. अजयसुद्धा ते पाहून चकित झाला. चुंबक दगडापासून दूर केलं की नेहमीसारख्या बरोबर दिशा दाखवत होतं, पण दगडाजवळ नेलं, की उलट्या दिशा दाखवत होतं. हा काय चमत्कार आहे? दोघांनाही प्रश्न पडला होता. दोघांनी तात्पुरतं त्याला 'जादूचा दगड' असं नाव दिलं. तो दगड जवळच्या एका कॉलेजात भूगोल विभागात नेऊन दाखवायचा आणि त्यांनाच त्याबद्दल विचारायचं, असं ठरलं.

दुसऱ्या दिवशी शाळेत जाण्यासाठी अर्धा तास आधी निघाले आणि वाटेवरच असलेल्या भूगोल विभागात गेले. तिथल्या एका सरांना 'जादूचा दगड' दाखवला. त्यांनी आठवड्यानंतर यायला सांगितलं होतं. त्यानुसार अजय आज शाळेत येता येता भूगोल विभागात गेला होता. तिथल्या सरांनी त्याला तो दगड फारच भन्नाट असल्याचं सांगितलं होतं. कारण पृथ्वीचे आता असलेले उत्तरध्रुव व दक्षिणध्रुव कोण्या एकेकाळी नेमके उलटे होते. तो दगड इतक्या जुन्या काळातला (म्हणजे लाखो वर्षांपूर्वीचा) होता. म्हणजे पृथ्वीची आताची उत्तर दिशा ही पूर्वी दक्षिण दिशा होता आणि दक्षिण दिशा म्हणजे पूर्वीची उत्तर दिशा. पण अशा दिशा बदलण्याचं कारण म्हणजे पृथ्वी हाच एक भलामोठा चुंबक आहे. या पृथ्वीच्या चुंबकाचे ध्रुव सतत बदलत असतात, असे त्या भूगोलाच्या सरांनी सांगितलंच. पण जाता जाता या पृथ्वीच्या चुंबकाबद्दल बरचं काही सांगून टाकलं. ऐका तर मग त्या सरांनी सांगितलेली पृथ्वीच्या चुंबकाची गोष्ट...

...शाळेत प्रयोग करताना चुंबकाची पट्टी धाग्याला बांधून टाकली की तीसुद्धा दक्षिणोत्तर दिशांना स्थिर राहत असल्याचं आपण पाहतो. ती कशीही फिरवली तरी याच दिशांना स्थिर होते आणि आपण चुंबकाचा दक्षिणोत्तर स्थिर राहण्याचा एक नियम शिकतो. पण याच दिशेत का? इतर दिशांना चुंबक का स्थिर होत नाही? त्याच्यावर कोण परिणाम करतं? प्रश्न अगदी साधे आणि सरळ आहेत. त्यांची उत्तरं शोधताना पृथ्वीचं एक अत्यंत महत्त्वाचं तत्त्व माहिती होतं. ते म्हणजे पृथ्वी स्वतःच एक भला मोठा चुंबक आहे. तिला स्वतःचं चुंबकीय क्षेत्र आहे. त्याचा प्रभाव केवळ पृथ्वीच्या पृष्ठभागावरच नाही तर पृष्ठभागापासून ते सुमारे



६० हजार किलोमीटरपर्यंत पाहायला मिळतो. पृथ्वीचं हे चुंबकीय क्षेत्र साधारण दक्षिणोत्तर आहे. त्याच्या प्रभावामुळं पृथ्वीवरचे सर्व चुंबकीय पदार्थ त्याला समांतर म्हणून दक्षिणोत्तर दिशांना स्थिर राहतात.

पृथ्वीला चुंबकीय गुणधर्म मिळवून देण्याचं काम तिच्याच पोटात असलेल्या तप्त लाव्हारसानं केलं आहे. आतमध्ये सुरू असलेल्या विशिष्ट हालचालींमुळंच ती एक प्रचंड चुंबक बनली आहे. आपल्या पृथ्वीच्या अंतरंगात डोकावलं तर तिचे तीन प्रमुख भाग आढळतात. बाहेरचं टणक कवच, मधलं मध्यावरण आणि सर्वात आतमध्ये असलेला तिचा गाभा. पृथ्वीचा गाभा सुमारे साडेतीन हजार किलोमीटर जाडीचा आहे. सर्वात आतला भाग असल्यामुळं तिथं जड आणि वजनदार अशी खनिजं एकत्र आली आहेत. त्यात मुख्यतः लोह (म्हणजे लोखंड) आणि निकेल हे धातू असतात.

पृथ्वीच्या पोटात तिच्या मध्याकडं जाताना तापमान वाढत जातं आणि दाबही मोठ्या प्रमाणात वाढतो. या गुणधर्मामुळं तिच्या गाभ्यात काहीशी रंजक स्थिती पाहायला मिळते. दाबाच्या तुलनेत तापमान वरचढ असेल, त्या थरात खनिजं द्रव अवस्थेत असतात आणि जिथं दाब तापमानापेक्षा प्रभावी ठरेल त्या ठिकाणी खनिजं स्थायूरूपात (घनरूपात) पाहायला मिळतात. याचा परिणाम म्हणून पृथ्वीच्या गाभ्याचा आतला भाग घनरूपात आहे, तर बाहेरचा भाग द्रव अवस्थेत आहे. आतला गाभा घनरूपात आणि बाहेरचा द्रवरूपात असला, तरी त्यात मुख्यतः लोह आणि निकेल हे वजनदार धातू आहेत. बाहेरच्या गाभ्यात हे धातू द्रव अवस्थेत असल्यामुळं सतत हालत असतात. त्याच्या हलण्यामुळं पृथ्वीला चुंबकीय शक्ती लाभली असल्याचं मानलं जातं. सध्या या क्षेत्राची दिशा साधारण दक्षिणोत्तर असल्याने सर्व चुंबक त्या दिशेत स्थिर राहतात.

आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे आताचं लोहचुंबक काही शे किंवा काही हजार वर्षांनंतर आताच्याच दिशेत स्थिर राहील असं नाही. कारण पुन्हा तेच आहे. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राची दिशा बदलत असल्याने सर्व लोहचुंबक पृथ्वीनुसार आपलीही स्थिर राहण्याची दिशा बदलणार. पृथ्वीच्या चुंबकीय ध्रुवांची दिशा पूर्वी वेगळी होती. आता ती पूर्णपणे बदलली आहे. म्हणजे तिचा आता उत्तर ध्रुव हा कोण्या एकेकाळी दक्षिण ध्रुव होता. पृथ्वीचे चुंबकीय ध्रुव सध्या 'साधारण दक्षिणोत्तर' आहेत. असं म्हणण्याचं कारण म्हणजे पृथ्वी ज्या अक्षाभोवती फिरते त्याला हे ध्रुव समांतर नाहीत. तिचे चुंबकीय ध्रुव तिच्या स्वतःभोवती फिरण्याच्या अक्षाशी साधारण ११ अंशाचा कोन करतात. चुंबकीय ध्रुव हळूहळू आपली दिशा बदलत असल्याने हा कोनही सतत बदलत राहतो.

या चर्चेतल्या एका मुद्द्यावर मुख्यतः आक्षेप घेतला जाऊ शकतो. तो म्हणजे पूर्वी पृथ्वीचं चुंबकीय ध्रुवांची दिशा वेगळी होती हे कशावरून? पण त्यालाही ठाम पुरावे आहेत. (अजयला सापडलेला दगड हा त्याचाच एक पुरावा आहे, बरं का!) एखादा खडक तयार होतो, तेव्हा त्यातली चुंबकीय गुणधर्म असलेली खनिजं म्हणजे मुख्यतः लोखंड असलेली खनिजं पृथ्वीच्या चुंबकीय ध्रुवांशी समांतर अशी स्वतःची मांडणी करतात. त्यातून खडकातल्या त्यांच्या रचनेवरून तो खडक तयार झाला, त्या काळात पृथ्वीचे चुंबकीय ध्रुव कोणता दिशा दाखवत होते, याचं उत्तर मिळतं. याच पुराव्यांवरून पृथ्वीचे ध्रुव कोणत्या दिशांना होते याचा तक्ता तयार करण्यात आला आहे. त्याचा उपयोग करून आता एखाद्या प्राचीन खडकाचं वय शोधणंही शक्य बनलं आहे.

पृथ्वीच्या चुंबकाच्या दिशेत होणाऱ्या बदलाचा परिणाम वातावरणातल्या विद्युत-चुंबकीय लहरींवर होतो. त्यामुळे अशा लहरींवर आधारित असलेल्या रेडिओ, दूरदर्शन, मोबाईल फोन,

वॉकीटॉकी अशा संपर्क यंत्रणांवर भविष्यात त्याचा विपरित परिणाम होऊ शकतो. विजेच्या वितरणालाही त्याचा फटका बसेल. अर्थात पृथ्वीच्या चुंबकाची दिशा अचानक बदलली तर हे घडेल. मात्र, हा दिशा बदलण्याचा कार्यक्रम अत्यंत कमी वेगाने होत असतो. त्यामुळं लगेचच असं काही घडेल, ही भीती बाळगण्याचं कारण नाही. सौरवादळं येतात तेव्हा मात्र पृथ्वीच्या वातावरणात मोठ्या प्रमाणावर विद्युत चुंबकीय लहरींची भर पडते. त्यामुळं रेडिओ, फॅन, वॉकीटॉकी अशा संपर्क यंत्रणा ठप्प होतात. अमेरिकेला गेल्याच वर्षी त्याचा फटका बसला. त्यवेळी आलेल्या सौरवादळाच्या प्रभावामुळं तिथली वीज वाहून नेणारी यंत्रणा ठप्प होते, पण आपल्याकडं फार लोकांना त्यामागचं नेमकं कारण माहीत नाही. त्यामुळे लोंक अशा गोंधळाचं खापर सरकारी यंत्रणेच्याच माथी फोडतात. पाहिलंत नेमकी माहिती नसली तर काय होतं ते!

जगातले अनेक पक्षी वेगवेगळया ऋतूंमध्ये स्थलांतर करतात. अन्नाच्या शोधात ते असे फिरतात किंवा एखाद्या ठिकाणी हिवाळा, उन्हाळा किंवा पावसाळा अतिशय त्रासदायक असले तरीही हे पक्षी दुसऱ्या भागात जातात. या पक्ष्यांप्रमाणेच काही प्रकारचे मासे या समुद्रातून त्या समुद्रात प्रवास करीत असतात. तुम्हाला प्रश्न पडेल या माशांना रस्ता कसा लक्षात राहतो? ते काही पत्ता लिहून घेत नाहीत किंवा खुणेसाठी फलक किंवा दगड लावून ठेवत नाहीत. तरीही हा रस्ता त्यांच्या लक्षात राहतोच कसा? हे मासे आणि पक्षी हा रस्ता लक्षात ठेवण्यासाठी हवेत असलेल्या विद्युत चुंबकीय लहरींचाच उपयोग करतात. त्यामुळे पृथ्वीच्या चुंबकाची दिशा बदलली, की ते गडबडतात. देवमाशांच्या बाबतीत ही गंमत पाहायला मिळते. स्थलांतर करणारे हे देवमासे आपला नेहमीचा रस्ता चुकतात आणि भलत्याच किनाऱ्यावर भरकटत जातात. त्यालाही विद्युत चुंबकीय लहरींमध्ये होणारे बदल कारणीभूत असल्याचे मानलं जातं...

आता कळालं का- पृथ्वीचा चुंबक व त्याची दिशा माणसासाठी उपयोगी आहेच. त्याचबरोबर ती प्राणी-पक्ष्यांनाही उपयोगी ठरते. गंमत म्हणजे हे परिणाम जमिनीवर पाहायला मिळतात, पण त्याचं मूळ पृथ्वीच्या आत खोलवर असलेल्या गाभ्यात आहे!

त्या सरांनी अजयला अशी ही पृथ्वीच्या चुंबकाची गोष्ट सांगितली होती. त्यामुळंच अजय खुशीत होता. कारण पृथ्वीचा एक महत्त्वाचा गुणधर्म सांगणारा दगडच त्याला सापडला होता. कारण असे दगड अत्यंत दुर्मिळ असतात. अजय नशीबवान म्हणूनच त्याला तो दगड सापडला होता. त्यामुळं मुलांनो, क्रिकेट खेळताना लांबवर गेलेला बॉल आणायचा कंटाळा करू नका. आणि बॉल उचलताना आसपासच्या दगडांकडंही दुर्लक्ष करू नका. कोणाला माहीत तुम्हालासुद्धा एखाद्या वेळेस असा भन्नाट दगड सापडू शकेल!!!

■

**पुढील चित्रं तुमच्या आवडीप्रमाणे रंगवा आणि खोलीत छान चिकटवून ठेवा.**





# शहाणा बाबू

डॉ. विजया वाड

**बा**बू खिडकीत बसला होता. त्याला क्रिकेटची बॅट हवी होती. पण आई म्हणाली, ''अरे बाबू, त्यापेक्षा पाच किलो तांदूळ आणणं महत्त्वाचं आहे.'' बाबूला राग आला. खूप खूप राग. ''अग आई, चार पाच दिवस आपण सहज उपाशी राहू शकतो. पण बॅट हवीच ग.'' तो हट्ट करू लागला.

''उपाशी राहणं कठीण असतं बाबू. तू उपाशी राहिल्याशिवाय तुला नाही कळणार. त्यापेक्षा एका फळकुटाची बॅट बाबा तुला करून देतील हं बाबू.'' ती म्हणाली.



''आम्हाला नको असली सडू बॅट.'' तो रागानं म्हणाला. त्या दिवशी रात्री तो हट्ट करून रडला आणि जेवला नाही. खूप रात्री मात्र तो जागा झाला नि भूक भूक करू लागला. आई शांतपणे उठली नि तिनं त्याला भात कालवून भरवला. बाबूनं तो फुगरे गाल करून खाल्ला. जणू काही तो आईवरच उपकार करीत होता. मग काही त्याला झोप येईना. तो सरळ खिडकीत जाऊन बसला. रस्त्याकडे पाहू लागला. रस्त्यावर खांबावरील दिव्यांचा उजेड पडला होता. पैशांची नाणी. बाबूला खूप खूप आनंद झाला. त्याने आईला उठवलं आणि तो तिला खिडकीपाशी घेऊन आला.

''आई बघ, पैशांचा पाऊस पडतोय. नाणीच नाणी. चल आपण वेचू नि बॅट आणू.'' तो म्हणाला. आईनं बाबूला जवळ घेतलं. ''बाबू, तो पैशांचा नाही. गारांचा पाऊस आहे. मनात असतं ते स्वप्नात दिसतं.'' ती त्याला बाहेर घेऊन गेली. त्याचे हात पावसात धरले. खरेच की!

मोठ्या मोठ्या गारा होत्या.

बाबू पहाटेपर्यंत अंथरुणात नुसता पडून होता. बाबा म्हणाले, ''हे बघ, मी महिनाभर कामावर चालत जाईन. आपल्या बाबूला बॅट घेऊन दे. बसचे पैसे वाचवतो.''

''नको. तुमचे पाय दुखतील. त्यापेक्षा मी नि तुम्ही बिनसाखरेचा, बिनदुधाचा चहा घेऊन महिनाभर पैसे वाचवू. बॅट घेऊ.''

बाबू ऐकत होता. सकाळी दूधवाला आला. आई म्हणाली, ''पाव लिटरच दे बाबा. बाबूपुरते.'' बाबू पटकन् पुढे झाला. म्हणाला, ''आई, नको ग. मला फळकुटाची बॅट चालेल. तुझा वेडा बाबू शहाणा बाबू झालाय.''

मग दूधवाल्या काकांना म्हणाला, ''दूधकाका, नेहमीसारखं दूध द्या.''

आईनं डोळे पुसले. बाबू बाबांच्या मांडीवर बसून दूध पिताना म्हणाला, ''तुम्हाला कळालं बाबा?''

''काय रे?''

''वेडा बाबू शहाणा झाला.''

बाबांनी बाबूची पापीच घेतली.





## झटपट पेपरवेट

आई - बाबा काही लिहीत बसले आहेत. त्यांचे कागद सारखे उडून जातायत. छानसा, झटपट 'पेपरवेट' करून देऊया त्यांना.

काय काय हवं? : एक पंज्याएवढा पुठ्ठा, मध्यम एक दगड, १५-२० छोटे छोटे दगड (रंगीत किंवा साधे), फेव्हिकॉल, रंग

काय करायचं : पुठ्ठ्यावर आधी मोठा दगड फेव्हिकॉलनं चिकटवून घ्या. मग त्यावर छोटे-छोटे दगड आवडतील त्या पद्धतीनं चिकटवा. दगडांना आवडतील तसे रंग द्या. पूर्ण वाळल्यावर दगडाभोवतीचा जास्तीचा पुठ्ठा कापून टाका.

हा छान पेपरवेट केव्हाही झटपट करता येईल.

मित्र - मैत्रिणींबरोबर खेळताना, हिंडताना रंगीत रंगीत दगड गोळा करून ठेवा.

**ही फुलं अशी रंगवा. बघा कशी छान दिसतात!**

| | | |
|---|---|---|
| ○ फिकट जांभळा | □ लाल | ◇ केशरी |
| ／ पिवळा | ✕ निळा | ⊥ हिरवा |





# कुऱ्हाडीचा दांडा, गोतास काळ

**अरुण मैड**

मित्रांनो!

कुऱ्हाड हे मानवाचे अतिप्राचीन हत्यार आहे. गुहेत राहण्याआधीपासून मनुष्य दगडी कुऱ्हाडीचा वापर करतो आहे. क्षूर म्हणजे गायीचा खूर अशा आकाराचे पाते असलेले हत्यार म्हणजे कुऱ्हाड. कुऱ्हाडीलाच परशू असेही म्हणतात. जमदग्नीचा पुत्र परशुराम याचे नावच मुळी त्याच्या शस्त्रावरून परशूवरुन पडले. सर्वसामान्य लोक कुऱ्हाड हाच शब्द वापरतात.

मनुष्य प्रगत झाला, शेती करू लागला तेव्हा या पात्याला दांडा बसविण्याची कल्पना मनुष्याला सुचली असावी.

कुऱ्हाडीला लाकडी दांडा बसविल्यानंतर तिची उपयुक्तता व मारकशक्ती अधिक वाढली. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणीचा अर्थ- आपल्याच कुळाचा नाश करणारा किंवा स्वतःच्या घराचा गुप्तशत्रू असा होतो.

सामवेदासंबंधी असलेल्या तांड्य ब्राह्मण महाग्रंथात वरील कथा आलेली आहे. देवदानवांच्या युद्धानंतर प्रत्येक देवाला वाटू लागले की मी आजपर्यंत केलेले कार्य, दाखवलेले चातुर्य फारच महान आहे. त्यामुळे सर्वांमध्ये मी फारच श्रेष्ठ आहे. हे मत ते एकमेकांना बोलून दाखवत नव्हते, मात्र हा अहंकार सर्व देवांच्या वागण्यातून व्यक्त होत होता.

सर्व देवांच्या व्यवहारातील कटुता, कडवटपणा, एकमेकांवर फेकले जाणारे शब्दबाण, वाग्बाण यांनी वाग्देवता-वाणीची देवता कंटाळून गेली होती. ती म्हणाली, हा सर्व कडवटपणा मलाच सोसायला लागतो. शब्द, भाषा हेच सर्व व्यवहाराचे साधन असते. मात्र माझे स्थान सर्वांच्या जिभेवर असूनही कोणी माझे महत्त्व जाणीत नाहीत. सर्वजण स्वतः आपण किती श्रेष्ठ आहोत याच विचारात मग्न आहेत.

या देव, देवतांना आपले महत्त्व समजण्यासाठी आपण देवलोकांतून अंतर्धान पावले पाहिजे, गायब झाले पाहिजे.

वनात विहार करण्याच्या निमित्ताने वाग्देवता घनदाट अरण्यात गेली. एका सुंदर तलावाच्या काठी कदंब वृक्ष वाढला होता. वाग्देवतेला तो वृक्ष फार आवडला. ती म्हणाली, ''मी या कदंब वृक्षाच्या खोडात लपून राहील, माझ्याशिवाय साऱ्या विश्वाचे व्यवहार बंद पडतील. देवांना एकमेकांशी बोलताच येणार नाही. मग तर माझे महत्त्व सर्वांना कळेल.'' असे म्हणून वाग्देवता कदंब वृक्षाच्या खोडात अंतर्धान पावली, लपून बसली. साऱ्या विश्वाची वाणी- भाषा

थंड झाली, गोठून गेली. पशू, पक्षी शांत झाले, नद्या, नाले, धबधबे साऱ्यांची खळखळ शांत झाली. कोकिळेचा पंचम ऐकू येईनासा झाला, मंदिरातले घंटानाद बंद पडले. सारे कसे शांत शांत झाले. मात्र सर्व देव अस्वस्थ झाले. मग देव वाग्देवतेला शोधायला निघाले. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी- समुद्रात, सर्व नगरात, वनात, डोंगर-पर्वतात सर्व ठिकाणी देव कासावीस होऊन वाग्देवतेचा कसून शोध घेत होते. थकले भागलेले देव वनात आले. एका सुंदरशा तळ्याकाठी कदंब वृक्ष फुलला होता. ते रम्य स्थान पाहून देवांनी तळ्याकाठच्या हिरवळीवर बैठक मारली.

कदंब वृक्षाच्या शेजारीच असलेला दुसरा एक काटेरी वृक्ष देवांना फांद्या हलवून काहीतरी सांगत आहे असे देवांच्या लक्षात आले. त्यांनी सावधपणाने खुणा करून वृक्षाला विचारले,





''बाबा रे, तू आमच्या वाग्देवतेला कुठे पाहिलेस का?'' त्या काटेरी वृक्षाने थेट आपल्या फांद्या कदंब वृक्षाकडे झेपावीत खूण केली, ''वाग्देवता या झाडात लपली आहे.'' असेच जणू तो सांगत होता. त्याबरोबर सारे देव आनंदित झाले. खुणेनेच एकमेकांना सांगू लागले वाग्देवता इथे लपली आहे. सारे देव कदंब वृक्षाच्या भोवती उभे राहिले व त्यांनी हात जोडून मनोमन प्रार्थना केली, ''हे वाग्देवते तू सर्व देवांमध्ये श्रेष्ठ आहेस, या विश्वाचा मूळ आधार तूच आहेस. तू नाहीस तर हे सारे विश्व मूक होईल. हे वागिश्वरी! आम्ही तुला मनःपूर्वक वंदन करतो.'' देवांच्या प्रार्थनेने प्रसन्न झालेली वाग्देवता कदंब वृक्षातून बाहेर आली. तिने देवांना

विचारले, ''या वृक्षात माझा निवास आहे हे आपणास कसे समजले?'' तेव्हा नेहमीच खरे बोलणारे- सत्यवचनी देव म्हणाले, ''हे वागिश्वरी, तुझा ठावठिकाणा आम्हाला या काटेरी वृक्षाने सांगितला.'' हे कळताच वाग्देवतेचा संताप अनावर झाला. ती म्हणाली, हे कंटक वृक्षा, मी तुझ्या सर्व वृक्षकुळालाच शाप देते की, ''तुम्हा सर्व वृक्षकुळाचा नाश तुमच्याच गोत्राकडून- कुळाकडून होईल. तुमच्याच फांद्या परशूला लावून मनुष्य तुमची वृक्षतोड करील.'' अशाप्रकारे जणू वाग्देवतेची चहाडी केल्याबद्दल वृक्षतोड होऊ लागली. त्यासाठी कुऱ्हाडीचा वापर होऊ लागला. वृक्षांची ही हत्या पाहून कुणीतरी सहृदय माणूस, कवी मनाचा माणूस म्हणाला, ''अरेऽऽरे, तो बघा तो कुऱ्हाडीचा दांडा आपल्याच गोताचा कसा काळ ठरतो आहे.''

मित्रांनो, हीच कुऱ्हाड आणि वाग्देवतेचा शाप मनुष्यजातीच्या मूळावरच उठला आहे. दरवर्षी जगात प्रखर सूर्यप्रकाशामुळे- त्यातील अतीनील किरणांमुळे साठ हजार माणसे भाजून मृत्युमुखी पडतात. कारण मोठ्या प्रमाणात होणाऱ्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. पाणीटंचाईला सारी पृथ्वी आता सामोरी जात आहे. वाग्देवतेला आपण प्रार्थना करूया, ''तुझा शाप तू परत घे. वृक्षतोड थांबव. ही पृथ्वी खऱ्या अर्थाने सुजलाम् सुफलाम् होऊ दे. वसुंधरा हे तिचे नाव तिला शोभू दे.'' सारेजण पर्यावरणाची प्रार्थना करू या. अन् 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ही म्हण इतिहासजमा करू या.

## दोन वेडे बकरे



# भूलभुलैय्या

वरून काळ्या गोलापासून सुरुवात करून खाली पांढऱ्या गोलापर्यंत जायचे आहे. कमीतकमी वेळात कसे जाल?





# स्पेशल टीचर

राजीव तांबे

**त्या** दिवशी माझा मुक्काम गावंडे सरांच्या घरी होता. रात्री जेवणं झाल्यावर,मी आणि सर अंगणात बसलो. इतक्यात जाधव सर पण आले. मग गप्पा सुरू झाल्या.

'आपल्या वर्गातली मुलं,मुलांचं शिकणं,मुलांसोबत शिकणं'असे गप्पांचे विषय होते. दोन्ही सरांनी खूप वेगवेगळे अनुभव सांगितले. ते ऐकताना तर मी अवाक् झालो होतो! त्यावेळी मला वाटलं, त्यांनी सांगितलेल्या किमान दोन गोष्टी तरी तुम्हाला सांगितल्याच पाहिजेत.

आता मी तुम्हाला जी गोष्ट सांगणार आहे,ती शंभर टक्के खरी गोष्ट आहे. ह्या गोष्टी म्हणजे दोन प्रसंग आहेत. आणि हे दोन्ही प्रसंग मला ह्या दोन शिक्षकांनीच सांगितलेले आहेत. ह्या शिक्षकांची नावं तीच आहेत फक्त त्यांच्या शाळांची नावं तुम्हाला सांगत नाही,कारण असे प्रसंग कुठल्याही शाळेत,कधीही  घडू शकतात.

### प्रसंग : एक

इंग्रजीचा तास होता. मुलांना स्पेलींग पाठ करुन यायला शिक्षकांनी सांगितलं होतं. आणि 'जर का चुका झाल्या तर एकेकाला चांगली शिक्षा करीन'असा सज्जड दम गावंडे सरांनी आधीच देऊन ठेवला होता!

गावंडे सर म्हणजे त्या शाळेतले खास 'इंग्रजी टिचर' म्हणून प्रसिध्द. गावंडे सर इंग्रजी शिकविताना कधी चुका करत नाहीत,त्यामुळे मुलांनी इंग्रजी लिहिताना किंवा बोलताना केलेली चूक त्यांना अजिबात चालत नाही.

'चूक केली,शिक्षा झाली!'अशी त्यांची सोपी पध्दत आहे.

इंग्रजीची भीती कमी होण्यासाठी ते मुलांकडून स्पेलींग चांगली घासून घेतात. आठवड्यातून दोन-तीन वेळा स्पेलींग पाठ करण्याचा गृहपाठ ते मुलांना देतात. आणि खरं म्हणजे सरांच्या भीती खातर,सर्व मुले सांगितलेली स्पेलींग कशीबशी पाठ करतात. 'पाठ स्पेलींग' पाहून गावंडे सर आनंदी होतात!  मात्र इंग्रजीचा तास संपल्यावर सर्व मुले सुटकेचा श्वास टाकतात.

इंग्रजीचा तास सुरू झाला. हातात छडी घेऊन गावंडे सरांनी वर्गात प्रवेश केला. त्यांचा असला अवतार पाहिल्यावर मुलांची धकधक वाढली.

ताबडतोब 'स्पेलींग परीक्षा'सुरू झाली. एखादे स्पेलींग चुकले तर ते मुलांना मारत नसत तर

जवळच्या टेबलावरच जोरात छडी आपटत असत. त्या छडीच्या सणसणीत आवाजानेच मुलांच्या काळजाचे पाणी-पाणी होत असे!

मग,ज्या मुलांची स्पेलींग चुकली होती त्यांना, प्रत्येक स्पेलींग शंभर वेळा लिहिण्याची शिक्षा झाली. ज्या मुलांना ही शिक्षा झाली,ती मुलं वैतागली. कंटाळली. मनातल्या मनात चरफडली.

पण करणार काय? स्पेलींग चुकलं तर शिक्षा भोगलीच पाहिजे ना!

वर्गातल्या सत्तावीस मुलांची स्पेलींग चुकली होती. काही मुलांच्या दहा-दहा,पंधरा-पंधरा चुका होत्या. त्यांना रात्रभर माना मोडून लिहावंच लागणार होतं.

कारण गावंडे सरांचा तसा नियमच होता. 'पाठ केलेलं स्पेलिंग जर सांगताना चुकलं तर ते किमान शंभर वेळा लिहून आणायचं! आणि लिहून आणल्यावर जर का ते स्पेलिंग चुकलं तर मग हाता-पायावर पट्टी खाऊन पुन्हा ते शंभर वेळा घासायचं.'

गौतमच्या नऊ चुका झाल्या होत्या.

दुसरा दिवस उजाडला. गावंडे सर 'चुकार मुलांच्या' वह्या तपासत होते.

एकच स्पेलिंग शंभर-शंभर वेळा लिहिलेलं पाहून,गावंडे सरांना समाधान होत होतं. आता मुलांचं इंग्रजी सुधारेल,त्यांच्या चुका होणार नाहीत ह्याबद्दल त्यांची मनोमन खात्री पटली होती. आणि..... अशी शिक्षा केल्याबद्दल त्यांच्या चेहऱ्यावर समाधान ही दिसत होतं.

इतक्यात त्यांनी गौतमची वही हातात घेतली. काल त्याच्या नऊ चुका झाल्या होत्या. म्हणजे त्याच्या वहीवर एकूण नऊशे शब्द हवे होते.

गौतमची वही तपासताना,सरांनी त्याच्या वहीची पानं भराभर उलटली. पुन्हा पहिल्या पासून वही चाळली.....पण....'ते नऊशे शब्द'त्यांना कुठेच दिसेनात!!

गावंडे सर जरा गांगरलेच!

ते रागाने लालेलाल झाले....

कारण,

गौतमने फक्त अठराच शब्द लिहिले होते! आणि त्यातले काही शब्द तर चक्क धड्याबाहेरचेच होते!!

आता 'पट्टी प्रसाद' मिळणार हे माहित असूनही गौतम घाबरला नव्हता! अजिबात चुळबूळ करत नव्हता. तोंड वेडवाकडं करुन गयावया करत नव्हता.

वर्गात शांतता पसरली. सारा वर्ग गौतमकडे आश्चर्याने पाहात होता! आता गौतमला काय शिक्षा होणार? ह्याबाबत साऱ्यांनाच उत्सुकता होती.

शांतपणे उभ्या असलेल्या गौतमकडे पाहात सरांनी जरासा राग गिळला. त्याला दोन सणसणीत पट्या माराव्यात अशी त्यांना अनिवार इच्छा झाली होती,पण त्यांनी ती मनातच ठेवली.

गौतमकडे जळजळीत रागाने पाहात,डोळे गरगर फिरवत, सरांनी आपल्या भुवया उंचावल्या!

'सर,काल मी घरी गेल्यावर खेळायला न जाता,स्पेलींग लिहायला बसलो होतो. तेव्हा बाबांना वाटलं मी अभ्यासालाच बसलो आहे! बाबा मला म्हणाले, 'दिवसभर वर्गात बसून-बसून अंग आखडून जातं रे. म्हणून शाळेतून आल्यावर लगेचच अभ्यासाला बसू नकोस. थोडावेळ मस्तपैकी खेळ आणि मग अभ्यासाला बस.'

मग मी बाबांना सांगितलं की, 'मी माझा अभ्यास मगच करणार आहे! सध्या मी माझी शिक्षा पुरी करतो आहे. चुकलेलं स्पेलिंग शंभर वेळा लिहिण्याची!!'

हे ऐकल्यावर बाबांना धक्काच बसला!

थोडावेळ विचार करून ते म्हणाले, 'हे बघ. मी तुला एक नवीन आयडीया सांगतो. ही आयडीया जर तुमच्या सरांना आवडली नाही तर मी तुमच्या सरांना अवश्य भेटायला येईन. पण.......................
तू कृपया,ते चुकलेलं स्पेलिंग शंभर-शंभर वेळा लिहू नकोस रे!!. प्लीऽऽज, ही शब्दांची हमाली थांबव!!



अरे,शंभरच काय पण हज्जार वेळा लिहून पण स्पेलिंग पाठ होत नाही! आणि जरी पाठ झालं तरी त्याचा अर्थ समजत नाही!

अरे गौतम,शब्दाचा अर्थ समजून वाक्यात उपयोग करता येणं म्हणजे ती भाषा समजणं!! स्पेलिंग पाठ केल्याने भाषा काही समजत नाही बरं!!!....''

गौतमला पुढे बोलू न देता,गावंडे सर वैतागून ओरडले, 'अरे,इंग्रजीचे स्पेशल टीचर कोण आहेत? मी की तुझे बाबा?............बरं-बरं,मला सांग, काय आहे ती आयडीया?''

गौतम चाचरत पुढे बोलू लागला, 'सर,माझी चुकलेली नऊ स्पेलिंग मी पाठ केलीच आहेत! पण शिक्षा म्हणून,पाठ्यपुस्तकात नसणारे पण रोजच्या व्यवहारातले असे नऊ शब्द मी निवडले. शब्दकोशात त्यांचं स्पेलिंग शोधलं. त्यांचे वेगवेगळे अर्थ पाहिले,आणि ते शब्द मी पाठ केले!

मी हे अठरा शब्द पाठ केलेच,पण सर,मी त्यांचा वाक्यात ही उपयोग करू शकतो.... .. तशी वाक्यं मी लिहून.......''

गौतमला मधेच थांबवत गावंडे सर म्हणाले, 'हे बघ गौतम,पण ह्यातलाच तुझा एखादा शब्द चुकला तऽऽऽऽऽऽऽर....?''

'एक शब्द चुकला तर मी दोन शब्द पाठ करीन सर!'' गौतम ताडकन म्हणाला.

गावंडे सर क्षणभर अवाक् झाले!!

गौतमच्या वडिलांचा मुद्दा त्यांना पटला होता!! पण तो नेमकेपणाने कसा मांडावा,हेच त्यांना कळत नव्हतं.

गौतम पुढे म्हणाला, 'सर....सऽऽऽर,माझी शिक्षा मी घेईन. पण...

सर,एक शब्द चुकला म्हणून तो शंभर-शंभर वेळा लिहायला सांगून,मला शब्दांची हमाली करायला सांगू नका होऽऽ.

सर,माझं चुकत असेल तर समजून घ्या. माझी चूक मी सुधारीन.

मला खूप शिकायचं आहे.

मोठं व्हायचं आहे.

तुमच्या सारखं शिक्षक व्हायचं आहे,मला 'स्पेशल टिचर' व्हायचं आहे!!

आता सर काय बोलणार? सर काय करणार? ह्याकडे सगळ्या वर्गाचं लक्षं लागलं होतं. गौतम खरोखरीच शांतपणे उभा होता!

गावंडे सर गौतम जवळ गेले. त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. त्याची पाठ थोपटली. पण सरांना इतकं भरून आलं,की त्यांना काही बोलताच आलं नाही.

'छोट्या स्पेशल टिचरने' चटकन वाकून सरांना नमस्कार केला!

सरांनी गौतमच्या डोक्यावरुन प्रेमाने हात फिरवत त्याला स्पेशल आशीर्वाद दिला!!

गावंडे सरांचं बोलणं संपलं आणि कुणीच काही बोललं नाही.

डोळ्यांच्या कडा पुसत गावंडे सर म्हणाले, 'शब्दांच्या हमालीची शिक्षा बंद केली आणि विशेष म्हणजे,तेव्हापासून मुलांच्या चुकाही कमी झाल्यात!पण..........

खरं सांगतो,आता मुलांना शिक्षा करताना,पूर्वीसारखं वाईट वाटत नाही!!

शिक्षा झालेल्या मुलांना 'आपण अपराधी आहोत' असं ही वाटत नाही,कारण त्यांना नवीन शब्द शोधायचे असतात,त्याचे शब्दकोशात अर्थ पाहायचे असतात आणि त्याचा वाक्यात उपयोग!! हा सारा प्रकार म्हणजे,मुलांसाठी अभिनव 'शब्द उपक्रमच!'....

गावंडे सरांनी माझ्याकडे आणि जाधव सरांकडे पाहात अंदाज घेतला. त्यांना आणखी काहीतरी नक्कीच बोलायचं होतं.

आम्ही अंगणात बसलो होतो. लख्ख चंद्रप्रकाशात त्यांचा चेहरा उजळला होता.

मी त्यांचा हात हातात घेत म्हणालो, 'बोला ना.मला माहित्येय,तुम्हाला आणखी काही बोलायचं आहे! हो ना?''

गावंडे सर मंदपणे हसत पुढे म्हणाले, 'मुलांनी भराभर शिकावं,त्यांची स्पेलिंग पाठ व्हावीत,त्यांची इंग्रजीची भीती जावी ह्यासाठी मी पूर्वी मुलांना शिक्षा करायचो.

पण तसं व्हायचं नाही! मग मी निराश व्हायचो आणि पुन्हा शिक्षा करायचो!!

आणि तरीही...... मला सगळेजण 'स्पेशल टिचर' म्हणायचे!

पण आज...... शिक्षा बंद केली,मुलांशी मैत्री केली आणि माझ्या स्वप्नातला वर्ग मला पाहता आला!

आज मुलांमधे चुरस आहे,नवीन शब्द शोधण्याची,शब्दकोश वापरण्याची,भाषा शिकण्याची... ....आणि ह्यासाठीच तर मी प्रयत्न करत होतो!!

खरं सांगतो, 'जर का शिक्षकाने मुलांचाच 'स्पेशल विचार' केला तरच तो शिक्षक होऊ शकतो, स्पेशल टिचर!!' ही नवीनच गोष्ट मला गौतमच्या वडिलांमुळे समजली!!

आता जाधव सर पुढे सरसावले. चेहरा कसानुसा करत ते म्हणाले, 'आता शिक्षांचाच विषय निघाला म्हणून एक सांगतो,आम्ही जेव्हा मुलांना शिक्षा करतो तेव्हा मुलांना वाटतं, आम्ही खूप दुष्ट आहोत,वाईट आहोत,मुलांना शिक्षा करण्यात आम्हाला खूप आनंद होतो. पण...

पण...मुलांनी सुधारावं,त्यांनी चुका करु नयेत,वेड्यासारखं वागू नये म्हणून आम्ही त्यांना शिक्षा करतो.

मुलांना शिक्षा करताना आम्हाला खूप म्हणजे खूपच वाईट वाटतं हो! मुलांना त्रास देऊन,त्यांना दुःखी करुन कुठल्या शिक्षकाला आनंद होईल हो? सांगा ना?

मुलं आमचं मन समजून घेत नाहीत,आमच्याशी मोकळेपणाने बोलत नाहीत........''

मी त्यांना मधेच थांबवत म्हणालो, ‘जाऊ द्या हो जाधव सर. काय एव्हढं मनाला लावून घेताय? अहो,मूल समजून घेण्याची आंतरिक इच्छा असली आणि मुलांकडून शिकण्याची तयारी असली ना,की शिक्षा करावीच लागत नाही ना? काऽऽय? अहोऽऽ....’’

पण त्यांनी मला खुणेनेच गप्प बसवलं आणि पुढचा प्रसंग सांगितला.

**प्रसंग : दोन**

शाळेत वाचनाचा तास असतो. ह्या तासाला वाचण्यासाठी, ‘पुरवणी वाचनाचे’एक पुस्तक आहे. अनेक वेळा सांगूनही,खूप मुले पुस्तके आणण्याचा आळस करतात.

ह्या आळशी मुलांना धडा शिकविण्याचं,जाधव सरांनी ठरवलं.

आधल्या दिवशी,त्यांनी मुलांना बजावून सांगितलं, ‘जो कुणी उद्या पुरवणी वाचनाचं पुस्तक आणायला विसरेल,त्याला, ‘पट्टी प्रसाद’ मिळेल! उद्यापासून आठवणीने पुस्तक आणा.

इतकं सांगून सुध्दा,दुसऱ्या दिवशी तेरा मुलं पुस्तकं आणायला विसरली.

इतकं तळमळीने सांगून सुध्दा मुलं ऐकत नाहीत हे पाहिल्यावर जाधव सरांना राग आला. त्यांचे डोळे मोठे झाले,भुवया उंचावल्या. पट्टी प्रसाद देण्यासाठी त्यांचे हात शिवशिवू लागले. त्यांनी हातात लाकडाची जाड पट्टी घेतली.

पट्टीची जाडी पाहताच,मुलांना प्रसादाची कल्पना आली!! त्यांचे हात वळवळू लागले! चेहरे वाकडे तिकडे झाले.

‘पुस्तक आणणारे’ आणि ‘पुस्तक न आणणारे’ ओळखणं अगदीच सोपं झालं.

पण....

पुस्तक न आणून सुध्दा परेश शांत होता!! आपल्याला ‘प्रसाद’ मिळणारच नाही,ह्याची त्याला जणू काही खात्रीच होती.

तो जाधव सरांना म्हणाला, ‘सऽर,मी पुस्तक आणलेलं नाही. आणि पुस्तक आणणं मला जमणार नाही.’’

हे ऐकताच सर बाकी मुलांना सोडून,परेश कडेच वळले.

आता काय होणार?

परेशच्या ह्या अशा उत्तराने त्याला ‘प्रसादच’ काय पण,आता त्याला ‘महाप्रसादच’ मिळणार, ह्या विषयी मुलांची खात्रीच पटली.

साऱ्या वर्गाची उत्सुकता वाढली.

सगळी मुले परेशकडे टकामका पाहू लागली. त्याला खूणेनेच समजावू लागली.

पण परेश शांतच होता.

जाधव सर परेश समोर उभे राहिले.

सर म्हणाले, 'हे बघ परेश,आज वाचनाचा तास आहे हे तुला माहीत होतं ना? आणि सर्वांनी न विसरता पुस्तक आणलंच पाहिजे,असं मी काल बजावलंही होतं! तरीपण तू का नाही आणलंस पुस्तक?''

परेश नाक फुगवून म्हणाला, 'सर,काल तुम्ही सांगितलेलं माझ्या लक्षात होतं. पण सर....पुरवणी वाचनाचं पुस्तक न घेताच मी त्यातल्या गोष्टी वाचू शकतो,सर! म्हणून नाही आणलं ते पुस्तक!!...''

त्याला मधेच थांबवत,चढ्या आवाजात सर म्हणाले, 'परेश काय ते सरळ सांग. उगाच जादा शहाणपणा करू नकोस. नाही तर मिळेल........'

सगळी मुले एकदम ओरडली,'महाप्रसाऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽऽद..''

सरांनी खाडकन पट्टी बाकावर आपटली.

वर्गात शांतता पसरली.

'सर,रागावू नका. माझी आई,वाघमारेंकडे धुणी-भांडी करायला जाते. त्यांच्याच मुलीची जुनी पुस्तके मी वापरतो.

मागच्या वर्षी तिच्या हातून पुरवणी वाचनाचे पुस्तक हरवले. त्यामुळे ह्या वर्षी ते पुस्तक मला मिळाले नाही. आणि नवीन पुस्तक विकत घेण्याची माझी ऐपत नाही.

म्हणून...

म्हणून,शाळा सुरू होण्याआधीच मी हे छोटंस गोष्टीचं पुस्तक पाठच करुन टाकलं!

सर,मी ते पुस्तक न उघडता,त्यातली कुठलीही गोष्ट वाचू शकतो,सांगू शकतो.''

परेशच्या ह्या बोलण्यावर सगळा वर्ग त्याच्याकडे आश्चर्याने व कौतुकाने पाहू लागला.

जाधव सर परेशची पाठ थोपटत म्हणाले, 'शाबास! परेश माझ्याकडे ह्या पुस्तकाची एक प्रत अधिक आहे,ती मी तुला देईनच,पण त्याच्या सोबत तुला मजेदार गोष्टींचं एक नवीन पुस्तक पण देईन!''

वर्गातल्या मुलांनी उत्सफूर्तपणे टाळया वाजवल्या!

परेश थोडासा संकोचला. लाजला.

हा प्रसंग सांगितल्यावर जाधव सर म्हणाले, 'पाहा ना,मी त्या परेशला शिक्षा करणार होतो,तर मलाच प्रसाद मिळाला! असा हुशार मुलगा आपला विद्यार्थी आहे,ह्याचा मनापासून आनंद पण झाला!!

एक सांगतो,आपल्या विद्यार्थ्याने काही वेगळं,असामान्य करुन दाखविल्यावर, त्याच्यापेक्षाही त्याच्या शिक्षकांनाच अधिक आनंद होतो; आणि.......

हे त्या मुलांनाही माहीत असतं बरं!!'

मला आणि गावंडे सरांना,जाधव सरांचं म्हणणं पटलं.

गावंडे सर म्हणाले, ‘अहो,मुलांशी दोस्ती केली,मैत्री केली की त्यांना शिक्षा करावीच लागत नाही........’’

गावंडेंना मधेच थांबवत जाधव सर म्हणाले, ‘कारण,मुलांना समजतं प्रेम,मुलांना समजते मैत्री! आणि मैत्रीत काय किंवा प्रेमात काय,शिक्षेला स्थानच नाही ना? काऽऽय?’’

आम्ही तिघांनी माना डोलावल्या.

गप्पा मारताना कळलंच नाही की आता बहुधा,रात्र संपून पहाटेला सुरुवात होणार आहे.

कारण गप्पा सुरू झाल्या तेव्हा चंद्र आमच्या अंगणातच होता;आता तो त्या लांबच्या शाळेपाशी सावकाश उतरत होता!!

■

## थोडं तुमच्या भल्यासाठी

लवकर निजा नि लवकर उठा
ही सवय लावून घ्याल स्वतःला
आरोग्य तुमच्या घरी येईल
स्वतः तुम्हाला भेटायला।।१।।
कार्टून हवं अन् कंप्यूटर हवा
खरंय म्हणणं तुमचं
पण मोकळया हवेत व्यायाम हवा
हे म्हणणंही खरंय आमचं।।२।।
पाढेही पाठ, अन् झालाय गृहपाठ?
आईबाबा नक्कीच थोपटतील पाठ।।३।।
डब्यातल्या खाण्यासाठी हट्ट नको
केकच हवा हे मत घट्ट नको
शाळेच्या डब्याला पोळीभाजीच बरी
चमचमीत खा तुम्ही आल्यावर घरी।।४।।
माहितीय ही अपेक्षा
जरा जास्तीच होतेय
पण खूप जास्ती केली,
तर थोडी पुरी होतेय।।५।।
तुमच्यात नि आमच्यात
एक अलिखित करार
शहाण्यासारखे वागाल तर
लाडके व्हाल फार ।।६।।

## ऐकलंत का?

वस्तू ठेवा जागेवर रोजच्या
शोधाशोध नको वेळेत सकाळच्या।।१।।
बाबा असतात घाईत ऑफिसच्या
आई असते कामात घरच्या।।२।।
सकाळच्या वेळेत तिला फारच घाई
सगळयांच्या तैनातीत तिचा वेळ जाई।।३।।
कुणाची आई, जाते ऑफिसमध्ये
कुणाची शिकवते कॉलेजमध्ये।।४।।
तरी घरातली कामं तिला चुकत नाहीत
नोकरी करते तरी घरात सवलती नाहीत।।५।।
आजीला धांदल आंघोळीची
तुम्हाला काळजी तुमच्या डब्याची।।६।।
बुटांना पॉलिश ठेवा करून
शाळेच्या घाईत नका बसू रुसून।।७।।
पाण्याची बाटली घरी विसरू नका
कुठलं तरी पाणी पिऊ नका।।८।।
आईला दाखवा चांगली मुलं बनून
मदत करा तिला चांगलं वागून।।९।।

**संध्या रानडे**
फोन नं. २५६५२७७६/२५६७४७६७



# परीची गोष्ट

डॉ. विजया वाड

शुभदा कामाला निघाली होती. समीर म्हणाला, ''शुभदा, आज तू कामाला जाऊ नकोस.''

''का रे बाबा? आपली परी गेल्या आठवड्यात तापली होती तेव्हा मीच रजा घेतली होती.''

''अग, पण आज सकाळीच मायाबाईचा फोन आला होता. आज ती परीला सांभाळायला येऊ शकणार नाही. तिच्या पोटात दुखतंय.''

''बरं हिच्या नेहमी पोटात दुखतं. कामावर यायला नको. दुसरं काय?''

''आई, तुझ्या केव्हा दुखेल पोटात?'' परीनं विचारलं.

''का ग बाई? असं का विचारतेस परी तू?''

''अग म्हणजे तू कामावर जाणार नाहीस आणि माझ्या जवळच राहशील.''



''अगं लब्बाडे!'' आई परीला असं म्हणाली आणि तिनं परीला घट्ट जवळ घेतली.

''शुभदा, आज माझ्या ऑफिसमध्ये इन्सपेक्शन आहे. तेव्हा...''

''ठीक आहे. तू जा. तुझी सदाचीच रड आहे. आज हे नि उद्या ते!'' शुभदाचा स्वर तापला.

''हे बघ आई! तुम्ही दोघं खुशाल कामावर जा. मी घरात एकटी राहीन. मुळीच घाबरणार नाही. मात्र तू मला ऑफिसातून थोड्या थोड्या वेळानं फोन कर. करशील ना?''

''नको ग. माझा जीव होत नाही.''

परी छानपैकी इडल्या खात होती. तिचा बाबा समीर तिच्या शेजारीच बसला होता. तो परीच्या आईला म्हणाला,

''आज काय करूया ग शुभदा? आत्ताच परीच्या मायाबाईंचा फोन होता.''

''काय? आज पण दांडी वाटतं?'' परीची आई एकदम नाक फुगवून रागावून म्हणाली.

माया परीला सांभाळायची. शुभदा आणि समीर कामावर जायचे.

''आज तिचं पोट दुखतंय.'' समीर म्हणाला.

''बरं हिचं सतत काही ना काही दुखतं. आज काय पोट, उद्या काय कंबर!'' शुभदा बडबडली.

''माझ्या ऑफिसात आज इन्सपेक्शन आहे ग.''

''समीर, तुझं हे नेहमीचं आहे. अरे, सारखं मी ऑफिसला न जाणं बरं दिसत नाही. कधी तरी तूही रहात जा घरी. परीला मोठं करणं ही आपली संयुक्त जबाबदारी आहे.''

''पण मी काय करू सांग?''

''जा ऑफिसला!''

''आई नि बाबा... भांडू नका. मी आता मोठी झालेय.''

''अस्सं का?'' आईनं परीचा गाल कुरवाळला.

''मी एकटी राहीन.''



''अरे वा!''

''अग खरंच सांगते. खोटं नाई.''

''मुळीच नको.'' आई म्हणाली.

''मी गॅसला हात लावणार नाही. पंख्यात बोट घालणार नाही. तुला काळजी नको. तू जा ऑफिसला.''

''अग मला काळजी वाटेल परी!'' शुभदा म्हणाली.

''सांगितलं ना! मी मोठी झालेय म्हणून!''

''अगं पण...''

''मला भीती वाटली तर मी कळवीन नं तुला. मग तू रिक्षात बसून लग्गेच ये.''

परीनं हट्टच केला. ''मग मी अर्धा दिवसाची रजा घेऊन येते.''

''ओक्के. बाहेरून कुलूप लाव. म्हणजे

तुला भीतीच नाही की कुणी मला पळवून नेईल.''

''किती शहाणी आहे ना आपली परी!'' समीर म्हणाला.

दोघं शंभरदा सूचना देऊन निघाली. परीसाठी टीव्हीवरची कार्टून नेटवर्क लावून दिली होती. खूप वेळ बघू नको म्हणून सूचना सुद्धा दिली होती.

परीला कार्टून बघून कंटाळा आला म्हणून तिनं चॅनल बदलला. आणि काय आश्चर्य! तिथे एक दुसरी परी होती. खरी खुरी. पंख असलेली परी!

''हॅलो! मी येते हं तुझ्याशी खेळायला.'' ती म्हणाली. आणि खुशाल टीव्हीतून उडून बाहेर आली.

''तुला असं टीव्हीतून कुठेही उडता येतं?''

''अग मी ही जादूची कांडी घेऊन फिरते ना! त्यामुळे मला काहीही करता येतं. त्यातून तूही 'परी' नि मीही परी.'' परी हसून म्हणाली.

''पण मला पंख कुठे आहेत तुझ्यासारखे?''

''मनाचे तर पंख आहेत ना? डोळे मिट. मनानं पंख लाव नि हव्वं ते करून ये.''

''आयडिया.'' परीनं तर उडीच मारली. म्हणाली, ''बघ हं! मी एक गमतीदार गोष्ट मागणार आहे. नव्हे... करणार आहे.''

परीनं डोळे मिटले. आणि मनानं उडत तिनं आईच्या ऑफिसातल्या सगळ्यांना अंगणात जमवलं. ऑफिसला मोठ्ठं टाळं लावलं नि म्हणाली, ''पळा घरी!'' सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

परीनं डोळे उघडले. बघते तो काय? टीव्हीतली परी गायब नि आई समोर हजर! ''छोन्या, बबड्या. मी ऑफिसातून निघून आले. जीवच लागेना.'' तिनं परीला जवळ घेऊन म्हटलं, ''तू कसली आलीस? मी जादूनं आणली तुला.'' परी म्हणाली. आई त्यावर गोड हसली. मज्जा नं बालदोस्तांनो?

■

## हास्यकॉर्नर



बाई : तुम्ही सगळे या देशाचे उद्याचे मतदार आहात.

सोहन : बाई, कसं शक्य आहे?

बाई : का नाही?

सोहन : बाई, आज मी १२ वर्षांचा आहे. एक दिवसात १८ वर्षांचा कसा होणार?

## ‘अशी झाली माझी फजिती’ स्पर्धेतील विजेते लेख



**प्रथम क्रमांक**

एका शुक्रवारी मला आणि माझ्या आईला मामाच्या गावाला जायचे होते.

आई म्हणाली, ‘सरांना विचारून शाळेतून सुटी घेऊन लवकर घरी ये.’

मी म्हणालो, ‘ठीक आहे, मी दुपारी येईन.’

शाळेत गेल्यावर खूप उत्सुकता होती. ‘दुपार कधी होईल? आम्ही गावाकडे कधी निघू?’ कसेबसे धीर एकवटून मी सरांना सुटीविषयी विचारले. तेव्हा सरांनी लगेच परवानगी दिली.

त्या आनंदाच्या भरात मी शाळेतून येताना चुकून मित्राचेच दप्तर आणले. घरी येईपर्यंत कळलेच नाही. आई म्हणाली, ‘हे कोणाचे दप्तर?’ तेव्हा लक्षात आले, आपण चुकून मित्राचेच दप्तर आणले. आई म्हणाली, ‘अरे, जा आता पुन्हा शाळेत. मित्राचे दप्तर देऊन ये. मगच मामाच्या गावाला जाऊ.’

शाळेत गेल्यावर गडबडीने मित्राला त्याचे दप्तर परत केले आणि माझे दप्तर घेऊन आलो. मात्र या वेळेसही चूक झाली. ती म्हणजे गडबडीत वर्गाबाहेर ठेवलेल्या चपलांपैकी दुसरीच चप्पल घेऊन आलो.

आता मात्र आई चिडली. ‘‘अरे, आता या कोणाच्या चपला आणल्यास...?’’

तेव्हा मी म्हणालो, ‘जाऊ दे आता... मामाच्या गावावरून परत आल्यावर बघू...’

अशी माझी झाली फजिती.

**संदीप प्रल्हाद काळे**

जि. प. प्राथमिक शाळा, ता. गेवराई, जि. बार्शी.

**द्वितीय क्रमांक**



एके दिवशी शाळेतला अभ्यास केल्यावर मी हळूच पप्पांजवळ गेलो आणि म्हणालो, ‘पप्पा, मला स्कॉलरशिपचे गाईड हवंय. आपण बाजारात जाऊया.’

मी अतिशय गंभीरपणे बोलतोय असं वाटून पप्पांना हसू आले आणि म्हणाले, ‘‘चल. ठीक आहे. जाऊया.’

तेवढ्यात आमच्याकडील लाइटच गेले! तरीदेखील मला

स्कॉलरशिपचे गाईड घ्यायचेच म्हणून पप्पांबरोबर तयारी करून बाहेर पडलो. थोडे अंतर चालत गेल्यावर लाईट आले. सार्वजनिक ग्रंथालय समोरच होते. म्हणून नेहमीप्रमाणे मी पप्पांबरोबर ग्रंथालयात गेलो. पप्पा पेपर वाचत बसले. त्याच वेळेस माझ्या लक्षात आले की, मी माझा शर्ट उलटाच घालून बाहेर पडलोय. मी पपांकडे बघत आजूबाजूलाही बघितले. माझ्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. मी हळूच बाजूला सरकलो. शर्ट काढणार तेवढ्यात पप्पांनी आवाज दिला. शुभमऽऽऽ, ए शुभमऽऽऽ' आणि पप्पा मला शोधत बाहेर आले. आणि म्हणाले, 'काय रे शुभम?' तसा मी खूप ओशाळलो. मनाचा हिय्या करून मी पप्पांना सांगितले, 'अहो पप्पा, मी अंधारात उलटा शर्ट घालून आलो.' असं सांगितले आणि शर्ट नीट घातला. त्यानंतर ग्रंथालयातून बाजारात गेलो. स्कॉलरशिपचे गाईड घेऊन घरी आलो. मम्मी-पप्पांबरोबर जेवायला बसलो. उलट्या घातलेल्या शर्टविषयी पोट धरून हसलो. हसत हसतच जेवण पूर्ण केले.

**शुभम श्यामसुंदर साळुंखे**
द्वारा. आर. एन. पाटील, सीतारामनगर
मराठा सेक्शन-३२, उल्हासनगर- ४. जिल्हा ठाणे

**तृतीय क्रमांक**



**अ**चानक घरातले लाइट गेले होते. माझी दीड वर्षाची बहीण बेडरूममध्ये झोपली होती हे मला माहीत नव्हते. मी अंधुक प्रकाशाच्या ओघाने आत गेलो, पण चुकून तिच्या अंगावर माझा पाय पडला. मी खूप घाबरलो. ती जोरजोरात रडू लागली. मला काही सुचेना. घरात आई-बाबा नेमके नसल्यामुळे माझी पंचाईत झाली.

मी तिला जवळ घेतले आणि तिची समजूत काढू लागलो. पण काही केल्या ती शांत होईना. तिला जास्त त्रास झाला असणार. मी तिला बाहेर पण घेऊन जाऊ शकत नव्हतो. थोड्या वेळाने आई-बाबा आले. ती रडत असलेली पाहून मला विचारू लागले की 'काय झाले...?' मी म्हणालो, 'अंधारातून जात असताना चुकून तिच्या अंगावर माझा पाय पडला. म्हणून ती रडते आहे.'

तेव्हा आई-बाबा खूप रागावले. 'अंधारात कशाला कडमडलास?' म्हणाले. तेव्हापासून मी ठरवले, अंधार झाला, लाइट गेले की एका जागी बसून राहायचे. कोठेही फिरायचे नाही, नाहीतर अशी फसगत होते.

**लवलीन तन्मय वैद्य**
२०८, संयुक्ता अपार्टमेंट,कसबा पेठ, शनि टेंपल जवळ, सोलापूर- ४१३००७

निळया रंगाच्या खडूने चेंडूपर्यंत पोचण्याचा दोरा रंगवा.



तुमच्या आवडत्या रंगांनी चित्र रंगवा



## दयाळू बदक



# दोन बोके एक पक्षी

